आमचा जो प्रभू व तारणारा येशू ख्रीस्त।

त्याविषयीं

हा नवा करार।

अमेरिकेंतील प्रेषितानीं।

हेलेनी मूळ भाषा इंतून मराठी भाषेंत

उतरला॥

ही दुसरी छापणी मुंबईंतील शास्त्र मंडळीसाठीं।

ख्रीस्ती शक १८३०व्यांत।

झाली॥

THE

NEW TESTAMENT

OF

OUR LORD AND SAVIOUR JESUS CHRIST;

TRANSLATED FROM THE ORIGINAL GREEK,

INTO THE

MURAT,HEE LANGUAGE,

BY THE AMERICAN MISSIONARIES.

SECOND EDITION:

PRINTED FOR THE BOMBAY AUXILIARY BIBLE SOCIETY,

1830.

अनुक्रमणिका ॥

ह्या पुस्तकाच्या छापण्यांत पुढील चुका पडल्या ॥

प्रकरण	पर्व	ओवी	अशुद्ध		शुद्ध
मात्थी	२	११	च्या वाहाण्या	—	चे जोडे
	९	१६	काढील	—	काढितें
	१०	१०	वाहाणा	—	जोडे
मार्कस	७	५	दंतकथेप्रमाणे	—	वडिलांच्या दंतकथेप्रमाणें
	८	१७	भूत	—	मुकें भूत
	८	२५	त्यानी	—	त्याने
	१२	२९	दवे	—	देव
लूका	७	१०	तें	—	ते
	१८	३१	यरुशलेमास	—	यरूशलेमास
	२३	७	यरुशलेमांमध्यें	—	यरूशलेमामध्यें

मात्थीकडून सुवर्तमान ॥

पर्व १॥ १ आब्राहामाचें संतान दावीद, याचें संतान येशू ख्री
स्त, ह्याच्या कुळागतीचें पुस्तक ॥
२ आब्राहामाने इस्साकाला जन्मविलें॥ आणि इस्साकाने याकोबा
ला जन्मविलें॥ आणि याकोबाने यहूदा, व याचे भाऊ यांस जन्म
विलें॥ २ आणि यहूदाने फारेज व जाराह, यांस, थामारेपासून
जन्मविलें॥ आणि फारेजाने हेस्रोनाला जन्मविलें॥ आणि हेस्रोना
ने अरामाला जन्मविलें॥ ४ आणि अरामाने आमीनादाबाला ज
न्मविलें॥ आणि आमीनादाबाने नाहशोनाला जन्मविलें॥ आणि
नाहशोनाने साल्मोनाला जन्मविलें॥ ५ आणि साल्मोनाने बवाजा
ला राहाबेपासून जन्मविलें॥ आणि बवाजाने ओबेदाला रूथेपासू
न जन्मविलें॥ आणि ओबेदाने इशायाला जन्मविलें॥ ६ आणि इ
शायने दावीद राजा, याला जन्मविलें॥ आणि दावीद राजा, या
ने ऊरीयाची जी, तीजपासून शलमोनाला जन्मविलें॥ ७ आणि
शलमोनाने रहबामाला जन्मविलें॥ आणि रहबामाने अबीयाला
जन्मविलें॥ आणि अबीयाने आसाला जन्मविलें॥ ८ आणि आ
साने यहोशाफाटाला जन्मविलें॥ आणि यहोशाफाटाने योरामाला
जन्मविलें॥ आणि योरामाने उजीयाला जन्मविलें॥ ९ आणि उ
जीयाने योथामाला जन्मविलें॥ आणि योथामाने आहाजाला ज
न्मविलें॥ आणि आहाजाने हजकीयाला जन्मविलें॥ १० आणि
हजकीयाने मनाश्शे याला जन्मविलें॥ आणि मनाश्शे याने आमो
नाला जन्मविलें॥ आणि आमोनाने योशीयाला जन्मविलें॥ ११ आ
णि योशीयाने यखन्या व याचे भाऊ यांस, बाबेलच्या प्रवासांत जाल्या

वेळेस जन्मविलें॥ १२ आणि बाबेलच्या प्रवासांत गेल्यावर, यख
न्याने शालतियेलाला जन्मविलें॥ आणि शालतियेलाने जरुबाबेलाला
जन्मविलें॥ १३ आणि जरुबाबेलाने अबीहूदाला जन्मविलें॥ आ
णि अबीहूदाने एल्याकीमाला जन्मविलें॥ आणि एल्याकीमाने आ
जोराला जन्मविलें॥ १४ आणि आजोराने जादोकाला जन्मविलें॥
आणि जादोकाने आखीमाला जन्मविलें॥ आणि आखीमाने ए
लीहूदाला जन्मविलें॥ १५ आणि एलीहूदाने एलाजाराला जन्म
विलें॥ आणि एलाजाराने मात्थानाला जन्मविलें॥ आणि मात्थाना
ने याकोबाला जन्मविलें॥ १६ आणि याकोबाने योसेफ, जो मारये
चा नवरा याला जन्मविलें॥ तिजपासून येशू, जो खीस्त ह्मटला, तो
जन्मला॥ १७ यास्तव सगळ्या पिढ्या, आब्राहामापासून दावीदापर्यं
त, चवदा पिढ्या। आणि, दावीदापासून बाबेलच्या प्रवासांत जाण्या
पर्यंत, चवदा पिढ्या। आणि बाबेलच्या प्रवासांत जाण्यापासून खी
स्तापर्यंत, चवदा पिढ्या॥

१८ आणि येशू खीस्ताचा जन्म या प्रकारें जाला। कीं त्याची
आई मारया योसेफाशीं लग्नास पत्करली असतां, त्यांची संगती जा
ल्यापूर्वीं, ती, पवित्र आत्म्याकडून गरोदर, सांपडली॥ १९ तेव्हां
तिचा नवरा योसेफ, यथार्थीक असून, आणि तिची धिंड काढा
यास न इच्छून, तिला गुप्तरूपें सोडायास योजिता जाला॥ २० प
रंतु तो त्यांविषईं चिंतन करीत असतां, पाहा, प्रभूचा दूत त्याला
स्वप्नांत दिसून, बोलिला, हे योसेफा, दावीदाच्या संताना, तुझी बा
यको मारया, इला अंगिकारायास भिऊं नको। कां कीं, जें तिजमध्यें
जन्मविलें, तें पवित्र आत्म्याकडून आहे २१ आणि ती पुत्राला
प्रसवेल, आणि तूं त्याचें नांव येशू ठेवसील, कारण कीं, तो आप
ल्या लोकास त्यांच्या पापांपासून तारील॥ २२ आणि हें अवघें
ह्यासाठीं जालें, कीं प्रभूने, भविष्यसांगणाराकडून जें ह्मटलें, तें
पूर्ण व्हावें, कीं २३ पाहा, कुंवार गरोदर होईल, आणि पु
त्राला प्रसवेल, आणि त्याचें नांव इम्मानुवेल ह्मणतील, ह्मणजे अ
र्थ उतरल्यास, आह्मासंगतें देव॥ २४ तेव्हां योसेफाने झों

पेंतून उठून. प्रभूच्या दुताने जशी आज्ञा दिल्ही. तसें केलें.
कीं आपल्या बायकोला अंगिकारिलें। २५ पण। तो आपल्या प्रथ
मसंभवल्या पुत्राला प्रसवे. तोंपर्यंत त्यानें तिला जाणलें नाहीं. आ
णि त्याचें नांव येशू ठेविलें॥

पर्व २॥ १ आणि। यहूदांतील बेथलेहेमांत। हेरोद् राजा. याच्या
दिवसांमध्यें येशू जन्मला असतां. पाहा. पूर्वेकडून ज्ञानी यरूशलेमां
त येऊन. २ बोलिले. यहूद्यांचा राजा. जो जन्मला तो को
ठे आहे? कां कीं. आम्ही उगवतीत त्याचा तारा पाहिला। आणि
त्याला भजायास आलों॥ ३ तेव्हां [हें] ऐकून। हेरोद् राजा। आ
णि त्याच्या समागमें सर्व यरूशलेम घाबरे जाले॥ ४ नंतर सर्व
मुख्य उपाध्ये. आणि लोकांचे पंडीत. यांस मिळवून। त्याने त्यांच्या
जवळ पुसलें। [कीं] ख्रीस्त कोठे जन्मावा? ५ तेव्हां, ते त्याला बो
लिले, यहूदांतील बेथलेहेमांत। कां कीं. भविष्यसांगणाराकडून असें
लिहिलें आहे. ६ कीं हे यहूदाच्या देशांतील बेथलेहेमा। तूं. य
हूदाच्या सुभेदारांमध्यें, सर्वांहून लाहान अगदी नाहींस। कारण कीं।
तुजपासून आवरणारा उत्पन्न होईल. जो तो माझा लोक इस्राए
ल। यांस मेंढपाळण करील॥ ७ तेव्हां हेरोदाने त्यां ज्ञान्यांस गुप्तरू
पें बोलावून त्यांजपासीं. ताऱ्याच्या दिसण्याचा वेळ येकाग्रतेने पुसला॥
८ आणि. त्यांस बेथलेहेमास पाठवितांना. बोलिला. तुम्ही जाऊन.
त्या बाळकाविषईं येकाग्रतेने शोधा। आणि. म्याही येऊन त्यास भजा
वें. म्हणोन। तुम्हास शोध लागल्यावर। मला वर्तमान सांगा॥ ९ ते
व्हां ते. राजाचें ऐकून. गेले, आणि पाहा. जो तारा त्यांनी उ
गवतीत पाहिला होता, तो. जेथे बाळक होतें, तेथे येऊन. वर्ता
उभा राहे. तोंपर्यंत त्यांच्या पुढें गेला॥ १० आणि ते. तारा
पाहून. अति आनंदेंकरून संतोषीत जाले॥ ११ नंतर त्यांनी घ
रांत येऊन. बाळकास आपल्या आई मारयेजवळ पाहिलें। आणि
पडून त्याला भजिलें॥ मग आपलीं भांडारें उघडून. दानें, सोनें
व लोबान व बोळ त्याला सादर केलीं॥ १२ तेव्हां. ते हेरोदा

कडे फिरोन न जाण्यास स्वप्नांत बोधीत होऊन। आपल्या देशास
दुसऱ्या वाटेने परत गेले॥
१३ तेव्हां ते निघाल्यावर। पाहा। प्रभूचा दूत योसेफास स्वप्नां
त दिसून बोलिला। तूं उठून। बाळक आणि त्याची आई। यांस
घेऊन। मिसरांत पळ। आणि तुला मी सांगेन तोंपर्यंत तेथे राहा।
याकरितां कीं। या बाळकाचा नाश करायास। हेरोद त्याला शोधील॥
१४ मग तो उठून। रात्रीं। बाळक आणि त्याची आई। यांस घे
ऊन मिसरांत गेला॥ १५ आणि हेरोदाच्या मरणापर्यंत तेथे
होता॥ ह्मणजे प्रभूने भविष्यसांगणाराकडून जें ह्मटलें। कीं म्या
आपल्या पुत्राला मिसरांतून बोलाविलें आहे। हें पूर्ण व्हावें॥
१६ तेव्हां हेरोद। आपण त्या ज्ञान्यांकडून अपमानीत जालों, हें
जाणून फार रागें भरला। आणि त्याने त्या ज्ञान्यांजवळ येकाग्र
तेने पुसलें होतें। त्या वेळाप्रमाणे। बेथलेहेमांत आणि त्याच्या अ
वघ्या शिंवारांत। जे बाळक दोन वर्षांचे आणि त्याहून धाकटे, त्या
सर्वांस। पाठऊन। वधविलें॥ १७ तेंव्हा भविष्यसांगणाराकडुन जें ह्म
टलें। कीं। १८ रामांत वाणी। शोक व रडणें व मोठा आकांत ऐ
किला गेला॥ राहेल आपल्या लेंकरांकरितां रडती। आणि। तीं ना
हींत। ह्मणोन तिने समजुत पाउं मानलें नाहीं। तेव्हां पूर्ण जालें॥
१९ मग हेरोद मेल्यावर। पाहा। प्रभूचा दूत। मिसरांत योसेफास स्वप्
नाकडून दिसून, २० बोलिला, तूं उठून बाळक व याची आई। यांस
घेऊन इस्राएल देशांत जा। कां कीं। ज्यांनी बाळकाचा जीव घ्यायास
शोधिलें, ते मेले आहेत॥ २१ तेव्हां तो उठून। बाळक व याची
आई। यांस घेऊन इस्राएल देशांत आला॥ २२ परंतु आर्खेला
स आपला बाप हेरोद याच्या स्थानीं यहूदांत राज्य करीत आहे। हें
ऐकून। तो तेथे जाण्यास भ्याला। तथापि स्वप्नांत बोधीत होऊन,
गालीलाच्या भागांत वळला॥ २३ आणि त्याने। नाजारेथ ह्मटले
ल्या नगरांत येऊन। वस्ती केली। अशास कीं। भविष्यसांगणाराकडून
जें ह्मटलें। तें पूर्ण व्हावें, कीं। तो नाजोरी ह्मटला जाईल॥

पर्व ३॥ १ आणि त्या दिवसांत। योहान्न बाप्तीस्मा देणारा।
यहूदाच्या रानांत गाजवीत आला। २ आणि बोलिला, तु
ह्मी मन पालटा। कां कीं। आकाशांचें राज्य जवळ आलें आहे॥
३ ह्मणजे तो हाच आहे, ज्याविषईं यशायाा भविष्यसांगणारानें
ह्मटलें, कीं। रानांत वोरडणाऱ्याचा शब्द। [कीं] प्रभूचा मार्ग सि
द्ध करा। त्याची वाटा नीट करा॥ ४ आणि त्याच योहान्नाचें व
स्त्र उंटाच्या लवेचें होतें। आणि त्याच्या कंबरेभोंवता कातड्या
चा कंबरकसा होता। आणि त्याचें खाणें टोळ व रानी मध होतें॥
५ तेव्हां यरूशलेम, आणि सर्व यहूद, आणि यार्देनेचा चहूंकडी
ल अवघा देश निघून। त्याच्या जवळ गेले। ६ आणि। आपल्या पा
पांस पत्करून। यार्देनेमध्यें त्याकडून बाप्तीस्मी जाले॥ ७ परंतु फा
रिशी व सादूकी। यांतील बहुतांस आपल्या बाप्तीस्म्यासाठीं येतां
पाहून। तो त्यांस बोलिला, अहो सापांचे वंश, होणार क्रोधापा
सून पळायास, तुह्मास कोणी उपदेशिलें आहे? ८ तर मन पा
लटण्याचीं योग्य फळें द्या। ९ आणि आब्राहाम आमचा बाप
आहे। [असें] आपणांमध्यें बोलणें करुं नका। कां कीं, मी तु
ह्मास असें ह्मणतों। आब्राहामासाठीं ह्या दगडांचीं लेंकरें उ
ठवायास देव शक्तिमान आहे॥ १० आणि आतांच कुऱ्हाड
झाडांच्या मुळासीं ठेविली आहे। यास्तव प्रत्येक झाड। जें
चांगलें फळ देत नाहीं, तें तोडलेंच जातें, आणि अग्नींत टा
कलें जातें॥ ११ मनपालटण्यासाठीं मी तुमचा बाप्तीस्मा पाण्या
नें करितोच। परंतु जो माझ्यामागून येतो, तो मजहून समर्थ आ
हे। त्याच्या वाहाणा न्यावयास मी योग्य नाहीं॥ तोच पवित्र आत्म्याक
डून। व अग्नीकडून तुमचा बाप्तीस्मा करील॥ १२ त्याचें सूप त्या
च्या हातांत [आहे।] आणि तो आपलें खळें पूर्ण निर्मळ करील।
आणि आपला गहूं कोठारांत येकवट करील। परंतु भूसाला न
विझणार अग्नींत जाळील॥

१३ तेव्हां येशू गालीलाहून यार्देनेस। योहान्नाच्या जवळ। याकडून
बाप्तीस्मी होण्याकरितां आला॥ १४ परंतु योहान्न त्याला मनाच क

रून बोलिला, मला तुजकडून बाप्तीस्मी होण्याचें अगत्य आहे। आणि
तूं मजपासीं येतोस कीं काय? १५ मग येशू, उत्तर देतां, त्याला
बोलिला, आतां होउं दे। कां कीं, सर्व यथार्थास असें पूर्ण करणें आह्मा
स योग्य आहे॥ तेव्हां त्याने त्याचें होउं दिलें॥ १६ आणि येशू,
बाप्तीस्मी होऊन, तेव्हांच पाण्यापासून चढला। आणि पाहा। त्याच्या
साठीं आकाशें उघडलीं। आणि त्याने देवाच्या आत्म्याला, खबुतरासारि
खा उतरतां, आणि आपणावर येतां, पाहिलें॥ १७ आणि पा
हा। आकाशांतून वाणी [असतां,] बोलली। हाच माझा प्रिय पुत्र
आहे। याकडून मी फार संतोषीत जालों आहें॥

पर्व ४॥ १ तेव्हां येशू, आपली प्रचिती घावलसाकडून पाहिली
जाण्यास। आत्म्याकडून रानांत नेला गेला॥ २ आणि त्याने चाळीस
दिवस व चाळीस रात्री उपास केला। नंतर त्याला भुक लागली॥
३ आणि प्रचिती पाहाणारा त्याजपासीं येऊन बोलिला। जर
तूं देवाचा पुत्र आहेस। तर ह्या धोंड्यांच्या भाकरी व्हाव्या। ह्म
णोन सांग॥ ४ पण तो उत्तर देतां बोलिला, [असें] लिहिलें आ
हे, केवळ भाकरीकडून माणुस वांचणार नाहीं। परंतु प्रत्येक जो
शब्द देवाच्या तोंडांतून निघतो, त्याकडून॥ ५ तेव्हां घावलस त्याला
घेऊन, पवित्र नगरांत गेला। आणि देवळाच्या पांकळीवर
त्याला ठेविलें॥ ६ मग त्याला बोलतो, जर तूं देवाचा पुत्र आ
हेस। तर आपणास खालीं टाक। कां कीं। [असें] लिहिलें आ
हे। तो तुजविषईं आपल्या दूतांस सांगी करील, आणि ते आपला
पाय कधीं धोंड्यावर न आपटावा। ह्मणोन ते हातांवर तुला ध
रतील॥ ७ येशू त्याला बोलिला, आणखी हें लिहिलें आहे। प्र
भू। जो तुझा देव, याची प्रचिती तूं पाऊं नको॥ ८ आ
णखी घावलस त्याला घेऊन फार उंच डोंगरावर गेला, आणि
पृथ्वींतील सर्व राज्यें आणि त्यांचें गौरव त्याने त्याला दाखवि
लें॥ ९ मग त्याला ह्मणतो, जर तूं पडून माझें भजन कर
सील, तर हीं अवघीं तुला देईन॥ १० तेव्हां येशू त्याला बो
लतो। अरे साटान, दूर हो। कां कीं। हें लिहिलें आहे, प्रभू,

जो तुझा देव, याचें भजन कर। आणि केवळ त्याचीच सेवा कर॥
११ तेव्हां द्यावलशाने त्याला सोडिलें। आणि पाहा दूतानी जवळ
येऊन, त्याची चाकरी केली॥

१२ नंतर योहान्न बंदांत घातला गेला, हें ऐकून, येशू फिरोन गा
लीलांत गेला॥ १३ आणि नाजारेथ सोडून, जबुलून आणि नाफता
ली। यांच्यां शिंवांरांत समुद्राच्या जवळील कापेर्णाह्मांत येऊन राहि
ला॥ १४ कारण कीं, यशाया भविष्यसांगणाराकडून जें ह्मटलें, तें पू
र्ण व्हावें, कीं १५ जबुलून प्रांत आणि नाफताली प्रांत। यार्देनेत्तरी
ल समुद्राच्या वाटेंत। परप्रजांच्या गालीलांत। १६ जो लोक अंधारां
त बसला, याने मोठा उजेड पाहिला। आणि जे मरणाचा देश व
सावली, यांत बसले, त्यांस उजेड उगवला आहे॥ १७ तेव्हांपासू
न येशू गाजवितांना बोलुं लागला, [कीं] आकाशांचें राज्य जवळ
आलें, यास्तव तुह्मी मन पालटा॥

१८ तेव्हां येशू, गालीलाच्या समुद्राजवळ चालत असतां, त्याने
दोघे भाऊ, शीमोन जो पेत्रस ह्मटलेला, आणि आंद्रेयास त्याचा
भाऊ, यांस पाहिलें। ते धीवर होते, यास्तव जाळें समुद्रांत टाकीत
[होते]॥ १९ तेव्हां तो त्यांस ह्मणतो, माझे मागें या। आणि मी
तुह्मास माणसांचे धीवर करीन॥ २० तेव्हां ते, जाळीं लवकर सोडू
न। त्याच्या मागें गेले॥ २१ आणि त्याने तेथून पुढें जाऊन दुसरे दो
घे भाऊ, जेबेदीचा याकोब, आणि त्याचा भाउ योहान्न। यांस, तार
वांत। त्यांचा बाप जेबेदी याच्या बराबर, आपलीं जाळीं नीट करि
तां, पाहिलें। आणि त्यांस बोलाविलें॥ २२ तेव्हां ते तारूं व आ
पला बाप। यांस लवकर सोडून। त्याच्या मागें गेले॥ २३ तेव्हां
येशू। संपूर्ण गालीलांतून। त्यांच्यां सभांत शिकवीत। आणि राज्याचें सु
वर्तमान गाजवीत। आणि लोकामध्यें प्रत्येक रोग व प्रत्येक दुखणें।
यांस बरें करीत फिरला॥ २४ तेव्हां त्याची कीर्ती संपूर्ण सूरीदे
त गेली। आणि त्यानी। ज्यां सर्वांस विद्दती होती त्यांस, आणि नाना
रोगानी व पिडानी धरलेले जे यांस, आणि भूतग्रस्त व फेंप्रेकरी व
वातरोगी यांस त्याजवळ आणिलें, आणि त्याने त्यांस बरें केलें॥

२५ आणि गालील व देकापलिस व यरुशलेम व यहूद व यार्देने
च्या पलीकडे। ह्यांहून बहुत समुदाय त्याच्या मागें गेले॥

पर्व ५॥ १ तेव्हां त्या समुदायांस पाहून। तो डोंगरावर चढला। आ
णि, तो बसल्यावर। त्याचे शिष्ये त्याच्या जवळ आले॥ २ आणि तो।
आपलें तोंड उघडून। त्यांस शिकवितां बोलिला। ३ जे आत्म्यांत दरिद्री।
त्यांचें कल्याण। कां कीं। आकाशांचें राज्य त्यांचें आहे॥ ४ जे शोक करि
तात। त्यांचें कल्याण। कां कीं। ते समजुत पावतील॥ ५ जे नम्र। त्यांचें
कल्याण। कां कीं। ते पृथ्वीचें वतन पावतील॥ ६ ज्यांस यथार्थाच्या भुके
व तान्ह आहेत। त्यांचें कल्याण। कां कीं। ते तृप्त होतील॥ ७ जे दयाळू।
त्यांचें कल्याण। कां कीं। ते दया पावतील॥ ८ जे अंतःकरणामध्यें शुद्ध।
त्यांचें कल्याण। कां कीं। ते देवास पाहातील॥ ९ जे शांतीकर्ते। त्यांचें
कल्याण। कां कीं। ते देवाचे पुत्र ह्मटले जातील॥ १० ज्यांचा पाठलाग य
थार्थासाठीं केला। त्यांचें कल्याण। कां कीं। आकाशांचें राज्य त्यांचें
आहे॥ ११ जेव्हां तुह्मास निंदितील। आणि पाठलाग करितील। आ
णि माझ्यासाठीं। तुह्मांविरुद्ध प्रत्येक वाईट गोष्ट। लबाडी करीतां। बो
लतील। तेव्हां तुमचें कल्याण आहे॥ १२ आनंदीत व उल्हासीत व्हा।
कां कीं। आकाशांमध्यें तुमचें फळ फार। कारण कीं। भविष्यसांगणा
रे। जे तुमच्या पूर्वीं। त्यांचा तसाच पाठलाग त्यांनी केला॥
१३ तुह्मी पृथ्वीचें मीठ आहां। परंतु जर मीठ निःसत्व जालें।
तर तें कशानें खारट केलें जाईल? बाहिर टाकलें जाणे। आणि मा
णसांकडून तुडविलें जाणें। यावांचून आणखी कशास उपयोगी ना
हीं॥ १४ तुह्मी जगाचा उजेड आहां॥ डोंगरावर वसलेल्या नगरा
च्यानें लपविलें जावतत नाहीं॥ १५ आणि दिवा लावितांना त्याला
मापाखालीं ठेवीत नाहींत। परंतु समईवर ठेवितात। मग तो घरांतील अव
घ्यांस प्रकाशितो॥ १६ माणसांसमोर तुमचा उजेड असा प्रकाशो।
कीं त्यांनी तुमचीं चांगलीं कामें पाहावीं। आणि तुमच्या आकाशां
तील बापाचें गौरव करावें॥

१७ मी शास्त्राचा अथवा भविष्यलेखांचा नाश करायास आ
लों। असें समजु नका। मी नाश करायास नाहीं। परंतु पूर्ण कराया

स आलें॥ १८ कां कीं, मी तुह्मास खचीत सांगतों, आकाश व पृ
थ्वी जाई तेथवर, अवघीं पूर्ण होई तोंपर्यंत, शास्त्रांतून येक येल्का
र किंवा येक फांटा जाणारच नाहीं॥ १९ यास्तव जर कोणी, ह्या
फारच लाहान आज्ञांतील, येकीला मोडील, आणि माणसांस तसें
शिकवील, तर तो आकाशांच्या राज्यांत, सर्वांहून लाहान ह्मटला
जाईल॥ परंतु जर कोणी आचरील व शिकवील, तर तोच आकाशांच्या
राज्यांत थोर ह्मटला जाईल॥ २० कारण, मी तुह्मास सांगतों,
कीं पंडित व फारिशी यांच्या उजूपणापेक्षां जर तुमचें अधीक
सोठें होत नाहीं, तर तुह्मी आकाशांच्या राज्यांत जाणारच नव्हां ※
२१ तूं खून करूं नको, आणि जो जो खून करील, तो
न्यायांत दोषी होईल, हें प्राचीनांस सांगीतलें होतें, ह्मणोन तु
ह्मी ऐकिलें आहे॥ २२ परंतु मी तुह्मास सांगतों, कीं जो कोणी
आपल्या भावावर येहवीं रागें भरतो, तो न्यायांत दोषी हो
ईल, आणि जो जो आपल्या भावाला वेडगळ ह्मणेल, तो न्यायसभें
त दोषी होईल, आणि जो मूर्खा ह्मणेल, तो अग्नीच्या न
र्कापर्यंत दोषी होईल॥ २३ यास्तव जर तूं आपलें अर्पण वेदीजवळ
आणितोस, आणि तेथें आठवितोस कीं तुझ्या भावाला तुजविरुद्ध
कांहीं आहे, २४ तर तेथें वेदीपुढें आपलें अर्पण ठेव, आणि
निघून जा, प्रथम आपल्या भावाशीं समेट कर, आणि
मग येऊन, आपलें अर्पण वाहा॥ २५ जोंपर्यंत तूं आपला वादी
याच्या संगातें, वाटेंत आहेस, तोंपर्यंत लवकर त्याशीं
समचित्त हो, नाहीं तर कधीं वादी तुला न्यायाधीशाच्या स्वा
धीन करील, आणि न्यायाधीश तुला हस्तकाच्या स्वाधीन करी
ल, आणि तूं बंदिशाळेंत घातला जाशील॥ २६ मी तुला ख
चीत सांगतों, तूं शेवटली दमडी फेडतोस, तोंपर्यंत तेथून बा
हेर येणारच नाहींस ※
२७ तूं व्यभिचार करूं नको, हें प्राचीनांस सांगीतलें होतें, ह्म
णोन तुह्मी ऐकिलें आहे॥ २८ परंतु मी तुह्मास सांगतों, कीं जो
कोणी, स्त्रीचो आस धरण्याने तिला पाहातो, त्याने इतक्यांत, आप

त्या मनांत, तिजशीं व्यभिचार केला आहे॥ २९ आणि जर तु
झा उजवा डोळा तुला अडखळवितो, तर त्याला उपट। आणि
आपल्यापासून टाक। कारण कीं तुझ्या अंगांमधून येकाचा ना
श व्हावा। आणि तुझें संपूर्ण शरीर नर्कांत टाकलें न जावें, हें
तुला उपयोगी आहे॥ ३० आणि जर तुझा उजवा हात तु
ला अडखळवितो, तर त्याला तोड। आणि आपल्यापासून टाक।
कारण कीं। तुझीं अंगें ह्यांतून येकाचा नाश व्हावा। आणि
तुझें संपूर्ण शरीर नर्कांत टाकलें न जावें। हें तुला उपयोगी आ
हे॥ ३१ जो जो आपल्या बायकोला सोडील, तो तिला सूटप
त्र देवो। असेंही म्हटलें होतें॥ ३२ परंतु मी तुह्मास सांग
तों। कीं जो जो आपल्या बायकोला। व्यभिचार कारणावांचून।
सोडितो, तो तिजकडून व्यभिचार करवितो। आणि जर कोणी
सोडलेलीसीं लग्न करितो। तो व्यभिचार करितो॥

३३ आणखी। तुह्मी ऐकिलें आहे, कीं प्राचीनांस म्हटलें हो
तें। तूं खोटी शपथ वाहूं नको। परंतु प्रभूपासीं आपल्या शप
था फेड॥ ३४ परंतु मी तुह्मास सांगतों। तुह्मी शपथ अ
गदी वाहूं नका। आकाशावरून नका। कां कीं। तें देवाचें सिंव्हासन
आहे॥ ३५ आणि पृथ्वीवरूनही नका। कां कीं। ती त्याच्या पा
यांचें आसन आहे॥ आणि यरूशलेमावरून नका। कां कीं। तें
मोठ्या राजाचें नगर आहे॥ ३६ आणि तूं। आपल्या मस्तका
वरून शपथ वाहूं नको। कां कीं तुझ्याने येक केंस पांढरा अ
थवा काळा करवत नाहीं॥ ३७ परंतु तुमचें बोलणें। होय
चें होय। नाहींचें नाहीं। होवो। पण यांहून जें अधीक। तें वा
इटाचें आहे॥ ३८ डोळ्याकरितां डोळा। आणि दांताकरितां
दांत। हें सांगीतलें होतें। ह्मणोन तुह्मी ऐकिलें आहे॥ ३९ त
थापि मी तुह्मास सांगतों। वाइटाला आडवूं नका। प
रंतु जो कोणी। तुझ्या उजव्या गालावर। तुला चपडाक हा
णील। त्याकडे दूसराही फिरेव॥ ४० आणि जो तुजवर फि
र्याद करितांना तुझा आंगरखा घ्यायास इछितो, त्या

ला तुझी पासोडीही घेऊं दे॥ ४१ आणि जो कोणी तुला ब
ळात्काराने अर्ध कोस चालवील। त्याबराबर दुप्पट जा॥
४२ जो तुझा जवळ मागतो। त्याला दे। आणि जो तुजपासून। उ
सणें घ्यायास इछितो। त्याला पाठमोरा होऊं नको॥ ४३ तूं
आपल्या शेजाऱ्याची प्रीती कर। आणि आपल्या वैऱ्याचा द्वेश
कर। हें ह्मटलें होतें। ह्मणोन तुह्मी ऐकिलें आहे॥
४४ तथापि मी तुह्मास सांगतों। आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा॥
जे तुह्मास शाप देतात। त्यांस तुह्मी आशिर्वाद द्या॥ जे तु
मचा द्वेष करितात। त्यांचें तुह्मी बरें करा। आणि जे तुह्मास
गांजितात। आणि तुमचा पाठलाग करितात। त्यांच्या साठीं
प्रार्थना। अस्यास करा। ४५ कीं तुह्मी आपल्या आकाशांतील
बापाचे पुत्र व्हावे। का कीं। तो। वाईटांवर व चांगल्यांवर।
आपल्या सूर्याला उगववितो। आणि उजूंवर व अनुजूं
वर पाऊस पाडितो॥ ४६ आणखी। जे तुह्मावर प्रीती क
रितात। त्यांजवर जर तुह्मी प्रीती करितां। तर तुह्मास फ
ळ काय? जकातदारही हेंच करीत नाहींत। कीं काय? ४७ आ
णि जर तुह्मी केवळ आपल्या भावांस क्षेम देतां। तर तुह्मी
विशेष काय करितां? जकातदारही तसें करीत नाहींत कीं का
य? ४८ यास्तव जसा तुमचा आकाशांतील बाप पूर्ण आहे।
तसे तुह्मी पूर्ण व्हा॥

पर्व ६॥ १ माणसांकडून पाहिले जाण्यास। त्यांच्या समोर तु
ह्मी आपला धर्म न करावा। ह्मणोन सावध व्हा। नाहीं। तर
तुमच्या आकाशांतील बापाजवळ तुह्मास फळ नाहीं॥ २ यास्तव।
जेव्हां तूं धर्म करितोस। तेव्हां जसे ढोंगी। माणसांकडून गौर
विले जावे। ह्मणोन सभांमध्यें आणि वाटांत करितात। तसें तूं।
आपल्या पुढें। भोंवारा वाजवुं नको॥ मी तुह्मास खचीत सांग
तों। ते आपलें फळ भरून पावतात॥ ३ परंतु। तूं। धर्म क
रीत असतां। आपला उजवा हात काय करितो। हें आपल्या
डाव्या हाताला आपल्यासाठीं न कळो। ४ कीं आपला धर्म गु

प्तांत व्हावा। मग तुझा बाप। जो गुप्तांत पाहातो। तो तुला
लौकिकांत फळ भरून देईल॥ ५ आणि जेव्हां तूं प्रार्थना क
रितोस। तेव्हां तूं ढोंग्यांसारिखा होऊं नको। कां कीं। ते मा
णसांस दिसावे। ह्मणोन सभांमध्यें व मार्गांच्या कोनांमध्यें उभे रा
हून प्रार्थना करणें त्यांस आवडतें॥ मी तुह्मास खचीत सांग
तों। ते आपलें फळ भरून पावतात॥ ६ परंतु। जेव्हां तूं प्रा
र्थना करितोस। तेव्हां आपल्या येकांतीं जा। आणि आपलें दा
र लावून। आपल्या गुप्तांतील बापाची प्रार्थना कर। मग तुझा
बाप। जो गुप्तांत पाहातो। तो तुला लौकिकांत फळ भरून दे
ईल॥ ७ आणि तुह्मी प्रार्थना करितां। परप्रजांतल्यांसारिखे।
व्यर्थ जप करूं नका। कारण कीं। त्यांच्या फार बोलण्याने त्यां
चें ऐकिलें जाईल, असें त्यांस वाटतें॥ ८ यास्तव त्यांच्या सा
रिखे तुह्मी होऊं नका। कारण कीं। तुह्मी आपल्या बापापा
सीं मागीतल्याच्या आगोधर, जीं तुह्मास पाहिजेत। तीं त्या
ला कळलीं॥ ९ यास्तव, तुह्मी असी प्रार्थना करा। हे आ
मच्या आकाशांतील बापा। तुझें नांव पवित्र मानिलें होवो॥
१० तुझें राज्य येवो॥ जसें आकाशांत तसें पृथ्वींतही तुझी इ
छा होवो॥ ११ आज आमचें नित्याचें अन्न आह्मास दे॥
१२ आणि जसें आह्मी आपल्या ऋण्यांस क्षमा करितों। त
सें तूं आमचीं ऋणें आह्मास क्षमा कर॥ १३ आणि आह्मा
स प्रचितीस न न्यावें। परंतु आह्मास वाईटापासून सोडीव।
कां कीं। राज्य। व शक्ती। व गौरव। हीं सर्वकाळापर्यंत तुझीं आ
हेत॥ आमेन॥ १४ कारण कीं। जर तुह्मी माणसांस त्यांचे अप
राध क्षमा करितां। तर तुमचा आकाशांतला बाप तुह्मास क्षमा
करील॥ १५ परंतु। जर तुह्मी माणसांस त्यांचे अपराध क्षमा
करीत नव्हां। तर तुमचा बाप तुमचेही अपराध क्षमा कर
णार नाहीं॥

१६ आणि जेव्हां तुह्मी उपास करितां। तेव्हां ढोंग्यांसारि
खे म्लानमुख होऊं नका। यास्तव कीं। माणसांस उपास करी

तां दिसावे। ह्मणोन ते आपले तोंडवळें निस्तेज करितात॥
मी तुह्मास खचीत ह्मणतों। कीं ते आपलें फळ भरून पावतात॥
१७ परंतु तूं उपास करितांना आपलें डोकें न्हाण। आणि आ
पलें तोंड धू। १८ अशासाठीं। कीं लां माणसांस नव्हे। परंतु
आपल्या गुप्तांतील बापाला उपास करितां दिसावें। मग तुझा बा
प। जो गुप्तांत पाहातो। तो तुला फळ लौकिकांत भरून देईल॥
१९ पृथ्वीवर। जेथें कसर व कळंक नाश करितात। आणि जेथें
चोर फोडतांना चोरी करितात। तेथें आपणांसाठीं संग्रह
सांठवूं नका॥ २० परंतु आकाशामध्यें। जेथें कसर, व कळं
कही नाश करीत नाहीं आणि जेथें चोर फोडतांना चोरी क
रीत नाहींत। तेथें तुह्मी आपणांसाठीं संग्रह सांठवा॥ २१ या
स्तव कीं। जेथें तुमचा संग्रह आहे। तेथें तुमचें चित्तही होईल॥
२२ शरीराचा दिवा डोळा आहे। यास्तव जर तुझा डोळा
अभेद असेल। तर तुझें संपूर्ण शरीर प्रकाशमय होईल॥ २३ परं
तु जर तुझा डोळा वाईट असेल, तर तुझें संपूर्ण शरीर काळोखम
य होईल॥ यास्तव तुजमध्यें जो उजेड। तो जर अंधार आहे।
तर तो अंधार केवढा मोठा॥
२४ कोणाच्याने दोन धन्यांची चाकरी करवत नाहीं। या
स्तव कीं। तो येकाचा द्वेष करील। आणि दुसऱ्यावर प्रीती क
रील। अथवा तो येकाचा पक्ष धरील। आणि दुसऱ्याची उपे
क्षा करील॥ तुमच्याने देवाची आणखी लक्ष्मीची चाकरी करवत
नाहीं॥ २५ ह्यासाठीं मी तुह्मास सांगतों। तुह्मी काय खावें। आ
णि काय प्यावें। [असें] आपल्या जिवासाठीं चिंता करूं नका। आ
णि काय पांघरावें। [असें] आपल्या शरिरासाठीं नका॥ खा
ण्यापेक्षां जीव। आणि वस्त्राहून शरीर अधीक नाहीं। कीं का
य? २६ आकाशाच्या पांखरांस पाहा। कां कीं तीं पेरीत
नाहींत। कापीतही नाहींत। आणि कोठारांमध्यें सांठवीत नाहींत।
तथापि तुमचा आकाशांतला बाप त्यांस पोसितो। तुह्मी त्यां
पेक्षां फार श्रेष्ठ आहां। कीं नाहीं? २७ आणि चिंता करून आ

पल्या परिमितास येक हातभर वाढवायास शक्तिमान आहे।
[असा] तुह्मामधील कोण? २८ आणि वस्त्रासाठीं तुह्मी कां चिं
ता करितां? शेताच्या फुलझाडांस ध्यानांत धरा। [कीं] तीं कशीं
वाढतात। श्रम करीत नाहींत। आणि कांतीत नाहींत। २९ त
थापि मी तुह्मास ह्मणतों। कीं शलमोनच। आपल्या अवघ्या गौ
रवांत। त्यांतील येकासारिखा पांघरला नव्हता॥ ३० यास्तव। अ
हो अल्पविश्वासी। शेताचें गवत, जें आज आहे। आणि उ
द्यां भटीमध्यें टाकलें जातें। त्याला जर देव असें पांघरवितो।
तर तुह्मास फार विशेषेंकरून न [पांघरवील] कीं काय?
३१ यास्तव। आह्मी काय खाउं। अथवा काय पिउं। अथवा
काय पांघरूं। [असें] बोलून चिंता न करावी॥ ३२ यास्तव कीं।
ह्या अवघ्यांस इतरप्रजा शोधितात। आणखी। हीं सर्व तुह्मा
स पाहिजेत। हें तुमचा आकाशांतल्या बापाला कळलें आहे॥
३३ परंतु तुह्मी देवाच्या राज्याला व याच्या उजूपणाला आ
गोधरच शोधा। मग ह्यांवर। तीं सर्व तुह्मास दिल्हीं जातील॥
३४ यास्तव उद्यांसाठीं चिंता करूं नका। कारण कीं। उद्यां। आ
पलींच जीं। यांची चिंता करील। ज्या दिवसाचें जें वाईट।
तें त्याला पुरें ❀

पर्व ७॥ १ तुह्मावर न्याय ठरविला न जावा। ह्मणोन तुह्मी
[दुसऱ्यांवर] न्याय ठरवुं नका। २ यास्तव कीं। ज्या न्यायठर
विण्यानें तुह्मी न्याय ठरवितां। त्यानें तुमचाही न्याय ठरविला
जाईल॥ आणि ज्या मापानें तुह्मी मोजितां। त्यानें तुह्मास प
रत मोजलें जाईल॥ ३ आणि तूं। आपल्या डोळ्यांतील काडी
ध्यानास न आणितां। आपल्या भावाच्या डोळ्यांतील काडी
कां पाहातोस? ४ अथवा। तुझ्या डोळ्यांत कडी जाण।
तेव्हां आपल्या भावास कसें ह्मणसील? मला तुझ्या डोळ्यां
तून काडी काढुं दे॥ ५ ढोंग्या। आगोधर तूं आपल्या डोळ्यां
तून कडी काढ। आणि मग तुझ्या भावाच्या डोळ्यांतून
काडी काढावयास। तुला बरें दिसेल ❀ ६ जें पवित्र। तें

कुत्र्यांस घालुं नका। आणि आपलीं मोत्यें डुकरांपुढें टाकुं नका।
नाहींतरं कदाचित तीं त्यांस आपल्या पायांखालीं तुडवितो
ल. आणि मुडून तुह्मास फाडितील ॐ ७ मागा। ह्मणजे तुह्मास
दिल्हें जाईल॥ शोधा। ह्मणजे तुह्मास सांपडेल॥ ठोका। ह्मण
जे तुह्मास उघडलें जाईल॥ ८ कां कीं। जो प्रत्येक मागतो।
तो पावतो। आणि जो शोधितो। त्यास सांपडतें। आणि जो ठो
कितो त्यास उघडलें जाईल॥ ९ काय। आपला पुत्र जर आपल्या
जवळ भाकर मागेल। तर त्यास धोंडा देईल? १० अथवा ज
र मासा मागेल। तर त्याला साप देईल? असा तुह्मामधील को
ण माणुस आहे? ११ यास्तव तुह्मी। वाईट असतां। जर आ
पल्या लेंकरांस चांगलीं देणीं द्यावयास जाणतां। तर तुमचा
आकाशांतील बाप। आपल्या जवळ जे मागतात। त्यांस। कितो
विशेषेंकडून। चांगलीं देईल? १२ यास्तव। दुसऱ्या माणसांनी अ
वघीं जितकीं तुह्मापाशीं करावीं। ह्मणोन तुह्मी इछितां। तसें
च तुह्मी त्यांपाशीं करा। कां कीं। शास्त्र आणि भविष्यभाकी
तसेच आहेत ॐ १३ तुह्मी अरुंद दाराने आंत जा। कां कीं। ना
शाकडे नेतें जें दार। तें रुंद। आणि जो मार्ग [तिकडे नेतो।]
तो पसरट [आहे।] आणि त्याकडून जे आंत जातात। ते बहु
त आहेत॥ १४ कारण कीं। वांचण्याकडे नेतें। जें दार। तें अरुंद।
आणि जो मार्ग [तिकडे नेतो।] तो संकोचीत [आहे।] आणि
ज्यांस तो सांपडतो। ते थोडके आहेत ॐ १५ आणि ते खोटे
भविष्यभाकी। जे मेंढ्रांच्या वेषानो तुह्माकडे येतात। परंतु
आंत हिसकणारे लांडगे आहेत। त्यांविषईं तुह्मी सावध व्हा॥
१६ तुह्मी त्यांच्या फळांवरून त्यांस जाणाल॥ कांट्यांच्या झा
डांवरून द्राक्षें। अथवा रिंगण्यांवरून अंजीर तोडितात। कीं का
य? १७ तसें प्रत्येक चांगलें झाड चांगलीं फळें देतें। आणि
वाईट झाड तें वाईट फळें देतें॥ १८ चांगल्या झाडाच्याने
वाईट फळें देववत नाहीं। आणि वाईट झाडाच्याने चांगलीं
फळें देववत नाहीं॥ १९ प्रत्येक झाड। [जें] चांगलें फळ देत

नाहीं। तें तोडलेंच असतांना। अग्नींत टाकिलें जातें॥ २० यास्तव
त्यांच्या फळांवरून तुह्मी त्यांस जाणाल ※ २१ जो मला। प्रभू। प्रभू।
[केवळ] ह्मणतो। असा प्रत्येक। आकाशांच्या राज्यांत। न जाणार।
परंतु जो माझ्या आकाशांतील बापाची इच्छा आचरतो। [तो
जाईल]॥ २२ त्या दिवशीं। बहुत मला बोलतील। हे प्रभू। प्र
भू। आह्मी तुझ्या नांवानें भविष्य सांगीतलें। आणि तुझ्या नां
वानें भूतें घालविलीं। आणि तुझ्या नांवानें बहुत चमत्कार केले
नाहींत कीं काय? २३ आणि तेव्हां मी त्यांजवळ असें पत्क
रीन। म्या तुह्मास कधींही जाणलें नाहीं। अहो अशास्त्र क
रणारे। मजपासून दूर जा※

२४ यास्तव प्रत्येक। जो कोणी माझ्या ह्या गोष्टी ऐकतो। आणि
त्या आचरतो। मी त्याला शाहाण्या माणसाची उपमा देईन। जो
ह्यानें आपलें घर खडकावर बांधिलें। २५ मग पाऊस पडला।
आणि पूर आले। वारेही सुटले व त्या घरास आपटले।
परंतु। त्याचा पाया खडकावर घातला। यासाठीं तें पडलें ना
हीं॥ २६ आणि प्रत्येक। जो माझ्या ह्या गोष्टी ऐकतो। आणि
त्या आचरीत नाहीं। त्याला। मूर्ख माणसाची उपमा दिल्ही जा
ईल। जो ह्यानें आपलें घर वाळूवर बांधिलें। २७ मग पाऊ
स पडला। आणि पूर आले। वारेही सुटले। व त्या घरास
लागले। तेव्हां तें पडलें। आणि त्याचें पडणें मोठें जालें※
२८ आणि येशूनें ह्या गोष्टी समाप्त केल्यावर। असें जालें। समु
दाय। त्याच्या उपदेशावरून। आश्चर्यवंत जाले। २९ यास्तव
कीं। त्याला अधिकार असल्याप्रमाणें। तो त्यांस उपदेशीत होता।
आणि पंडितांसारिखें नव्हे※

पर्व ८॥ १ मग तो डोंगरावरून उतरल्यावर। बहुत स
मुदाय त्याच्या मागें गेले॥ २ आणि पाहा। कोढी येऊन त्या
च्या पायां पडून बोलिला। हे प्रभू। जर तुझी इच्छा असेल। त
र मला शुद्ध करायास तूं शक्तिमान आहेस॥ ३ तेव्हां येशू।
हात लांबवून। त्याला शिवून बोलिला। माझी इच्छा आहे। तूं

शुद्ध हो॥ आणि तेव्हांच त्याचें कोढ शुद्ध जालें॥ ४ तेव्हां
येशू त्याला बोलतो। त्वां कोणास न सांगावें। ह्मणोन जप।
परंतु जा। आपणास उपाध्याला दाखीव। आणि। त्यांस प्रमाणा
साठीं। मोश्याने जें अर्पण नेमिलें। तें वाहा॥
५ तेव्हां येशू कापेर्णाह्रमांत आल्यावर। शतपती त्या
जवळ येऊन। त्यांस विनंती करितांना। ६ ह्मणाला। हे
प्रभू। माझा चाकर भारी पोडीत होऊन। वातरोगी घरांत पा
डला आहे॥ ७ तेव्हां येशू त्यास बोलतो। मी येऊन त्या
ला निरोगी करीन॥ ८ तेव्हां शतपती उत्तर देतां बोलिला।
हे प्रभू। त्वां माझ्या छपराखालीं यावें। असा मी योग्य ना
हीं। परंतु तूं शब्द मात्र बोल। आणि माझा चाकर निरो
गी केला जाईल॥ ९ यास्तव कीं। मीही आज्ञांकीत माणस आ
हें॥ माझ्या स्वाधीन लष्करी आहेत। आणि ह्याला मी सांगतों।
जा। आणि तो जातो। आणि दुसऱ्याला। ये। आणि
तो येतो। आणि माझ्या चाकरास। हें कर। आणि तो करि
तो॥ १० तेव्हां येशूने ऐकून आश्चर्य केलें। आणि मागें ये
णाऱ्यांस ह्मटलें। मी तुह्मास खचीत सांगतों। इस्राएलांतही ये
वढा विश्वास मला सांपडला नाहीं॥ ११ आणि मी तुह्मा
स सांगतों। कीं पूर्वेपासून आणि पश्चमेपासून बहुत येतील।
आणि आब्राहाम व इस्हाक व याकोब। यांबराबर आकाशांच्या
राज्यांत बसतील॥ १२ परंतु राज्यांतलीं संतानें बाहेरील
आंधेरांत टाकिलीं जातील। तेथे रडणें व दांत कडकडिवणें
होईल॥ १३ तेव्हां येशू शतपतीला बोलिला। तूं जा। आणि
त्वां जसा विश्वास केला। तसें तुला होवो॥ आणि त्याच घ
टकेस। त्याचा चाकर निरोगी केला गेला॥
१४ मग येशूने पेत्रसाच्या घरांत येऊन। त्याची सासू
ज्वरीत होऊन पाडलेली। असी पाहिली॥ १५ तेव्हां तो ति
च्या हातास शिवला। आणि तापाने तिला सोडिलें। आणि
तिने। उठून। त्याची चाकरी केली॥ १६ तेव्हां संध्याकाळ जाल्या

वर। त्यानी बहुत भूतग्रस्तांस त्याच्या जवळ आणिलें। आणि
त्याने त्या आत्म्यांस शब्दाकडून घालविलें। आणि ज्या सर्वांस दु
खणीं होतीं। त्यांस ह्यासाठीं बरें केलें। १७ कीं यशाया भविष्य
माघ्याकडून जें ह्मटलं। तें पूर्ण व्हावें। कीं त्यानें आपण आम
चे विकार घेतले। आणि आमचे रोग वागविले ※

१८ तेव्हां येशूनें आपल्या भोंवते बहुत समुदायांस पाहून।
पलीकडे जायास आज्ञा दिली॥ १९ आणि येक पंडित जवळ
येऊन। त्यास बोलिला। हे गुरू। जेथें जेथे तूं जातोस। तेथे मी
तुझ्या मागें येईन॥ २० तेव्हां येशू त्यास ह्मणतो। कोल्ह्यांस
बिळें। आणि आकाशाच्या पांखरांस वसत्या आहेत। परंतु
माणसाच्या पुत्रास। जेथें डोकें टेकावें। तें नाहीं॥ २१ मग त्या
च्या शिष्यांतील दुसरा त्याला बोलिला। हे प्रभू। आगोधर मा
झ्या बापाला पुरायास मला जाऊं दे॥ २२ परंतु येशू त्याला
बोलिला। तूं माझ्या मागें ये। आणि जे मेले। त्यांला आपल्या
मेलेल्यांस पुरूं दे ※

२३ तेव्हां तो तारवावर गेल्यानंतर। त्याचे शिष्य त्याच्या मा
गें गेले॥ २४ आणि पाहा। समुद्रांत असें मोठें वादळ जालें। कीं
तारूं लाटानी झांकलें गेलें। परंतु तो निजला होता॥ २५ तेव्हां
त्याचे शिष्य। जवळ येऊन। त्याला उठवून बोलिले। हे प्रभू। आह्मा
स तार। आह्मी नाश पावतों॥ २६ आणि तो त्यांस बोलतो। अ
हो अल्पविश्वासु। तुह्मी कां भयाभीत आहां? तेव्हां त्याने उठून।
वारे व समुद्र। यांस निषेध केला। आणि मोठें शांतपण जालें॥
२७ तेव्हां तीं माणसें आश्चर्य करून बोलिलीं। हा कशाचा? कीं
वारे आणि समुद्र। हेही याला मानितात ※

२८ तेव्हां तो पलीकडे गेर्गेशी देशांत आल्यावर। दोन भूतग्रस्त
त्याला भेटले। [ते] थड्यांमधून येतां। येवढे फार विक्राळ [होते।]
कीं कोणाच्याने त्या वाटेवरून जाववत नव्हतें॥ २९ आणि पाहा।
ते ओरडतां बोलिले। हे येशू। देवाच्या पुत्रा। आह्मासीं व तुज
सीं काय? काळाच्या आगोधर। तूं आह्मास पिडायास येथे

आलास कीं काय? ३० तेव्हां त्यांपासून दूर। बहुत डुकरां
चा. कळप चरत होता॥ ३१ आणि तीं भूतें त्यास विनंती
करितां बोलिलीं। जर तूं आह्मास घालविलास, तर आह्मास
त्या डुकरांच्या कळपांत जाऊं दे॥ ३२ तेव्हां तो त्यांस बोलिला।
जा॥ मग तीं निघून डुकरांच्या कळपांत गेलीं। आणि पाहा। डुक
रांचा सर्व काळप कड्यावरून समुद्रांत वेगानें धांवून। पाण्यांमध्यें मेला॥
३३ तेव्हां चारणारे पळाले। आणि। नगरांत येऊन। [हीं] अवघीं
आणि भूतग्रस्तांविषईं जीं। तीं सांगीतलीं॥ ३४ तेव्हां पाहा।
अवघें नगर येशूला भेटायास निघालें। आणि त्याला पाहून।
त्यानें आपल्या शिवारांतून जावें। ह्मणोन त्यांनी विनंती केली॥

पर्व ९॥ १ तेव्हां तो तारवावर चढून पलीकडे गेला।
आणि आपल्या नगरास आला॥ २ मग पाहा। त्यांनी बाजे
वर घातलेला वातरोगी त्याच्या जवळ आणिला। आणि येशू।
त्यांचा विश्वास पाहून। वातरोग्याला बोलिला। हे लेंकरा। धी
र धर। तुझीं पापें तुला क्षमा जालीं आहेत॥ ३ तेव्हां। पा
हा। पंडितांतील कित्येक आपणांमध्यें बोलिले। हा दुर्भाषणें
बोलतो॥ ४ आणि येशू। त्यांच्या कल्पना जाणून। बोलिला।
तुह्मी आपल्या अंतःकरणांमध्यें वाईट - कल्पना कां करितां?
५ वास्तव कीं। कोणतें बोलणें सोपें आहे? तुझीं पापें तुला क्ष
मा जालीं। अथवा हें बोलणें। तूं उठ। आणि चाल? ६ प
रंतु। माणसाच्या पुत्रास। पृथ्वीवर। पापें क्षमा करण्याचा अधि
कार आहे। हें तुह्मी जाणावें ह्मणोन। मग तो वातरोग्या
ला ह्मणतो। तूं उठून आपली बाज उचल। आणि आपल्या
घरास जा॥ ७ तेव्हां तो उठून आपल्या घरास गेला॥ ८ आ
णि समुदायानी पाहून आश्चर्य केलें। आणि ज्या देवानें माण
सांस येवढा अधिकार दिल्हा। त्याची स्तुती केली॥

९ मग येशूनें तेथून जाऊन। मात्थी ह्मटलेला माणुस।
जकात घेण्याच्या चौकीवर बसलेला पाहिला। आणि त्याला ह्मणतो।
माझ्या मागें ये। तेव्हां तो उठून त्याच्या मागें गेला॥ १० मं

तर तो घरांत जेवायास बसतां। असें जालें। कीं पाहा। बहुत
जकाहार व पापी येऊन येशूजवळ आणि त्याच्या शिष्यांजवळ
बसले॥ ११ तेव्हां फारिशी पाहून त्याच्या शिष्यांस बोलिले।
तुमचा गुरु। जकाहार व पापी यांबराबर कां खातो॥ १२ म
ग येशूने ऐकल्यावर। त्यांस ह्मटलें बळवानांस वैद्याचें अगत्य
नाहीं। परंतु ज्यांस दुखणें आहे। त्यांस॥ १३ आणि मला द
येची इच्छा आहे। परंतु यज्ञाची नाहीं। हें काय आहे? तु
ह्मी जाऊन शिका॥ वास्तव कीं। मी पुण्यवानांस नव्हे। परंतु
पाप्यांस पश्चात्तापासाठीं बोलावायास आलों॥
१४ तेव्हां योहान्नाचे शिष्य त्याच्या जवळ येऊन बोलिले। आ
ह्मी आणि फारिशी बहुत उपास करितों। परंतु तुझे शिष्य
उपास करीत नाहींत। याचें कारण काय? १५ मग येशू
त्यांस बोलिला। वऱ्हाडाचे सखे। जोंपर्यंत वर त्यांच्या बराब
र आहे। तोंपर्यंत शोक करूं सकतात कीं काय? परंतु जेव्हां
वर त्यांजपासून घेतला जाईल। असे दिवस येतील। आणि ते
व्हां ते उपास करितील॥ १६ आणि कोणी कोऱ्या कापडाचें
थिगळ जुन्या वस्त्रास लावीत नाहीं। वास्तव कीं। त्याचें जें घ
ड करणारें। तें वस्त्रापासून काढील, आणि फाट अधीक वाईट
होत असती॥ १७ आणखी। नवा द्राक्षरस जुन्या बुधल्यांत घा
लीत नाहींत। आणि घातलाच, तर बुधले फुटतात। आणि
द्राक्षरस ओघळतो। बुधलेही नासतात। परंतु नवा द्राक्षरस न
व्या बुधल्यांत घालितात। आणि दोन्हीं राखलीं जातात॥
१८ तो त्यांस हीं बोलत असतां, पाहा, अधिकारी ये
ऊन, त्याच्या पायां पडून बोलिला। कीं माझी कन्या आतांच
मेली आहे। परंतु तूं येऊन, आपला हात तिजवर ठेव, मग
ती जिवंत होईल॥ १९ आणि येशू उठून, त्याच्या मागें गे
ला। त्याचे शिष्यही [गेले]॥ २० तेव्हां पाहा। स्त्रिला बा
रा वर्षें रक्तस्राव होता। ती मागें येऊन त्याच्या वस्त्राच्या कां
ठास शिवली। २१ कां कीं। ती आपणाशीं बोलिली, मी त्या

च्या वस्त्रास जरीं केवळ शिवेन। तरीं रक्षीत होईन॥ २२ प
रंतु येशू। मुरडून आणि तिला पाहून। बोलिला। हे कन्ये।
धीर धर। तुझ्या विश्वासाने तुला तारिलें आहे॥ आणि त्याच
घटकेपासून। ती स्त्री रक्षीत जाली॥ २३ तेव्हां येशू अ
धिकाऱ्याच्या घरांत आल्यावर। आणि पांवा वाजिवणाऱ्यांस व बो
रडत्या समुदायास पाहून। २४ त्यांस बोलिला। तुह्मी येथून
जा। कां तर। मुलगी मेली नाहीं। परंतु झोपेंत आहे॥ तेव्हां
त्यांनी त्याचा उपहास केला॥ २५ मग समुदाय बाहेर घा
लविल्यानंतर। त्याने आंत जाऊन तिचा हात धरिला। आणि ती
मुलगी उठली॥ २६ नंतर ही कीर्ती त्या संपूर्ण देशांत गेली ❀
२७ आणि येशू। तेथून जात असतां। दोन आंधळे त्या
च्या मागें गेले। [ते] बोरडतांना बोलिले। हे दावीदाच्या संताना।
आह्मावर दया कर॥ २८ मग तो घरांत गेल्यावर। ते आं
धळे त्याच्या जवळ आले। आणि येशू त्यांस ह्मणतो। मी हें
करायास शक्तिमान आहें। असें तुह्मी विश्वासतां कीं काय? ते
त्याला ह्मणतात। होय प्रभू॥ २९ तेव्हां तो त्यांच्या डोळ्यां
स शिवून बोलिला। तुमच्या विश्वासाप्रमाणे तुह्मास होवो॥
३० आणि त्यांचे डोळे उघडले गेले॥ मग येशू त्यांस दट
वून बोलिला। जपा। हें कोणास न कळो॥ ३१ परंतु त्यां
नी बाहेर जाऊन। त्या अवघ्या देशांत त्याला गाजविलें ❀
३२ तेव्हां। ते बाहेर गेल्यावर। पाहा। त्यांनी भूतग्रस्त मुक्या
माणसाला त्याच्या जवळ आणिलें॥ ३३ आणि भूत घालविल्या
वर। तो मुका बोलिला। आणि समुदाय आश्चर्य करून ह्मणाले।
कीं इस्राएलामध्यें याप्रमाणे कधींही दिसलें नाहीं॥ ३४ परंतु
फारिशी बोलिले। तो। भूतांच्या अधिकाऱ्याकडून। भूतांस घा
लवितो ❀
३५ आणि येशू सर्व नगरें व गांवें यांमधून। त्यांच्या सभां
मध्यें शिकवीत। आणि राज्याचें सुवर्तमान गाजवीत। आणि लोकां
मध्यें प्रत्येक रोग व प्रत्येक बाधा। यांस बरीं करीत फिरला ❀

२६ आणि। समुदायांस पाहून। त्यांविषयीं तो कळवळला। यास्तव
कीं। मेंढपाळावांचून जशीं मेंढ्रें। तसे ते कासावीस आणि पांगलेले
होते॥ २७ तेव्हां तो आपल्या शिष्यांस ह्मणतो। पीक फार [आहे]
खरें। परंतु कामकरी थोडे [आहेत॥] २८ यास्तव। पिकाच्या धन्या
ने आपल्या पिकांत कामकरी लावावे। ह्मणोन तुह्मी त्याची प्रार्थ
ना करा॥

पर्व: १०॥ १ तेव्हां त्याने आपल्या बारा शिष्यांस जंवळ बोलावून।
त्यांस अशुद्ध आत्म्यांवरचा असा अधिकार दिल्हा। कीं त्यांस घा
लवावें। आणि प्रत्येक रोग व दुखणें यांस बरें करावें॥ २ आ
णि त्या बारा प्रेषितांचीं नांवें हीं आहेत। पहिला शीमोन। जो
पेत्रस ह्मटलेला। आणि त्याचा भाउ आंद्रियास। जेबेदीचा जो या
कोब तो आणि त्याचा भाउ योहान्न। ३ फिलीप्पस आणि बार्थल
मी। थोमा आणि मात्थी जो जकातदार। आलफीचा जो याकोब तो
आणि लेब्बी ज्याचें आडनांव थाद्दी। ४ शीमोन। जो कानानी तो
आणि यहूदा जो इस्कारयोते। ज्यानेही त्याला परस्वाधीन केलें
तो॥ ५ ह्यां बारांस येशूने पाठविलें। त्यांस सांगी करून ह्मट
लें। परप्रजांच्या वाटेस जाउं नका। आणि शोमरोनकरांच्या नग
रांत जाउं नका। ६ परंतु त्यापेक्षां इस्राएलाच्या घरचीं। जीं ह
रपलीं मेंढ्रें। त्यांजवळ जा॥ ७ आणि जातांना। गाजवीत बोला।
कीं आकाशांचें राज्य जवळ आलें आहे॥ ८ विकाऱ्यांस निरोगी
करा। कोढ्यांस शुद्ध करा। मेलेल्यांस उठवा। भुतांस घालवा।
फुकट तुह्मास मिळालें। फुकट द्या॥ ९ सोनें। व रुपें। व तांबें आ
पल्या कंबरकस्यांमध्यें घेउं नका। १० वाटेसाठीं झोळणा नका।
आणि दोन आंगरखे नका। आणि वाहाणा नका। आणि काठी
नका। कां कीं। कामकरी आपल्या पोषणास योग्य आहे॥ ११ आ
णि ज्या ज्या नगरांत किंवा गांवांत तुह्मी जातां। त्यांत कोण योग्य
आहे? [असें] पुसा॥ आणि तुह्मी निघाल। तोंपर्यंत तेथे राहा॥
१२ आणि घरांत जातांना त्याला क्षेम द्या॥ १३ आणि जर तें
घर योग्यच असेल। तर तुमचें कल्याण त्यावर जावो। परंतु जर तें

योग्य नाहीं। तर तुमचें कल्याण तुह्मांजवळ परत येवो॥ १४ आ
णि जर कोणी तुह्मास न घेईल। आणि तुमच्या गोष्टी न ऐकेल।
तर त्या घरांतून। अथवा त्या नगरांतून निघतांना। तुह्मी आप
ल्या पायांची धूळ झाडून टाका॥ १५ मी तुह्मास खचीत सांगतों।
न्यायठरण्याच्या दिवशीं त्या नगरापेक्षां सदोम व गमोरा देशाच्याने
सहन होववेल॥ १६ पाहा। मी तुह्मास लांडग्यांमध्यें मेंढ्रांसा
रिखे पाठवितों॥ यास्तव तुह्मी सापांसारिखे धूर्त। परंतु खबुत्रांसा
रिखे निर्दोषी व्हा॥ १७ आणि माणसांविषईं सावध व्हा। यास्तव
कीं। ते तुह्मास न्यायसभांत स्वाधीन करितील। आणि त्यांच्या
सभांमध्यें तुह्मास मार देतील॥ १८ आणि सुभेदार व राजे यां
जवळ तुह्मी माझ्यासाठीं नेले जाल। कारण कीं। त्यांस व परप्र
जांस साक्ष [व्हावी॥] १९ परंतु जेव्हां तुह्मास परस्वाधीन करि
तात। तेव्हां कसें। अथवा काय बोलाल। यांविषईं चिंता करूं नका।
यास्तव कीं। तुह्मी काय बोलाल। हें त्याच घटकेस तुह्मास दिल्हें
जाईल। २० कां कीं। जे बोलणारे। ते तुह्मी नव्हां। परंतु तु
मच्या बापाचा आत्मा। तो तुह्मामध्यें बोलणारा आहे॥ २१ ते
व्हां भाऊ भावाला। आणि बाप लेंकराला मरणासाठीं परस्वाधीन
करील॥ आणि लेंकरें आईबापांविरुद्ध उठून। त्यांस वधवितील॥
२२ आणि। माझ्या नांवाकरितां। तुह्मी सर्वांकडून देषिलेले व्हा
ल। परंतु जो शेवटापर्यंत टिकतो। तोच तारला जाईल॥ २३ आ
णि जेव्हां येक्या नगरांत तुमच्या पाठीस लागतात। तेव्हां दु
सऱ्यांत पळा॥ कारण। मी तुह्मास खचीत सांगतों। माणसा
चा पुत्र येई। तोंपर्यंत तुह्मी इस्राएलाच्यां नगरीं समाप्ती
करणारच नव्हां॥ २४ शिष्य गुरूच्या वर्ता नाहीं। आणि चाक
र धन्याच्या वर्ता नाहीं॥ २५ शिष्य आपल्या गुरूसारिखा। आ
णि चाकर आपल्या धन्यासारिखा व्हावा। हें त्यांस पुरे॥ जर त्या
नी घरधन्यास बालजबूल ह्मटलें। तर किती विशेषें त्याच्या घर
च्यांस [ह्मणतील?] २६ यास्तव त्यांस भिऊं नका। कां कीं। जें
उघडें केलें जाणार नाहीं। असें कांहीं झांकलें नाहीं। आणि जें

कळविलें जाणार नाहीं। असें [कांहीं] गुप्त [नाहीं॥] २७ मी जें आंधेरांत तुह्मास ह्मणतों। तें तुह्मी उजेडांत सांगा। आणि, जें तुह्मी कानांत ऐकतां, तें घरांवर गाजवा॥ २८ आणि जे शरीरा ला वधितात। पण आत्म्याला वधायास शक्तिमान नाहींत। त्यांमुळें भिउं नका। परंतु जो आत्मा व शरीरही। यां दोघांचा नाश अधोगतीं त करायास समर्थ आहे। त्यास विशेषें भ्या॥ २९ दोन चिमण्या [येक] पैस्याला विकत्या नाहींत। कीं काय? तथापि तुमच्या बापाशिवाय। त्यांहून येक भुमिवर पडणार नाहीं॥ ३० आणि तुमच्या डो क्याचे केंसही सर्व मोजलेले आहेत॥ ३१ यास्तव भिउं नका। बहुत चिमण्यांहून। तुह्मी श्रेष्ठ आहां॥ ३२ यास्तव प्रत्येक। जो को णी। माणसांसमोर। मजविषईं पत्करील। त्याविषईं मीही। आ पल्या आकाशांतील बापासमोर। पत्करीन॥ ३३ परंतु कोणीही। जो माणसांसमोर मला नकारील। त्याला मीही आपल्या आकाशां तील बापासमोर नकारीन॥ ३४ मी पृथ्वीवर शांती घालावयास आलों। असें कल्पुं नका। शांती नव्हे। परंतु तरवार घालावयास मी आलों आहें॥ ३५ कां कीं। माणसाला आपल्या बापाविरुद्ध। आणि कन्येला आपल्या आईविरुद्ध। आणि सुनेला आपल्या सासू विरुद्ध फितवायास मी आलों आहें॥ ३६ आणि माणसाचे वैरी आपल्या घरचे [होतील॥] ३७ जो माझ्या पेक्षां बापाची अथवा आईची प्रीती करितो। तो माझ्या योग्य नाहीं। आणि जो। मा झ्या पेक्षां पुत्राची अथवा कन्येची प्रीती करितो। तो माझ्या योग्य नाहीं॥ ३८ आणि जो आपला वधस्तंभ घेतांना माझ्या मागें येत नाहीं। तो माझ्या योग्य नाहीं॥ ३९ जो आपल्या जीवाचें साधन क रितो। तो त्याला गमावील। आणि जो माझ्या साठीं आपल्या जि वास गमावतो। तो त्याचें साधन करील॥ ४० जो तुह्मास अंगि कारितो। तो मला अंगिकारितो। आणि जो मला अंगिकारितो। तो माझ्या पाठविणाऱ्यास अंगिकारितो॥ ४१ जो भविष्यभा ष्याच्या नांवानें भविष्यभाष्यास अंगिकारितो। तो भविष्यभा ष्याचें फळ पावेल॥ आणि जो पुण्यवानाच्या नांवाने पुण्यवानाला

अंगिकारितो। तो पुण्यवानाचें फळ पावेल॥ ४२ आणि ज
र कोणी। शिष्याच्या नांवानें। ह्यां लाहानांतील येकाला फक्त
थंड [पाण्याचा] पाला पाजील। तर। मी तुह्मास खचीत ह्मण
तों। तो आपलें फळ गमावणार नाहीं॥

पर्व ११॥ १ मग। येशूनें आपल्या बारा शिष्यांस नेमणूक
देणें संपविल्यावर। असें जालें। तो त्यांच्या नगरांमध्यें उपदे
शितांनां गाजवायास तेथून निघाला॥ २ आणि योहान्न बंदि
शाळेंत। ख्रीस्ताचीं कामें ऐकल्यावर। आपल्या शिष्यांतून दो
घांस पाठवून। ३ त्याला बोलिला। जो येतो, तो तूं आहे
स? किंवा आह्मी दुसऱ्याची वाट पाहावी? ४ तेव्हां येशू उ
त्तर देतां त्यांस बोलिला। तुह्मी जाऊन। जीं ऐकतां व पाहा
तां। तीं योहान्नास फिरोन सांगा। ५ आंधळे पाहातात, आ
णि पांगळे चालतात। कोढी शुद्ध केले जातात, आ
णि बहिरे ऐकतात। मेले उठविले जातात। आणि दरि
द्री यांस सुवर्तमान सांगीतलें आहे॥ ६ आणि जर को
णी मजविषईं अडखळत नाहीं। तर त्याचें कल्याण आहे॥
७ तेव्हां ते गेल्यावर। येशू योहान्नाविषईं समुदायांस बो
लुं लागला। तुह्मी कशास पाहायास रानांत निघून गेलां? वा
ऱ्यानें हालविलेल्या बोरूला। कीं काय? ८ आणखी कशास पा
हायास। तुह्मी निघून गेलां? मऊ वस्त्रांकडून झांकलेल्या माणसा
ला। कीं काय? पाहा। जे मऊ [वस्त्रें] वाहातात, ते राजांच्यां घ
रांत आहेत॥ ९ आणखी। कशास पाहायास तुह्मी निघून गे
लां? भविष्यभाष्याला। कीं काय? होय। मी तुह्मास बोलतों।
आणि भविष्यभाष्याहून फार अधीक। त्याला॥ १० वास्तव कीं।
तोच हा आहे। ज्याविषईं हें लिहिलें आहे। पाहा। मी आपल्या
दूतास। तुझ्या तोंडापुढें। पाठवितों। तो तुजपुढें तुझी वाट
सिद्ध करील॥ ११ मी तुह्मास खचीत सांगतों। स्त्रियांच्या
जन्मलेल्यांमध्यें। योहान्न बाप्तीस्मा देणाऱ्याहून [कोणी] मोठा उप
जला नाहीं। परंतु आकाशांच्या राज्यांत। जो फार लाहान।

तो त्याहून मोठा आहे॥ १२ आणि योहान बाप्तीस्मा देणा
याच्या दिवसांपासून आतांपर्यंत। आकाशांचें राज्य बलात्का
र पावतें। आणि बलात्कारीक त्याला बळानें घेतात॥ १३ कां
कीं योहानापर्यंत। सर्व भविष्यभाषी व शास्त्र भविष्य बालिले॥
१४ आणि। जर अंगिकारायाचो इच्छा तुह्मास आहे। तर ए
लीया। ज्याचें येणें व्हायाचें। तो हाच आहे॥ १५ ज्याला ऐ
कायास कान आहेत। तो ऐको॥ १६ तर मी या पिढी
ला काय उपमा देऊं? लाहान लेकरांसारिखी आहे। बा
जारांमध्यें बसतात। आणि आपल्या सवंगड्यांस हाक मारतां
ना। १७ ह्मणतात। आह्मी तुह्माजवळ पांवा वाजविला आ
हे। परंतु तुह्मी न नाचलां। आह्मी तुह्माजवळ विपलाप के
ला आहे। परंतु तुह्मी वडवून न घेतलें। १८ कां कीं योहा
न खात नसतां व पीतही नसतां आला। परंतु [असें] ह्मणता
त। [कीं] त्याला भूत आहे॥ १९ माणसाचा पुत्र खात असतां व
पीत असतां आला। आणि ह्मणतात। पाहा। माणुस खादाड व
मद्यपी। जकातदारांचा व पाप्यांचा सखा॥ परंतु ज्ञान आपल्या
लेंकरानी पुण्यवान ठरविलें आहे॥ २० तेव्हां ज्यां नगरांमध्यें
त्याचे बहुत चमत्कार घडले होते। त्यांस तो निषेधुं लागला।
कारण कीं। त्यानी पश्चात्ताप केला नाहीं॥ २१ हे खो
राजीना। तुला हायहाय॥ हे बेथसाईदा। तुला हायहाय। कार
ण कीं। तुह्मामध्यें जे चमत्कार घडले। ते जर जोर व जी
दोन यांत घडले असते। तर त्यानी। पूर्वकाळीं। तरट व रा
ख यांकडून। पश्चात्ताप केला असता॥ २२ आणखी तुह्मास सां
गतों। न्यायठरण्याच्या दिवसीं। तुमच्यापेक्षां जोर व जीदोन।
यांच्यानें सहन होववील॥ २३ आणि हे कापेर्णाहूमा। जें
आकाशापर्यंत उंचावलेलें। तें तूं लोकांतरापर्यंत खालीं टाकिलें जा
सील। कां कीं। तुजमध्यें जे चमत्कार घडले। ते जर सदो
मांत घडले असते। तर तें आजपर्यंत राहिलें असतें॥ २४ आ
णखी तुह्मास सांगतों। कीं न्यायठरण्याच्या दिवसीं। तुह्मापेक्षां

सदोम देशाच्याने सहन होववील॥ २५ त्या समयीं। येशू उ
त्तर देतां बोलिला, हे बापा। आकाशाचा व पृथ्वीचा प्रभू।
त्वां हीं गोष्टीं। ज्ञानी व तर्कवान यांपासून लपवितांना। लेंकरां
जवळ प्रगट केलीं आहेत। यावरून तुला पत्करितां स्तवितों॥
२६ होय बापा। कां कीं तुझ्या दृष्टींत असेंच बरें दिसलें आ
हे॥ २७ माझ्या बापाकडून अवघीं मला सोपलीं आहेत।
परंतु बापावांचून कोणी पुत्राला वोळखत नाहीं। आणखी।
पुत्र व ज्याजवळ प्रगट करायास पुत्र इच्छीत असेल। त्यावांचू
न कोणी बापाला वोळखत नाहीं॥ २८ अहो श्रम करणारे।
आणि वोझ्यानी लादलेले। तुह्मी सर्व माझ्या जवळ या। ह्मण
जे मी तुह्मास विसांवा देईन। २९ तुह्मी आपणांवर माझें जो
कड घ्या। आणि मजपासून शिका, कां कीं। मी अंतःकरणांत
नम्र व लीन आहें। आणि तुह्मी आपल्या जिवांस विसांवा पा
वाल। ३० यास्तव कीं। माझें जोकड सोईचें, आणि माझें वो
झें हलकें आहे॥

पर्व १२॥ १ त्या समयीं। येशू शाब्बाथांमध्यें शित्रांमधून गे
ला, तेव्हां त्याचे शिष्य क्षुधीत जाले। आणि कणसें मोडतांना।
खाऊं लागले॥ २ तेव्हां फारिशी पाहून त्याला बोलिले। पाहा।
जें शाब्बाथांत करूं नये। तें तुझे शिष्य करितात॥ ३ मग तो
त्यांस बोलिला। जेव्हां दावीदास। आणि त्याबराबरच्यांस भूक
लागली। तेव्हां त्याने काय केलें। तें तुह्मी न वाचलें? ४ तो
देवाच्या घरांत कसा गेला। आणि पुढें ठेवायाच्या भाकरी।
ज्या त्याने व त्याच्या बराबरच्यानी खाऊं नये। केवळ उपाध्या
नी मात्र [खाव्या,] त्या त्याने खाल्ल्या? ५ किंवा तुह्मी शास्त्रां
त हें न वाचिलें? कीं उपाध्ये। देवळांत शाब्बाथांमध्यें। शाब्बाथाला
विटाळवितांना। निर्दोषी आहेत? ६ आणि तुह्मास सांगतों। कीं
देवळापेक्षां येथे [कोणी] मोठा आहे॥ ७ तथापि। मला दये
ची इच्छा आहे, परंतु यज्ञाची नाहीं। हें काय आहे? अ
सें जर तुह्मी जाणलें असतें। तर निर्दोष्यांस अन्यायी ठरवि

र्से मसतें। ८ कारण कीं। माणसाचा पुत्र शाब्बायाचाही प्र
भू आहे॥
९ तेव्हां तो तेथून निघून। त्यांच्या सभेंत आला॥ १० आ
णि पाहा, वाळलेल्या हाताचा माणुस तेथे असतांना। ते। त्या
जवर दोष ठेवयाकरितां। त्याला विचारितां बोलिले। शाब्बा
थांमध्यें निरोगी करणें उचीत आहे। किंवा नाहीं? ११ ते
व्हां तो त्यांस बोलिला। तुह्मामध्यें कोण माणुस होईल। जो
त्याला येक मेंढरुं असतांना। जर तें शाब्बाथांमध्यें खांचेंत प
डेल। तर त्याला धरून काढणार नाहीं? १२ तर मेंढाहून
माणुस केवढा श्रेष्ठ आहे? यास्तव शाब्बाथांमध्यें बरें करणें उ
चीत आहे॥ १३ तेव्हां तो त्या माणसाला ह्मणतो। तूं आपला
हात लांब कर, आणि त्याने लांब केला। तेव्हां दुसऱ्यासारि
खा पूर्ववत बरा जाला॥ १४ तेव्हां फारिश्यानी बाहेर जाऊ
न। त्याचा घात कसाने करावा। ह्मणोन त्याविरुद्ध येकत्र वि
चार मांडला। १५ परंतु येशू। [हें] जाणून। तेथून निघाला।
तेव्हां बहुत समुदाय त्याच्या मागें गेले। आणि त्याने त्यां स
वांस निरोगी केलें। १६ मग। त्यानी त्याला प्रगट न करा
वें। ह्मणोन त्याने त्यांस। हडसून सांगीतलें। १७ अशास्तव कीं।
यशाया भविष्यभाषी। याकडून जें ह्मटलें। तें पूर्ण व्हावें। कीं।
१८ पाहा। माझा चाकर। ज्याला म्या निवडिलें। माझा प्रिती
पात्र। ज्यावर माझा जीव फार संतोषीत आहे। ह्यावर माझा
आत्मा ठेवीन। आणि तो परप्रजांस न्यायाचें वर्तमान सांगेल॥
१९ तो भांडणार नाहीं, आणि बोरडणार नाहीं, आणि मार्गां
मध्यें त्याचा शब्द कोणी ऐकणार नाहीं। २० तो जयांत न्या
य काढी, तोंपर्यंत। चेंचलेला बोरु मोडणार नाहीं। व धुमस
त जोतीला विझविणार नाहीं। २१ आणि परप्रजा त्याच्या
नांवावर आशा धरतील॥
२२ तेव्हां आंधळा व मुका भूतग्रस्त त्याच्या जवळ आणिला
होता। आणि त्याने त्याला असें निरोगी केलें, कीं तो आं

धळा व मुका। याने बोलावें व पाहावेंही॥ २३ मग अवघे समु
दायं विस्मीत जाले। आणि बोलिले। हा दावीदाचा पुत्र नाहीं
कीं काय? २४ परंतु फारिश्यानी ऐकून, ह्मटलें। बालजबूल,
जो भूतांचा अधिकारी। त्याविना हा भूतांस घालवीत नाहीं॥
२५ तेव्हां येशू। त्यांच्या कल्पनां जाणून। त्यांस बोलिला। प्र
त्येक राज्य। आपल्याविरुद्ध विभागलें असतां। वोसाड होतें।
आणि प्रत्येक नगर अथवा घर आपल्याविरुद्ध विभागलें अ
सतां। स्थीर राहाणार नाहीं॥ २६ आणि। जर साटान साटा
नास घालवितो, तर तो आपल्याविरुद्ध विभागला आहे। या
स्तव त्याचें राज्य कसें स्थीर राहील? २७ आणि जर मी।
बालजबूलाकडून भूतांस घालवितों। तर तुमचे पुत्र त्यांस को
णाकडून घालवितात? याजकरितां तेच तुमचे न्यायाधीश होती
ल॥ २८ परंतु। जर मी देवाच्या आत्म्याकडून भूतांस घाल
वितों। तरी देवाचें राज्य तुह्मावर पावलें आहे॥ २९ किं
वा बळकटाच्या घरांत जायास। आणि त्याचीं साहीत्यें लुटाया
स। कोणी। त्या बळवानाला प्रथम बांधल्यांवाचून। कसा शक्तिमान
आहे? नंतरच त्याचें घर लुटील॥ ३० जो मजबराबर
नाहीं। तो मजविरुद्ध आहे। आणि जो माझ्या संगातें गोळा
करीन नाहीं। तो विखरितो॥ ३१ याजकरितां तुह्मास सांग
तों। प्रत्येक पाप व दुर्भाषण। हीं माणसांस क्षमा केलीं जाती
ल। परंतु [पवित्र] आत्म्यावर दुर्भाषण। हें माणसांस क्षमा
केलें जाणार नाहीं॥ ३२ आणि जो जो माणसाच्या पुत्राविः
रुद्ध शब्द बोलतो। त्याला तो क्षमा केला जाईल। परंतु जो
जो पवित्र आत्म्याविरुद्ध बोलतो। तें त्याला। ह्या लोकांत क्षमा
केलें जाणार नाहीं। आणि जो होणार [लोक] यांतही नाहीं॥
३३ झाड चांगलें व त्याचें फळ चांगलें करा। अथवा झाड
वाईट व त्याचें फळ वाईट करा। कारण कीं। फळावरून झाड
कळतें ३४ अहो सर्पांचे उपज। तुह्मी दुष्ट असतां। तुमच्यानी चांग

तीं कशीं बोलवतील? कारण कीं। अंत:करणाच्या परिपूर्णप
णाहून तोंड बोलतें॥ ३५ चांगला माणुस। अंत:करणाच्या चां
गल्या भांडारांतून। चांगलीं काढितो। आणि दुष्ट माणुस। दुष्ट
भांडारांतून। दुष्ट असीं काढितो॥ ३६ परंतु तुह्मास सांगतों।
कीं। प्रत्येक व्यर्थ शब्द। जो माणसें बोलत असतील। त्याविष
ईं न्यायठरण्याच्या दिवशीं हिशेब भरून देतील॥ ३७ कारण
कीं। तुझ्या गोष्टीवरून। तूं पुण्यवान ठरविला जासील। आणि तु
झ्या गोष्टीवरून दोषी ठरविला जासील॥

३८ तेव्हां पंडित आणि फारिशी। यांतून कित्येक उत्तर देतां
बोलिले। हे गुरू आह्मी तुझ्यापासून चिन्ह पाहायास इछितों॥
३९ मग त्याने। उत्तर देतां। त्यांस ह्मटलें। कीं दुष्ट व व्यभि
चारीण पिढी चिन्ह मागतो। परंतु योना भविष्यभाषी। या
च्या चिन्हावांचून तिला चिन्ह द्यायाचें नाहीं॥ ४० कारण कीं।
जसा योना। तीन दिवस आणि तीन रात्री। मास्याच्या पोटां
त होता। तसा माणसाचा पुत्र। तीन दिवस आणि तीन रा
त्री। पृथ्वीच्या ह्रदयीं होईल॥ ४१ नीनवेकर माणसें। या पि
ढीशीं न्यायठरण्यांत उठतील। आणि हिला अन्यायी ठरवितील।
यास्तव कीं। त्यानी योनाच्या गाजविण्यावरून पश्चात्ताप केला।
परंतु। पाहा। योनापेक्षां येथे कांहीं अधीक॥ ४२ दक्षणेची
राणी। या पिढीशीं न्यायठरण्यांत उठेल। आणि हिला अन्यायी
ठरवील। यास्तव कीं। ती। शलमोनाचें ज्ञान ऐकायास। पृथ्वी
च्या शेवटांपासून आली। परंतु। पाहा। शलमोनापेक्षां येथे कां
हीं अधीक॥ ४३ जेव्हां अशुद्ध आत्मा माणसांतून निघाला।
तेव्हां कोरड्या जागांमधून विसांवा शोधीत फिरतो। परंतु पा
वत नाहीं। ४४ तेव्हां ह्मणतो। जेथून निघालों तेथे। माझ्या
घराश परत जाईन। आणि येऊन। रिकामें। व झाडलेलें। व शो
भविलेलें पावतो॥ ४५ नंतर तो जातो। आणि दुसरे सात आ
त्मे। आपल्याहून अधीक दुष्ट। यांस आपल्या बरावर घेतो।

मग ते आंत जाऊन तेथे राहातात। आणि त्या माणसाच्या
शेवटलीं जीं। मीं पहिल्यांपेक्षां वाईट होतात॥ तसें ह्या दुष्ट
पिढीस प्राप्त होईल ॐ
४६ आणि तोंपर्यंत। तो समुदायांस बोलत असतां। पाहा।
त्याची आई व भाऊ। त्यासीं बोलायास पाहातां। बाहेर उभीं
राहिलीं॥ ४७ तेव्हां कोणी त्याला सांगीतलें। पाहा। तुझी आ
ई आणि तुझे भाऊ बाहेर उभे राहून। तुजसीं बोलायास पा
हातात॥ ४८ मग तो उत्तर देतां। आपल्याला सांगणारा।
यास ह्मणाला। माझी आई कोण आहे? आणि माझे भाऊ
कोण आहेत? ४९ नंतर त्याने। आपल्या शिष्यांवर आपला
हात लांब करून। ह्मटलें। पाहा। माझी आई। आणि माझे
भाऊ। ५० कारण कीं। जो कोणी माझा आकाशांतील बा
प याची इछा आचरील। तोच माझा भाऊ। व बहीण। व
आई आहे ॐ
पर्व १३ ॥ १ आणि त्याच दिवशीं। येशू। घरांतून निघून।
समुद्राजवळ बसला॥ २ तेव्हां असे बहूत समुदाय त्याजवळ मि
ळाले। कीं तो तारवावर चढून बसला। आणि सगळा समुदा
य थडीवर उभा राहिला॥ ३ तेव्हां तो दाखल्यानी त्यांस ब
हूत बोलत असतां ह्मणाला। पाहा। पेरणारा पेरायास नि
घाला। ४ आणि तो पेरितांना। कांहीं [बीजें] मार्गाजवळ पड
लीं। आणि पांखरानी येऊन तीं खाऊन टाकिलीं॥ ५ आ
णि दुसरीं खडकाळींवर। जेथे त्यांस बहूत माती नाहीं। ते
थे पडलीं। आणि त्यांस मातीची खोली नव्हती। ह्मणोन ल
वकर रुजलीं। ६ परंतु सूर्य उगवल्यावर। तीं करपलीं। आ
णि त्यांस मूळ नाहीं। यास्तव वाळून गेलीं॥ ७ आणि दुस
रीं कांटेझाडांमध्यें पडलीं। तेव्हां कांटेझाडानी वाढून त्यांस गु
दमारलें॥ ८ परंतु दुसरीं चांगल्या भूमींत पडलीं। आणि कोणी
शंभरपटही। आणि कोणी साठपट। आणि कोणी तीसपट। [अ
सें] फळ दिल्हें॥ ९ ज्याला ऐकायास कान आहेत। तो ऐको ॐ

१० तेव्हां शिष्य, जवळ येऊन, त्याला बोलिले, तूं त्यांस दा
खल्यानी कां बोलतोस? ११ मग त्याने उत्तर देतां त्यांस ह्म
टलें, आकाशांच्या राज्याचीं रहस्यें जाणणें तुह्मास दिल्हें आ
हे, परंतु त्यांस दिल्हें नाहीं, यासाठीं॥ १२ कां कीं, ज्या को
णाला आहे, त्याला दिल्हें जाईल, आणि त्याला फार होईल। प
रंतु ज्या कोणाला नाहीं, त्यापासीं जें आहे, तेंही त्याजपासू
न् घेतलें जाईल॥ १३ ह्यासाठीं मी त्यांस दाखल्यानी बोलतों,
यास्तव कीं, ते पाहात असतां, पाहात नाहींत, आणि ऐक
त असतां, ऐकत नाहींत, आणि समजत नाहींत॥ १४ आणि
यशायाचें भविष्यभाषण त्यांस पूर्ण जालें, जें तें ह्मणतें, ऐक
ण्याने तुह्मी ऐकाल, परंतु न समजाल। आणि पाहातां पाहा
ल, परंतु तुह्मास दिसणारच नाहीं। १५ कारण कीं,
या लोकाचें अंतःकरण जड जालें। आणि ते कानानी मंद ऐ
कतात। त्यानी आपले डोळेही मिटले, नाहीं तर, त्यानी क
धीं डोळ्यांकडून पाहावें। आणि कानांकडून ऐकावें। अंतःकरणा
कडूनही समजावें। मग त्यानी फिरावें, आणि म्या त्यास निरोगी
करावें॥ १६ परंतु तुमचे डोळे पाहातात, यास्तव ते, आणि तुम
चे कान ऐकतात। यास्तव ते धन्य। १७ कारण तुह्मास खचीत सां
गतों, कीं जीं तुह्मी पाहातां, तीं बहुत भविष्यभाष्यानी व पुण्यवा
नानी पाहायास इच्छिलीं होतीं। परंतु पाहिलीं नव्हतीं। आणि, जीं
तुह्मी ऐकतां, तीं ऐकायास [इच्छिलीं,] परंतु ऐकिलीं नव्हतीं॥
१८ यास्तव तुह्मी पेरणाराचा दाखला ऐका॥ १९ कोणी रा
ज्याची गोष्ट ऐकतां, परंतु न समजतां, तो दुष्ट येतो, आणि त्या
च्या अंतःकरणांत पेरलेलें जें, तें हरण करितो। मार्गाजवळ
ज्याला पेरलें, तो हाच आहे॥ २० आणि ज्याला खडकाळीं
वर पेरलें, तो हाच आहे, कीं, गोष्ट ऐकतो आणि तेव्हांच
तिला आनंदाने घेतो। २१ तथापि त्याला आपल्यांत मूळ ना
हीं। परंतु क्षणभंगूर आहे। आणि गोष्टीकरितां हाल अथ
वा पाठलाग प्राप्त जाल्यावर, तो तेव्हांच अडखळतो॥ २२ आ

णि ज्याला कांटेझाडांमध्यें पेरणें जालें। तो हाच आहे। कीं गो
ष्ट ऐकतो। परंतु। ह्या जगाची चिंता आणि धनाचें ठकपण हीं ह्या
गोष्टीस दडपतात। आणि ती निर्फळ होती॥ २३ आणि ज्याला
चांगल्या भूमींत पेरलें। तो हाच आहे। कीं गोष्ट ऐकतो व समजतो।
हा फळ देतो खरें। ह्मणजे कोणी शंभरपटही। आणि कोणी साठ
पट। आणि कोणी तीसपट देतो ※ २४ तो त्यांस दुसरा दाखला दे
तां बोलिला। आकाशांच्या राज्याला ही उपमा द्यावयाची
आहे। [कीं] माणसाने आपल्या शेतांत चांगलें बीज पेरिलें। २५ पर
तु। माणसें निजल्या वेळेस। त्याचा वैरी आला। आणि गव्हाच्या म
ध्यें रानबीजें पेरल्यावर निघाला॥ २६ मग जेव्हां पाला फुटला।
आणि त्याने फळ दिल्हें। तेव्हां रानझाडेंही दिसलीं॥ २७ ते
व्हां घरधन्याच्यां चाकरानी जवळ येऊन त्याला ह्मटलें। हे प्रभू।
त्वां आपल्या शेतामध्यें चांगलें बीज पेरलें कीं नाहीं? तर त्याला
रानझाडें कोठून जालीं? २८ तेव्हां तो त्यांस बोलिला। वैरी
माणसाने हें केलें आहे॥ मग चाकरानी त्याला ह्मटलें। तर आ
ह्मी जाऊन तीं गोळा करावीं ह्मणोन इच्छितोस कीं काय?
२९ तेव्हां तो बोलिला। नको। कदाचित तुह्मी रानझाडें गो
ळा करितां। त्यांच्या बराबर गव्हंही उपटाल॥ ३० कापणीपर्यंत।
दोन्ही बराबर वाढुं द्या। मग कापणीच्या समयीं। मी कापणा
ऱ्यांस ह्मणेन। तुह्मी पहिल्याने रानझाडें गोळा करा। आणि।
त्यांस जाळण्यासाठीं। त्यांच्या पेंढ्या बांधा। परंतु गहूं माझ्या
कोठारांत सांठवा ※ ३१ तो त्यांस दुसरा दाखला देतां बोलि
ला, आकाशांचें राज्य मोहरीच्या बीजासारिखें आहे। जें या
ला माणसाने घेऊन आपल्या शेतांत पेरिलें॥ ३२ तें सर्व बी
जांतील लाहानच आहे। परंतु जेव्हां वाढलें। तेव्हां रोपांतील
मोठें आहे। आणि असें झाड होतें। कीं आकाशांतलीं पांख
रें येऊन त्याच्या फांद्यांवर वस्ती करितात ※ ३३ त्याने त्यां
स दुसरा दाखला सांगीतला। कीं आकाशांचें राज्य फुगवणासा
रिखें आहे। जें याला बायकोने घेऊन। तीन मापें पिठामध्यें

सगळें फुगे तोंपर्यंत गुप्त ठेविलें॥ ३४ येशूने हीं अवघीं दाखल्यां
वरून समुदायांस ह्मटलीं। आणि दाखल्यावांचून तो त्यांस बो
लिला नाहीं। ३५ अशासाठीं कीं। भविष्यभाष्याकडून जें ह्मट
लें। कीं मी आपलें तोंड दाखल्यानी उघडीन। जग मांडण्या
पासून जीं लपविलेलीं। तीं उच्चारीन। हें पूर्ण व्हावें॥

३६ नंतर येशू समुदायांस जाऊं देऊन घरांत गेला। आ
णि त्याचे शिष्य त्याच्या जवळ येऊन बोलिले। शेतांतल्यां रान
झाडांचा दाखला फोडून आह्मास सांग॥ ३७ आणि उत्तर दे
तां त्याने त्यांस ह्मटलें। जो चांगलें बीज पेरितो। तो माणसा
चा पुत्र आहे। ३८ आणि जें शेत, तें जग आहे। आणि
जें चांगलें बीज। तें राज्याचीं संतानें आहेत। आणि रानझा
डें तीं त्या दुष्टाचीं संतानें आहेत। ३९ आणि ज्या वैऱ्याने
तीं पेरलीं तो याबलस आहे। आणि कापणी ती जगाची स
माप्ती आहे। आणि जे कापणारे, ते दूत आहेत॥ ४० यास्तव।
जशीं रानझाडें गोळा केलीं जातात। आणि अग्नींत जाळिलीं जा
तात। तशें ह्या जगाच्या समाप्तीस होईल॥ ४१ माणसाचा पुत्र
आपल्या दूतांस पाठवील। आणि ते सर्व आडखळण्यांस। व सर्व अ
शास्त्र करणाऱ्यांस त्याच्या राज्यांतून गोळा करतील, ४२ आ
णि त्यांस अग्नीच्या भट्टींत टाकतील। तेथे रडणें व दांत कड
कडिवणें होईल॥ ४३ तेव्हां जे पुण्यवान ते आपल्या बापाच्या
राज्यांत सूर्यासारिखें प्रकाशतील॥ ज्याला ऐकायास कान आहेत।
तो ऐको॥ ४४ आणखी आकाशांचें राज्य शेतांतील लपविलि
ल्या धनासारिखें आहे। हें माणसाला सांपडून। त्याने गुप्त ठेवि
लें, मग त्याच्या आनंदाने तो जातो। आणि आपलीं जितकीं
आहेत। तीं आवघीं विकितो। नंतर तें शेत विकत घेतो॥
४५ आणखी व्यापारी मनुष्य। चांगल्या मोत्यांस शोधितो। ह्याच्या
सारिखें आकाशांचें राज्य आहे। ४६ त्याला फार मोलाचें येक
मोतीं याचा शोध लागल्यावर। आपलीं जितकीं होतीं। तीं अव
घीं त्याने जाऊन विकलीं। मग तें विकत घेतलें॥ ४७ आणखी आ

काशांचें राज्य यासारिखें आहे। जाळें समुद्रांत टाकल्यावर सर्व
प्रकारच्यांस गोळा करितें। ४८ [आणि] तें भरल्यावर त्यांनी
तीरास वोढिलें, आणि बसतां। जे चांगले। ते भांड्यांमध्यें भरिले।
आणि जे वाईट। ते बाहेर टाकिले। ४९ तसें जगाच्या समाप्तीस
होईल। दूत बाहेर येतील। आणि पुण्यवानांमधून दुष्टांस वेग
ळें करितील। ५० आणि त्यांस अग्नीच्या भट्टींत टाकितील।
तेथे रडणें व दांत कडकडिवणें होईल॥ ५१ येशू त्यांस ह्मा
णतो। तुह्मी हीं अवघीं समजलां कीं काय? ते त्याला ह्मण
तात। होय। प्रभू॥ ५२ तेव्हां त्याने त्यांस ह्मटलें। त्यासाठीं।
प्रत्येक पंडित। आकाशांच्या राज्याविषईं शिकविलेला। तो घर
धनी मनुष्यासारिखा आहे। जो तो आपल्या भांडारांतून नवीं
व जुनीं काढितो ॥
५३ आणि येशूने हे दाखले संपविल्यानंतर। असें जालें। तो
तेथून गेला॥ ५४ आणि आपल्या देशास येऊन। त्याने त्यांच्या स
भेंत त्यांस असें उपदेशिलें। कीं ते थक्क होऊन बोलिले। हें ज्ञा
न आणि अपूर्वशक्ती त्याला कोठून? ५५ हा त्या सुताराचा
पुत्र नाहीं कीं काय? याची आई मारया ह्मटलेली। आणि याचे
भाऊ याकोब व योसे व शीमोन व यहूदा। हे नाहींत कीं
काय? ५६ आणि याच्या सर्व बहिणी आमच्या जवळ ना
होंत कीं काय? यास्तव हीं सर्व याला कोठून? ५७ अ
से ते त्याविषईं अडखळविले गेले। तेव्हां येशूने त्यांस ह्मटलें।
भविष्यभाषी आपल्या देशांत। आणि आपल्या घरीं नाहीं। तर तो
असन्मानी नाहीं॥ ५८ आणि त्यांच्या अविश्वासावरून। त्याने
तेथे बहुत चमत्कार केले नाहींत ॥
पर्व १४॥ १ त्या वेळेस। हेरोद, जो चौथाइदार, याने येशू
ची कीर्ती ऐकिली। २ आणी आपल्या चाकरांस ह्मटलें। यो
हान्न। जो बाप्तीस्मा देणारा तो हाच आहे। तोच मेलेल्यांमधून उठला
आहे। आणि यासाठीं त्याकडून चमत्कार घडतात ॥ ३ कां
रण कीं। हेरोदाने, आपला भाऊ जो फिलीपस। याची बायको।

जी हेरोदियास। इजकरितां योहान्नास धरून। त्याला बांधिलें आ
णि बंदिशाळेंत घातलें होतें॥ ४ यास्तव कीं। योहान्न त्याला बो
लिला होता। ती तुझी होणें उचित नाहीं ॥ ५ आणि तो त्या
चा घात करायास इच्छितां। समुदायास भ्याला। कां कीं त्यानी
त्याला भविष्यभाषी असा मानला होता॥ ६ नंतर हेरोदाच्या
वाढदिवसाचीं कर्में घडत असतां हेरोदियासीच्या कन्येने। म
ध्यें नाचून। हेरोदाला संतोषविलें॥ ७ यावरून जें जें ती मा
गेल। तें तें त्याने शपतपूर्वक तिला देउं पत्करलें॥ ८ आणि
ती। आपल्या आईने पूर्वीं प्रेरली असतां। ह्मणाली। योहा
न्न। जो बाप्तीस्मा देणारा। त्याचें शीर येथे ताटामध्यें मला
दे॥ ९ तेव्हां राजा खिन्न जाला। तथापि शपतांसाठीं व संगा
तें बसणाऱ्यांसाठीं। त्याने देण्याची आज्ञा केली॥ १० आणि बंदि
शाळेंत पाठवून योहान्नाचें शीर छेदिलें॥ ११ मग त्याचें शी
र ताटांत आणिलें गेलें। आणि त्या मुलगीस दिलें गेलें। मग
तिने आपल्या आईकडे आणिलें॥ १२ नंतर त्याच्यां शिष्यानी।
जवळ येऊन। शरीर उचलें व त्याला पुरिलें। आणि येऊन येशू
ला वर्तमान सांगीतलें॥

१३ तेव्हां येशू ऐकून। तेथून तारवाने वोस जागेंत ये
कीकडे गेला॥ परंतु समुदाय ऐकून। नगरांमधून त्याच्या मा
गें पायीं गेले ॥ १४ मग येशूने। बाहेर जाऊन। मोठा समु
दाय पाहिला। तेव्हां त्याने त्यांजवर करुणा केली। आणि त्यां
तल्यां अशक्तांस निरोगी केलें॥ १५ मग संध्याकाळ जाल्यावर।
त्याचे शिष्य त्याजवळ येऊन बोलिले। ही वोस जागा आहे।
आणि वेळ आतां होऊन गेली आहे। समुदायानी। गांवांमध्यें जा
ऊन। आपणांकरितां खाणीं विकत घ्यावीं ह्मणोन त्यांस निरोप दे॥
१६ परंतु येशू त्यांस बोलिला। त्यांस जावयाचें कारण नाहीं।
तुह्मी त्यांस खायाला द्या॥ १७ तेव्हां ते त्याला ह्मणतात। पां
च भाकरीं व दोन मासे। यांवांचून आह्माजवळ येथे [कांहीं]
नाहीं॥ १८ तेव्हां तो बोलिला। तीं येथे मजवळ आणा॥ १९ म

ग त्याने। समुदायांस गवतावर बसायास आज्ञा देऊन। आ
णि त्या पांच भाकरी व दोन मासे यांस घेऊन। वर्ते आका
शास पाहून। स्तुती केली। नंतर भाकरी मोडून शिष्यांस दिल्या।
आणि शिष्यानी समुदायांस [दिल्या]॥ २० मग सर्वानी खाल्लें।
आणि ते तृप्त जाले। नंतर उरल्या चूरांच्या भरलेल्या बारा
करंड्या त्यानी उचलिल्या॥ २१ आणि बायका व लेंकरें। यां
शिवाय ज्या पुरुषानी खाल्लें। ते सुमारें पांच हजार होते॥
२२ आणि तेव्हांच। येशू समुदायांस निरोप देई तोंपर्यं
त। त्याने आपल्या शिष्यांस अगत्याने तारवावर चढविलें। आ
णि आपल्या पुढें पलीकडे जावविलें॥ २३ तेव्हां समुदायांस नि
रोप दिल्यावर। तो प्रार्थना करायास येकीकडे डोंगरावर च
ढला। आणि। संध्याकाळ जाल्यावर, तो तेथे येकला हो
ता॥ २४ परंतु तारूं। तेव्हां समुद्रामध्यें असतां। लाटानी डळ
मळलें गेलें। कारण कीं वारा उलटा होता॥ २५ मग राचीच्या च
वथ्या प्रहरीं। येशू समुद्रावर चालत असतां। त्यांच्या जवळ गे
ला॥ २६ तेव्हां शिष्य। त्याला समुद्रावर चालतां पाहून। घा
बरे होऊन ह्मणाले। आभास आहे। आणि भयेंकरून वोरड
ले॥ २७ परंतु तेव्हांच येशू त्यांस बोलिला। कीं धीर धरा।
मी आहें। भिऊं नका॥ २८ तेव्हां पेत्रसाने त्याला उत्तर देतां
ह्मटलें। हे प्रभू। जर तूं आहेस। तर। पाण्यांवर तुझ्या जवळ
यावयास; मला आज्ञा दे॥ २९ नंतर त्याने ह्मटलें। ये॥ ते
व्हां पेत्रस तारवावरून उतरून येशूजवळ जावयास पाण्यां
वर चालिला॥ ३० परंतु। वारा बळकट पाहून, तो भ्याला।
आणि बुडुं लागतांना। वोरडतां बोलिला। हे प्रभू। मला तार॥
३१ आणि तेव्हांच येशूने। हात लांबवून। त्याला धरिलें। आ
णि त्याला ह्मटलें। हे अल्पविश्वासी। त्वां संशय कां धरिला॥
३२ मग ते तारवावर आल्यानंतर। वारा शमला॥ ३३ तेव्हां
जे तारवावर। ते येऊन त्याचें भजन करून बोलिले। निश्चयें तूं दे
वाचा पुत्र आहेस॥ ३४ तेव्हां ते पार जाऊन, गेन्नेसरेत

देशांत आले। ३५ आणि त्या जागेंतल्या माणसानी। त्याला
वोळखून। त्या अवघ्या चक्रफेरांत पाठविलें। आणि सर्व दुखणे
कर्यांस त्याच्या जवळ आणिलें। ३६ आणि त्यानी त्याच्या व
स्त्राच्या कांठाला केवळ शिवावें। ह्मणोन विनंती केली। आणि
जितकीं शिवलीं। तितकीं पारच पडलीं ※

पर्व १५॥ १ तेव्हां यरूशलेमापासून पंडित व फारिशी ये
शूच्या जवळ येऊन बोलिले। २ तुझे शिष्य वाडवडिलांचे परं
परोपदेश कशास्तव उल्लंघितात? कां कीं जेव्हां खाणें खातात।
तेव्हां आपले हात धूत नाहींत॥ ३ मग तो उत्तर देतां त्यांस
बोलिला। तुह्मीही। आपल्या परंपरोपदेशांकडून देवाची आज्ञा
कशास उल्लंघितां? ४ वास्तव कीं देवाने। आज्ञा देतां। सांगी
तलें। तूं। आपला बाप व आई। यांची मर्यादा कर। आणि
जो बापाला अथवा आईला निंदितो। तो मरणीं मरो॥ ५ प
रंतु तुह्मी बोलतां। जो जो बापाला अथवा आईला ह्मणेल।
मजकडून जर तुह्मा कांहीं लाभ असेल। तर तो अर्पण [असो।] ६ म
ग त्याने आपल्या बापाची अथवा आपल्या आईची मर्यादा नच
करावी॥ असें तुह्मी। आपल्या परंपरोपदेशाने। देवाची आज्ञा
निरर्थ केली आहे ७ अहो ढोंगी। यशायाने तुह्माविषईं भवि
ष्य उत्तम सांगीतलें। कीं। ८ हा लोक आपल्या तोंडाने मजव
ळ येतो। आणि ओंठानी माझी मर्यादा करितात। परंतु त्यां
चें हृदय मजपासून दूरच आहे॥ ९ आणि ते। उपदेशांसाठीं
माणसांच्या आज्ञा शिकवीत असतां। माझें भजन व्यर्थ करिता
त ※ १० तेव्हां त्याने समुदायाला बोलावल्यावर। त्यांस ह्मटलें। तु
ह्मी ऐका। आणि समजा॥ ११ जें तोंडांत जातें। तें माणसा
ला विटाळवीत नाहीं। परंतु जें तोंडांतून निघतें। तेंच माणसा
ला विटाळवितें॥ १२ नंतर त्याचे शिष्य जवळ येऊन त्याला बो
लिले। फारिशी ही गोष्ट ऐकून अडखळविले गेले। हें तुला क
ळलें कीं काय? १३ परंतु त्याने उत्तर देतां ह्मटलें। प्रत्येक
रोप। जें माझ्या आकाशांतल्या बापाने लाविलें नाहीं। तें उप

टलें जाईल॥ १४ त्यांस असुं द्या। ते आंधळ्यांचे आंधळे वा
टाडे आहेत। आणि जर आंधळा आंधळ्याला नेतो। तर दो
घे खांचेंत पडतील॥ १५ तेव्हां पेत्रस उत्तर देतां। त्याला बो
लिला। हा दाखला फोडून आह्मास सांग॥ १६ मग येशू बो
लिला। अद्यापि तुह्मीही अज्ञानी आहां। कीं काय? १७ आ
झून ध्यानांत न आणितां। कीं अवघें जें तोंडांत जातें। तें
पोटांत मावतें। आणि शौचकूपांत बाहेर टाकिलें जातें? १८ प
रंतु जीं तोंडांतून निघतात। तीं हृदयांतून बाहेर येतात।
आणि तींच माणसाला विटाळवितात॥ १९ कां कीं। हृदयां
तून। दुष्ट विचार। खून। व्यभिचार। शिंदळक्या। चोऱ्या। खो
ट्या साक्षी। दुर्भाषणें। हीं निघतात॥ २० जीं माणसाला वि
टाळवितात तीं हींच आहेत। परंतु न धुतल्या हातानी खा
णें। हें माणसाला विटाळवीत नाहीं ※

२१ तेव्हां येशू तेथून निघून। सोर व जीदोन यांच्यां भा
गांत गेला॥ २२ आणि पाहा। त्यां शिवांतून खनानी स्त्री।
बाहेर येऊन। त्याला वोरडतां बोलिली। हे प्रभू। दावीदाच्या
संताना। मजवर। दया कर। माझी कन्या भुताने भारी पीडिली
आहे॥ २३ परंतु त्याने तिला [येक] शब्दाने उत्तर दिल्हें
नाहीं॥ तेव्हां त्याचे शिष्य जवळ येऊन त्यापाशीं मागतां बो
लिले, ती आमच्या मागें वोरडती। यास्तव तिला निरोप दे॥
२४ मग तो उत्तर देतां बोलिला। मला इस्राएलाच्या घरा
ण्याच्या हरपलेल्यां मेंढ्रांकडे पाठविलें। अन्यत्र नाहीं॥ २५ ते
व्हां ती येऊन। त्याच्या पायां पडून। बोलिली। हे प्रभू। मा
झें साह्य कर॥ २६ परंतु तो उत्तर देतां बोलिला। लेंकरांची
भाकर घेऊन कुत्र्यांस घालणें। हें उत्तम नाहीं॥ २७ मग ती
ने ह्मटलें। होय। प्रभू। तथापि कुत्रींही आपल्या धन्यांच्या चव
रंगावरून जे चूर पडतात। त्यांतून खातात॥ २८ तेव्हां ये
शू उत्तर देतां। तिला बोलिला। हे स्त्री। तुझा विश्वास मोठा।

जसें तूं इछितोस। तसें तुला होवो। आणि त्याच घटकेपासू
न। तिची कन्या बरी जाली ॥

२९ तेव्हां येशू तेथून निघून। गालीलाच्या समुद्राजवळ आ
ला। आणि डोंगरावर चढून। तेथे बसला॥ ३० नंतर बहुत स
मुदाय लंगड्यांस। आंधळ्यांस। मुक्यांस। व्यंगांस। आणि दुस
ऱ्यां बहुतांस आपणांबराबर घेऊन त्याच्या जवळ आले। आणि
त्यानी त्यांस येशूच्या पायांजवळ टाकिलें। आणि त्याने त्यां
स असें बरें केलें। ३१ कीं समुदायानी मुक्यांस बोलतां। व्यं
गांस सांग [होतां]। लंगड्यांस चालतां। आणि आंधळ्यांस पा
हातां। [असें] पाहून आश्चर्य केलें। आणि इस्राएलाच्या देवाला
गौरविलें॥ ३२ मग येशूने आपल्या शिष्यांस जवळ बोलावून
ह्मटलें। मी समुदायावर करुणा करितों। यास्तव कीं ते आतां
तीन दिवस माझ्या जवळ राहिले आहेत। आणि त्यांस खाया
स कांहीं नाहीं। तर त्यांस उपासी निरोप द्यावयास मी न
इछितों। कां तर। कदाचित ते वाटेंत कासावीस होतील॥
३३ नंतर त्याचे शिष्य त्याला ह्मणतात। इतक्या मोठ्या स
मुदायाला तृप्त करायास असें। येवढ्या भाकरी रानांत आ
ह्माजवळ कोठून? ३४ तेव्हां येशू त्यांस बोलतो। तुह्माजवळ
किती भाकरी आहेत? आणि त्यानी ह्मटलें। सात। आणि ला
हान मासे थोडके [आहेत]॥ ३५ मग त्याने समुदायांस भूमि
वर बसायाला आज्ञा दिल्ही॥ ३६ नंतर त्याने त्या सात भा
करी व मासे यांस घेऊन। आभार मानल्यावर। मोडिलीं। आ
णि आपल्या शिष्यांस दिल्हीं। मग शिष्यानी समुदायाला [दिल्हीं]॥
३७ नंतर सर्वानी खाल्लें। आणि ते तृप्त जाले। मग उरले
ल्या चुराच्या सात भरलेल्या टोपल्या त्यानी उचलिल्या॥ ३८ आ
णि ज्यानी खाल्लें। ते। बायका व लेंकरें यांखेरीज। चार हं
जार होते॥ ३९ मग समुदायांस निरोप दिल्यावर। तो तार
वावर चढला। आणि माग्दालाच्या शिवांत आला॥

पर्व १६ ॥ १ तेव्हां फारिशी व जाद्दूकी त्यांनी। जवळ येऊ
न। परिक्षा करीत असतां। त्यापाशीं मागीतलें। कीं आपणांस
आकाशापासून चिन्ह दाखवावें॥ २ परंतु तो उत्तर
देतां त्यांस ह्मणाला। संध्याकाळ जाला असतां। तुह्मी ह्मणता।
उघाड [होईल।] कां कीं आकाश तांबुस आहे ॥ ३ आणि
सकाळीं [ह्मणतां।] आज झड [लागेल।] कां कीं आकाश तां
बुस आणि गडद आहे ॥ अहो ढोंगी। तुह्मी आकाशाचें स्वरू
प पारखायास जाणतां खरें। तर काळांचीं चिन्हें [पारखायास]
तुह्मी शक्तिमान नव्हां कीं काय? ४ दुष्ट व व्यभिचारी पि
ढी चिन्ह मागती। परंतु योना भविष्यभाषी। याच्या चिन्हा
वांचून। तिला चिन्ह दिल्हें जाणार नाहीं ॥ तेव्हां तो त्यां
स सोडून गेला ※
५ नंतर त्याचे शिष्य पलीकडे जाऊन। भाकरी घ्यावयास वि
सरले होते ॥ ६ तेव्हां येशू त्यांस बोलिला। फारिशी व जा
द्दूकी। यांच्या फुगवणाविषयीं तुह्मी जपा। आणि सावध
व्हा॥ ७ तेव्हां ते। आपणांमध्यें विचार करून। बोलिले। आ
ह्मी भाकरी घेतल्या नाहींत ह्मणोन [असें ह्मणतो]॥ ८ प
रंतु येशू [हें] जाणून त्यांस बोलिला। अहो अल्पविश्वासी। तु
ह्मी भाकरी घेतल्या नाहींत। ह्मणोन आपणांमध्यें कां विचा
र करितां? ९ तुह्मी आझून ध्यानांत न आणितां कीं काय?
आणि। पांच हजारांच्या पांच भाकरी आणि तुह्मी किती क
रंड्या उचलिल्या। [हें] न आठवितां कीं काय? १० आणखी
चार हजारांच्या सात भाकरी। आणि किती टोपल्या तुह्मी
उचलिल्या। [हें] न [आठवितां] कीं काय? ११ तुह्मी ध्यानां
त कां न आणितां? कीं फारिशी व जाद्दूकी। यांच्या फुगव
णापासून सावध व्हावें। [असें] भाकरीविषयीं म्यां तुह्मास
सांगीतलें नाहीं॥ १२ तेव्हां ते समजले। कीं सावध व्हावें [असें]
त्याने भाकरीच्या फुगवणाविषयीं ह्मटलें नाहीं। परंतु फारि
शी व जाद्दूकी यांच्या उपदेशाविषयीं ※

१३ आणि येशू फिलीप्पसाची कादसारी हीच्यां भागांत आल्यावर। तो आपल्या शिष्यांस पुसतां बोलिला। जो माणसा चा पुत्र। तो मी कोण आहें, ह्मणोन जन काय ह्मणतात? १४ तेव्हां ते बोलिले। तर कित्येक। योहान्न बाप्तीस्मा देणा रा। आणि दुसरे। एलीया। आणि दुसरे। इर्मया। किंवा भ विष्यभाष्यांतील येक [आहे। असें ह्मणतात]॥ १५ तो त्यांस ह्मणतो। मी कोण आहें, ह्मणोन तुह्मीहो काय ह्मणतां? १६ तेव्हां शीमोन पेत्रस उत्तर देतां ह्मणाला। तूं ख्रीस्त। जीवंत देवाचा पुत्र आहेस॥ १७ मग येशू उत्तर देतां त्याला ह्मणाला। हे शीमोन बार्योना, तूं सुखी आहेस। यास्तव कीं, मास व रक्त। यानीं नाहीं। परंतु माझा आकाशांतील बाप्र याने [हें] तुला कळिवलें आहे॥ १८ आणखी मी तुला ह्म णतों। कीं तूं पेत्रस आहेस, आणि ह्या खडकावर। मी आ पली मंडळी उभारीन। आणि तिजविरुद्ध लोकांतराच्यां दरवा ज्यांचें बळ चालणार नाहीं॥ १९ आणि आकाशांच्या राज्या च्या किल्ह्या तुला देईन। मग पृथ्वीवर जें कांहीं तूं बंद करि शील, तें आकाशांमध्यें बंद केलेलें होईल। आणि पृथ्वीवर जें कांहीं सोडसील, तें आकाशांमध्यें सोडिलें होईल॥ २० तेव्हां त्याने आपल्या शिष्यांस सांगी केली। कीं येशू जो ख्रीस्त तो च आपण आहे। हें त्यानी कोणास न सांगावें॥ २१ ते व्हांपासून येशू आपल्या शिष्यांस दाखवुं लागला। कीं आपणा ला यरूशलेमास जाणें, आणि पुरातन व मुख्य उपाध्ये व पंडि त। यांकडून बहुत सोसणें, आणि वधिलें जाणें। आणि तिस ऱ्या दिवशीं उठणें अगत्य आहे॥ २२ तेव्हां पेत्रस त्याला येकीकडे नेऊन। त्याला निषेधुं लागून बोलिला, हे प्रभू। तु जवर दयाळु [होणें।] हें तुला होणारच नाहीं॥ २३ परंतु तो मुरडून पेत्रसाला बोलिला। अरे साटाना। माझ्या मागें जा। तूं मला अडखळा आहेस। यास्तव कीं। जों देवाचीं तीं चिं तीत नाहींस। परंतु जीं माणसांची तीं॥ २४ तेव्हां येशूने

आपल्यां शिष्यांस ह्मटलें। कीं जर कोणी माझ्या मागें येण्यास
इछितो। तर आपणाला अगदी नकारो। आणि आपला वध
स्तंभ उचलो। व माझ्या मागें येवो। २५ क्यों कीं। जो जो आ
पला जीव राखायास इछितो। तो त्याला गमावील। परंतु जो
जो मजकरितां आपल्या जीवास गमावील। तो त्याला साधील॥
२६ कारण कीं। जर माणुस सगळें जग मिळवील। आणि
आपल्या जीवाची हानी पावेल। तर त्याला काय लाभ होतो?
अथवा माणुस आपल्या जिवाचें प्रतिदान काय देईल? २७ का
रण कीं। माणसाचा पुत्र। आपल्या बापाच्या गौरवांत। आपल्या
दूतांसुध्धां येणार आहे। आणि तेव्हां प्रत्येकाला आपापल्या का
माप्रमाणे भरून देईल॥ २८ मी तुह्मास खचीत सांगतों। ये
थे जे उभे राहातात। ह्यांतील कोणी असे आहेत। कीं मा
णसाच्या पुत्राला त्याच्या राज्यांत येतां पाहातील। तोंपर्यंत
मरणाला चाखणारच नाहींत ॐ

पर्व १७॥ १ आणि साहा दिवसांनंतर येशू। पेत्रस व
याकोब व याचा भाउ योहान्न। यांस जवळ घेतो। आणि त्यां
स येक्या उंच डोंगरावर येकीकडे नेतो॥ २ तेव्हां त्यांच्या स
मोर त्याचें रूप पालटलें। आणि त्याचा तोंडवळा सूर्यासारि
खा प्रकाशला। आणि त्याचीं वस्त्रें उजेडासारिखीं पांढरीं आ
लीं॥ ३ तेव्हां पाहा। मोशे व एलीया। हे त्याबराबर संभा
षण करितां त्यांस दिसले॥ ४ मग पेत्रसाने। उत्तर देतां ये
शूला ह्मटलें। हे प्रभू। आमचें येथे असणें बरें आहे॥ जर
तूं इछितोस। तर आह्मी येथे तीन मांडव करूं। तुझ्या सा
ठीं येक। आणि मोशासाठीं येक। आणि एलीयासाठीं येक॥
५ तो बोलत असतां इतक्यांत पाहा। प्रकाशवंत आभाळाने
त्यांजवर सावली केली। आणि पाहा आभाळांतून शब्द [अ
सतां] बोलिला। हाच माझा प्रिय पुत्र आहे। याकडून मी फा
र संतोषीत जालों आहें। याचें तुह्मी ऐका॥ ६ तेव्हां शि
ष्य ऐकून आपल्या तोंडावर पडले। असे फार भ्याले॥ ७ प

परंतु येशू जवळ येऊन त्यांस शिवला। आणि बोलिला। उठा।
आणि भिउं नका॥ ८ तेव्हां त्यांनी आपले डोळे वर करून।
येशूला मात्र। याशिवाय कोणाला पाहिलें नाहीं॥ ९ नंतर। ते
डोंगरावरून उतरत असतां। येशू त्यांस सांगी करितां बोलिला।
माणसाचा पुत्र मेलेल्यांमधून उठेल। तोंपर्यंत तुह्मी हा दृष्टांत
कोणाला न सांगावा※ १० तेव्हां त्याचे शिष्य त्याला पुसतां
बोलिले। तर एलीया आगोधर आला पाहिजे। असें पंडित
कां ह्मणतात? ११ मग येशू उत्तर देतां त्यांस बोलिला। ए
लीया आगोधर येतो। खरें। आणि अवघीं पूर्ववत करील॥
१२ परंतु मी तुह्मास सांगतों। कीं एलीया इतक्यांत आला
आहे। आणि त्यांनी त्याला वोळखलें नाहीं। परंतु जितकीं इ
च्छिलीं। तितकीं त्याला केलीं आहेत। तसेंही माणसाचा पुत्र
त्यांकडून सोसणार आहे॥ १३ तेव्हां शिष्य समजले। कीं यो
हान बाप्तीस्मा देणारा। याविषईं त्याने त्यांस ह्मटलें होतें※
१४ नंतर ते समुदायाजवळ आल्यावर। माणुस त्याच्या
जवळ येऊन त्याजवळ गुढघे टेंकतांना। १५ बोलिला। हे
प्रभू। माझ्या पुत्रावर दया कर। का कीं तो फेंफेंकरी आहे।
आणि तो भारी सोसितो। कारण कीं। तो वेळोवेळ अग्नींत।
आणि वेळोवेळ पाण्यांत पडतो॥ १६ आणि म्या त्याला तु
ह्मा शिष्यांजवळ आणिलें होतें। परंतु त्यांच्यानी त्याला निरो
गी करवलें नाहीं॥ १७ मग येशू उत्तर देतां बोलिला। अ
रे अविश्वासी आणि विपरीत पिढी। मी कोठपर्यंत तुह्मावरा
बर असेन? कोठपर्यंत तुमचें सोसीन? त्याला येथे मजवळ आ
णा॥ १८ तेव्हां येशूने त्याला धमकाविलें। मग भूत त्यांतून
निघालें। आणि त्याच घटकेपासून। बाळक निरोगी जाला॥
१९ तेव्हां शिष्य येकीकडे येशूजवळ येऊन बोलिले। आह्मी
त्याला घालवायास शक्तिमान कां न जालों? २० मग येशू
त्यांस बोलिला। कीं, तुमच्या अविश्वासावरून। वास्तव कीं। मी तु
ह्मास खचीत सांगतों। मोहरीच्या दाण्या येवढा विश्वास तुह्मास

असल्यास। ह्या डोंगराला तुह्मी ह्मणाल। तूं येथून ढळ।
मग तो ढळेल। आणि तुह्मास कांहीं असाध्य होणार ना
हीं॥ २१ परंतु प्रार्थना आणि उपास यांवांचून हा प्रकार
निघत नाहीं ॐ

२२ आणि ते गालीलांत फिरत असतां। येशू त्यांस बो
लिला। माणसाचा पुत्र माणसांच्या हातीं स्वाधीन केला जाणा
र आहे। २३ मग ते त्याला वधितील। आणि तो तिस
ऱ्या दिवशीं उठेल। तेव्हां ते फार खिन्न जाले ॐ

२४ नंतर ते कापेर्णाहूमांत आल्यावर। अधेल्या घेणारे पे
त्रसाच्या जवळ आले। आणि बोलिले। तुमचा गुरू अधेल्या
देत नाहीं कीं काय? २५ तो ह्मणतो। होय। मग तो
घरांत आल्यावर। येशू त्याच्या आगोधर लागून ह्मणाला। हे
शीमोना। तुला कसें दिसतें? पृथ्वीचे राजे कोणापासून कर व
पट्टी घेतात। आपल्या पुत्रांपासून किंवा परक्यांपासून? २६ पे
त्रस त्याला ह्मणतो। परक्यांपासून॥ येशू त्याला बोलिला।
तरी पुत्र मोकळे आहेत। २७ तथापि। आह्मी त्यांस न
अडखळवावें। ह्मणोन तूं। समुद्राजवळ जाऊन। गळ टाक।
आणि। पहिला मासा जो वर येतो त्याला धर। मग त्याचें
तोंड उघडून। तुला रुपया सांपडेल। तो घेऊन। माझ्या सा
ठीं आणि तुझ्या साठीं त्यांस दे ॐ

पर्व १८॥ १ त्याच वेळेस शिष्य येशूच्या जवळ येऊन बो
लिले। तर आकाशांच्या राज्यांत मोठा कोण आहे? २ ते
व्हां येशूने बाळकाला जवळ बोलावून। त्याला त्यांच्या मध्यें ठे
विलें। ३ आणि ह्मटलें। मी तुह्मास खचीत सांगतों। जर तुह्मी
फिरविले न जातां। आणि बाळकांसारिखे न होतां। तर तुह्मी
आकाशांच्या राज्यांत जाणारच नव्हां॥ ४ यास्तव। जो को
णी आपणाला ह्या बाळकासारिखा लीन करील। तोच आका
शांच्या राज्यांत मोठा आहे॥ ५ आणि जर कोणी माझ्या
नांवाने अशा येका बाळकाला अंगिकारितो। तर तो मला

अंगिकारितो ॥ ६ परंतु हे लाहान । जे मजवर विश्वास ध
रितात। त्यांतील येकास जो जो अडखळवील । त्याला हें उ
पयोगी आहे । कीं त्याच्या गळ्यांत जात्याची तळी टांगली
जावी । आणि तो समुद्राच्या खोलवटींत बुडविला जावा ※
७ अडखळ्यांवरून जगाला हायहाय। कारण कीं अडखळे यावया
चें अगत्य आहे। तथापि ज्या माणसाकडून अडखळा येतो । त्या
ला हायहाय ॥ ८ आणि जर तुझा हात। अथवा तुझा पाय
तुला अडखळवितो। तर त्यांस तोड। आणि आपल्यापासून
टाक ॥ तुला दोन हात। अथवा दोन पाय असतां सर्वकाळ
च्या अग्नींत टाकलें जाणें। यापेक्षां लंगडें अथवा व्यंग [होऊन]
जीवनांत जाणें । हें तुला बरें आहे ॥ ९ आणि जर तुझा
डोळा तुला अडखळवितो। तर त्याला काढ, आणि आप
ल्यापासून टाक ॥ तुला दोन डोळे असतां। अग्नीच्या अधोगतींत
टाकलें जाणें। यापेक्षां येक डोळा [असतां] जीवनांत जाणें। हें
तुला बरें॥ १० तुह्मी जपा। यां लाहानांतील येकाचा धिःकार
न करावा। कारण। तुह्मास सांगतों। कीं आकाशांमध्यें त्यांचे
दूत । माझा आकाशांतील बाप। याचें तोंड नित्य पाहाता
त ॥ ११ आणखी जें हरपलेलें। त्याला तारायास माणसाचा
पुत्र आला आहे ॥ १२ तुह्मास कसें दिसतें ? जर कोण्या
माणसाजवळ शंभर मेंढ्रें असतील। आणि त्यांतून येक भटकतें।
तर तो त्यां नव्याण्णवांस डोंगरांवर सोडून जातो। जें भट
कलें। त्याला शोधीत नाहीं कीं काय ? १३ आणि जर तें
त्याला सांपडलें असेल। तर तुह्मास खचीत सांगतों कीं। जीं
नव्याण्णव भटकलीं नाहींत। त्यांपेक्षां तो त्याविषईं अधीक
आनंदतो ॥ १४ तसें। ह्या लाहानांतील येकाचा नाश व्हावा
ह्मणोन । तुमचा आकाशांतील बाप । याच्या भावनेंत इच्छा ना
हीं ※ १५ आणि जर तुझा भाउ तुजविरुद्ध पाप करि
तो । तर तूं जा । आणि केवळ तुझ्या आणि त्याच्या सम
क्षांत त्याला निषेध कर ॥ जर तो तुझें ऐकेल । तर त्वां

आपल्या भावाला मिळविलें आहे ॥ १६ परंतु जर तो न
ऐकेल। तर दोन अथवा तीन साक्ष्यांच्या तोंडानें। प्रत्येक गो
ष्ट खचीत ठरावी। ह्मणोन तूं आणखी येकास अथवा दोघां
स आपल्या बराबर घे ॥ १७ आणि जर तो त्यांस अनमा
नील, तर मंडळीस सांग। आणि जर तो मंडळीसही अ
नमानील। तर तो परप्रजांतला व करघेणारा। यांसारिखा
तुला होवो ॥ १८ मी तुह्मास खचीत सांगतों। जों कांहीं तु
ह्मी पृथ्वीवर बंद कराल। तीं आकाशांमध्यें बंद केलेलीं होती
ल। आणि जीं कांहीं तुह्मी पृथ्वीवर सोडाल। तीं आका
शामध्यें सोडलेलीं होतील ॥ १९ आणखी तुह्मास सांग
तों। कीं तुह्मांमधील दोघे। जें कांहीं मागत असतील, त्या
कोण्या गोष्टीविषईं। पृथ्वीवर जर येकोपा करितील। तर तें।
माझा आकाशांतील बाप। याकडून। त्यांच्या साठीं घडेल ॥
२० कारण कीं। जेथे दोघे अथवा तिघे माझ्या नांवानें येक
वटले। तेथे त्यांच्या मध्यें मी आहें ※

२१ तेव्हां पेत्रस त्याजवळ येऊन बोलिला। हे प्रभू।
माझा भाऊ मजविरुद्ध कितिदां पाप करितांना मी त्याला
क्षमा करूं? सात वेळांपर्यंत कीं काय? २२ येशू त्याला
ह्मणतो, सात वेळांपर्यंत, [असें] मी तुला ह्मणत नाहीं।
परंतु सातांच्यां सत्तर वेळांपर्यंत ※ २३ ह्मासाठीं आ
काशांच्या राज्याला। राजा मनुष्याची उपमा दिल्ही आ
हे। त्यानें आपल्या चाकरांसीं हिशेब घेऊं इछिलें ॥ २४
आणि तो घेऊं लागल्यावर। दाहा हजार मण पैक्याचा येक
देणेदार त्याच्या जवळ आणिला होता ॥ २५ परंतु फेडण्या
स [कांहीं] त्याला नसतां। त्याच्या प्रभूनें आज्ञा दिल्ही। कीं
त्याला व त्याच्या बायकोला व लेंकरांस व त्याचीं अवघीं जि
नसीं होतीं। त्यांस विकावें, आणि ऋण फेडावें ॥ २६ या
स्तव तो चाकर त्याच्या पायांसीं पालथा पडून बोलिला। हे प्र
भू। मजविषईं क्षमा धर। ह्मणजे मी तुझें सर्व फेडीन ॥

२७ तेव्हां त्या चाकराच्या प्रभूने करुणा करून त्याला मोक
ळा केला। आणि त्याला ऋण सोडिलें ॥ २८ परंतु तोच चा
कर बाहेर जाऊन आपणाला आपल्या सोबती चाकरांतला ये
क । जो आपल्या शंभर पावल्यांचा देणेदार होता। तो मिळा
ला । तेव्हां त्याला धरून नर्डी आवळतां बोलिला। जें तुजवर
ऋण आहे। तें मला भरून दे॥ २९ यास्तव त्याचा सोबती
चाकर। त्याच्यां पायांजवळ पडला। आणि त्याला विनंती
करितां बोलिला। मजविषईं क्षमा धर। ह्मणजे मी तुझें सर्व
फेडीन॥ ३० तेव्हां त्याने मानलें नाहीं। परंतु जाऊन। तो
तें देणें भरून देई तोंपर्यंत त्याला बंदिशाळेंत घातलें॥ ३१ ते
व्हां जीं जालीं। तीं त्याचे सोबती चाकर पाहून। फार खि
न्न जाले। आणि त्यानी येऊन। जीं जालीं। तीं अवघीं आप
ल्या प्रभूला निवेदिलीं॥ ३२ तेव्हां त्याचा प्रभू त्याला जवळ
बोलावून। त्याला ह्मणतो। अरे दुष्ट चाकरा। त्वां मला विनं
ती केली। ह्मणोन म्या तें सर्व देणें तुला सोडिलें॥ ३३ ज
सी म्या तुजवर दया केली। तसी तुलाही आपल्या सोबती
चाकरावर दया करणें प्राप्त नव्हतें कीं काय? ३४ आणि
त्याच्या प्रभूने। त्याजवर रागें भरून। तो त्याचें सर्व देणें फे
डी तोंपर्यंत। त्याला दंड करणाऱ्यांच्या स्वाधीन केलें॥ ३५ त
सें माझा आकाशावरला बापही तुह्मास करील। जर तुह्मी
आपल्यां हृदयांतून। प्रत्येक आपल्या भावाला। त्यांचे अप
राध न सोडितां तर ॐ

पर्व १९ ॥ १ आणि असें जालें। जेव्हां येशूने ह्या गो
ष्टी संपविल्या होत्या। तेव्हां तो गालीलाहून पलीकडे गेला।
आणि यार्देनेवरील यहूदाच्यां शिवांत आला॥ २ तेव्हां बहु
त समुदाय त्याच्या मागें गेले। आणि त्याने त्यांस तेथे नि
रोगी केलें ॐ

३ तेव्हां फारिशी त्याच्या जवळ येऊन। त्याची प्रचिती पा
हातांना। त्याला बोलिले। माणसाने। आपल्या बायकोला प्र

त्येक निमित्तावरून सोडणें उचीत आहे कीं काय? ४ म
ग तो उत्तर देतां त्यांस बोलिला। काय। तुह्मी [हें] न वा
चलें। कीं ज्याने प्रारंभीं उत्पन्न केलें। त्याने त्यांस पुरूष आणि
स्त्री [असें] उत्पन्न केलें। ५ आणि ह्मटलें। याकरितां मा
णुस। आपला बाप व आई यांस सोडील। आणि आपल्या बाय
कोसीं जडेल। आणि तीं दोघें येक मांस होतील? ६ अशा
स्तव पुढें तीं दोन नाहींत। परंतु येक मांस। यास्तव जें देवानें
येकवट जोडलें आहे। त्याला माणुस न तोडो॥ ७ ते त्याला
ह्मणतात। तर मोश्याने आज्ञा कां दिल्ही, कीं सूटपत्र देणें आ
णि तिला सोडणें? ८ तो त्यांस ह्मणतो। कीं तुमच्या हृद
यकठीणपणावरून। मोश्याने तुमच्यां बायकांस सोडुं तुह्मास दि
ल्हें। परंतु पहिल्यापासून असें जालें नाहीं॥ ९ आणि मी तुह्मास
सांगतों। कीं जो जो आपल्या बायकोला शींदळकी कारणावांचून
सोडील। आणि दुसरीसीं लग्न करील। तो तो व्यभिचार करितो।
आणि सोडलेलीसीं जो लग्न करितो। तो व्यभिचार करितो ※
१० त्याचे शिष्य त्याला ह्मणतात। बायकोविषईं जर माणसाची
दशा असी आहे। तर लग्न करणें उपयोगी नाहीं॥ ११ तेव्हां
तो त्यांस बोलिला। ह्या गोष्टीचें धारण सर्वांस न होतें। केवळ
ज्यांस दिल्हें त्यांस॥ १२ कारण। असे नपूंसक आहेत। कीं आ
ईच्या पोटापासून तसे जन्मले होते। आणि असे नपुंसक आहे
त। कीं माणसांकडुन नपुंसक केले होते। आणि ज्यानी आकाशां
च्या राज्यासाठीं आपणांस नपूंसक केले। असे नपुंसक आहेत।
जो धारण करायास शक्तिमान। तो धारण करो ※

१३ नंतर बाळकें। यांवर त्याने हात ठेवावे। आणि प्रार्थ
ना करावी। ह्मणोन त्याच्या जवळ आणिलीं होतीं। तेव्हां शिष्यां
नी त्यांस धमकाविलें॥ १४ परंतु येशू बोलिला। बाळकांस
असूं द्या। आणि मजवळ येण्याला त्यांस मना करूं नका।
कां कीं। आकाशांचें राज्य अशांचें आहे॥ १५ मग तो त्यांवर
हात ठेवून तेथून गेला ※ १६ तेव्हां पाहा। कोणी जवळ

येऊन त्याला बोलिला। हे उत्तम गुरू। मला सर्वकाळचें जी
वन व्हावें, ह्मणोन म्या काय चांगलें करावें? १७ तेव्हां तो
त्याला बोलिला। मला उत्तम कां ह्मणतोस? येक जो देव। त्या
वांचून कोणी उत्तम नाहीं। परंतु जीवनांत जावयास जर इ
छितोस। तर तूं त्यां आज्ञा पाळ॥ १८ तो त्याला ह्मणतो
कोणत्या? तेव्हां येशू बोलिला, कीं। तूं खून करूं नको। व्यभि
चार करूं नको। चोरी करूं नको। खोटी साक्ष देऊं नको।
१९ तुझा बाप आणि आई। यांची मर्यादा कर। आणि आप
ल्यासारिखी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर॥ २० तो तरूण
त्याला ह्मणतो। म्या आपल्या बाळपणापासून हीं अवघीं
पाळिलीं आहेत। आझून मी कशाने उणा आहें? २१ येशू
त्याला बोलिला, परिपूर्ण व्हावयास जर इछितोस। तर जा।
तुझीं जीं आहेत। तीं वीक आणि दरिद्री यांस दे। ह्मणजे आका
शांत तुला संग्रह होईल। मग इकडे मजमागें चाल॥ २२ प
रंतु तो तरूण ही गोष्ट ऐकून। खिन्न होऊन निघाला। कां कीं
त्याच्या बहुत संपत्ती होत्या ॐ २३ तेव्हां येशू आपल्यां शि
ष्यांस बोलिला। मी तुह्मास खचीत ह्मणतों, कीं धनवान आकाशां
च्या राज्यांत दुर्घटपणें जाईल॥ २४ आणि फिरोन तुह्मास
ह्मणतों। धनवानानें देवाच्या राज्यांत जावें। यापेक्षां उंटानें सु
ईच्या नेढ्यांतून जावें, हें सोपें आहे॥ २५ तेव्हां त्याचे शिष्य
ऐकून फार विस्मीत होऊन बोलिले। तर तारलें जायास कोण
शक्तिमान आहे? २६ परंतु येशू त्यांस न्याहाळून बोलिला।
हें माणसांस अशक्य आहे। परंतु देवाला अवघीं शक्य आ
हेत ॐ २७ तेव्हां पेत्रस उत्तर देतां त्याला बोलिला। पा
हा। आह्मी अवघीं सोडलीं। आणि तुजमागें आलों आहों।
ह्मणोन आह्मास काय होईल? २८ मग येशू त्यांस बोलिला।
मी तुह्मास खचीत ह्मणतों। कीं। जेव्हां माणसाचा पुत्र आप
ल्या गौरवाच्या सिंव्हासनावर बसेल, तेव्हां। जे तुह्मी पुनर्जन्मां
त मजमागें चालला। तुह्मीही। इस्राएलाच्या बारा वंशांचा न्या

य ठरवितां। बारा सिंव्हासनांवर बसाल॥ २९ आणि ज्या प्र
त्येकाने। आह्मा नांवाशाठीं। घरें। किंवा भाऊ। किंवा बहिणी।
किंवा बाप। किंवा आई। किंवा बायको। किंवा लेंकरें। किं
वा शेतें। हीं सोडिलीं आहेत। तो शंभरपट पावेल। आ
णि सर्वकाळच्या जिवनाचें वतन पावेल॥ ३० परंतु बहूत प
हिले। ते शेवटले। आणि शेवटले। ते पहिले होतील ※

पर्व २०॥ १ कारण कीं। आकाशाचें राज्य घरधनी मनुष्यासा
रिखें आहे। जो तो आपल्या द्राक्षमळ्यांत कामकरी मोलाने ठेवा
याश। सकाळीं बाहेर गेला॥ २ आणि त्याने। कामकऱ्यांशीं दि
वसाला पावलीचा ठराव केल्यावर। त्यांस आपल्या द्राक्षमळ्यांत
पाठविलें॥ ३ आणि त्याने। तिसऱ्या होरेस बाहेर जाऊन। अ
उ्ड्यावर दुसरे रिकामे उभे राहातां पाहिले॥ ४ आणि तो
त्यांस बोलिला। तुह्मीही द्राक्षमळ्यांत जा। आणि जें जें यो
ग्य असेल। तें तें तुह्मास देईन। ५ मग ते गेले॥ फिरोन
साहाव्या व नवव्या होरेस। त्याने बाहेर जाऊन तसेंच केलें॥
६ नंतर अकराव्या होरेस। त्याने बाहेर जाऊन दुसरे
रिकामे उभे राहातां पाहिले। आणि तो त्यांस ह्मणतो। तु
ह्मी सारा दिवस येथे रिकामे कां उभे राहातां? ७ ते त्या
ला ह्मणतात। कोणी आह्मास मोलाने ठेविलें नाहीं। यासाठीं॥
तो त्यांस ह्मणतो। तुह्मीही द्राक्षमळ्यांत जा। आणि जें जें
योग्य असेल। तें तें तुह्मी पावाल॥ ८ तेव्हां संध्याकाळ झा
ल्यावर। त्या द्राक्षमळ्यांचा धनी आपल्या कारभाऱ्याला ह्मण
तो। कामकऱ्यांस बोलाव। आणि शेवटल्यांपासून आरंभून पहि
ल्यांपावेतों। त्यांस मोल दे॥ ९ तेव्हां अकराव्या होरेचे
जे। ते येऊन। त्यां येकयेकाला पावली मिळाली॥ १० म
ग जे पहिले। त्यानी येऊन। आपणांस अधीक मिळेल। असें
कल्पिलें। परंतु त्यां येकयेकालाही पावली मिळाली॥ ११ आ
णि त्यानी घेतल्यावर। घरधन्याविरुद्ध कुरकुर करून। १२ ह्म
टलें। कीं ह्या शेवटल्यानी येकच होरा काम केलें, तथापि

ज्यांनी दिवसाचा भार व ऊन सोसिलें। त्यां आह्मांसमान
त्यां त्यांस केलें आहे॥ १३ परंतु तो त्यांमधील येकाला उत्त
र देतां बोलिला। हे सख्या। मी तुझा अन्याय करीत ना
हीं। त्वां मजसीं पावलीचा ठराव केला नाहीं। कीं काय?
१४ जें तुझें। तें घेऊन जा। परंतु जसें तुला। तसें ह्या से
वटल्यालाही द्यावयास माझी इछा आहे॥ १५ जें माझें।
त्याविषईं जें मी इछितों। तें करणें हें मला उचीत नाहीं।
कीं काय? मी चांगला आहें। यास्तव तुझा डोळा वाईट
आहे। कीं काय? १६ असे सेवटले। ते पहिले। आणि पहि
ले। ते सेवटले होतील॥ यास्तव कीं। बहुत बोलाविले। परंतु
थोडके निवडिले आहेत ※

१७ नंतर येशू यरूशलेमास चढत असतां। वाटेंत। त्या
ने बारा शिष्यांस येकीकडे जवळ घेतलें। आणि त्यांस ह्मट
लें। १८ पाहा। आह्मी यरूशलेमास चढतों। आणि माणसा
चा पुत्र। मुख्य उपाध्ये व पंडित। यांच्या स्वाधीन केला जाई
ल। आणि ते त्याला मरणदंड ठरवितील॥ १९ मग त्या
चा उपहास करायास। आणि मार द्यायास, आणि वधस्तंभीं
द्यायास। परप्रजांच्या स्वाधीन करितील। मग तिसऱ्या दिवशीं।
तो फिरोन उठेल ※

२० तेव्हां जेबेदीच्या पुत्रांच्या आईने। आपल्या पुत्रांबरा
बर त्याच्या जवळ येऊन। भजतांना त्यापासीं कांहीं मागीत
लें॥ २१ मग तो तिला बोलिला। काय इछितीस? तो त्या
ला ह्मणती। हे माझे दोघे पुत्र, येकाने तुझ्या उजव्याकडे।
आणि येकाने तुझ्या डाव्याकडे। तुझ्या राज्यांत बसावें। ह्मणोन
सांग॥ २२ परंतु येशू उत्तर देतां ह्मणाला। जें तुह्मी माग
तां। तें तुह्मास कळलें नाहीं॥ जो प्याला मी पिणार आहें।
तो तुह्मी प्यायास। आणि ज्या बाप्तीस्म्याने मी बाप्तीस्मा होतों।
त्याने तुह्मी बाप्तीस्मा व्हायास। शक्तिमान आहां की काय? ते
त्याला ह्मणतात। आह्मी शक्तिमान आहों॥ २३ मग तो त्यां

स ह्मणतो। माझा प्याला तुह्मी प्याल खरें। आणि ज्या बाप्ती
स्म्याने मी बाप्तीस्मी होतों। त्याने तुह्मी बाप्तीस्मी व्हाल। परं
तु। ज्यांसाठीं माझ्या बापाने सिद्ध केलें आहे। त्यांवांचून [दु
सऱ्यांस] माझ्या उजव्याकडे आणि डाव्याकडे बसूं देणें। हें मा
झें नाहीं॥ २४ तेव्हां ते दाहा ऐकून त्या दोघां भावांवर
जळफळले॥ २५ परंतु येशूने। त्यांस जवळ बोलावून ह्म
टलें, परप्रजांचे अधिकारी त्यांजवर धनीपणा करितात। आ
णि जे मोठे। ते त्यांजवर सत्ता करितात। हें तुह्मास कळ
लें आहे॥ २६ तथापि तुह्मामध्यें तसें होणार नाहीं। परंतु
जर कोणी तुह्मामध्यें मोठा होऊं इच्छील। तर तो तुमचा
सेवक होवो। २७ आणि जर कोणी तुह्मामध्यें पहिला होऊं
इच्छितो। तर तो तुमचा चाकर होवो। २८ ज्याप्रकारें
माणसाचा पुत्र सेविला जायास नाहीं। परंतु सेवायास। आ
णि बहुतांच्या साठीं खंडणी। आपला जिवच द्यायांस आला।
त्याप्रकारें ※

२९ तेव्हां ते यरीहोपासून जात असतां, मोठा समुदा
य त्याच्या मागें गेला॥ ३० आणि पाहा। दोन आंधळे मार्गा
जवळ बसले असतां। येशू जवळून जातो। हें ऐकून। ते बोर
डतां बोलिले। हे प्रभू। दावीदाच्या संताना। आह्मावर दया क
र॥ ३१ तेव्हां त्यांनी उगेंच राहावें, ह्मणोन समुदायाने त्यां
स धमकाविलें। परंतु ते अधीकच बोरडतां बोलिले। हे प्रभू।
दावीदाच्या संताना। आह्मावर दया कर॥ ३२ तेव्हां येशूने।
उभा राहून। त्यांस बोलाविलें, आणि ह्मटलें। म्यां तुह्मासाठीं
काय करावें। ह्मणोन इच्छितां? ३३ ते त्याला ह्मणतात। हे
प्रभू। आमचे डोळे उघडले जावे॥ ३४ तेव्हां येशू करुणा
करून। त्यांच्या डोळ्यांस शिवला। आणि तेव्हांच त्यांच्या डो
ळ्यांस दृष्टी आली। आणि ते त्याच्या मागें गेले ※

पर्व २१ ॥ १ आणि जेव्हां ते यरूशलेमाजवळ आले। आणि
बेथफाग्यांत जाइतांच्या डोंगरास पोहोंचले, तेव्हां येशू दोघां शि

त्यांस पाठवितांना, २ त्यांस बोलिला। तुमच्या समोरच्या
गांवांत जा। आणि तेव्हांच बांधलेली गाढवी, व तिच्याबरा
बर शिंगरूं तुह्मास सांपडेल। [त्यांस] सोडून मजवळ आणा॥
३ आणि जर कोणी तुह्मास कांहीं ह्मणेल। तर यांचें अ
गत्य प्रभूला आहे। असें सांगा। ह्मणजे तो त्यांस तेव्हांच पा
ठवील॥ ४ आणि हें अवघें यासाठीं जालें। कीं भविष्यभा
ष्याकडून जें सांगीतलें। तें पूर्ण व्हावें, त्याने ह्मटलें, ५ जी
योनाच्या कन्येला सांगा। पाहा। तुझा राजा नम्र। आणि गा
ढवावर ह्मणजे शिंगरूं जें पाठाळाचा पोर, त्यावर बसला अ
सतां तुझ्या जवळ येत आहे॥ ६ तेव्हां शिष्यानी। जाऊन।
आणि येशूने त्यांस जसी आज्ञा दिल्ही तसेंच करून, ७ गा
ढवी व शिंगरूं आणिलीं, आणि। त्यांवर आपलीं वस्त्रें घालू
न। त्यांवर [त्याला] बसविलें॥ ८ तेव्हां फार मोठ्या समुदा
याने आपलीं वस्त्रें वाटेवर पसरलीं। आणि दुसऱ्यानी झाडां
च्यां डाहाळ्यां तोडल्यां, आणि वाटेवर पसरल्या॥ ९ आणि
पुढें चालते व मागें चालते समुदाय ओरडून बोलिले। दावीदाच्या
संतानासाठीं तारणविनंती। जो प्रभूच्या नांवाने येतो। तो धन्यवादी
त [असो,] सर्वांहून उंचांमध्यें तारणविनंती॥ १० आणि तो य
रूशलेमांत आल्यावर। सारें नगर खळबळलें होऊन बोलिलें,
हा कोण आहे? ११ आणि समुदाय बोलिले। येशू। भविष्यभा
षी। जो गालीलांतील नाजारेथापासून तो हाच आहे॥

१२ नंतर येशू देवाच्या देवळांत गेला। आणि देवळांत जे विकी
त होते। आणि जे विकत घेत होते। त्यां अवघ्यांस बाहेर घातलें,
आणि सराफांचे चौरंग व खबुतरें विकणारांच्या बैठकी। यांस उलटें
केलें। १३ आणि त्यांस बोलतो। माझें घर प्रार्थनेचें घर ह्मटलें
जाईल। असें लिहिलें आहे। परंतु तुह्मी त्याला लुटाऱ्यांची गुहा
केली आहे॥ १४ मग आंधळे व लंगडे देवळांत त्याच्या जवळ
आले। आणि त्याने त्यांस निरोगी केलें॥ १५ तेव्हां। त्याने जे
चमत्कार केले। यांस आणि देवळांत लेंकरें ओरडतांना ह्मणतां।

दावीदाच्या संतानासाठीं तारणविनंती [असो.] त्यांस मुख्य उ
पाध्ये व पंडित पाहून । जळफळले । १६ आणि त्याला बोलिले ।
हे काय बोलतात । तें तूं ऐकतोस कीं काय ? तेव्हां येशू
त्यांस ह्मणतो । होय, बाळकें व तान्हीं यांच्या तोंडांतून त्वां
स्तुती पूर्ण करविली आहे । हें तुह्मी कधीं न वाचिलें कीं का
य? १७ नंतर तो त्यांस सोडून । नगराबाहेर बेथानींत गे-
ला । आणि तेथे वस्तीस राहिला ※

१८ आणि सकाळीं । तो फिरोन नगरास जात असतां ।
त्याला भूक लागली । १९ तेव्हां वाटेवर येक अंजिरझाड पाहून ।
तो त्याजवळ आला । आणि केवळ पानें यांवांचून त्यावर कां
हीं न सांपडून । तो त्याला बोलतो । यापुढें सर्वकाळापर्यंत
तुजपासून फळ न होवो ॥ आणि तें अंजिरझाड तेव्हांच वा
ळून गेलें ॥ २० मग शिष्य पाहून आश्चर्य करून बोलिले ।
अंजिरझाड किती लवकर वाळून गेलें ॥ २१ नंतर येशूनें उ
त्तर देतां त्यांस ह्मटलें । मी तुह्मास खचीत सांगतों ; जर तु
ह्मास विश्वास असतां । आणि तुह्मी संशय न धरीतां । तर
अंजिरझाडाचें जें । केवळ तेंच तुह्मी करणार नव्हां । परंतु ज
र तुह्मी ह्या डोंगरास ह्मणाल । तूं काढला जा । आणि समु
द्रांत टाकला जा । तर तें घडेल ॥ २२ आणि तुह्मी । वि
श्वास धरितां । प्रार्थनेंत अवघीं जितकीं मागाल । तीं पा
वाल ※

२२ नंतर तो देवळांत येऊन शिकवीतां । मुख्य उपाध्ये आ
णि लोकांचे पुरातन त्याच्या जवळ येऊन बोलिले । तूं कोण
त्या अधिकारानें हीं करितोस? आणि हा अधिकार तुला
कोणी दिल्हा ? २४ तेव्हां येशू उत्तर देतां त्यांस बोलिला ।
मीही तुह्मास येक गोष्ट पुसेन । ती जर तुह्मी मला सांगा
ल । तर मीही कोणत्या अधिकारानें हीं करितों । हें तुह्मास
सांगेन ॥ २५ योहान्नाचा बाप्तीस्मा कोठून होता ? आकाशापा
सून । किंवा माणसांपासून ? तेव्हां ते आपणांमध्यें विचार क

रून बोलिले। आह्मी आकाशापासून ह्मटल्यास। तो आह्माला
बोलेल, तर तुह्मी त्यावर विश्वास कां केला नाहीं? २६ आणि
माणसांपासून। जर ह्मणतों, तर आह्मी जनास भितों।
यास्तव कीं योहान्नाला भविष्यभाषी असा सर्व मानितात॥
२७ नंतर ते येशूला उत्तर देतां बोलिले। आह्मास कळलें
नाहीं॥ मग तो त्यांस बोलिला। मीही। कोणत्या अधिकाराने
हीं करितों। हें तुह्मास सांगत नाहीं॥ २८ परंतु तुह्मास
कसें दिसतें? माणसाला दोन पुत्र होते। आणि तो पहिल्या
जवळ येऊन बोलिला। मुला। आज तूं माझ्या द्राक्षमळ्यांत
जाऊन काम कर॥ २९ तेव्हां तो उत्तर देतां बोलिला।
माझी इच्छा नाहीं। तथापि। तो मागून पश्चात्ताप करून
गेला॥ ३० नंतर दुसऱ्याजवळ येऊन। त्याने तसेंच ह्मट
लें॥ तेव्हां तो उत्तर देतां बोलिला, प्रभू। मी [जा
तों।] तथापि तो गेला नाहीं॥ ३१ या दोघांतून कोण
त्याने बापाची इच्छा पाळिली? ते त्याला बोलतात। पहिल्या
ने॥ येशू त्यांस ह्मणतो। मी तुह्मास खचीत सांगतों। कीं क
रघेणारे आणि कळवांतिणी तुमच्या आगेधर देवाच्या राज्यां
त जातात॥ ३२ यास्तव कीं। योहान्न पुण्याच्या वाटेने तुह्मा
जवळ आला। तथापि तुह्मी त्यावर विश्वास ठेविला नाहीं।
परंतु करघेणारे आणि कळवांतिणी। यानी त्यावर विश्वास ठे
विला। तथापि। तुह्मी [हें] पाहून। त्यावर विश्वास ठेवायासाठीं
पश्चात्ताप मागून केला नाहीं॥ ३३ तुह्मी आणखी दाखला
ऐका॥ कोणी माणुस जो घरधनी होता। त्याने द्राक्षमळा ला
विला। आणि कुंपण त्याभोंवतें घातलें। आणि त्यामध्यें द्राक्ष
रसाचें कुंड खणून केलें। आणि माळा बांधिला, आणि त्याला शेत
कऱ्यांस सोपून परदेशास गेला॥ ३४ नंतर फळांचा समय प्रा
प्त जाला। तेव्हां। आपलीं फळें घेण्याकरितां। त्याने आपल्या
चाकरांस त्यां शेतकऱ्यांजवळ पाठविलें॥ ३५ तेव्हां त्यां शे
तकऱ्यानी त्याच्यां चाकरांस धरून। कोणाला तर। मार दि

व्हा। आणि कोणाला वधिलें। आणि कोणाला धोंड्यानी मा
लें॥ ३६ फिरोन त्याने पहिल्यांहून बहुत दुसऱ्या चाकरांस
ठविलें। परंतु त्यानी त्यांस तसेंच केलें॥ ३७ तेव्हां मागून त्या
ने आपला पुत्र त्यांकडे पाठवितां ह्मटलें। ते माझ्या पुत्राची
भीड धरितील॥ ३८ तथापि शेतकरी पुत्राला पाहून आपल्यां
मध्यें बोलिले। हा वतनदार आहे। या। आपण याला जिवें मा
रूं। आणि याचें वतन घेऊं॥ ३९ तेव्हां त्यानी त्याला धरू
न द्राक्षमळ्याबाहेर काढिलें। आणि जिवें मारिलें॥ ४० यास्त
व जेव्हां द्राक्षमळ्याचा धनी येईल, तेव्हां त्यां शेतकऱ्यांस का
य करील? ४१ ते त्याला ह्मणतात। तो त्यां दुष्टांचा भारी
नाश करील। आणि दुसरे शेतकरी। जे फळें यांच्या वेळांम
ध्यें त्याला देतील। त्यांस द्राक्षमळा सोपून देईल॥ ४२ येशू
त्यांस ह्मणतो। ज्या धोंड्याला घर बांधणारानी अव्हेरिलें। तो
च कोंपऱ्याचा शिरोभाग जाला आहे। हें प्रभूकडून घडलें। आ
णि आमच्यां दृष्टींस चमत्कारीक आहे। हें तुह्मी लेखांमध्यें
कधीं न वाचिलें कीं काय? ४३ यास्तव मी तुह्मास सांगतों।
कीं देवाचें राज्य तुह्मापासून घेतलें जाईल। आणि जी प्र
जा त्याचीं फळें देईल। तिला दिल्हें जाईल। ४४ आणि जो
ह्या धोंड्यावर पडतो। तो ठेंचला जाईल। परंतु ज्या कोणा
वर हा पडेल। त्याला भुगा करील॥ ४५ तेव्हां मुख्य उपा
ध्ये आणि फारिशी। यानी त्याचे दाखले ऐकून जाणलें। कीं
आपणांविषईं तो बोलत आहे॥ ४६ तेव्हां ते त्याला धरा
यास ह्मटत असतां लोकांस भ्याले। अशावरून कीं। त्यानी त्या
ला भविष्यभाषी असा मानिला होता ※

पर्व २२ ॥ १ तेव्हां येशू उत्तर देतां दाखल्यानी फिरो
न त्यांस ह्मणाला। कीं २ आकाशाचें राज्य राजा मनुष्या
वरून दाखविलें आहे। जो त्याने आपल्या पुत्रासाठीं लग्नकार्यें
केलीं॥ ३ आणि लग्नकार्यांस जे पाचारलेले। त्यांस बोलावया
ला त्याने आपल्यां चाकरांस पाठविलें। परंतु त्यानी येण्यास

मानिलें नाहीं॥ ४ फिरोन त्याने दुसऱ्यां चाकरांस पाठवितां
ह्मटलें। जे पाचारलेले त्यांस सांगा। पाहा। म्या आपलें जेवण
सिद्ध केलें आहे। माझे बईल आणि पुष्ट [पशू]. मारिले आहे
त। आणि अवघीं सिद्ध। लग्नकार्यांस या॥ ५ परंतु ते उपे
क्षा करून। येक तर। आपल्या शेताला। आणि येक आप
ल्या व्यापाराला असे गेले। ६ आणि जे राहिले। त्यानी त्या
च्यां चाकरांस धरून गांजिलें। आणि जिवें मारिलें॥ ७ ते
व्हां राजा ऐकून रागें भरला। आणि आपलीं सैनें पाठवून
त्यां घातकांचा नाश केला। आणि त्यांचें नगर जाळिलें॥
८ तेव्हां तो आपल्यां चाकरांस ह्मणतो। लग्न सिद्ध आहे।
खरें। परंतु जे पाचारले ते योग्य नव्हते॥ ९ यास्तव मार्गां
च्यां चव्हाठ्यांमध्यें जा। आणि जितके तुह्मास सांपडतात।
तितक्यांस लग्नकार्यांस बोलावा॥ १० आणि ते चाकर मार्गां
मध्यें बाहेर गेले। आणि जे वाईट आणि बरेही। जितके त्यांस
सांपडले। त्यां सर्वांस येकवट केलें। मग बसणाऱ्यांकडून लग्ना
ची भर्ती जाली ※ ११ तेव्हां राजाने। बसणाऱ्यांस पाहायास
आंत येऊन। तेथे लग्नाचें वस्त्र आंगांत न घातलेल्या माणसाला
पाहिलें। १२ तेव्हां त्याला बोलतो। हे सख्या। लग्नाचें वस्त्र न
घेतां। तूं येथे कसा आंत आलास? आणि तो कुंठीत जाला॥
१३ तेव्हां राजाने चाकरांस ह्मटलें। त्याचे पाय व हात बां
धून त्याला न्या। आणि बाहेरील अंधारांत टाका। तेथे
रडणें आणि दांतांचें कडकडिवणें होईल॥ १४ यास्तव
कीं। बहुत बोलाविले। परंतु थोडके निवडिले आहेत ※
१५ तेव्हां फारिश्यानी जाऊन। त्याला बोलण्यामध्यें फांसां
त कसें पाडावें। असा येकवट विचार मांडला॥ १६ आणि
त्यानी आपल्यां शिष्यांस। हेरोदाचे जे त्यांसुद्धां। त्याकडे पाठवू
न ह्मटलें। हे गुरू। आह्मास कळलें। कीं तूं खरा आहेस।
आणि देवाचा मार्ग खरेपणाने शिकवितोस। आणि कोणावि
षईं तुला काळजी नाहीं। यास्तव कीं। माणसांच्या तोंडाकडे तूं

पाहात नाहींस॥ १७ यास्तव आह्मास सांग. तुला कसें दिस
तें ? कादूसारास पट्टी देणें। हें योग्य आहे किंवा नाहीं ? १८
परंतु येशू त्यांचें वाईटपण जाणून बोलिला। अहो ढोंगी।
माझी प्रचिती कां पाहातां ? १९ पट्टीचा पैका मला दाखवा।
तेव्हां त्यानी त्याजवळ पावली आणिली॥ २० तेव्हां तो त्यां
स ह्मणतो। ही आकृती व पत्ता कोणाचीं? २१ ते त्याला
ह्मणतात। कादूसाराचीं॥ यावर तो त्यांस ह्मणतो, तर जीं
कादूसाराचीं तीं कादूसाराला। आणि जीं देवाचीं तीं देवा
ला भरून द्या॥ २२ तेव्हां ते ऐकून आश्चर्य पावले। आ
णि त्याला सोडून तेथून गेले॥

२३ त्याच दिवशीं। जादूकी। जे पुनरुठणें होणार ना
हीं असें ह्मणतात। ते त्याजवळ आले। आणि त्यानी त्या
ला पुसून २४ ह्मटलें। हे गुरू। मोश्याने सांगीतलें। ज
र कोणी आपलीं लेंकरें नसतां मरतो। तर त्याच्या भावानें
त्याच्या बायकोसीं लग्न करावें। आणि आपल्या भावासाठीं
बिज उपजवावें॥ २५ तर आह्मामध्यें सात भाऊ होते। आ
णि पहिला लग्न करून मेला। आणि त्याला संतान नसतां।
त्यानें आपली बायको आपल्या भावासाठीं ठेविली॥ २६ दु
सराही, आणि तिसरा। सातव्यापर्यंत तसेच [मेले।] २७ आणि
सर्वांच्या मागून बायकोही मेली॥ २८ यास्तव पुनरुठण्यांत।
ती त्यां सातांतील कोणाची बायको होईल? कां कीं। त्यां स
र्वांचीही ती होती॥ २९ तेव्हां येशूनें। उत्तर देतां। त्यांस ह्म
टलें। तुह्मी लेखांस आणि देवाच्या शक्तीस जाणलें नसतां चुक
तां॥ ३० कारण कीं। पुनरुठण्यांत ते लग्नानें घेत नाहींत।
आणि लग्नास दिल्हे जात नाहींत। परंतु आकाशांत देवांच्या
दूतांसारिखे आहेत॥ ३१ आणि मेल्यांच्या पुनरुठण्याविषईं।
तुह्मी काय। न वाचिलें, जें देवापासून तुह्मास ह्मटलें। कीं।
३२ जो आब्राहामाचा देव। आणि जो इस्हाकाचा देव। आ
णि जो याकोबाचा देव। तो मी आहें? जो देव। तो मेल्यां

चा नव्हे। परंतु जीवंतांचा देव आहे॥ ३३ तेव्हां समुदाय
ऐकून, त्याच्या उपदेशावरून विस्मीत जाले ॐ

३४ तेव्हां, त्याने साडूक्यांस कुंठीत केलें। हें फारिशी ऐ
कून येकवट मिळाले॥ ३५ तेव्हां त्यांमधील येक शास्त्री। त्या
सी परिक्षा पाहातां। त्याला विचारितांना बोलिला। ३६ हे
गुरू, शास्त्रांत कोणती आज्ञा मोठी? ३७ मग येशू त्याला बो
लिला, प्रभू जो तुझा देव। त्यावर तूं आपल्या सगळ्या हृ
दयाने। आणि आपल्या सगळ्या जीवाने, आणि आपल्या स
गळ्या बुद्धीने, प्रीती कर॥ ३८ हीच प्रथम व मोठी आज्ञा
आहे। ३९ आणि हिच्या सारिखी दुसरी। [कीं] तूं जसी
आपणावर। तसी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर॥ ४० ह्या
दोन आज्ञांवर संपूर्ण शास्त्र व भविष्यभाषी यांचा भा
र आहे ॐ

४१ आणि फारिशी मिळालेले असतां। येशू त्यांस विचारि
तां बोलिला। ४२ ख्रीस्ताविषईं तुह्मास कसें दिसतें? तो को
णाचें संतान आहे? ते त्याला ह्मणतात। दावीदाचें॥ ४३ तो
त्यांस ह्मणतो। तर दावीद। आत्म्याने, त्याला प्रभू कसें ह्मण
तां बोलतो। ४४ प्रभूने माझ्या प्रभूला ह्मटलें। मी तुझ्यां
वैऱ्यांस तुझ्यां पायांचें आसन करीन। तोंपर्यंत तूं माझ्या उ
जव्याकडे बैस? ४५ यास्तव। जर दावीद त्याला प्रभू ह्मणतो।
तर तो त्याचें संतान कसा आहे? ४६ तेव्हां कोणाच्या
ने त्याला [येक] शब्द उत्तर देववलें नाहीं। आणि त्या
दिवसापासून कोणी त्याला आणखी विचारायास धजला
नाहीं ॐ

पर्व २३॥ १ तेव्हां येशू समुदायांस आणि आपल्यां शि
ष्यांस बोलिला। २ कीं पंडित आणि फारिशी मोशाच्या आ
सनावर बसले आहेत॥ ३ यास्तव अवघीं। जीं जीं ते तुह्मास
पाळायास सांगत असतील। तीं पाळा आणि करा। परंतु
त्यांच्यां कामांप्रमाणे करूं नका। कारण कीं। ते ह्मणतात, पण क

रीत नाहींत॥ ४ आणखी ते भारी आणि वागवायास अवघड वो
झीं बांधितात। आणि माणसांच्यां खांद्यांवर ठेवितात। परंतु ते।
आपल्या बोटाने त्यांस हालवूं इच्छीत नाहींत॥ ५ आणि माण
सांकडून पाहिले जाण्यास। ते आपलीं अवघीं कामें करितात।
आणि आपलीं रक्षणपत्रें विस्तीर्ण करितात। व आपल्या व
स्त्रांच्या दश्या मोठ्या करितात॥ ६ आणखी जेवणावळींस आ
दी टेकण। आणि सभांमध्यें आदी आसनें। ७ आणि पेठांमध्यें क्षेम
गोष्टी। आणि माणसांकडून गुरू। गुरू। असें ह्मटलें जाणें।
हीं त्यांस आवडतात॥ ८ परंतु तुह्मी गुरू ह्मटले जाउं न
का। यास्तव कीं। येक जो ख्रीस्त। तो तुमचा उपदेशक आ
हे। आणि सर्व तुह्मी भाऊ आहां॥ ९ आणि पृथ्वीवर तु
ह्मी [कोणाला] आपला बाप ह्मणुं नका। यास्तव कीं। येक जो
आकाशांमध्यें। तो तुमचा बाप आहे॥ १० आणि तुह्मी उ
पदेशक ह्मटले जाउं नका। कारण कीं। येक जो ख्रीस्त। तो
तुमचा उपदेशक आहे॥ ११ परंतु जो तुह्मामधील थोर।
तो तुमचा सेवक होईल॥ १२ आणि जो कोणी आपणाला
उंच करील। तो नीच केला जाईल॥ आणि जो कोणी आ
पणाला नीच करील। तो उंच केला जाईल॥ १३ आणि अ
हो पंडित व फारिशी। ढोंगी। तुह्मास हायहाय। कां कीं। तु
ह्मी माणसांसमोर आकाशांचें राज्य बंद करितां। यास्तव कीं।
तुह्मी आपण आंत न जातां। आणि जे आंत जात [आहेत।]
त्यांस आंत जाउं न देतां॥ १४ अहो पंडित आणि फारिशी।
ढोंगी। तुह्मास हायहाय। कां कीं। तुह्मी विधवांचीं घरें खा
ऊन टाकितां। आणि मिसाने फार वेळाच्यां प्रार्थना करितां।
ह्यावरून तुह्मी अधीक दंड पावाल॥ १५ अहो पंडित आ
णि फारिशी। ढोंगी। तुह्मास हायहाय। कां कीं। तुह्मी। ये
क शिष्य मिळवायासाठीं। समुद्राला आणि कोरडवटीला फिरत्या
घालतां। आणि जेव्हां तो जाला। तेव्हां त्याला तुमच्या दुप्पटा
हून अधीक अधोगतीचा पुत्र करितां॥ १६ अहो आंधळे वाटा

डे। तुह्मास हायहाय। जे तुह्मी ह्मणतां। जर कोणी देवळावरू
न शपत वाहातो। तर तो कांहीं नाहीं। परंतु जो कोणी दे
वळांतील सोन्यावरून शपत वाहातो। तो ऋणी आहे॥ १७ [तु
ह्मी] मूर्ख आणि आंधळे। कारण कीं। कोणतें मोठें? सोनें?
किंवा देऊळ। जें सोन्याला पवित्र करितें। तें? १८ आणि ज
र कोणी वेदीवरून शपत वाहातो। तर तो कांहीं नाहीं। प
रंतु तिजवर जें अर्पण। त्यावरून जो कोणी शपत वाहातो।
तो ऋणी आहे॥ १९ [तुह्मी] मूर्ख आणि आंधळे। कां कीं
कोणतें मोठें? अर्पण? किंवा वेदी। जी अर्पणाला पवित्र करि
ती। ती? २० यास्तव जो वेदीवरून शपत वाहातो। तो ति
जवरून। आणि तिजवर अवघीं जीं। त्यांवरून शपत वाहा
तो॥ २१ आणि जो देवळावरून शपत वाहातो। तो त्यावरू
न। आणि त्यांतील राहाणारा। यावरून शपत वाहातो॥
२२ आणि जो आकाशावरून शपत वाहातो। तो देवाच्या सिं
व्हासनावरून। आणि त्याजवरील बसणारा। यावरून शपत वा
हातो॥ २३ अहो पंडित आणि फारिशी। ढोंगी। तुह्मास हा
यहाय। कां कीं। पोदीना व शोफा व जिरें। यांतून तुह्मी
दाहावें देतां। परंतु शास्त्रांतील जीं अधीक भारी। न्याय। व
दया। व विश्वास। हीं सोडिलीं॥ हीं केलीं पाहिजे होतीं।
आणि तीं न सोडावीं॥ २४ अहो आंधळे वाटाडे। जे तु
ह्मी केमोऱ्याला गाळितां। परंतु उंटाला गिळितां॥ २५ अहो
पंडित आणि फारिशी। ढोंगी। तुह्मास हायहाय। यास्तव कीं।
वाटी व ताट यांस बाहेरून शुद्ध करितां। परंतु तीं आंत
अपहाराने व अदमनाने भरलीं आहेत॥ २६ हे आंधळ्या फारि
श्या। वाटी व ताट यांचें आंतून प्रथम शुद्ध कर। ह्यासाठीं कीं त्यां
चें बाहेरूनही शुद्ध व्हावें॥ २७ अहो पंडित आणि फारिशी।
ढोंगी। तुह्मास हायहाय। कां कीं। चुना लावलेलीं प्रेतस्थानें।
जीं बाहेरून सुंदर दिसतात खरें। परंतु आंतून मेलेल्यांच्या हा
डानी व प्रत्येक अशुद्धपणाने भरलीं आहेत, त्यांसारिखे तु

ह्मी आहां॥ २८ तसेच तुह्मी बाहेरून माणसांस पुण्यवान दि
सतां खरें, परंतु आंतून ढोंगाने। आणि अधार्मिकपणाने भरले आ
हां॥ २९ अहो पंडित आणि फारिसी। ढोंगी। तुह्मास हाय
हाय। कां कीं। तुह्मी भविष्यभाष्यांचीं प्रेतस्थानें बांधितां। आणि
पुण्यवानांचीं थडीं शोभिवंत करितां। ३० मग बोलतां। जर
आह्मी आपल्या पितरांच्या दिवसांत असतों। तर त्यांचे भागी
दार, भविष्यभाष्यांच्या रक्ताविषईं जालों नसतों॥ ३१ अशा
ने तुह्मी आपल्याविषईं साक्ष देतां। कीं तुह्मी भविष्यभाष्यां
च्यां वधणाऱ्यांचीं संतानें आहां॥ ३२ तुह्मीही आपल्यां पित
रांचें परिमाण पूर्ण करा॥ ३३ अहो साप। दुस्सर्पांचे उपज।
नर्काच्या दंडापासून तुह्मी कसे पळाल? ३४ ह्याकरितां। पा
हा। मी तुह्माजवळ भविष्यभाष्यांस व ज्ञान्यांस व पंडितांस पा
ठवितों। आणि त्यांमधील [कित्येकांस] तुह्मी जिवें माराल, आ
णि वधस्तंभीं द्याल। आणि त्यांमधील [कित्येकांस] तुमच्यां स
भांमध्यें फटके माराल। आणि नगरो नगरीं त्यांच्या पाठीस
लागाल॥ ३५ अशाने। पुण्यवान हाबेल याच्या रक्तापासून ब
रख्या याचा पुत्र जखार्या। ज्याला वेदीच्या व देवळाच्या मध्यें
तुह्मी वधिलें। त्याच्या रक्तापर्यंत। सर्व पुण्यवान रक्त। जें पृ
थ्वीवर पाडिलें तें तुह्मावर यावें॥ ३६ मी तुह्मास खचीत
सांगतों। ह्या पिढीवर तीं अवघीं येतील॥ ३७ हे यरूशले
मा। यरूशलेमा। जें भविष्यभाष्यांस वधितें। आणि आपल्याजव
ळ पाठविलेले यांस धोंड्याने मारितें, तें तूं। जसें कोंबडी आ
पल्यां पिलांस पंखांखालीं येकवट करिती। त्या प्रकारें तुझ्या
लेकरांस येकवट करायास म्या कितीदां इछिलें आहे? परंतु
तुह्मी मानिलें नाहीं॥ ३८ पाहा। तुमची वस्ती तुह्मास वो
साड सोडली आहे॥ ३९ कारण कीं। मी तुह्मास सांगतों।
प्रभूच्या नांवाने जो येतो। तो धन्यवादीत। [असें] ह्मणाल ते
थपर्यंत तुह्मी आतांपासून मला पाहाणार नव्हांच॥

पर्व २४॥ १ मग येशू बाहेर आऊन देवळापासून गेला।

आणि त्याचे शिष्य। त्याला देवळाच्यां रचनां दाखवायास। ज
वळ आले॥ २ परंतु येशू त्यांस बोलिला। तुह्मी हीं अवघीं
पाहातां कीं नाहीं? मी तुह्मास खचीत सांगतों। खालीं पा
डिला जाणार नाहीं। असा येथे धोंड्यावर धोंडा राहूं दिल्हा
नाहींच॥ ३ मग तो। जाइतझाडांच्या डोंगरावर बसला असतां।
शिष्य त्याच्या जवळ येकीकडे येऊन बोलिले। हीं केव्हां हो
तील। आणि तुझ्या येण्याचें। व जगाच्या समाप्तीचें चिन्ह काय
[होईल।] हें आह्मास सांग॥ ४ तेव्हां येशू उत्तर देतां त्यां
स बोलिला। कोणी तुह्मास न फसवावें। ह्मणोन पाहा॥ ५ का
रण कीं। बहुत माझ्या नांवाने येऊन बोलतील। मी ख्रीस्त आहें।
आणि बहुतांस फसवितील॥ ६ आणि लढायां व लढायांच्यां
आवायां तुह्मी ऐकणार आहां। सावध व्हा। घाबरूं न
का। यास्तव कीं अवघीं जालीं पाहिजेत। परंतु शेवट तेव्हां
च नाहीं॥ ७ कारण कीं। प्रजा प्रजेविरुद्ध। आणि राज्य रा
ज्याविरुद्ध उठेल। आणि दुकाळ व मऱ्या। आणि जागोजागीं
भूमिकंप होतील। ८ परंतु हीं अवघीं तिडकांचा प्रारंभ॥ ९ ते
व्हां तुह्मास दुखासाठीं परस्वाधीन करितील। आणि तुह्मास व
धितील। आणि माझ्या नांवाकरितां अवघ्यां प्रजांकडून द्वेषलेले
व्हाल॥ १० आणि तेव्हां बहुत अडखळविले जातील। आणि
येकमेकांस परस्वाधीन करितील। आणि येकमेकांचा द्वेष करिती
ल॥ ११ आणि बहुत खोटे भविष्यभाषी उठतील। आणि बहुतां
स फसवितील॥ १२ आणि अशास्त्रपण वाढल्यावरून बहुतांची प्रीती
थंड होईल॥ १३ परंतु जो शेवटापर्यंत टिकेल, तोच तारला
जाईल॥ १४ आणि अवघ्यां प्रजांस साक्ष [व्हावी।] यासाठीं
राज्याचें हें सुवर्तमान संपूर्ण वसलेल्यांत गाजविलें जाईल।
आणि तेव्हां शेवट येईल॥ १५ यास्तव। वोसाड करण्याचें
वोखटें। जें दानीयेल भविष्यभाष्याकडून सांगीतलें। तें पवि
त्र स्थानांत उभें राहातां जेव्हां तुह्मी पाहाल। वाचणारा ध्या
नांत आणो। १६ तेव्हां जे यहूदांत। ते डोंगरांवर पळो

न॥ १७ जो गच्चीवर। तो। आपल्या घरांतून कांहीं घेण्या
करितां। न उतरो॥ १८ आणि जो शेतांत। तो। आप
लीं वस्त्रें घेण्याकरितां। माघारीं न फिरो॥ १९ तेव्हां त्यां
दिवसांत ज्या पोटाशीं आहेत। आणि ज्या स्तन पाजतात त्यांस
हायहाय॥ २० परंतु तुमचें पळणें हिंवाळ्यांत। अथवा शा
ब्बाथांत न व्हावें। ह्मणोन प्रार्थना करा॥ २१ कारण कीं।
जगाच्या प्रारंभापासून अंतांपर्यंत जसें जालें नाहीं। आणि
होणारही नाहींच तसें दुःख तेव्हां होईल॥ २२ आणि ते दिव
स न आंखडल्यास। कोणीच मास निभावणार नसतें। परंतु निवड
लेले जे त्यांच्या साठीं ते दिवस आंखडले जातील॥ २३ तेव्हां
जर कोणी तुह्मास ह्मणेल। पाहा। ख्रीस्त येथे। किंवा तेथे।
तर तुह्मी विश्वास न धरावा। २४ कारण कीं। खोटे ख्रीस्त
आणि खोटे भविष्यभाषी उठतील। आणि मोठीं चिन्हें व सा
ह्यासाठीं चमत्कार त्याकडून घडतात॥ १५ दुसरे बोलिले।

कीं एलीया आहे। आणि दुसरे बोलिले, कीं भविष्यभाषी आ
हे। किंवा भविष्यभाष्यांतील येकाच्या सारिखा आहे॥ १६ परं
तु हेरोद ऐकून बोलिला। कीं ज्या योहान्नाचें शीर म्या छे
दिलें, तोच आहे। तोच मेलेल्यांमधून उठला आहे। १७ कां
कीं। या हेरोदाने पाठवून योहान्नाला धरिलें होतें। आणि
त्याला। हेरोदियासीं आपला भाउ फिलीपस याची बायको।
हिजशीं आपण लग्न केलें होतें। यास्तव हिजकरितां। बंदिशा
ळेंत बंद केलें होतें॥ १८ कां कीं। योहान्नाने हेरोदाला ह्म
टलें होतें। कीं तुझ्या भावाची बायको तुझी होणें। हें तु
ला योग्य नाहीं॥ १९ मग हेरोदियासीने त्यासीं वैर केलें।
आणि त्याला वधायास इछिलें। परंतु न शकली॥ २० कारण
कीं। योहान्न पुण्यवान व पवित्र [असें] हेरोद जाणून त्याला
भ्याला। आणि त्याचें संरक्षण केलें व त्याचें ऐकून बहुत केलें।
आणि हर्षानें त्याचें ऐकिलें॥ २१ मग सुप्रसंगाचा दिवस जा
ला। कीं तेव्हां हेरोदाने आपल्या वाढदिवसीं आपले थोरले
व सरदार व गालीलांतील जे श्रेष्ठ। यांसाठीं जेवणावळ केली।
२२ आणि त्या हेरोदियासीच्या कन्येने आंत येऊन व ना
चून। आणि हेरोदाला व त्याच्या बरोबर बसणाऱ्यांस संतोष
विल्यावर। राजाने त्या मुलगीला ह्मटलें। जें कांहीं तूं इछि
तीस तें मजवळ माग। ह्मणजे मी तुला देईन॥ २३ आणि
त्याने तिजशीं शपत वाहिली। कीं जें काहीं तूं मजवळ माग
सील। तें मी आपल्या राज्याच्या अर्धपर्यंत देईन॥ २४ ते
व्हां ती बाहेर जाऊन आपल्या आईला बोलिली। मी काय
मागुं? आणि तिने ह्मटलें। योहान्न। जो बाप्तीस्मा करणारा।
त्याचें शीर॥ २५ मग ती तेव्हांच वेगें राजाजवळ आंत आ
ल्यावर मागतां बोलिली। योहान्न, जो बाप्तीस्मा करणारा।
त्याचें शीर लां मला तबकांत आतां द्यावें। ह्मणोन मी इछि
तें॥ २६ आणि राजा फार खिन्न जाला। [तथापि] त्या शप
ता आणि बरोबर बसणारे यांसाठीं तिला आव्हेरायास त्याने

न दूकिलें॥ २७ आणि तेव्हांच राजाने भालदार पाठवून त्या
चें शीर आणायाची आज्ञा केली॥ २८ तेव्हां त्याने निघून
बंदिशाळेंत त्याचें शीर छेदिलें। आणि त्याचें शीर तबकांत
आणून। त्या मुलगीस दिल्हें। मग मुलगीने तें आपल्या आईस
दिल्हें॥ २९ मंतर त्याचे शिष्य ऐकून आले। आणि त्याचें प्रे
त उचलून तें थड्यांत ठेविलें ॥

३० आणि ते प्रेषीत येशूजवळ मिळाले। तेव्हां अवघीं। ह्मा
णजे जितकीं त्यानी केलीं। आणि जितकीं शिकविलीं। तीं
त्यानी त्याला सांगितलीं॥ ३१ आणि तो त्यांस बोलिला। तु
ह्मी आपण येकीकडे रानटी जागेस या। आणि थोडा वि
सांवा घ्या। कां कीं। पुष्कळ येत व जात होते। आ
णि खायाचाही अवकाश त्यांस नव्हता॥ ३२ तेव्हां ते येकीक
डे रानटी जागेस तारवाने निघून गेले॥ ३३ तेव्हां समुदाया
नी त्यांस निघतां पाहिलें। आणि बहुतानी त्याला वोळखिलें।
आणि अवघ्यां नगरांतून पायानी तेथे येकवट धांवले। त्यां
च्या पुढेंही आले। आणि त्याजवळ मिळाले॥ ३४ तेव्हां येशू
ने बाहेर येऊन मोठा समुदाय पाहिला। आणि मेंढरांस मेंढ
पाळ नाहीं। त्यांसारिखे ते होते। यास्तव तो त्यांवर कळवळ
ला। तेव्हां तो त्यांस बहुत उपदेशूं लागला॥ ३५ आणि तित
क्यांत फार वेळ गेल्यावर। त्याचे शिष्य त्याजवळ येऊन ह्मण
तात। कीं ही रानटी जागा आहे। आणि इतक्यांत फार वे
ळ [जाला आहे।] ३६ त्यानी चहुंकडल्यां शेतवस्त्यांत व गां
वांत जाऊन। आपणांसाठीं खाणीं विकत घ्यावीं। ह्मणोन त्यां
स जाऊं दे। कारण कीं। त्यांजवळ खावयास कांहीं नाहीं॥
३७ परंतु तो उत्तर देतां त्यांस बोलिला। तुह्मी त्यांस खा
याला द्या॥ तेव्हां ते त्याला ह्मणतात। आह्मी जाऊन दोन
शें पावल्यांच्या भाकरी विकत घ्याव्या। आणि त्यांस खायाला
द्यावें कीं काय? ३८ तेव्हां तो त्यांस ह्मणतो। तुह्माजवळ
किती भाकरी आहेत? जाऊन पाहा॥ मग ते जाणल्यावर

ह्मणतात। पांच व दोन मासे॥ ३९ नंतर त्यां सर्वांनी हिं
रव्या गवतावर पंक्ती पंक्तीने बसावें। ह्मणोन त्याने त्यांस आज्ञा
दिल्ही॥ ४० आणि ते। वळी वळीने शें शें व पन्नपन्नास। बसले॥
४१ मग त्याने। त्या पांच भाकरी व दोन मासे घेतल्यावर आका
शास वर पाहून स्तुती केली। मग त्या भाकरी मोडिल्या आणि। त्यां
पुढें वाढायास। आपल्यां शिष्यांपाशीं दिल्ह्या। आणि त्याने ते
दोन मासे सर्वांस वांटले॥ ४२ तेव्हां सर्वांनी खालें। आणि ते ट
प्त जाले॥ ४३ मग तुकड्यांच्या व त्यां माशांच्या बारा भरलेल्या
करंड्या त्यानी उचलिल्या॥ ४४ आणि ज्यानी त्या भाकरी खा
ल्या। ते सुमारें पांच हजार पुरुष होते ※

४५ आणि तेव्हांच। आपण समुदायास निरोप देई तोंपर्यंत।
त्याने आपल्यां शिष्यांस अगत्याने तारवावर चढविलें। आणि
पलीकडे बेथसाद्यास पुढें जावविलें॥ ४६ मग। त्यांपासून
आज्ञा घेतल्यानंतर। तो प्रार्थना करायाला डोंगरास गेला॥
४७ आणि संध्याकाळ जाल्यावर, तारूं समुद्राच्या मध्यें हो
तें। परंतु तो येकला भुयीवर [होता॥] ४८ तेव्हां त्याने त्यां
स वल्हावण्याने पिडिलेले पाहिलें। का कीं वारा त्यांस उलटा
होता॥ नंतर रात्रीच्या चवथ्या प्रहरीं। तो समुद्रावर चालतां
त्यांच्या जवळ येतो। आणि त्याने त्यांच्या पुढें जाऊं इच्छि
लें॥ ४९ परंतु ते त्याला समुद्रावर चालतां पाहून। आभास
आहे। असें मोजितांना वोरडले। ५० कां कीं। सर्वांनी त्याला
पाहिलें। आणि ते घाबरे जाले॥ मग तो तेव्हांच त्यांशीं बो
लिला। आणि त्यांस ह्मणतो। धीर धरा। मी आहें। भिऊं
नका॥ ५१ नंतर तो त्यांजवळ तारवावर चढला। आणि वा
रा राहिला। तेव्हां ते आपणांमध्यें फाराने अती विस्मय पा
वले। असे आश्चर्यवंत जाले। ५२ तर भाकरींविषईं त्यानी ध्यान
केलें नाहीं। कारण कीं त्यांचें हृदय घट्ट जालें होतें॥
५३ नंतर ते पलीकडे जाऊन। गेन्नेसारेत देशाजवळ आले।
मग तडीस लागले ※

५४ तेव्हां हे तारवांतून निघाल्यावर। तेव्हांच ते त्याला वो
ळखून। ५५ त्या संपूर्ण चहूंकडील ठिकाणीं धांवून। ज्यांस
रोग होते त्यांस। जेथें तो आहे ह्मणोन त्यांनी ऐकिलें। ते
थें बाजांवर्तें फिरवूं लागले॥ ५६ आणि जेथें जेथें तो गांवांम
ध्यें। किंवा नगरांमध्यें। किंवा शेतवस्त्यांमध्यें गेला. तेथें तेथें त्यांनी
रोग्यांस अड्ड्यांमध्यें ठेविलें। आणि। ह्यांनी त्याच्या वस्त्राच्या टों
कास मात्र शिवावें। ह्मणोन त्याला विनंती केली। तेव्हां जितके
त्याला शिवले। तितके रक्षिले गेले ※

पर्व ७ ॥ १ तेव्हां फारिशी आणि पंडितांतून कित्येक। य
रूशलेमापासून येऊन। त्याजवळ मिळाले॥ २ आणि ह्यांनी त्या
च्या शिष्यांतील कित्येकांस साधारण, ह्मणजे न धुतलेल्यां। हाता
नीं भाकरी खातां पाहून। दोष ठेविला॥ ३ कां कीं। फारि
शी व सर्व यहूदी। पुरातनांची दंतकथा धरून। आपले हात वे
ळोवेळ धुतल्यावांचून खात नाहींत॥ ४ आणि अड्ड्यांतून [आ
ल्यास] आंघोळ केल्यावांचून ते खात नाहींत। आणि जीं त्यांनी
पाळायास अंगिकारिलीं। तीं दुसरीं बहुत आहेत। [कीं] प्याले
व घागरी व तांब्याचीं भांडीं व माचवे। यांचें धुणें॥ ५ या
वरून फारिशी व पंडित यांनी त्याला विचारिलें। तुझे शिष्य
दंतकथेप्रमाणे न चालतात। परंतु न धुतलेल्यां हातांनी अन्न
खातात। हें कशाला? ६ तेव्हां त्याने उत्तर देतां त्यांस ह्मटलें
कीं तुह्मा ढोंग्यांविषईं यशायाने भविष्य ठीक सांगीतलें।
असें लिहिलें। हा लोक आपल्यां ओंठांनी माझा सन्मान क
रितो। तथापि त्यांचें हृदय माझ्यापासून दूरच आहे॥
७ आणि उपदेशार्थ माणसांच्या आज्ञा शिकवीत असतां। म
ला व्यर्थ भजतात॥ ८ कारण कीं। तुह्मी देवाची आज्ञा
सोडून मनुष्यांची दंतकथा धरितां। [ह्मणजे] घागरी व प्या
ले यांचें धुणें। आणि त्यांसारिखीं दुसरीं असीं पुष्कळ करि
तां॥ ९ तेव्हां तो त्यांस बोलिला। तुह्मी आपली दंतकथा
पाळावी। ह्मणोन देवाची आज्ञा पक्कें चालवितां॥ १० कां

कीं। मोशे बोलिला। तूं आपला बाप आणि आपली आई
यांचा सन्मान कर। आणि जो आपल्या बापाला किंवा आईला
निंदितो। तो मरणीं मरो॥ ११ परंतु तुह्मी ह्मणतां। जर
माणुस बापाला किंवा आईला ह्मणेल। मजकडून तुझा जो
कांहीं लाभ असेल। तो कर्बान। ह्मणजे अर्पण आहे।
१२ तर तुह्मी त्याला त्याच्या बापासाठीं अथवा त्याच्या आईसा
ठीं आणखी कांहीं करूं न देतां। १३ असें तुह्मी जी आपली दंत
कथा सांगून देतां। तीजकडून देवाची गोष्ट निरर्थ करितां।
आणि याप्रकारिखीं बहुत असीं करितां ※ १४ तेव्हां तो सगळ्या
समुदायाला जवळ बोलावून। त्यांस ह्मणाला। तुह्मी अवघे माझें
ऐका। आणि समजा। १५ जें माणसांत शिरून त्याला अ
शुद्ध करूं शकतें। असें त्याच्या बाहेर कांहीं नाहीं। परंतु
जीं त्यांतून निघतात। तींच माणसाला अपवित्र करतीं आहे
त॥ १६ जर कोणाला ऐकायास कान आहेत। तर तो ऐ
को॥ १७ मग तो समुदायापासून घरांत गेल्यानंतर। त्या
च्यां शिष्यांनी त्याला त्या दाखल्याविषईं विचारिलें॥ १८ ते
व्हां तो त्यांस ह्मणतो। तुह्मीही इतके असमजीक आहां कीं का
य? काय। हें तुमच्या ध्यानांत नाहीं। कीं अवघें जें बाहेरून
मनुष्यांत शिरतें। तें त्याला विटाळवायास शक्तिमान नाहीं?
१९ कारण कीं। तें त्याच्या मनांत जात नाहीं। परंतु पो
टांत। मग सर्व भक्ष्यें शुद्ध करीत असतां। शौचकुपांत बाहेर जा
तें॥ २० आणि तो बोलिला। कीं जें मनुष्यांतून निघतें।
तें माणसाला विटाळवितें। २१ कां कीं। आंतून मनुष्यांच्या
मनापासून वाईट विचार निघतात। व्यभिचार। शिंदळक्या।
हत्यां। २२ चोऱ्या। लोभ। दुष्टपणें। कपट। कामातुरपण।
दुष्ट दृष्टी। दुर्भाषण। डंभ। निर्बुद्धपण। २३ हीं अवघीं
वाईट आंतून निघतात। आणि मनुष्याला विटाळवितात ※

२४ मग तो तेथून उठून शोर व सिदोन यांच्यां सीमां
त गेला। आणि घरांत जाऊन। कोणी न जाणावें ह्मणोन

त्याने इछिलें। परंतु त्याच्याने गुप्त राहावलें नाहीं॥ २५ का
तर। ज्या स्त्रीच्या लाहान कन्येस अशुद्ध आत्मा लागला
ती। त्याविषईं ऐकल्यावर। येऊन त्याच्या पायांजवळ पडली॥
२६ परंतु ती स्त्री हेल्लाणीण। जन्माकडून सुरफैनीसीण हो
ती। आणि त्याने तीच्या कन्येंतून भूत घालवावें, ह्मणोन ती
ने त्याजवळ मागीतलें॥ २७ तेव्हां येशू तिला बोलिला,
पहिलें लेंकरें तृप्त केलीं जाउं दे। कारण कीं लेंकरांची भा
कर घेणें। आणि कुत्र्यांस देणें। हें ठीक नाहीं॥ २८ मग
ती उत्तर देतांना त्याला ह्मणती। होय प्रभू। तरीं यांसाठीं।
कीं कुत्रीं चवरंगाखालीं लेंकरांच्यां चुर्यांतून खातात॥ २९ तेव्हां
त्याने तिला ह्मटलें। ह्या गोष्टीसाठीं तूं जा। तुझ्या कन्येंतून
भूत निघालें आहे॥ ३० नंतर ती आपल्या घरास जाऊन।
भूत निघालेलें। आणि कन्या अंथरुणावर निजलेली। असें तिला
सांपडलें ※

३१ आणि तो फिरोन तोर व सिदोन यांच्यां सीमांतून
निघून। देकापलीसाच्यां सीमांमधून गालीलाच्या समुद्राजवळ आ
ला॥ ३२ तेव्हां ते बहिर्या तोत्र्याला त्याजवळ आणितात।
आणि त्याने त्याजवर हात ठेवावा। ह्मणोन त्याजवळ विनंती
करितात॥ ३३ मग त्याने। त्याला घेऊन समुदायापासून ये
कीकडे गेल्यावर। आपलीं बोटें त्याच्यां कानांमध्यें घातलीं।
नंतर तो थुंकून त्याच्या जिभेस शिवला। ३४ आणि आकाशाकडे
वर पाहून सुफुंदला। मग त्याला ह्मणतो। एफ्फाथा। ह्मण
जे मोकळा हो॥ ३५ तेव्हां वर्चांवर त्याचे कान मोकळे जाले,
आणि त्याच्या जिभेचा बंद सुटला, आणि तो नीट बोलि
ला॥ ३६ तेव्हां त्यानीं कोणाला न सांगावें, ह्मणोन याने त्यां
स सांगी केली। परंतु याने त्यांस जेवढी सांगी केली। तेवढें त्या
नी फार अधीक गाजविलें॥ ३७ आणि ते अत्यंत थक्क हो
ऊन बोलिले। त्याने सगळीं बरीं केलीं आहेत। तो बहिर्यांस ऐ
कतां आणि मुक्यांसही बोलतां करितो ※

पर्व ८ ॥ १ त्यां दिवसांमध्यें समुदाय फार मोठा असतां।
आणि त्यांस खावयास कांहीं नसतां। येशू आपल्यां शिष्यांस
जवळ बोलावून। त्यांस ह्मणतो। २ मी समुदायावर कळव
ळतों। कारण कीं ते इतक्यांत माझ्या जवळ तीन दिवस रा
हिले आहेत। आणि खावयाला त्यांस कांहीं नाहीं॥ ३ ह्म
णोन जर मी त्यांस उपाशी त्यांच्या घरीं जाऊं देतों। तर
ते वाटेंत कांधेरी पावतील। कां कीं त्यांतून कित्येक लांबून आ
ले॥ ४ तेव्हां त्याच्या शिष्यांनी त्याला उत्तर दिल्हें। [कीं]
कोणी ह्यांस येथें रानांत अन्नानी तृप्त करायाला कोठून शक्ति
मान होईल? ५ मग त्याने त्यांस विचारिलें। तुह्माजवळ किती
भाकरी आहेत? तेव्हां त्यानी ह्मटलें। सात॥ ६ नंतर त्या
ने समुदायाला भूमीवर बसायाची आज्ञा दिल्ही। आणि त्या
ने त्या सात भाकरी घेऊन। आभार मानल्यावर। मोडिल्या।
आणि वाढायासाठीं आपल्यां शिष्यांस दिल्या। मग त्यानी
समुदायापुढें वाढिल्या॥ ७ आणि त्यांजवळ लाहान मासे थोडके
असतांना। त्याने स्तुती केल्यावर तेही पुढें वाढायास सांगी
तलें॥ ८ तेव्हां त्यानी खाल्लें। आणि ते तृप्त जाले। नंतर
त्यानी उरलेल्यां तुकड्यांच्या सात टोपल्या उचलिल्या॥ ९ ते
व्हां ज्यानी खाल्लें। ते सुमारें चार हजार होते। मग त्याने
त्यांस निरोप दिल्हा ※

१० आणि तेव्हांच तो आपल्यां शिष्यांबराबर तारवावर
चढून। दाल्मानुथ्याच्यां भागांत आला॥ ११ तेव्हां फारिशी नि
घाले। आणि त्याशीं विचारूं लागले। त्यानी त्याची परिक्षा पा
हातां। त्याजवळ आकाशांतून साक्षात्कार मागीतला॥ १२ म
ग तो आपल्या आत्म्यांत फार सुस्कारून ह्मणतो। ही पिढी सा
क्षात्कार कशाला शोधिती? मी तुह्मास खचीत ह्मणतों। या
पिढीस साक्षात्कार दिल्हा जाणार नाहींच॥ १३ नं
तर तो त्यांस सोडून। फिरोन तारवावर चढून। पलीकडे
गेला ※

१४ तेव्हां ते भाकरी घ्यावयास विसरले होते। आणि
येक्या भाकरीवांचून त्यांजवळ तारवांत [कांहीं] नव्हतें॥
१५ मग त्याने त्यांस सांगी करून ह्मटलें। संभाळा। फारि
स्यांचें फुगवण व हेरोदाचें फुगवण यांविषई न्याहाळा॥ १६ ते
व्हां ते आपणांमध्यें विचार करून ह्मणाले। आह्माजवळ भा
करी नाहींत यास्तव॥ १७ परंतु येशू जाणून त्यांस ह्मणतो।
तुह्माजवळ भाकरी नाहींत। यास्तव तुह्मी विचार कां करि
तां? अद्याप तुह्मी ध्यानांत न आणितां? आणि न समजतां
कीं काय? आझून तुह्मी आपलें हृदय घट्ट जालेलें राखितां
कीं काय? १८ तुह्मास डोळे असतां। तुह्मी न पाहातां?
आणि तुह्मास कान असतां। तुह्मी न ऐकतां? आणि आ
ठवण न करितां कीं काय? १९ जेव्हां त्या पांच हजारांसाठीं पां
च भाकरी मोडिल्या। तेव्हां तुह्मी तुकड्यांच्या किती भरल्या
करंड्या उचलिल्या? ते त्याला ह्मणतात। बारा। २० आ
णि जेव्हां चार हजारांसाठीं सात, तेव्हां तुह्मी तुकड्यांच्या
किती टोपल्याभर उचलिले? २१ मग ते बोलिले। सात।
नंतर तो त्यांस बोलिला। तुह्मी कसें न समजतां? ※

२२ मग तो बेथसाइद्यास येतो। तेव्हां ते त्याजवळ आं
धळ्याला आणितात। आणि त्याने त्याला शिवावें। ह्मणोन त्या
ची काकुळती करितात॥ २३ नंतर त्याने आंधळ्याचा हात
धरून त्याला गांवाबाहेर नेलें। मग त्याच्यां डोळ्यांत थुंकून,
आणि त्यावर आपले हात ठेवून, त्याला विचारिलें, कांहीं
दिसतें कीं काय? २४ तेव्हां तो वर पाहून बोलिला, माण
सें, झाडांसारिखीं, चालतां दिसतात॥ २५ नंतर त्याने त्याच्यां
डोळ्यांवर हात फिरोन ठेविले। आणि त्याला वर पाहाविलें।
तेव्हां तो यथास्थित जाला। आणि अवघें त्याला स्पष्ट दिसलीं॥
२६ मग तो त्याला त्याच्या घरास पाठवितां बोलिला, त्यां गां
वांत न जावें, आणखी गांवांतील कोणाला न सांगावें ※

२७ तेव्हां येशू आपल्यां शिष्यांसुद्धां फिलीप्पसाच्या का

दूसऱ्याच्यां गांवांत गेला । आणि वाटेंत त्याने आपल्यां शिष्यांस
विचारितां त्यांस ह्मटलें। माणसें मला कोण ह्मणतात ? २८ मग
त्यांनी उत्तर दिल्हें। [कीं] योहान्न बाप्तीस्मा करणारा।
परंतु दुसरे। एलीया। आणि दुसरे। भविष्यभाष्यांमधी
ल येक। [असें ह्मणतात ॥] २९ नंतर तो त्यांस ह्मणतो। प
रंतु तुह्मी मला कोण ह्मणतां ? तेव्हां पेत्रस उत्तर देतां त्या
ला ह्मणतो। तूं तो ख्रीस्त आहेस ॥ ३० मग त्याने त्यांस हड
सून ह्मटलें। कीं आपणाविषईं कोणाला न सांगावें ※

३१ तेव्हां तो त्यांस शिकवूं लागला। कीं मनुष्याच्या पुत्रा
ला बहुत सोसणीं। आणि पुरातन व मुख्य उपाध्ये व पंडित
यांकडून अव्हेरिलें जाणें। आणि जिवें मारिलें जाणें। आणि तीन
दिवसांनंतर फिरोन उठणें लागतें ॥ ३२ आणि त्याने ती गो
ष्ट उघडी सांगीतली ॥ मग पेत्रस त्याला जवळ घेऊन निषेधूं
लागला ॥ ३३ परंतु तो मुरडून आणि आपल्यां शिष्यांस पा
हून। पेत्रसाला निषेधितां बोलिला। अरे साटाना। माझ्या मा
गें जा। कां कीं तूं देवाचीं जीं यांस नाहींस। परंतु मनुष्यांचीं
जीं त्यांस चिंतितोस ※

३४ आणि त्याने। आपल्यां शिष्यांसुद्धां समुदायास जवळ बो
लावल्यावर। त्यांस ह्मटलें। जो कोणी माझ्या मागें यावें ह्म
णोन इछितो। तो आपल्या आपणाला नकारो। आणि आपला
मरणखांब उचलो। मग माझ्या मागें येवो ॥ ३५ कां कीं। जो जो
आपला जीव राखायास इछितो। तो त्याला गमावील। परंतु
जो जो माझ्या आणि सुवर्तमानाच्या साठीं आपल्या जिवाला
गमावील। तोच त्याला राखील ॥ ३६ तर। माणुस सगळी पृ
थ्वी जर मिळवील। आणि आपल्या प्राणाची हानी पावेल।
तर त्याला काय हीत होईल ? ३७ अथवा माणुस आपल्या
प्राणाचा पालट काय देईल ? ३८ कां तर। या व्यभिचारी
ण व पापीष्ट पिढीमध्यें। जो जो मजविषईं। आणि माझ्या
गोष्टीविषईं लाजेल। त्या त्याविषईं मनुष्याचा पुत्रही। जेव्हां आ

पल्यां पवित्र दुतांसुद्धां। आपल्या बापाच्या गौरवांत येईल।
तेव्हां लाजेल ॥

पर्व ९ ॥ १ आणि त्याने त्यांस ह्मटलें। मी तुह्मास खचीत
ह्मणतों। कीं जे येथे उभे राहातात। यांतील असे कोणी आ
हेत। कीं देवाचें राज्य पराक्रमाने आलेलें पाहातील। तोंपर्यंत
मरण चाखणारच नाहींत ॥ २ आणि साहा दिवसांनंतर।
येशू पेत्रसाला व याकोबाला व योहान्नाला जवळ घेतो। आ
णि त्यांस मात्र येकीकडे। उंच डोंगरावर नेतो॥ तेव्हां त्या
चें रूप त्यांच्या समोर पालटलें। ३ आणि त्याचीं वस्त्रें लख
लखीत। बर्फासारिखीं फार पांढरीं जालीं। कीं पृथ्वीवरील पं
रीटाच्याने येवढीं पांढरीं करवत नाहींत॥ ४ तेव्हां मोशासु
द्धां एलीया त्यांस दिसला। आणि हे येशूशीं बोलत होते॥ ५ नं
तर पेत्रस त्यावर बोलतां येशूला ह्मणाला। हे गुरू। आह्मास
येथे असणें बरें आहे। तर आह्मी येथे तीन मंडप क
रूं। तुझ्या साठीं येक। आणि मोशासाठीं येक। आणि एलीया
साठीं येक। ६ कां की। काय बोलावें। हें त्याला कळलें नव्हतें।
कारण। ते भयाभीत होते॥ ७ तेव्हां त्यांवर सावली करणा
रा ढग जाला। आणि ढगांतून वाणी आली। कीं हा मा
झा प्रिय पुत्र आहे। ह्याचें तुह्मी ऐका॥ ८ मग त्यांनी अ
कस्मात अवलोकन करून आणखीं कोणाला न पाहिलें। केवळ
आपणांबराबर येशू येकला पाहिला॥ ९ मग ते डोंगरावरून
उतरल्यावर। याने त्यांस सांगी केली। कीं आपण जीं पाहिलीं
तीं कोणाला कथन न करावीं। केवळ जेव्हां मनुष्याचा पुत्र मेलेल्यां
मधून फिरोन उठला होईल तेव्हां॥ १० नंतर त्यांनी आप
णांजवळ ती गोष्ट धरितां संवाद केला। कीं तें मेलेल्यांमधून
फिरोन उठणें काय आहे? ॥ ११ तेव्हां ते त्याला पुसून बो
लिले। कीं पंडित कां ह्मणतात? कीं एलीयाला पहिलें येणें
लागतें॥ १२ नंतर त्याने उत्तर देतां त्यांस सांगीतलें। एलीया
पहिल्याने येऊन अवघीं यथास्थीत करितो खरें। आणि मनु

त्याच्या पुत्राविषईं कसें लिहिलें आहे। कीं याने बहुत सोसावीं
आणि तुछ केलें जावें। हेंहि सांगीतलें।] १२ आणखी मी
तुह्मास ह्मणतों। कीं एलीया आलाच आहे। आणि त्याविषईं
जसें लिहिलें आहे। तसें त्यानी। जितकीं इछिलीं। तितकीं त्या
ला केलीं आहेत ॥
१४ नंतर त्याने। शिष्यांजवळ येऊन। त्यांच्या भोंवत्या मो
ठ्या समुदायाला, आणि त्यांशीं संवाद करित्यां पंडितांस पाहि
लें॥ १५ तेव्हां सगळा समुदाय त्याला पाहातांच फार थक
जाला। आणि त्यानी। जवळ धांवून। त्याशीं क्षेमगोष्टी केल्या॥
१६ मग त्याने पंडितांस विचारिलें। तुह्मी त्यांशीं काय संवा
द करितां? १७ तेव्हां समुदायांतून कोणी उत्तर देतां बो
लिला। हे गुरू। म्या आपल्या पुत्राला तुह्मा जवळ आणि
लें। याला भूत लागलें आहे। १८ आणि जेथे जेथे तें त्या
ला धरितें। तेथे तेथे ह्याला आपटितें। आणि हा फेंस टा
कितो। आणि आपल्या दांतांस करकरवितो। आणि कोमून
जातो। तर तुह्मा शिष्यानी त्याला घालवावें। ह्मणोन म्या त्यां
स सांगीतलें, परंतु त्यांची शक्ती न चालली॥ १९ तेव्हां तो
त्याला उत्तर देतां ह्मणतो। हे अविश्वासी पिढी। कोठपर्यंत
मी तुह्माबराबर असूं? कोठपर्यंत तुमचें सोसूं? त्याला मज
वळ आणा॥ २० मग त्यानी त्याला याच्या जवळ आणिलें।
नंतर याला पाहून। तेव्हांच त्या आत्म्याने त्याची ओढाताण
केली। आणि तो भूमीवर पडून। फेंस टाकितां लोळला॥ २१ ते
व्हां याने त्याच्या बापाला पुसलें। हें त्याला प्राप्त जालें। ते
व्हांपासून किती काळ जाला? आणि त्याने ह्मटलें। बाळपणा
पासून। २२ आणि त्याने याचा नाश करावयास याला ब
हुत वेळा अग्नींत व पाण्यांत पाडिलें आहे। परंतु तुह्माने
जर आह्मासाठीं कांहीं करवतें। तर आह्मावर करुणा करि
तां आह्मास साह्य हो॥ २३ तेव्हां येशू त्याला बोलिला। कीं
जर तुह्माने विश्वासवतें। तर विश्वासणाराला सगळीं शक्य [आ

होत ॥] २४ आणि तेव्हांच त्या मुलाचा बाप वोरडतां। अश्रुपात
करून बोलिला। हे प्रभू। मी विश्वासतों। माझ्या अविश्वासावि
षईं साह्य कर॥ २५ तेव्हां लोक येकत्र धांवते। हें ये
शू पाहून। त्या अपवित्र आत्म्याला धमकावतां त्याला बोलिला।
अरे मुक्या व बहिऱ्या आत्म्या। मी तुला आज्ञा देतों। ह्
यांतून निघ। आणि आतांपासून यांत न शिरावें॥ २६ ते
व्हां तो वोरडून आणि त्याला फार ओढाताण करून निघाला॥
नंतर तो येवढा मेल्यासारिखा जाला। कीं तो मरून गेला।
ह्मणोन बहुतानी ह्मटलें होतें॥ २७ तेव्हां येशूने त्याला हातें
धरून त्याला उठविलें। आणि तो उभा राहिला॥ २८ मग तो
घरांत गेल्यावर। त्याच्या शिष्यानी त्याला येकीकडे पुसलें।
आमच्यानी त्याला कां न घालवलें? २९ तेव्हां तो त्यांस बो
लिला। प्रार्थना आणि उपास यांवांचून। हा प्रकार कशाक
डून निघवत नाहीं ॥

३० नंतर ते तेथून निघून पुढें गालीलावरून गेले। आ
णि कोणी जाणावें, हें त्यानी इछिलें नाहीं॥ ३१ कां कीं।
त्याने आपल्यां शिष्यांस उपदेशितांना त्यांस ह्मटलें। कीं म
नुष्याचा पुत्र मनुष्यांच्यां हातांत परस्वाधीन केला जातो। आ
णि ते त्याला जिवें मारतील। आणि तो जिवें मारल्यावर।
तिसऱ्या दिवशीं फिरोन उठेल॥ ३२ परंतु त्यानी ही गोष्ट
न जाणली। आणि ते त्याला विचारण्यास भ्याले ॥

३३ तेव्हां तो कापेर्णाहूमांत आला। आणि घरांत अस
तां याने त्यांस विचारिलें। तुह्मी वाटेंत आपणांमध्यें काय सं
वाद केला? ३४ परंतु ते उगे राहिले। कां कीं। कोणता
श्रेष्ठ। याविषईं त्यानी वाटेंत आपणांमध्यें विवाद केला हो
ता॥ ३५ तेव्हां त्याने बसून त्यां बारांस बोलाविलें। आणि
त्यांस तो ह्मणतो। जर कोणी प्रथम व्हावें ह्मणोन इछितो।
तर तो सर्वांचा शेवटला। आणि सर्वांचा सेवक होईल॥
३६ आणि त्याने बाळक घेऊन त्यांच्या मध्यें त्याला ठेविलें।

नंतर त्याला आपल्यां हातांवर धरून। त्यांस ह्मटलें। ३७ ज
र कोणी अशां बाळकांतील येकाला माझ्या नांवावर अंगि
कारील। तर तो मला अंगिकारितो। आणि जर कोणी
मला अंगिकारील। तर तो मला नव्हे। परंतु ज्यानें मला
पाठविलें। त्याला अंगिकारितो ※

३८ तेव्हां योहान त्याला उत्तर देतां बोलिला। हे गुरू।
कोणी जो आह्मास अनुसरत नाहीं। त्याला तुझ्या नांवानें भूतां
स घालवितां आह्मी पाहिलें। आणि तो आह्मास अनुसरत नाहीं।
यास्तव आह्मी त्याला मना केलें॥ ३९ परंतु येशू बोलिला।
त्याला मना करूं नका। कारण कीं जो माझ्या नांवावर चम
त्कार करील। आणि सहज माझ्या विरुद्ध बोलुं शकेल। असा
कोणी नाहीं? ४० कां कीं। जो आह्माविरुद्ध नाहीं। तो आ
मच्या कडचा आहे॥ ४१ आणखी। तुह्मी ख्रीस्ताचे आहां। ह्म
णोन जो जो माझ्या नांवानें तुह्मास पाण्याचा प्याला प्यायास
देईल। मी तुह्मास खचीत ह्मणतों। तो आपलें फळ मुकणारच
नाहीं॥ ४२ आणि हे धाकटे जे मजवर विश्वासतात। यांतील
येकाला कोणी अडखळवावें। यापेक्षां जर त्याच्या गळ्यांत
जात्याची तळी बांधली असती। आणि त्याला समुद्रांत टाकलें अ
सतें। तर हें त्याला बरें आहे॥ ४३, ४४ आणि जर तुझा हात
तुला अडखळवितो। तर त्याला खांडुन काढ। दोन हात असतां। नि
घून। नर्कांत। [ह्मणजे] न विझवत्या अग्नींत। जेथें त्यांचा किडा मरत
नाहीं। आणि अग्नी विझत नाहीं। तेथें जाणें। यापेक्षां व्यंग [हो
ऊन] जीवनांत जाणें। हें तुला बरें आहे॥ ४५, ४६ आणि जर तु
झा पाय तुला अडखळवितो। तर त्याला खांडुन काढ। दोन
पाय असतां। नर्कांत। [ह्मणजे] न विझवत्या अग्नींत। जेथें त्यांचा
किडा मरत नाहीं। आणि अग्नी विझत नाहीं। तेथें टाकलें जाणें।
यापेक्षां व्यंग [होऊन] जीवनांत जाणें। हें तुला बरें आहे॥ ४७
४८ आणि जर तुझा डोळा तुला अडखळवितो। तर त्याला
काढून टाक। दोन डोळे असतां। अग्नीच्या नर्कांत। जेथें त्यांचा कि

डा मरत नाहीं। आणि अग्नी विझत नाहीं। तेथें टाकलें जाणें।
याहून येक डोळ्याचा [होऊन] देवाच्या राज्यांत जाणें। हें
तुला बरें आहे॥ ४९ कां कीं। अग्नीने प्रत्येक खारट केला जा
ईल। आणि प्रत्येक बळदान मिठाने खारट केलें जाईल॥ ५० मी
ठ चांगलें आहे। परंतु मीठ जर खारटपणहीन जालें असेल,
तर त्याला कशाने खारट कराल? तुह्मी आपणांसीं मीठ रा
खा। आणि येकमेकांसीं शांत असा ※
पर्व १० ॥ १ आणि तो तेथुन उठून। यार्देनेच्या पलीकडल्या
वरून यहूदाच्या सिमांत येतो। तेव्हां फिरोन समुदाय त्याच्या
जवळ मिळतात, आणि त्याने आपल्या वहिवाटीप्रमाणे त्यांस
फिरोन उपदेशिलें॥ २ तेव्हां फारिशी जवळ येऊन। त्याला प्र
चितोष घालतां त्यांनी त्याला विचारिलें। बायकोला सुटका देणें।
हें पुरुषास योग्य आहे कीं काय? ३ मग तो उत्तर देतां त्यां
स बोलिला। मोशाने तुह्मास काय आज्ञा दिल्ही? ४ तेव्हां ते
बोलिले। मोशाने सांडण्याचें पत्र लिहूं। आणि [तिला]
सोडुं दिल्हें॥ ५ नंतर येशू उत्तर देतां त्यांस बोलिला। तुम
च्या हृदयाच्या कठीणपणामुळें। तुह्मासाठीं त्याने ती आज्ञा लि
हिली होती॥ ६ परंतु उत्पत्तीच्या प्रारंभापासून। देवाने त्यांस
पुरुष व स्त्री असीं उत्पन्न केलीं॥ ७ ह्यावरून पुरुष आपल्या
बापाला व आईला सोडील, आणि आपल्या बायकोसीं लकटेल।
८ मग तीं दोघें येक मास होतील। अशाने तीं त्यापुढें दो
घें नाहींत। परंतु येक मास आहेत॥ ९ यास्तव देवाने जें ये
कवट जोडिलें। तें माणुस न तोडो॥ १० मग त्याच्या शिष्यांनी
त्याविषईं त्याला घरांत फिरोन पुसलें॥ ११ तेव्हां तो त्यांस
ह्मणतो। जर कोणी आपल्या बायकोला सोडील। आणि दु
सरीसीं लग्न करील। तर तो तीजविरुद्ध व्यभिचार करितो॥
१२ आणि जर बायको आपल्या नवऱ्याला सोडील, आणि
दुसऱ्यासीं वऱ्हाडेल। तर ती व्यभिचार करिती ※
१३ आणि त्यांनी त्याच्या जवळ लेंकरें यासाठीं आणिलीं। कीं

त्याने त्यांस शिवावें। परंतु ज्यांनी आणिलीं। त्यांस शिष्या
नी निषेधिलें॥ १४ तेव्हां येशू पाहून संतापीत जाला। आ
णि त्यांस बोलिला। लेंकरांस मजवळ येउं द्या। आणि त्यां
स वर्जु नका। कां कीं। देवाचें राज्य अशांचें आहे॥ १५ मीं
तुह्मास खचीत ह्मणतों। जर कोणी लेंकरासारिखें देवाचें रा
ज्य न घेईल। तर तो त्यांत जाणारच नाहीं॥ १६ तेव्हां त्या
ने त्यांस उराशीं घेऊन। त्यांवर [आपले] हात ठेवून। त्यांस
आशिर्वाद दिल्हा॥

१७ मग तो वाटेंत बाहेर जात असतां। कोणी धांवत येऊ
न। आणि त्याजवळ गुडघे टेंकून। त्याला विचारिलें। हे उ
त्तम गुरू। म्या सर्वकाळीक जीवनाचें उपार्जन पावावें। ह्मणो
न काय करावें? १८ तेव्हां येशू त्याला बोलिला। तूं मला उ
त्तम कां ह्मणतोस? येक जो देव। त्यावांचून कोणी उत्तम नाहीं॥
१९ ह्या आज्ञा तुला कळल्या। [कीं] त्वां व्यभिचार न क
रावा। हत्या न करावी। चोरी न करावी। खोटी साक्ष न द्यावी।
न नाडावें। तूं आपला बाप आणि आई। यांचा सन्मान कर॥
२० तेव्हां तो उत्तर देतां त्याला बोलिला। हे गुरू। म्या
आपल्या बाळपणापासून हीं सर्व पाळिलीं आहेत॥ २१ ते
व्हां येशूने। त्याला पाहून। त्यावर प्रीती केली। आणि त्या
ला ह्मटलें। येक तुला उणें आहे। जा। तुझीं जितकीं आहे
त। तीं वीक। आणि दरिद्र्यांस दे। मग आकाशांत तुला संप
त्त होईल। नंतर मरणखांब उचलून। इकडे। माझ्या मागें
चाल॥ २२ तेव्हां तो त्या गोष्टीवरून म्लान होत असतां। खेद
पावून निघाला। कारण कीं। त्याचीं द्रव्यें बहुत होतीं॥
२३ तेव्हां येशू। भोंवतीं पाहून। आपल्यां शिष्यांस ह्मणतो।
ज्यांचीं द्रव्यें आहेत। ते देवाच्या राज्यांत केवळ्या विकटपणाने
जातील? २४ मग शिष्य। त्याच्यां गोष्टींवरून विस्मीत
जाले। तेव्हां येशू फिरोन उत्तर देतां त्यांस ह्मणतो। लेंकरां
हो। जे द्रव्यांचा भरोसा धरितात। त्यांस देवाच्या राज्यांत जा

णें, हें केवढें विकट आहे? २५ धनवानाला देवाच्या रा
ज्यांत जाणें। याहून उंटाला सुईच्या नेढ्यांतून जाणें। हें
सोपें आहे॥ २६ तेव्हां ते अत्यंत चकीत होऊन। आपणांम
ध्यें बोलिले। तर तारला जाण्यास कोण शकतो? २७ मग
येशू त्यांस पाहून ह्मणतो। माणसांस अशक्य आहे। परंतु
देवास नाहीं। कां तर। देवाला अवघीं शक्य आहेत ※
२८ तेव्हां पेत्रस त्याला बोलुं लागला। पाहा। आह्मी अवघीं
सोडिलीं। आणि तुझ्या मागें आलों आहों॥ २९ नंतर येशू उत्त
र देतां बोलिला। मी तुह्मास खचीत ह्मणतों। ज्याने घर।
किंवा भाऊ। किंवा बहिणी, किंवा बाप। किंवा आई। किंवा
बायको। किंवा लेंकरें। किंवा शेतें, हीं मजकरितां व सुवर्तमाना
करितां सोडलीं। ३० [आणि] शंभरपट। सध्या। ह्या काळीं। पाठ
लागांसुद्धां। घरें। व भाऊ। व बहिणी। व आया। व लेंकरें। व
शेतें। आणि येत्या लोकीं सर्वकाळीक जीवन, हीं पावल्यावांचून हो
ईल, असा कोणी नाहीं॥ ३१ परंतु बहुत पहिले। हे शेव
टले। आणि शेवटले। हे पहिले होतील ※

३२ आणि ते। वाटेंत। यरूशलेमास चढत होते। तेव्हां येशू
त्यांच्या पुढें जात होता। आणि ते विस्मीत जाले। व मागें चालत
असतां भ्याले॥ तेव्हां तो फिरोन त्या बारांस जवळ घेऊन। आ
पणाला जें प्राप्त होणार होतें। तें त्यांस सांगुं लागला।
३३ कीं पाहा। आह्मी यरूशलेमास चढतों। आणि मनुष्याचा
पुत्र मुख्य उपाध्यांच्या व पंडितांच्या स्वाधीन केला जाईल। आ
णि ते त्याला मरणदंड ठरवितील। आणि त्याला परराष्ट्रां
च्या स्वाधीन करितील॥ ३४ आणि ते त्याची टवाळी करितील।
आणि त्याला मार देतील। आणि त्यावर थुंकतील। आणि त्या
ला जिवें मारितील। मग तो तिसऱ्या दिवशीं फिरोन उठेल ※

३५ आणि जेबेदीचे पुत्र, याकोब व योहान्न। हे त्याच्या
जवळ येऊन बोलतात। हे गुरू। जें आह्मी मागूं। तें तूं आह्मासा
ठीं करावें ह्मणोन इच्छितों॥ ३६ तेव्हां तो त्यांस बोलिला। ह्या

तुह्मासाठीं काय करावें ह्मणोन इछितां? ३७ नंतर ते
त्याला बोलिले। आह्मी तुझ्या गौरवामध्यें। येकाने तुझ्या उ
जव्याकडे। आणि येकाने तुझ्या डाव्याकडे बसावें। असें आह्मा
स दे॥ ३८ परंतु येशू त्यांस बोलिला। तुह्मी काय मागतां।
तें तुह्मास कळलें नाहीं॥ जो प्याला मी पितों। तो तुह्मी
प्यावा। आणि ज्या बाप्तीस्म्याने मला बाप्तीस्मा घातला जातो।
त्याकडून तुह्मास बाप्तीस्मा घातला जावा। ह्मणोन तुह्मी शक
तां कीं काय? ३९ तेव्हां ते त्याला बोलिले। आह्मी शक
तों॥ मग येशू त्यांस बोलिला। जो प्याला मी पितों, तो तु
ह्मी प्याल खरें। आणि ज्या बाप्तीस्म्याने मला बाप्तीस्मा घात
ला जातो। त्याकडून तुह्मास बाप्तीस्मा घातला जाईल। ४० परं
तु माझ्या उजव्याकडे आणि माझ्या डाव्याकडे बसणें। हें ज्यांसाठीं
सिद्ध केलें। त्यांवेगळ्यांस देणें माझें नाहीं॥ ४१ तेव्हां ते दा
हा ऐकून। याकोब व योहान्न यांवर। संतप्त होऊं लागले॥
४२ परंतु येशू। त्यांस जवळ बोलावून। त्यांस ह्मणतो। जे पररा
ष्ट्रांची सत्ता करूं इछितात। ते त्यांचें अती धनीपण करितात।
आणि त्यांचे जे थोर। ते त्यांचा अती अधिकार करितात॥
४३ तथापि तुह्मामध्यें असें होणार नाहीं। परंतु जर को
णी तुह्मामध्यें थोर व्हावा ह्मणोन इछील। तो तुमचा सेवक
होईल। ४४ आणि जो कोणी तुमचा प्रथम व्हावा ह्मणोन
इछील। तो सर्वांचा चाकर होईल॥ ४५ कां कीं। माणसा
चा पुत्रही सेविला जाण्यास आला नाहीं। परंतु सेवा करण्या
स। आणि बहुतांसाठीं खंडणी। आपला जीव देण्यास
[आला] ※

४६ आणि यरीहोस येतात। मग तो, आपले शिष्य व
मोठा समुदाय यांसुद्धां। यरीहोपासून बाहेर जातां, तीमी
याचा पुत्र जो आंधळा बार्तीमी। तो वाटेजवळ भीक माग
त बसला॥ ४७ आणि। येशू नाजोरी आहे। असें ऐकू
न। तो ओरडतांना बोलूं लागला। हे येशू। दावीदाच्या सं

ताना, मजवर दया कर ॥ ४८ तेव्हां त्याने उगें राहावें, ह्म
णोन बहुतानी त्याला दडसून सांगीतलें। परंतु तो फार
अधीक वोरडला, हे दावीदाच्या संताना, मजवर दया क
र॥ ४९ तेव्हां येशूने उभा राहून त्याला बोलावायास सांगी
तलें॥ मग ते त्या आंधळ्याला बोलावून, त्याला ह्मणतात।
धीर धर। उठ। तो तुला बोलावतो॥ ५० नंतर तो आ
पलें वस्त्र टाकून। उठून येशूजवळ आला॥ ५१ तेव्हां येशू
उत्तर देतां त्याला ह्मणतो, म्या तुजसाठीं काय करावें ह्म
णोन इछितोस? मग तो आंधळा त्याला बोलिला। माझ्या स
द्गुरु। मला दिसणें प्राप्त व्हावें ह्मणोन॥ ५२ तेव्हां येशू
त्याला बोलिला। जा। तुझ्या विश्वासाने तुला तारिलें आहे॥
मग त्याला तेव्हांच दिसलें। आणि तो वाटेने येशूच्या मागें
चालला ※

पर्व ११ ॥ १ आणि ते यरूशलेमाजवळ। बेथफागे व बेथानी
तेथवर। जाइतझाडांच्या डोंगरास आल्यावर, तो आप
ल्यां शिष्यांतून दोघांस पाठवितांना, २ त्यांस ह्मणतो, तुमच्या
समोरच्या गांवास जा। आणि त्यांत जातां, तेव्हांच बांधलेलें
शिंगरूं। ज्यावर कोणी माणुस बसलें नाहीं, तें तुह्मास सां
पडेल। त्याला सोडून आणा॥ ३ आणि जर कोणी तुह्मास
ह्मणेल। तुह्मी हें कां करितां? तर ह्मणा, कीं प्रभूला ह्या
चें अगत्य आहे। आणि तेव्हांच तो त्याला येथे पाठवील॥
४ तेव्हां ते निघाले, आणि बाहेर, दारासीं, वाट संग
मावर बांधलेलें शिंगरूं त्यांस सांपडलें। तेव्हां ते त्याला सो
डितात॥ ५ आणि तेथील उभ्यां राहाणाऱ्यांतील कित्येक त्यां
स बोलिले। तुह्मी शिंगरूं सोडून काय करितां? ६ मग ज
सी येशूने आज्ञा दिल्ही। तसें ह्मानी त्यांस सांगीतलें। तेव्हां
त्यानी ह्मांस जाऊं दिल्हें॥ ७ नंतर ह्मानी शिंगरूं येशूजवळ
आणिलें, आणि त्यावर आपलीं वस्त्रें घातलीं। मग तो त्या
वर बसला॥ ८ तेव्हां बहुतानी आपलीं वस्त्रें वाटेस पस

रलों। आणि दुसऱ्यांनी झाडांपासून डाहाळ्या तोडिल्या। आ
णि वाटेस पसरल्या॥ ९ आणि पुढील चालणारे। व मागी
ल चालणारे मोठ्याने बोलिले। तारणविनंती। जो प्रभूच्या नांवा
ने येतो। तो आशिर्वादीत [असो॥] १० आमचा पितर दा
वीद। याचें राज्य। जें प्रभूच्या नांवानें येतें। तें आशिर्वादी
त [असो।] सर्वांहून उंचांमध्यें, तारणविनंती॥ ११ नंतर ये
शू यरूशलेमांत। मग देवळांत आला। आणि अवघ्यांस अ
वलोकून इतक्यांत संध्याकाळ जाला असतां। तो त्यां बारांस
ह्वां निघून बेथानीस गेला॥

१२ आणि दुसऱ्या दिवशीं। ते बेथानीपासून बाहेर येत
असतां। त्याला भूक लागली॥ १३ तेव्हां दूरून अंजिरझा
ड। ज्यावर पानें होतीं। त्याला पाहून। कदाचीत आपल्या
ला त्यावर कांहीं मिळेल ह्मणोन आला। परंतु त्याजवळ ये
ऊन। पानांवांचून कांहीं त्याला सांपडलें नाहीं। अंजिरांचा सम
य तरीं जाला नव्हता॥ १४ तेव्हां येशू यावर बोलतां त्या
ला ह्मणाला। आतांपासून सर्वकाळापर्यंत। कोणी तुजपासून फ
ळ न खावें। आणि त्याच्या शिष्यांनी ऐकिलें॥ १५ मग ते
यरूशलेमास येतात। आणि येशू देवळांत येऊन। जे देवळां
त विकीत। आणि विकत घेत होते। त्यांस बाहेर घालवूं ला
गला। आणि नाणावटींचे चौरंग व खबुत्रें विकणाऱ्यांच्या बैठ
की। यांस त्याने उलथें केलें। १६ आणि कोणी देवळामधून भां
डें न्यावें ह्मणोन दिल्हें नाहीं॥ १७ आणि तो उपदेशितां
त्यांस बोलिला। माझें घर अवघ्यां राष्ट्रांसाठीं प्रार्थनेचें घर
ह्मटलें जाईल। असें लिहिलें नाहीं कीं काय? परंतु तुह्मी
त्याला लुटाऱ्यांची गुहा केली आहे॥ १८ तेव्हां पंडित व मु
ख्य उपाध्ये यांनी ऐकिलें। आणि त्याचा घात कसें करावें ह्म
णोन शोधिलें। तर ते त्याला भ्याले। कारण कीं सर्व लोक
त्याच्या उपदेशावरून थक्क जाला॥ १९ नंतर सांज जाल्यावर
तो नगरांतून बाहेर गेला॥ २० आणि सकाळीं ते जवळून

जात असतां। तें अंजिरझाड मुळांपासून वाळलेलें त्यानी
पाहिलें॥ २१ तेव्हां पेत्रस आठवून। त्याला म्हणतो। मा
झ्या गुरू। पाहा। अंजिरझाड। ज्याला त्वां शाप दिल्हा।
तें वाळलें आहे॥ २२ मग येशू उत्तर देतां त्यांस म्हणतो।
देवावरचा विश्वास राखा॥ २३ कारण। मी तुम्हास खचीत म्ह
णतों। कीं जो जो ह्या डोंगराला म्हणेल। तूं ढळला हो। व
समुद्रांत टाकला जा। आणि आपल्या ह्रदईं संशय न धरी
ल। परंतु जीं आपण म्हणतो। तीं होतात। असा विश्वास ध
रील। तर जें जें म्हणेल। तें तें त्याला होईल॥ २४ ह्या
साठीं मी तुम्हास म्हणतों। अवघीं जितकीं तुम्ही प्रार्थना करि
त मागतां। तितकीं पावतां। म्हणोन विश्वास धरा। मग तुम्हास
होतील॥ २५ आणि जेव्हां तुम्ही प्रार्थना करीत उभे राहातां।
तेव्हां जर तुम्हास कोणाच्या विरुद्ध कांहीं आहे। तर तें या
साठीं सोडा। कीं तुमचा बाप। जो आकाशांमध्यें। याने तुमचीं
पातकें तुम्हास सोडावीं॥ २६ परंतु जर तुम्ही न सोडितां।
तर तुमचा बाप। जो आकाशांमध्यें। तोही तुमचीं पातकें सो
डणार नाहीं ॥

२७ मग ते फिरोन यरूशलेमांत येतात॥ नंतर तो देव
ळांत चालत असतां। मुख्य उपाध्ये व पंडित व पुरातन। हे
त्याजवळ येतात। २८ आणि त्याला म्हणतात। तूं कोणत्या
अधिकाराने हीं करितोस? आणि त्वां हीं करावीं। म्ह
णोन हा अधिकार तुला कोणी दिल्हा? २९ तेव्हां येशू उ
त्तर देतां त्यांस बोलिला। मीही तुम्हास येक गोष्ट विचारी
न। आणि तुम्ही मला उत्तर द्या। मग मी कोणत्या अधि
काराने हीं करितों। हें तुम्हास सांगेन॥ ३० योहान्नाचा बा
प्तिस्मा। हा आकाशापासून? किंवा माणसांपासून जाला? तुम्ही
मला उत्तर द्या॥ ३१ तेव्हां ते आपणांमध्यें विचार करून।
बोलिले। जर आम्ही। आकाशापासून। [असें] बोलूं। तर तो
म्हणेल। तुम्ही तर कशामुळें त्यावर विश्वास न ठेविला? ३२ आ

णखी माणसांपासून। जर आह्मी ह्मणूं। तर ते लोकास भ्या
ले। कारण। योहान्न निश्चयें भविष्यभाषी होता। असें सर्वांनी
ही त्याला मानिलें होतें॥ ३३ तेव्हां ते उत्तर देतां येशूला
ह्मणतात। आह्मास कळलें नाहीं॥ मंतर येशू उत्तर देतां त्यांस
ह्मणतो। मीही कोणत्या अधिकाराने हीं करितों। हें तुह्मास
सांगत नाहीं ※

पर्व १२ ॥ १ आणि तो त्यांस दाखल्यांकडून बोलूं लाग
ला। माणसाने द्राक्षमळा लाविला। आणि भोंवतीं कुंपण
घातलें। द्राक्षरसाचें टांकेंही खणलें। आणि माळा बांधिला।
मंतर शेतकऱ्यांस ठरावाने दिल्हा। मग तो प्रवासास गेला॥
२ आणि त्याने शेतकऱ्यांपासून द्राक्षमळ्याच्या फळांतून कांहीं
घ्यावें ह्मणोन। समयीं। शेतकऱ्यांजवळ चाकर पाठविला॥ ३ परंतु
त्यांनी त्याला धरून झोडिलें। आणि रिकामें लावलें॥ ४ मं
तर त्याने फिरोन दुसरा चाकर त्यांजवळ पाठविला। ते
व्हां त्यांनी त्याला धोंडे मारून डोकें घायाळ केलें। आ
णि अपमानिलेला लावला॥ ५ मग त्याने फिरोन दुसरा
पाठविला। आणि याला त्यांनी जिवें मारिलें। मंतर बहुत दु
सरे। यां कित्येकांस तर त्यांनी झोडिलें। आणि कित्येकांस
जिवें मारिलें॥ ६ यास्तव त्याला आझून आपला येक प्रिय
पुत्र असतां। शेवटीं यालाही त्याने त्यांजवळ पाठवितां ह्मट
लें। कीं माझ्या पुत्राची भीड धरितील॥ ७ परंतु ते शेतकरी
आपणांमध्यें बोलिले, कीं हा उपार्जक आहे। या। आपण या
ला जिवें मारूं। मग उपार्जन आमचें होईल॥ ८ ह्मणोन त्या
नी त्याला धरून जिवें मारिलें। आणि द्राक्षमळ्याबाहेर टा
किलें॥ ९ यास्तव द्राक्षमळ्याचा धनी काय करील? तो येईल।
मग शेतकऱ्यांचा नाश करील, आणि द्राक्षमळा दुसऱ्यांस देईल॥
१० काय तुह्मी हा लेख न वाचिला? [कीं] जो धोंडा बांधणारा
नी अव्हेरिला। तोच कोंपऱ्याचा मस्तक जाला आहे। ११ हें प्रभू
करून जालें। आणि आमच्यां दृष्टींत चमत्कारीक आहे॥ १२ ते

व्हां ते त्याला धरायास पाहात होते। परंतु लोकास भ्याले।
कां तर। त्यांस ठाऊक होते। कीं आपणांविरुद्ध त्याने हा दा
खला सांगीतला आहे। असें ते त्याला सोडून निघाले॥
१३ नंतर ते त्याला बोलण्याने झटांत पाडायास फारिशी
व हेरोदी यांतून कित्येकांस त्याच्या जवळ पाठवितात॥ १४ आ
णि हे येऊन त्याला ह्मणतात। हे गुरू। आह्मांस कळलें। कीं
तूं खरा आहेस। आणि कोणाविषईं चिंता राखीत नाहींस।
कां कीं। तूं मनुष्यांच्या तोंडाकडे पाहात नाहींस। परंतु देवा
चा मार्ग खरेपणाने शिकवितोस। कादूसाराला पट्टी देणें। हें
योग्य आहे। किंवा नाहीं? १५ आह्मी द्यावी। किंवा न द्या
वी? तेव्हां तो त्यांचें ढोंग जाणून। त्यांस बोलिला। तुह्मी
मला प्रचीतीस कां पाहतां? म्या पावली पाहावी ह्मणेन मज
वळ आणा॥ १६ नंतर त्यांनी आणिली। तेव्हां तो त्यांस
ह्मणतो। ही आकृती व पत्ता कोणाची? आणि ते त्याला
बोलिले कादूसाराची॥ १७ मग येशू उत्तर देतां त्यांस बो
लिला। जीं कादूसाराचीं। तीं कादूसाराला। आणि जीं देवाचीं।
तीं देवाला भरून द्या। तेव्हां त्यांनी त्याविषईं आश्चर्य केलें॥
१८ नंतर जादूकी। जे ह्मणतात कीं पुनरुठणें नाहीं।
ते त्याजवळ येऊन त्याला विचारितां बोलिले। १९ हे गुरू।
मोश्याने आह्मासाठीं लिहिलें। कीं जर कोणाचा भाऊ मरेल।
आणि आपली बायको मागें ठेवील। परंतु लेंकरें न ठेवील।
तर त्याच्या भावाने त्याची बायको घ्यावी। आणि तिजकडून
आपल्या भावासाठीं बीज उपजवावें॥ २० तर सात भाऊ हो
ते। तेव्हां पहिल्याने बायको घेतली। आणि मरतां बीज ठे
विलें नाहीं॥ २१ मग दुसऱ्याने तिला घेतली। हाही मेला।
परंतु ह्यानेही बीज ठेविलें नाहीं। नंतर तिसऱ्यानेही तसेंच
[केलें॥] २२ आणि त्या सातांनी तिला घेतली। परंतु बी
ज न ठेविलें॥ सर्वांच्या शेवटीं बायकोही मेली॥ २३ यास्तव
पुनरुठण्यांत। जेव्हां उठतील। तेव्हां त्यांमधील ती कोणाची

बायको होईल? त्यां सातांची तरीं ती बायको होती॥ २४ ते
व्हां येशू उत्तर देतां त्यांस बोलिला। ह्यावरून तुह्मी लेख
आणि देवाचा पराक्रम न जाणतां चुकत नव्हां कीं काय? २५ का
रण कीं। जेव्हां ते मेलेल्यांतून फिरोन उठतील। तेव्हां ते लग्ना
ला घेत नाहींत। आणि लग्नाला देतही नाहींत। परंतु आका
शामधील दुतांसारिखे आहेत॥ २६ आणि मेलेल्यांविषईं। तुह्मी
मोशाच्या पुस्तकांत काय न वाचिलें। कीं उठतात? असें देव
त्याशीं झुडपांत बोलून ह्मणाला। मी आब्राहामाचा देव। आ
णि इझाकाचा देव। आणि याकोबाचा देव॥ २७ तो मेलेल्यां
चा देव नव्हे। परंतु जीवंतांचा देव आहे॥ यास्तव तुह्मी फार
चुकतां॥ २८ तेव्हां पंडितांतून येकाने येऊन त्यांचा संवाद
ऐकून। त्याने त्यांस बरें उत्तर दिल्हें हें जाणून। त्याला वि
चारिलें। सर्वांतील प्रथम आज्ञा कोणती? २९ तेव्हां येशूने
त्याला उत्तर दिल्हें। कीं सर्व आज्ञांतील [ही] प्रथम। हे इ
स्राएला। प्रभू जो आमचा देव। तो येक प्रभू आहे॥ ३० आ
णि प्रभू जो तुझा देव। त्यावर तूं आपल्या सगळ्या हृदयाने। आ
णि आपल्या सगळ्या जिवाने। आणि आपल्या सगळ्या बुद्धीने। आ
णि आपल्या सगळ्या बळाने प्रीती कर। हीच प्रथम आज्ञा [आ
हे॥] ३१ आणि दुसरी सारिखी [आहे।] ती ही। तूं जसी आपल्या
वर। तसी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर। यांहून मोठी [असी]
दुसरी आज्ञा नाहीं॥ ३२ तेव्हां पंडित त्याला बोलिला। हे गु
रू। बरें, तूं खरेपणाने बोलिलास। कारण कीं। येक देव आहे।
आणि त्याखेरीज दुसरा नाहीं॥ ३३ आणि सगळ्या हृदयाने।
आणि सगळ्या तर्काने। आणि सगळ्या जिवाने। आणि सग
ळ्या बळाने। त्यावर प्रीती करणें। आणि जसी आपणावर तसी
शेजाऱ्यावर प्रीती करणें। हें अवघे यज्ञ व बळदानें यांहून
अधीक आहे॥ ३४ आणि त्याने ज्ञानेंकरून उत्तर दिल्हें। या
स्तव येशूने त्याकडे पाहून। त्याला ह्मटलें। तूं देवाच्या राज्यापा
सून दूर नाहींस॥ आणि तेव्हांपासून कोणी त्याला प्रश्न करा

यास धजला नाहीं ※ ३५ आणि येशू देवळांत उपदेशीत अ
सतां । उत्तर देतां, ह्मणाला । पंडित कसें ह्मणतात ? कीं ख्रीस्त दा
वीदाचा पुत्र आहे ॥ ३६ कारण कीं । दावीदानें आपण प
वित्र आत्म्याकडुन ह्मटलें । प्रभूनें माझ्या प्रभूला सांगीतलें । [कीं] मी
तुझ्यां वैर्यांस तुझ्यां पायांचें पादासन करीन । तोंपर्यंत तूं मा
झ्या उजव्याकडे बैस ॥ ३७ यास्तव दावीद आपण त्याला प्र
भू ह्मणतो । तर तो त्याचा पुत्र कोठून आहे ? फार लो
कानें तरीं हर्षाकडून त्याचें ऐकिलें ※ ३८ आणि तो आप
ल्या उपदेशांत त्यांस बोलिला । पंडितांविषईं लक्ष लावा ॥ अं
गे घालून चालणें । आणि अड्ड्यांमध्यें क्षेमगोष्ठी । ३९ आ
णि सभांमध्यें आदी आसनें । आणि जेवणावळींस आदी टेंकणें ।
हीं त्यांस आवडतात । ४० ते विधवांचीं घरें खाउन टा
कितात । आणि मिसानें लांब प्रार्थना करितात । तेच अधीक
दंड पीवतील ※

४१ आणि येशूनें भांडारासमोर बसून । लोक भांडारांत
पैसा कसा टाकतो । हें पाहिलें । आणि बहुत धनवानांनी फा
र टाकिलें ॥ ४२ तेव्हां येक दरीद्री विधवेनें येऊन दोन दमड्या
टाकिल्या । ह्मणजे नासरो ॥ ४३ मग तो आपल्या शि
ष्यांस जवळ बोलावून त्यांस ह्मणतो । मी तुह्मास खचीत सांगतों ।
कीं ज्यां सर्वांनी भांडारांत टाकिलें । त्यांपेक्षां ह्या दरीद्री वि
धवेनें अधीक टाकिलें आहे ॥ ४४ कारण कीं । त्यां सर्वांनी आ
पल्या भरपूरांतून टाकिलें आहे । परंतु हिनें आपल्या अभा
वीपासून जितकीं आपलों होतीं । तीं । आपलें सगळें उप
जीवन टाकिलें आहे ※

पर्व १३ ॥ १ मग तो देवळांतून जात असतां । त्याच्यां
शिष्यांतील येक त्याला बोलतो । हे गुरू । कशाचे धोंडे । आ
णि कशाचीं रचणीं । पाहा ॥ २ तेव्हां येशू उत्तर देतां त्या
ला बोलिला । तूं हीं मोठीं रचणीं पाहातोस कीं काय ? खा
लीं पाउलास नाहीं । अशा धोंड्यावर धोंडा राहूं दिल्हा जा

णारच नाहीं॥ ३ मग तो देवळाच्या समोर जाइतझाडांच्या
डोंगरावर बसला असतां। पेत्रस। व याकोब। व योहान्न। व
आंद्रियास। ह्यांनी त्याला येकीकडे विचारिलें। ४ हीं केव्हां हो
तील? आणि जेव्हां हीं अवघीं पूर्ण व्हायाचीं आहेत। तेव्हां
ची काय खूण? हें आह्मास सांग॥ ५ तेव्हां येशू त्यांस
उत्तर देतां। बोलूं लागला। कोणी तुह्मास न फसवावें। ह्म
णोन तुह्मी सांभाळा॥ ६ कारण। बहुत माझ्या नांवानें ये
ऊन ह्मणतील। कीं मी तो आहें। आणि ते बहुतांस फसविती
ल॥ ७ आणि जेव्हां तुह्मी लढायां। व लढायांच्या आवाया
ऐकाल। तेव्हां घाबरूं नका। कारण कीं। ह्या अगत्य व्हाया
च्या। परंतु तितक्यांत समाप्ती नाहीं॥ ८ कारण कीं। राष्ट्र
राष्ट्राविरुद्ध। आणि राज्य राज्याविरुद्ध उठेल। आणि जागोजा
गीं भूमीकंप। व दुकाळ। व दंगे होतील॥ हीं तिडकांचे प्रा
रंभ [आहेत ❀] ९ परंतु तुह्मी आपाणांविषईं सांभाळा। का
रण कीं। ते तुह्मास न्यायसभेंत स्वाधीन करितील। आणि स
भांमध्यें तुह्मी झोडिले जाल। आणि सुभेदार व राजे।
यांस प्रमाणासाठीं तुह्मी यांसमोर। माझ्या करितां उभे केले जाल॥
१० परंतु पहिलें। सुवर्तमान सर्व राष्ट्रांमध्यें गाजविलें पाहिजे॥
११ आणि जेव्हां ते तुह्मास नेऊन परस्वाधीन करितील।
तेव्हां तुह्मी काय बोलावें। हें पूर्वीं चिंता करूं नका। आणि
विचार करूं नका। परंतु तुह्मास त्या घटकेस जें दिल्हें जा
ईल। तें तुह्मी बोला। कारण कीं। तुह्मी बोलणारे नव्हां।
परंतु पवित्र आत्मा तो॥ १२ तेव्हां भाउ भावाला। आणि
बाप लेंकराला मरणासाठीं परस्वाधीन करील। आणि लेंकरें
आईबापांविरुद्ध उठतील, आणि त्यांस जिवें मारवितील॥
१३ आणि माझ्या नांवासाठीं तुह्मी सर्वांकडून द्वेषलेले असत
जाल। परंतु जो शेवटपर्यंत टिकलेला असेल। तोच तारला
जाईल ❀ १४ परंतु वोसाड करण्याचें वोखटें। जें दानीयेल
भविष्यवाद्याकडून सांगीतलें। तें जेथें अगत्यें नसावें। तेथें उ

में राहातां जेव्हां पाहाल। वाचणारा ध्यानांत आणो। तेव्हां
जे येहूदांत। ते डोंगरांस पळोत॥ १५ आणि जो गच्चीवर
तो घरांत न उतरो। आणि आपल्या घरांतून कांहीं न्यावया
स। आंत न जावो॥ १६ आणि जो शेतांत आहे। तो आप
लें वस्त्र न्यावयास माघारीं न फिरो॥ १७ तेव्हां ज्या पोटा
सीं आहेत। आणि ज्या स्तन पाजतात। त्यांस त्या दिवसीं हाय
हाय॥ १८ आणि तुमचें पळणें हिंवाळ्यांत न व्हावें। ह्मणो
न तुह्मी प्रार्थना करा॥ १९ कारण कीं। जी उपत्ती देवा
ने उत्पन्न केली। तीच्या प्रारंभापासून आतांपर्यंत जसें संकट
झालें नाहीं। आणि [त्यानंतर] होणारच नाहीं। तसें ते दि
वस होतील॥ २० आणि प्रभूने ते दिवस आंखुडल्यावांचून।
कोणी मास तारिलें जाणार नसतें। परंतु ते निवडलेले। ज्यां
स त्याने निवडले। त्यांसाठीं त्याने ते दिवस आंखुडले आहेत॥
२१ आणि तेव्हां जर कोणी तुह्मास ह्मणेल। पाहा। ख्रीस्त
येथे। किंवा पाहा तेथे [आहे।] तर तुह्मी विश्वास न ध
रावा॥ २२ कां कीं। खोटे ख्रीस्त। आणि खोटे भविष्यभाषी
उठतील। आणि जर शक्य। तर निवडलेल्यांसही भुलवायासा
ठीं साक्षात्कार व उत्पात देतील॥ २३ परंतु तुह्मी न्याहा
ळा। पाहा। ह्या अवघीं तुह्मास आगोधर सांगीतलीं आहेत॥
२४ आणखी त्या दिवसीं। त्या संकटासुद्धां। सूर्य काळो
खी केला जाईल। आणि चंद्र आपला प्रकाश देणार नाहीं॥
२५ आकाशांतील तारेही गळून पडत जातील। आणि आ
काशांमध्यें जीं सामर्थ्यें। तीं हालविलीं जातील॥ २६ आणि
तेव्हां मनुष्याच्या पुत्राला। मोठें सामर्थ्य व गौरव यांकडून। ढ
गांमध्यें येतां पाहातील॥ २७ तेव्हांही तो आपल्या दूतांस
पाठवील। आणि ते। चार दिशांपासून। पृथ्वीच्या शेवटापासून
आकाशाच्या शेवटापर्यंत। त्याच्या निवडलेल्यांस एकवट क
रितील॥ २८ आतां अंजीरझाडावरून दाखला शिका। जे
व्हां त्याची कोंवळी डाहाळी नुकी जाली असेल। आणि पानें

फुटवितो। तेव्हां तुह्मी जाणतां। कीं उन्हाळा जवळ आ
हे॥ २९ तसेंही जेव्हां तुह्मी तीं जालेलीं पाहाल। तेव्हां जा
णा। कीं तें जवळ। दारांशीं आहे॥ ३० मी तुह्मास खची
त ह्मणतों। कीं तीं अवघीं होतील। तोंपर्यंत। ही पिढी
जाणार नाहीं॥ ३१ आकाश व पृथ्वी जातील। परंतु मा
झ्या गोष्टी जाणार नाहींत॥ ३२ तथापि त्या दिवसाविषईं।
आणि त्या घटकेविषईं कोणाला कळलें नाहीं। आकाशांती
ल दुतांसही नाहीं। पुत्रालाही नाहीं। केवळ बापाला॥ ३३ तु
ह्मी न्याहाळा। जागे राहा। आणि प्रार्थना करा। कारण
की। तो वेळ केव्हां आहे। हें तुह्मांस कळलें नाहीं॥
३४ असें [आहे।] कीं प्रवासकरी माणसाने आपलें घर सो
डलें। आणि आपल्यां चाकरांस अधिकार व येक येकाला
आपलें काम दिल्हें। आणि द्वारपाळाने जागें राहावें। ह्म
णोन त्याला आज्ञा दिल्ही॥ ३५ यास्तव तुह्मी जागे राहा।
का कीं। घराचा धनी केव्हां येतो। सांजें। किंवा मध्यरा
त्रीं। किंवा कोंबडे आरवणीं। किंवा सकाळीं। हें तुह्मांस
कळलें नाहीं॥ ३६ नाहीं तर। तो अकस्मात येऊन तुह्मी
झोंप घेतां त्याला सांपडाल॥ ३७ आणि जें मी तुह्मांस ह्म
णतों। तें सर्वांस ह्मणतों। जागे व्हा॥

पर्व १४॥ १ तेव्हां दोन दिवसांनंतर वल्हांडण व न
फुगल्या भाकरी। यांचा सण होता। आणि मुख्य उपाध्या
नी व पंडितानी त्याला कपटाकडून कसें धरून जिवें मारावें।
ह्मणोन शोधीत होते॥ २ परंतु त्यानी ह्मटलें। सणांत नको।
नाहीं तर कदाचित। लोकाचा गलबला होईल॥

३ आणि तो बेथानींत। शीमोन जो कोढी याच्या घरीं अ
सून। जेवायास बसला असतां। [येक] स्त्री। जिच्या जवळ फा
र मोलवान खरा नरद याच्या सुगंध तेलाची आलाबास्त्र
कुपी होती। ती आली। आणि तिने आलाबास्त्रकुपी फोडू
न। त्याच्या डोक्यावर ओतिलें॥ ४ तेव्हां कित्येक आपणांमध्यें

संतप्त जाले। आणि बोलिले। सुगंध तेलाचा हा नासाडा क
शाला जाला? ५ कां कीं। हें तीन शें पावल्यांवर विकवलें।
व दरिद्र्यांस" देववलें असतें। आणि ते तीजवर गुरगुर
ले॥ ६ परंतु येशू बोलिला। तुह्मी हिला असुं द्या। हिला
श्रम कशाला देतां? हिने मजसाठीं चांगलें काम केलें
आहे। ७ कारण कीं। दरिद्री तुह्मावराबर सर्वकाळ आहेत।
आणि जेव्हां इछितां। तेव्हां त्यांवर बरें करायास शकतां। प
रंतु मी तुह्मावराबर सर्वकाळ नव्हें॥ ८ हिच्याने जें होवव
लें। तें हिने केलें आहे। उत्तरकार्यासाठीं माझ्या शरीराचें ले
पणें पूर्वीं धरिलें आहे॥ ९ मी तुह्मास खचीत ह्मणतों। स
गळ्या पृथ्वींत। जेथे जेथे हें सुवर्तमान गाजविलें जाईल। तेथे
तेथे। हिने जें केलें, हेंही। हिच्या आठवणीसाटीं। सांगी
तलें जाईल ※

१० मग त्यां बारांमधील येक यहूदा इस्कारयोते। तो नि
घून ह्याला मुख्य उपाध्यांच्या स्वाधीन करावयास। त्यांजवळ
गेला॥ ११ तेव्हां ते ऐकून आनंदीत जाले। आणि त्यानी त्याला
पैका देण्याचें वचन दिल्हें॥ नंतर त्याने ह्याला परस्वा
धीन सुसंधीने कसें करावें। ह्मणोन शोध केला ※

१२ आणि न फुगल्यां भाकरींच्या पहिल्या दिवशीं। जेव्हां
वल्हांडणाची बळ मारीत होते। तेव्हां त्याचे शिष्य त्याला ह्म
णतात। त्वां वल्हांडणाचें जेवण खावें। यासाठीं आह्मी को
ठे जाऊन सिद्ध करावें ह्मणोन इछितोस? १३ नंतर तो आ
पल्यां शिष्यांतील दोघांस पाठवितांना। त्यांस ह्मणतो।"
तुह्मी नगरांत जा। मग माणुस पाण्याचें मडकें वाहातां तु
ह्मास भेटेल। त्याच्या मागें जा॥ १४ नंतर जेथे तो को
ठें आंत जाईल। तेथल्या घरधन्याला ह्मणा। कीं गुरू ह्म
णतो। उतारखोली। जेथे म्या आपल्यां शिष्यांवराबर वल्हांड
ण जेवण खावें। ती कोठे आहे? १५ मग तो तुह्मास मोठी
माडी साहित्यासुद्धां सिद्ध दाखवील। तेथे आह्मासाठीं

सिद्ध करा॥ १६ आणि त्याचे शिष्य निघतांना नगरांत आ
ले, आणि जसें ह्याने त्यांस सांगीतलें, तसें त्यांस सांपडलें।
नंतर त्यांनी वल्हांडणजेवण सिद्ध केलें॥ १७ आणि सांज
जाल्यावर, तो त्यां बारांसुद्धां येतो॥ १८ मग ते बसल्या
वर खात असतां, येशू बोलिला, मी तुह्मास खचीत ह्मण
तों, कीं तुह्मामधील येक, जो मजबरावर खातो, तो मला
परस्वाधीन करील॥ १९ तेव्हां ते खिन्न होउं आणि येका
मागें येक त्याला बोलुं लागले, तो मी कीं काय? मग दुस
रा, तो मी कीं काय? २० तेव्हां त्याने उत्तर देतां त्यांस
सांगीतलें, बारांमधील येक, जो मजसहीत पात्रांत बुचकळ
तो, तो [आहे॥] २१ मनुष्याच्या पुत्राविषईं जसें लिहिलें
आहे, तसें तो जातो, खरें। परंतु ज्याकडून मनुष्याचा पु
त्र परस्वाधीन केला जातो, त्या माणसाला हायहाय। जर
तो माणुस जन्मला नसता, तर त्याला बरें असतें ॥ २२ आ
णि ते जेवीत असतां, येशूने भाकर घेऊन, स्तुती करून मो
डिली। मग त्यांस दिल्ही। आणि ह्मटलें, घ्या, खा, ही
माझें शरीर आहे॥ २३ नंतर त्याने प्याला घेऊन, आभार
स्तुती करून त्यांस दिल्हा। तेव्हां ते सर्व त्यांतून प्याले॥ २४ आ
णि त्याने त्यांस ह्मटलें, हें नव्या नेमाचें माझें जें रक्त
बहुतांसाठीं पाडलें तें आहे॥ २५ मी तुह्मास खचीत ह्म
णतों, कीं जेव्हां देवाच्या राज्यामध्यें मी हा नवा पिईन, त्या
दिवसापर्यंत, मी द्राक्षवेलाचा उपज आणखी पिणारच
नाहीं ॥

२६ तेव्हां ते गीत गाऊन, बाहेर जाइतझाडांच्या डों
गरास गेले॥ २७ आणि येशू त्यांस ह्मणतो, कीं तुह्मी
सर्व, मजविषईं यांच रात्रीं, अडखळाल, कारण कीं, हें लिहिलें
आहे, मी मेंढपाळास मारीन, आणि मेंढें दाणादाण के
लीं जातील॥ २८ परंतु मी उठल्यावर, तुह्मापुढें गालीलां
त जाईन॥ २९ तेव्हां पेत्रस त्याला बोलिला, जर सर्व

ही अडखळणार। तथापि मी नाहीं॥ ३० परंतु येशू
त्याला ह्मणतो।,, मी तुला खचीत ह्मणतों। कीं आज।
याच रात्रीं कोंबडा दोंनदां आरवल्यापूर्वीं। तूं मला तीनदां
नकारून टाकसील॥ ३१ परंतु तो अधीक विशेषें बोलिला
जरीं मला तुजबराबर मरावें लागतें। तरीं मी तुला न
कारून टाकणारच नाहीं। आणि तसेंच सर्वांनीही ह्मटलें ※
३२ मग ज्या जागेचें नांव गेथ्सेमाने। तेथें ते येतात।
आणि तो आपल्यां शिष्यांस ह्मणतो। मी प्रार्थना करीन। तों
पर्यंत तुह्मी येथे बसा॥ ३३ तेव्हां तो, पेत्रस व याकोब
व योहान्न। यांस आपणाबराबर घेतो। आणि फार विस्मी
त व कष्टी होऊं लागला॥ ३४ आणि तो त्यांस ह्मणतो।
माझा जीव मरणा येवढा फार खिन्न आहे। तुह्मी येथे
राहा। आणि जागे असा॥ ३५ मग तो किंचीत पुढें जाऊन
भूयीवर पडला। नंतर त्याने प्रार्थना केली। कीं जर साध्य
आहे। तर या घटकेने मजपासून वटावून जावें। ३६ आणि
तो बोलिला। हे आब्बा। बापा। अवघें तुला साध्य। हा
प्याला मजपासून दूर कर। तथापि मी काय इछितो। तें नको।
परंतु तूं काय [इछितोस।] तें [होवो॥] ३७ मग तो येतो।
आणि ते झोंपीं असतां त्याला सांपडतात। तेव्हां तो पेत्रसाला
ह्मणतो। हे शीमोना। तूं झोंपीं आहेस कीं काय? येक घटका
जागा राहायास तुझी शक्ती न पुरती काय? ३८ तु
ह्मी प्रचितीस न यावें। ह्मणोन जागे राहा, आणि प्रार्थना क
रा। आत्मा सचेष्ट। खरें। परंतु देह अशक्त [आहे॥]
३९ नंतर त्याने फिरोन निघून। तीच गोष्ट ह्मणतां। प्रार्थ
ना केली॥ ४० मग माघारा येऊन। ते फिरोन झोंपी अस
तां त्याला सांपडले। कारण कीं त्यांचे डोळे भारी जाले
होते। आणि त्याला काय उत्तर द्यावें। हें ते न समज
ले॥ ४१ नंतर तो तिसऱ्याने येतांना त्यांस ह्मणतो। पुढें
झोंप घ्या। आणि विसांवा पावा। हें पुरें आहे। घटका आ

ल्हो। पाहा। मनुष्याचा पुत्र पाप्यांच्यां हातांत स्वाधीन केला आ
हे॥ ४२ उठा। आपण जाऊं। पाहा, जो मला परस्वाधीन
करितो। तो जवळ आला आहे ※

४३ आणि तेव्हांच तो बोलता इतक्यांत। यहूदा जो त्यां
बारांमधील येक। तो येतो। आणि त्याबराबर मोठा समु
दाय। तरवारी व सोटे घेऊन मुख्य उपाध्ये व पंडित व
पुरातन यांजवळून [आला॥] ४४ आणि त्याचा जो परस्वा
धीन करणारा। त्याने त्यांसीं खूण देऊन ह्मटलें होतें। ज्याला
मी चुंबन देईन। तो तोच आहे। त्याला धरा। आणि बंदो
बस्ताने न्या॥ ४५ तेव्हां तो पोहोंचून त्याजवळ येऊन ह्मण
तो। माझ्या गुरू। माझ्या गुरू। मग त्याने त्याला चुंबन दिं
लें॥ ४६ नंतर त्यांनी आपले हात त्यावर टाकितांना त्या
ला धरिलें॥ ४७ आणि उभ्यां राहाणाऱ्यांमधील येकाने।
तरवार उपसून। मुख्य उपाध्याच्या चाकराला मारिलें। आणि
त्याचा कान कापुन टाकला॥ ४८ तेव्हां येशू उत्तर देतां
त्यांस बोलिला। जसें लुटाऱ्यावर तसें। तरवारी आणि सोटे
घेऊन। तुह्मी मला धरायास बाहेर आलां कीं काय? ४९ मी
प्रति दिवसीं। तुह्माबराबर देवळांत शिकवीत होतों। आ
णि तुह्मी मला धरिलें नाहीं। परंतु लेख पूर्ण व्हावे ह्म
णोन॥ ५० तेव्हां सर्व त्याला सोडून पळाले॥ ५१ तथापि
कोणी येक तरूण। नागव्या [आंगा]वर ओल पांघरून त्या
च्या मागें गेला। परंतु तरण्यांनी त्याला धरिलें। ५२ मग
तो ओल सांडून त्यांपासून नागवा पळाला ※

५३ नंतर त्यांनी येशूला तेथून मुख्य उपाध्याजवळ ने
लें। आणि ह्माबराबर सर्व मुख्य उपाध्ये, व पुरातन व पं
डित मिळाले होते॥ ५४ आणि पेत्रस दुरून त्याच्या मागें।
मुख्य उपाध्याच्या वाड्यांत। तेथवर गेला। आणि चाकरांब
राबर बसतांना। अग्नीजवळ शेकत होता॥ ५५ तेव्हां मु
ख्य उपाध्ये। आणि सगळी न्यायसभा। यांनी। येशूला

जीवें मारायासाठीं । त्याविरुद्ध साक्ष शोधिली । परंतु त्यां
स मिळाली नाहीं ॥ ५६ कारण कीं । बहुतांनी त्याच्या वि
रुद्ध खोटी साक्ष दिल्ही । आणि साक्षी संगत न जाल्या ॥
५७ तेव्हां कित्येक उठून । त्याच्या विरुद्ध खोटी साक्ष दे
तां । बोलिले । ५८ कीं आह्मी त्याला असें बोलतां ऐकि
लें । कीं ह्या हातकामी देवळास मीं मोडुन टाकीन ॥
आणि तीन दिवसांत । हातकामावांचून दुसरें रचीन ?
५९ परंतु तसीही त्यांची साक्ष संगत न जाली ॥ ६०
तेव्हां मुख्य उपाध्या मध्यें उठून येशूला विचारितां बोलिला ।
तूं कांहीं उत्तर देत नाहींस कीं काय ? हे तुजविरुद्ध का
य साक्ष देतात ? ६१ तथापि तो उगा राहिला । आणि
कांहीं उत्तर त्यानें दिल्हें नाहीं ॥ फिरोन मुख्य उपाध्यानें
त्याला विचारिलें । आणि त्याला ह्मटलें । तूं ख्रीस्त । तो
स्तुतीमान्याचा पुत्र आहेस कीं काय ? ६२ तेव्हां येशू बो
लिला । मी आहें । आणि तुह्मी मनुष्याच्या पुत्राला । साम
र्थ्याच्या उजव्याकडे बसलेला । आणि आकाशाच्या ढगामध्यें
येतां पाहाल ॥ ६३ तेव्हां मुख्य उपाध्या । आपलीं वस्त्रें
फाडून । बोलतो । आह्मास यापुढें साक्ष्यांचें काय अग
त्य ? ६४ तुह्मी हें दुर्भाषण ऐकिलें आहे । तुह्मास क
सें दिसतें ? तेव्हां तो मरण्यास होवो । असें । सर्वांनी त्याव
र दंड ठरविला ॥ ६५ मग कित्येक त्यावर थुंकुं । आ
णि त्याचें तोंड झांकुं । आणि त्याला बुक्के मारुं । आणि
त्याला बोलुं लागले । [कीं] भविष्य सांग ॥ चाकरांनीही
त्याला चपडाका मारल्या ॥ ※

६६ तेव्हां पेत्रस खालीं वाड्यांत असतां । मुख्य उपा
ध्याच्या दासींमधील येक येती । ६७ आणि पेत्रसाला शेक
तां पाहून । त्याला न्याहाळून बोलती । तूंही त्या येशू ना
जारेकराच्या कडचा होतास ॥ ६८ परंतु तो नकारितां बो
लिला । मला माहीत नाहीं । आणि तूं काय ह्मणतीस ।

हें मी समजत नाहीं ॥ मग तो आंगणांत बाहेर गेला ।
आणि कोंबडा आरवला ॥ ६९ मग ती दासी दुसरेदां त्या
ला पाहून। जवळ उभ्यां राहाणाऱ्यांस बोलुं लागली । कीं
हाच त्यांमधील आहे ॥ ७० तेव्हां त्याने फिरोन नकारिलें ॥
मग थोडक्या [वेळे] नंतर । जवळ उभे राहाणारे पेत्र
साला आणखी बोलिले । तूं त्यांमधील आहेस । खरें । का
रण । तूं गालीली आहेस । आणि तुझी बोलीही तशी आ
हे ॥ ७१ तेव्हां तो श्रापुं । आणि शपत वाहूं लागला ।
कीं ज्याविषईं तुह्मी ह्मणतां । हा माणुस मला माहीत
नाहीं ॥ ७२ मग कोंबडा दुसऱ्याने आरवला ॥ तेव्हां ।
येशूने पेत्रसाला जी गोष्ट ह्मटली होती। कीं कोंबडा दोन
दां आरवल्यापुर्वीं तूं मला तीनदां नकारून टाकसील । ही
याला आठवली। मग तो त्याविषैं लागून रडला ॥

पर्व १५ ॥ १ आणि तेव्हांच सकाळीं । पुरातन व पंडित
व सगळी न्यायसभा यांसुद्धां । मुख्य उपाध्यानी मनसुबा के
ल्यावर येशूला बांधून तेथून नेलें । आणि पिलातसाच्या
स्वाधीन केलें ॥ २ तेव्हां पिलातसाने त्याला विचारिलें ।
तूं यहूद्यांचा तो राजा आहेस कीं काय ? मग हा उत्त
र देतां त्याला बोलिला । तूं ह्मणतोस [तो] ॥ ३ तेव्हां
मुख्य उपाध्यानी त्यावर बहुत दोष ठेविले ॥ ४ मग पिला
तस त्याला फिरोन विचारितां बोलिला । तूं कांहीं उत्तर
देत नाहींस कीं काय ? पाहा । हे तुजविरुद्ध साक्षीने की
तीं पटवितात ? ५ परंतु येशूने तेव्हांही कांहींच उत्त
र दिलेंह नाहीं । यावरून पिलातसाला आश्चर्य वाटलें ॥
६ आतां तो। प्रति सणास। येक बंदिवान, ज्या कोणाला त्या
नी मागीतलें। त्याला त्यांच्या साठीं सोडीत होता ॥ ७ आ
णि ज्यानी फितुरांत हत्या केली । त्यां फितुरकऱ्यांसहीत
बांधलेला बाराब्बा जो ह्मटला । तो होता ॥ ८ तेव्हां लोक मो
ठ्याने हाक देतां। आपणांजवळ जसें त्याने सर्वकाळ केलें होतें।

त्याप्रमाणे मागुं लागले ॥ ९ मग पिलातसाने त्यांस उत्तर दिलें । कीं म्या तुह्मासाठीं यहूद्यांच्या राजाला सोडावें ह्मणोन तुह्मी इच्छितां का काय ? १० त्याने तरीं जाणलें । कीं मुख्य उपाध्यानी ह्याला हेव्यामुळें परस्वाधीन केलें होतें ॥ ११ तथापि मुख्य उपाध्यानी लोकाला चिथावून उठविलें । कीं यापेक्षां त्याने त्यांसाठीं बाराब्बा सोडावा ॥ १२ परंतु पिलातसाने त्यांस उत्तर करितां फिरोन ह्मटलें । तर ज्याला तुह्मी यहूद्यांचा राजा ह्मणतां । त्याला म्या काय करावें । ह्मणोन इच्छितां ? १३ तेव्हां ते फिरोन बोवडले । [कीं] त्याला मरणखांबीं दे ॥ १४ मग पिलातसाने त्यांस ह्मटलें , कशाला ? त्याने काय वाईट केलें ? परंतु ते फार अधीक बोरडले । त्याला मरणखांबीं दे ॥ १५ तेव्हां पिलातसाने लोकाची तृप्ती करायास इच्छून । त्यांसाठीं बाराब्बाला सोडिलें । आणि येशूला कोडा मारून । मरणखांबीं द्यावयास स्वाधीन केलें ॥ १६ नंतर लष्कऱ्यानी त्याला तेथून , प्रादतोरयम वाडा जो आहे । त्यांत नेलें । आणि ते सगळें पतक येकवट बोलावतात ॥ १७ मग त्यानी जांभळें वस्त्र त्यावर घातलें . आणि कांट्यांचा मुगुट गुंफून त्यावर बसविला ॥ १८ नंतर ते त्याला क्षेमगोष्टी करूं लागले । [कीं] हे यहूद्यांच्या राजा । सुखरूप ऐस ॥ १९ आणि त्यानी त्याच्या मस्तकावर कांडीने मारिलें । मग ते त्यावर थुंकले । नंतर त्यानी गुडघे टेंकून त्याला भजिलें ॥ २० तेव्हां त्यानी त्याची ढवाळी केल्यावर । जांभळें वस्त्र त्यापासून काढिलें । आणि त्याचींच वस्त्रें त्याला घातलीं । नंतर त्याला मरणखांबीं द्यावयास घेऊन बाहेर गेले ॥

२१ तेव्हां कोणी शीमोन । कुरेनेकर । जो आलेक्षांद्रस व रूफस यांचा बाप । तो शिवारावरून येऊन जवळून जात असतां । याने त्याचा मरणखांब न्यावा । ह्मणोन ते त्यावर

बळात्कार करितात ॥ २२ नंतर गलगथा जागा ह्मणजे ।
अर्थ उतरतां ? कवटीची जागा । तेथे त्याला आणतात ॥
२३ आणि त्याला बोळभेळी द्राक्षरस प्यायास दिल्हा । परंतु
त्याने घेतला नाहीं ॥ २४ मग त्यानी त्याला मरणखांबीं दि
ल्ह्यावर । कोणी काय घ्यावें [याविषई ।] त्याच्यां वस्त्रांवर पण
घालून । तीं वांटुन घेतलीं ॥ २५ आणि तिसरी होरा होती।
तेव्हां त्यानी त्याला मरणखांबीं दिल्हें ॥ २६ आणि त्याच्या
आरोपाचा पत्ता वर्ता लिहिला होता । [कीं] हा यहूद्यां
चा राजा ॥ २७ तेव्हां ते ह्याबराबर दोन लुटाऱ्यांस।
येकाला उजव्याकडे । आणि येकाला त्याच्या डाव्याकडे । मर
णखांबीं देतात ॥ २८ असें । जो लेख ह्मणतो । कीं तो
नेमभंग्यांबराबर मोजला गेला । हा पूर्ण जाला ॥ २९ तेव्हां
जवळून जाणारे । आपलीं डोकीं डोलवून त्याला निंदितांना
बोलिले । वाह । तूं देउळ मोडणाऱ्या । आणि तीन दिवसा
नी बांधणाऱ्या । ३० आपणाला तार । ह्मणजे मरणखांबावरू
न उतर ॥ ३१ आणि तसेंच मुख्य उपाध्येही । पंडितांसु
द्धां । येकमेकांसीं टवाळी करित बोलिले । त्याने दुसऱ्यांस
तारिलें । आपणाला तारववत नाहीं ॥ ३२ तो ख्रीस्त। तो
इस्त्राएलाचा राजा । आह्मी पाहावें आणि विश्वासावें । ह्म
णोन आतां मरणखांबावरून उतरो ॥ जे बराबर मरणखां
बीं दिल्हे । त्यानीही त्याला गांजिले ॥ ३३ आणि
साहावी होरा जाल्यावर । नव्व्या होरेपर्यंत सगळ्या दे
शावर आंधार जाला ॥ ३४ मग नव्व्या होरेस । येशू मोठ्या
स्वराने हाक देतां बोलिला । एलोही । एलोही । लामा शा
बाख्थानी । ह्मणजे अर्थ उतरतां । हे माझ्या देवा । हे मा
झ्या देवा । त्वां मला कशाला सोडून दिल्हें ? ३५ नंतर उ
भ्यां राहाणाऱ्यांतील कित्येकानी ऐकून ह्मटलें । पाहा । तो ए
लीयास बोलावितो ॥ ३६ तेव्हां येकाने धांवून । आणि सादल
आंबेने भरून । मग कांडीवर बसवून । त्याला पाजितां ।

ह्मटलें। असुं द्या, एलीया त्याला खालीं काढायास येतो कीवा नाहीं, पाहूं ※

३७ नंतर येशूने उंच स्वर काढून प्राण सोडिला॥ ३८ तेव्हां देवळाचा पडदा वरपासून खालवेरीं फाटून, दुभाग जाला ※
३९ मग, त्याने असें वोरडून प्राण सोडिला, हें शतपती, जो त्याच्या समोर जवळ उभा राहात [होता,] त्याने पाहातां ह्म टलें। हा माणुस देवाचा पुत्र होता, खरें॥ ४० आणि बाय काही दुरून पाहात होत्या। तेव्हां ह्यांमध्यें मारया जी माग दालीण, आणि मारया जी धाकट्या याकोबाची व योसा ची [आई,] आणि सालोमे, ह्या [होत्या॥] ४१ आणि ह्या, जेव्हां तो गालीलांत होता, तेव्हां त्याच्या मागें चालल्या, आणि त्याची सेवा करीत होत्या। आणि बहुत दुसऱ्या, ज्या त्याच्या संगातें यरूशलेमास चढल्या, ह्या [होत्या] ※

४२ तेव्हां तितक्यांत संध्याकाळ जाला असतां, सिद्ध कर णें, ह्मणजे शाब्बाथापूर्वीची वेळ होती, यास्तव ४३ योसेफ, जो हारिमाथाईचा, सज्जन पंचाइद्दार, तो आला, तो, आप णही देवाच्या राज्याची वाट पाहात असतां, धजून पिला तसाजवळ आंत गेला, आणि त्याने येशूचें शरीर मागीत लें॥ ४४ तेव्हां तो इतक्यांत मेला, याविषईं पिलातसाने आ श्चर्य केलें, मग शतपतीला बोलावून त्याला पुसलें, [कीं] तो कांहीं पुर्वीं मेला कीं काय? ४५ तेव्हां [हें] शतपतीकडून जाणल्यावर, त्याने शरीर योसेफाला दिल्हें॥ ४६ नंतर त्याने, शाल विकत घेऊन आणि त्याला खालीं काढून, शा लीने गुंडाळलें, मग, जें थडें खडकांत खोदिलें होतें, त्यांत त्याला खालीं ठेविलें, आणि थड्याच्या दारावर धोंड लोटिली॥ ४७ तेव्हां तो कोठे ठेविला, हें मारया जी मा ग्दालीण, आणि मारया जी योसाची [आई,] यांनी पाहिलें ※

पर्व १६ ॥ १ नंतर साब्बाथ होउन गेल्यावर। मारया
माग्दालीण, व मारया जी याकोबाची [आई।] व सालोमे।
यानी येऊन त्याला लेपन करावें। ह्मणोन सुगंधद्रव्यें विक
त घेतलीं॥ २ आणि साप्त्याच्या प्रथमवारीं। मोठ्या सका
ळीं। सूर्य उगवतां थड्याकडे येतात। ३ तेव्हां येकमेकांसीं बो
लिल्या आह्मासाठीं थड्याच्या दारावरून धोंड कोण लोटील?
४ परंतु अवलोकन करून पाहातात। कीं धोंड लोटलेली आहे।
ती तर फार मोठी होती॥ ५ मग त्यानी थड्यांत जाऊन। न
वातरणा। उजव्याकडें बसलेला। [आणि] पांढरा झगा ल्याले
ला पाहिला। आणि त्या घाबरल्या॥ ६ तेव्हां तो त्यांस ह्मणतो
घाबरूं नका। येशू जो नाजारेकर मरणखांबीं दिल्हेला।
त्याला तुह्मी शोधितां। तो उठला आहे। येथे नाहीं।
जेथे त्यानी त्याला ठेविलें। ही जागा पाहा॥ ७ परंतु तु
ह्मी माघारें जा। त्याच्या शिष्यांस, पेत्रसालाही सांगा। कीं
तो तुह्मापुढें गालीलांत जातो। तेथे जसें त्यांने तुह्मास
सांगीतलें, तसें तुह्मी त्याला पाहाल॥ ८ नंतर त्या लव
कर निघून थड्यापासून पळाल्या। तेव्हां कांपणें व विस्मय
हीं त्यांस लागलीं होतीं। आणि त्यानी कोणास कांहीं न सांगी
तलें। कारण कीं भ्याल्या ※

९ परंतु तो। साप्त्याच्या प्रथमवारीं सकाळीं उठ
ल्यावर। मारया माग्दालीण, जींतून त्याने सात भुतें घाल
विलीं होतीं, तिला पहिलें दिसला॥ १० तिने जाऊन, त्या
चे कडले जे शोक करीत आणि रडत [होते।] त्यांस सांगी
तलें॥ ११ परंतु। तो जिवंत आहे। आणि हीकडून पहिला गे
ला। हें त्यानी ऐकून विश्वास न धरिला ※ १२ यानंतर त्यांमधी
ल दोघे हिंडतां [व] बाहेरस्थानीं जात असतां, त्यांसीं तो दुसऱ्या रू
पाने प्रगटला॥ १३ आणि त्यानी जाऊन वर्कांडास सांगीतलें, परं
तु हे त्यांवर विश्वासले नव्हते ※ १४ मागुन। ते अकरा जेवायास
बसले असतां। तो त्यांस प्रगटला। आणि त्यांच्या अविश्वासाचा।

व हृदयकठोणपणाचा बट्टा लाविला। कारण कीं। ज्या
नी त्याला उठलेला पाहिला। त्यांवर त्यांनी विश्वास धरिला
नाहीं॥ १५ आणि त्याने त्यांस सांगीतलें। [कीं] तुह्मी सग
ळ्या जगांत जाऊन। प्रत्येक उत्पन्नाला सुवर्तमान गाजवा॥
१६ जो विश्वास धरील. आणि बाप्तीस्मा घेईल। तो तारि
ला जाईल। परंतु जो विश्वास न धरील। तो दंडी ठरविला
जाईल॥ १७ आणि जे विश्वासतात त्यांसंगातें ह्या खुणा मागें
जातील। माझ्या नांवाने ते भुतांस घालवितील। नव्या भाषा बो
लतील। १८ साप उचलतील। आणि काहीं मृत्युकारक जर
पितील। तर त्यांस बाधणार नाहीं। रोग्यांवर हात ठेवितील।
आणि ते बरे होतील ॥

१९ तर खरें। प्रभू त्यांशीं बोलिल्यानंतर। वर आकाशांत
घेतला गेला। आणि देवाच्या उजव्याकडे बसला॥ २० म
ग त्यांनी निघून सर्व ठिकाणीं गाजविलें। प्रभू [त्यां]संगातें
काम करीत आणि। गोष्टीवर अनुसरत्यां साक्षात्कारांकडून। हि
ला खचीत करीत [गेला॥] आमेन ॥

लूकाकडून सुवर्तमान ॥

पर्व १ ॥ १,२ जे प्रारंभापासून आपणच शब्दाचे पाहाणारे
व सेवक होते. त्यानी जसें आह्मास सांगुन दिलें तसें। आह्मास
ध्यें निर्धारें घडलेल्यां क्रियांविषईं कथा संगत लावायास बहुता
नी हातीं धरिलें आहे। यावरून, ३ हे माहाराज थ्यफिल
सा। मलाही वाटलें कीं, येकाग्रतेने पहिल्यापासून अवघ्यांचा मा
ग जवळ काढलेला असतां। त्या तुला यासाठीं अनुसंगत लि
हावें। ४ कीं ज्यां गोष्टींविषईं तुला शिकविलें। त्यांचा निश्चय
त्वां जाणावा ॐ

५ हेरोद जो यहूदाचा राजा, त्याच्यां दिवसांत अबीया
च्या पाळींतील जखार्या नांवें येक उपाध्या होता। त्याची
स्त्रीही आहरोनाच्यां कन्यांतील [होती।] आणि तिचें नांव ए
लीसाबेत॥ ६ तेव्हां तीं उभयतां। प्रभूच्यां अवघ्यां आज्ञां
व जे ठराव यांप्रमाणे निर्दोषी चालत असतां। देवाच्या दृष्टींत नि
तीवंत होतीं॥ ७ आणि एलीसाबेत वांझ होती। याकरितां त्यां
स लेंकरूं नाहीं। दोघेंही आपल्यां दिवसांत सरसावलीं होतीं ॐ
८ आणि असें जालें। कीं तो देवाच्या समोर। उपाध्यप
ण आपल्या पाळीच्या अनुक्रमाने करीत असतां, ९ उपाध्यप
णाच्या चालीप्रमाणे। प्रभूच्या देवळांत जाऊन धूप करणें त्या
ला पडलें॥ १० तेव्हां धूप करण्याच्या वेळेस। लोकाचा सर्व भ
रणा बाहेर प्रार्थना करीत होता॥ ११ तेव्हां त्याकडून
प्रभूचा दूत। धूपवेदीच्या उजव्याकडे उभा राहून। पाहिला

गेला ॥ १२ आणि जखार्या पाहून घाबरला । असें त्यावर
भय पडलें ॥ १३ परंतु दूत त्याला बोलिला। हे जखार्या।
भिऊं नको। कां कीं। तुझी प्रार्थना ऐकुन घेतली गेली।
आणि तुझी स्त्री एलीशाबेत तुजसाठीं पुत्राला प्रसवेल।
आणि तूं त्याचें नांव योहान ठेविसील ॥ १४ आणि तुला आनंद
व उल्हासपणें होईल। आणि त्याच्या जन्मावरून बहुतही आनं
दतील। १५ कारण कीं, तो प्रभूच्या दृष्टींत महान हो
ईल। आणि द्राक्षरस व दारू पिणारच नाहीं। परंतु
आपल्या आईच्या पोटापासूनच पवित्र आत्म्याने भरला होई
ल ॥ १६ आणि तो इस्राएलाच्यां संतानांतील बहुतांस। प्रभू जो
त्यांचा देव, त्याकडे फिरवील ॥ १७ आणि तो त्यापुढें एली
याच्या आत्म्यांत व शक्तींत यासाठीं पूर्वीं येईल। कीं आपण
लोकाला प्रभूसाठीं सिद्ध, निट लावलेला [असा] करावयास,
बापांच्यां हृदयांस लेंकरांकडे, आणि अवमानणाऱ्यांस नितिवंतां
च्या भावनेकडे फिरवावें ॥ १८ तेव्हां जखार्या दूताला बो
लिला। मी कशावरून हें जाणुं? कारण कीं, मी म्हातारा
आहें। आणि माझी स्त्री आपल्यां दिवसांत सरसावली आहे ॥
१९ मग दूत उत्तर देतां त्याला बोलिला। गाब्रियेल जो दे
वाच्या जवळ प्रत्यक्ष उभा राहातो, तोच मी आहें। आणि
तुजशीं बोलायास। व हीं सुवर्तमानें तुला सांगायास मला पा
ठविलें आहे ॥ २० आणि पाहा। माझ्या ज्या गोष्टी आपापल्या
काळीं पूर्ण होतील। त्यांवर त्वां विश्वास केला नाहीं। यांकरितां
हीं पूर्ण व्हावयाच्या दिवसापर्यंत तूं उगा असतां व बोलुं न शक
तां होसील ॥ २१ तेव्हां लोक जखार्याची वाट पाहात
होता। आणि याने देवळांत उशीर केल्यावरून ते आश्चर्य
पावले ॥ २२ मग तो बाहेर आल्यावर त्यांशीं बोलुं शकत
नव्हता। तेव्हां त्याने देवळांत दृष्टांत पाहिला आहे। असें ते
उमजले। तोही त्यांस खुणावीत होता।, आणि मुका राहिलाच ॥
२३ नंतर असें जाहलें। कीं त्याच्या सेवेचे दिवस पूर्ण जा

त्यावर। तो तेथून आपल्या घरास गेला॥ २४ आणि त्यां
दिवसांनंतर। त्याची स्त्री एलीसाबेत हिने गर्भ धरिला॥
२५ आणि पांच महिन्यांपर्यंत आपणाला गुप्त राखितां ह्मट
लें। कीं माणसांमध्यें माझा अपमान। हा दूर करावयास।
प्रभूने ज्यां दिवसीं मजवर पाहिलें। त्यांत मला असें के
लें आहे॥

२६ मग साहाव्या महिन्यांत। गालीलांतील नगर ज्याचें नां
व नाजारेथ। तेथे गाब्रियेल दूत देवाकडून कुंवारीच्या जवळ
पाठविला होता। २७ ती। दावीदाच्या घराण्यांतील पुरुष।
ज्याचें नांव योसेफ। याला मागणीने दिल्हेली होती। आ
णि कुंवारीचें नांव मारया [होतें॥] २८ तेव्हां दूत तीच्या
जवळ आंत जाऊन बोलिला। कृपा पावलेल्ये, सुखी ऐस। प्रभू
तुजसहीत [आहे॥] स्त्रियांमध्यें तूं धन्य ह्मटलेली [आहेस॥]
२९ तेव्हां ती पाहातां त्याच्या गोष्टीवरून फार घाबरली।
आणि तिने विचार केला। [कीं] ही क्षेमगोष्ट कशाची असे
ल? ३० तेव्हां दुताने तिला ह्मटलें। हे मारये। भिऊं नको। कां
कीं देवाजवळ तुला कृपा मिळाली आहे॥ ३१ आणि पा
हा। तूं पोटीं गर्भ धरिसील। पुत्रालाही प्रसवसील। आणि त्याचें
नांव येशू ठेविसील॥ ३२ तो माहान होईल। आणि परा
त्पराचा पुत्र ह्मटला जाईल। आणि प्रभू जो देव। तो त्या
ला त्याचा पितर दावीद याचें सिंहासन देईल॥ ३३ मग
तो याकोबाच्या घराण्यावर सर्वकाळांपर्यंत राज्य करील। ह्म
णजे त्याच्या राज्याचा शेवट होणार नाहीं॥ ३४ तेव्हां मा
रयेने दुताला ह्मटलें। मी पुरुषाला जाणत नाहीं। याव
रून हें कसें घडेल? ३५ मग दूत उत्तर देतां तिला बो
लिला। पवित्र आत्मा तुजवर येईल। आणि परात्पराची श
क्ती तुजवर सावली करील। याकरितांही जें पवित्र तुजक
डून जन्म पावेल। तें देवाचा पुत्र ह्मटला जाईल॥ ३६ आ
णि पाहा। तुझी नातलग एलीसाबेत। तीनेही आपल्या ह्मा

तारपणीं पुत्र गर्भ धरिला आहे। आणि जी वांझ ह्मटलेली।
तिला हाच साहावा महिना आहे॥ ३७ कां कीं। कोणती गोष्ट
देवाजवळ अशक्य होणार नाहीं॥ ३८ तेव्हां मारया बोलि
ली। पाहा। [मी] प्रभूची दासी। तुझ्या गोष्टीप्रमाणे मला
व्हावें॥ तेव्हां दूत तिजपासून गेला॥

३९ मग त्यां दिवसीं। मारया उठून डोंगरवटीस। य
हूदांतील नगरांत उतावळीने गेली॥ ४० आणि जखार्याच्या
घरांत जाऊन, एलीसाबेतीला क्षेमगोष्ट केली॥ ४१ तेव्हां असें
जालें; कीं एलीसाबेत मारयेची क्षेमगोष्ट ऐकतांच। तिच्या
पोटांतील बाळकाने उडी मारिली। आणि एलीसाबेत पवित्र
आत्म्याकडून भरली॥ ४२ तेव्हां मोठ्या स्वराने ओरडतां बोलि
ली। तूं स्त्रियांमध्यें धन्य ह्मटलेली आहेस, आणि तुझ्या पोटचें
फळ धन्य ह्मटलेलें [आहे॥] ४३ आणि माझ्या प्रभूची आई
माझ्या जवळ आली। हें मला कोठून? ४४ कां तर पाहा।
तुझ्या क्षेमगोष्टीची वाणी माझ्यां कानांमध्यें पडतांच। माझ्या पो
टांतील बाळकाने उल्हासाकडून उडी मारली॥ ४५ आणि जि
ने विश्वास धरिला, ती धन्य। कां कीं। प्रभूकडून जीं तिला सां
गीतलीं। त्यांचें पूर्ण करणें होईल॥ ४६ तेव्हां मारया बो
लिली। माझा जीव प्रभूला थोर मानितो। ४७ आणि देव
जो माझा तारणारा। त्याविषईं माझा आत्मा उल्हास पावला
आहे। ४८ कां तर। त्याने आपल्या दासीच्या नीचपणा
कडे पाहिलें आहे। यास्तव कीं पाहा। आतांपासून सगळ्या पि
ढ्या मला सुखी ह्मणतील॥ ४९ कारण कीं। जो शक्तिमान
याने माझ्या करितां मोठीं केलीं आहेत। तर त्याचें नांव प
वित्र॥ ५० आणि जे त्याला भितात, त्यांवर त्याची दया
पिढ्यांच्या पिढ्यांपर्यंत [आहे॥]५१ त्याने आपल्या भुजेकडून
पराक्रम केला आहे॥ जे आपल्या चित्ताच्या भावनेंत गर्विष्ट।
त्यांची दांगादाण केली आहे॥ ५२ त्याने शक्तिवंतांस सिं
व्हासनांवरून खालीं काढिलें। आणि दीनांस उंचाविलें आ

हे॥ ५३ भुकेल्यांस चांगल्यांकडून तृप्त केलें। आणि धनवानां
स रिकामें लाविलें आहे॥ ५४। ५५ सर्वकाळापर्यंत आब्रा
हामावर आणि त्याच्या बिजावर दया। जसें त्याने आमच्या
पितरांस सांगीतलें तसें ती आठवायासाठीं। त्याने आपला सेवक
इस्त्राएल याचें साह्य केलें आहे ॐ ५६ तेव्हां मारया तिच्या
जवळ सुमारें तीन महिने राहिली। मग आपल्या घरास मा
घारें गेली ॐ

५७ नंतर एलीसावेतीच्या प्रसूत होण्याचा काळ तिला पूर्ण
जाला। तेव्हां ती पुत्राला प्रसवली॥ ५८ आणि प्रभूने आप
ली दया तिजवर मोठी केली। हें तिचे शेजारी व नातल
ग यानी ऐकिलें। तेव्हां तिच्या सहीत हर्ष केला॥ ५९ म
ग आठव्या दिवसीं असें जालें, बाळकाची सुंता करायास ते
आले, आणि त्याच्या बापाच्या नांवावरून त्याला जखार्या नां
व देत होते॥ ६० तेव्हां त्याची आई उत्तर करितां बोलि
ली। नका। परंतु याला योहान्न ह्मणावें॥ ६१ मग ते तिला
बोलिले, कीं जो ह्या नांवाने ह्मटला। असा तुझ्या नातलगां
त कोणी नाहीं॥ ६२ तेव्हां त्याचा बाप त्याला काय ह्मणा
यास इछीत असेल। याविषईं त्यानी त्याला खुणाविलें॥
६३ मग त्याने पाटी मागून लिहिलें। कीं त्याचें नांव यो
हान्न आहे। तेव्हां सर्वांस आश्चर्य जालें॥ ६४ आणि तेव्हां
च त्याचें मुख व त्याची जीभ मोकळीं होतांना। तो देवाची
स्तुती करितां बोलिला॥ ६५ नंतर त्यांच्या चहूंकडील अव
घ्यां राहाणाऱ्यांस भय जालें। आणि ह्या सर्व गोष्टी यहूदाच्या
संपूर्ण डोंगरवटीवरून सांगीतल्या गेल्या॥ ६६ तेव्हां ज्यानी ऐ
कल्या। त्या सर्वांनी आपल्या चित्तांत ठेवून ह्मटलें, तरीं हें काय
लेंकरूं होईल? आणि प्रभूचा हात त्याच्या सहीत होता ॐ
६७ तेव्हां त्याचा बाप जखार्या पवित्र आत्म्याने भरला। आ
णि त्याने भविष्य सांगीतलें। कीं ६८ प्रभू जो इस्त्राएलाचा दे
व तो स्तुतीमान्य। कां तर। त्याने आपल्या प्रजेची भेट घे

तली। आणि त्याची सुटकाखंडणी केली आहे। ६९ आणि
आपला सेवक दावीद। याच्या घराण्यांत आह्मासाठीं तारणा
चें शिंग उठविलें आहे। ७० जसें त्याने जगकाळापासून आपल्यां
पवित्र भविष्यभाष्यांच्या मुखाकडून सांगीतलें तसें। ७१ आमच्यां
शत्रूंपासून आणि सर्व जे „आमचा द्वेष करितात। त्यांच्या हा
तांतून तारण। ७२ ह्यासाठीं कीं। त्याने आमच्यां पितरां
पाशीं दया घडवावी। आणि आपला पवित्र नेमठराव आठवा
वा॥ ७३ [ह्मणजे] जी शपत त्याने आमचा पितर आब्राहा
म यासीं वाहिली ती। कीं आह्मास असें द्यावें। ७४। ७५ आम
च्यां शत्रूंच्या हातांतून आह्मी सोडविलें होऊन। निर्भयें त्यासमोर
धार्मीकपणाने व नीतीवंतपणाने, त्याची सेवा आमच्या आयुष्या
च्यां सर्व दिवसांत करावी॥ ७६ आणि बाळका। तूं परात्पराचा
भविष्यभाषी ह्मटला जासील। कारण। तूं प्रभूच्या तोंडासमोर
यासाठीं जासील। कीं त्याचे मार्ग असे सिद्ध करावे। ७७ कीं त्या
च्या लोकाला त्यांच्यां पापांच्या सुटीने तारणाचें जाणें द्यावें। ७८
[हें] आमच्या देवाच्या दयेच्या कळवळ्यांकडून। ह्यांच्याने उदय
वरपासून आह्मास यासाठीं भेटला आहे। ७९ कीं जे अंधा
रांत आणि मरणाच्या सावलींत बसले। त्यांवर प्रकाशतां आ
मच्यां पायांस कल्याणाच्यां मार्गांत सुतीं लावावें॥ ८० तेव्हां तें
लेंकरूं वाढलें व आत्म्याने बळावलें, आणि इस्राएलास त्या
च्या प्रसिद्ध होण्याच्यां दिवसापर्यंत, रानांमध्यें होतें ॥

पर्व २॥ १ आणि त्यां दिवसांत हें जालें, काइसार
आउगूस्तस। याजवळून अवघ्या वस्तीवटीची झडती लिहायाची
आज्ञा निघाली॥ २ कुरेनयस अरामाचा अधिकारी असतां,
हें पहिलें झडतीलिहिणें जालें होतें॥ ३ आणि प्रत्येक आ
पापल्या नगरांत, झडती लिहून द्यावयास सर्व गेले॥ ४
तेव्हां योसेफही, तो दावीदाचें घराणें व गोत्र यांती
ल होता, „यावरून गालीलांतून नासरेथ नगरापासून
यहूद्यांत दावीदाचें नगर, जें बेथलेहेम ह्मटलें, तेथे यासाठीं प

ढला ।५ कीं आपण। मागणीने केलेली आपली स्त्री मारया
दूजसुद्धां। झडती लिहून घावी। ती गरोदर असतां। ६ असें
जालें। कीं तीं तेथे असतांना तिच्या प्रसूत होण्याचे दिवस पुर्ण आ
ले॥ ७ तेव्हां ती आपल्या प्रथम जालेल्या पुत्राला प्रसवली। आ
णि त्याला बाळंत्याने गुंडाळलें। तेव्हां त्यांस उतारशाळेंत जागा
नव्हती। यावरून तिने त्याला गव्हाणींत निजविलें ※ ८ आ
णि त्याच प्रांतांत मेंढपाळ रात्रीं माळांत राहात आणि आ
पल्या कळपावर चौकी करीत होते॥ ९ तेव्हां पाहा। त्यां
च्या जवळ प्रभूचा दूत उभा ठाकला। आणि प्रभूचें तेज त्यां
च्या भोंवतें प्रकाशलें। ह्मणोन ते फार भयाने भ्याले॥
१० तेव्हां दूत त्यांस बोलिला। भिउं नका। कारण कीं। पा
हा। जो मोठा आनंद प्रत्येक प्रजेला होईल। त्याचें सुवर्तमान
मी तुह्मांस सांगतों॥ ११ कीं तारणारा। जो खीस्त प्रभू
आहे। तो दावीदाच्या नगरांत आज तुह्मासाठीं जन्मला आहे॥
१२ आणि हेंच तुह्मास खुण। बाळक बाळंत्याने गुंडाळ
लें असतां। गव्हाणींत निजविलें तुह्मास सांपडेल॥ १३ म
ग आकाशी सैन्याचा भरणा दुतासहीत अकस्मात जाला। त्यानी
देवाला स्तवितांना ह्मटलें। परमउंचांमध्यें देवाला गौरव, १४
पृथ्वीवरही शांती। माणसांचीं संतुष्टता॥ १५ आणि जेव्हां
ते दूत त्यांपासून आकाशांत गेले। तेव्हां असें जालें, कीं ते मेंढपा
ळ मनुष्य येकमेकांस बोलिले। चला। आपण बेथलेहेमापावें
तों पलिकडे जाउं, आणि ही जालेली गोष्ट। जी प्रभूने आ
ह्मास कळविली। ती पाहूं॥ १६ तेव्हां ते उतावळी करून
आले। आणि त्यानी मारया व योसेफ व गव्हाणींत निजविलेलें
बाळकही, यांचा शोध काढिला॥ १७ मग त्यानी पाहि
ल्यावर। त्या लेंकराविषईं जी गोष्ट आपणांस सांगीतली
होती। तीच्या विषईं प्रगट कळविली॥ १८ नंतर सर्व ऐ
कणारे। आपणांस मेंढपाळांकडून जीं सांगीतलीं। त्यांविषईं आ
श्चर्यंत जाले॥ १९ आणि मारयेने आपल्या चित्तांत ह्यां स

वे गोष्टीचें मनन करून संरक्षण केलें ॥ २० तेव्हां मेंढपा
ळ। आपणांस जशीं सांगीतलीं होतीं। तशीं जीं आपण ऐ
किलीं व पाहिलीं। त्यां अवघ्यांवरून देवाला गौरवितां व
स्तवितां। माघारें फिरले ※

२१ मग जेव्हां लेंकराची सुंता करण्याचे आठ दिवस पूर्ण जा
ले। तेव्हां त्याचें नांव येशू ठेविलें गेलें। हें नांव। त्याचा
गर्भ पोटांत धरल्यापूर्वीं दुताकडून दिल्हें होतें ※

२२ आणि मोशाच्या धर्मनेमाप्रमाणे तीच्या शुद्ध करण्याचे
दिवस पूर्ण जाल्यानंतर। त्यानी त्याला वर्ते यरूशलेमास याशाठीं
आणिलें। कीं २३ जसें प्रभूच्या धर्मनेमांत हें लिहिलेलें। प्र
त्येक नर जो गर्भस्थानास मोकळें करितो। तो प्रभूसाठीं पवि
त्र ह्मटला जाईल। तसें प्रभूजवळ सादर ठेवावें। २४ आणि
प्रभूच्या धर्मनेमांत सांगीतल्याप्रमाणे पारव्यांचा जोडा। किंवा
कबुतरांचीं दोन पिलें। [असा] यज्ञ अर्पावा ※ २५ तेव्हां
पाहा। माणुस ज्याचें नांव शिमोन। असा यरूशलेमांत होता।
आणि हा माणुस नीतिवंत व धर्मशील। इस्राएलाच्या शांतवना
ची वाट पाहात [होता।] त्याला पवित्र आत्माही होता॥
२६ आणि आपण प्रभूच्या ख्रीस्ताला पाहिल्यापूर्वीं। मर
ण पाहाणार नाहीं। असें पवित्र आत्म्याकडून त्याला प्रबोध
जाला होता॥ २७ तेव्हां तो आत्म्यायुक्त देवळांत आला। आ
णि आईबापानी। आपण लेंकरूं येशू याविषईं धर्मनेमा
च्या लावलेल्या रीतीप्रमाणे करावें। ह्मणोन जेव्हां त्याला
आंत आणिलें। २८ तेव्हां त्याने त्याला अपल्यां हातांमध्यें घेतलें।
मग देवाची स्तुती केली आणि ह्मटलें। २९ आतां हे स्वामी।
तुझ्या गोष्टीप्रमाणे तुझ्या सेवकाला शांतीने सोडितोस। ३० या
स्तव कीं। माझ्या डोळ्यानी तुजकडील तारण पाहिलें। ३१ जें त्वां
आवघ्यां प्रजांच्या दृष्टीस सिद्ध केलें तें। ३२ राष्ट्रांच्या प्रकाशा[सा
ठीं।] आणि तुझ्या इस्राएल प्रजेच्या गौरवासाठीं उजेड॥
३३ तेव्हां ह्माविषईं जीं सांगीतलीं। त्यांवरून योसेफ व

त्याची आई। यानी आश्चर्य केलें॥ ३४ शिमोनानें त्यांस आशिर्वादही दिल्हा। आणि त्याची आई मारया इला ह्मटलें। पाहा। इस्त्राएलांत बहुतांचें पडणें व फिरोन उठणें। यांकरितां। आणि अपवादलेख्या खुणेकरितां हाच घातला आहे। ३५ तुझ्याच स्वजिवांतूनही तरवार पार जाईल। [हीं] अशाखव। कीं बहुतांच्या हृदयांतील कल्पना प्रगट व्हाव्या ॥ ३६ आणि आशेराच्या वंशांतील। फानुवेलाची कन्या हान्ना भविष्यभाषीण होती॥ ती फार दिवसानी सरसावली होती। आपल्या कुंवारपणापासून नवऱ्यासहीत सात वर्षे राहिली। ३७ आणि सुमारें चौऱ्याशीं वर्षांची विधवा [होती॥] ती रात्रंदिवस उपास व प्रार्थनां यांकडून सेवा करीत असतां। देवळापासून गेली नाहीं॥ ३८ तिनेही त्याच क्षणीं जवळ येउन। प्रभूसीं आभारमान पत्करला। आणि यरूशलेमांत सर्व जे सुटकाखंडणीची वाट पाहात होते। त्यांस त्याविषईं सांगीतलें॥ ३९ नंतर प्रभूच्या धर्मनेमाप्रमाणे अवघीं समाप्त केलीं असतां। तीं गालीलांत आपलें नगर नाजारेथ तेथे माघारें गेलीं॥ ४० आणि तें लेंकरूं वाढलें। व ज्ञानेंकरून पूर्ण असतां। आत्म्याने बळवान जालें। आणि देवाची कृपा त्यावर होती॥

४१ तेव्हां त्याचीं आईबापें प्रति वर्षीं वल्हांडण सणाला यरूशलेमास जात होतीं॥ ४२ आणि जेव्हां तो बारा वर्षांचा जाला। तेव्हां तीं सणाच्या रीतीप्रमाणे यरूशलेमास गेलीं॥ ४३ मग ते दिवस समाप्त करून। तीं माघारें जात्या वेळेस। तो मुल येशू यरूशलेमामध्यें मागें राहिला। आणि योसेफाला व त्याच्या आईला कळलें नाहीं॥ ४४ परंतु तो संगत्यांत आहे। असें तीं लेखून दिवसाची वाट चालून गेलीं। नंतर नातलगांमध्यें व वोळखी यांमध्यें। त्यानी त्याचा फार शोध केला॥ ४५ परंतु तो त्यांस न सांपडून। तीं त्याचा शोध करीत यरूशलेमास माघारें गेलीं॥ ४६ आणि

तीन दिवसांनंतर असें जालें। तो देवळांत। उपदेशकांमध्यें
बसलेला। त्यांचें ऐकतां व त्यांस प्रश्नही करितां। त्यांस सां
पडला॥ ४७ तेव्हां ज्या सर्वांनी त्याचें ऐकिलें। ते त्याची बु
द्धी आणि उत्तरें यांवरून थक्क जाले॥ ४८ तेव्हां हीं त्याला
पाहून विस्मीत जालीं॥ आणि त्याची आई त्याला बोलिली।
हे मुला। त्वां आह्मास असें कां केलें? पाहा। तुझा बापाने आ
णि म्या खेद करीत तुझा शोध केला आहे॥ ४९ तेव्हां
तो त्यांस बोलिला, तुह्मीं कशाकारणें माझा शोध केला? माझ्या
बापाचीं जीं यांमध्यें मला व्हावें लागतें। हें तुह्मास ठाऊक
नाहीं कीं काय? ५० परंतु त्याने जी गोष्ट त्यांस ह्मटली।
ही तीं समजलीं नाहींत॥ ५१ मग तो त्यांसंगातें खालीं जा
ऊन नाजारेथास आला, आणि त्यांच्या स्वाधीन हो
ता॥ परंतु त्याची आई ह्या सर्व गोष्टी आपल्या चित्तांत
राखीत राहिली॥ ५२ येशूही ज्ञान व वाढणें यांत। आ
णि देव व माणसें यांकडील कृपा, ईंत सरसावला ※
पर्व ३॥ १ मग तिबेरयस काईसार याच्या अधिकाराच्या
पंधराव्या वर्षी। पंतयस पिलातस यहूदाचा अधिकारी असतां।
आणि हेरोद गालीलाचा चैाथाईदार असतां। आणि त्याचा
भाउ फिलीप्पस इतुराई व त्राखोनितीस देशाचा चैाथाईदार
असतां, आणि लुसानयास आबिलेनेचा चैाथाईदार असतां।
२ हान्नान व कायाफा यांच्या मुख्य उपाध्यपणांत। देवाची
गोष्ट जखार्याचा पुत्र जो योहान्न त्याजवळ रानामध्यें प्राप्त जा
ली॥ ३ आणि तो पापांच्या सुटकेसाठीं पश्चात्तापाचा बाप्ती
स्मा गाजवितां यार्देनेच्या सर्व जवळल्या जागेंत असा आला।
४ कीं यशाया भविष्यवाद्याच्या गोष्टींच्या पुस्तकामध्यें लिहून
सांगीतलें। रानांत ओरडणाऱ्याचा शब्द। [कीं] प्रभूचा मार्ग
सिद्ध करा। त्याच्या वाटा नीट करा। ५ प्रत्येक खोरा भ
रला जाईल। आणि प्रत्येक डोंगर व टेंकडी नीच केलीं जा
तील। जीं वांकडीं तीं ही सरळ असीं। आणि जे खर्बरीत

तें गुळगुळीत असे मार्ग होतील। ६ आणि सगळी मासजात
देवाकडलें तारण पाहील॥ ७ तेव्हां जे समुदाय त्याकडून बा
प्तिस्मा घ्यावयास बाहेर गेले। त्यांस तो बोलिला, अहो सापां
चे उपज। होणार रागापासून पळावें। ह्मणोन कोणी तुह्मा
स सुचविलें? ८ तर पश्चात्तापाचीं योग्य फळें द्या। आणि
आब्राहाम आमचा पितर आहे। असें आपणांमध्यें बोलूं ला
गुं नका। मी तुह्मास कारण सांगतों। कीं आब्राहामासाठीं लें
करांव ह्यां दगडांपासून उठवायास, देव शक्तीमान आहे॥
९ आणि आतांही झाडांच्या मुळाजवळ कुह्राड ठेविली आहे।
यास्तव जें प्रत्येक झाड चांगलें फळ देत नाहीं, तें तोडुन
टाकिलें जातें। आणि अग्नींत घातलें जातें॥ १० तेव्हां समु
दाय त्याला पुसतां बोलिले। तर आह्मी काय करूं? ११ म
ग तो उत्तर देतां त्यांस ह्मणतो। ज्याला दोन अंगरखे आ
हेत। तो ज्याला नाहीं त्याला देवो। आणि ज्याला अन्नें आहेत,
तो तसेंच करो॥ १२ तेव्हां करघेणारेही बाप्तिस्मा घ्यावया
स आले, आणि त्याला बोलिले, हे गुरू, आह्मी काय करूं?
१३ नंतर तो त्यांस बोलिला, तुह्मास जें नेमिलें, त्याहून कांहीं अ
धीक उगवुं नका॥ १४ तेव्हां सैनीकही त्याला विचारितां बोलि
ले, आह्मीही काय करूं? मग तो त्यांस बोलिला। कोणावर
बळात्कार करूं नका। बालांटही घेउं नका। आणि आपल्यां वे
तनानी तृप्त व्हा॥ १५ तेव्हां लोक वाट पाहात असतां। आ
णि योहान्नाविषईं, हाच ख्रीस्त असेल कीं काय? असें सर्व
आपल्यां हृदयांत विचार करीत असतां, १६ योहान्न उत्त
र देतां अवघ्यांस बोलिला। मी पाण्याने तुमचा बाप्तिस्मा क
रितों खरें, परंतु मजहून जो शक्तिमान, ज्याच्यां जोड्यां
चा बंद सोडायास मी योग्य नाहीं, तो येत आहे। १७ तो
च, पवित्र आत्म्याकडून आणि अग्नीकडून, तुमचा बाप्तिस्मा
करील। त्याचें सूप त्याच्या हातांत [आहे।] आणि तो आ
पलें खळें पूर्ण निर्मळ करील। आणि गहूं आपल्या कोठारीं

त येकवट करील। परंतु भूसाला न विझवत्या अग्नींत जाळून
टाकील॥ १८ त्याने तरीं बहुतच दुसरेही संबोध करितां।
लोकाला सुवर्तमान सांगीतलें॥ १९ परंतु हेरोद। जो चौथा
ईदार। तो आपला भाउ फिलीप्पस याची बायको। जी हेरो
द्यास तिजविषईं। आणि अवघीं जीं वाईट हेरोदानें केलीं
होतीं। त्यांविषईं याकडून निषेधिला असतां। २० अवघ्यां
वर हेंही आणखी केलें। कीं योहान्नाला। बंदिशाळेंत कों
डिलें ※

२१ मग सर्व लोकानें बाप्तीस्मा घेतला होता। तेव्हां असें
जालें। येशूही बाप्तीस्मा घेऊन। व प्रार्थना करून। आकाश
उघडलें। २२ आणि पवित्र आत्मा शरीरी रुपानें त्यावर कबुत्रा
सारिखें उतरला। आणि आकाशांतून वाणी असतां। बोलिली
तूं माझा प्रिय पुत्र आहेस। तुझ्याने मी फार संतोषीत
जालों आहें ※

२३ तेव्हां येशू आपण। आधीन असतां। सुमारें तीस
वर्षांचा जाला। [आणि] लेखिल्याप्रमाणे योसेफाचा पुत्र होता।
तो हेलीचा। २४ तो मात्थाताचा। तो लेवीचा। तो मेलखी
चा। तो यान्नाचा। तो योसेफाचा। २५ तो मात्ताथियाचा।
तो आमोसाचा। तो नाहूमाचा। तो एसलीचा। तो नांग्गाया
चा। २६ तो माहायाचा। तो मात्ताथियाचा। तो शिमीचा।
तो योसेफाचा। तो यहूदाचा। २७ तो योहान्नाचा। तो रे
साचा। तो जरुबाबेलाचा। तो शालतियेलाचा। तो नेरीचा।
२८ तो मेलखीचा। तो आद्दीचा। तो कोसामाचा। तो एल्
मोदामाचा। तो एराचा। २९ तो योसेचा। तो अलियेजेराचा।
तो योरीमाचा। तो मात्थाताचा। तो लेवीचा। ३० तो शिमोना
चा। तो यहूदाचा। तो योसेफाचा। तो योनानाचा। तो ए
ल्याकीमाचा। ३१ तो मल्याचा। तो माईनानाचा। तो मा
त्ताथाचा। तो नाथानाचा। तो दावीदाचा। ३२ तो इशाया
चा। तो ओबेदाचा। तो बवाजाचा। तो सालमोनाचा। तो

नाहशोनाचा। ३३ तो आमीनादाबाचा। तो अरामाचा। तो
हेज्रोनाचा। तो फारेजाचा। तो यहूदाचा। ३४ तो या
कोबाचा। तो इझाकाचा। तो आब्राहामाचा। तो थाराहाचा।
तो नाहोराचा। ३५ तो सरूगाचा। तो रगूचा। तो फा
लेगाचा। तो एबेराचा। तो शालाहाचा। ३६ तो केनानाचा।
तो आर्फाक्षादाचा। तो शेमाचा। तो नोहाचा। तो लामेखा
चा। ३७ तो मथूशालाहाचा। तो हनोखाचा। तो यारेदा
चा। तो माहलालेलाचा। तो केनानाचा। ३८ तो अनोशाचा।
तो शेथाचा। तो आदामाचा। तो देवाचा ※

पर्व ४ ॥ १ तेव्हां येशू पवित्र आत्म्याने भरलेला। यार्देने
पासून माघारें गेला। मग आत्म्याने रानांत नेला असतां।
२ द्यावलसाकडून चाळीस दिवस प्रचितीस घातला गेला॥ आ
णि त्यां दिवसांत त्याने कांहीं खाल्लें नाहीं। मग ते समाप्त
झाल्यानंतर त्याला भूक लागली॥ ३ आणि द्यावलस त्याला बो
लिला। जर तूं देवाचा पुत्र आहेस। तर हा दगड भाकर
व्हावा ह्मणोन त्याला सांग॥ ४ तेव्हां येशू त्याला उत्तर दे
तां बोलिला। असें लिहिलें आहे, कीं केवळ भाकरीने नव्हे।
परंतु देवाच्या प्रत्येक गोष्टीने माणुस वांचेल॥ ५ मग द्या
वलसाने त्याला उंच डोंगरावर नेऊन। काळाच्या क्षणां
त वस्तिवटींतलीं सर्व राज्यें त्याला दाखविलीं॥ ६ आणि
द्यावलसाने त्याला ह्मटलें। हा अवघाच अधिकार व त्यांचें गौरव
तुला देईन। कां कीं। हें माझ्या स्वाधीन ठेविलें आहे।
आणि ज्या कोणाला मी इच्छितों। त्याला हें देतों। ७ या
स्तव जर तूं माझ्या समोर भक्ती करसील। तर सगळीं तुझीं
होतील॥ ८ तेव्हां येशू त्याला उत्तर देतां बोलिला। हे सैता
ना। माझ्या मागें हो। कारण। असें लिहिलें आहे। कीं
प्रभू जो तुझा देव। त्याला भज। आणि त्याची मात्र सेवा क
र॥ ९ नंतर त्याने त्याला यरूशलेमांत नेलें। आणि देवळा
च्या पांकळीवर त्याला ठेविलें। मग त्याला बोलिला। जर

तूं देवाचा पुत्र आहेस। तर आपणाला येथून खालीं टाक॥
१० कां तर। असें लिहिलें आहे। कीं तो आपल्यां दुतांस
तुजविषईं आज्ञा देईल। कीं तुझें संरक्षण करावें। ११ आणि अ
सें। कीं त्यां आपला पाय दगडावर कधीं न आपटावा। ह्म
णोन ते हातांवर तुला धरतील॥ १२ तेव्हां येशू उत्तर दे
तां त्याला बोलिला, कीं असें सांगीतलें आहे। प्रभू जो तु
झा देव। त्याला प्रचितीस घालुं नको॥ १३ तेव्हां सैतान,
ही सर्व प्रचिती समाप्त करून। [कांहीं] काळापर्यंत त्यापा
सून गेला ※

१४ तेव्हां येशू आत्म्याच्या सामर्थ्यानें गालीलांत माघारें गे
ला। तेव्हां त्याच्या विषईं आवाई संपूर्ण चहूंकडल्या ठिका
णीं बाहेर गेली॥ १५ आणि तो त्यांच्यां सभांमध्यें उपदे
शितां। सर्वांकडून गौरविला गेला॥ १६ मग जेथे त्याचा प्रती
पाळ जाला होता, तेथे नाजारेथांत आला। आणि आपल्या
चालीप्रमाणे शाब्बाथ दिवसीं सभेंत गेला। नंतर वाचायास
उभा राहिला॥ १७ तेव्हां भविष्यभाषी यशाया। याचें
पुस्तक त्याला दिल्हें गेलें। आणि त्यानें पुस्तक उघडून असें ठिका
ण काढिलें। कीं तेथे हें लिहिलें होतें। १८ दरिद्र्यांस
सुवर्तमान सांगायास। प्रभूने मला अभिषेकिलें, यास्तव त्या
चें वारें मला [आहे।] हृदय फुटलेल्यांस बरें करायास।
१९ पाडाव माणसांस सुटणें। आणि आंधळ्यांस दृष्टी पाव
णें। हीं गाजवायास, चेंचलेल्यांस मोकळिकेने लावायास, प्र
भूचें मान्य वर्ष गाजवायास त्यानें मला पाठविलें आहे॥
२० तेव्हां त्यानें पुस्तक गुंडाळून। सेवकाजवळ देऊन बस
ला॥ आणि सभेमध्यें सर्वांचे डोळे त्याकडे लागले होते॥
२१ मग तो त्यांस बोलता जाला। कीं आज हा लेख तुमच्यां
कानांसीं पूर्ण जाला आहे॥ २२ तेव्हां सर्वांनी त्याजविषईं सा
क्ष दिल्ही, आणि ज्या कृपेच्या गोष्टी त्याच्या मुखांतून नि
घाल्या। त्यांवरून आश्चर्य करितांना ह्मटलें। हा योसेफाचा

पुत्र नाहीं कीं काय? २३ नंतर तो त्यांस बोलिला। सर्व
था तुह्मी हा दाखला मला ह्मणाल। हे वैद्या। तूं आपणा
ला निरोगी कर। कापेर्णाह्मांत जालेलीं जितकीं आह्मी ऐ
किलीं। तितकीं येथे आपल्या देशांत कर॥ २४ तेव्हां तो
बोलिला। मीं तुह्मास खचीत सांगतों। कीं कोणी भविष्य
भाषी आपल्या देशांत मान्य नाहीं॥ २५ आणि मी तुह्मास
खरेपणाने ह्मणतों। एलीयाच्यां दिवसांत। जेव्हां तीन वर्षे
आणि साहा महिन्यांपर्यंत आकाश असें बंद जालें कीं सर्व देशाम
ध्यें मोठा दुकाळ जाला। तेव्हां इस्राएलांत बहुत विधवा हो
त्या॥ २६ परंतु यांतील कोणतीच्या जवळ एलीया पाठ
विला नव्हता। केवळ ओदोनाकडील जारफाथ यांत विधवा
बायको हिच्या जवळ॥ २७ आणि भविष्यभाषी अलीशा याच्या
वेळेस। इस्राएलांत बहुत कोढी होते। परंतु यांतील को
णी शुद्ध केला नव्हता। केवळ नामान जो अरामी तो॥
२८ तेव्हां सभेमध्यें सर्व हीं ऐकून रागाने भरले। २९ आ
णि उठून त्याला नगराच्या बाहेर घालविलें। मग ज्या डोंग
रावर आपलें नगर रचिलें होतें। त्याच्या कड्यापर्यंत त्याला
खालीं लोटून द्यावयास नेलें॥ ३० परंतु तो त्यांच्या मधून
जाऊन निघाला ॐ

३१ आणि गालीलांतील नगर कापेर्णाह्मम। यांत खालीं
आला। तेव्हां शाब्बाथांमध्यें तो त्यांस शिकवीत होता॥ ३२ आ
णि त्याची गोष्ट पराक्रमासुद्धां जाली। यास्तव त्याच्या उपदे
शावरून ते विस्मीत जाले॥ ३३ आणि सभेंत अशुद्ध भूता
चा आत्मा लागलेला माणुस होता। तेव्हां तो मोठ्या शब्दा
ने ओरडून ३४ बोलिला। अहं। येशू नाजारेकरा। आह्मासीं
व तुजसीं काय? आमचा नाश करावयास आलास कीं काय?
तूं कोण आहेस हें मला कळलें। देवाचा पवित्र तो॥ ३५ ते
व्हां येशू त्याला धमकावून बोलिला। उगा ऐस। आणि
त्यांतून नीघ॥ मग भूत त्याला मध्यांत पाडून। त्याला

कांहीं उपद्रव न देतां । त्यांतून निघालें ॥ ३६ तेव्हां सर्वां
स विस्मय जाला। आणि एकमेकांशीं संभाषण करितां बोलि
ले। ही गोष्ट काय? कीं हा अधिकाराने व सामर्थ्याने अप
वित्र आत्म्यांस आज्ञा देतो। मग ते निघतात॥ ३७ आ
णि त्याविषईंचा नाद चहूंकडील सर्व ठिकाणांत बाहे
र गेला ※

३८ नंतर तो उठून सभेपासून शिमोनाच्या घरांत गेला।
आणि शिमोनाच्या सासूला मोठा ताप लागला होता। तेव्हां
तिच्या साठीं त्यांनी त्याजवळ काकुळती केली॥ ३९ नंतर त्या
ने तिच्या वर जवळ उभें राहून तापाला धमकाविलें। मग
याने तिला सोडिलें। आणि तिने तेव्हांच उठून त्यांची सेवा
केली ※ ४० मग सूर्य मावळल्यावर। जितक्यांजवळ नाना रो
गानी दुखणाईत होतीं। यांस त्या सर्वांनी त्याच्या जवळ आ
णिलें। आणि त्याने। त्यांतील प्रत्येकावर [आपले] हात ठेवून
त्यांस निरोगी केलें॥ ४१ आणि भुतेंही। हे देवाचा पुत्र
ख्रीस्त आहेस: असें ओरडतांना बोलतां। बहुतांतून निघालीं॥
आणि त्याने त्यांस धमकावून। हा ख्रीस्त आहे। हें त्यांस
कळलें ह्मणोन बोलुं दिलें नाहीं॥ ४२ मग दिवस लागल्या
वर। तो बाहेर जाऊन वोसाड जाग्यांत गेला॥ तेव्हां समुदा
यानी त्याला शोधिलें। आणि त्याकडे आले। मग आपणां
पासून त्याने न जावें। ह्मणोन त्याजवळ आग्रह केला॥
४३ परंतु तो त्यांस बोलिला। कीं दुसऱ्यां नगरांतही देवाच्या
राज्याचें सुवर्तमान सांगण्याचें अगत्य मला आहे। कां कीं।
यासाठीं मला पाठविलें आहे॥ ४४ आणि तो गालीलाच्यां
सभांमध्यें गाजवीत गेला ※

पर्व ५ । १ आणि समुदाय देवाची गोष्ट ऐकायास त्याज
वर लोटला। तेव्हां असें जालें। कीं तो गेन्नेसरेत डोहाज
वळ उभा होता। २ आणि त्याने डोहाच्या कडेस दोन ता
रवें पाहिलीं॥ तेव्हां ढीवर। त्यांवरून उतरले असतां। जा

ळीं धूत होते॥ ३ आणि त्यां तारवांमधील येक। जें शिमो
नाचें होतें। यावर त्यानें चढून त्याच्या जवळ मागीतलें। कीं
कांठापासून थोडें पलिकडे लोटावें। मग त्याने बसून समुदा
यांस तारवांतून उपदेशिलें ✣ ४ नंतर त्याने बोलणें समाप्त के
ल्यावर शिमोनाला ह्मटलें। पुढें खोलवटींत लोट। आणि ध
रण्यासाठीं आपलीं जाळीं खालीं सोडा॥ ५ तेव्हां शिमोन त्या
ला उत्तर देतां बोलिला। हे स्वामी। आह्मी सारी रात्र श्र
म करून कांहीं पावलों नाहीं। परंतु तुझ्या शब्दावरून जाळें
खालीं सोडीन॥ ६ मग त्यानी हें केल्यावर। माशांचा मोठा
घोळका वेढिला। आणि त्यांचें जाळें फाटतें जालें॥ ७ तेव्हां
दुसऱ्या तारवामध्यें जे भागिदार। त्यानी येऊन ह्यांचें साह्य
करावें। ह्मणोन ह्यानी त्यांस खुणाविलें। मग ते आले। आ
णि त्यानी दोन्हीं तारवें येवढीं भरलीं। कीं तीं बुडत हो
तीं॥ ८ तेव्हां शिमोन पेत्रस पाहून। येशूच्यां गुडघ्यांजवळ
पडून बोलिला। हे प्रभू। मी पापी माणुस आहें। यास्तव मा
झ्या पासून जा॥ ९ कां कीं। माशांची धरणी जी त्यांस मि
ळाली होती। तो पाहून त्याला व त्याजवळच्यां सर्वांस वि
स्मयाने व्यापिलें। १० आणि जेबेदीचे पुत्र। याकोब व यो
हान्न। जे शिमोनाचे भागिदार होते। त्यांसही तसेंच॥ तेव्हां
येशू शिमोनाला बोलिला। भिउं नको। आतांपासून तूं मा
णसांस धरितां होसील॥ ११ मग ते तारवांस कांठीं लावून
अवघेंच सोडून त्याच्या मागें गेले ✣

१२ आणि तो येक्या नगरांत होता। तेव्हां असें जालें।
कीं पाहा। कोढाने भरलेला माणुस [होता।] आणि तो ये
शूला पाहून तोंडावर पडतां। त्याची प्रार्थना करीत बोलिला।
हे प्रभू। जर तुझी इछा असेल। तर तूं मला शुद्ध कराया
स शक्तिमान आहेस॥ १३ तेव्हा तो [आपला] हात लांबवून
त्याला शिवून बोलिला। मी इछितों। तूं शुद्ध हो। आणि
तेव्हांच कोढ त्यापासून निघालें॥ १४ मग त्याने त्याला नि

क्षूण सांगीतलें। कीं कोणास न सांगावें। परंतु जाऊन आपणाला उपाध्याजवळ दाखेव। आणि जसें मोश्याने नेम लाविला त सें त्यांस साक्ष [व्हावी।] यासाठीं तुझ्या शुद्ध होण्याविषईं अ र्पण कर॥ १५ तथापि त्याविषईंची गोष्ट अधीकच पसरली॥ मग बहुत समुदाय। ऐकायास आणि त्याकडून आपल्यां रो गांपासून निरोगी केले जाण्यास मिळाले॥ १६ तेव्हां तो रा नांमध्यें येकांतीं जात व प्रार्थीत होता ॐ

१७ नंतर येक्या दिवसीं असें जालें। कीं तो उपदेशीत होता। आणि फारिशी व धर्मनेमाचे उपदेशक। जे गालीलां तील प्रती गांव व यहूद व यरूशलेम यांपासून आले। ते बसले होते। आणि त्यांस निरोगी करायास प्रभूचें सामर्थ्य [प्र गट] जालें ॐ १८ तेव्हां पाहा। माणुस जो वातरोगी हो ता। याला माणसानी बाजेवर आणिलें। आणि याला आंत नेऊन त्याच्या समोर ठेवायास ते झटले॥ १९ परंतु त्याला क शाने आंत न्यावें ह्मणोन समुदायामुळें न पावून। त्यानी ग च्चीवर चढून ह्याला बाजेसुद्धा। कवल्हारांतून येशूच्या समोर मध्यें उतरविलें॥ २० तेव्हां तो त्यांचा विश्वास पाहून त्याला बोलिला। हे माणसा। तुझीं पापें तुला सोडिलीं आहेत॥ २१ तेव्हां पंडित आणि फारिशी विचार करूं लागतां बोलि ले। जो दुर्भाषणें बोलतो। हाच कोण आहे? केवळ देव या वांचून कोण पापांस सोडुं शकतो? २२ परंतु येशू त्यांचे वि चार जाणून उत्तर देतां त्यांस बोलिला। तुह्मी आपल्यां ह्र दयांत विचार कां करितां? २३ तुझीं पापें तुला सोडिलीं। हें बोलणें। किंवा ऊठ आणि चाल। हें बोलणें। यांत सोपें असें कोणतें? २४ परंतु मनुष्याच्या पुत्राला पृथ्वीवर पापांची सुट करण्याचा अधिकार आहे। हें तुह्मी जाणावें ह्मणोन। मी तुला सांगतों। ऊठ। आणि आपली बाज उचलून आप ल्या घरास जा। [असें] तो वातरोग्याला बोलिला॥ २५ आ णि तेव्हांच तो त्यांच्या समोर उठून। जिजवर निजला ती

उचलून तेथून। देवाची स्तुती करीत। आपल्या घरास गेला॥
२६ तेव्हां विस्मयाने अवघ्यांस व्यापिलें। मग त्यानी देवाला
गौरविलें। आणि भयाने भरून ह्मटलें। कीं आह्मी आ
ज असंभाव्यें जीं तीं पाहिलीं आहेत ※

२७ आणि यांनंतर तो बाहेर गेला। तेव्हां लेवी नांवें कर
घेणारा करचौकीवर बसला असतां। याला पाहिलें। आणि या
ला ह्मटलें। माझ्या मागें ये॥ २८ नंतर तो। आवघ्यांसच सो
डतां। उठून त्याच्या मागें गेला॥ २९ आणि लेवीने आप
ल्या घरीं त्याच्या साठीं मोठी जेवणावळ केली॥ तेव्हां करघे
णारे यांचा। आणि दुसरे। जे त्यांच्या बरोबर जेवायास बस
ले होते। यांचा मोठा समुदाय होता॥ ३० परंतु त्यांचे पं
डित आणि फारिशी ह्याच्या शिष्यांसीं कुरकुरतां बोलिले। क
रघेणारे आणि पापी यांच्या बरोबर तुह्मी कशाला खातां व
पितां? ३१ तेव्हां येशू उत्तर देतां त्यांस बोलिला। निरोग्यां
स वैद्याचें अगत्य नाहीं। परंतु दुखणेकऱ्यांस आहे॥ ३२ पु
ण्यवानांस नव्हे। परंतु पाप्यांस पश्चात्तापासाठीं बोलावायास मी
आलों आहें ※

३३ तेव्हां त्यानी त्याला ह्मटलें। हें कशासाठीं। योहा
न्नाचे शिष्य आणि तसेंच फारिश्यांचे हे वारंवार उपास करिता
त। आणि प्रार्थना करितात। परंतु तुझे जे। ते खातात आ
णि पितात? ३४ तेव्हां तो त्यांस बोलिला। वऱ्हाडसख्यांब
राबर नवरा आहे। तोंपर्यंत त्यांस उपास करवुं शकतां कीं
काय? ३५ परंतु जेव्हां नवरा त्यांपासून काढला होईल।
असे दिवस येतील। तेव्हां त्यां दिवसीं ते उपास करतील ※
३६ आणि त्याने त्यांस दाखलाही सांगितला। कीं जुन्या
वस्त्राला नव्या वस्त्राचें थिगळ कोणी न लाविता। आणि जर
अन्यथा, तर नवें [जुन्याला] फाडितें, नव्याचें थिगळ जुन्या
ला संगतही होत नाहीं॥ ३७ आणि नवा द्राक्षरस जुन्यां बुध
ल्यांत कोणी न घालतो। आणि जर अन्यथा। तर नवा द्राक्ष

रस बुधल्यांस फोडील। आणि तो ओघळेल। बुधलींही नाश
तील॥ ३८ परंतु नवा द्राक्षरस नव्या बुधल्यांत घातला अ
सावा। मग दोन्हीं राखिलीं जातात॥ ३९ आणि कोणी जु
ना [द्राक्षरस] पिऊन। तेव्हांच नवा इच्छीत नाहीं। कां कीं तो
ह्मणतो। जुना अधीक चांगला आहे ※

पर्व ६ ॥ १ मग दुसऱ्या प्रथम शाब्बाथांत असें जालें। कीं तो
शितवांजवळून चालला। तेव्हां त्याच्या शिष्यानीं कणसें तोडलीं।
आणि हातांवर चोळून खाल्लीं॥ २ तेव्हां फारिश्यांमधून को
णी त्यांस बोलिले। शब्बाथांमध्यें जें करायास योग्य नाहीं।
तें तुह्मी कां करितां? ३ परंतु येशू त्यांस उत्तर देतां बो
लिला। दावीदाला आणि जे त्याच्या बराबर होते। त्यांस
जेव्हां भूक लागली। तेव्हां त्याने जें केलें हें तुह्मी न वाच
लें काय? ४ कीं तो देवाच्या घरांत गेला। आणि पुढें
ठेवण्याच्या भाकरी। ज्यांस खाणें हें केवळ उपाध्यांस यो
ग्य। इतरांस नव्हे। त्या त्याने घेतल्या व खाल्ल्या। आ
णि त्याच्या बराबरच्यांसही दिल्ह्या? ५ आणि तो त्यांस
बोलिला। कीं मनुष्याचा पुत्र शाब्बाथाचाही प्रभू आहे ※

६ आणखी दुसऱ्या शाब्बाथांत असें जालें, कीं त्याने सभें
त जाऊन उपदेशिलें। तेव्हां तेथे [असा] माणुस होता। कीं
त्याचा उजवा हात वाळला होता॥ ७ आणि पंडित व फा
रिशी। आपणांस ह्यावर आरोप सांपडावा। ह्मणोन ह्याला
जपिलें कीं शाब्बाथांत निरोगी करील किंवा नाहीं? ८ परंतु ह्याने
त्यांचे विचार जाणले। आणि ज्या माणसाचा हात वाळला हो
ता। त्याला बोलिला। ऊठ। आणि मध्यांत उभा राहा। म
ग तो उठून उभा राहिला॥ ९ तेव्हां येशू त्यांस बोलिला।
मी तुह्मास कांहीं पुसेन। कीं शाब्बाथांमध्यें बरें करणें। किं
वा वाईट करणें। प्राण वांचविणें। किंवा नाश करणें। [को
णतें] योग्य आहे? १० मग सभोंवतें त्या सर्वांस पाहून।
तो त्या माणसाला बोलिला। तुझा हात लांब कर। तेव्हां त्या

ने तसें केलें। आणि त्याचा हात दुसऱ्यासारिखा पूर्ववत ब
रा जाला॥ ११. मग ते मिढुद्धीने भरले। आणि येकमेकांसीं
ह्मणाले। आपण येशूला काय करावें? ※

१२ त्यां दवसीं। असें जालें। तो प्रार्थना करायास डोंगराला
बाहेर गेला। आणि सगळी रात्र देवाची प्रार्थना करीत राहि
ला॥ १३ मग दिवस लागल्यावर। त्याने आपल्यां शिष्यांस जवळ
बोलावलें। आणि त्यांतून बारा। ज्यांसही प्रेषितनांव ठेविलें। हे नि
वडले। १४ शिमोन। ज्याला त्याने पेत्रसही नांव ठेविलें। तो व
त्याचा भाउ आंद्रियास। याकोब व योहान्न। फिलीपपस व बार्थल
मी। १५ मात्थी व थोमा। आल्फीचा याकोब व जो जेलोतिस
ह्मटला तो शिमोन। १६ याकोबाचा [भाऊ] यहूदा व यहू
दा ईस्कारयोते। हा परस्वाधीन करणाराही होता ※ १७ नं
तर तो त्यांच्या बराबर खालीं जाऊन। सपाट ठिकाणीं उभा
राहिला। तेव्हां आपल्यां शिष्यांचा समुदाय। आणि सगळा
यहूद व यरूशलेम। आणि जोर व सीदोन यांचा समुद्र
कांठ, यांपासून लोकाचा मोठा भरणा [होता।] हे त्याचें
ऐकायास। आणि आपल्यां रोगांपासून निरोगी केले जाया
स आले॥ १८ आणि जे अशुद्ध आत्म्यांकडून जाचिले। ते
[आले।] आणि बरे केले गेले॥ १९ सगळा समुदायही
त्याला शिवायास झटला। कां तर त्यांतून सामर्थ्याने निघून
अवघ्यांस निरोगी केलें ※

२० आणि तो आपल्यां शिष्यांकडे आपले डोळे वर करू
न बोलिला। अहो दरिद्री। [तुह्मी] धन्य। कां तर देवा
चें राज्य तुमचें आहे॥ २१ आतां भुकेले अहो। तुह्मी ध
न्य। कां तर तृप्त व्हाल॥ अहो जे आतां रडतां। तु
ह्मी धन्य। कां तर हांसाल॥ २२ जेव्हां माणसें तुम
चा द्वेष करितील। आणि जेव्हां तुह्मास वेगळें करितील।
आणि निंदितील। आणि मनुष्याच्या पुत्रासाठीं तुमचें नांव दु
ष्टासारिखें घालवितील। तेव्हां तुह्मी धन्य आहां॥ २३ त्या

दिवसीं तुह्मी आनंद करा। उड्डोही मारा। कां तर। पाहा।
आकाशामध्यें तुमचें फळ मोठें। यास्तव कीं। त्यांप्रमाणे त्यां
च्या पितरानी भविष्यभाष्यांशीं केलें॥ २४ परंतु तुह्मा धनव्म
नांस हायहाय। यास्तव कीं। तुह्मी आपलें शांतवन भरून
घावलां आहां॥ २५ अहो भरलेले। तुह्मास हायहाय। यास्त
व कीं। तुह्मास भूक लागेल॥ अहो आतां हांसणारे। तुह्मा
स हायहाय। यास्तव कीं। तुह्मी खेदीत व्हाल। आणि र
डाल॥ २६ जेव्हां सर्व माणसें तुह्मास बरें ह्मणतील। तेव्हां
तुह्मास हायहाय। यास्तव कीं। त्यांप्रमाणे त्यांच्या पितरानी
खोट्या भविष्यभाष्यांशीं केलें होतें॥ २७ परंतु तुह्मा ऐकणा
ऱ्यांस मी ह्मणतों। तुह्मी आपल्यां वैऱ्यांवर प्रीती करा॥ जे
तुह्मास द्वेषितात। त्यांचें तुह्मी बरें करा॥ २८ जे तुह्मास
शाप देतात। त्यांस तुह्मी आशिर्वाद द्या॥ आणि जे तुह्मास
गांजितात। त्यांसाठीं तुह्मी प्रार्थना करा॥ २९ जो तुला गाला
वर मारितो। त्याकडे दुसराही सादर कर॥ आणि जो तुझें
आंगवस्त्र घेतो। त्यापुढें आंगरख्याचाही प्रतिबंध करूं नको॥
३० आणि प्रत्येक जो तुजपाशीं मागतो। त्याला दे। आणि
तुझीं जीं तीं जो घेतो। यापासून परत मागुं नको॥ ३१ आ
णि जसें माणसानी तुह्माविषईं करावें ह्मणोन इछितां। तसेंच
तुह्मी त्यांविषईं करा॥ ३२ आणि जे तुह्मावर प्रीती करि
तात। त्यांवर जर तुह्मी प्रीती करितां। तर तुमचा कसचा
आभार आहे? कां तर। पापीही आपल्यां प्रीतिकरणाऱ्यांवर
प्रीती करितात॥ ३३ आणि जे तुमचें बरें करितात। त्यांचें
जर तुह्मी बरें करितां। तर तुमचा कसचा आभार आहे?
कां तर। पापीही तेंच करितात॥ ३४ आणि ज्यापासून पर
त घेण्याची आशा तुह्मास आहे। [त्यांस] जर तुह्मी उसनें
देतां। तर तुमचा कसचा आभार आहे? कां कीं। फिरोन ति
तकीं घ्यावयाकरितां। पापीही पाप्यांस उसनें देतात॥ ३५ प
रंतु तुह्मी आपल्यां वैऱ्यांवर प्रीती करा। व बरें करा। आ

णि कांहीं फेडाया न धरितां। उसनें द्या। मग तुह्मास मोठें फळ
होईल, आणि परात्पराचे पुत्र व्हाल। कां तर। कृतघ्न व
दुष्ट यांवर तो उपकारीक आहे॥ ३६ यास्तव। जसा तुमचा
बाप कनवाळु आहे। तसेच तुह्मीही कनवाळु व्हा॥ ३७ आ
णि तुह्मी न्याय ठरवुं नका। मग तुमचा न्याय ठरविला जा
णार नाहीं॥ दंड ठरवुं नका। मग तुमचा दंड ठरविला जा
णार नाहीं॥ सोडा। मग तुह्मी सोडिले जाल॥ ३८ द्या। आ
णि तुह्मास दिल्हें जाईल। बरें माप। दडपलें व हालविलें,
आणि वाहून सांडतां, असें तुमच्या ओंटींत देतील। कां तर,
ज्या मापानें तुह्मी मापून देतां। त्यानेच तुह्मास परत मापून दिल्हें
जाईल ॐ ३९ आणि त्यानें त्यांस दाखला सांगीतला, आंधळा
आंधळ्याला न्यावयास शकतो कीं काय? दोघेही खांचेंत पड
णार नाहींत कीं काय? ४० शिष्य आपल्या गुरुवरता नाहीं,
परंतु प्रत्येक शुद्ध शिकविलेला। तो आपल्या गुरुसारिखा हो
ईल॥ ४१ आणि तूं आपल्या डोळ्यांतील कडी ध्यानांत न
आणितांना। आपल्या भावाच्या डोळ्यांतील काडी कां पाहा
तोस? ४२ अथवा आपण आपल्या डोळ्यांतील कडी न
पाहातां। आपल्या भावाला कसें ह्मणुं शकतोस, [कीं] हे भा
वा। तुझ्या डोळ्यांतील काडी मला काढुं दे? अरे ढोंगी। प
हिलें आपल्या डोळ्यांतून कडी काहाड। आणि मग आपल्या
भावाच्या डोळ्यांतील काडी काढायास तुला बरें दिसेल॥ ४३ कां
तर वाईट फळ देतें, तें चांगलें झाड नाहीं। आणि चांगलें
फळ देतें, तें वाईट झाड नाहीं॥ ४४ यास्तव कीं। प्रत्येक
झाड आपल्या फळावरून कळतें। कारण। कांटेझाडावरू
न अंजीर वेंचीत नाहींत, आणि झुडपावरून द्राक्षघड तो
डीत नाहींत॥ ४५ चांगला माणुस। आपल्या हृदयांतील
चांगल्या संग्रहांतून। चांगलें काढितो। आणि वाईट माणुस
आपल्या हृदयांतील वाईट संग्रहांतून वाईट काढितो॥ कां
तर। हृदयांतील अतिशयांतून त्याचें तोंड बोलतें ॐ ४६ आ

णि मी जें ह्मणतों । तें तुह्मी न आचरितांना । मला प्रभू ।
प्रभू । कां ह्मणतां ? ॥ ४७ प्रत्येक जो मजकडे येतो । आणि मा
झ्या गोष्टी ऐकतो । आणि त्या आचरतो । तो कोणासारिखा
आहे । हें मी तुह्मास दाखवीन ॥ ४८ तो घर बांधत्या
माणसासारिखा आहे । याने खणून खोल करितांना पा
या कातळावर घातला । मग पूर आला असतां । त्या घराला
ओघ लागला । तथापि त्याचा पाया कातळावर घातला । ह्म
णोन त्याला हालवायास शक्तिमान न जाला ॥ ४९ परंतु जो
ऐकतो आणि आचरीत नाहीं । तो या माणसासारिखा आहे ।
[कीं] याने पायावांचून मातीवर घर बांधिलें । त्याला ओघ ला
गला । आणि तें तेव्हांच पडलें । आणि त्या घराचें आपट
णें मोठें जालें ॥

पर्व ७ ॥ १ आणि त्याने लोकाच्या ऐकण्यांत आपल्या स
र्व गोष्टी समाप्त केल्यावर । तो कापेर्णाह्मांत गेला ॥ २ ते
व्हां कोणा शतपतीचा चाकर । जो त्याला प्रिय होता । तो
दुखणाईत होऊन मरणार होता ॥ ३ नंतर त्याने येशूविष
ईं ऐकून । याने येऊन त्याच्या चाकराला निरोगी करावें
ह्मणोन त्याची विनंती करितां । यहूद्यांच्यां पुरातनांस त्याजव
ळ पाठविलें ॥ ४ आणि ते येशूच्या जवळ येऊन त्याला आग्र
हाने विनंती करीत बोलिले । कीं ज्यासाठीं हें करायाचें ।
तो योग्य आहे । ५ कारण कीं । तो आमच्या राष्ट्रावर प्रीती क
रितो । आणि त्याने आह्मासाठीं सभा बांधिली ॥ ६ मग ये
शू त्यांबराबर गेला । आणि तो तेव्हां घरापासून लांब न
सतां । त्या शतपतीने त्याजवळ मित्रांस पाठवून त्याला ह्मट
लें । हे प्रभू । श्रम करूं नको । कारण कीं । त्वां माझ्या छ
पराखालीं यावें । ह्मणोन मी योग्य नाहीं ॥ ७ यासाठीं हीं
म्या आपणाला तुजकडे येण्यास योग्य मोजिलें नाहीं । परंतु
तूं शब्द बोल । आणि माझा चाकर निरोगी होईल ॥ ८ कां
कीं । मीही अधिकाराखालीं ठेविलेला माणुस आहें । माझ्या खा

कीं येनीक असतांना। त्याला मी सांगतों। तूं जा। तेव्हां तो
जातो। आणि दुसऱ्याला ये। तेव्हां तो येतो। आणि मा
झ्या चाकराला। हें कर। तेव्हां तो करितो॥ ९ मग ये
शूने हीं ऐकून त्याविषईं आश्चर्य केलें। आणि मुरडुन, स
मुदाय जो त्याच्या मागें चालत होता, त्याला ह्मटलें। मी
तुह्मास सांगतों। इस्राएलांतही येवढा विश्वास मला सांपडला
नाहीं॥ १० नंतर जे पाठविले होते, तें माघारें घरास गे
ल्यावर, जो चाकर रोगी होता, तो त्यांस निरोगी सां
पडला ※

११ मग पुढील दिवसीं हें जालें। तो नाईन ह्मटलेल्या
नगरास गेला। आणि त्याचे बहुत शिष्य व मोठा समुदाय
त्यासंगातें गेले॥ १२ नंतर जेव्हां तो नगराच्या वेसीजवळ
आला होता, तेव्हां पाहा। येक मेलेला बाहेर नेला होता॥
तो आपल्या आईचा येकुलता पुत्र। तीही विधवा [होती॥]
आणि त्या नगराचा मोठा समुदाय तिच्या बराबर होता॥
१३ तेव्हां प्रभू तिला पाहून तिजवर कळवळला। आणि ति
ला बोलिला रडुं नको॥ १४ मग तो जवळ येऊन। ता
टीस शिवला। आणि खांदेले उभे राहातांना, तो बोलिला।
तरुणा। मी तुला सांगतों। ऊठ॥ १५ तेव्हां तो मेलेला उ
ठुन बसला। आणि बोलुं लागला। मग त्याने तो त्याच्या
आईला दिल्हा॥ १६ नंतर अवघ्यांस भय लागलें। आणि
ते देवाला गौरवीत बोलिले। कीं आह्मामध्यें मोठा भविष्यभाषी
उठला आहे। आणखी देवाने आपल्या लोकाची भेट घेतली
आहे॥ १७ मग त्याविषईं ही गोष्ट बाहेर सगळ्या यहूदांत
आणि सगळ्या चहूंकडल्या देशांत गेली ※

१८ तेव्हां यां अवघ्यांविषईं योहान्नाच्या शिष्यानी त्याला
निवेदन केलें॥ १९ आणि योहान्नाने आपल्यां शिष्यांतील
कोणां दोघांस जवळ बोलावून। येशूला सांगून पाठविलें [कीं।]
काय जो यावयाचा तो तूं आहेस। किंवा आह्मी दुसऱ्याची

वाट पाहावी? २० आणि ते मनुष्य त्याजवळ येऊन बोलिले।
योहान्न जो बाप्तीस्मा देणारा। त्याने आह्मास तुझ्या जवळ
सांगून पाठविलें [कीं।] काय जो यावयाचा तो तूं आहेस।
किंवा आह्मी दुसऱ्याची वाट पाहावी? २१ तेव्हां त्याच घटि
केस। त्याने बहुतांस। दुखणीं व पटक्या व दुष्ट आ
त्मे। यांपासून बरें केलें। आणि बहुत आंधळ्यांवर दृष्टी पा
डण्याचा उपकार केला॥ २२ मग येशू उत्तर देतां त्यांस
बोलिला। तुह्मी जें पाहिलें आणि ऐकिलें तें। जाऊन।
योहान्नाला सांगा। कीं आंधळे पाहातात। लंगडे चालतात।
कोढी शुद्ध होतात। बहिरे ऐकतात। मेलेले उठतात। दरि
द्र्यांसही सुवर्तमान सांगीतलें आहे। २३ आणि जर कोणी
मजविषईं अडखळत नाहीं। तर तो धन्य आहे※ २४ म
ग योहान्नाचे दूत तेथून गेल्यानंतर। तो योहान्नाविषईं
समुदायांस बोलूं लागला। तुह्मी रानांत काय पाहायास बा
हेर गेलां? वाऱ्याने हालविलेली कांडी कीं काय? २५ तर
तुह्मी काय पाहायास बाहेर गेलां? मउ वस्त्रें ल्यालेला मा
णुस कीं काय? पाहा। तेजस्वी वस्त्रें व मिष्टान्न यांकडून अ
सतात। ते राजांमध्यें आहेत॥ २६ तर काय पाहायास तु
ह्मी बाहेर गेलां। भविष्यभाषी कीं काय? होय मी तुह्मा
स सांगतों। आणि भविष्यभाष्याहून फार अधीक॥ २७ ज्या
विषईं लिहिलें। [कीं] पाहा। तुझ्या तोंडापुढें मी आपला
असा दूत पाठवितों। कीं तुझी वाट-तुझ्या समोर सिद्ध क
रील। तो हाच आहे॥ २८ कां तर। मी तुह्मास सांगतों
जे बायकांपासून जन्मले। यांमध्यें योहान्न जो बाप्तीस्मा देणा
रा। यापेक्षां कोणी भविष्यभाषी थोर नाहीं। तथापि देवा
च्या राज्यांत जो धाकटाच। तो त्यापेक्षां थोर आहे॥ २९ आ
णि सर्व लोक। करघेणारेही। यांनी ऐकून योहान्नाचा बाप्ती
स्मा घेत असतां। देवाला यथार्थीक मानिलें॥ ३० परंतु फारि
शी आणि शास्त्री। यांनी त्याकडून बाप्तीस्मा न घेतां। आप

णांविरुद्ध देवाचा बेत अव्हेरिला ॥ ३१ तेव्हां प्रभुने ह्मटलें।
तर या पिढीच्यां माणसांस मी कोणती उपमा देऊं? आणि ते
कोणासारिखे आहेत? ३२ हाटांत जीं मुलें बसतात। आ
णि येकमेकांस हाक देतांना बोलतात। आह्मी तुह्माजवळ
पांवा वाजविला। परंतु तुह्मी न नाचलां। आह्मी तुमच्या जव
ळ विलाप केला। परंतु तुह्मी न रडलां। यांसारिखे ते आ
हेत॥ ३३ कारण कीं। योहान्न जो बाप्तीस्मा देणारा। तो
भाकर खात नसतां। आणि द्राक्षरसही पीत नसतां आला। ते
व्हां त्याला भूत लागलें। तुह्मी ह्मणतां। ३४ मनुष्याचा पुत्र
खातां व पितां आला। आणि तुह्मी बोलतां। पाहा। खादा
ड माणुस। व मद्यपी। करघेणाऱ्यांचा व पाप्यांचा सखा॥ ३५ प
रंतु ज्ञान आपल्या सर्व लेंकरानी यथार्थीक मानिलें जातें ॥
३६ मग फारिश्यांतील कोणी त्याला विनंती केली। कीं
आपल्या बराबर जेवावें। नंतर तो त्या फारिश्याच्या घरांत
जाऊन जेवायास बसला॥ ३७ तेव्हां पाहा। त्या नगरांत जी
स्त्री पापीण होती। तिने। तो फारिश्याच्या घरांत जेवितो।
हें जाणलें असतां। सुगंधतेलाची आलाबास्त्रकुपी मिळवि
ली॥ ३८ मग ती त्याच्यां पायांजवळ मागें उभी राहातां।
रडत असतां आंसवांकडून त्याचे पाय भीजवुं लागली। नंतर
तिने आपल्या डोक्याच्या केंसानी पुसले। आणि त्याच्यां
पायांचें चुंबन घेतलें। आणि सुगंध तेलाने त्यांस लेपन के
लें॥ ३९ तेव्हां ज्या फारिश्याने त्याला बोलाविलें। तो पाहू
न आपल्यासीं बोलिला। कीं हा जर भविष्यभाषी असता। तर
जी त्याला शिवती। ती कोण आणि कशाची स्त्री। हें त्या
ला कळलें असतें। कां कीं ती पापीण आहे॥ ४० तेव्हां ये
शू उत्तर देतां त्याला बोलिला। हे शिमोना। तुजसीं मला कां
हीं बोलणें आहे॥ तेव्हां तो ह्मणतो। हे गुरू। बोल॥ ४१ ये
का सावकाराचे दोन ऋणी होते। येकाला पांच शें पावल्या।
आणि दुसऱ्याला पन्नास देणें होतें॥ ४२ परंतु फेडायाला त्यां

स कांहीं नसतां। त्याने दोघांस कृपेने सुट दिल्ही॥ तर त्यां
तून कोणता त्यावर अधीक प्रीती करील। हें सांग॥ ४३ ते
व्हां शिमोन उत्तर देऊन बोलिला। ज्याला कृपेने अधीक सो
डिलें तो। असें मला वाटतें॥ मग हा त्याला बोलिला।
त्वां उजु ठरविलें॥ ४४ तेव्हां स्त्रीकडे मुरडून। शिमो
नाला बोलिला। ह्या स्त्रीला तूं पाहातोस काय? मी तुझ्या
घरांत आलों। त्वां माझ्यां पायांसाठीं पाणी दिल्हें नाहीं। प
रंतु तिने आंसवानी माझे पाय भिजविले। आणि आपल्या डो
क्याच्या केंसांनी पुसले॥ ४५ त्वां माझें चुंबन दिल्हें नाहीं। प
रंतु मी आंत आल्यापासून। ती माझ्यां पायांचें चुंबन घेतां
राहिली नाहीं॥ ४६ त्वां तेलाने माझें डोकें लेपिलें नाहीं।
परंतु तिने सुगंधतेलाने माझ्यां पायांस लेपन केलें आहे।
४७ या कारणास्तव। मी तुला सांगतों। तिचीं जीं बहुत पा
पें। तीं सोडलीं आहेत। कांकीं तिने फार प्रीती केली॥
परंतु ज्याचीं थोडकीं सोडलीं। तो थोडकी प्रीती करितो॥ ४८ ते
व्हां तो तिला बोलिला। तुझीं पापें सोडलीं आहेत॥
४९ मग जेवायास जे संगातें बसले होते। ते आपणांमध्यें बोलुं
लागले। जो पापेंही सोडितो। हा कोण आहे? ५० आ
णि तो बायकोला बोलिला। तुझ्या विश्वासाने तुला तारिलें
आहे। सुखाने जा ※

पर्व ८। १ मग असें जालें। कीं तो गाजवीत आणि दे
वाच्या राज्याचें सुवर्तमान सांगत। प्रती नगर व गांव यांमधू
न अनुक्रमाने गेला॥ ते बाराही त्याबरोबर। २ आणि कि
त्येक स्त्रिया। ज्या दुष्ट आत्मे व दुखणीं यांपासून बऱ्या के
ल्या होत्या। मारया जी माग्दालीण ह्मटलेली। जिच्या मधू
न सात भूतें निघालीं। ३ आणि हेरोदाचा कारभारी खूजा
याची स्त्री योहाना। शूसान्नाही आणि बहुत दुसऱ्या।
ज्यानी आपल्यां द्रव्यांकडून त्याची सेवा केली। त्या [होत्या] ※
४ तेव्हां मोठा समुदाय मिळाला। ह्मणजे प्रती नगराचे

जे। ते त्याजवळ येकवट आले असतां। तो दाखल्याने बोलि
ला। ५ पेरणारा आपलें बीं पेरायास बाहेर गेला॥ तेव्हां
तो पेरितांना कांहीं तर वाटेजवळ पडलें। मग तें तुडविलें गेलें,
आणि आकाशांतील पांखरांनी त्याला खाउन टाकिलें॥ ६ आ
णि दुसरें कातळावर पडलें। तेव्हां त्याला ओल नाहीं। या
स्तव तें रुजल्यावर वाळून गेलें॥ ७ आणि दुसरें कांटेझाडांम
ध्यें पडलें। तेव्हां कांटेझाडांनी संगातें वाढून त्याला गुदमारू
न टाकिलें॥ ८ आणि दुसरें चांगल्या भुयीवर पडलें। मग
त्याने रुजून शंभरपट पीक दिल्हें॥ हीं बोलून। त्याने हाक
दिल्ही। [कीं] ज्याला ऐकायास कान आहेत। तो ऐको॥
९ तेव्हां त्याचे शिष्य त्याला विचारितां बोलिले। हा दाखला
काय असेल? १० मग तो बोलिला। देवाच्या राज्याचीं गो
ष्टें जाणणें तुह्मास दिल्हें आहे। परंतु वर्कडांस दाखल्यांक
डून। अशासकीं। त्यांनी पाहातां न पाहावें। आणि ऐकतां
न समजावें॥ ११ तर हा दाखला असा आहे। तें बीं देवाचे। गो
ष्ट आहे॥ १२ आणि जे वाटेजवळील। ते [हे] आहेत।
कीं ऐकतात। नंतर सैतान येतो। आणि ती गोष्ट त्यांच्या
ह्रदयांतून अशास काढितो। कीं त्यांनी विश्वास धरून तारलें
न जावें॥ १३ आणि जे कातळावर। ते जेव्हां ऐकतात तेव्हां
आनंदाने गोष्ट धरितात। परंतु त्यांस मूळ नसतां। [कांहीं]
वेळापर्यंत विश्वास धरितांना। प्रचितीच्या वेळेस फिरतात॥
१४ आणि जें कांटेझाडांमध्यें पडलें। तें हे आहेत। कीं ऐ
कतात। परंतु संसाराचीं चिंतनें व धन व विलास। यांच्या
खालीं चालतां। उवगविले जातात। आणि पूर्णफळ देत ना
हींत॥ १५ परंतु चांगल्या भुयींमध्यें जें, तें हे आहेत। कीं
जे उत्तम आणि शुद्ध ह्रदयांत गोष्ट ऐकून ठेवितात। म
ग धिराने फळ देतात ते॥ १६ आणि कोणी दिवा लावू
न। भांड्याने त्याला झांकीत किंवा बाजेखालीं ठेवीत नाहीं।
परंतु आंत येणारे जे। यांनी उजेड पाहावा। ह्मणोन समईवर

ठेविता॥ १७ कां तर उघडें होणार नाहीं, असें कांहीं गुप्त
नाहीं। आणि कळविलें जातांना उघड्यांत येणार नाहीं। अ
सें कांहीं लपविलें नाहीं॥ १८ यास्तव तुह्मी कसें ऐकतां, यावि
षईं न्याहाळा। कां कीं, ज्याला असेल। त्याला दिल्हें जाई
ल। परंतु ज्याला नसेल। त्याचें जें दिसतें। तें देखील त्या
पासून काढिलें जाईल ※

१९ तेव्हां त्याची आई आणि भाऊ त्याकडे आ
ले। परंतु समुदायास्तव तीं त्याच्या जवळ येउं न शकलीं॥
२० मग त्याला सांगीतलें गेलें। [कीं] तुझी आई आणि तु
झे भाऊ बाहेर उभे राहातां। तुला पाहायास इच्छितात॥
२१ परंतु तो उत्तर देतां त्यांस बोलिला। जे देवाची गोष्ट
ऐकतात आणि ती पाळितात। हेच माझी आई व माझे भा
ऊ आहेत ※

२२ आणि येका दिवशीं असें जालें। कीं तो आपल्यां शि
ष्यांसुद्धां तारवांत चढतांना त्यांस बोलिला। डोहाच्या पलि
कडेस जाऊं। आणि ते निघाले॥ २३ तेव्हां ते हाकारून जात अ
सतां। तो झोंपीं गेला। मग डोहांत वायुचें वादळ खालीं आ
लें। आणि तीं भरलीं व भयदशेंत पडलीं॥ २४ नंतर ते जवळ
येऊन। त्याला जागें करून बोलिले। स्वामी। स्वामी। आह्मी
नाश पावतों॥ तेव्हां त्यानें उठून वायुला आणि पाण्याच्या
उसळण्याला निषेधिलें। मग तीं राहिलीं। आणि निवळपण जा
लें॥ २५ तेव्हां तो त्यांस बोलिला। तुमचा विश्वास कोठे आहे?
नंतर ते भयाभीत होऊन आश्चर्य करितां येकमेकांस बोलिले।
तर हा कोण आहे? कीं वायांस व पाण्यासही आज्ञा देतो,
आणि तीं त्याला मानितात ※

२६ मग ते गादारेकरांचा देश। जो गालीलाच्या स
मोर आहे। तेथे हाकारून गेले॥ २७ आणि तो बाहेर भू
मीवर आला। त्या नगराचा कोणी माणुस। ज्याला बहुत
काळापासून भुतें लागलीं। आणि जो वस्त्रें नेसला नाहीं। आ

णि घरांत राहिला नाहीं। परंतु घड्यांमध्यें। हा त्याला
भेटला॥ २८ तेव्हां येशूला पाहून व ओरडून त्याच्या पुढें प
डला। आणि उंच शब्दें बोलिला। हे येशू. परात्पर देवा
च्या पुत्रा। मजशीं व तुजसीं काय? त्वां मला न पिडावें, ह्म
णोन मी तुझी प्रार्थना करितों॥ २९ यास्तव कीं। ह्याने त्या
अशुद्ध आत्म्याला। त्या माणसांतून निघण्याची आज्ञा दि
ल्ही होती॥ कां तर। त्याने त्याला बहुत काळ धरिलें हो
तें। आणि सांखळानी व बेड्यानी तो बंद करून राखला हो
ता। परंतु तो तीं बंधनें तोडून भूताकडून रानांमध्यें हाकला
गेला होता॥ ३० तेव्हां येशूने त्याला पुसिलें। कीं तुझें नां
व काय आहे? मग त्याने ह्मटलें। गोट। कां तर। त्याम
ध्यें पुष्कळ भुतें शिरलीं होतीं॥ ३१ आणि आपणांस अधो
गतीस जायाला न सांगावें। ह्मणोन ह्यानी त्याला विनंती के
ली॥ ३२ तेव्हां तेथे डोंगरांत चरतीं पुष्कळ डुकरें यांचा
काळप होता। आणि आपणांस त्यांमध्यें शिरूं द्यावें। ह्मणोन
त्याला विनंती केली। मग त्याने त्यांस जाऊं दिल्हें॥ ३३ ते
व्हां भुतें त्या माणसांतून निघून। त्यां डुकरांत शिरलीं। आ
णि तो काळप कड्यावरून डोहांत बळानें धांवला। आणि गु
दमरतां मेला॥ ३४ तेव्हां जें जालें तें। चरणारे पाहून
पळाले। आणि जाऊन नगरामध्यें व बाहेरस्थानांमध्यें वर्तमान सां
गीतलें॥ ३५ तेव्हां जें जालें तें पाहायास [लोक] निघाले।
आणि येशूजवळ आले। तेव्हां ज्या माणसांतून भुतें निघालीं।
तो स्याला आणि शुद्धीवर आला असतां। येशूच्यां पायांज
वळ बसलेला त्यांस सांपडला। आणि ते भ्याले॥ ३६ मग
तो भूतग्रस्त कसा तारिला गेला। हेंही ज्यानी पाहिलें। त्या
नी त्यांस सांगीतलें॥ ३७ तेव्हां त्यां गादारेकरांच्या चहूंक
डला सर्व भरणा। यानी त्याजवळ मागीतलें। कीं आपणा
पासून जावें। कां तर मोठें भय त्यांस लागलें॥ मग तो
तारवांत चढून माघारें गेला॥ ३८ आणि ज्या माणसांतून भु

तें निघालीं। त्याने त्याच्या जवळ असायास प्रार्थना केली।
परंतु येशू त्याला निरोप देतां बोलिला। ३९ तूं आपल्या
घरास माघारें जा। आणि देवाने तुजसाठीं जेवढीं कीलीं।
तीं निवेदन कर॥ मग त्याने निघून। येशूने त्यासाठीं जे
वढीं केलीं। तीं संपूर्ण नगरांत गाजविलीं ॐ
४० मग असें जालें। येशू माघारें आल्यावर। समुदाया
ने त्याला आदरें घेतलें। कां तर। सर्व त्याची वाट पाहात
होते॥ ४१ तेव्हां पाहा। माणुस ज्याचें नांव याईरस तो
आला। आणि तो सभेचा अधिकारी होता। तेव्हां त्याने ये
शूच्यां पायांजवळ पडून, त्याला विनंती केली। कीं आपल्या
घरास यावें। ४२ कारण। त्याला सुमारें बारा वर्षांची येकुल
ती कन्या होती। आणि ती मरत होती ॐ मग तो निघ
तांना। समुदायानी त्याला दडपलें॥ ४३ आणि स्त्री बारा व
र्षांपर्यंत रक्ताच्या धुपणीयुक्त असतां, जी आपलें संपूर्ण उपजीवन
वैद्यांजवळ खर्चल्यावर। कोणाकडूनही निरोगी होउं न शक
ली। ४४ ती मागें येऊन त्याच्या वस्त्राच्या टोंकाला शिवली,
आणि तेव्हांच तिच्या रक्ताची धुपणी बंद जाली॥ ४५ म
ग येशू बोलिला। मला कोण शिवलें? तेव्हां सर्व नकारीत अस
तां। पेत्रस आणि त्याच्या बराबर जे। ते बोलिले। हे स्वा
मी। समुदाय तुला लागतात व चेंपतात। आणि मला
कोण शिवलें, ह्मणतोस कीं काय? ४६ तेव्हां येशू बोलिला।
कोणी मला शिवलें। कां तर माझ्यांतून सामर्थ्य निघालें,
हें मला ठाऊक आहे॥ ४७ मग स्त्री। आपण लपली न गे
ली। हें पाहून। कांपत आली। आणि कोणत्या कारणाक
रितां त्याला शिवली। आणि तेव्हांच कसी निरोगी जाली हें,
त्याच्या पुढें पडून, सर्व लोकासमोर तिने त्याला सांगीतलें॥
४८ तेव्हां तो तिला बोलिला। हे कन्ये। धीर धर। तुझ्या
विश्वासाने तुला तारिलें। सुखाने जा ॐ ४९ तो बोलतां इ
तक्यांत सभेच्या अधिकाऱ्याकडला कोणी येऊन त्याला बोलि

ला। कीं तुझी कन्या मेली। गुरूला श्रम देउं नको॥ ५० प
रंतु येशू ऐकून त्याला उत्तर देतां बोलिला। भिउं नको।
विश्वास मात्र धर। ह्मणजे ती तारली जाईल॥ ५१ मग
त्याने घरांत जाऊन। पेत्रस व याकोब व योहान्न आणि मु
लीचा बाप व आई। यांवांचून कोणाला आंत येउं दिल्हें ना
हीं॥ ५२ तेव्हां सर्वांनी रडतांना तिच्या साठीं वडवून घेत
लें। परंतु तो बोलिला। रडूं नका। ती मेली नाहीं। पण
झोंपीं आहे॥ ५३ नंतर। ती मेली असें जाणून। ते त्याला
हांसले॥ ५४ परंतु तो सर्वांस बाहेर काढून। तिचा हात ध
रून हाक देतां बोलिला। मुली ऊठ॥ ५५ मग तिचा आत्मा
फिरोन आला। आणि तेव्हांच ती उभी राहिली। नंतर तिला
खायास द्यावें। ह्मणोन त्याने आज्ञा दिल्ही॥ ५६ तेव्हां ति
चीं आईबापें विस्मीत जालीं। परंतु जें घडलें। तें कोणा
ला न सांगावें। असी त्याने त्यांस सांगी दिल्ही ❋

पर्व ९। १ आणि त्याने आपल्यां बारा शिष्यांस येकव
ट बोलावून। त्यांस अवघ्यां भुतांवर आणि रोगांस उपा
य करायाचीं सामर्थ्य व अधिकार दिल्हीं॥ २ तेव्हां त्याने
त्यांस देवाचें राज्य गाजवायास। आणि दुखणेकऱ्यांस बरें
करायास पाठविलें॥ ३ आणि तो त्यांस बोलिला। तुह्मी
वाटेसाठीं कांहीं घेउं नका। काठ्या व पडसोडी। व भाकर
व रुपें नका। आणि येकयेकाला दोन आंगरखे नसावे॥
४ आणि ज्या ज्या घरांत तुह्मी जातां। तेथे राहा। आणि ते
थून निघा॥ ५ आणि जितके तुह्मांस अंगिकारीत नसतील।
त्या नगरापासून जातांना। त्यांजवर साक्ष होण्यासाठीं आपल्यां
पायांपासून धूळ झटकुन टाका॥ ६ तेव्हां ते निघून। सुवर्त
मान सांगतां। आणि सर्व ठिकाणीं निरोगी करितां। गांवांस
मधून गेले ❋

७ आणि जीं सर्व त्याकडून घडलीं। तीं चौथाईदार हेरो
द याने ऐकिलीं। आणि भ्रांत जाला। यास्तव कीं योहान्न

मेलेल्यांतून उठला आहे। असें कित्येकांकडून ह्मटलें गेलें। ८ आ
णि कोणांकडून असें। कीं एलीया दृश्य जाला। आणि दुस
ऱ्यांकडून असें। कीं पूर्वकाळिकांतील येक भविष्यवादी उठला
आहे॥ ९ तेव्हां हेरोद बोलिला। योहानाचें शीर म्या छेदि
लें। परंतु ज्याविषईं मी असीं ऐकतों। हा कोण आहे?
आणि त्यानें त्याला पाहायास शोधिलें॥

१० मग प्रेषितानीं माघारें येऊन। जितकीं केलीं होतीं।
तीं त्याला निवेदिलीं॥ नंतर तो त्यांस संगातें घेऊन। बेथ्सा
इदा ह्मटलेलें नगर। याच्या ओस जाग्यांत येकांतीं गेला॥
११ परंतु समुदाय जाणून त्याच्या मागें गेले। तेव्हां त्यानें
त्यांस अंगिकारितां। देवाच्या राज्याविषईं त्यांस सांगीतलें।
आणि ज्यांस निरोगी करण्याचें अगत्य होतें। त्यांस बरें केलें॥
१२ नंतर दिवस उतरूं लागला। तेव्हां ते बारा जवळ येऊन
त्याला बोलिले। समुदायाला असा निरोप दे। कीं त्यानीं येथून
चहूंकडलीं गांव व बाहेरखालें यांमध्यें जाऊन वस्ती करावी।
आणि अन्न मिळवावें। कां तर। आह्मी येथें ओस जाग्यां
त आहों॥ १३ परंतु तो त्यांस बोलिला। तुह्मी त्यांस खा
याला द्या॥ तेव्हां ते बोलिले। काय आह्मी जाऊन ह्या स
गळ्या लोकासाठीं भक्षें विकत घ्यावीं? नाहीं तर पांच भाक
री व दोन मासे। यांहून अधीक आह्माजवळ नाहींत॥
१४ कां तर। ते पुरूष सुमारें पांच हजार होते॥ तेव्हां
त्यानें आपल्या शिष्यांस सांगीतलें। तुह्मी त्यांस पन्नास पन्ना
सांच्या पंक्तींकरून बसवा॥ १५ मग त्यानीं तसेंच केलें। आ
णि अवघ्यांसच बसविलें॥ १६ तेव्हां त्यानें त्या पांच भाकरी
व दोन मासे घेऊन। आकाशाकडे वर्ते पाहून। त्यांविषईं स्तु
ती केली। मग मोडलीं आणि शिष्यांजवळ समुदायापुढें वा
ढावयास दिल्हीं॥ १७ मग त्यानीं खाल्लें। आणि सर्व तृप्त
जाले। नंतर त्यांस जें उरलें। तें तुकड्यांच्या बारा करंड्या
उचलल्या गेल्या॥

१८ आणि जेव्हां तो येकिकडे प्रार्थना करीत होता। ते
व्हां असें जालें, शिष्य त्याच्या जवळ आले। मग तो त्यांस
विचारितां बोलिला। मी कोण आहें ह्मणोन समुदाय काय ह्म
णतात? १९ तेव्हां ते उत्तर देतां बोलिले। योहान्न जो बा
प्तिस्मा देणारा तो। आणि दुसरे एलीया। आणि दुसरे [ह्म
णतात।] कीं पूर्वकाळिकांतून कोणी भविष्यभाषी फिरोन उठ
ला आहे॥ २० नंतर तो त्यांस बोलिला। परंतु मी कोण आ
हें ह्मणोन तुह्मी काय ह्मणतां? तेव्हां पेत्रस उत्तर देतां
बोलिला। देवाचा जो ख्रीस्त तो॥ २१ मग हें कोणाला न
सांगणें। ह्मणोन त्यांस निक्षूण सांगतां। २२ ह्मटलें कीं
मनुष्याच्या पुत्राला बहुत सोसणीं लागतात। आणि पुरा
तन व मुख्य उपाध्ये व पंडित यांकडून अव्हेरिलें जाणें, आ
णि जिवें मारिलें जाणें। आणि तिसऱ्या दिवसीं उठणें [लाग
तें] ※ २३ तेव्हां तो सर्वांस बोलिला। जर कोणी माझ्या मा
गें येण्यास इच्छितो। तर तो आपणाला नकारून टाको। आ
णि प्रती दिवसीं आपला मरणखांब उचलो। आणि मला
अनुसरो॥ २४ कारण कीं। जो जो आपल्या जीवाला राखा
यास इच्छितो, तो त्याला गमावील। परंतु जो जो मजकरितां
आपल्या जीवाला गमावील, तोच त्याला राखील॥ २५ कां
कीं। माणुस संपूर्ण पृथ्वी मिळवीत असतां। परंतु आपणाला
गमावीत असतां। अथवा हरविला जातां। काय लाभ पाव
तो? २६ यास्तव कीं। जो जो मजविषईं आणि माझ्यां गो
ष्टींविषईं लाजेल। त्याविषईं मनुष्याचा पुत्र। जेव्हां आपल्या
व बापाच्या व पवित्र दूतांच्या गौरवाने येईल। तेव्हां लाजेल॥
२७ आणि मी तुह्मास खरें सांगतों। जे देवाचें राज्य पाहा
तील तोंपर्यंत मरण चाखणारच नाहींत। असे येथल्यां उभेरा
ह्मणाऱ्यांतील कोणी आहेत ※

२८ आणि यां गोष्टींनंतर सुमारें आठ दिवस तेव्हां अ
सें जालें, कीं तो। पेत्रस व योहान्न व याकोब यांस घेऊन, प्रा

र्थना करायास डोंगरावर चढला॥ २९ मग तो प्रार्थ
ना करितांना त्याच्या तोंडाचें स्वरूप दुसरें जालें। आणि त्या
चें वस्त्र पांढरें। आंतून चकचकीत असें॥ ३० आणि पाहा
दोन पुरूष त्यासीं बोलते जाले। ते मोशे व एलीया हे होते॥
३१ हे गौरवयुक्त दिसून त्याची गत, जी तो यरूशलेमांत
भरणार होता। तिजविषईं बोलिले॥ ३२ तेव्हां पेत्रस आ
णि त्याच्या बराबर जे। हे झोंपेने भारावले होते। परंतु जा
गे जाल्यावर, यानी त्याचें गौरव, आणि ते दोन पुरूष त्या
च्या समागमें उभे राहातां पाहिले॥ ३३ मग ते ह्यापासून
वेगळे होत असतां। हें जालें। पेत्रस। आपण जें ह्मणतो हें
न जाणतां। येशूला बोलिला, हे स्वामी। आह्मास येथे अस
णें बरें आहे। तर आह्मी तीन मंडप करावे। तुजसाठीं
येक। व मोश्यासाठीं येक, व एलीयासाठीं येक॥ ३४ ते
व्हां तो हीं बोलत असतां, ढग जाला, आणि याने त्यां
वर सावली केली॥ मग ते ढगांत जातांना, हे भ्याले॥
३५ आणि त्या ढगांतून वाणी होत असतां बोलिली। हा मा
झा प्रिय पुत्र आहे। याचें तुह्मी ऐका॥ ३६ तेव्हां ती वा
णी जाली असतांना येशू माच सांपडला॥ नंतर हे उगे रा
हिले। आणि जीं आपण पाहिलीं होतीं। तीं कांहीं त्यां
दिवसीं। कोणाला सांगीतलीं नव्हतीं ※

३७ आणि दुसऱ्या दिवसीं असें जालें। ते डोंगरावरून
खालीं आल्यावर। मोठा समुदाय त्याला भेटला। ३८ आणि
पाहा। समुदायांतून माणुस मोठ्याने हाक देतां बोलिला, हे
गुरू। मी तुला काकुळत करितों। माझ्या पुत्रावर अवलोकन
कर। कां कीं। तो माझा येकुलता आहे॥ ३९ तर पाहा।
आत्मा त्याला धरितो, मग अकस्मात ओरडतो। आणि फें
सासहीत त्याची ओढाताण करितो। आणि त्याला ठेंचाळ क
रून, त्यापासून कष्टाने जातो॥ ४० तर तुझ्या शिष्यानी त्या
ला घालवावें। ह्मणोन म्या त्यांची काकूळत केली। परंतु

त्यांच्याने घडवलें नाहीं॥ ४१ तेव्हां येशू उत्तर देतां बोलि
ला, हे अविश्वासी व विपरीत पिढी। मी कोठपर्यंत तुह्मा
बरावर असेन, आणि तुमचें सोसीन? तुझ्या पुत्राला येथे आ
ण॥ ४२ नंतर तो येत असतां। दृतक्यांत भुताने त्याला आ
पटलें। आणि ओढाताण फार केली॥ तेव्हां येशूने त्या
अशुद्ध आत्म्याला धमकाविलें। आणि मुलाला बरें करून,
त्याच्या बापाला तो फिरोन दिल्हा॥ ४३ मग देवाच्या
माहानपणावरून सर्व थक्क जाले ॐ आणि येशूने जीं अवघीं
केलीं। त्यांवरून सर्व आश्चर्य करीत असतां, तो आपल्यां शि
ष्यांस बोलिला। ४४ तुह्मी ह्या गोष्टी आपल्यां कानांत ठे
वा। कारण कीं, मनुष्याचा पुत्र माणसांच्यां हातांत स्वाधीन के
ला जाणार आहे॥ ४५ तथापि ही गोष्ट त्यांस कळली ना
हीं। आणि त्यानी ती न समजावी। ह्मणोन त्यांजपासून
झांकली होती। आणि ह्या गोष्टीविषईं त्याला विचाराया
स ते भ्याले ॐ

४६ आणि त्यांमध्यें असा विचार संचरला। कीं अपणां
मध्यें कोण श्रेष्ठ असेल? ४७ तेव्हां येशूने त्यांच्या हृदयांती
ल विचार जाणून। बाळक घेऊन त्याला आपल्या जवळ ठे
विलें। ४८ आणि त्यांस ह्मटलें। जर कोणी माझ्या नांवा
वर ह्या बाळकाला अंगिकारील, तो मला अंगिकारितो।
आणि जर कोणी मला अंगिकारील। तो माझ्या पाठविणा
ऱ्याला अंगिकारितो। कारण कीं। तुह्मा सर्वांत जो अधी
क लाहान असतो, तोच थोर होईल ॐ

४९ तेव्हां त्यावर योहान्न बोलतां ह्मणाला, हे स्वामी। को
णी तुझ्या नांवावर भुतांस घालवितां आह्मी पाहिला। मग आ
ह्मी त्याला मना केलें। कां कीं, तो आह्मासंगतीं अनुस
रत नाहीं॥ ५० तेव्हां येशू त्याला बोलिला, मना करूं नका।
कारण कीं, जो आमच्या विरुद्ध नाहीं। तो आमच्या क
डचा आहे ॐ

५१ आणि याला वर घेण्याचे दिवस पूर्ण जाले असतां
ना, असें जालें, कीं त्याने आपलें तोंड यरुशलेमास जाया
ला स्थीर केलें ॥ ५२ आणि त्याने आपल्या तोंडों दूतांस
पुढें पाठविलें। तेव्हां ते जाऊन त्याच्या साठीं सिद्ध करायास
शोमरोनकरांच्या गांवांत गेले ॥ ५३ परंतु त्याचें तोंड यरुश
लेमास जायाचें होतें, यास्तव यांनी त्याला अंगिकारिलें नाहीं ॥
५४ नंतर त्याचे शिष्य, याकोब व योहान पाहून बोलिले,
हे प्रभू, जसें एलीयाने केलें, तसें आकाशांतून अग्नीने पडावें,
आणि त्यांस नाहींसें करावें, म्हणून आम्हीही सांगावें, अ
सी तुझी इच्छा आहे कीं काय? ५५ परंतु त्याने मुरडून
त्यांस निषेधिलें, आणि म्हटलें, तुम्ही कोणत्या आत्म्याचे
आहां, हें तुम्हास कळलें नाहीं। कां तर, मनुष्याचा पुत्र मा
णसांच्या प्राणांचा नाश करायास नव्हे, परंतु तारायास आ
ला आहे॥ तेव्हां ते दुसऱ्या गांवास गेले ※

५७ आणि ते वाटेने जात असतां, असें जालें। कोणी
त्याला बोलिला, प्रभू, जेथे जेथे तूं जातोस, तेथे मी तुला
अनुसरेन॥ ५८ तेव्हां येशू त्याला बोलिला, कोल्ह्यांस बिळें,
आणि आकाशांतल्यां पांखरांस वस्त्या आहेत, परंतु मनुष्या
च्या पुत्राला जेथे डोकें टेंकावें तें नाहीं॥ ५९ मग तो दु
सऱ्याला बोलिला, तूं मला अनुसर। परंतु तो बोलिला,
हे प्रभू, पहिलें माझ्या बापाला पुरायास मला जाउं दे॥
६० तेव्हां येशू त्याला बोलिला, मेलेल्यांस आपल्यां मेल्यां
स पुरूं दे, परंतु तूं जाऊन देवाच्या राज्याचें वर्तमान प्रग
ट सांग॥ ६१ तेव्हां दुसराही बोलिला, हे प्रभू, मी तु
ला अनुसरेन, परंतु पहिलें माझ्या घरीं जे, यांची निरवणी
मला करूं दे॥ ६२ तेव्हां येशू त्याला बोलिला, कोणी आ
पला हात नांगरास लावतो, आणि माघारें पाहातो, तो
देवाच्या राज्याजोगा नाहीं ※

पर्व १०, १ आणि त्यानंतर प्रभुने दुसऱ्यां सत्तरांसही

नेमिले, आणि प्रत्येक नगर व ठिकाण, जेथे आपण जा
णार होता, तेथे दोघे दोघे आपल्या तोंडीं पुढें पाठवि
ले॥ २ तेव्हां तो त्यांस बोलिला, पीक फार खरें, परंतु
कामकरी थोडके। याकरितां पिकाच्या प्रभूने कामकऱ्यांस आ
पल्या पिकामध्यें बाहेर लावावें, ह्मणोन याची प्रार्थना करा॥
३ तुह्मी जा। पाहा, लांडग्यांमध्यें जसें कर्डांस, तसें मी
तुह्मास पाठवितों॥ ४ कसणी व झोळणा व जोडे नेऊं न
का। आणि वाटेंत कोणाला जोहारूं नका॥ ५ आणि कोणा
घरांत जातां, प्रथम ह्मणा, ह्या घराचें कल्याण [असो॥]
६ आणि जर कल्याणाचा पुत्र तेथे असेल खरें, तर त्याज
वर तुमचें कल्याण राहील, परंतु जर नसेल, तर तुह्मा
वर फिरोन येईल॥ ७ आणि त्याच घरांत, त्यांच्या ज
वळ जीं तीं खातां व पितां। राहा। कां तर, कामकरी आ
पल्या वेतनाला योग्य आहे॥ घरोघरीं फिरूं नका॥ ८ आ
णि जर तुह्मी कोणा नगरांत जातां, आणि ते तुह्मास
अंगिकारितात, तर तुमच्या पुढें जीं वाढलीं, तीं खा॥ ९ आ
णि त्यांत जे दुखणाईत, त्यांस निरोगी करा। आणि त्यां
स बोला, देवाचें राज्य तुह्माजवळ आलें आहे॥ १० परंतु
जर तुह्मी कोणा नगरांत जातां, आणि ते तुह्मास अंगि
कारीत नाहींत। तर त्यांच्यां मार्गांत बाहेर जातां बोला,
११ तुमच्या नगराची धूळ, जी आह्मास लागती। तीच
तुमच्या साठीं, आह्मी झाडुन टाकितों। तथापि हें जाणा, कीं
देवाचें राज्य तुमच्या जवळ आलें आहे॥ १२ आणि मी तु
ह्मास सांगतों, कीं त्या दिवशीं त्या नगरापेक्षां सदोमाला
साहावतें होईल॥ १३ हे खराजीना, तुला हायहाय।
हे बेथसाइदा, तुला हायहाय। कां तर। तुह्मामध्यें जे च
मत्कार घडले। ते जर जोरांत आणि जीदोनांत घडले अस
ते। तर त्यानी पूर्वकाळीं, तरट व राख यांत बसून। पश्चा
त्ताप केला असता॥ १४ आणखी न्याय ठरविण्यांत तुह्मा

पेक्षां जोर व जीदीन यांस साहावतें होईल॥ १५ आणि हे का
पेर्णाह्मा, जें आकाशापर्यंत उंच केलेलें। तें तूं लोकांतरापर्यंत
खालीं टाकलें जासील॥ १६ जो तुमचें ऐकतो, तो माझें
ऐकतो। आणि जो तुह्मास अव्हेरितो, तो मला अव्हेरितो। आ
णि जो मला अव्हेरितो। तो माझ्या पाठविणाऱ्याला अव्हेरितो ※
१७ मग ते सत्तर आनंदाने माघारें येऊन बोलिले। हे
प्रभू। तुझ्या नांवेंकडून भुतें देखील आमच्या स्वाधीन आहेत॥
१८ तेव्हां तो त्यांस बोलिला। साटानाला विजेसारिखें आका
शांतून पडतां। म्या पाहिलें॥ १९ पाहा। साप जे व विंचू जे।
यांवर पाय द्यायास। आणि वैऱ्याच्या सर्व शक्तीवर मी तुह्मा
स अधिकार देतों। आणि कांहीं तुह्मास बाधा देणार नाहीं
च॥ २० तथापि आत्मे तुमच्या स्वाधीन आहेत। यांत तु
ह्मी आनंदूं नका। परंतु त्यापेक्षां यांत आनंद करा।
कीं तुमचीं नांवें आकाशांमध्यें लिहिलीं आहेत ※ २१ त्या
वेळेस येशू आत्यांत हर्षीत जाला। आणि बोलिला। हे बा
पा। आकाशाच्या आणि पृथ्वीच्या प्रभू। त्वां। ज्ञानी व बुद्धि
मान। यांपासून हीं लपविलीं। आणि बाळकांस हीं प्रगटविलीं
आहेत। यावरून मी तुला पल्करून स्तवितों। होय बापा। कां
तर। तुझ्या विचारांत असा मनोदय जाला आहे॥ २२ मा
झ्या बापाकडून अवघीं माझ्या स्वाधीन केलीं आहेत। आणि
पुत्र कोण आहे। हें बापाखेरीज कोणाला ठाऊक नाहीं। आ
णि बाप कोण आहे। हें पुत्र आणि ज्याला पुत्र प्रगट क
रायाला इच्छीत असेल। त्यांखेरीज [कोणाला कळत नाहीं] ※
२३ तेव्हां तो शिष्यांकडे मुरडून येकांतीं बोलिला। जीं तुह्मी
पाहातां। तीं जे डोळे पाहातात। ते धन्य। २४ कां तर। मी
तुह्मास सांगतों। कीं जीं तुह्मी पाहातां। तीं बहुत भविष्य
भाष्यानी आणि राजानी पाहायास इच्छिलीं। परंतु पाहिलीं ना
हींत। आणि जीं तुह्मी ऐकतां। तीं ऐकायास [इच्छिलीं।] प
रंतु ऐकिलीं नाहींत ※

२५ तेव्हां पाहा। कोणी शास्त्री उभा राहून त्याची प
रिक्षा करितांना बोलिला। हे गुरू। म्या काय केल्याने सर्व
काळ जीवनाचें वतन पावेन? २६ तेव्हां तो त्याला बोलिला,
धर्मनेमांत काय लिहिलें आहे? तूं कसें वाचितोस? २७ तेव्हां
तो उत्तर देतां बोलिला, प्रभू जो तुझा देव यावर तूं आ
पल्या संपूर्ण हृदयाने। आणि आपल्या संपूर्ण जिवाने। आणि
आपल्या संपूर्ण शक्तीने। आणि आपल्या संपूर्ण बुद्धीने। प्रीती
कर। आणि जशी आपणावर। तशी आपल्या शेजाऱ्यावर प्री
ती कर। २८ नंतर तो त्याला बोलिला, त्वां उत्तर उजु
केलें। तूं हें कर, मग वांचसील॥ २९ तेव्हां तो आपणाला
पुण्यवान ह्मणवायास इछितां। येशूला बोलिला। तर माझा शे
जारी कोण आहे? ३० तेव्हां येशू अर्थ धरून बोलिला।
कोणी माणुस यरूशलेमाहून यरीहोस खालीं जात होता।
आणि लुटाऱ्यांमध्यें सांपडला। तेव्हां ते त्याला उघडें करून
आणि फटके चढवून, अर्धमेला जाल्यावर, सोडून निघाले॥
३१ मग प्रसंगाप्रमाणे कोणी उपाध्या त्या वाटेने खालीं जा
त होता। आणि तो त्याला पाहून आड जवळून गेला॥
३२ आणि त्यासारिखें लेवीही त्या ठिकाणाजवळ असतां, ये
ऊन व पाहून, आड जवळून गेला॥ ३३ परतु कोणी
शोमरोनी वाटेने जातां त्याजवळ आला, आणि त्याला पा
हून कळवळला। ३४ मग जवळ येऊन त्याच्यां घायांत ते
ल व द्राक्षरस वोतून नीट बांधिलें। आणि त्याला आपल्या
पशूवर बसवून, धर्मशाळेंत आणून त्याचा सांभाळ के
ला॥ ३५ आणि सकाळीं तो निघतां, दोन पावल्या काढून ध
र्मशाळकऱ्याला देतांना, त्याला बोलिला, तूं याचा सांभाळ कर,
आणि याहून जें कांहीं खर्चिसील तें, मी माघारें आल्यावर,
तुला भरून देईन॥ ३६ तर यां तिघांतून कोणता, लुटाऱ्यांत
सांपडलेल्याचा शेजारी होता तुला दिसतो? ३७ तेव्हां तो

बोलिला, ज्याने त्यावर दया केली तो॥ ह्मणोन येशू त्याला
बोलिला, तूं जा, आणि तसेंच कर ※

३८ मग हे चालत असतां असें जालें, कीं तो कोणा गां
वांत आला, आणि मार्था नांवें कोणी स्त्री, तिने आपल्या घ
रीं त्याचें आतिथ्य केलें। ३९ आणखी तिला मारया ह्मटले
ली बहीण होती, आणि ही येशूच्यां पायांजवळ बसून त्याची
गोष्ट ऐकत होती॥ ४० परंतु मार्था बहुत सेवेविषईं वोढावो
ढींत होती॥ तेव्हां जवळ येऊन बोलिली, हे प्रभू, माझ्या
बहिणीनें मला येकटें सेवा करायास सोडून दिलें, याची तु
ला चिंता नाहीं कीं काय? यास्तव तिला माझें साह्य करा
वें, ह्मणोन सांग॥ ४१ तेव्हां येशू उत्तर देतां, तिला बो
लिला। हे मार्थे। मार्थे, तूं बहुतांविषईं चिंतातूर व गड
बडींत आहेस। ४२ परंतु येकाचें अगत्य आहे। आणि
मारयेनें। जो चांगला वांटा तिजपासून घेतला जाणार नाहीं,
तो निवडिला आहे ※

पर्व ११ ॥ १ आणि तो प्रार्थना करीत कोणा ठिका
णीं असतांना जेव्हां त्यानें समाप्त केली। तेव्हां असें जालें।
त्याच्यां शिष्यांमधून कोणी त्याला बोलिला। हे प्रभू, जसें यो
हान्नानें आपल्यां शिष्यांस शिकविलें, तसें तूंही आह्मांस प्रार्थ
ना करायास शिकेव॥ २ मग तो त्यांस बोलिला। जेव्हां तु
ह्मी प्रार्थना करितां, तेव्हां ह्मणा, हे आमच्या बापा, आ
काशांतल्या, तुझें नांव पवित्र मानिलें होवो॥ तुझें राज्य
येवो॥ जसें आकाशांत, तसें पृथ्वींतही तुझी इछा होवो॥
३ आमचें नित्य अन्न आह्मास प्रति दिवसीं दे॥ ४ आणि
आमचीं पापें आह्मास सोड। कां कीं, आह्मी आपणही आप
ल्या प्रत्येक ओशाळ्याला सोडितों॥ आणि आह्मास छळण्यांत न
न्यावें। परंतु आह्मास वाईटापासून सोडीव ※ ५ आणि तो त्यां
स बोलिला। तुह्मामध्यें असा कोण, कीं त्याला सखा असतां,

ना, त्याच्या जवळ मध्यरात्रीं जाईल। आणि त्याला बोलेल।
हे सख्या, मला तीन भाकरी उसन्या दे। ६ कारण कीं,
माझा मित्र वाटेंहून मजवळ आला, आणि जें म्या त्याच्या
पुढें वाढावें तें मजपाशीं नाहीं॥ ७ मग तो आंतून उत्तर
देतां बोलेल, मला श्रम देउं नको। आतां दार बंद केलें
आहे, आणि माझीं मुलें माझ्या जवळ अंथरूणावर आहेत।
उठून तुला देतां मला येत नाहीं॥ ८ मी तुह्मास सांगतों,
तो त्याचा मित्र आहे, यामुळें त्याला जरी तो उठून
देणार नाहीं, तथापि त्याच्या आग्रहामुळें तो उठून, त्या
ला जितक्या पाहिजेत, तितक्या देईल॥ ९ आणि मी तुह्मास सां
गतों, मागा, मग तुह्मास दिल्हें जाईल॥ शोधा, मग तु
ह्मास सांपडेल॥ ठोका, मग तुह्मासाठीं उघडलें जाईल॥
१० कां तर, प्रत्येक जो मागतो, तो पावतो। आणि जो
शोधितो, त्याला सांपडतें। आणि जो ठोकितो, त्यासाठीं उ
घडलें जातें॥ ११ आणि तुह्मामधील कोणा बापाजवळ पु
त्र भाकर मागेल, काय त्याला धोंडा देईल? आणि जर मा
सा, तर माशाच्या ठिकाणीं त्याला साप देईल कीं काय?
१२ किंवा जर तो कंवटही मागेल, तर त्याला विंचू देईल
कीं काय? १३ यास्तव तुह्मी दुष्ट असतां, जर आपल्यां
मुलांस उत्तम देणीं द्यायास जाणतां, तर कितीं विशेषें, आ
काशांतील बाप आपल्यां मागणाऱ्यांस पवित्र आत्मा देईल॥

१४ तेव्हां तो भुताला घालवीत होता, आणि तें मुकें
होतें॥ मग असें झालें, भूत निघाल्यावर, तो मुका बोलि
ला। आणि समुदाय आश्चर्य पावले॥ १५ परंतु त्यांमधून
कोणी बोलिले, भुतांचा अधिकारी बालजबूल, याकडून तो
भुतांस घालवितो॥ १६ आणि दुसऱ्यांनी, प्रचिती घेतां, त्याक
डून आकाशांतील साक्षात्कार शोधिला॥ १७ तेव्हां तो त्यां
च्या भावना जाणून, त्यांस बोलिला, आपल्याविरुद्ध विभागले
लें प्रत्येक राज्य ओसाड केलें जातें। घराविरुद्ध घरही पडलें॥

१८ आणखी जर सैटान आपल्याविरुद्ध विभागला आहे। त
र त्याचें राज्य स्थीर कसें राहील? कां तर, तुह्मी ह्मणतां।
कीं मी बालजबूलाकडून भुतांस घालवितों॥ १९ आणि जर मी
बालजबूलाकडून भुतांस घालवितों, तर तुमचे पुत्र कोणाकडू
न घालवितात? यास्तव ते तुमचे न्यायाधीश होतील॥ २० प
रंतु जर मी देवाच्या बोटाकडून भुतांस घालवितों। तर याव
रून देवाच्या राज्याने तुह्मांस आटोपलें आहे॥ २१ जेव्हां ब
ळकट हातेरबंद आपला वाडा राखितो, तेव्हां त्याचीं द्रव्यें
स्वस्थपणांत असतात॥ २२ परंतु जेव्हां त्याहून बळकट येऊन
त्याला जिंकील, तेव्हां त्याचें ज्या हातेरबंधनावर त्याने विश्वास
ठेविला, तें घेतो, आणि त्याच्या लुटी वांटून देतो॥ २३ जो
माझ्या कडचा नाहीं, तो माझ्या विरुद्ध आहे॥ आणि जो मा
झ्या जवळ मिळवीत नाहीं, तो विखरितो॥ २४ जेव्हां अशु
द्ध आत्मा माणसांतून निघतो, तेव्हां विसांवा शोधीत। को
रड्यां जाग्यांतून जातो। आणि न पावून ह्मणतो, जेथून नि
घालों, तेथे माझ्या घरास माघारें जाईन॥ २५ मग तो ये
ऊन। तें झाडलेलें व शोभविलेलें पावतो॥ २६ नंतर तो
जातो, आणि आपल्याहून वाईट दुसरे सात आत्मे, यांस सं
गतीं घेतो, आणि ते आंत जाऊन तेथे राहातात॥ तेव्हां
त्या माणसाचीं जीं शेवटलीं। तीं पहिल्यांहून वाईट होतात॥
२७ आणि तो हीं बोलत असतां हें जालें। समुदायांतील
कोणी स्त्री उंच शब्द करून त्याला बोलिली, ज्या पोटाने
तुला वागविलें। आणि ज्यां स्तनांस त्वां चोखिलें, तीं धन्य॥
२८ मग तो बोलिला, तर जे देवाची गोष्ट ऐकतात,
आणि तिला पाळितात, ते निश्चयें धन्य॥ २९ आणि
समुदाय दाट मिळाल्यावर, तो असें बोलुं लागला। ही
पिढी वाईट आहे। साक्षात्कार शोधिते, परंतु योना भ
विष्यभाषी, याच्या साक्षात्काराखेरिज हिला साक्षात्कार दि
ल्हा जाणार नाहीं॥ ३० कारण कीं। जसा योना निनवे

करांस साक्षात्कार होता। तसा मनुष्याचा पुत्रही ह्या पि
ढीला होईल॥ ३१ दक्षणेची राणी न्याय ठरविण्यांत ह्या
पिढीच्यां माणसांसीं उठेल। आणि त्यांस अन्यायी ठरवील।
कां कीं। ती शलमोनाचें ज्ञान ऐकायास पृथ्वीच्या शींवां
पासून आली। आणि पाहा, शलमोनापेक्षां येथे अधीक [आहे॥]
३२ नीनवेचे लोक। न्याय ठरविण्यांत। ह्या पिढीसीं उठ
तील। आणि हिला अन्यायी ठरवितील। कां कीं, योनाच्या
गाजिवण्यावरून त्यानी पश्चात्ताप केला। आणि पाहा। योना
पेक्षां येथे अधीक [आहे]॥ ३३ आणि कोणी दिवा लावून
गुप्तांत किंवा मापाखालीं नाहीं। परंतु यासाटीं समईवर ठे
वितो। कीं आंत येणाऱ्यानी प्रकाश पाहावा॥ ३४ शरीरा
चा उजेड डोळा आहे। यास्तव जेव्हां तुझा डोळा निर्विका
र आहे। तेव्हां तुझें संपूर्ण शरीर उजेडयुक्त आहे। परंतु
जेव्हां वाईट आहे, तेव्हां तुझें शरीरही काळोखी [आहे॥]
३५ यास्तव तुझ्या मध्यें जो उजेड, तो अंधार न व्हावा।
ह्मणोन जप॥ ३६ तर तुझें सगळें शरीर जर प्रकाशीत।
त्यांत कांहीं भाग काळोखी नसता। तर जेव्हां दिव्याचें झळ
कणें तुला उजेड देतें। तसें संपूर्ण उजेडयुक्त होईल॥

३७ आणि तो बोलतांना। कोणी फारिश्याने त्याला विनं
ती केली, कीं आपल्या जवळ जेवावें॥ तेव्हां तो आंत जा
ऊन। जेवायास बसला॥ ३८ परंतु त्याने जेवणापूर्वीं आं
घोळ केली नाहीं। हें पाहून फरिश्याने आश्चर्य केलें॥ ३९ ते
व्हां प्रभू त्याला बोलिला। आतां अहो फारिशी। तुह्मी पेला
व ताट यांचें बाहेरांग शुद्ध करितां। परंतु तुमचें आंतील आं
ग अपहारानें व वाईटपणानें भरलें आहे॥ ४० अहो निर्बुद्धी।
ज्याने बाहेरचें केलें। त्याने आंतलेंही केलें नाहीं कीं काय?
४१ आणखी तुह्मांस जीं आहेत। यांचें दान द्या, मग पा
हा। अवघीं तुह्मांस शुद्ध आहेत॥ ४२ परंतु तुह्मां फा
रिश्यांस हायहाय। कां तर। पुदिना व सताप व प्रत्येक रोप

यांचा दाहावा भाग देतां। पण न्याय व देवाची प्रीती चु
कतां॥ हीं केलीं। आणि दुसरीं न सोडलीं पाहिजेत॥
४३ तुह्मां फारिश्यांस हायहाय? कारण कीं। सभांमध्यें उत्त
म आसन। आणि अड्ड्यांत क्षेमगोष्टी तुह्मांस आवडतात॥
४४ अहो पंडित आणि फारिशी। ढोंगी। तुह्मांस हायहाय।
कारण कीं। तुह्मी जशीं प्रेतपेवें जीं अप्रसीद्ध। आणि ज्यांवर
मनुष्य चालत असतां न जाणतात। तसे आहां॥ ४५ तेव्हां शा
स्त्र्यांतील कोणी उत्तर देतां त्याला बोलिला। हे गुरू। हीं बोल
त असतां। तूं आह्मांसही गांजितोस॥ ४६ तेव्हां तो बोलिला।
तुह्मां शास्त्र्यांसही हायहाय। कारण कीं। तुह्मी वाहायास
दुर्घट वोझीं माणसांवर घालतां। आणि तुह्मी आपण आ
पल्या येका बोटाने त्यां वोझ्यांस न शिवतां॥ ४७ तुह्मांस
हायहाय। कारण कीं। तुह्मी भविष्यभाष्यांचीं थडगीं बां
धितां। आणि तुमच्या पितरांनी त्यांस जिवें मारिलें॥ ४८ या
स्तव तुह्मी आपल्यां पितरांच्यां कामांविषई साक्ष देतां।
आणि संमतीं संतोषीत आहां। कां कीं। त्यांनी त्यांस जि
वें मारिलें खरें। आणि तुह्मी त्यांचीं थडगीं बांधितां॥
४९ ह्यासाठींही देवाचें ज्ञान बोलिलें। मी त्यांजवळ भविष्य
भाषी व प्रेषीत यांस पाठवीन। आणि यांतून कित्येकांस
ते जिवें मारितील। आणि पाठीस फार लागतील। ५० ह्मणो
न सर्व भविष्यभाष्यांचें रक्त। जें जगाचा पाया घालण्यापा
सून पाडलें। त्याचा झाडा या पिढीपासून घेतला जाई
ल। ५१ हाबेलाच्या रक्तापासून। जखार्य जो वेदीच्या आ
णि घराच्या मध्यें घात पावला। याच्या रक्तापर्यंत। होय।
मी तुह्मांस सांगतों। ह्या पिढीपासून त्याचा झाडा घेतला
जाईल॥ ५२ तुह्मां शास्त्र्यांस हायहाय। कारण कीं। तुह्मी
जाणण्याची किल्ली हिरावली आहे। तुह्मी आपण आंत न गे
लां। आणि जे आंत जात आहेत। त्यांस प्रतिबंध करितां॥
५३ आणि त्यांस तो हीं बोलतां। पंडित व फारिशी त्यासीं भा

रो भिडुं। आणि बहुतांविषईं त्याला बोलता करूं लाग
ले। ५४ त्याच्या जपणीस राहिले। आणि त्याच्या मुखांतून
कांहीं सांपडवायास झटले। यासाठीं कीं ह्यानी त्यावर दो
ष लावावा ※

पर्व १२ ॥ १ समुदायाचे दाहा हजारों मिळाले असतां।
असें कीं त्यानी येकमेकांस तुडवावें। [तेव्हां] त्यांमध्यें येशू
आपल्यां शिष्यांस बोलुं लागला। प्रथम तुह्मी आपणांस फा
रिश्यांच्या फुगवणापासून राखा। तेंच ढोंग आहे॥ २ तथा
पि जें प्रगट केलें जाणार नाहीं। असें कांहीं झांकिलें ना
हीं॥ आणि जें कळविलें जाणार नाहीं। असें गुप्त नाहीं॥
३ त्यांविरुद्ध। जितकीं तुह्मी काळोखांत बोलिलां। तीं उजे
डांत ऐकिलीं जातील। आणि तुह्मी कानांत येकांतांमध्यें
जें बोलिलां। तें आगाश्यांवर गाजविलें जाईल॥ ४ आणि
तुह्मां माझ्यां सख्यांस मी सांगतों। जे शरीराला जिवें मारि
तात। आणि यांनंतर त्यांच्यानी आणखी कांहीं करणें हो
त नाहीं। त्यांकडून भेवडाविले जाउं नका॥ ५ परंतु तु
ह्मी कोणाला भ्यावें। तो तुह्मांस दाखवीन। जिवें मारिल्याव
र नर्कांत घालायाचा अधिकार ज्याला आहे। त्याला भ्या।
होय मी तुह्मांस सांगतों। ह्याला भ्या॥ ६ पांच चिमण्या
दोन पैश्यांला विकल्या नाहींत कीं काय? तथापि त्यांतून येक।
देवाच्या पाहाण्यांत, विसरली जात नाहीं॥ ७ आणखी तुम
च्या डोक्याचे केंसही सर्व मोजले आहेत॥ यास्तव। तुह्मी भि
उं नका॥ तुह्मी बहुत चिमण्यांहून मोलवान आहां॥ ८ आ
णि मी तुह्मांस सांगतों। जो कोणी माणसांसमोर माझा
कैवार पत्करील। त्याचा कैवार माणसाचा पुत्रही देवाच्या
दुतांसमोर पत्करील॥ ९ आणि जो माणसांसमोर मला न
कारील। तो देवाच्यां दुतांसमोर नकारिला जाईल॥ १० आ
णि प्रत्येक जो मनुष्याच्या पुत्राविरुद्ध गोष्ट ह्मणेल ती त्या
ला सोडली जाईल॥ परंतु जो पवित्र आत्म्याविरुद्ध दुर्भा

पण बोलेल। तें सोडलें जाणार नाहीं॥ ११ आणि जेव्हां
ते तुह्मांस सभां व सरकार व अधिकार यांजवळ नेतात. ते
व्हां तुह्मी कसी किंवा काय तोड कराल। अथवा काय बोला
वें। याची चिंता करूं नका। १२ कां तर, काय ह्मटलीं
पाहिजेत। तीं पवित्र आत्मा त्याच घटकेस तुह्मांस सिकवील ※
१३ तेव्हां समुदायामधून कोणी त्याला बोलिला। हे गुरू।
माझ्या भावाला। मजसीं वतन वांटायास सांग॥ १४ मग
तो त्याला बोलिला, माणसा, मला तुह्मांवर न्यायाधीश अथवा
वांटणारा कोणी स्थापिला? १५ तेव्हां तो त्यांस बोलिला।
तुह्मी न्याहाळा, आणि लोभापासून चौकसीने दूर व्हा। कां त
र, कोणाला पुष्कळ असतांना। त्याचा जीव आपल्या द्रव्यां
पासून नाहीं॥ १६ आणि त्याने त्यांस दाखला सांगीतला।
कीं कोणा धनवान माणसाच्या शेतिकाने फार पिक दिल्हें॥
१७ आणि तो आपल्यांत विचार करितां बोलिला। मी का
य करूं? यास्तव कीं। माझीं पिकें सांठवायास मला जागा ना
हीं॥ १८ मग त्याने ह्मटलें। मी हें करीन। [कीं] आपलीं कोठा
रें मोडीन। आणि त्यांहून मोठीं बांधीन। मग तेथे माझे
अवघे उपज। आणि माझीं जीं उत्तम। तीं सांठवीन॥ १९ मं
तर आपल्या जिवाला ह्मणेन। हे जिवा, फार वर्षांसाठीं तु
झीं बहुत उत्तम ठेविलीं आहेत॥ विसांवा घे। खा। पी।
आनंद कर॥ २० परंतु देवाने त्याला ह्मटलें। हे निर्बुद्धी। या
च रात्रीं। तुझा प्राण सोडायाची आज्ञा तुला करितील।
तेव्हां त्वां जीं सिद्ध केलीं। तीं कोणाचीं होतील? २१ जो
आपल्यासाठीं सांचवितो। परंतु देवाविषईं धनवान नव्हे। तो
तसाच [आहे] ※ २२ तेव्हां तो आपल्या शिष्यांस बोलिला।
त्यासाठीं मी तुह्मांस सांगतों। तुह्मी काय खावें। असी आप
ल्या जिवाविषईं चिंता करूं नका। आणि काय ल्याल। असी
शरीराविषईं नका॥ २३ पोषणापेक्षां जीव। आणि पांघरुणा
पेक्षां शरीर अधीक आहे॥ २४ तुह्मी कावळ्यांचा विचार

करा, कीं ते पेरीत नाहींत, आणि कापीत नाहींत। त्यांस थे
कांत नाहीं, आणि कोठार नाहीं। तथापि देव त्यांस पोसितो।
पांखरांपेक्षां तुह्मी केवढे अधीक मोलवान आहां? २५ आ
णि विचार करून। आपल्या परिमिताला येक हातभर वाढवायास
तुह्मांमधील कोण शकतो? २६ यास्तव सर्वांहून लाहान। तें
देखील जर तुह्मी करूं न शकतां, तर वरकडांविषईं, चिंता
कां करितां? २७ तुह्मी फुलझाडांचा विचार करा। तीं क
सीं वाढतात, श्रम करीत नाहींत। आणि सूत काढीत ना
हींत। परंतु मी तुह्मांस सांगतों। शलमोन देखील। आप
ल्या अवघ्या गौरवामध्यें, त्यांतील येकासारिखा पांघरला नव्ह
ता॥ २८ आणि अहो अल्प विश्वासी। शेतांतील गवत, जें आ
ज आहे। आणि उद्यां भटीमध्यें टाकिलें जातें। त्याला जर
देव असा पोशाक देतो, तर किती विशेषें तुह्मांस [देईल?]
२९ आणि तुह्मी काय खावें। अथवा काय प्यावें, याचा शो
ध करूं नका। आणि झुरझुरूं नका॥ ३० कां तर जगाचीं
राष्ट्रें त्यां अवघ्यांस शोधितात। आणि तीं तुह्मांस पाहिजेत।
हें तुमचा बाप जाणतो॥ ३१ त्यांपेक्षां तुह्मी देवाच्या रा
ज्याला शोधा, आणि मागून तीं अवघीं तुह्मांस दिल्हीं जा
तील ※ ३२ हे लाहान कळपा, भिऊं नको। कां तर, तुम
चा बाप तुह्मांस राज्य देण्यास संतोषीत जाला आहे॥ ३३ तुमचीं
जीं आहेत। तीं विका, आणि दान द्या॥ ज्या पिशव्या जु
न्या होत नाहींत त्या। न सरता संग्रह, आकाशांमध्यें तो, जे
थे चोर जवळ येत नाहीं। आणि कसर नास करीत नाहीं,
तेथे तुह्मी आपल्यांसाठीं मिळवा॥ ३४ कां कीं। जेथे तुम
चा संग्रह आहे। तेथे तुमचें चित्तही होईल ※ ३५ तुम
च्या कंबरा कसलेल्या, आणि दिवे पाजळलेले होवोत॥
३६ आणि माणसें, आपला प्रभू लग्नकार्यांपासून केव्हां मा
घारें येईल, त्याची असी वाट पाहातीं, कीं तो येऊन
आणि ठोकून त्यासाठीं त्यानी तेव्हांच उघडावें। त्यांसा

रिख तुह्मी [व्हा॥] ३७ प्रभू येऊन। जे चाकर पाहारा क
रितां त्याला सांपडतील, तेच धन्य॥ मी तुह्मांस खचीत
सांगतों। कीं तो कंबर बांधील। मग त्यांस जेवायाला
बसवील। आणि जवळ येऊन। त्यांची सेवा करील॥ ३८ आ
णि तो जर दुसऱ्या प्रहरांत येईल। किंवा तिसऱ्या प्रहरां
त येईल। आणि त्याला असे सांपडतील, तर ते चाकर ध
न्य आहेत॥ ३९ आणि हें तुह्मी जाणा। कीं कोणत्या घ
टकेस चोर येतो। हें जर घरच्या धन्याला कळलें असतें।
तर त्यानें पाहारा केला असता। आणि आपलें घर फोड
लें जाऊं दिल्हें नसतें॥ ४० यास्तव तुह्मीही सिद्ध व्हा। कां
तर। जी घटका तुह्मांस वाटत नाहीं। तींत माणसाचा पु
त्र येतो॥ ४१ तेव्हां पेत्रस त्याला बोलिला। हे प्रभू, का
य। तूं हा दाखला आह्मांस किंवा सर्वांसही सांगतोस?
४२ तेव्हां प्रभू बोलिला। तर। जो विश्वासु व बुद्धीमंत का
रभारी। ज्याला धनी आपल्या परिवारावर। वेळेस नेमी
शिधा द्यावयास ठेवील। तो कोण आहे? ४३ जो चाकर
आपल्या धन्याला असें करितां सांपडेल। तोच धन्य॥
४४ मी तुह्मांस खरें सांगतों, कीं त्याला तो आपल्या अ
वघ्या द्रव्यांवर स्थापील॥ ४५ परंतु जर तो चाकर आपल्या
मनांत ह्मणतो। माझा धनी येण्यास खोळंबतो, आणि दा
सांस व दासींस मारूं, आणि जेवूं व पिऊं व झिंगूं लागेल।
तर ४६ ज्या दिवशीं तो वाट पाहात नाहीं त्यांत, आ
णि जी घटका त्याला कळत नाहीं तींत। त्या चाकराचा ध
नी येईल। आणि त्याचीं खांडें करील। आणि अविश्वाशां
संगतीं त्याचा वांटा ठेवील॥ ४७ आणि ज्या चाकरानें आपल्या
धन्याची इच्छा जाणली। तथापि आपण सिद्ध न जाला, आणि
त्याच्या इच्छेप्रमाणे न केलें, तो बहुत [फटक्यानीं] झोडला जाई
ल॥ ४८ परंतु ज्यानें जाणलें नाहीं। आणि फटक्यांस योग्य
तीं केलीं, तो थोडक्यानीं झोडला जाईल॥ आणि ज्या प्रत्ये

कोला बहुत दिल्हें आहे। त्याजवळ बहुत शोधिलें जाईल।
आणि ज्याच्या जवळ बहुत ठेविलें। त्यापाशीं अधीक मागती
ल ※ ४९ मी पृथ्वीवर विस्तव घालायास आलों आहें। आणि
तो इतक्यांत पेटलेला असावा, ह्मणोन मी किती इछितों?
५० परंतु बाप्तीस्मा मला घातला जायाचा आहे, आणि तो
समाप्त केला तोंपर्यंत, मी कसें पेंचलों आहें? ५१ मी पृथ्वी
वर शांती द्यावयास आलों। असें तुह्मांस वाटतें कीं काय?
मी तुह्मांस ह्मणतों। नव्हे, परंतु त्यापेक्षां भेद। ५२ कां कीं।
आतांपासून, येका घरांत पांच भेदलेले, दोघांवर तिघे, आ
णि तिघांवर दोघे, [असे] होतील, ५३ पुत्रावर बाप, आ
णि बापावर पुत्र। कन्येवर आई, आणि आईवर कन्या। सा
सू आपल्या सुनेवर, आणि सून आपल्या सासूवर भेदली
जाईल ※ ५४ आणखी तो समुदायांस बोलिला, जेव्हां तुह्मी
ढगाला पश्चमेपासून उगवता पाहातां, तेव्हांच तुह्मी ह्मणतां,
पाहाळी येती। आणि तसें होतें॥ ५५ आणि जेव्हां दक्षण
वाऱ्याला सुटता [पाहतां,] तेव्हां तुह्मी ह्मणतां, कीं उष्ण
होईल। आणि होतें॥ ५६ अहो ढोंगी, तुह्मी पृथ्वीच्या आ
णि आकाशाच्या स्वरूपाला पारखायास जाणतां। तर या स
मयाला तुह्मी कसें न पारखितां? ५७ आणखी काय यथा
र्थ, हें तुह्मी आपणांकडूनच कां न ठरवितां? ५८ कारण कीं,
जेव्हां तूं आपल्या वाद्यासंगातें अधिकाऱ्याजवळ जातोस, ते
व्हां त्यापासून समेटानें सुटायास श्रम कर। नाहीं तर, कदा
चित, तो तुला न्यायाधीशाजवळ वोढील, आणि न्यायाधीश
तुला हस्तकाच्या स्वाधीन करील, आणि हस्तक तुला बंदीशा
ळेंत घालील॥ ५९ मी तुला सांगतों, तूं शेवटील दमडीही
फेडितोस, तोंपर्यंत तेथून बाहेर येणार नाहींस ※

पर्व १३॥ १ आणि ज्यां गालीलयांचें रक्त पिलातसानें त्यां
च्यां मारल्यां अर्पणांच्या संगतीं भेळविलें। त्यांविषईं त्याला
सांगते, असे कित्येक तेथे होते॥ २ तेव्हां येशू उत्तर देतां त्यां

स बोलिला, ह्या गालीलांनी येवढीं सोसिलीं, यास्तव सर्व गा
लीलांपेक्षां ते पापी होते, असें तुह्मांस दिसतें कीं काय?
३ मी तुह्मांस सांगतों, नव्हते। परंतु जर तुह्मी पश्चात्ताप न
करितां तर तुह्मी सर्व त्याप्रमाणे नाश पावाल॥ ४ किंवा ज्यां
अठरांवर शिलोहांतील बुरूजाने पडून त्यांस जिवें मारि
लें। ते यरुशलेमांतील सर्व राहाणाऱ्यां माणसांहून ओशा
ळे होते। असें तुह्मांस दिसतें कीं काय? ५ मी तुह्मां
स सांगतों, नव्हते। परंतु जर तुह्मी पश्चात्ताप न करितां।
तर तुह्मी सर्व त्यासारिखा नाश पावाल॥ ६ तेव्हां त्याने
हा दाखला सांगीतला। कोणाला याच्या द्राक्षमळ्यांत लावि
लेलें अंजीरझाड होतें, आणि त्यावरतें फळ शोधितां तो
आला। परंतु त्याला सांपडलें नाहीं॥ ७ तेव्हां तो माळ्या
ला बोलिला, पाहा, तीन वर्षें या अंजिरावर फळ शोधित
येतों। परंतु मला सांपडत नाहीं। त्याला कापून टाक।
तो भूमीस भारच कां होतो? ८ तेव्हां तो उत्तर देतां त्याला
बोलिला। हे धन्या, त्याला यंदांही असूं दे, येथपर्यंत। कीं
मी त्याच्या भोंवतें खणीन, आणि खत घालीन॥ ९ मग क
दाचित फळ देईल खरें, आणि जर नाहींच। तर त्या उ
शिराने त्याला कापून टाकसील॥

१० आणि तो शाब्बाथांमध्यें येका सभेंत उपदेशीत होता॥
११ तेव्हां पाहा, ज्या स्त्रीला अठरा वर्षें विकाराचा आत्मा
होता, ती [तेथें] होती॥ आणि ती दुमती वांकली होती, आ
णि नीट होऊं, सर्व प्रकारें न शकली॥ १२ तेव्हां येशूनें ति
ला पाहून, जवळ बोलाविलें, आणि तिला ह्मटलें, हे स्त्रिये,
तुझ्या विकारापासून तूं सुटली आहेस॥ १३ मग त्यानें तिजव
र हात ठेविले, आणि तेव्हांच ती फिरोन उभी जाली। आणि
तिने देवाला गौरविलें॥ १४ परंतु येशूनें शाब्बाथांत निरोगी
केलें, यास्तव सभेंचा अधिकारी जळफळून, उत्तर देतां समु
दायाला बोलिला, ज्यांमध्यें काम करावें। असे साहा दिवस

आहेत। तर त्यांत येऊन निरोगी केले जा। परंतु शाब्बा
थ दिवशीं नका॥ १५ यास्तव प्रभूने त्याला उत्तर देतांना
ह्मटलें। हे ढोंगी। तुह्मांमधील प्रत्येक। आपला बैल अथवा
गाढव यांस शाब्बाथांत गव्हाणीपासून सोडून आणि दूर नेऊन।
न पाजितो कीं काय? १६ आणि ही। आब्राहामाची क
न्या असतां। जिला साटानाने अठरा वर्षें देखील बंद केलें।
जाणा, तिला ह्या बंधनापासून शाब्बाथ दिवशीं सोडलें न पा
हिजे कीं काय? १७ आणि तो हीं बोलतां। त्याचे सर्व अ
डविणारे लाजविले गेले। आणि त्याकडून अवघीं जीं नवलें
जालीं। त्यांवरून सर्व समुदायाने आनंद केला ※
१८ मग तो बोलिला। देवाचें राज्य कशासारिखें आहे? आणि
मी कशाची उपमा त्याला देऊं? १९ तें मोहरीच्या अशा दाण्या
सारिखें आहे। कीं माणसाने घेऊन आपल्या मळ्यांत टाकिला।
मग तो वाढला आणि मोठें झाड असें जालें। आणि आकाशां
तील पांखरानी त्याच्यां फांद्यांमध्यें वस्ती केली ※ २० आणि तो
फिरोन बोलिला। देवाच्या राज्याला काय उपमा देऊं? २१ तें
अशा फुगवणासारिखें आहे, कीं बायकोने घेऊन, तीन पावफऱ्या
चें पीठ, संपूर्ण फुगविलें गेलें। तोंपर्यंत त्यांत लपविलें ※
२२ तेव्हां तो उपदेशितां आणि यरूशलेमाकडे गमन क
रितां। प्रती नगर व गांव यांमधून गेला॥ २३ तेव्हां को
णी त्याला बोलिला, हे प्रभू, जे तारिले जातात। ते थोड
के कीं काय? मग तो त्यांस बोलिला। २४ तुह्मीं अरूं
द दाराकडून शिरायाला प्रयास करा। कां तर, बहुत। मी
तुह्मांस सांगतों, आंत जायास झटतील। परंतु येथपासून
न शकणार। २५ कीं घराचा धनी उठला आणि त्या
ने दार बंद केलें, आणि तुह्मीं, बाहेर उभे राऊं व दारा
वर ठोकुं लागून। ह्मणाल। हे प्रभू। प्रभू, आह्मांसाठीं उघड।
मग तो उत्तर देतां तुह्मांस बोलेल। म्या तुह्मांस नोळखि

लें नाहीं, [कीं] कोठून आहां॥ २६ तेव्हां तुह्मीं बोलूं लागा
ल, आह्मीं तुझ्या समोर खालें आहे, व प्यालों। आणि तां
आमच्यां मार्गांत उपदेशिलें आहे॥ २७ परंतु तो बोलेल। मी
तुह्मांस सांगतों। म्या तुह्मांस वोळखिलें नाहीं, [कीं] कोठून
आहां॥ अहो अन्याय करणारे, सर्व तुह्मीं मजपासून दूर व्हा॥
२८ आब्राहाम व इझाक व याकोब व सर्व भविष्यभाषी,
यांस..देवाच्या राज्यांत। आणि आपणांस बाहेर टा
किलेले, असें जेव्हां तुह्मीं पाहाल। तेव्हां रडणें व दांत
कडकडोवणें होईल॥ २९ आणि उगवत व मावळत ह्मां
पासून। आणि उत्तर व दक्षण ह्मांपासून येतील। आणि
देवाच्या राज्यांत टेंकतील॥ ३० आणि पाहा, शेवटले। जे
पहिले होतील। असे आहेत। आणि पहिले, जे शेवटले हो
तील। असे आहेत॥

३१ त्याच दिवसीं। कित्येक फारिशी जवळ येऊन। त्या
ला बोलिले। तूं निघून येथून जा। कां तर, हेरोद तु
ला जिवें मारायास इछितो॥ ३२ परंतु तो त्यांस बोलिला।
तुह्मीं जाऊन त्या कोल्ह्याला सांगा, पाहा, आज व उद्यां मी
भुतांस घालवितों। आणि निरोगी करणीं संपवितों। मग ति
सर्यांत पूर्ण केला जाईन॥ ३३ तथापि आज। व उद्यां। व
परवां। मला चालणें अगत्य आहे। कां तर। यरूशलेमा
बाहेर भविष्यभाषी घात पावणें संभवत नाहीं॥ ३४ हे यरू
शलेमा। यरूशलेमा। जी तूं भविष्यभाष्यांस जिवें मारितीस।
आणि आपणाजवळ जे पाठविले। त्यांस धोंड्यांनी मारितीस।
जसी कोंबडी आपल्या पिलवर्गास पांखांखालीं [येकवट करि
ती।] त्या प्रकारें तुझ्यां लेंकरांस येकवट करायास म्या कि
तिदां इछिलें। परंतु तुह्मीं न इछिलें॥ ३५ पाहा।
तुमचें घर तुह्मांस ओसाड ठेविलें आहे॥ आणि मी तुह्मां
स खचीत सांगतों। कीं जो प्रभूच्या नांवाने येतो। तो धन्य

"वाटीत। [असें] तुह्मीं ह्मणाल। ही वेळ येईल। तोंपर्यंत
तुह्मीं मला पाहाणार नव्हांच ※

पर्व १४। १ आणि शाब्बाथांत। तो फारिश्यांतील येका
अधिकाऱ्याच्या घरांत अन्न खायास जात्या वेळेस, असें जालें।
कीं ते त्याला जपत होते॥ २ तेव्हां पाहा, कोणी जळोदरा
चा माणुस त्याच्या समोर होता॥ ३ आणि येशू उत्तर दे
तां त्यां शास्त्र्यांस व फारिश्यांस बोलिला। शाब्बाथांत निरो
गी करणें योग्य आहे कीं काय? तेव्हां ते उगेच राहिले॥
४ मग त्याने त्याला धरून निरोगी केलें। आणि सोडिलें॥
५ मग त्यांस उत्तर देतां ह्मटलें। तुह्मांमधील कोणाचें गा
ढव। किंवा बैल खांचेंत पडेल। आणि शाब्बाथ दिवसीं त्या
ला तेव्हांच बाहेर न काढील? ६ नंतर ह्यांविषईं ते त्याला
विरुद्ध उत्तर देउं न शकले ※

७ आणि जे बोलाविलेले। त्यानी उत्तम आसनें कशीं नि
वडून घेतलीं। याविषईं लक्ष लावून, तो त्यांस दाखला बोलतां
त्यांस ह्मणाला। ८ जेव्हां तूं कोणाकडून लग्नकार्थांस बोला
विला आहेस। तेव्हां उत्तम आसनीं बसुं नको। कदाचित को
णी तुजपेक्षां अधीक सन्मानी त्याकडून बोलाविलेला असेल।
९ मग ज्याने तुला व त्याला बोलाविलें, तो येऊन तुला ह्म
णेल। ह्याला जागा दे। आणि तेव्हां तूं लाजेने शेवटील जा
गा धरूं लागसील॥ १० परंतु जेव्हां तूं बोलाविला अससील।
तेव्हां जाऊन शेवटील जागीं यासाठीं बैस, कीं ज्याने तुला बो
लाविलें, तो जेव्हां येतो। तेव्हां त्याने तुला ह्मणावें। हे मि
त्रा। याहून उंचावर, जवळ ये। नंतर। तुझ्या सोबती बस
णाऱ्यांसमोर। तुला गौरव होईल॥ ११ कां तर। जो को
णी आपणाला उंच करितो। तो निंच केला जाईल। आणि
जो आपणाला निंच करितो। तो उंच केला जाईल ※
१२ आणि ज्याने त्याला बोलाविलें होतें। त्याल्लाही तो बो
लिला। जेव्हां तूं दुपारचें किंवा संजचें जेवण करितोस। तें

व्हां तुझ्यां मित्रांस, किंवा तुझ्यां भावांस। किंवा तुझ्यां नातल
गांस। किंवा धनवान शेजाऱ्यांस। बोलावूं नको। कदाचित ते
ही तुला फिरोन बोलावतील। आणि तुला फेड होईल॥
१३ परंतु जेव्हां तूं जेवण करितोस। तेव्हां दरिद्र्यांस। व्यं
गांस। लंगड्यांस, आंधळ्यांस बोलाव। १४ मग तूं धन्य हो
सील। कां कीं। तुझें फेडायास ह्यांपासीं नाहीं। आणखी
पुण्यवान्तांच्या फिरोन उठत्या वेळेस तुझी फेड होईल॥ १५ नं
तर संगतीं जेवणाऱ्यांतील कोणी हीं ऐकून त्याला बोलिला।
जो देवाच्या राज्यांत अन्न खाईल। तो धन्य॥ १६ तेव्हां
याला तो बोलिला। येका माणसाने मोठें सांजजेवण केलें।
आणि बहुतांस बोलाविलें॥ १७ मग। अवघीं आतां सिद्ध
जालीं आहेत। यास्तव या। [असें] जेवणाच्या वेळेस। बोला
विलेल्यांस सांगायाला त्याने आपला चाकर पाठविला॥ १८ ते
व्हां येकापासून सगळे सुटका मागूं लागले। पहिला त्याला
बोलिला। म्या शेत विकत घेतलें आहे। आणि बाहेर जा
ऊन त्याला पाहाण्याचें अगत्य मला आहे॥ मी तुला वि
नंती करितों। मला सोडलें मान॥ १९ आणि दुसरा बोलि
ला। म्या बैलांच्या पांच जोड्या विकत घेतल्या आहेत। आणि
मी त्यांची प्रचिती घ्यायास जातों। मी तुला विनंती करि
तों। मला सोडलें मान॥ २० आणि दुसरा बोलिला। म्या
बायको केली आहे। तर ह्यासाठीं माझ्याने येववत नाहीं॥
२१ तेव्हां त्या चाकराने जवळ येऊन। आपल्या धन्याला हीं
निवेदिलीं॥ नंतर घरधन्याने। रागें भरून। आपल्या चाकरा
ला सांगीतलें॥ बाहेर नगराच्या मार्गांत व गल्ल्यांत वेगें जा,
आणि दरिद्र्यांस। व व्यंगांस, व लंगड्यांस, व आंधळ्यांस,
इकडे आण॥ २२ मग तो चाकर बोलिला, हे धन्या। ज
सी त्वां आज्ञा दिल्ही तसें जालें आहे, आणि अद्याप जागा
आहे॥ २३ मग धनी चाकराला बोलिला, माझें घर भरा
वें ह्मणोन वाटांमध्यें व कुंपणांमध्यें बाहेर जाऊन। अगत्या

न आंत येवीव॥ २४ कां तर। मी तुह्मांस सांगतों। कीं जीं बोलाविलीं। त्यां माणसांमधील कोणी माझें जेवण चाखणार नाहीं ※

२५ आणि त्याच्या बराबर बहुत समुदाय चालिले। ते व्हां तो मुरडून त्यांस बोलिला। २६ जर कोणी मजकडे येतो। आणि आपला बाप। व आई। व बायको। व लेंकरें। व भाऊ। व बहिणी यांस। आणखी आपल्या जिवालाही द्वेषीत नाहीं। तर तो माझा शिष्य होण्यास शक्तिमान नाहीं॥ २७ आणि जो कोणी। आपला मरणखांब वागवून माझ्या मागें येत नाहीं। तो माझा शिष्य होण्यास शक्तिमान नाहीं॥ २८ कां तर। तुह्मांमधील असा कोण? कीं बुरूज बांधायास इच्छितो। समाप्त करण्यासाठीं जें। तें आपल्यापाशीं आहेत। किंवा नाहींत। [असें] पहिलें बसून खर्च न गणतो॥ २९ कारण कीं। कदाचित पाया घालून। आणि समाप्त करायास शक्तिमान न होऊन। सर्व जे पाहातात। ते त्याची विटंबना करूं लागून बोलतील। ३० कीं हा माणुस बांधुं लागला। परंतु संपवुं न शकला॥ ३१ अथवा असा कोण राजा? कीं दुसऱ्या राजाशीं लढाईत भिडायास जात असतां। बसून पहिल्याने विचार न करितो। कीं जो वीस हजार घेऊन। आपल्यावर येतो। त्याला आपण दाहा हजार घेऊन सामोरें जायास शक्तिमान आहे किंवा नाहीं? ३२ आणि जर नाहीं खरें। तर तो दूर असतां। इतक्यांत हा वकिलीस पाठवून। शांती होण्यास अशीं काय। ह्मणोन विनंती करितो॥ ३३ याच्यासाठीं तसेंच तुह्मांमधील प्रत्येक जो, आपलीं अवघीं जीं आहेत। त्यांपासून विदा होत नाहीं। तो माझा शिष्य होऊं शकत नाहीं॥ ३४ मीठ चांगलें [आहे।] परंतु मीठ जर निःसत्व झालें, तर कशानें खारट केलें जाईल? ३५ भूमी व खतही यांजोगें नाहीं। त्याला बाहेर टाकितात॥ ज्याला ऐकायास कान आहेत। तो ऐको ※

पर्व १५. १ तेव्हां त्याचें ऐकायास। सर्व करघेणारे व
पापी त्याच्या जवळ येत असत होते॥ २ आणि फारिशी व
पंडीत कुजबुजतां बोलिले। कीं हा माणुस पाप्यांस अंगिका
रितो। आणि त्यांबराबर खातो॥ ३ तेव्हां तो हा दाखला
त्यांस बोलतां ह्मणाला। ४ तुह्मांमधील असा कोण माणुस?
कीं याची शंभर मेंढें असतां। आणि, त्यांतुन येक हर
विल्यावर। तीं नव्याणव रानामध्यें सोडतांना। जें हारपलें।
तें सांपडे तोंपर्यंत। त्यासाठीं न जातो॥ ५ आणि सांपडल्या
स। तो आनंदतां आपल्यां खांद्यांवर ठेवितो। ६ मग घरीं
येऊन। मित्रांस व शेजाऱ्यांस बोलाऊन। त्यांस सांगतो। मा
झें हारपलेलें मेंढुं सांपडलें। यास्तव तुह्मीं माझ्या संगतीं आनं
द करा॥ ७ मी तुह्मांस सांगतों कीं तसें। नव्याण्णव पुण्यवा
न। ज्यांस पश्चात्तापाचें अगत्य नाहीं। त्यांहून पश्चात्ता
प कर्त्या येक पाप्यावर आकाशामध्यें आनंद होईल ※
८ किंवा असी कोण बायको? कीं आपल्याला दाहा पाव
ल्या असतां। जर ती येक पावली हरवील। तर दिवा ला
वून। व घर झाडून, ती सांपडे तोंपर्यंत येकनिष्ठेने शोध न
करिती॥ ९ आणि सांपडल्यावर। मित्रांस व शेजाऱ्यांस बोला
वून ह्मणती। जी पावली म्या हरविली ती मला सांपडली।
यास्तव माझ्या संगतीं आनंद करा॥ १० तसें। मी तुह्मांस
सांगतों। येक पापी जो पश्चात्ताप करितो, यावर देवाच्या दू
तांच्या भावनेंत आनंद होतो ※ ११ आणि तो बोलिला। को
णा माणसाला दोन पुत्र होते। तेव्हां यांतील धाकटा। तो
बापाला बोलिला। १२ हे बापा। वस्तभावेचा वांटा जो [मजा]
लागतो। तो मला दे॥ मग त्याने त्यांस उपजीवन वांटलें॥
१३ आणि फार दिवसांचें अंतर नसतां, धाकटा पुत्र। अ
वघीं गोळा करून। दूर देशांत प्रवासास गेला॥ आणि तेथे
आपलें धन उधळेपणाने उडविलें॥ १४ नंतर त्याने अवघीं खर्च
ल्यावर। त्या देशांत मोठा दुकाळ जाला। आणि त्याला उणें

होऊं लागलें॥ १५ मग तो जाऊन त्या ठिकाणांतील येका दे
शस्थाला जडला। आणि त्याने त्याला डुकरांस चरवायाला आप
ल्या शेतांत पाठविलें॥ १६ तेव्हां डुकरांनी जीं गुळीं खाल्लीं।
त्यांकडून त्याने आपलें पोट भरायास फार इछिलें॥ आणि
कोणी त्याला दिल्हें नाहीं॥ १७ नंतर तो आपलेपणांत आ
ल्यावर बोलिला। माझ्या बापाच्या किती मोलकऱ्यांस पुष्कळ अ
न्न आहे। परंतु मी भुकेने नाश पावतों॥ १८ मी उठून आ
पल्या बापाजवळ जाईन। मग त्याला ह्मणेन। हे बापा। म्या
आकाशासीं आणि तुझ्या पाहाण्यांत। पाप केलें आहे। १९ आ
णि आतांपासून मी तुझा पुत्र ह्मटला जाण्यास योग्य नाहीं।
तुझ्या येका मोलकऱ्यांप्रमाणे मला ठेव॥ २० नंतर तो उठू
न आपल्या बापाजवळ आला। तेव्हां तो दूतक्यांत फार दू
र असतां। त्याचा बाप त्याला पाहातांना कळवळला। तेव्हां
धांवून त्याच्या मानेवर पडला। आणि त्याचें चुंबन ह्याने घेत
लें॥ २१ मग पुत्र त्याला बोलिला। हे बापा। आकाशासीं आ
णि तुझ्या पाहाण्यांत म्या पाप केलें आहे। आणि आतांपा
सून मी तुझा पुत्र ह्मटला जाण्यास योग्य नाहीं॥ २२ परं
तु बापाने आपल्यां चाकरांस ह्मटलें। तुह्मीं उत्तम झगा काढू
न याला लेववा। आणि याच्या हातीं आंगठी। आणि पांईं जो
डे घाला॥ २३ मग पुष्ट वांसरूं आणून मारा। आणि आ
ह्मीं खाऊन हर्षीत होऊ। २४ कां तर। हा माझा पुत्र मे
ला होता। परंतु फिरोन जिवंत जाला। आणि हारपला हो
ता। परंतु सांपडला आहे॥ आणि ते हर्षीत होऊं लागले॥
२५ परंतु त्याचा वडील पुत्र शेतांत होता। मग येऊन घ
राजवळ पोहोंचल्यावर। त्याने वाद्य व नाच ऐकिलें॥ २६ ते
व्हां चाकरांतील येकाला बोलावून विचारिलें। हीं कशाला अ
सतील? २७ नंतर तो त्याला बोलिला। तुझा भाऊ आला
यासाठीं। आणि तुझा बाप त्याला सुखरूप पावला। यास्तव
त्याने पुष्ट वांसरूं मारिलें आहे॥ २८ मग ह्याने रागें भरून।

आंत जायाला अनमान केला॥ यास्तव याच्या बापाने बा
हेर येऊन याला समजाविलें॥ २९ परंतु हा उत्तर देतां।
बापास बोलिला। पाहा। मी इतकीं वर्षें तुझी चाकरी करितों।
आणि तुझी आज्ञा म्या कधीं उल्लंघली नाहीं। तथापि। माझ्यां
मित्रांच्यां बरोबर म्या हर्षीत व्हावें। ह्मणोन त्वां मला कधीं
बकरूं दिल्हें नाहीं॥ ३० परंतु हा तुझा पुत्र। ज्याने तुझें
उपजीवन कळवांतिणींबरोबर खाऊन टाकिलें। तो जेव्हां आ
ला। तेव्हां त्वां त्याच्या साठीं पुष्ट वांसरूं मारिलें आहे॥ ३१ ते
व्हां तो याला बोलिला। हे लेंकरा। तूं सर्वदां माझ्या जवळ आहे
स। आणि अवघीं जीं माझीं तीं तुझीं आहेत॥ ३२ परंतु हर्षी
त व आनंदीत होणें अगत्य जालें। कां तर। हा तुझा भा
ऊ मेला होता। परंतु फिरोन जिवंत जाला आहे। आणि
तो हारपला होता। परंतु सांपडला आहे॥

पर्व १६। १ आणखी तो आपल्यां शिष्यांस बोलिला। को
णी धनवान माणुस होता। याचा कारभारी होता। आणि
ह्याने त्याचीं द्रव्यें उडविलीं। असा हा त्याच्या जवळ अपवा
दिला गेला॥ २ आणि त्याने याला बोलावून याला ह्मटलें।
तुजविषईं हें मी काय ऐकतों? तुझ्या कारभाराची झडती
दे। कारण कीं। आतांपासून। तूं कारभार करूं शकणार
नाहींस॥ ३ तेव्हां तो कारभारी आपल्यांत बोलिला। माझा
प्रभू मजपासून कारभार काढितो। यास्तव मी काय करूं?
खणायास मला शक्ति नाहीं। [आणि] भीक मागायास
लाजतों॥ ४ जेव्हां मी कारभारांतुन घालविला जाईन। ते
व्हां त्यांनी आपल्यां घरांत मला घ्यावें ह्मणोन म्या काय करा
वें। हें मला कळलें॥ ५ तेव्हां त्याने आपल्या धन्याचे देणेकरी।
यांतील येक येकाला बोलाविल्यावर। पहिल्याला ह्मटलें, माझ्या
धन्याचें तुला किती देणें आहे? ६ मग हा बोलिला। तेलाचे
शंभर मण॥ तेव्हां तो ह्याला बोलिला। तुझा लेख घे,
आणि लवकर बसून पन्नास मांड॥ ७ नंतर दुसऱ्याला बो

लिला। आणि तुला किती देणें आहे? तेव्हां हा बोलिला।
गव्हांच्या शंभर खंड्या। मग तो त्याला ह्मणतो, तुझें लिखीत
घे। आणि ऐशी मांड॥ ८ नंतर। अन्यायी कारभाऱ्या
ने शाहाणपणें केल्यासुव। धन्याने त्याला वाखाणिलें। कां
तर। ह्या जगाचे पुत्र। आपल्या पिढीमध्यें। प्रकाशाच्यां पु
त्रांपेक्षां अधीक शाहाणे आहेत॥ ९ आणि मी तुह्मांस सां
गतों, अन्यायी लक्ष्मीकडून तुह्मीं आपल्यांसाठीं मित्रांस मि
ळवा। यासाठीं। कीं तुह्मीं खुंटाल, तेव्हां त्यांनी तुह्मांस सर्व
काळांच्या वस्त्यांत घ्यावें॥ १० जो अती लाहानाविषईं विश्वा
सु, तो फाराविषईंही विश्वासु आहे। आणि जो अती ला
हानाविषईं अन्यायी, तो फाराविषईंही अन्यायी आहे॥
११ यास्तव जर तुह्मीं अन्यायी लक्ष्मीविषईं विश्वासु न जा
लां, तर जें खरी, ते तुमच्या विश्वासावर कोण ठेवील?
१२ आणि दुसऱ्याचें, याविषईं जर तुह्मीं विश्वासु न जालां,
तर तुमचें जें, तें तुह्मांस कोण देईल? १३ कोणी घरचा
कर दोघां धन्यांची चाकरी करूं शकत नाहीं। कारण कीं,
तो येकाला द्वेषील, आणि दुसऱ्यावर प्रीती करील। अथवा
येकाचा पक्ष धरील। आणि दुसऱ्याला तुच्छ करील॥ तुह्मीं
देवाची आणि लक्ष्मीची चाकरी करूं न शकतां ※

१४ आणि फारिशी। जे पैक्यालोभी असतात। यांनी हीं
अवघीं ऐकिलीं। आणि त्याला नाकारिलें॥ १५ तेव्हां तो
त्यांस बोलिला, जे आपणांस माणसांसमोर पुण्यवान ठरवितात।
ते तुह्मीं आहां। परंतु देव तुमच्यां हृदयांस जाणतो। कां तर।
माणसांमध्यें जें फार उंच, तें देवाच्या पाहाण्यांत मळमळित आ
हे॥ १६ नेमशास्त्र। व भविष्यभाषी योहान्नापर्यंत [होते।]
तेव्हांपासून देवाच्या राज्याचें सुवर्तमान सांगीतलें आहे, आणि
प्रत्येक त्यांत बळाने जातो॥ १७ परंतु नेमशास्त्राचा येक फां
टा गळण्यापेक्षां आकाश व पृथ्वी नाहींसीं होणें। हें सोपें आहे॥
१८ जो कोणी आपल्या बायकोला सूट देतो, आणि दुसरी

शीं लग्न करितो। तो व्यभिचार करितो। आणि नवऱ्यापा
सून सुट पावलेल्या स्त्रीशीं जो कोणी लग्न करितो, तो व्यभिचा
र करितो॥ १९ तर कोणी धनवान माणूस होता॥ आणि
तो किरमजी व बुटीं वस्त्रें लेऊन। प्रती दिवशीं तेजस्वी उत्सा
ह करीत होता॥ २० आणि लाजारस नांवें कोणी दरिद्री
होता। हा फोडयुक्त असून, त्याच्या दरवाज्याजवळ टाकिला
होता। २१ आणि तो त्या धनवानाच्या अडणीवरून पडले
ले चुरे, यांपासून पोसला जाण्यास आशावला॥ आणखी कु
त्र्यांनीही येऊन त्याचे फोड चाटिले॥ २२ मग असें जालें,
कीं दरिद्री मेला, आणि दूतांकडून आब्राहामाच्या उराक
डे तो नेला गेला॥ तेव्हां धनवानही मेला, आणि पु
रला गेला॥ २३ आणि लोकांतरीं पिडांमध्यें असतां।
त्याने आपले डोळे वर करून। दुरून आब्राहामाला व त्या
च्या उरीं लाजारसाला पाहिलें॥ २४ मग तो हाक मारितां
बोलिला। हे आब्राहामा। बापा। मजवर दया कर। आणि
लाजारसाला यासाठीं पाठीव, कीं त्याने आपल्या बोटाचें
अग्र पाण्यांत बुचकळून। माझ्या जिभेला थंड करावें। कां त
र, मी ह्या जाळांत क्लेशी आहें॥ २५ परंतु आब्राहाम बो
लिला, हे लेंकरा, तूं हें आठेव। कीं तूं आपल्या आयुष्यांत।
आपलीं जीं उत्तम तीं पावलास। आणि त्याप्रमाणे लाजा
रस वाईट तीं [पावला।] परंतु आतां हा येथें शांतविला
आहे, आणि तूं क्लेशीत आहेस॥ २६ आणि यां सगळ्यां
वर। आमच्या व तुमच्या मध्यें मोठा चर स्थापिला आहे।
यास्तव जे येथून पार तुह्मांकडे जाण्यास इछितात। ते शकत
नाहींत। आणि तिकडून आह्मांकडे। त्यांच्याने वल्हांडवत ना
हीं॥ २७ मग तो बोलिला। तर बापा। मी तुला विनंती क
रितों, कीं त्याला माझ्या बापाच्या घरास पाठवावें। २८ कां
तर, मला पांच भाऊ आहेत। ह्मणजे त्याने त्यांस साक्ष
यासाठीं पटवावी। कीं त्यांनी ह्या पिडेच्या जाग्यांत न यावें॥

२९ आब्राहाम त्याला बोलतो, त्यांच्या जवळ मोशे व भविष्य
भाषी आहेत यांचें ते ऐकोत ॥ ३० मग तो बोलिला, हे आ
ब्राहामा, बापा। [असें] नको। परंतु जर कोणी मेलेल्यांम
धून त्यांजवळ जाईल। तर ते पश्चात्ताप करतील ॥ ३१ तेव्हां
त्याने त्याला ह्मटलें। जर ते मोश्याचें व भविष्यभाष्यांचें ऐक
त नाहींत, तर मेलेल्यांमधुनही जरीं कोणी उठला, तरीं
ते विश्वासविले जाणार नाहींत ॥

पर्व १७ ॥ १ तेव्हां तो शिष्यांस बोलिला, अडखळणीं न
येणें हें असंभव आहे। परंतु ज्याकडून येतात। त्याला हाय
हाय ॥ २ त्याने ह्या धाकट्यांतून एकाला अडखळावें।
यापेक्षां त्याच्या गळ्यांत जांत्याचें पेढ घातलें जाणें। आणि
तो समुद्रांत टाकला जाणें। हें त्याला लाभ असतें ॥
३ तुह्मीं आपणांसीं सावध व्हा ॥ आणि जर तुझा भाऊ तु
झ्या जवळ पाप करितो। तर त्याला निषेध कर। आणि ज
र तो पश्चात्ताप करितो, तर त्याला क्षमा कर ॥ ४ आ
णि जर तो, दिवसांत सात वेळा, तुझ्या जवळ पाप करि
तो। आणि त्या दिवसांत सात वेळा तुजकडे परतून बोलेल।
मी पश्चात्ताप करितों। तर त्वां त्याला क्षमा करावें ॥ ५ ते
व्हां ते प्रेषीत प्रभूला बोलिले। आमचा विश्वास वाढीव ॥
६ आणि प्रभू बोलिला, जर तुह्मांस मोहरीच्या दाण्या इतका
विश्वास जाला असता, [आणि] तुह्मीं या उंबराला सांगितलें
असतें, तूं उपटला जा। आणि समुद्रांत लावला जा। तर त्या
ने तुमचें मानलें असतें ॥ ७ आणि तुह्मांमधील [असा] को
ण? कीं याचा चाकर नांगरीत किंवा चरवीत असतां शेता
पासून आल्यावर त्याला बोलेल, तूं जवळ येऊन जेवायास
बैस ॥ ८ काय, त्याला वेगळें न ह्मणेल? म्या जेवावें। ह्मा
णोन कांहीं सिद्ध कर, आणि तूं कंबर बांधून। मी खातों
व पितों तोंपर्यंत माझी सेवा कर। आणि त्यांनंतर। तूं खा
सील व पिसील? ९ काय। त्या चाकराचा आभार मानीतो,

कीं त्याला जों नेमिलों तों त्याने केलों ह्मणोन? मला
वाटतें, नाहीं। १० तसें तुह्मीही, अवघों जीं तुह्मास नेमिलीं
तीं जेव्हां कराल। तेव्हां बोला। कीं जें करायास आह्मीं बांधले
होतों, तें [मात्र] केलें। यास्तव आह्मीं अहीतकारी चाक
र आहों ॥
११ आणि तो यरूशलेमास जात होता, तेव्हां असें जा
लें; कीं शोमरोन व गालील यांच्या मधून गेला॥ १२ आ
णि तो येका गांवांत जात असतां; दाहा कोढी माणूस त्या
ला भेटून, दूर उभे राहिले। १३ आणि ते उंच स्वर का
ढून बोलिले, हे येशू, स्वामी। आह्मांवर दया कर॥
१४ मग तो पाहून त्यांस बोलिला, तुह्मीं जाऊन आपणांस
उपाध्यांसीं दाखवा॥ नंतर त्यांच्या जाल्या वेळेस, असें जालें,
ते शुद्ध केले गेले॥ १५ आणि त्यांमधील येकाने, आपण
बरा जाला, असें पाहून माघारें फिरून। मोठ्या स्वराने दे
वाला गौरविलें। १६ आणि त्याच्या पायांजवळ पालथा
पडून, त्याला उपकार मानिला। आणि हा शोमरोनकर
होता॥ १७ तेव्हां येशू उत्तर देतां बोलिला। दाहा शुद्ध
केले नव्हते काय? तर ते नव कोठे? १८ हा अन्य जाती
चा यावांचून, देवाला गौरव द्यायास परतलेले असे सांपड
ले नाहींत॥ १९ मग तो त्याला बोलिला॥ तूं उठून जा।
तुझ्या विश्वासाने तुला तारिलें आहे॥
२० आणि देवाचें राज्य केव्हां येतें। [असें] फारिश्यांक
डून तो विचारलेला असतां, त्यांस उत्तर देतांना बोलिला।
देवाचें राज्य जपण्यासीं येत नाहीं॥ २१ आणि येथे पाहा,
किंवा तेथे पाहा। असें न बोलतील। कां तर पाहा। देवाचें
राज्य तुह्मांमध्यें आहे॥ २२ आणि तो शिष्यांस बोलिला। अ
से दिवस येतील। कीं तेव्हां तुह्मीं माणसाच्या पुत्राच्या दि
वसांतील येकाला पाहायास इच्छाल, परंतु न पाहाल॥ २३ आ
णि तुह्मांस बोलतील, येथे पाहा, किंवा तेथे पाहा। [तेव्हां]

तुह्मीं निघुं नका। आणि मागें जाउं नका॥ २४ कारण कीं
ज्या प्रकारें वीज आकाशाखालच्या इकडून चमकून। आकाशा
खालच्या तिकडे प्रकाशती, तसा माणसाचा पुत्रही आपल्या
दिवसांत होईल॥ २५ परंतु पहिल्यानें बहुत सोसणों, आ
णि ह्या पिढीकडून अव्हेरिलें जाणें, हीं त्याला लागतात॥
२६ आणि नोहाच्यां दिवसांत जसें जालें, तसें मनुष्यपुत्राच्यां
दिवसांतही होईल॥ २७ नोहा तरांड्यांत गेला, आणि प्र
ळयपुरानें येऊन सर्वांचा नाश केला, त्या दिवसापर्यंत त्या
नी खालें। तीं प्यालीं। त्यानी वह्राडुन घेतलीं। तीं वह्राडुन
गेलीं॥ २८ आणि लोटाच्यां दिवसांत जसें जालें, त
सेंही। त्यांनी खालें। ते प्याले। त्यानी विकत घेतलें। त्यानी वि
किलें। त्यानी लावणें केलें। त्यानी बांधिलें। २९ परंतु लोट सदो
मापासून निघाला, त्या दिवशीं, आकाशांहून अग्नी व गं
धक यांचा पाऊस जाला, आणि त्यानी सर्वांचा नाश केला॥
३० माणसाचा पुत्र प्रगट होईल, तो दिवस त्यांप्रमाणे हो
ईल॥ ३१ त्या दिवशीं, जो गच्चीवर होईल, आणि त्या
च्या वस्तू घरांत, तो त्या न्यावयास, खालीं न येवो॥
आणि जो शेतांत, तो तसाच माघारीं जीं यांसाठीं न फिरो॥
३२ लोटाच्या बायकोची आठवण करा॥ ३३ जर कोणी आ
पला जीव राखायास झटतो, तर तो त्याला गमावील। आ
णि जर कोणी त्याला गमावील, तर तो त्याला जिवंत का
ढील॥ ३४ मी तुह्मांस सांगतों, त्या रात्रीं। येका बाजे
वर दोघे होतील। येक धरिला जाईल, आणि दुसरा ठेवि
ला जाईल॥ ३५ दोघीं येकवट दळीत होतील। येक धरि
ली जाईल, आणि दुसरी ठेविली जाईल॥ ३६ शेतामध्यें दो
घे होतील। येक धरिला जाईल, आणि दुसरा ठेविला जा
ईल॥ ३७ तेव्हां ते उत्तर देतां त्याला बोलिले, हे प्रभू,
कोठें? मग तो त्यांस बोलिला। जेथे प्रेत। तेथे राजगीध
ही येकवट होतील ※

पर्व १८ ॥ १ आणखी त्याने त्यांस दाखला असला सां
गीतला, कीं सर्वदां प्रार्थना करणें, आणि न भागणें लाग
तें। २ कीं येका नगरांत कोणी असा न्यायाधीश होता,
देवाला न भ्याला। आणि त्याने माणसाची भीड मा
निली नाहीं॥ ३ तेव्हां त्या नगरांत कोणी विधवा होती। आ
णि ती त्याच्या जवळ येऊन बोलिली, माझ्या वाद्यापासून
मला न्यायखंड दे॥ ४ तेव्हां [कांहीं] वेळपर्यंत त्याने मानि
लें नाहीं। परंतु त्यानंतर, तो आपणांत बोलिला। जरी मी
देवाला भीत नाहीं। आणि माणसाचीही भीड मानीत ना
हीं। ५ तथापि ही विधवा मला श्रम देती, यास्तव तिला
न्यायखंड यासाठीं पाववीन, कीं तीने। शेवटपर्यंत येऊन,
माझ्या तोंडावर न मारावें॥ ६ आणि प्रभू बोलिला, अन्या
ची न्यायाधीश काय ह्मणतो, तें तुह्मीं ऐका॥ ७ तर दे
व। आपले निवडलेले जे रात्रीं व दिवसीं त्याला हाक मा
रितात, त्यांजविषईं फार साहातांही, त्यांचा न्यायखंड घेणार
नाहीं कीं काय? ८ मी तुह्मांस सांगतों, कीं तो त्यांचा न्या
यखंड लवकर घेईल? तथापि माणसाचा पुत्र येऊन पृथ्वी
वर त्याला विश्वास सांपडेल कीं काय? ※

९ आणखी आपण पुण्यवान आहों, असें ज्या कित्येकानी
आपणांवर विश्वासलें। आणि दुसऱ्यांस धिःकारिलें। त्यांस त्या
ने हा दाखला सांगीतला। १० दोघे माणूस, येक फारिशी
व दुसरा करघेणारा। हे प्रार्थना करायास देवळास चढले॥
११ फारिश्याने आपणाशीं उभा राहून। हीं प्रार्थिलीं। हे दे
वा। दुसरीं माणसें। अपहारी, अन्यायी, व्यभिचारी। यांसारि
खा, किंवा या करघेणाऱ्यासारिखाही, मी नव्हें। यास्तव मी
तुझा उपकार मानितों॥ १२ सात्यांत दोनदां उपास करि
तों। जितकीं मला मिळतात, त्यां अवघ्यांचें दाहावें देतों॥
१३ परंतु करघेणाऱ्याने दूर उभा राहून, डोळे आकाशाकडे
वर कराधाम अनमान केला, आणखी आपल्या उरावर मा

ऊन बोलिला। हे देवा। मज पाप्यावर प्रसन्न हो॥ १४ मी
तुह्मांस सांगतों, हा दुसऱ्यापेक्षां न्यायी मोजलेला। आपल्या घ
रास उतरला। कां तर। जो कोणी आपणाला उंच करितो।
तो निंच केला जाईल। आणि जो आपणाला निंच करितो।
तो उंच केला जाईल ॐ

१५ तेव्हां त्यांनी त्याच्या जवळ बाळेंही यासाठीं आणि
लीं, कीं त्याने त्यास शिवावें, परंतु शिष्यानी पाहून त्यांस द
बाविलें॥ १६ तेव्हां येशूने त्यांस जवळ बोलावून ह्मटलें, मु
लग्यांस माझ्या जवळ येउं द्या। आणि त्यांस मना करूं नका।
कारण कीं, देवाचें राज्य तशांचें आहे॥ १७ मी तुह्मांस ख
चीत सांगतों, जर कोणी, लेंकरासारिखा, देवाचें राज्य घेत
नाहीं। तर तो त्यांत जाणार नाहींच ॐ

१८ तेव्हां कोणी अधिकारी त्याला विनंती करीत बोलिला।
हे उत्तम गुरू, म्या सर्वकाळीक जीवनाचें वतन पावावें, ह्म
णोन काय करावें? १९ मग येशू त्याला बोलिला, मला उ
त्तम कां ह्मणतोस? येक जो देव यावांचून कोणी उत्तम ना
हीं॥ २० ह्या आज्ञा तुला कळल्या आहेत। व्यभिचार न करा
वा। हत्या न करावी। चोरी न करावी। खोटी साक्ष न द्या
वी। तुझा बाप व तुझी आई, यांचा सन्मान कर॥ २१ म
ग तो बोलिला, ह्या सर्व, माझ्या बाळपणापासून, म्या पाळि
ल्या आहेत॥ २२ तेव्हां येशू, हीं ऐकून। त्याला बोलिला।
अद्यापि तुला येक उणें आहे। अवघीं जितकीं तुझीं आहे
त। तीं वीक आणि दरिद्र्यांस वांटून दे। ह्मणजे तुला आ
काशांत धन होईल। मग दूकडे, मला अनुसर॥ २३ परंतु
तो हीं ऐकून, फार कष्टी जाला। कारण कीं, तो अती ध
नवान होता॥ २४ तेव्हां तो कष्टी जाला, हें येशू पाहून बो
लिला, ज्यांस संपत्तीं आहेत। ते देवाच्या राज्यांत, किती वि
कटपणाने जातील॥ २५ कारण कीं, धनवानाला, देवाच्या रा
ज्यांत जाणें, यापेक्षां उंटाला सुईच्या नेढ्यांतून जाणें सोपें आ

हे॥ २६ तेव्हां ज्यानी ऐकिलें, ते बोलिले। तर तारलें जा
ण्यास कोण शकतो? २७ मग तो बोलिला, माणसांस जों
अशक्य तीं देवाला शक्य आहेत ※

२८ तेव्हां पेत्रस बोलिला। पाहा। आह्मीं अवघीं सोडून तु
झ्या मागें चाललों आहों॥ २९ मग तो त्यांस बोलिला। मी
तुह्मांस खचीत सांगतों। कीं ज्याने देवाच्या राज्यासाठीं। घर
किंवा आईबापें। किंवा भाऊ जे, किंवा बायको, किंवा लेंकरें।
यांस सोडिलें। ३० असा, जो ह्या काळीं बहुतपट। आणि
होणार लोकीं सर्वकाळीक जिवन न पावणार। कोणीच नाहीं ※

३१ तेव्हां तो बारा शिष्यांस जवळ घेऊन, त्यांस बोलि
ला। पाहा। आह्मीं वर यरूशलेमास जातों। आणि भविष्यवा
द्यांकडून माणसाच्या पुत्राविषईं। सर्व जीं लिहिलीं। तीं पूर्ण के
लीं जातील॥ ३२ कारण कीं। तो परदेशस्थांच्या स्वाधीन के
ला जाईल, आणि त्याची विटंबना केली जाईल। आणि तो गां
जला जाईल। व त्यावर थुंकणें होईल॥ ३३ आणि ते फटके
देऊन, त्याला जिवें मारितील। मग तिसऱ्या दिवशीं। तो फि
रोन उठेल॥ ३४ परंतु ते ह्यांतील कांहीं न समजले। ह्म
णजे, ही गोष्ट त्यांपासून लपविली गेली, आणि जीं ह्मटलीं
तीं त्यांनी न जाणलीं ※

३५ मग तो जवळ येत्या वेळेस। यरिहोस हें जालें।
कोणी आंधळा भीक मागत वाटेजवळ बसला होता॥ ३६ ते
व्हां त्याने समुदाय पुढून चालतां ऐकून, हें काय असेल?
असें पुसलें॥ ३७ मग त्यांनी त्याला सांगीतलें। कीं नाजोरी
येशू जवळून जात आहे॥ ३८ तेव्हां तो ओरडत बोलिला। हे
येशू, दावीदाच्या पुत्रा। मजवर दया कर॥ ३९ नंतर तो
उगा राहावा, ह्मणोन पुढें चालणाऱ्यांनी त्याला दबाविलें।
परंतु तो फार अधीक ओरडला। [कीं] दावीदाच्या पुत्रा, मज
वर दया कर॥ ४० तेव्हां येशूने। उभा राहून, आपल्या
जवळ तो आणला जावा, ह्मणोन आज्ञा केली॥ मग तो ज

वळ आंध्यावर। ह्याने त्याला विचारतां ४१ ह्मटलें, त्या
तुझ्या साठीं काय करावें ह्मणोन इछितोस? नंतर तो बोलिला,
हे प्रभू, मला दिसावें ह्मणोन॥ ४२ तेव्हां येशू त्याला बोलिला,
तुला दिसो। तुझ्या विश्वासाने तुला तारिलें आहे॥ ४३ आ
णि त्याला तेव्हांच दिसलें॥ मग तो देवाला गौरवीत त्या
च्या मागें गेला। आणि सर्व लोकांनी पाहून देवाला स्तुती
दिल्ही ※

पर्व १९ ॥ १ आणि तो आंत येऊन यरिहोमधून गेला॥
२ तेव्हां पाहा, जाक्खी नांवाने ह्मटलेला माणुस [होता।]
आणि तो मुख्य करघेणारा होता। तो धनवानही होता॥
३ आणि येशू कोण आहे, हें पाहायास त्याने यत्न केला।
परंतु समुदायामुळें न शकला। कां कीं वाढ्याने ठेंगणा होता॥
४ तेव्हां तो त्याला पाहायासाठीं पुढें धांवून उंबरावर चढ
ला। कां तर, हा त्याजवळून जाणार होता॥ ५ आणि त्या
जागयावर आला असतां, येशूने दृष्टी वर करून त्याला पा
हिलें। आणि त्याला ह्मटलें, हे जाक्खी, घाईने उ
तर। कां कीं, आज तुझ्या घरीं मला राहावें लागतें॥ ६ म
ग त्याने घाईने उतरून आनंदाने त्याला अंगिकारिलें॥
७ तेव्हां सर्व पाहून कुरकुरतां बोलिले, कीं तो पापी मा
णसाकडे उतरायास आंत गेला आहे॥ ८ तेव्हां जाक्खी उ
भा राहून प्रभूला बोलिला। पाहा प्रभू, माझें अर्धें द्रव्यें द
रिद्र्यांस देतों। आणि जर कुभांडाने कोणाचें कांहीं घेतलें,
तर चौपट परत देतों॥ ९ तेव्हां येशूने त्याविषईं असें ह्मटलें,
आज या घराला तारण प्राप्त जालें आहे। आसव कीं,
ह्याही आब्राहामाचें संतान आहे। १० कारण कीं, जें हा
रपलेलें त्याला शोधायास आणि तारायास माणसाचा पुत्र
आला आहे ※

११ तेव्हां ते हीं ऐकत असतां, त्याने आणखी दाखला
सांगीतला। यामुळें कीं तो यरूशलेमाजवळ होता, आ

णि देवाचें राज्य लवकर प्रकाशीत होणार आहे। असें त्यां
स वाटलें॥ १२ ह्मणोन बोलिला, कोणी सुकुळी माणुस।
आपल्यासाठीं राज्य घेण्यास। आणि माघारें येण्यास दूर दे
शांत गेला॥ १३ आणि त्यानें आपल्यां दाहा चाकरांस बो
लावून, त्यांस दाहा शेरपैका दिल्हा। आणि त्यांस ह्मटलें। मी
येतों तोंपर्यंत। तुह्मीं व्यापार करा॥ १४ परंतु त्याच्या ना
गरिकानीं त्याचा द्वेष केला। आणि त्याच्या मागें वकिली
पाठवून ह्मटलें। ह्यानें आह्मांवर राज्य करावें। ह्मणोन आ
ह्मीं न इच्छितों॥ १५ मग तो राज्य पावून माघारें आल्याव
र। असें झालें। कीं ज्या चाकरांस पैका दिल्हा। त्यांतील
कोणी काय मिळविलें। हें आपण जाणावें। ह्मणोन त्यानें त्यां
स आपल्या जवळ बोलावायास सांगितलें॥ १६ तेव्हां पहिला
जवळ येऊन बोलिला, हे प्रभू, तुझ्या शेरानें दाहा शेर मि
ळविले आहेत॥ १७ मग ह्याला तो बोलिला, बरें, उत्त
म चाकरा। तूं फार थोडक्याविषईं विश्वासु जालास। यास्तव
दाहा नगरांवर अधिकार करीत ऐस॥ १८ तेव्हां दुसरा
येऊन बोलिला। हे प्रभू, तुझ्या शेरानें पांच शेर मिळवि
ले आहेत॥ १९ तेव्हां यालाही तो बोलिला। तूंही पांच
नगरांवर ऐस॥ २० मग दुसरा येऊन बोलिला। हे प्रभू, पा
हा। तुझा शेर, जो म्यां फडक्यांत ठेवून राखिला आहे।
तो हा। २१ कां तर, मी तुला भ्यालों। कारण कीं।
तूं खट माणुस आहेस। जें त्वां ठेविलें नाहीं, तें तूं घेतो
स। आणि जें त्वां पेरिलें नाहीं, तें तूं कापितोस॥ २२ ते
व्हां तो त्याला ह्मणतो। दुष्ट चाकरा। मी तुझ्या मुखानें तु
झा न्याय ठरवितों॥ मी खट माणुस आहें। जें म्यां ठेविलें
नाहीं, तें मी घेतों। आणि जें म्यां पेरिलें नाहीं। तें मी
कापितों, हें त्वां जाणलें। २३ तर, माझा पैका पेढिवर
कां ठेविला नाहीं? ह्मणजे म्यां। येऊन, तो व्याजासुद्धां उ
गविला असता॥ २४ तेव्हां जवळ उभ्यां राहाणाऱ्यांस तो बोलि

ला। तो येक शेर त्यापासून घ्या, आणि ज्याला दाहा शे
र आहेत। त्याला द्या॥ २५ मग ते त्याला बोलिले, हे
प्रभू, त्याला दाहा शेर आहेत॥ २६ मी तुह्मांस कारण
सांगतो। कीं ज्या प्रत्येकाला आहे, त्याला दिल्हें जाईल॥
आणि ज्याला नाहीं, त्याचें जें आहे, तें त्यापासून घेतलें
जाईल। २७ आणखी ते माझे शत्रू, ज्यांनी आपल्यांवर
म्या राज्य करावें ह्मणोन इच्छिलें नाहीं। त्यांस येथे आणा,
आणि माझ्या समोर वधून टाका॥

२८ आणि तो हीं बोलून। यरूशलेमास वर जात अ
सतां, पुढें चालिला॥ २९ नंतर तो जवळ, बेथफागे व बेथा
नी येथवर, जाइतझाडांच्या ह्मटलेल्या डोंगरास आला अस
तां हें जालें। तो आपल्यां शिष्यांतून दोघांस पाठवितांना।
३० बोलिला। तुह्मीं समोरच्या गांवास जा। त्यांत शिरतां तु
ह्मांस बांधलेला शिंगा, ज्यावर कोणी माणुस कधींही बसलें
नाहीं, असें तुह्मांस सांपडेल। त्याला सोडून आणा॥ ३१ आ
णि कां सोडितां? [असें] जर कोणी तुह्मांस विचारतो। त
र त्याला असें बोला, कीं प्रभूला त्याचें अगत्य आहे॥ ३२ आ
णि जे पाठविले, ते जाऊन, त्यांस जसें ह्याने सांगीतलें हो
तें। तसें सांपडलें॥ ३३ आणि ते शिंग्याला सोडीत असतां।
याचे धनी त्यांस बोलिले। तुह्मीं शिंग्याला कां सोडितां?
३४ मग ते बोलिले। प्रभूला याचें अगत्य आहे॥ ३५ आ
णि त्यांनी त्याला येशूच्या जवळ आणिलें। नंतर आपलीं व
स्त्रें शिंग्यावर घालून, येशूला वर्ती बसविलें॥ ३६ मग तो
जात असतां। त्यांनी आपलीं वस्त्रें वाटेंत पसरलीं॥ ३७ आणि
तो इतक्यांत जाइत्या डोंगराच्या उतरणीजवळ आला असतां।
शिष्यांचा सर्व भरणा आनंद करून, आपण जे सर्व चमत्कार पा
हिले, त्यांविषई मोठ्या शब्दाने देवाची स्तुती करूं लागून
३८ बोलिले। प्रभूच्या नांवाने जो राजा येतो, तो धन्यवादी
त। आकाशांत शांती। आणि परम उंचांमध्यें गौरव॥ ३९ ते

ह्यां समुदायामधून कित्येक फारिशी त्याला बोलिले। हे गुरू।
तूं आपल्यां शिष्यांस निषेध कर॥ ४० मग तो उत्तर देतां
त्यांस बोलिला। मी तुह्मांस सांगतों। कीं जर हे उगेच असती
ल। तर धोंडे ओरडतील॥ ४१ आणि जवळ आल्यावर।
त्याने नगराला पाहून। त्याविषयीं रडून ह्मटलें। ४२ कीं तुझीं
शांतीकारक जीं। तीं त्वां। ह्या तुझ्या दिवसींही खरें।
अवश्य जाणावींच होतीं। परंतु आतां तीं तुझ्यां डोळ्यांपासून
लपविलीं आहेत॥ ४३ कां तर। [असे] दिवस तुजवर ये
तील। कीं तुझे शत्रु तुझ्या भोंवता मोर्चा घालितांना।
तुला वेढितील। आणि तुला चहूंकडून कोंडतील। ४४ आ
णि तुला व तुझ्या मधील तुझीं लेंकरें। यांस भुईसरसें क
रतील। आणि तुझ्या मध्यें धोंड्यावर धोंडा राहूं देणार ना
हींत। याचें कारण। तुझी भेट घेण्याचा समय त्वां जाण
ला नाहीं ※

४५ आणि देवळांत जाऊन। त्यांत जे विकीत होते। आ
णि जे विकत घेत होते। त्यांस घालवूं लागून। ४६ त्यांस
बोलिला। माझें घर प्रार्थनेचें घर आहे। [असें] लिहिलें आ
हे। परंतु तुह्मीं त्याला लुटाऱ्यांची गुहा केली आहे ※ ४७ आ
णि तो देवळांत प्रती दिवशीं उपदेशीत होता। तेव्हां मुख्य
उपाध्ये व पंडित। आणि लोकांतील श्रेष्ठ जे। हे त्याचा घात
करायास ह्मटले॥ ४८ परंतु आपण काय करावें। हें त्या
स सांपडलें नाहीं। कारण कीं। सर्व लोक त्याचें ऐकत असतां
लागून राहिला ※

पर्व २० ॥ १ मग त्यांतील येका दिवशीं हें जालें। तो दे
वळांत लोकांस उपदेशीत। आणि सुवर्तमान सांगत असतां। मु
ख्य उपाध्ये व पंडित। हे पुरातनांसुद्धां [त्याच्या] जवळ आ
ले। २ आणि त्याला ह्मणाले। कीं तूं कोणत्या अधिकाराने
हीं करितोस? अथवा ज्याने तुला हा अधिकार दिल्हा। तो
कोण आहे? हें आह्मांस सांग॥ ३ तेव्हां तो उत्तर देतां त्यां

स बोलिला। मीही येक गोष्ट तुह्मांस विचारणार। आणि तु
ह्मीं मला सांगा। ४ योहान्नाचा बाप्तीस्मा आकाशापासून हो
ता। किंवा माणसांपासून? ५ तेव्हां तें आपणांसीं संवाद क
रितां बोलिले। कीं आकाशापासून जर आह्मीं ह्मणूं। तर तो
ह्मणेल। तुह्मीं तरीं त्यावर विश्वास कशास्तव न ठेविला? ६ आ
णि जर आह्मीं माणसांपासून ह्मणूं। तर सर्व जन आह्मांस
दगड मारील। कां तर। योहान्न भविष्यभाषी होता। असा
त्यांला भरवसा आहे॥ ७ आणि त्यांनी उत्तर दिल्हें। कीं
तो कोठून। हें ठाऊक नाहीं॥ ८ तेव्हां येशू त्यांस बोलिला।
मीही कोणत्या अधिकारानें हीं करितो। हें तुह्मांस सांगत ना
हीं ※ ९ मग तो लोकांस हा दाखला सांगता जाला। येका
माणसानें द्राक्षमळा लाविला। मग त्यानें तो शेतकऱ्यांस सोंपिला।
आणि बहुत काळ प्रवास केला॥ १० मग वेळेस शेतकऱ्यांनी
त्याला द्राक्षमळ्याचें कांहीं फळ द्यावें। ह्मणोन त्यानें त्यांकडे
चाकर पाठविला॥ तेव्हां शेतकऱ्यांनी त्याला झोडून रिकामें बाहेर
लाविलें॥ ११ मग त्यानें आणखी दुसऱ्या चाकराला पाठविलें।
आणि त्यालाही त्यांनी झोडतां व अपमान करितां। रिका
में बाहेर लाविलें॥ १२ मग त्यानें आणखी तिसऱ्याला पाठ
विलें। आणि त्यांनी त्यालाही घायाळ करून। बाहेर घात
लें॥ १३ नंतर द्राक्षमळ्याचा धनी बोलिला। मी काय क
रूं? माझ्या आवडत्या पुत्राला पाठवीन। निश्चयें। त्याला पा
हून भीड मानतील॥ १४ परंतु शेतकरी त्याला पाहून आ
पणांसीं विचार करून बोलिले। हा वतंदार आहे। या।
आपल्यांस वतन व्हावें। ह्मणोन याला जिवें मारूं॥ १५ नंतर
त्यांनी त्याला द्राक्षमळ्याच्या बाहेर काढून जिवें मारिलें॥ त
र द्राक्षमळ्याचा धनी त्यांस काय करील? १६ तो येईल व
त्यां शेतकऱ्यांचा नाश करील। आणि द्राक्षमळा दुसऱ्यांस देई
ल॥ तेव्हां ते ऐकून बोलिले। असें नसावें॥ १७ मग तो
त्यांकडे न्याहाळून बोलिला। तर जें लिहिलें। हें काय आ

हे? बांधणाऱ्यांनी जो धोंडा अव्हेरिला। तोच कोंपऱ्याचा शि
रोभाग असा जाला आहे॥ १८ प्रत्येक जो त्या धोंड्यावर
पडतो। तो चेंचला जाईल। परंतु ज्या कोणावर तो पडेल।
त्याचा भुगा करील॥ १९ तेव्हां मुख्य उपाध्यांनी व पंडि
तांनी जाणलें। कीं आपणांवर त्यानें हा दाखला सांगीतला।
यास्तव हे त्यावर त्याच घटकेस हात टाकायास झटले। परंतु ज
नांस भ्याले॥

२० तेव्हां टपत असतां। त्यांनी हेरे। जे आपण पुण्य
वान असण्याचें मीस घेणारे। त्यांस यासाठीं पाठविलें। कीं आ
पण त्याला सुभेदाराच्या सत्तेंत व अधिकारांत स्वाधीन कराया
साठीं। त्याच्या बोलण्याला धरावें॥ २१ तेव्हां त्यांनी त्याला
विचारिलें कीं हे गुरू। आह्मांस कळलें कीं तूं उजू बोल
तोस व उपदेशितोस। आणि दिसणें अंगिकारीत नाहींस। परंतु
देवाचा मार्ग खरेपणानें उपदेशितोस। २२ कादसाराला कर
भार देणें। हें आह्मांस योग्य आहे। किंवा नाहीं? २३ तेव्हां
तो त्यांचा कावा ध्यानांत आणून। त्यांस बोलिला। तुह्मीं म
ला कां करून पाहातां? २४ पावली मला दाखवा। इजवर
आकृती व लिहिणें कोणाचीं आहेत? मग ते उत्तर देतां बो
लिले। कादसाराचीं॥ २५ नंतर तो त्यांस बोलिला। तर कादसा
राचीं जीं तीं कादसाराला। आणि जीं देवाचीं। तीं देवाला भरून
द्या॥ २६ तेव्हां ते लोकांच्या पुढें त्याच्या बोलण्यास धरायाला
सामर्थ्यवान नव्हते॥ आणि त्याच्या उत्तरावरून आश्चर्य करितां।
उगेच राहिले॥ २७ मग सादूकी, जे आडवें ह्मणतात। कीं
पुनरुठणें नाहीं, यांतून कित्येक जवळ येऊन। त्याला पुसतां।
२८ बोलिले। हे गुरू। मोश्यानें आह्मांस लिहिलें, [कीं] कोणा
च्या भावाला बायको असतां जर मरण लागतें। आणि तो लेंकरावां
चून मरतो, तर त्याच्या भावानें त्याची बायको घ्यावी। आणि आप
ल्या भावासाठीं बीज उपजवावें॥ २९ तर सात भाऊ होते, आ
णि पहिला बायको करून लेंकराविरहीत मेला॥ ३० मग दु

यम्याने ती बायको केली। आणि तो लेंकराविरहीत मेला।
३१ मग तिसऱ्याने ती केली। आणि तसेंच त्यां सातांनींही।
परंतु लेंकरें न ठेवितांना मेले॥ ३२ नंतर सर्वांच्या मागून बायको
ही मेली॥ ३३ यास्तव। पुनरुठण्यांत ती त्यांतील कोणाची बायको
असती? ती सातांची बायको होती ह्मणोन॥ ३४ तेव्हां येशू उत्त
र देतां त्यांस बोलिला। ह्या जगाचीं संतानें वह्राडून घेतात, आणि
वह्राडून जातात॥ ३५ परंतु त्या जगाला व मेलेल्यांपासून पुन
र्उठण्याला मिळवायास, जे योग्य मोजिले जातील। ते वह्राडून
घेत नाहींत। आणि वह्राडून जातही नाहींत॥ ३६ कार
ण कीं, ते पुढें मरूंही शकत नाहींत। ते दूतांसमान आहे
त ह्मणोन। आणि पुनरुठण्याचे पुत्र असतां। ते देवाचीं लें
करें आहेत॥ ३७ आणि मेलेले उठतात, हें मोश्याने दे
खील झुडपावरून सुचविलें। अशाने कीं, तो प्रभूला आब्राहा
माचा देव। व इस्ह्माकाचा देव। व याकोबाचा देव ह्मणतो॥
३८ आणि तो मेलेल्यांचा देव नाहीं। परंतु जिवंतांचा। का
रण कीं। त्याविषईं सर्व जिवंत आहेत॥ ३९ तेव्हां पंडितांती
ल कित्येक उत्तर देतां बोलिले। हे गुरू। तूं बरें बोलिला
स॥ ४० आणि तेव्हांपासून ते त्याला कांहीं प्रश्न करायास
धजले नाहींत ॐ ४१ आणि तो त्यांस बोलिला, ख्रीस्त दावी
दाचें संतान आहे, असें कशावरून बोलतात? ४२। ४३ कां।
दावीद आपण गीतांच्या पुस्तकांत ह्मणतो। [कीं] प्रभू माझ्या
प्रभूला बोलिला। मी तुझ्यां शत्रूंस तुझ्या पायांचें आसन करी
न। तोंपर्यंत तूं माझ्या उजव्याकडे बैस॥ ४४ यास्तव दावी
द त्याला प्रभू ह्मणतो। तर तो त्याचें संतान कसा आहे? ॐ
४५ तेव्हां सर्व लोक ऐकत असतां, तो आपल्यां शिष्यांस बो
लिला, ४६ पंडितांविषईं सावध असा। ते झगे घालून चाला
यास इछितात। आणि अड्ड्यांमध्यें क्षेमगोष्टी। आणि सभां
मध्यें आदी आसनें, आणि जेवणावळींमध्यें आदी बैटकी त्यांस
आवडतात॥ ४७ ते विधवांचीं घरें खाऊन टाकितात।

आणि दाखविण्यासाठीं लांब प्रार्थना करितात। हे अधीक दं
ड पावतील ॐ

पर्व २१ ॥ १ मग त्याने वर्ते पाहून, धनवानांस त्यांचीं
दानें भांडारांत टाकितां। पाहिलें॥ २ आणि त्याने येक प्रका
र दुबळ्या विधवेसही दोन दंवड्या तेथे टाकितां पाहिलें।
३ मग ह्मटलें। मी तुह्मांस खरें सांगतें। कीं ह्या दरीद्री
विधवेने सर्वांहून अधीक टाकिलें आहे। ४ कारण कीं। त्या
सर्वांनी आपल्या अतिशयांतून देवाच्या दानांत टाकिलें आहे।
परंतु तिने आपल्या अवाळींतून। आपलें जें उपजीवन होतें।
तें अवघें टाकिलें आहे ॐ

५ आणि देउळ उत्तम धोंड्यानी व उत्सर्गानी शोभविलें।
असें त्याविषईं कित्येक ह्मणत असतां, तो बोलिला। ६ ज्यां
स तुह्मीं पाहातां हीं। न पाडलेला असा धोंड्यावर धोंडा
ज्यां दिवसांत राहुं दिल्हा जाणार नाहीं। ते येतील॥ ७ ते
व्हां ते त्याला पुसतां बोलिले, हे गुरू। तर हीं केव्हां हो
तील? आणि जेव्हां हीं होण्यास सिद्ध असतील। तेव्हां का
य खूण [होईल?] ८ मग तो बोलिला। तुह्मीं फसविले न
जावे, ह्मणोन न्याहाळा। कारण कीं, माझ्या नांवाने बहुत
येऊन बोलतील। कीं मी [तो] आहें॥ आणि तो काळ जवळ
आला आहे। यास्तव तुह्मीं त्यांच्या मागें जाउं नका॥ ९ आ
णि जेव्हां तुह्मीं लढायांविषईं। आणि दंग्यांविषईं ऐकाल।
तेव्हां घाबरूं नका। कारण कीं, पहिलें। हीं जालीं पाहि
जेत। परंतु तेव्हांच शेवट नाहीं॥ १० नंतर तो त्यांस बो
लिला। कीं प्रजेविरुद्ध प्रजा, आणि राज्याविरुद्ध राज्य उ
ठेल॥ ११ आणि जागोजागीं, मोठे भूमीकंप व दुका
ळ व मऱ्या होतील॥ आणखी आकाशांतून भयकारक व मोठे
साक्षात्कार होतील॥ १२ परंतु या सर्वांच्या आगोधर। माझ्या
नांवासाठीं ते आपले हात तुह्मांवर टाकितील। आणि तुह्मां
स राजे व अधिकारी यांच्या समोर नेल्यावर। सभां व बं

दिशाळां यांसाठीं स्वाधीन करीत पाठलाग करितील॥ १३ त
थापि हें तुमच्या साक्षीसाठीं प्राप्त होईल॥ १४ यास्तव तु
ह्मी आपल्या हृदयांत ठेवा। कीं उत्तर देण्यास पूर्वीं चिंतन न
करावें॥ १५ कारण कीं तोंड। आणि ज्या ज्ञानाला तुमचे स
र्व विरोधक उलटें ह्मणुं। अथवा अडवुं शकणार नाहींत।
तें मी तुह्मांस देईन॥ १६ तथापि आईबापें देखील व भाऊ व
नातलग व सखे। यांकडून तुह्मीं परस्वाधीन केले जाल। आ
णि ते तुह्मांमधल्यांस जिवें मारितील॥ १७ आणि तुह्मीं।
अवघ्यांकडून माझ्या नांवासाठीं। द्वेषिले जाल॥ १८ परंतु
तुमच्या मस्तकाचा केंस नाश पावणार नाहींच॥ १९ तुह्मीं
आपल्या सोसिकपणानें। आपल्या आत्म्यांवर सत्ता राखा॥
२० आणि यरूशलेम सैन्यातळाजी वेढलेलें, जेव्हां तुह्मीं पा
हाल, तेव्हां त्याचें वोसाड होणें जवळ आलें। असें जाणा॥
२१ नंतर यहूदांत जे। ते डोंगरांस पळोत। आणि त्याच्या
मध्यें जे। ते बाहेर जावोत। आणि जे बाहेरस्थानांमध्यें। ते
त्यांत न जावोत॥ २२ कां तर। सर्व जीं लिहिलीं। तीं पूर्ण
होण्यास हे न्यायसुड घेण्याचे दिवस आहेत॥ २३ आणि त्यां
दिवसीं। ज्या गर्भार। आणि तान्हाळ। त्यांस हायहाय।
कारण कीं। भूमीवर मोठें सांकडें होईल। व ह्या लोकावर
क्रोध॥ २४ आणि ते तरवारीच्या धारेनें पडतील। आ
णि पाडाव केले असून सर्व प्रजांमध्यें नेले जातील। आणि प
रप्रजांचे काळ भरतील तोंपर्यंत। यरूशलेम परप्रजांकडून
तुडविलें जाईल॥ २५ तेव्हां सूर्य व चंद्र व तारे। यांमध्यें
साक्षात्कार होतील। आणि भूमीवर पेंचानें प्रजांचा संकोच। ख
वळणासुद्धां समुद्र गर्जतां। २६ भयानें। आणि वस्तिवटीवर
जीं येणार त्यांच्या पाहाण्यानें। माणसें जीव जातां असीं [होती
ल।] कां तर। आकाशांचीं सामर्थ्यें हालविलीं जातील॥ २७ आ
णि तेव्हां माणसाच्या पुत्राला ढगामध्यें सामर्थ्यानें आणि मोठ्या
गौरवानें येतां पाहातील॥ २८ आणि हीं होऊं लागतां। व

ह्मीं उभे राहा, आणि आपलीं डोकीं वर करा। यास्तव कीं।
तुमचा खंड भरणें जवळ होत आहे॥ २९ आणि त्याने त्यांस
दाखला सांगीतला। अंजीर व सर्व झाडें यांस पाहा।
३० जेव्हां तीं नवीं पालवतात, तेव्हां तुह्मीं पाहून, उन्हाळा
दृतक्यांत जवळ आहे। असें आपले आपण जाणतां॥ ३१ त्या
प्रमाणेहो जेव्हां तुह्मीं तीं घडलेलीं पाहातां, तेव्हां देवाचें
राज्य जवळ आहे, असें जाणा॥ ३२ मी तुह्मांस खचीत
सांगतों, कीं अवघीं घडतील, तोंपर्यंत ही पिढी जा
णारच नाहीं॥ ३३ आकाश व पृथ्वी जातील। परंतु माझ्या
गोष्टी जाणारच नाहींत॥ ३४ आणि तुमचीं हृदयें गुंगी व
मद्यपान व संसारिक चिंतनें, यांकडून कधीं जड न व्हा
वीं। आणि तो दिवस अकस्मात तुह्मांवर न यावा, ह्मणोन
आपणांलीं सावध व्हा॥ ३५ कारण कीं, तो फांसासारिखा
संपूर्ण भुमीच्या पाठीवरल्यां सर्व राहाणाऱ्यांवर येईल॥
३६ यास्तव अवघीं जों होणार त्यांस चुकवायाला, आणि मा
णसाच्या पुत्रासमोर उभे राहायाला, तुह्मीं योग्य मोजिले जा
वे, ह्मणोन अवघ्या वेळांत प्रार्थना करीत असतां जागे राहा॥

३७ तेव्हां दिवसांस तो देवळांत उपदेशीत होता, आणि
रात्रीस बाहेर जाऊन, जाइत्याच्या ह्मटलेल्या डोंगरावर राहि
ला॥ ३८ आणि मोठ्या सकाळीं, त्याचें ऐकायास सर्व जन
त्याच्या जवळ देवळांत आले॥

पर्व २२॥ १ तेव्हां निर्फुगल्यां भाकरींचा सण, जो वल्हांड
ण ह्मटलेला, तो जवळ आला होता॥ २ आणि मुख्य उ
पाध्ये व पंडित, यानी असें शोधिलें, कीं त्याचा घात कसा
करावा, कारण, ते जनास भ्याले॥ ३ नंतर यहूदा, जो बा
रांच्या गणतींतील असतां, आडनांवाने ईस्कारयोते ह्मटला,
त्यांत साटान शिरला॥ ४ मग तो बाहेर गेला असतां, मुख्य
उपाध्ये व सरदार यांच्या स्वाधीन त्याला कसें करावें, यावि
षईं त्यांसीं बोलिला॥ ५ मग ते संतोषीत जाले, आणि त्या

नी त्याला रुपें देउं ठरविलें॥ ६ तेव्हां त्यानें पत्करिलें,
आणि समुदायाविरहीत त्याला त्यांच्या स्वाधीन करण्याची
संधी शोधिली ※

७ तेव्हां निर्फुगल्यां भाकरींचा दिवस आला। त्यांत वल्हां
डणवळ मारली पाहिजे होती॥ ८ आणि पेत्रस व योहान्न
यांस तो पाठवीत असतां बोलिला, आह्मीं जेवावें ह्मणोन तु
ह्मीं जाऊन आह्मांसाठीं वल्हांडणाचें सिद्ध करा ॥ ९ तेव्हां
ते त्याला बोलिले। आह्मीं कोठे सिद्ध करावें ह्मणोन इ
च्छितोस? १० मग तो त्यांस बोलिला। पाहा। तुह्मीं नगरांत
जात असतां, माणुस पाण्याचें मडकें वाहातां, तुह्मांस भेटे
ल। ज्या घरांत तो जातो, त्यांत त्याच्या मागें तुह्मीं जा॥
११ आणि त्या घराच्या धन्याला बोला। गुरू तुला ह्मणतो म्या
आपल्यां शिष्यांसुद्धां वल्हांडणाचें जेवावें। ह्मणोन उतारखोली
कोठे आहे? १२ मग तो तुह्मांस मोठी सिद्ध केलेली माडी
दाखवील। तेथे सिद्ध करा॥ १३ तेव्हां ते जाऊन, त्यांस ह्या
नें सांगीतल्याप्रमाणे सांपडलें। आणि त्यांनी वल्हांडणाचें सि
द्ध केलें॥ १४ नंतर, घटका लागल्यावर तो आणि त्यासुद्धां
ते बारा प्रेषीत जेवायास बसले॥ १५ तेव्हां तो त्यांस बो
लिला; माझ्या सोसण्यापूर्वीं ह्या वल्हांडणाचें तुह्मांबरोबर जे
वायास। म्या आसावण्यानें इच्छिलें आहें। १६ कारण, मी
तुह्मांस सांगतों। कीं देवाच्या राज्यांत हा पूर्ण केला होई
ल। तोंपर्यंत याचें मी आणखी जेवणारच नाहीं॥ १७ मग
तो। पेला घेऊन। आभार मानून बोलिला, तुह्मीं हा घ्या,
आणि आपणांमध्यें वांटा॥ १८ कारण, मी तुह्मांस सांग
तों कीं देवाचें राज्य येईल तोंपर्यंत। द्राक्षवेलाचा उपज
मी पिणारच नाहीं ※ १९ आणि त्यानें, भाकर घेऊन आ
भार मानल्यावर मोडिली। आणि त्यांस देऊन ह्मटलें, मा
झें शरीर जें तुह्मांसाठीं दिल्हें। तें हेंच आहे॥ माझ्या
आठवणीसाठीं तुह्मीं हें करा॥ २० त्याप्रमाणे जेवल्यानं

तर तो पेलाही [घेऊन] बोलिला, माझें रक्त, जें तुमच्या
साठीं शांडलें, यांकडून नवा ठराव असा हा पेला [आहे] ॐ
२१ आणखी पाहा। जो मला परस्वाधीन करितो। त्याचा हात
माझ्या बरोबर अडणीवर [आहे ॥] २२ तर माणसाचा पुत्र ने
मलेल्याप्रमाणे जातो। खरें। परंतु ज्याकडून तो परस्वाधीन
केला जातो, त्या माणसाला हायहाय॥ २३ तेव्हां ते आ
पणांमध्यें विचार करूं लागले कीं, तर आपल्यांमधून जो हें
करणार आहे, तो कोण असेल? ॐ

२४ आणखी, आपल्यांतील कोण श्रेष्ठ होउं दिसतो,
असी त्यांमध्यें कटकट जाली॥ २५ तेव्हां तो त्यांस बोलिला,
परप्रजांचे राजे त्यांवर धनिपणा करितात। आणि जे त्यां
वर अधिकार करितात, ते सुकर्मी ह्मटले आहेत॥ २६ प
रंतु तुह्मीं त्याप्रमाणे [होउं] नका। वेगळें, तुह्मांमध्यें जो
श्रेष्ठ, तो धाकट्यासारिखा। आणि जो चालविणारा, तो सेव
कासारिखा होवो॥ २७ कां तर। कोण श्रेष्ठ? जेवायास ब
सणारा, किंवा सेवा करणारा? जेवायास बसणारा कीं नाहीं? प
रंतु मी तुह्मांमध्यें सेवा करणाऱ्यासारिखा आहें॥ २८ आणि
जे माझें सत्व पाहाण्यांत माझ्या संगतीं राहिले, ते तुह्मीं आहां॥
२९ आणि जसें माझ्या बापाने मला राज्य नेमून दिल्हें। त
सें मी तुह्मांस नेमून देतों। ३० कीं तुह्मीं माझ्या राज्याम
ध्यें माझ्या अडणीवरून खावें व प्यावें। आणि इस्राएलाच्या
बारा वंशांचा न्याय ठरवितां। सिंहासनांवर बसाल ॐ

३१ आणि प्रभू बोलिला। शिमोना। शिमोना पाहा। साटानानें
तुह्मांस गव्हासारिखें चाळावें ह्मणोन फार मागीतलें आहे॥
३२ परंतु तुझा विश्वास न खुंटावा। ह्मणोन तुझ्या साठीं म्या
प्रार्थना केली आहे॥ आणि जेव्हां तूं फिरला होसील। तेव्हां
तुझ्या भावांस स्थिराव॥ ३३ मग हा त्याला बोलिला, हे प्र
भू। मी तुझ्या संगतीं बंदिशाळेंत आणि मरणांत जाण्यास सि
द्ध आहें॥ ३४ तेव्हां तो बोलिला। पेचरा; मी तुला सांग

तों, मला न वोळखलें [ह्मणण्याने] तूं तीनदां नकारून टाकि
सील। यापूर्वी आज कोंबडा आरवणारच नाहीं ※ ३५ ते
व्हां तो त्यांस बोलिला। जेव्हां म्या तुह्मांस कसणी व झोळणा
व जोडे यांवांचून पाठविलें। तेव्हां तुह्मांस कांहीं उणें पडलें
कीं काय? मग ते त्याला बोलिले। कांहीं नाहीं॥ ३६ या
वरून तो त्यांस बोलिला। परंतु आतां ज्याला कसणी आ
हे। तो ती घेवो। त्याप्रमाणे झोळणाही॥ आणि ज्याला
तरवार नाहीं। तो आपलें वस्त्र विकून घेवो॥ ३७ मी तुह्मां
स कारण सांगतों। कीं जें असें लिहिलें। तो नेमभंग्या
संगतीं मोजला गेला। हें यापुढें माझ्यांत पूर्ण केलें पाहिजे।
कां तर मजविषईं जीं यांचाही शेवट आहे॥ ३८ तेव्हां ते
बोलिले। हे प्रभू। पाहा। येथे दोन तरवारी [आहेत॥] म
ग तो त्यांस बोलिला, तें पुरे आहे ※

३९ तेव्हां तो बाहेर जाऊन रीतीप्रमाणे, जाइतांच्या
डोंगरास गेला॥ आणि त्याचे शिष्यही, त्याच्या मागे गेले॥
४० मग त्या ठिकाणीं असतां। त्याने त्यांस ह्मटलें, तुह्मीं
सत्व पाहाण्यांत न येण्याकरितां प्रार्थना करा॥ ४१ मग तो
सुमारें धोंडा झोंकण्याइतका दूर त्यांपासून गेला। आ
णि गुडघे टेंकून त्याने प्रार्थना करितां ४२ ह्मटलें। हे बा
पा, जर तुझी इच्छा आहे। तर हा पेला मजपासून घ्यां
वा। तथापि माझी इच्छा नव्हे, परंतु तुझी होवो॥ ४३ तेव्हां
आकाशांतून दूत त्याला सबळ करितां। दिसला॥ ४४ तेव्हां प्र
यासांत होऊन, त्याने अधीक आग्रहाने प्रार्थना केली॥ आणि
त्याचा घाम। रक्ताचीं जळमटें भूमीवर पडतां। ह्मांसारिखा
जाला॥ ४५ मग तो प्रार्थनेंतून उठून, आपल्यां शिष्यांज
वळ येऊन। त्यांस दुःखास्तव निज घेतां पावला। ४६ आणि
तो त्यांस बोलिला, तुह्मीं झोंप कां घेतां? सत्व पाहाण्यांत न
यावें, ह्मणोन उठून प्रार्थना करा ※

४७ आणि तो येथवर बोलत असतां। पाहां समुदाय।

आणि त्या बारांमधील येक यहूदा ह्मटलेला। तो त्यांच्या पु
ढें चालला। आणि येशूचें चुंबन घ्यायास त्याजवळ आला॥
४८ तेव्हां येशू त्याला बोलिला। हे यहूदा। तूं चुंबनाने मा
णसाच्या पुत्राला परस्वाधीन करितोस कीं काय? ४९ आणि
त्याकडले जे। ते काय होणार हें जाणून। त्याला बोलिले।
हे प्रभू। आह्मीं तरवारीने मारूं कीं काय? ५० तेव्हां त्यां
मधील कोणियेकाने। मुख्य उपाध्याच्या चाकराला मारितां।
त्याचा उजवा कान कापून टाकिला॥ ५१ तेव्हां येशूने उत्तर
देतां ह्मटलें। येवढेंच असुं द्या॥ आणि त्याच्या कानाला शिवू
न त्याला बरें केलें॥ ५२ तेव्हां येशू। आपणावर जे मुख्य
उपाध्ये आणि देवळाचे सरदार आणि पुरातन आले। त्यां
स बोलिला। तुह्मीं जसें लुटाऱ्यावर तसें। तरवारी व सोटे घे
ऊन बाहेर आलां कीं काय? ५३ मी प्रतिदिवशीं तुमच्या
संगतीं देवळांत असतां। तुह्मीं मजवर हात लांबविले नव्हते।
परंतु ही तुमची घटका। आणि अंधाराचा शक आहे॥

५४ मग त्यांनी त्याला धरून नेलें। आणि त्याला मुख्य
उपाध्याच्या घरीं आणिलें॥ आणि पेत्रस दुरून मागें गेला॥
५५ तेव्हां वाड्याच्या मध्यें विस्तव पेटवून। ते येकवट बसले
असतां, पेत्रसही त्यांच्या मध्यें बसला॥ ५६ आणि कोणी दा
सी त्याला विस्तवाजवळ बसलेला पाहातांना। त्याला न्याहाळून
बोलिली, हाही त्याच्या बरोबर होता॥ ५७ तेव्हां त्याच्या
विषईं हा नकारीत बोलिला। हे स्त्री, तो मला माहीत ना
हीं॥ ५८ मग थोड्या अवकाशाने दुसरा त्याला पाहून बोलि
ला। तूंही त्यांमधील आहेस॥ परंतु पेत्रस बोलिला। माणसा।
मी नाहीं॥ ५९ आणि सुमारें येक होरा दूच्या अंतराने।
दुसरा कोणी आग्रह धरून बोलिला। खरेपणाने हाही त्यां
च्या बरोबर होता। कां तर। गालीलीही आहे॥ ६० ते
व्हां पेत्रस बोलिला। माणसा। तूं जें बोलतोस। तें मला कळ
लें नाहीं॥ आणि तो तेथपर्यंत बोलत असतां। तेव्हांच कोंब

डा आरवला ॥ ६१ मग प्रभूने मुरडून पेत्रसावर दृष्टी ला
विली। तेव्हां पेत्रसाने प्रभूची गोष्ट आठविली, जसी त्याला
ह्मटली तसी; कीं कोंबडा आरवल्या आगोधर। तूं मला
तीनदां नकारून टाकसील ॥ ६२ आणि पेत्रस बाहेर जाऊन।
कडू रडला ※

६३ तेव्हां, जीं माणसें येशूला राखीत होतीं, त्यांनी त्या
ची थट्टा करून। फटके मारिले, ६४ आणि त्याला घूंगु
टं बांधून, त्याच्या तोंडावर मारिलें, मग ते त्याला पुसतां
बोलिले। ज्याने तुला मारिलें। तो कोण आहे? हें भविष्य
सांग॥ ६५ आणि निंदितां त्याच्या विरुद्ध दुसरीं बहुत
ह्मटलीं ※

६६ आणि दिवस लागला असतां, लोकाचा पुरातनवर्ग।
मुख्य उपाध्येही आणि पंडित मिळाले। मग ते त्याला आप
ल्या न्यायसभेंत नेऊन बोलिले। तूं ख्रीस्त आहेस कीं काय?
आह्मांस सांग॥ ६७ नंतर तो त्यांस बोलिला, जर मी तु
ह्मांस सांगतों। तर तुह्मीं विश्वास धरणारच नव्हां॥ ६८ आ
णि जर मी तुह्मांस विचारितोंही, तर तुह्मीं मला उत्तर
देणार किंवा सोडणारच नव्हां॥ ६९ आतांपासून माणसाचा
पुत्र देवाच्या पराक्रमाच्या उजव्याकडे बसलेला होईल॥ ७० ते
व्हां ते सर्व बोलिले, तर तूं देवाचा पुत्र आहेस काय? मग
तो त्यांस बोलिला, तुह्मीं ह्मणतां। तसा मी आहें॥
७१ नंतर ते बोलिले। आह्मांस साक्षीचें आणखी काय अ
गत्य? कां तर, आह्मीं स्वतां त्याच्या तोंडापासून ऐकिलें ※

पर्व २३॥ १ मग त्यांच्या सर्व भरण्याने उठून त्याला पि
लातसाकडे नेलें। २ नंतर त्यावर दोष ठेवुं लागून ह्मटलें, हा
राष्ट्राला विपरीत चालवितां। आणि आपण ख्रीस्त। राजा
आहें, असें ह्मणून। कादसाराला करभार देणें मना क
रितां। आह्मांस सांपडला आहे॥ ३ तेव्हां पिलातस त्या
ला पुसतां बोलिला। तूं यहूद्यांचा राजा आहेस कीं काय?

मग तो त्याला उत्तर देतां बोलिला। तूं ह्मणतोस [तोच ॥]
४ नंतर पिलातसानें मुख्य उपाध्यांस व समुदायांस ह्मटलें।
मला ह्या माणसाकडे कांहीं अपराध सांपडत नाहीं ॥ ५ म
ग ते बळरूप धरून बोलिले, कीं तो गालीलापासून आरंभ
करून। येथपर्यंत संपूर्ण यहूदावरून शिकवितां। जनाला चिथा
वून उठवितो ॥ ६ तेव्हां पिलातसानें गालीलाविषईं ऐकून विचा
रिलें, हा माणुस गालीली आहे कीं काय? ७ आणि तो हेरो
दाच्या अधिकारांतील आहे, हें जाणल्यावर। हेरोद स्वतां
ही त्यां दिवसांत यरूशलेमांमध्यें असतां। त्याकडे ह्याला फि
रवून पाठविलें ※ ८ मग हेरोद येशूला पाहून फार संतोष पा
वला, कारण कीं त्याविषईंचीं बहुत ऐकल्यावरून, त्याला पा
हायास फार [वेळ] इछीत होता। आणि त्याकडून कांहीं च
मत्कार घडतां पाहायास आशा धरिली ॥ ९ तेव्हां त्याला ब
हुत गोष्टींविषईं विचारिलें। परंतु ह्यानें त्याला कांहीं उत्तर
दिल्हें नाहीं ॥ १० तेव्हां मुख्य उपाध्ये व पंडित। यांनीं उभे
राहून ताव्यानें त्याजवर दोष ठेविले ॥ ११ आणि हेरोदानें
आपल्यां सैनिकांसुद्धां त्याचा धिःकार केल्यावर। व थट्टा के
ल्यावर। त्याला तेजस्वी वस्त्रें लेववून। फिरोन त्याला पिलात
साजवळ पाठविलें ※ १२ आणखी त्याच दिवसीं पिलातस आ
णि हेरोद। हे परस्परें मित्र जाले। कां तर। आगोधर ते
येकमेकांशीं वैरयुक्त असत होते ※ १३ मग पिलातसानें मु
ख्य उपाध्यांस व अधिकाऱ्यांस व जनाला येकत्र बोलावून।
१४ त्यांस सांगीतलें। तुह्मीं ह्या माणसाला। जनास विप
रीत चालविणाऱ्यासारिखा। माझ्या जवळ आणिलें। आणि
पाहा, म्यां तुह्मांसमोर त्याचा निवाडा केल्यावर। ज्यांविष
ईं तुह्मीं त्यावर दोष ठेवितां। त्यांविषईं या माणसाकडे कां
हीं अपराध मला सांपडला नाहीं ॥ १५ आणखी हेरोदा
लाही नाहीं। कां तर। त्याकडे म्यां तुह्मांस पाठविलें। आ
णि पाहा। त्याला मरणाचें योग्य कांहीं केलेलें नाहीं ॥ १६ या

ह्मणून त्याला शिक्षा देऊन सोडीन॥ १७ आणि प्रती सणीं
त्यांसाठीं येकाला सोडणें। हें त्याला अगत्य होतें॥ १८ ते
व्हां अवघा भरण्यांत ते ओरडत बोलिले। याला घालीव।
आणि आह्मांसाठीं बाराब्बाला सोड॥ १९ जो हा। नगरांत
झालेला कांहीं दंगा आणि हत्या। ह्यांसाठीं बंदिशाळेंत घातला
होता॥ २० यास्तव पिलातस। येशूला सोडायास इच्छीत अस
तां। फिरोन त्यांस मोठ्याने बोलिला॥ २१ परंतु ते त्यावर ओ
रडत बोलिले, त्याला मरणखांबीं दे। मरणखांबीं दे॥ २२
मग तो तिसऱ्याने त्यांस बोलिला। कशाला? त्याने काय वा
ईट केलें? त्याकडे मरणाचा कांहीं अपराध मला सांपडला
नाहीं। यास्तव त्याला शिक्षा देऊन सोडीन॥ २३ परंतु ते
मोठ्या स्वराने आग्रह करून। तो मरणखांबीं दिल्हा जावा।
ह्मणोन मागत होते॥ आणि त्यांचे व मुख्य उपाध्यांचे श
ब्द जय पावले॥ २४ तेव्हां त्यांचें मागणें पूर्ण व्हावें। ह्म
णोन पिलातसाने ठरविलें॥ २५ आणि दंगा व हत्या। यां
साठीं बंदिशाळेंत घातलेला। जो त्यानी मागीतला होता। त्या
सा त्याने त्यांच्या साठीं सोडिलें। परंतु येशूला त्यांच्या इच्छे
प्रमाणे स्वाधीन केलें ※

२६ आणि ते त्याला नेत होते। तेव्हां कोणी शिमोन
कुरेन्याचा। बाहेरस्थानापासून येत असतां। त्याने मर
णखांब येशूमागें वाहावा ह्मणोन त्याला त्यानी धरून त्या
जवर ठेविला ※ २७ आणि जनाचा व स्त्रियांचा मोठा भर
णा त्याच्या मागें चालिला॥ ज्या त्याविषईं बडवून घेतांना।
शोक करीत होत्या॥ २८ तेव्हां येशू त्यांकडे मुरडून बोलि
ला। अहो यरूशलेमांतील कन्यां मजविषईं रडुं नका। परंतु
तुह्मीं आपणांविषईं। आणि आपल्यां लेंकरांविषईं रडा।
२९ कां तर पाहा। [असे] दिवस येतात। [कीं] त्यांत
बोलतील। ज्या वांझा। जीं पोटेंही प्रसवलीं नाहींत। आणि
ज्या स्तनानी पाजिलें नाहीं। तीं धन्य [आहेत॥] ३० तेव्हां

ते डोंगरांस बोलुं लागतील। आम्हांवर पडा। टेंकड्यांस
ही। आम्हांस झांका॥ ३१ कां तर, ओल्या झाडाला ज
र हीं करितात। तर वाळल्याला काय होईल? ३२ आणि
त्याच्या संगतीं। दुसरेही दोन दुष्कर्मी ठार मारण्यास
नेले होते॥

३३ मग जेव्हां ते। कंवटी ह्मटलेल्या जागा। तेथवर आ
ले। तेव्हां त्यानी तेथे त्याला व त्यां दुष्कर्म्यांस, येकाला तर
उजव्याकडे। आणि दुसऱ्याला डाव्याकडे मरणखांबीं दिल्हें॥
३४ तेव्हां येशू बोलिला॥ हे बापा। ते काय करितात।
हें त्यांस कळत नाहीं। यास्तव त्यांस सूट दे॥ नंतर त्या
नी त्याचीं वस्त्रें वांटितां पण घातले॥ ३५ आणि जन पा
हात उभे राहिले। आणि त्यांसुद्धां अधिकारीही नाकारितां
बोलिले। त्याने दुसऱ्यांस तारिलें। जर तो ख्रीस्त। देवाचा
निवडलेला आहे। तर तो आपणाला तारो॥ ३६ आणि
सैनिकानीही त्याची थट्टा केली। जवळ येऊन त्याला आंब सादर
केली। ३७ आणि ह्मटलें। जर तूं यहूद्यांचा राजा आहेस।
तर आपणाला तार॥ ३८ आणि हेल्लेनी व रोमी व इब्री ह्यां
अक्षरानी लिहिलेला पत्ता त्याच्या वर्ता होता। [कीं] हा यहू
द्यांचा राजा आहे॥ ३९ आणि जे दुष्कर्मी टांगले, यां
तील येक त्याची निंदा करीत बोलिला। जर तूं ख्रीस्त आ
हेस। तर आपणाला आणि आह्मांस तार॥ ४० परंतु दु
सरा उत्तर देतां। त्याला निषेधीत बोलिला, तूं ह्याच दं
डांत आहेस। तर देवाला भीतच नाहींस काय? ४१ आ
णि आह्मीं न्यायाने खरें। कारण कीं। आह्मीं जीं केलीं। यां
चीं योग्य तीं पावतों। परंतु ह्याने कांहीं असंगत केलें ना
हीं॥ ४२ मग तो येशूस बोलिला। हे प्रभू। तूं आपल्या
राज्यांत येसील, तेव्हां माझी आठवण कर॥ ४३ नंतर ये
शू त्याला बोलिला, मी तुला खचीत सांगतों। तूं आज मा
झ्या संगतीं स्वर्गांत होसील॥ ४४ तेव्हां सुमारें दुपार हो

ती। आणि तिसऱ्या प्रहरापावेतों। संपूर्ण भूमीवर काळोख
जाला। ४५ ह्मणजे सूर्य काळोखला। आणि देवळाचा
पडदा मध्यें फाटला ॐ ४६ आणि येशू मोठ्या स्वराने हाक
मारितां बोलिला। हे बापा। तुझ्यां हातांत माझा आत्मा सो
पितों॥ मग हीं बोलून त्याने प्राण सोडिला॥ ४७ तेव्हां श
तपती। जें जालें। तें पाहून देवाला गौरवितां बोलिला। ख
चीत। हा माणुस पुण्यवान होता॥ ४८ आणि सर्व समुदाय।
जे त्या पाहाण्यावर येकवट जाले ते। जीं घडलीं। तीं पा
हून आपल्या उरांवर मारून माघारें गेले॥ ४९ आणि जे
त्याचे सर्व ओळखी ते। आणि ज्या स्त्रीया त्याच्या मागें गा
लीलापासून आल्या। त्या हीं पाहातां। दूर उभ्या राहिल्या ॐ

५० आणि पाहा। यहूद्यांचें नगर हारिमाथाई। यांतून
माणुस नांवें योसेफ। सभासद उत्तम व पुण्यवान माणुस हो
ता। ५१ हा त्यांच्या विचाराला व कामाला संमत देत नव्ह
ता। आणि हा आपणही देवाच्या राज्याची वाट पाहात होता॥
५२ ह्याने पिलातसाच्या जवळ येऊन येशूचें शरीर मागीतलें।
५३ मग तें खालीं काढून। खेंडाने तें गुंडाळलें। आणि ख
डकांत खोदलेलें थडें। ज्यांत कधीं कोणी घातलें नव्हतें।
त्यांत तें ठेविलें॥ ५४ तेव्हां सिद्ध करण्याचा दिवस होता।
आणि शाब्बाथ लागणार होता ॐ

५५ आणि बायकाही। ज्या गालीलापासून त्याच्या संग
तीं आल्या होत्या। त्यानी आणखी मागें जाऊन। थडगें आ
णि त्याचें शरीर कसें ठेविलें हें पाहिलें॥ ५६ मग माघारें
जाऊन। सुगंधद्रव्यें व उट्या। हीं सिद्ध केलीं। तथापि शाब्बाथीं
त आज्ञेप्रमाणे निवांत राहिल्या खरें ॐ

पर्व २४॥ १ नंतर साप्ताच्या प्रथमांत मोठ्या पाहांटेस,
त्या आणि कित्येक त्यांसुद्धां। जीं सुगंधद्रव्यें त्यानी सिद्ध के
लीं। तीं घेऊन थड्याजवळ आल्या॥ २ मग धोंड थडग्याव
रून लोटलेली त्यांस सांपडली॥ ३ आणि आंत जाऊ

न। प्रभू येशूचें शरीर त्यांस सांपडलें नाहीं॥ ४ तेव्हां ह्या
विषईं त्या भ्रांत असतां। असें जालें, कीं पाहा। दोन म
नुष्य चमकीत वस्त्रें नेसलेले असतां, त्यांच्या जवळ उभे रा
हिले॥ ५ नंतर त्या फार भयाभीत असतां। आणि तोंड भू
मीकडे वांकवीत असतां। त्यांस ते बोलिले। मेलेल्यांमध्यें जि
वंताचा शोध कां करितां? ६ तो येथे नाहीं, परंतु उठला
आहे॥ तो जोंपर्यंत गालीलांत होता, तेव्हां तुह्मांस कसें सां
गतां बोलिला, तें तुह्मीं आठवा, ७ कीं माणसाच्या पुत्रा
ला पापी माणसांच्यां हातांत स्वाधीन केलें जाणें। आणि म
रणखांबीं दिल्हें जाणें, आणि तिसऱ्या दिवशीं फिरोन उ
ठणें अगत्य आहे॥ ८ तेव्हां त्यांनी त्याचीं सांगणीं आठ
विलीं। ९ आणि थडग्यापासून, त्या माघारें येऊन, ते
अकरा यांस व सर्व वरकडांस हीं अवघीं वर्तमानें सांगी
तलीं॥ १० आणि ज्यांनी प्रेषितांस हीं सांगीतलीं, त्या मा
रया माग्दालीण। व योहान्ना। व याकोबाची [आई] मा
रया। आणि ह्यांसुद्धां दुसऱ्या, ह्या होत्या॥ ११ परंतु
ह्यांच्या गोष्टी त्यांच्या दृष्टीस गप्प असी दिसली। आणि ते त्यां
वर विश्वासले नव्हते॥ १२ तथापि पेत्रस उठून थडग्या
जवळ धांवला। आणि ओणवा होऊन। त्याने प्रेतवस्त्रें येक
लीं ठेविलेलीं पाहिलीं। आणि जें जालें, याविषईं तो आपल्या
सीं आश्चर्य करीत माघारें चालिला ※

१३ आणि पाहा, त्याच दिवशीं, त्यांमधील दोघे [येका]
गांवास जात होते। [तें] यरूशलेमाहून साठ स्तायन लांब
आहे। त्याचें नांव एम्माऊस॥ १४ आणि ते, ह्या अवघ्या
वृत्तांताविषईं, परस्परें संभाषण करीत होते॥ १५ तेव्हां ते सं
भाषण करीत व विचारीत असतांना। असें जालें, कीं येशू
आपण जवळ येऊन, त्यांच्या संगतीं चालला॥ १६ परंतु त्यांनी
त्याला न ओळखावें। ह्मणोन त्यांचे डोळे धरिले होते॥
१७ तेव्हां तो त्यांस बोलिला। तुह्मीं चालतां व म्लानमुखी

असतां, ह्या गोष्टी ज्या तुह्मीं येकमेकांसीं परस्परें काढि
तां। त्या काय? १८ मग येक ज्याचें नांव क्लेयपास, तो उ
त्तर देतां त्याला बोलिला, [काय,] तूं यरूशलेमांत ये
कला प्रवास करितोस। आणि ह्यां दिवसीं जीं त्यांत घडलीं।
तीं न जाणतोस? १९ आणि तो त्यांस बोलिला, कोणतीं?
तेव्हां ते त्याला बोलिले। नाजोरीच्या येशूविषईचीं तीं। कीं
तो माणुस भविष्यभाषी, देवाच्या व अवघ्या जनाच्या देखतां।
करण्यांत व बोलण्यांत सामर्थ्यवान होता। २० आणि असें।
कीं आमच्या मख्य उपाध्यानीं व अधिकाऱ्यानीं त्याला मरणाच्या
दंडासाठीं परस्वाधीन केलें। आणि त्याला मरणखांबीं दिल्हें॥
२१ परंतु आह्मीं आशा धरीत होतों। कीं जो इस्राएलाची
खंडणी भरणार, तो हाच आहे॥ आणखी ह्या अवघ्यांसंग
तीं। हीं घडलीं यापासून आज तिसरा दिवस चालत आहे खरें॥
२२ आणखीही आमच्यांतील कित्येक बायकानीं आह्मांस वि
स्मीत केलें। ह्या मोठ्या सकाळीं थडग्याजवळ असतां,
२३ आणि त्याचें शरीर न पावतां। येऊन बोलिल्या। ज्या
दूतानीं ह्मटलें। कीं तो जिवंत आहे। त्यांचा देखावाही आप
ण पाहिला आहे॥ २४ आणि आमच्या बरोबरच्यांतून कि
त्येक निघून थडग्याकडे गेले। मग जसें स्त्रियानीं सांगीतलें।
तसेंच त्यांसही सांपडलें। परंतु त्यानीं त्याला पाहिलें नाहीं॥
२५ मग तो आपण त्यांस बोलिला। अहो अबुद्धिमान।
आणि भविष्यभाष्यानीं अवघीं जीं सांगीतलीं, त्यांवर विश्वा
स धरण्यास हृदयमंदा हो। २६ ख्रीस्ताला हीं सोसणें, आणि आ
पल्या गौरवांत जाणें, हें पाहिजे नव्हतें कीं काय? २७ मग
त्याने मोश्याच्या व सर्व भविष्यभाष्यांच्या पासून आरंभ करून।
आपणाविषईं जीं तीं। अवघ्यां लेखांकडून। त्यांस समजविलीं॥
२८ नंतर ज्या गांवास ते जात होते। त्याजवळ आले। ते
व्हां तो पुढें जावयासारिखा करीत होता॥ २९ परंतु ते
त्याजवळ बळ धरून बोलिले, आमच्या संगतीं राहा। कारण

कीं। सांज समय आहे, असा दिवस उतरला॥ ३० नंतर
तो त्यांच्या बरोबर राहावयास। आंत गेला॥ मग तो त्यां
सहीत जेवायास बसतांना। असें जालें। त्याने भाकर घेऊन स्तु
ती केली। आणि मोडून त्यांस दिल्ही॥ ३१ तेव्हां त्यांचे डोळे उ
घडले गेले। आणि त्यांनी त्याला ओळखिलें। मग तो त्यां
स अदृश्य जाला॥ ३२ नंतर ते येकमेकांसीं बोलिले, जेव्हां
तो वाटेंत आह्मांसीं बोलत होता, आणि आह्मांसाठीं ले
ख उघडे करीत होता। तेव्हां आह्मांमध्यें आमचें हृदय प्र
ज्वलीत नव्हतें कीं काय? ३३ मग त्याच घटकेस, ते उठून,
यरूशलेमास माघारें गेले। आणि त्यांस ते अकरा व त्यांच्या
संगतींचे जे, ते येकवटलेले सांपडले। ३४ [आणि] सांगत हो
ते। कीं प्रभू उठला आहे। खरें। आणि शिमोनाला दिसला
आहे॥ ३५ आणि त्यांनी वाटेंतलीं जीं। तीं। आणि तो भाकर
मोडण्याने त्यांस कसा कळला गेला। हें साद्यंत सांगीतलें ※

३६ आणि ते हीं सांगत असतां, येशू स्वतां त्यांच्या म
ध्यें उभा राहिला। आणि त्यांस ह्मणतो। तुमचें कल्याण [अ
सो॥] ३७ परंतु ते घाबरले। आणि भयाभीत होऊन। आत्मा
पाहिला। असें त्यांस भासलें॥ ३८ मग तो त्यांस बोलिला।
तुह्मीं कां थरारले आहां। आणि तुमच्यां हृदयांत विचार
कशामुळें उठतात? ३९ माझे हात। आणि माझे पाय यांस
पाहा। कां कीं। मी स्वतां आहें॥ मला चांचपा, आणि पा
हा। कां कीं। जसीं मला आहेत ह्मणोन तुह्मीं पाहातां। त
सीं आत्म्याला मास व हाडें नाहींत॥ ४० आणि हें बोलतां।
त्याने त्यांस हात आणि पाय दाखविले॥ ४१ तेव्हां ते तेथ
पर्यंत आनंदामुळें विश्वासत नसतां, आणि आश्चर्य करितां।
तो त्यांस बोलिला। तुह्मांजवळ येथे कांहीं भक्ष्य आहे कीं का
य? ४२ मग त्यांनी त्याला भाजलेल्या मासाचा। आणि मधी
च्या मोहोळांतला तुकडा दिल्हा॥ ४३ मग त्याने घेऊन त्यां
च्या देखतां खालें ※

४४ आणि तो त्यांस बोलिला, जोंपर्यंत मी तुमच्या संग
तीं होतों। तेव्हां ज्या गोष्टी तुह्मांस बोलिलों त्या ह्याच। कीं
कीं, मोशाच्या नेमशास्त्रांत, आणि भविष्यभाष्यांच्यांत। आणि
गीतांमध्यें। मजविषईं जीं अवघीं लिहिलीं। तीं पूर्ण जालीं पा
हिजेत॥ ४५ तेव्हां त्यानी लेख समजावे, ह्मणोन ह्याने त्यांचें
मन उघडिलें। ४६ मग त्यांस ह्मटलें, कीं असें लिहिलें आहे।
आणि असें ख्रीस्ताला सोसणें, आणि तिसऱ्या दिवशीं मेलेल्यांतून
फिरोन उठणें। ४७ आणि यरूशलेमापासून आरंभ करून। आ
पल्या नांवावर सर्व राष्ट्रांस पश्चात्ताप व पापांची सूट गा
जिवणें अगत्य जालें॥ ४८ आणि ह्यांचे साक्षी, तुह्मीं आ
हां॥ ४९ आणि पाहा, मी आपल्या बापाचें वचनफळ तु
ह्मांवर पाठवितों॥ परंतु तुह्मीं वरल्यांतील सामर्थ्य ह्यासेतो
व्हाल, तोंपर्यंत यरूशलेम नगरांत वस्ती करा ※

५० मग तो त्यांस बेथान्यापावेतों बाहेर घेऊन गेला। आ
णि, आपले हात वर करून, त्यांस आशिर्वाद दिल्हा॥
५१ आणि तो त्यांस आशिर्वाद देतांना, हें जालें। तो त्यां
पासून वेगळा जाला, आणि आकाशांत वर नेला गेला॥ ५२ ते
व्हां ते, त्याची भक्ती करोन, मोठ्या आनंदाने यरूशलेमास मा
घारें गेले॥ ५३ आणि देवाला स्तवितां व धन्य ह्मणतां। स
र्वदां देवळांत असत होते॥ आमेन ※

योहान्नाकडून सुवर्तमान ॥

पर्व १ ॥ १ प्रारंभीं तो शब्द होता। आणि तो शब्द देवा
जवळ होता। आणि तो शब्द देव होता ॥ २ तोच प्रारंभीं
देवाजवळ होता ॥ ३ त्याकडून सगळीं जालीं। ह्मणजे जें
जालें। तें कांहींच त्यावांचून जालें नाहीं ॥ ४ त्यामध्यें जि
वन होतें। आणि तें जिवन माणसांचा उजेड होता ॥ ५ आ
णि तो उजेड अंधारांत प्रकाशतो। परंतु अंधारानें त्याला ध
रिलें नाहीं ※ ६ देवाजवळून पाठविलेला माणुस होता। त्या
चें नांव योहान्न ॥ ७ तोच। आपणाकडून सर्वांनी विश्वास ध
रावा। ह्मणोन त्या उजेडाविषयीं साक्ष द्यावयास साक्षीसाठीं
आला ॥ ८ तोच तो उजेड नव्हता। परंतु त्या उजेडाविष
यीं साक्ष द्यावयास [आला ॥] ९ जो प्रत्येक माणुस जगांत येतो।
त्याला जो प्रकाशितो। तोच खरा उजेड होता ॥ १० तो जगां
त होता। आणि जग त्याकडून जालें। तथापि जगाने त्याला
जाणलें नाहीं ॥ ११ तो आपलीं जीं ह्यांजवळ आला। आ
णि आपले जे ह्यानी त्याला अंगिकारिलें नाहीं ॥ १२ परंतु
जितक्यानी त्याला घेतलें। ह्मणजे त्याच्या नांवावर विश्वास
ठेविला। त्यांस त्याने देवाचीं लेंकरें होण्याचा अधिकार दि
ल्हा ॥ १३ ते रक्तांपासून। किंवा मासाच्या इच्छेपासून। किं
वा माणसाच्या इच्छेपासून नव्हेत। परंतु देवापासून जन्मले ※
१४ आणि तो शब्द अवतरला। तेव्हां त्याने आह्मामध्यें वस्ती
केली। आणि तो कृपेनें व खरेपणाने पूर्ण [असतां।] त्याचें
गौरव। बापाजवळील येकुलत्याच्या गौरवासारिखें। आह्मी

पाहिलें॥ १५ योहान्न त्याविषयीं साक्ष देत असतांना ओरडत बोलला। ज्याविषयीं मी बोललों। तो हाच आहे। कीं जो माझ्या मागें येतो। तो माझ्या पुढें जाला। यास्तव कीं तो माझ्या आगोधर होता॥ १६ आणि त्याच्या पूर्णपणापासून आह्मी सर्व, कृपेमुळें कृपाच पावलों आहों॥ १७ कां कीं नेमशास्त्र मोश्याकडून दिल्हें गेलें। कृपा व खरेपण येशू ख्रीस्ताकडून जालीं॥ १८ देवाला कोणी कधींहि पाहिलें नाहीं। येकुलता पुत्र, जो बापाच्या उराशीं असतो। त्यानेच तो निवेदिला आहे ※

१९ आणि जेव्हां यहूद्यानी यरूशलेमापासून उपाध्यांस व लेवींस यासाठीं पाठविलें। कीं तूं कोण आहेस। ह्मणोन त्यानी योहान्नाला विचारावें। तेव्हां याची साक्ष हीच आहे। २० कीं याने पत्करिलें, आणि नकारिलें नाहीं। परंतु मी तो ख्रीस्त नव्हें। असें पत्करिलें॥ २१ मग त्यानी त्याला विचारिलें, तर कोण? तूं एलीया आहेस कीं काय? तेव्हां तो ह्मणतो। नव्हे॥ [तर] तूं तो भविष्यभाषी आहेस कीं काय? मग त्याने उत्तर दिल्हें। [कीं] नाहीं॥ २२ तेव्हां ते त्याला बोलले। ज्यानी आह्मास पाठविलें त्यांस आह्मी उत्तर द्यावें। ह्मणोन तूं कोण आहेस? तूं आपणाविषयीं काय सांगतोस? २३ तो बोलला, जसें यशाया भविष्यभाष्याने सांगितलें। कीं प्रभूचा मार्ग नीट करा। रानांत अशा गर्जणाऱ्याची वाणी मी [आहें॥] २४ तेव्हां जे पाठविले। ते फारिश्यांतील होते॥ २५ आणि त्यानी त्याला विचारितांना त्याला बोलले, जर तूं तो ख्रीस्त नाहींस, आणि एलीया नाहींस, आणि तो भविष्यभाषी नाहींस, तर बाप्तीस्मा कां करितोस? २६ योहान्नाने त्यांस उत्तर दिल्हें, कीं मी पाण्याने बाप्तीस्मा करितों। परंतु जो तुह्मांस कळला नाहीं, तो तुह्मांमध्यें उभा राहिला आहे॥ २७ तोच हा आहे, कीं जो माझ्या मागें येतो। तो माझ्या पुढें जाला॥ त्याच्या जो

ह्याचे बंद सोडायास मी योग्य नाहीं॥ २८ हीं यार्देनेपलिकडे
जेथे योहान्न बाप्तीस्मा करीत होता। तेथे बेथाबाऱ्यांत जालीं ※
२९ दुसऱ्या दिवशीं। योहान्न आपल्या जवळ येशूला येतां
पाहून ह्मणतो। पाहा, देवाचा लाहान मेंढा। तो ज
गाचें पाप हरण करितो॥ ३० हाच तो आहे। ज्याविषयीं
मी बोललों, [कीं] माझ्या मागें असा माणूस येतो। कीं मा
झ्या पुढें जाला। कां तर माझ्या आगोधर होता॥ ३१ आ
णि म्या त्याला जाणलें नाहीं, परंतु त्याने इस्राएलास प्र
गट व्हावें ह्मणोन [जाणलें।] यामुळें मी येऊन पाण्याने
बाप्तीस्मा करितों॥ ३२ आणि योहान्न साक्ष देतां बोलला।
कीं आत्मा आकाशांतून पारव्यासारिखा उतरतां म्या पाहि
ला। आणि तो त्यावर राहिला॥ ३३ आणि म्या त्याला
जाणलें नव्हतें। परंतु ज्याने मला पाण्याने बाप्तीस्मा करायास
पाठविलें, तोच मला बोलला। [कीं] ज्यावर आत्मा उत
रतां। त्यावर राहातांहि पाहासील। तोच पवित्र आत्म्याने
बाप्तीस्मा करणारा आहे॥ ३४ तेव्हां म्या पाहिलें। आणि
साक्ष दिल्ही। कीं हाच देवाचा पुत्र आहे ※

३५ दुसऱ्या दिवशीं योहान्न। आपल्यां दोघां शिष्यांसुद्धां।
फिरोन उभा राहात होता॥ ३६ तेव्हां येशूला चालतां पाहून ह्म
णतो। पाहा। देवाचा लाहान मेंढा॥ ३७ आणि त्यां दोघां
शिष्यानी त्याचें बोलणें ऐकिलें। मग ते येशूच्या मागें चालले॥
३८ तेव्हां येशू मुरडून त्यांस मागें येतां पाहून। त्यांस ह्मण
तो। ३९ तुह्मी काय शोधितां? नंतर ते त्याला बोलले।
राब्बी। ह्या अर्थ उतरल्याने ह्मणजे। हे गुरू। कोठे रा
हातोस? ४० तो त्यांस ह्मणतो, या, आणि पाहा॥ ते आ
ले। आणि तो कोठे राहातो। हें त्यानी पाहिलें। मग त्या दि
वशीं ते त्याच्या जवळ राहिले। तेव्हां सुमारें दाहावी होरा
होती॥ ४१ जे दोघे। योहान्नाचें ऐकल्यावर। त्याच्या मा
गें चालले।* त्यांत शिमोनपेत्रसाचा भाऊ। आंद्रेयास येक हो

ता ॥ ४२ तो आपला भाउ शिमोन, याला पहिला पावतो।
आणि त्याला ह्मणतो। मशीहा। ह्मणजे। अर्थ उत
रल्याने। तो ख्रीस्त। तो आह्मास सांपडला आहे॥ ४३ म
ग त्याने त्याला येशू जवळ आणिलें॥ तेव्हां येशू त्याला न्या
ह्याळून बोलला। तूं शिमोन, योनाचा पुत्र आहेस। तूं केफा
ह्मटला जासील। तो पेत्रस असा अर्थ उतरतो ॐ ४४ दुसऱ्या दि
वशीं येशूने गालिलांत जाण्यास इच्छिलें। मग फिलीप्पसाला
पावल्यावर तो त्याला ह्मणतो। माझ्या मागें ये॥ ४५ तर
हा फिलीप्पस। आंद्रियास व पेत्रस यांच्या नगरचा। बेथसाद
यांतील होता॥ ४६ फिलीप्पस नथानेलाला पावल्यावर
त्याला ह्मणतो। ज्याविषयीं नेमशास्त्रांत मोशाने, आणि भविष्य
भाष्यानी लिहिलें तो। नाजारेथांतील येशू योसेफाचा पुत्र आह्मा
स सांपडला आहे॥ ४७ तेव्हां नथानेलाने त्याला ह्मटलें। ना
जारेथांतून कांहीं चांगलें होउं शक्य आहे कीं काय? फिली
प्पस त्याला ह्मणतो। ये। आणि पाहि॥ ४८ येशू आपल्या जव
ळ नथानेलाला येतां पाहिल्यावर, त्याविषयीं ह्मणतो। पाहा।
इस्राएली खरें। त्यांत कपट नाहीं॥ ४९ नथानेल त्याला ह्मण
तो, मला कोठून जाणतोस? येशूने उत्तर देतांना त्याला ह्मटलें।
फिलीप्पसाने तुला बोलाविल्यापूर्वीं। तूं अंजिराखालीं असतां,
म्या तुला पाहिलें॥ ५० नथानेल उत्तर देतांना त्याला ह्म
णतो, हे राब्बी, तूं देवाचा पुत्र आहेस। तूं इस्राएलाचा रा
जा आहेस॥ ५१ येशूने उत्तर देतांना त्याला ह्मट
लें, म्या तुला अंजिराखालीं पाहिलें। हें तुला सांगि
तलें, यावरून विश्वास धरितोस कीं काय? यांहून मोठें
पाहासील॥ ५२ आणि तो त्याला ह्मणतो। मी तुह्मास खची
त खचीत सांगतो। यापुढें आकाश उघडलेलें। आणि देवाचे
दूत माणसाच्या पुत्राविषयीं चढतां व उतरतां पाहाल ॐ
पर्व २॥ १ आणि तिसऱ्या दिवशीं। गालिलांतील कान्यां
त लग्न होतें। तेव्हां येशूची आई तेथे होती॥ २ आणि

येशूहि व त्याचे शिष्य त्या लग्नास बोलाविले होते॥ ३ मग
द्राक्षरस खुटला असतां। येशूची आई त्याला ह्मणती। त्यां
जवळ द्राक्षरस नाहीं॥ ४ येशू तिला ह्मणतो। हे स्त्री। म
ला व तुला काय? आझून माझी घटका आली नाहीं॥
५ त्याची आई सेवकांस ह्मणती। जें कांहीं तो तुह्मास सां
गेल। तें करा॥ ६ तेव्हां यहूद्यांच्या शुद्ध करण्याप्रमाणें ठेव
लेल्या पाण्याच्या साहा दगडी कुंड्या, प्रथकप्रथक दोन किंवा ती
न मण मावत्या, तेथे होत्या॥ ७ येशू त्यांस ह्मणतो। त्या
कुंड्या पाण्याने भरा॥ मग त्यानी त्या वरपर्यंत भरल्या॥
८ तेव्हां तो त्यांस ह्मणतो। आतां त्यांतून काढून जेवणका
रभाऱ्याजवळ न्या। आणि त्यानी नेलें॥ ९ मग द्राक्षरस जा
लेलें पाणी। तें जेवणकारभाऱ्याने जेव्हां चाखलें आणि कोठू
न हें जाणलें नाहीं। परंतु ज्यां सेवकानी पाणी काढिलें त्यां
स ठाऊक होतें। तेव्हां जेवणकारभाऱ्याने नवऱ्याला बोलाविलें,
१० आणि त्याला ह्मणतो, प्रत्येक माणुस चांगला द्राक्षरस
प्रथम वाढितो। मग बहुत प्याल्यानंतर जो कनीष्ठ तो। [परंतु] त्वां
उत्तम द्राक्षरस आतांपर्यंत ठेविला आहे॥ ११ येशूने चम
त्कारांचा हा प्रारंभ गालिलांतील कान्यामध्यें केला। आणि आ
पलें गौरव प्रगट केलें। तेव्हां त्याचे शिष्य त्यावर विश्वासले॥
१२ यानंतर तो व त्याची आई व त्याचे भाऊ व त्याचे
शिष्य कापेर्णाऊमास खालीं गेले। परंतु बहुत दिवस तेथे रा
हिले नव्हते॥

१३ आणि यहूद्यांचा वल्हांडणसण जवळ होता। तेव्हां
येशू यरूशलेमास चढला॥ १४ मग देवळांत गुरें व मेंढ्रें व
पारवीं। यांचे विकणारे, व नाणावटी बसलेले, त्याला आढळले॥
१५ तेव्हां त्याने लाहान दोऱ्यांचा कोरडा करून। त्यां सर्वां
स, आणि मेंढ्रें व गुरें यांस देवळांतून घालविलें। नाणावटीं
चा पैकाहि उधळिला। आणि चौरंग उलंडिले। १६ पारव्यां
च्यां विकणाऱ्यांसहि ह्मटलें। हीं येथून काढा। माझ्या बापा

चें घर व्यापाराचें घर करूं नका॥ १७ तेव्हां त्याच्यां शिष्या
नी आठवण केली। कीं असें लिहिलें आहे। तुझ्या घराच्या
आवेशाने मला खाऊन टाकिलें आहे ※ १८ तेव्हां यहूदी उ
त्तर देतांना त्याला बोलले, कीं तूं हीं करितोस याविषयीं
आह्मास काय साक्षात्कार दाखवितोस? १९ येशू उत्तर दे
तांना त्यांस बोलला, ह्या देवळाला मोडा। मग तीन दिव
सांत याला उभारीन॥ २० यास्तव यहूदी बोलले। या देवळा
ला बांधायास शेचाळीस वर्षें लागलीं। तर तूं तीन दिवसांत
याला उभारिसील कीं काय? २१ परंतु तो आपल्या शरिराच्या
देवळाविषयीं बोलला॥ २२ यास्तव तो मेलेल्यांमधून उठल्या
वर। त्याच्यां शिष्यानी आठवण केली। कीं त्याने त्यांस असें
ह्मटलें होतें। मग त्यानी लेखावर। आणि येशूनें जी गो
ष्ट ह्मटली। तिजवर विश्वास ठेविला ※
२३ तेव्हां तो वल्हांडणाच्या सणास यरूशलेमांत असतां।
बहुतानी त्याचे केलेले जे चमत्कार। ते पाहून त्याच्या नांवावर वि
श्वास ठेविला॥ २४ परंतु येशू स्वतां आपणाविषयीं त्यांस विश्वास
ला नाहीं। यास्तव कीं त्याने सर्वांस जाणलें। २५ आणखी को
णी माणसाविषयीं साक्ष द्यावी असें त्याला अगत्य नव्हतें।
कारण कीं माणसांत काय आहे, हें तो समजला ※
पर्व ३ ॥ १ तेव्हां फारिश्यांतील माणुस, त्याचें नांव निक
देमस, यहूद्यांचा अधिकारी, असा होता॥ २ तो रात्रीं ये
शूजवळ आला। मग त्याला बोलला, हे राब्बी। तूं उपदेशक, दे
वापासून आलास, हें आह्मास कळलें, कारण, जे चमत्कार तूं क
रितोस हे कोणी। आपल्यासहीत देव असल्यांवांचून। करूं
शकत नाहीं॥ ३ येशू उत्तर देतांना त्याला बोलला, मी
तुला खचीत खचीत सांगतों। जर कोणी पर्टून न जन्मला।
तर तो देवाचें राज्य पाहूं शकत नाहीं॥ ४ निकदेमस त्या
ला बोलतो। माणुस ह्मातारा असतां। जन्म घेऊं कसें शकतो?
तो आपल्या आईच्या पोटांत दुसऱ्याने शिरून जन्म घ्यायास

शक्तिमान आहे कीं काय? ५ येशूने उत्तर दिल्हें। [कीं] मी
तुला खचीत खचीत सांगतों। जर कोणी पाण्यापासून आ
णि आत्म्यापासून न जन्मला। तर तो देवाच्या राज्यांत जाऊं
शकत नाहीं॥ ६ जें मांसापासून जन्मलें, तें मांस आहे। आ
णि जें आत्म्यापासून जन्मलें। तें आत्मा आहे॥ ७ तुह्मास
परतून जन्मलें पाहिजे। हें म्या तुला सांगितलें, ह्मणोन न
वल मानूं नको॥ ८ वारा जिकडे इच्छितो। तिकडे वाहातो।
आणि तूं त्याचा शब्द ऐकतोस, परंतु कोठून येतो। आणि
कोठे जातो। हें तुला कळलें नाहीं। प्रत्येक जो आत्म्यापासून जन्म
ला, तो तसाच आहे॥ ९ निकदेमस उत्तर देण्याने त्याला
बोलला। हीं कसीं घडूं शकतात? १० येशू उत्तर देण्याने
त्याला बोलला। तूं इस्राएलांतील उपदेशक आहेस। आणि
हीं न जाणतोस कीं काय? ११ मी तुला खचीत खचीत सांग
तों। कीं जें आह्मास कळलें। तें आह्मी बोलतों। आणि जें आह्मी
पाहिलें। त्या विषयीं साक्ष देतों। परंतु तुह्मी आमची सा
क्ष न घेतां॥ १२ जर म्या पृथ्वीवरलीं जीं, तीं तुह्मास सां
गीतलीं आहेत, आणि तुह्मी विश्वास न धरितां, तर मी
आकाशावरलीं तीं तुह्मास सांगितल्यास, तुह्मी विश्वास कसा ध
राल? १३ आणि आकाशांतून उतरलेला माणसाचा पुत्र। जो
आकाशांत असतो। ह्यावांचून कोणी आकाशांत चढला ना
हीं ※ १४ आणि जसें मोश्याने रानांत साप उंच केला, त
सें माणसाच्या पुत्राला यासाठीं उंच केलें पाहिजे, १५ कीं
त्याजवर जो कोणी विश्वास ठेवील। त्याने नाशास न जावें।
परंतु त्याला सर्वकाळचें जिवन व्हावें ※ १६ यास्तव कीं देवा
ने जगावर येवढी प्रीति केली। कीं त्याने आपला येकुलता
पुत्र यासाठीं दिल्हा। कीं त्याजवर जो कोणी विश्वास ठेवितो।
त्याने नाशास न जावें। परंतु त्याला सर्वकाळचें जिवन व्हा
वें॥ १७ कां तर देवाने आपल्या पुत्राला जगांत पाठविलें।
हें जगाचा दंड ठरवावा ह्मणोन नव्हे। परंतु त्याजकडून जग तार

लें जावें ह्मणोन ॥ १८ त्याजवर जो विश्वास ठेवितो । त्याचा दं
ड, ठरविला जात नाहीं । परंतु जो विश्वास ठेवीत नाहीं ।
त्याचा आतांच दंड ठरलेला आहे । कां तर त्यानें देवाच्या
येकुलत्या पुत्राच्या नांवावर विश्वास ठेविला नाहीं ॥ १९ आ
णि तें दंडठरविणें हेंच आहे, कीं जगांत उजेड आला
असतांना । माणसानीं उजेडापेक्षां अंधाराची आवड धरिली ।
कारण कीं त्यांचीं करणीं दुष्ट ॥ २० कां तर जो कोणी
वाईट करितो । तो उजेडाचा द्वेष करितो । आणि आपलीं क
रणीं निषेधलीं न जावीं, ह्मणोन उजेडाजवळ येत नाहीं ॥
२१ परंतु जो खरेपण वर्ततो । तो उजेडाजवळ असा ये
तो । कीं त्याचीं करणीं देवाकडून घडलीं आहेत, हें उ
घडें व्हावें ॥

२२ यांनंतर येशू आपल्यां शिष्यांसुद्धां यहूद देशांत आ
ला । आणि तेथें त्यानें त्यांच्या संगतीं राहात ना बाप्तीस्मा
केला ॥ २३ आणि शालिमाजवळच्या एनोनांत बहुत पाणी हो
तें, यास्तव योहान्नहि तेथें बाप्तीस्मा करीत होता । तेव्हां त्या
नी येऊन बाप्तीस्मा घेतला । २४ कां तर योहान्न तोंपर्यंत बं
दिशाळेंत टाकला नव्हता ॥ २५ यास्तव शुद्ध करण्याविषयीं
यहूद्यांशीं योहान्नाच्यां शिष्यांनल्यांचा विवाद जाला ॥ २६ ते
व्हां ते योहान्नाजवळ येऊन त्याला बोलले । हे राब्बी । जो या
र्देनेपलिकडे तुझ्या संगतीं होता । ज्याची त्वां साक्ष दिल्ही । पा
हा । तो बाप्तीस्मा करितो, आणि सर्व त्याजवळ येतात ॥ २७ यो
हान्न उत्तर देण्यानें बोलला । जर माणसाला आकाशांतून दि
ल्हें नसेल । तर तो कांहीं घेऊं शकत नाहीं ॥ २८ तुह्मी स्व
तां माझी साक्ष देतां, कीं म्या ह्मटलें, मी तो ख्रीस्त नव्हें,
परंतु त्याच्या पुढें पाठविलेला आहें ॥ २९ ज्याला नवरी आ
हे । तोच नवरा आहे । आणि नवऱ्याचा मित्र, जो उभा रा
हातांना त्याचें ऐकतो । तो नवऱ्याच्या शब्दावरून फार आनं
दतो । यास्तव हा माझा आनंद पूर्ण जाला आहे ॥ ३० त्याला

थोर होत जाणें । परंतु मला लाहान होत जाणें लागतें ॥
३१ जो वरून येतो, तो सर्वांवर आहे ॥ जो जगीपासून
होतो। तो जगाचा आहे, आणि जगाविषयीं बोलतो ॥ जो
आकाशांतून येतो। तो सर्वांवर आहे ॥ ३२ आणि त्यानें जें
पाहिलें व ऐकिलें। तो साक्ष देतो। परंतु त्याची साक्ष
कोणी धरीत नाहीं ॥ ३३ त्याची साक्ष जो धरितो, त्या
नें। देव खरा आहे। ह्मणोन शिक्का केला आहे ॥ ३४ का
रण कीं ज्याला देवानें पाठविलें। तो देवाच्या गोष्टी बोल
तो। कां तर देव [त्याला] आत्मा परिमितानें देत नाहीं ॥
३५ बाप पुत्रावर प्रीति करितो । आणि त्यानें अवघीं त्या
च्या हातीं दिल्हीं आहेत ॥ ३६ जो पुत्रावर विश्वास ठेवि
तो। त्याला सर्वकाळचें जिवन आहे। आणि जो पुत्राला मा
नीत नाहीं। तो जिवन पाहाणार नाहीं। परंतु देवाचा रा
ग त्यावर राहील ॥

पर्व ४ ॥ १, २ येशूनें तर स्वतां नव्हे, परंतु त्याच्यां शि
ष्यांनी बाप्तीस्मा केला खरें। तथापि योहान्नापेक्षां येशू अ
धीक शिष्य करितो आणि त्यांचा बाप्तीस्मा करितो। असें फा
रिश्यांनी ऐकिलें। हें जेव्हां प्रभूनें जाणलें। तेव्हां ३ तो य
हूद सोडून फिरोन गालिलांत गेला। ४ आणि त्याला
शोमरोनांतून जावें लागलें ॥ ५ तेव्हां जें शेत याकोबानें
आपल्या योसेफ पुत्राला दिल्हें। त्याच्या जवळ शोमरो
नाचें शखार ह्मटलेलें नगर, तेथें तो येतो ॥ ६ आणि
तेथें याकोबाची विहीर होती । यास्तव येशू चालण्यानें भाग
ला असतां। त्या विहिरीजवळ तसाच बसला। सुमारें दु
पार होती ॥ ७ शोमरोनांतली स्त्री पाणी काढायास येती ॥
येशू तिला ह्मणतो, मला प्यायास दे ॥ ८ त्याचे शिष्य तर,
अन्न विकत घ्यावयास, नगरांत गेले होते ॥ ९ यास्तव ती
शोमरोनी स्त्री त्याला बोलली। मी शोमरोनी स्त्री असतां,
तूं यहूदी असून माझ्या जवळ प्यायास कसें मागतोस? य

ऊदी तर। शोमरोन्यांशीं वहिवाट करीत नाहींत॥ १० येशू उत्तर देण्याने तिला बोलला। देवाहून दान हें। आणि मला प्यायाला दे [असें] जो तुजशीं बोलतो तो कोण आहे। हें जर तुला कळलें असतें, तर त्वां त्यापाशीं मागितलें असतें, आणि त्याने तुला जिववान पाणी दिल्हें असतें॥ ११ ती स्त्री त्याला बोलती। हे प्रभू। तुला पोहरा नाहीं, आणि विहीर खोल आहे। यास्तव तुझ्या जवळ जिवनाचें पाणी कोठून आहे? १२ आमचा पितर याकोब। त्यापेक्षां तूं मोठा आहेस कीं काय? त्याने आह्मांस ही विहीर दिल्ही, आणि हीचें तो स्वतां। आणि त्याचे पुत्र। आणि त्याचीं ढोरें प्यालीं॥ १३ येशू उत्तर देण्याने तिला बोलला। जो कोणी ह्या पाण्यांतून पितो। त्याला फिरोन ताहान लागेल। १४ परंतु जें पाणी मी देईन। त्यांतून जो जो पितो। त्याला सर्वकाळापर्यंत ताहान लागणार नाहीं। आणखी जें पाणी मी त्याला देईन, तें त्यामध्यें सर्वकाळीक जिवनासाठीं उपळत्या पाण्याची विहीर होईल॥ १५ स्त्री त्याला ह्मणती। हे प्रभू, मला ताहान न लागावी, आणि पाणी काढायास म्या येथे न यावें। ह्मणोन तें पाणी मला दे॥ १६ येशू तिला ह्मणतो, जा। तुझ्या नवऱ्याला बोलावून। इकडे ये॥ १७ ती स्त्री उत्तर देण्याने बोलली। मला नवरा नाहीं॥ येशू तिला ह्मणतो, बरें बोललीस। कीं मला नवरा नाहीं॥ १८ कारण कीं तुला पांच नवरे जाले, आणि जो तुला आतां आहे। तो तुझा नवरा नाहीं। हें त्वां खरें ह्मटलें॥ १९ स्त्री त्याला ह्मणती। हे प्रभू। तूं भविष्यभाषी आहेस, हें मला दिसतें॥ २० आमच्या पितरानी ह्या डोंगरावर भजन केलें। परंतु ज्या जाग्यांत भक्ती केली पाहिजे। तो यरूशलेमांत आहे, असें तुह्मी ह्मणतां॥ २१ येशू तिला ह्मणतो। हे स्त्री, तुह्मी जेव्हां बापाची भक्ती या डोंगरांत आणि यरूशलेमांतहि न करांल। अशी वेळ येत आहे। ह्मणोन। मजवर वि

स्थास ठेव॥ २२ तुह्मी कशास भजतां, तें तुह्मास कळलें ना
हीं। आह्मी कशास भजतों, ते आह्मास कळलें। कां कीं
तारण यहूद्यांतून आहे॥ २३ परंतु अशी वेळ येते, आ
णि आतां आहे, कीं तींत खरे भजणारे आत्म्यानें व सत्य
तेनें बापाला भजतील। यास्तव कीं बापच आपल्याला अ
सें भजन करणाऱ्यांस शोधितो॥ २४ जो देव, तो आत्मा
[आहे।] आणि जे त्याला भजतात, त्यांनी आत्मा व खरेपण
यांकडून, भजलें पाहिजे॥ २५ बायको त्याला ह्मणती, मशी
हा जो ख्रीस्त ह्मटला, तो येत आहे, हें मला कळलें। तो
आल्यावर आह्मा अवघीं विस्तारानें सांगेल॥ २६ येशू तिला
ह्मणतो, तोच तुजशीं बोलता, मी आहे॥ २७ आणि त्या
वर त्याचे शिष्य आले। आणि तो स्त्रीशीं बोलत होता, यास्तव
त्यांनी आश्चर्य केलें। तथापि तूं काय शोधितोस? किंवा
तिजशीं कां बोलतोस? असें कोणी ह्मटलें नाहीं॥ २८ ते
व्हां स्त्री आपली घागर ठेवून नगरांत गेली, मग लोकांस
ह्मणती। २९ या। जितकीं म्या केलीं, तीं अवघीं ज्यानें म
ला सांगितलीं। त्या माणसाला पाहा। तोच ख्रीस्त आहे कीं
नाहीं? ३० यास्तव ते नगरांतून निघून त्याजवळ आले॥
३१ आणि त्या अंतरांत शिष्यांनी त्याला विनंती केली, कीं
हे राब्बी, जेव॥ ३२ परंतु तो त्यांस बोलला, जें अ
न्न तुह्मांस कळलें नाहीं, तें मला खायाला आहे॥ ३३ या
स्तव शिष्यांनी आपल्यांमध्यें ह्मटलें, काय, कोणी त्यासाठीं खा
याला आणलें? ३४ येशू त्यांस ह्मणतो, ज्यानें मला पा
ठविलें, त्याच्या इच्छेप्रमाणें म्या करावें, आणि त्याचें काम
सिद्धीस न्यावें, हें माझें अन्न आहे॥ ३५ अद्याप चार महि
न्यांचा [अवकाश] आहे, मग कापणी येती। असें तुह्मी ह्मण
तां कीं नाहीं? पाहा। मी तुह्मास ह्मणतों। तुमचे डोळे
वर करून शेतांस न्याहाळ[illegible] कीं आतांच तीं काप
णीसाठीं पांढरीं आहे[illegible] आणि कापणारा वेतन पावतो।

आणि सर्वकाळच्या जिवनासाठीं फळ येकवट करितो, असें कीं
पेरणाऱ्यानें आणि कापणाऱ्यानेंहि येकवट आनंद करावा ॥
३७ कां तर यांत ही ह्मण खरी आहे। कीं येक पेरि
तो। आणि दुसरा कापितो॥ ३८ ज्यावर तुह्मी श्रम केले
नाहींत, तें कापायाला। म्या तुह्मास पाठविलें। दुसऱ्यानी श्र
म केले, आणि त्यांच्या श्रमांत तुह्मी शिरलां आहां ॥
३९ तर त्या स्त्रीने साक्ष दिल्ही। कीं जितकीं म्या केलीं।
तीं अवघीं त्याने मला सांगितलीं। असें असतां। त्या नग
रांतील बहुत शोमरोन्यानी तिच्या गोष्टीवरून त्यावर विश्वा
स ठेविला॥ ४० यास्तव शोमरोन्यानी। त्याजवळ आल्याव
र। आपल्या संगतीं त्याने राहावें ह्मणोन त्याला विनंती के
ली। आणि तो तेथे दोन दिवस राहिला॥ ४१ तेव्हां त्याच्या
गोष्टीवरून बहुत अधीक विश्वासले। ४२ आणि त्या स्त्री
ला बोलले। कीं आतांपासून तुझ्या बोलण्यावरूनच आह्मी
विश्वास न धरितों। कां तर आह्मी स्वतां ऐकिलें। आ
णि ख्रीस्त जो जगाचा तारणारा। तो हाच आहे खरें।
हें आह्मास कळलें ॥

४३ मग दोन दिवसांनंतर तो तेथून निघाला। आणि
येकिकडे गालिलांत गेला। ४४ कां तर येशूने स्वतां साक्ष
दिल्ही। कीं भविष्यभाष्याला आपल्या कुळस्थानांत सन्मान ना
हीं॥ ४५ तर तो गालिलांत आला, नंतर गालिल्यानी
त्याला यावरून अंगिकारिलें, कीं त्याने यरूशलेमामध्यें सणां
त जीं अवघीं केलीं, तीं ह्यानी पाहिलीं होतीं। कां त
र हेहि सणास आले होते ॥ ४६ तर येशू फिरोन गालिलां
तील काना, जेथे त्याने पाणी द्राक्षरस केला, तेथे गेला॥
तेव्हां कोणी राजमान्य होता। त्याचा पुत्र कापेर्णाहूमांत दु
खणेकरी होता॥ ४७ त्याने ऐकिलें। कीं येशू यहूदाहून गा
लिलांत आला। या[illegible]ळ गेला। आणि त्याने
खालीं येऊन याच्या पुत्राला [illegible]रावें। ह्मणोन याने

त्याला विनंती केली । कां तर मरणार होता ॥ ४८ यावर
येशू त्याला बोलला । तुह्मी चमत्कार व उत्पात पाहिल्या
वांचून विश्वास नच धरणार ॥ ४९ राजमान्य त्याला ह्मणतो ।
हे प्रभू । माझा मुल मेल्या आगोधर खालीं ये ॥ ५० येशू त्या
ला ह्मणतो । जा । तुझा पुत्र वांचतो ॥ तेव्हां येशूने जी गो
ष्ट त्याला ह्मटली । तिजवर तो माणुस विश्वास धरून गेला ॥
५१ मग तो खालीं जात असतां इतक्यांत त्याचे चाकर
त्याला भेटले । आणि त्यांनी सांगतां ह्मटलें । कीं तुझा मू
ल वांचतो ॥ ५२ यास्तव । कोणत्या घटकेंत त्याला कांहीं
उतार पडला ? हें त्यानें त्यांजवळ पुसलें ॥ आणि त्यांनी त्या
ला ह्मटलें । कीं काल , सातव्या होरेंत तापानें त्याला सोडिलें ॥
५३ यास्तव । ज्या घटिकेंत येशूने त्याला सांगितलें । कीं तु
झा पुत्र वांचतो । त्यांत [हें जालें] ह्मणोन बापानें जाणलें ।
आणि त्यानें व त्याच्या सर्व घराण्यानें विश्वास धरिला ॥ ५४ फि
रोन येशूने यहूदाहून गालिलांत येऊन हा दुसरा चमत्का
र केला ॥

पर्व ५ ॥ १ यानंतर यहूद्यांचा सण होता । आणि येशू
यरूशलेमास चढला ॥ २ तर यरूशलेमांत मेंढ्र[दरवाज्या]
जवळ तळें आहे । तें इब्रींत बेथेस्दा ह्मटलें , त्याला पांच मं
डप आहेत ॥ ३ त्यांमध्यें रोगी । आंधळे । लंगडे । लुले , यांचा
मोठा भरणा । पाणी हालण्याची वाट पाहात असतां । पडला
होता ॥ ४ कारण कीं दुतानें वेळो वेळेस । तळ्यांत उत
रून । पाणी हालविलें । यास्तव पाणी हालविल्यानंतर । जो
प्रथम त्यांत शिरला । त्याला जो कोणी रोग लागला अस
तां । त्यापासून तो निरोगी जाला होता ॥ ५ आणि तेथे
अडतीस वर्षें दुखणेकरी कोणी माणुस होता ॥ ६ येशू
ने त्याला पडलेला पाहून , आणि तेव्हां त्याला बहुत का
ळ जाला , हें जाणून त्याला ह्मणतो । तूं निरोगी होण्या
स इच्छितोस [कीं काय ?] ७ रोग्यानें त्याला [असें] उत्तर

दिल्हें। हे प्रभू, जेव्हां पाणी हालविलें, तेव्हां मला तळ्यां
त घालायास कोणी माणुस मला नाहीं। परंतु मी येत आहें,
तेव्हां दुसरा माझ्या पुढें उतरतो॥ ८ येशू त्याला ह्मणतो।
उठ। तूं आपलें आंथरूण उचलून चाल॥ ९ आणि तेव्हांच तो
माणुस निरोगी जाला। आणि आपलें आंथरूण उचलून चालला॥
तेव्हां त्या दिवशीं शाब्बाथ होता※ १० यास्तव। जो निरोगी
केला। त्याला यहूदी बोलले, शाब्बाथ आहे। तुला आंथरूण
न्यावयास योग्य नाहीं॥ ११ त्याने त्यांस [असें] उत्तर दिल्हें।
ज्याने मला निरोगी केलें। त्याने मला सांगितलें। [कीं] तुझें
आंथरूण उचलून चाल॥ १२ यावर त्यांनी त्याला पुसलें।
कीं तुझें आंथरूण उचलून चाल। असें ज्याने तुला ह्मटलें।
तो माणुस कोण आहे? १३ परंतु तो कोण आहे, हें
निरोगी जालेल्याला कळलें नाहीं। कारण कीं त्या ठिकाणीं
समुदाय असतां, येशू निघटला॥ १४ यानंतर तो देवळां
त येशूला मिळाला। तेव्हां याने त्याला ह्मटलें। पाहा।
तूं निरोगी जालास। कांहीं अधीक वाईट तुला न व्हावयास।
आतांपासून पाप करूं नको॥ १५ तो माणुस गेला, आणि
ज्याने त्याला निरोगी केलें। तो येशू आहे, हे त्याने यहू
द्यांस सांगितलें॥ १६ मग यामुळें यहूदी येशूच्या पाठीस
लागले, आणि त्याला जिवें मारायास ह्मटले। कां कीं
त्याने शाब्बाथांत हीं केलीं होतीं※ १७ परंतु येशूने
त्यांस [असें] उत्तर दिल्हें। आतांपावेतों माझा बाप काम
करितो। आणि मी काम करितों॥ १८ यासाठीं तर, यहूदी
त्याला जिवें मारायास अधीक ह्मटले। कां कीं त्याने शाब्बा
थ मोडला, हें केवळ नव्हे। परंतु देव तो आपला बाप ह्म
णोन देखील सांगून। त्याने आपणाला देवासमान केलें॥ १९ या
स्तव येशूने। उत्तर देतांना। त्यांस ह्मटलें। मी तुह्मास ख
चीत, खचीत सांगतों, पुत्र बापाला कांहीं करितां पाहातो।
त्यावांचून आपल्या आपण कांहीं करूं शकत नाहीं। कारण

कीं तो जें करितो, तें पुत्रहि त्याप्रमाणे करितो॥ २० या
स्तव कीं बाप पुत्रावर प्रीति करितो। आणि आपण जें अ
वघें करितो, तें त्याला दाखवितो। आणि तुह्मी आश्चर्य
करावें ह्मणोन त्याहून मोठीं कामें त्याला दाखवील॥ २१ कां
तर जसा बाप मेलेल्यांस उठवितो, आणि जिवंत करितो। तसें
पुत्रहि ज्यांस इच्छितो, त्यांस जिवंत करितो॥ २२ आणखी
बाप कोणाचा न्याय ठरवीत नाहीं। परंतु सर्व न्याय पुत्राला
यासाठीं दिल्हा। २३ कीं जसा बापाचा सन्मान करितात,
तसा पुत्राचा सन्मान सर्वांनी करावा॥ जो पुत्राचा सन्मान क
रीत नाहीं। तो त्याच्या पाठविणाऱ्या बापाचा सन्मान करी
त नाहीं॥ २४ मी तुह्मास खचीत। खचीत सांगतों। कीं जो
माझी गोष्ट ऐकतो। आणि माझ्या पाठविणाऱ्यावर विश्वास
ठेवितो, त्याला सर्वकाळचें जिवन आहे। आणि तो दंडांत
येणार नाहीं। परंतु तो मरणापासून जिवनाकडे पार गेला
आहे॥ २५ मी तुह्मास खचीत। खचीत सांगतों। कीं अशी वेळ
येती, आणि आतां आहे। कीं तींत मेलेले जे, ते देवाच्या पुत्रा
ची वाणी ऐकतील। आणि ऐकणारे जिवंत होतील॥ २६ का
रण कीं जसें बापाला आपल्यामध्यें जिवन आहे। तसें त्या
ने पुत्रालाहि आपल्यामध्यें जिवन होणें दिल्हें आहे॥ २७ आ
णि तो माणसाचा पुत्र आहे, यास्तव न्याय ठरविण्याचा अ
धिकारहि त्याला दिल्हा आहे॥ २८ यावरून तुह्मी आश्च
र्य करूं नका। कां तर वेळ येती। कीं तींत सर्व जे मस
णांमध्यें। ते त्याची वाणी ऐकतील। २९ आणि ज्यानी चां
गलीं केलीं। ते जिवनाच्या पुनरुठण्यास। आणि ज्यानी वाईट
आचरलीं, ते दंडाच्या पुनरुठण्यास, बाहेर येतील॥ ३० मी
आपल्या आपण कांहीं करायास शक्तिमान नाहीं। जसें ऐक
तों, तसा न्याय ठरवितों। आणि मी आपली इच्छा शोधी
त नाहीं। परंतु बाप ज्याने मला पाठविलें, त्याची इच्छा।
यास्तव माझें ठरविणें न्यायी आहे॥ ३१ जर मी आपणा

विषयीं साक्ष देतों। तर माझी साक्ष खरी नाहीं॥ ३२ जो मजविषयीं साक्ष देतो। असा दुसरा आहे। आणि जी साक्ष तो मजविषयीं देतो। ती खरी आहे। हें मला कळलें॥ ३३ तुह्मीं योहान्नाजवळ पाठविलें। आणि त्याने खरेपणाची साक्ष दिल्ही॥ ३४ तथापि मी माणसांपासून साक्ष घेत नाहीं। परंतु तुह्मी तारले जावें। ह्मणोन हीं सांगतों॥ ३५ तो पाजळीत व प्रकाशमान दिवा होता। आणि त्याच्या उजेडांत तुह्मी हर्षायास घटकाभर मान्य होतां॥ ३६ परंतु योहान्नाच्या पेक्षां मला मोठी साक्ष आहे। कारण कीं जीं कामें पूर्ण करायास बापाने मला दिल्हीं तीं। जीं कामें मी करितों। तीं मजविषयीं साक्ष देतात। कीं बापाने मला पाठविलें आहे॥ ३७ आणि बाप ज्याने मला पाठविलें, त्याने स्वतां मजविषयीं साक्ष दिल्ही॥ तुह्मी त्याची वाणी कधींहि ऐकिली नाहीं, आणि त्याचें स्वरूप पाहिलें नाहीं॥ ३८ आणि त्याची गोष्ट तुह्मामध्यें राहातां, हें तुह्मास नाहीं। कां कीं त्याने ज्याला पाठविलें, त्याजवर तुह्मी विश्वास न ठेवितां॥ ३९ तुह्मी धर्मलेखांची झडती करा। कां तर त्यांकडून सर्वकाळचें जिवन तुह्मास आहे, असें तुह्मास वाटतें। आणि जे मजविषयीं साक्ष देतात। ते तेच आहेत॥ ४० परंतु तुह्मास जिवन व्हावायासाठीं तुह्मी मजकडे येण्यास न इछितां॥ ४१ मी माणसांपासून गौरव घेत नाहीं॥ ४२ परंतु म्या तुह्मास जाणलें, कीं देवावरची प्रीति तुह्मामध्यें नाहीं॥ ४३ मी आपल्या बापाच्या नांवाने आलों। तथापि तुह्मी मला न घेतां। जर दुसरा आपल्या नांवाने येतो। तर त्याला तुह्मी घ्यास॥ ४४ तुह्मी येकमेकांपासून गौरव घेत असतां। आणि जें गौरव केवळ देवाजवळ। तें न शोधितां। विश्वास धरूं कसें शकतां? ४५ मी बापाजवळ तुह्मावर दोष ठेवीन, असें कल्पुं नका। तुह्मावर दोष ठेवणारा असा आहे। तो मोशे। ज्यावर तुह्मी आशा ठेविली तो॥ ४६ का

कारण कीं जर तुह्मी मोश्यावर विश्वास ठेविला असता।
तर मजवर विश्वास ठेविला असता। कां तर मोश्याने म
जविषयीं लिहिलें॥ ४७ आणि जर तुह्मी त्याच्यां लेखां
वर विश्वास न ठेवितां, तर माझ्यां गोष्टींवर विश्वास क
सा ठेवाल? ※

पर्व ६ ॥ १ यांनंतर येशू। गालिलाचा तोच तिबेर
यासाचा समुद्र, याच्या पलिकडे गेला॥ २ आणि मोठा
समुदाय त्याच्या मागें गेला। कां तर त्याचे चमत्कार जे
त्याने दुखणाइतांवर केले, ते त्यांनी पाहिले होते॥ ३ ते
व्हां येशू येका डोंगरावर चढला। आणि तेथे आपल्यां
शिष्यांसुद्धां बसला होता॥ ४ आणि वल्हांडण। यहूद्यां
चा येक सण जवळ होता ※ ५ यास्तव येशू डोळे
वर करून। आणि मोठ्या समुदायाला आपल्याजवळ
येतां पाहून। फिलीप्पसाला ह्मणतो। ह्यांनी खावें ह्म
णोन आह्मी भाकरी कोठून विकत घेऊं? ६ परंतु त्या
ने त्याची परिक्षा करून हें ह्मटलें, कारण कीं आपण का
य करणार होता। हें त्याला कळलें होतें॥ ७ फिली
प्पसाने त्याला उत्तर दिल्हें, [कीं] यांतील प्रत्येकाने कांहीं
थोडी घ्यावयासाठीं, दोन शें पावल्यांच्या भाकरी त्यांस पु
रणार नाहींत॥ ८ त्याच्यां शिष्यांतून येक। जो शिमोन
पेत्रसाचा भाउ, आंद्रेयास, तो त्याला ह्मणतो। ९ ये
थे येक तरुण आहे। त्याजवळ जवांच्या पांच भाकरी,
आणि दोन मासोळ्या आहेत। परंतु इतक्यांस तीं काय
आहेत? १० तेव्हां येशू बोलला, लोकांस बसवा॥ आणि
त्या जाग्यांत बहूत चार होती॥ यास्तव माणसें, गणती
ने सुमारें पांच हजार, बसलीं॥ ११ तेव्हां येशूने त्या भा
करी घेऊन, आणि आभारस्तुती करून, शिष्यांजवळ वां
टल्या। आणि शिष्यांनी बसणाऱ्यांस [वांटल्या।] आणि त्यां
मासोळ्यांतून जितकें त्यांनी इछिलें तें तसेंच॥ १२ आ

णि ते तृप्त जाल्यावर। तो आपल्यां शिष्यांस ह्मणतो।
कांहीं फुकट न जावें। ह्मणोन उरलेले तुकडे गोळा क
रा॥ १३, यास्तव त्यानी गोळा केले। आणि जवांच्या
पांच भाकरींचे जे तुकडे जेवणाऱ्यांपुढें राहिलें। त्यांच्या
बारा करंड्यां भरल्यां ॥ १४ यावरून। येशूने जो चम
त्कार केला, तो त्यां माणसानी पाहून ह्मटलें। कीं जो
भविष्यभाषी जगांत यावयाचा, तो निश्चयें हाच आहे॥
१५ यास्तव। येशूला राजा करावा ह्मणोन ते येऊन त्या
ला बळाने धरणार आहेत। हें तो जाणून फिरोन डोंग
रावर येकला निघून गेला॥
१६ मग संध्याकाळ जाल्यावर, त्याचे शिष्य खालीं समुद्राजवळ
गेले। १७ आणि तारवावर चढून। समुद्राच्या पलिकडे कापेर्णा
ऊमास जात होते॥ तेव्हां दृतक्यांत अंधार जाला। परंतु ये
शू त्यांच्या जवळ आला नव्हता॥ १८ आणि मोठा वारा सुटून।
समुद्र उचंबळला॥ १९ तेव्हां ते सुमारें पंचवीस किंवा तीस धां
वांभर वल्हावून। येशूला समुद्रावर पायाने चालतां आणि तार
वाजवळ होतहोत असतां पाहातात। आणि ते भ्याले॥ २० प
रंतु तो त्यांस ह्मणतो, मी आहें। भिऊं नका॥ २१ तेव्हां
त्यानी त्याला हर्षेने तारवावर घेतलें। आणि जेथे जात होते।
त्या भूमीस तारूं लवकर पावलें॥
२२ दुसऱ्या दिवसीं। समुदाय समुद्राच्या पलिकडे
उभा राहिला असतां। त्यानी पाहिलें कीं येक होड
कें, ज्यावर त्याचे शिष्य चढले। त्यावांचून तेथे दुसरें नाहीं,
आणि असें कीं येशू आपल्यां शिष्यांसुद्धां त्या होडक्यावर
चढला नव्हता। परंतु त्याचे शिष्य मात्र गेले। २३ तथापि
जेथे प्रभूने आभारस्तुती केल्यावर। त्यानी भाकर खाली। त्या जा
ग्याजवळच्या तिबेरयासापासून दुसरीं होडकीं आलीं। २४ तर
समुदायाने जेव्हां पाहिलें, कीं येशू आणि त्याचे शिष्य ते
थे नाहींत; तेव्हां तेहि तारवावर चढले। आणि येशूचा शो

ध करीत कापेर्णाऊमांत आले॥ २५ मग ते त्याला समुद्रा
पलिकडे पावून। त्याला बोलले। हे राब्बी, तूं येथे के
व्हां पावलास? २६ येशू त्यांस उत्तर देण्याने बोलला, मी
तुह्मास खचीत, खचीत सांगतों। तुह्मी चमत्कार पाहिले
यासाठीं नाहीं। परंतु तुह्मी भाकरी खाऊन तृप्त जालां। या
स्तव मला शोधितां॥ २७ जें अन्न नाशवंत त्यासाठीं का
म करूं नका। परंतु जें अन्न सर्वकाळच्या जिवनासाठीं राहातें,
जें माणसाचा पुत्र तुह्मास देईल, त्यासाठीं [करा।] कीं
तर बाप जो देव। त्याने त्याजवर शिक्का केला आहे॥ २८ ते
व्हां त्यानी त्याला ह्मटलें, आह्मी देवाचीं कामें करावया
स काय करूं? २९ येशू उत्तर देण्याने त्यांस बोलला, हें
देवाचें काम करणें आहे, कीं ज्याला त्याने पाठविलें, त्याजवर
तुह्मी विश्वास ठेवावा॥ ३० यावर त्यानी त्याला ह्मटलें, आ
ह्मी पाहून तुजवर विश्वास ठेवावा। ह्मणोन तूं काय चमत्कार
करितोस? तूं काय काम करितोस? ३१ जसें लिहिलें आहे।
[कीं] त्याने आकाशांतून त्यांस भाकर खायाला दिल्ही। तसें
आमच्या पितरानी रानामध्यें मान्ना खाल्ला॥ ३२ यास्तव येशूने
त्यांस ह्मटलें, मी तुह्मास खचीत, खचीत सांगतों, आकाशांतून
ती भाकर मोशाने तुह्मास दिल्ही नाहीं। परंतु आकाशांतून
जी खरी भाकर, ती माझा बाप तुह्मास देतो॥ ३३ यास्त
व कीं जी आकाशांतून उतरती। आणि जगाला जिवन देती,
ती देवाची भाकर आहे॥ ३४ तेव्हां ते त्याला बोलले, हे प्रभू,
सर्वकाळ ती भाकर आह्मास दे॥ ३५ तेव्हां येशू त्यांस बो
लला, मी जिवनाची भाकर आहें। जो मजकडे येतो, त्या
ला भूक लागणारच नाहीं। आणि मजवर जो विश्वासतो,
त्याला कधींहि तहान लागणारच नाहीं॥ ३६ परंतु म्या
तुह्मास सांगितलें, कीं तुह्मी मला पाहिलेंच। तथापि न वि
श्वासतां॥ ३७ बापाने जो प्रत्येक मला दिल्हा। तो मजकडे ये
ईल। आणि जो मजकडे येतो। त्याला मी घालविणार

नाहींच। ३८ कां तर मी आपली इच्छा नव्हे। परंतु ज्या
ने मला पाठविलें। त्याची इच्छा पाळावयास आकाशांतून उ
तरलों॥ ३९ आणि ज्या बापाने मला पाठविलें, त्याची
इच्छा हीच आहे, कीं जें मला दिल्हें। त्यांतून म्या
कांहीं न हारवावें। परंतु म्या त्याला शेवटील दिवशीं फिरोन
उठवावें॥ ४० आणि ज्याने मला पाठविलें त्याची इच्छा ही
च आहे। कीं प्रत्येक जो पुत्राला पाहून त्याजवर विश्वास ठेवि
तो, त्याला सर्वकाळचें जिवन व्हावें। आणि शेवटील दिवशीं
म्या त्याला फिरोन उठवावें॥ ४१ यास्तव यहूद्यांनी
त्याविषयीं कुरकुर केली। कां कीं तो बोलला। मी आका
शांतून उतरलेली भाकर आहें॥ ४२ आणि ते बोलले, हा
येशू, योसेफाचा पुत्र, ज्याचा बाप व आई आह्मास कळलीं
कीं नाहींत। तर तो कसा ह्मणतो? कीं मी आकाशांतून
उतरलों॥ ४३ यास्तव येशू उत्तर देण्याने त्यांस बोलला।
तुह्मी परस्परें कुरकुर करूं नका॥ ४४ कोणी मजकडे येउं
यावांचून शकत नाहीं। कीं ज्या बापाने मला पाठविलें, त्याने
त्याला ओढावें। आणि शेवटील दिवशीं। मी त्याला फिरोन
उठवीन॥ ४५ भविष्यभाष्यांच्यांत असें लिहिलें आहे। कीं ते
सर्व देवाकडून शिकविलेले होतील। यास्तव प्रत्येक जो बा
पानवळ ऐकतो आणि शिकतो। तो मजकडे येतो॥ ४६ ह्म
णजे कोणी बापाला पाहिलें, असें नाहीं। केवळ जो बापा
जवळ असतो, त्याने बापाला पाहिलें आहे॥ ४७ मी तु
ह्मास खचीत। खचीत सांगतों। जो मजवर विश्वास ठेवि
तो। त्याला सर्वकाळचें जिवन आहे॥ ४८ मी त्या जिवनाची
भाकर आहें॥ ४९ तुमच्यां पितरांनी रानांत मान्ना खाल्ला,
तथापि ते मेले॥ ५० आकाशांतून जी भाकर उतरती। ती
हीच आहे, कीं कोणी तींतून खावें, आणि न मरावें॥
५१ जो जिववान भाकर आकाशांतून उतरली, ती मीच आ
हें॥ ह्या भाकरींतून जर कोणी खातो, तर तो सर्वकाळपर्यं

त वांचेल॥ आणखी जो भाकर मी देईन, तो माझें मा स आहे। तो जगाच्या जिवनासाठीं मी देईन ※ ५२ यास्तव यहूदी आपस्यांमध्यें भांडतां बोलले, हा [आपलें] मास आ ह्मास खायाला देण्यास कसें शकतो? ५३ यावर येशूनें त्यांस ह्म टलें, मी तुह्मास खचीत, खचीत सांगतों, जर तुह्मी मनु ष्य पुत्राचें मास न खातां, आणि त्याचें रक्त न पितां, त र तुमचें आपस्यांमध्यें जिवन नाहीं॥ ५४ जो माझें मास खातो, आणि माझें रक्त पितो, त्याला सर्वकाळचें जिवन आहे, आणि शेवटील दिवशीं मी त्याला फिरोन उठवीन॥ ५५ कारण कीं माझें मास अन्न आहे; खरें। आणि मा झें रक्त पिणें आहे, खरें॥ ५६ जो माझें मास खातो, आणि माझें रक्त पितो, तो मजमध्यें राहातो, आणि मी त्या मध्यें [राहातों]॥ ५७ जसें जिवंत बापानें मला पाठविलें, आणि मी बापाकडून वांचतों, तसें जो मला खातो, तोहि मजक डून वांचेल॥ ५८ जी भाकर आकाशांतून उतरली, ती हीच आहे। तुमच्या पितरानी मान्ना खाऊन मेले, त्या सारि खें नव्हे। जो ही भाकर खातो, तो सर्वकाळापर्यंत वांचे ल॥ ५९ कापेर्णाऊमांतील सभेंत शिकवीत असतां, त्यानें हीं ह्मटलीं ※

६० यास्तव त्याच्यां शिष्यांतून बहुतानी ऐकून ह्मटलें, ही कठीण गोष्ट आहे, ही ऐकायास कोण शक्तिमान आहे? ६१ तेव्हां त्याच्यां शिष्यानी तिजविषयीं कुरकुर केली, हें ये शू आपणांत जाणून त्यांस बोलला, हें तुह्मास अडखळवितें कीं काय? ६२ तर माणसाचा पुत्र आगोधर जेथें होता, तेथें जर त्याला चढत पाहातां, मग? ६३ जो जिवंत कर णारा, तो आत्मा आहे, मास कांहीं लाभ देत नाहीं॥ ज्या गोष्टी मी तुह्मास सांगतों, त्या आत्मा आहेत, आणि जि वन आहेत॥ ६४ परंतु जे विश्वासत नाहींत, असे कित्येक तुह्मामध्यें आहेत॥ कां तर कोण विश्वास ठेवीत नाहींत, आ

णि त्याला कोण परस्वाधीन करणार, हें येशू प्रारंभापासून
समजला होता॥ ६५ मग तो बोलला, यासाठीं म्या तुह्मास
सांगितलें, कीं कोणाचें मजकडे येणें, माझ्या बापानें त्याला
दिल्यावांचून होववत नाहीं ॐ ६६ तेव्हांपासून त्याच्यां शिष्यांतून
बहुत माघारीं गेले, आणि त्यानंतर त्यासहीत हिंडले नाहीं
त॥ ६७ यास्तव येशू त्यां बारांस बोलला। तुह्मीहि निघा
याला इछितां कीं काय? ६८ मग शिमोन पेत्रसानें त्याला
उत्तर दिल्हें। हे प्रभू। आह्मी निघून कोणाकडे जाउं? सर्व
काळीक जिवनाच्या गोष्टी तुझ्या जवळ आहेत॥ ६९ आणि
तूं तो ख्रीस्त। जिवंत देवाचा पुत्र आहेस, हें आह्मी विश्वास
लों, आणि जाणलें आहे॥ ७० येशूनें त्यांस उत्तर दिल्हें।
[कीं] म्या तुह्मा बारांस निवडिलें की नाहीं? तथापि तुह्मा
मध्यें येक फितुरी आहे॥ ७१ तेव्हां यहूदा। ईस्कारयोते
शिमोनाचा [पुत्र] जो, त्याविषयीं तो बोलला। कारण कीं
हा त्यां बारांमध्यें येक असतां। त्याला परस्वाधीन करणा
र होता ॐ

पर्व ७ ॥ १ आणि यानंतर येशू गालिलांत हिंडला।
कारण कीं यहूदी त्याला जिवें मारायास ह्मटले, यास्तव
त्यानें यहूदांत हिंडायास इछिलें नाहीं॥ २ तेव्हां मंडप घालणें,
हा यहूद्यांचा सण जवळ होता॥ ३ यास्तव त्याचे भाऊ त्याला
बोलले। तूं येथून ढळून यहूदांत यासाठीं जा, कीं जीं का
में तूं करितोस। तीं तुझ्यां शिष्यानींहि पाहावीं॥ ४ कार
ण कीं कोणी, आपण प्रगटांत व्हावयास ह्मटतांना, गुप्तां
त कांहीं करीत नाहीं॥ जर तूं हीं करितोस, तर आपणा
स जगाला दाखेव॥ ५ कां कीं त्याच्यां भावानींहि त्याजव
र विश्वास ठेविला नाहीं॥ ६ यास्तव येशू त्यांस ह्मणतो। मा
झा काळ आझून आला नाहीं। परंतु तुमचा काळ सर्वदां
सिद्ध आहे॥ ७ जग तुमचा द्वेष करूं शकत नाहीं। परंतु
माझा द्वेष करितें। का कीं त्याचीं कामें वाईट आहेत। अ

सो मी त्याविषयीं साक्ष देतों॥ ८ तुह्मी या सणास वर जा।
माझा काळ अद्याप पूर्ण जाला नाहीं। यास्तव मी इतक्यांत या
सणास वर जात नाहीं॥ ९ आणि तो त्यांस हीं बोलून गा
लिलांत राहिला ※ १० मग त्याचे भाऊ वर गेल्यानंतर
तोही प्रगटरूपें नव्हे, परंतु गुप्तांत असा सणास वर गेला॥
११ यावर यहूदी सणांत त्याला शोधून बोलले। तो कोठे
आहे? १२ मग समुदायांमध्यें त्याजविषयीं बहुत कुजबूज
जाली। कित्येक तर बोलले। कीं तो चांगला आहे। आणि
दुसरे बोलले। नव्हे, परंतु तो जनाला ठकवितो॥ १३ त
थापि यहूद्यांच्या भयामुळें, कोणी त्याविषयीं उघडें बोल
ला नाहीं ※

१४ आणि इतक्यांत सणाचा मध्य असतां, येशूने
वर देवळांत जाऊन शिकविलें॥ १५ तेव्हां यहूदी आ
श्चर्य करून बोलले। हा शिकला नसतां अक्षरें कसीं जाणतो॥
१६ येशूने त्यांस उत्तर देतांना ह्मटलें, माझा उपदेश तो
माझा नव्हे, परंतु ज्याने मला पाठविलें त्याचा॥ १७ त्याच्या
इच्छेप्रमाणें करायास जर कोणी मान्य आहे, तर माझा उ
पदेश कसा, देवापासून आहे। किंवा मी आपल्या आपण बो
लतों। याविषयीं तो समजेल॥ १८ जो आपल्या आपण बो
लतो, तो आपलें गौरव शोधितो। परंतु जो आपल्या
पाठविणाऱ्याचें गौरव शोधितो। तो खरा आहे। आणि
त्यामध्यें अन्याय नाहीं॥ १९ मोश्याने तुह्मास नेमशास्त्र दि
लें कीं नाहीं? परंतु तुह्मामधील कोणी तें नेमशास्त्र पा
ळीत नाहीं॥ तुह्मी मला जिवें मारायास कां पाहातां? २० स
मुदाय उत्तर देण्याने बोलला, तुला भूत लागलें। तुला जि
वें मारायास कोण पाहातो? २१ येशूने उत्तर देतांना त्यां
स ह्मटलें, म्या येक काम केलें। आणि तुह्मी सर्व आश्चर्य
करितां। २२ यावरून [ह्मणतों।] मोश्याने तुह्मास सुंता दि
ली। ह्मणजे मोश्यापासून असें नव्हे, परंतु पितरांपासून। आ

णि तुह्मी शाब्बाथांत माणसाची सुंता करितां॥ २३ मोशा
चें नेमशास्त्र मोडलें न जावयाकरितां। जर माणुस शाब्बाथां
त सुंता घेतो, तर म्या शाब्बाथांत माणसाला आगदी निरो
गी केलें, यास्तव तुह्मी मजवर रागें भरतां कीं का
य? २४ तोंडाप्रमाणें न्याय ठरवुं नका। परंतु यथार्थ न्या
य ठरवा॥ २५ यास्तव यरूशलेमकरांतून कित्येकांनी ह्मटलें।
ज्याला जिवें मारायास पाहातात। तो हाच आहे कीं नाहीं?
२६ आणि पाहा। तो उघडें बोलतो, आणि ते त्याला कां
हीं ह्मणत नाहींत। हाच ख्रीस्त आहे खरें। हें अधिकारी
निश्चयें समजतात काय? २७ तथापि हा कोठून आहे अ
सा आह्मास कळला। परंतु जेव्हां ख्रीस्त येतो, तेव्हां तो को
ठून आहे। हें कोणी जाणत नाहीं॥ २८ यावर येशू दे
वळांत शिकवितांना ओरडत बोलला, तुह्मी मला जाणतां।
आणि मी कोठून आहें। हें जाणतां॥ तथापि मी आपल्या आ
पण आलों नाहीं। परंतु ज्याने मला पाठविलें। तो खरा आ
हे। त्याला तुह्मी न जाणतां॥ २९ परंतु मी त्याला जा
णतों, कारण कीं मी त्याजवळून आहें। आणि त्याने मला
पाठविलें आहे॥ ३० यावर त्यांनी त्याला धरायास पाहिलें।
परंतु। त्याचा काळ तोंपर्यंत आला नव्हता। यास्तव कोणी
त्यावर हात टाकिला नाहीं॥ ३१ तेव्हां समुदायांतून बहु
तांनी त्याजवर विश्वास ठेविला आणि ह्मटलें। कीं जेव्हां ख्री
स्त येतो। तेव्हां ह्याने जे चमत्कार केले। त्यांहून अधीक
करील कीं काय? ३२ समुदाय त्याविषयीं असी कुजबूज
करीत होते। हें फारिश्यांनी ऐकिलें। मग फारिशी व मुख्य उ
पाध्ये, यांनी त्याला धरावयास हस्तक पाठविले॥ ३३ या
स्तव येशू त्यांस बोलला, आद्याप थोडका वेळ मी तुह्मा
सहीत आहें। मग ज्याने मला पाठविलें, त्याकडे मी निघू
न जातों॥ ३४ तुह्मी मला शोधाल। परंतु मी तुह्मास
सांपडणार नाहीं। आणि जेथे मी आहें, तेथें तुह्मी येऊं

न शकतां॥ ३५ त्यावर यहूदी आपणांमध्यें बोलले। हा को
ठे असा जाणार। कीं आह्मास सांपडणार नाहीं? तो हेल्ला
स्यांतील फांकलेल्यांजवळ जाऊन। हेल्लाण्यांस उपदेशणार
आहे कीं काय? ३६ तुह्मी मला शोधाल। परंतु [मी] तु
ह्मास सांपडणार नाहीं। आणि जेथे मी आहें, तेथे तुह्मी
येउं न शकतां। अशी गोष्ट त्याने ह्मटली ही काय? ※
३७ मग सणाच्या शेवटल्या मोठ्या दिवशीं येशू उभा राहून
ओरडत बोलला। जर कोणी तान्हेला, तर तो मजकडे येऊन
पिवो॥ ३८ जसें धर्मलेखाने ह्मटलें तसें। जो मजवर विश्वास
तो। त्याच्या पोटांतून जीववान पाण्याच्या नद्या वाहातील॥
३९ तर त्याजवरचे विश्वासणारे जो आत्मा पावणार होते। त्या
विषयीं त्याने ह्मटलें। कारण कीं। येशू तोंपर्यंत गौरविला
नव्हता यास्तव। तोंपर्यंत पवित्र आत्मा [दिल्हा] नव्हता ※
४० यावर समुदायांतून बहुतानी ही गोष्ट ऐकून ह्मटलें।
हा तो भविष्यभाषी आहे खरें॥ ४१ दुसऱ्यानी ह्मटलें। हा
तो ख्रीस्त आहे। परंतु दुसऱ्यानी ह्मटलें। कां? ख्रीस्त गा
लीलांतून येतो काय? ४२ ख्रीस्त दाविदाच्या बिजांतून।
आणि बेथलेहेम गांव। जेथे दावीद होता। तेथून येतो।
असें धर्मलेखाने सांगितलें कीं नाहीं? ४३ यास्तव त्यावि
षयीं समुदायांत फूट जाली॥ ४४ आणि त्यांमधील कित्येका
नी त्याला धरायास इछिलें। परंतु कोणी त्यावर हात टा
किले नाहींत ※ ४५ यावर हस्तक मुख्य उपाध्यां व फारिश्यां
जवळ आले। मग हे त्यांस बोलले। तुह्मी त्याला कां न आणि
लें? ४६ हस्तकानी [असें] उत्तर दिल्हें। या माणसासारिखा
कोणी माणुस कधींहि बोलला नाहीं॥ ४७ यावर फारिश्यानी
त्यांस उत्तर दिल्हें। [कीं] तुह्मीहि ठकविले गेलां काय?
४८ अधिकाऱ्यांमधून। किंवा फारिश्यांमधून कोणी त्याजवर
विश्वासला काय? ४९ परंतु हें जन नेमशास्त्र न जाणतें।

हे शापग्रस्त आहेत ॥ ५० निकदेमस । जो रात्रीं ह्याजवळ
आला । तो त्यांमधील येक असतां । त्यांस बोलला , ५१ पू
र्वीं माणसाचें ऐकिलें आणि त्यानें जें केलें तें जाणलें ।
यांवांचून आमचें नेमशास्त्र त्याचा न्याय ठरवितें काय ? ५२ त्या
नीं उत्तर देतांना त्याला ह्मटलें । तूंहि गालिलांतील आ
हेस कीं काय ? शोध करून पाहा । कां तर गालिलांतून
भविष्यभाषी उत्पन्न होत नाहीं ॥ ५३ तेव्हां प्रत्येक आप
आपल्या घरास गेला ❋

प. ८ ॥ १ तेव्हां येशू जाईतझाडांच्या डोंगरास गेला ॥
२ नंतर सकाळीं तो देवळांत फिरोन पावला । मग सगळा
लोक त्याजवळ आला । आणि त्यानें बसून त्यांस शिकविलें ॥
३ तेव्हां पंडीत आणि फारिशी व्यभिचारांत सांपडलेली बा
यको त्याजवळ आणितात । मग तिला मध्यें ठेवून । ४ त्याला
बोलतात । हे गुरू , ही बायको व्यभिचार करीत । त्याच दो
षांत सांपडली ॥ ५ आणि मोशानें नेमशास्त्रांत आह्मास आ
ज्ञा दिल्ही , कीं अशांस धोंड्यानीं मारावें । तर तूं काय सां
गतोस ? ६ परंतु त्यानीं त्याला झट लावितां । आपणांस त्या
वर दोष ठेवायाचें [कांहीं] व्हावें ह्मणोन हें ह्मटलें । ते
व्हां येशूनें खालीं वोणवून बोटानें भुयीवर लिहिलें ॥ ७ तथा
पि ते त्याला पुसत राहातां । तो उठून त्यांस बोलला ।
जो तुह्मामध्यें पापाविरहीत , तो पहिला तिजवर धोंडा टा
को ॥ ८ मग त्यानें दुसरेदां खालीं वोणवून भुयीवर लि
हिलें ॥ ९ तेव्हां ते ऐकून आणि भावानें निशा पटलेले
होऊन । वृद्धापासून आरंभून शेवटल्यापर्यंत येकामागें येक अ
से निघाले । आणि मध्यें उभ्या राहिलेल्या बायकोसुद्धां येशू
येकला सोडला गेला ॥ १० तेव्हां येशू उठून आणि बाय
कोवांचून कोणाला न पाहून । तिला बोलला , हे स्त्री । ते तु
जवर दोष ठेवणारे कोठे आहेत ? कोणी तुला दंडलें नाहीं कीं

काय? ११ मग ती बोलली। हे प्रभू। कोणी नाहीं॥ ते
व्हां येशू तिला बोलला मीहि तुला दंडीत नाहीं। तूं जा।
आणि यापुढें पाप करूं नको ※

१२ यांवर येशू त्यांस फिरोन बोलला। कीं मी जगाचा
उजेड आहें। जो मला अनुसरतो, तो अंधारांत चालणार
च नाहीं। परंतु जिवनाचा उजेड त्याला होईल॥ १३ यास्त
व फारिशी त्याला बोलले। तूं आपणाविषयीं साक्ष देतोस।
तुझी साक्ष खरी नाहीं॥ १४ येशू उत्तर देण्याने त्यांस बो
लला। जरीं मी आपणाविषयीं साक्ष देतों। तथापि माझी सा
क्ष खरी आहे। कां कीं मी कोठून आलों आणि कोठे जा
तों। हें मला कळलें। परंतु मी कोठून येतों आणि कोठे जा
तों, हें तुह्मास कळलें नाहीं॥ १५ तुह्मी देहाप्रमाणे न्या
य ठरवितां। मी कोणाचा न्याय ठरवीत नाहीं॥ १६ आ
णखी जर मी न्याय ठरवितों। तथापि माझें ठरविणें खरें
आहे। कां कीं मी येकला नाहीं। परंतु मी आणि बाप ज्या
ने मला पाठविलें, तो आहे॥ १७ आणि तुमच्या नेमशास्त्रां
त असें लिहिलें। कीं दोन माणसांची साक्ष खरी आहे॥
१८ मी आपणाविषयीं साक्ष देणारा असा आहें। आणि बा
प ज्याने मला पाठविलें। तो मजविषयीं साक्ष देतो॥ १९ या
स्तव ते त्याला बोलले, तुझा बाप कोठे आहे? येशूने उत्त
र दिल्हें। कीं तुह्मी मला व माझ्या बापालाहि न जाणलें॥
जर तुह्मी मला जाणलें असतें। तर माझ्या बापाला जाणलें
असतें॥ २० येशू देवळांत शिकवीत असतां, ह्या गोष्टी भां
डारांत बोलला। आणि त्याचा काळ तोंपर्यंत आला नव्हता।
यास्तव कोणी त्याला धरिलें नाहीं ※

२१ यावर येशू त्यांस फिरोन बोलला, मी निघून जा
तों। आणि तुह्मी मला शोधाल। परंतु आपल्या पापांत म
राल। जेथे मी जातों। तेथे तुह्मी येउं न शकतां॥ २२ या
स्तव यहूदी बोलले। काय? तो आपणाला जिवें मारील। या

स्तव बोलतो? जेथे मी जातों। तेथे तुह्मी येऊं न शकतां॥
२३ आणि त्याने त्यांस ह्मटलें। तुह्मी खालचे आहां। मी
वरचा आहें॥ तुह्मी ह्या जगाचे आहां। मी ह्या जगाचा
नाहीं॥ २४ यास्तव मी तुह्मास बोललों। कीं तुह्मी आपल्यां
पापांमध्यें मराल। कां कीं तुह्मी जर न विश्वासतां। कीं मी
[तो] आहें। तर तुह्मी आपल्यां पापांमध्यें मराल॥ २५ या
स्तव त्यानी त्याला ह्मटलें। तूं कोण आहेस? तेव्हां येशूने त्यां
स ह्मटलें। जें पहिल्याने तुह्मास सांगत आलों तेंच॥ २६ तु
ह्माविषयीं बोलायाचीं आणि न्याय ठरवायाचीं मला बहुत आ
हेत। परंतु ज्याने मला पाठविलें। तो खरा आहे। आणि म्या
त्याजवळ जीं ऐकिलीं। तीं मी जगास सांगतों॥ २७ त्याने
त्यांस बापाविषयीं ह्मटलें। असें ते समजले नाहींत॥ २८ या
वर येशूने त्यांस ह्मटलें। जेव्हां तुह्मी माणसाचा पुत्र उंच
कराल। तेव्हां जाणाल। कीं मी [तो] आहें। आणि मी आ
पल्या आपण कांहीं करीत नाहीं। परंतु जसें माझ्या बापा
ने मला शिकविलें। तीं मी बोलतों॥ २९ आणि ज्याने मला
पाठविलें। तो माझ्या सहीत आहे। बापाने मला येकलें सो
डलें नाहीं। कां कीं जीं त्याला आवडतीं। तीं मी सर्वदा
करितों ※

३० तो हीं बोलत असतां बहुतानी त्याजवर विश्वास ठेवि
ला॥ ३१ यास्तव ज्या यहूद्यानी त्यावर विश्वास ठेविला। त्यां
स येशू बोलला। जर तुह्मी माझ्या गोष्टींत राहातां। तर
तुह्मी माझे शिष्य आहां खरें। ३२ आणि तुह्मी खरेपण जाणा
ल। आणि खरेपण तुह्मास मोकळें करील॥ ३३ त्यानी त्या
ला [असें] उत्तर दिल्हें। आह्मी आब्राहामाचें बीज आहों। आ
णि कधींहि कोणासीं दासपणांत नव्हतों। तुह्मी मोकळे व्हा
ल। असें तूं कसें ह्मणतोस? ३४ येशूने त्यांस [असें] उ
त्तर दिल्हें। मी तुह्मास खचीत। खचीत सांगतों। जो कोणी
पाप करितो। तो पापाचा दास आहे॥ ३५ आणि दास स

३५ घरांत राहात नाहीं। पुत्र सर्वकाळ राहातो॥
३६ यास्तव जर पुत्र तुह्मास मोकळें करील, तर तुह्मी नि
श्चयें मोकळे व्हाल॥ ३७ तुह्मी आब्राहामाचें बीज आहां,
हें मला कळलें। तथापि, माझी गोष्ट तुह्मांत ठिकाण पावत
नाहीं, यास्तव तुह्मी मला जिवें मारायास पाहातां॥ ३८ म्या
आपल्या बापाजवळ जें पाहिलें, तें बोलतों। तुह्मीहि तर आ
पल्या बापाजवळ जें पाहिलें, तें करितां॥ ३९ ते उत्त
र देण्याने त्याला बोलले। आब्राहाम आमचा बाप आहे॥ ये
शू त्यांस बोलतो, जर तुह्मी आब्राहामाचीं लेंकरें असतां।
तर आब्राहामाचीं कामें केलीं असतीं ४० परंतु आतां।
म्या जें खरेपण देवाजवळ ऐकिलें। तें तुह्मास बोललों, अ
शा माणसाला, मला जिवें मारायास पाहातां। आब्राहामानें असें
केलें नाहीं॥ ४१ तुह्मी आपल्या बापाचीं कामें करितां॥
यावर ते त्याला बोलले। आह्मी शिंदळकीपासून न जन्मलों।
आह्मास येक बाप, तो देव आहे॥ ४२ यास्तव येशू त्यांस
बोलला। जर देव तुमचा बाप असता। तर तुह्मी मजवर प्रीति
केली असती। कारण कीं मी देवापासून निघून आलों।
आणखी आपल्या आपण आलोंहि नाहीं। परंतु त्यानें म
ला पाठविलें आहे॥ ४३ तुह्मी माझें बोलणें कशाकरितां
न समजतां? कारण कीं माझी गोष्ट तुह्मी ऐकायास शक्तिमा
न नव्हां॥ ४४ तुह्मी द्याबलस बापापासून आहां। आ
णि तुमच्या बापाच्यां लोभांप्रमाणे करायास तुह्मी इछितां॥
तो प्रारंभापासून नरहिंसक जाला। आणि त्यामध्यें खरेपण
नाहीं, यास्तव तो खरेपणांत उभा टिकला नाहीं॥ जेव्हां तो खो
टें बोलतो। तेव्हां तो आपलीं जीं यांतून बोलतो। कां तर
तो लबाड। आणि तीचा बाप आहे॥ ४५ परंतु मी तु
ह्मास खरेपण बोलतों। यास्तव तुह्मी मजवर विश्वास न ठे
वितां॥ ४६ मला पापाविषयीं निशा तुह्मामधील कोण देतो?
आणि जर मी खरेपण बोलतों। तर तुह्मी कशामुळें मजवर

विश्वास न ठेवितां? ४७ जो देवाचा आहे, तो देवाच्या गो
ष्टी ऐकतो॥ ह्यावरून तुह्मी न ऐकतां। कीं तुह्मी देवा
चे नव्हां॥ ४८ यावर यहूदी उत्तर देतांना त्याला बोलले।
तूं शोमरोनी आहेस। आणि तुला भूत आहे। हें आह्मी ठी
क न ह्मणतों कीं काय? ४९ येशूने [असें] उत्तर दिल्हें।
मला भूत नाहीं। परंतु मी आपल्या बापाचा सन्मान करि
तों। आणि तुह्मी माझा अपमान करितां॥ ५० तथापि मी
आपलें गौरव शोधीत नाहीं। जो शोधितो। आणि न्याय
ठरवितो असा [येक] आहे॥ ५१ मी तुह्मास खचीत। ख
चीत सांगतों। जर कोणी माझी गोष्ट पाळील, तो सर्वका
ळापर्यंत मरण पाहाणारच नाहीं॥ ५२ यावर यहूदी त्याला
बोलले। आतां। तुला भूत आहे। ह्मणोन आह्मास कळलें।
आब्राहाम व भविष्यभाषी मेले, तथापि तूं बोलतोस। जर कोणी
माझी गोष्ट पाळील। तर तो सर्वकाळापर्यंत मरण चाखणार
च नाहीं॥ ५३ आमचा पितर, आब्राहाम। यापेक्षां तूं थोर
आहेस काय? तोच मेला। आणि भविष्यभाषी मेले। तूं आ
पणाला कोण करितोस? ५४ येशूने [असें] उत्तर दिल्हें।
जर मी आपणाला गौरवितों। तर माझें गौरव कांहीं ना
हीं॥ जो मला गौरवितो तो माझा बाप। त्याविषयीं तुह्मी
ह्मणतां। की तो आमचा देव आहे। ५५ तथापि तुह्मी त्या
ला न जाणलें। परंतु मला तो कळला॥ आणि तो मला न
कळला। असें जर मी ह्मणेन, तर तुमच्या सारिखा मी ल
बाड होईन। परंतु तो मला कळला। आणि त्याची गोष्ट
मी पाळितों॥ ५६ तुमचा बाप। आब्राहाम। माझा दिवस
पाहायास हर्षीत जाला, आणि पाहून आनंदला॥ ५७ यावर
यहूदी त्याला बोलले। तूं आजून पन्नास वर्षांचा नाहींस।
तर त्वां आब्राहामाला पाहिलें [काय?] ५८ येशू त्यांस बो
लला। मी तुह्मास खचीत, खचीत सांगतों। आब्राहाम जा
ल्यापूर्वीं मी आहें॥ ५९ यावर त्यांनी त्याजवर धोंडे घ्यां

कायास उचलिले। परंतु येशू लपाला। आणि त्यांच्या मधू
न जाऊन देवळांतून निघाला। आणि तसाच तेथून गेला ※
पर्व ९॥ १ मग पुढें जाऊन जन्मांध माणुस पाहिला॥
२ आणि त्याचे शिष्य त्याला विचारितां बोलले। हे राब्बी।
ज्या पापामुळें हा आंधळा जन्मला। तें कोणी केलें। याने।
किंवा याच्यां आईबापानी? ३ येशूने उत्तर दिल्हें। [कीं]
याने आणि याच्यां आईबापानीहि पाप न केलें। परंतु या
कडून देवाचीं कामें प्रगट व्हावीं यामुळें॥ ४ जोपर्यंत दिव
स आहे। तोंपर्यंत माझ्या पाठविणाऱ्याचीं कामें मला केलीं पा
हिजेत। रात्र येती। तेव्हां कोणाला काम करायास शक्ती ना
हीं॥ ५ मी जगांत आहें। तोंपर्यंत मी जगाचा उजेड आ
हें॥ ६ तो हीं बोलून भुयीवर थुंकला। मग त्याने थुंक्या
ने चिखल केला। आणि तो चिखल त्या आंधळ्याच्यां डोळ्यां
वर लेपिला। ७ नंतर त्याला ह्मटलें, जा। शिलोहामाच्या त
ळ्यांत धू॥ हा [शिलोहाम] ह्मणजे पाठविलेला॥ यास्तव तो गे
ला, आणि धुवून पाहात आला ※ ८ यावर शेजारी आ
णि ज्यानी त्याला पूर्वीं पाहिलें कीं आंधळा होता। ते बोल
ले, जो बसत आणि भीक मागत होता, तो हाच कीं ना
हीं? ९ कित्येक बोलले, कीं तोच आहे। आणि दुसरे [बो
लले]। कीं त्याच्या सारिखा आहे। [परंतु] तो बोलला, कीं मी
[तोच] आहें॥ १० यास्तव त्यानी त्याला ह्मटलें। तुझे डोळे
कसे उघडले? ११ तो उत्तर देतांना बोलला। येशू ह्मट
लेल्या माणसाने चिखल केला। आणि माझ्यां डोळ्यांवर लेपू
न मला सांगितलें। तूं शिलोहामाच्या तळ्यास जा। आणि धू।
तेव्हां जाऊन व धुवून मला दिसलें॥ १२ यावर त्यानी त्या
ला ह्मटलें। तो कोठें आहे? तो बोलतो, मला ठाऊक नाहीं ※
१३ जो पूर्वीं आंधळा। त्याला फारिश्यांजवळ आणिता
त॥ १४ आणि जेव्हां येशूने चिखल केला व त्याचे डोळे
उघडले। तेव्हां शाब्बाथ होता॥ १५ यास्तव आणखी। त्या

ला दिसणें कसें जालें. हें फारिश्यांनी त्याला पुसलें॥ आणि
तो त्यांस बोलला. त्यानें माझ्यां डोळ्यांवर चिखल लाविला.
मग म्यां धुतलें. आणि मी पाहातों॥ १६ यास्तव फारिश्यां
तून कित्येक बोलले. हा माणुस देवापासून नाहीं. कां तर तो
शाब्बाथ पाळीत नाहीं॥ दूसरे बोलले जो पापी माणुस. तो
येवढे चमत्कार करूं कसा शकतो? तेव्हां त्यांमध्यें फूट जा
ली॥ १७ फिरोन ते त्या आंधळ्याला ह्मणतात, त्यानें तु
झे डोळे उघडले. ह्मणोन त्याविषयीं तूं काय बोलतोस? मग
त्यानें ह्मटलें. कीं तो भविष्यभाषी आहे॥ १८ तेव्हां यहूद्या
नी त्या दृष्टी पावलेल्याच्यां आईबापांस बोलाविलें. तोंपर्यंत
विश्वास धरिला नाहीं. कीं तो आंधळा होता आणि दृष्टी पा
वला॥ १९ मग त्यांनी त्यांस विचारितां ह्मटलें. तुमचा पुत्र
जो जन्मांध होता. ह्मणोन तुह्मी ह्मणतां. तो हाच आहे
कीं काय? तर तो आतां कसा पाहातो? २० त्याचीं आ
ईबापें त्यांस उत्तर देण्यानें बोललीं. हा आमचा पुत्र आ
हे हें. आणि जन्मांध होता. हें आह्मास कळलें॥ २१ परं
तु तो आतां कसा पाहातो, हें आह्मास कळलें नाहीं. किं
वा त्याचे डोळे कोणी उघडले, हें आह्मास कळलें नाहीं.
त्याला प्रौढपण आहे, त्याला विचारा. तो आपल्याविषयीं सां
गेल॥ २२ त्याच्यां आईबापानी यहूद्यांचें भय धरिलें, या
स्तव असीं ह्मटलीं॥ कारण कीं हा ख्रीस्त असें जर कोणी
पत्करील. तर तो सभेंतून घालविला जावा, असा यहूद्या
नी तितक्यांत येकोपा केला होता॥ २३ ह्यावरून त्याच्यां आ
ईबापानी ह्मटलें. कीं त्याला प्रौढपण आहे. त्याला विचारा॥
२४ यास्तव जो माणुस आंधळा होता, त्याला त्यानी दुस
ऱ्यानें बोलाविलें, आणि त्याला ह्मटलें. देवाला गौरव दे. हा मा
णुस पापी आहे. हें आह्मास कळलें॥ २५ यावर तो उत्त
र देतांना बोलला. पापी कीं नाहीं. हें मला कळलें ना
हीं. येक मला कळलें, कीं मी आंधळा असून, आतां पाहा

तों॥ २६ मग त्यानी त्याला फिरोन ह्मटलें, त्याने तुला का
य केलें? त्याने तुझे डोळे कसे उघडिले? २७ त्याने त्यां
स उत्तर दिल्हें। म्या आतांच तुह्मास सांगितलें, आणि तु
ह्मी ऐकिलें नाहीं। फिरोन ऐकायास कां इछितां? तुह्मीहि
त्याचे शिष्य होउं इछितां कीं काय? २८ यावर ते त्याला निं
दितांना बोलले, तूं त्याचा शिष्य आहेस, परंतु आह्मी मो
श्याचे शिष्य आहों॥ २९ देव मोश्याशीं बोलला। हें आ
ह्मास ठाऊक आहे। परंतु हा माणुस कोठला आहे। हें आ
ह्मास ठाऊक नाहीं॥ ३० तो माणुस उत्तर देण्याने त्यांस
बोलला। तर यावरुन आश्चर्य आहे। कीं त्याने माझे डोळे उघ
डिले असतांही, तो कोठला आहे। हें तुह्मास ठाऊक नाहीं।
३१ आणि आह्मास कळलें, कीं देव पाप्यांचें ऐकत नाहीं।
परंतु जर कोणी देवभक्त आहे। आणि त्याच्या इछेप्रमाणे
करितो। तर ह्याचें तो ऐकतो॥ ३२ कोणी जन्मांधाचे डोळे
उघडिले। असें काळांतरापासून ऐकिलें न गेलें॥ ३३ जर हा देवा
पासून नसता, तर कांहीं करूं न शकता॥ ३४ ते उ
त्तर देण्याने त्याला बोलले। तूं अगदी पापांमध्यें जन्मलास।
आणि तूं आह्मास उपदेशितोस काय! मग त्यानी त्याला बा
हेर घालविलें ※

३५ त्यानी त्याला बाहेर घालविलें, हें येशूने ऐकिलें। नंत
र त्याला पावून त्याला ह्मटलें। तूं देवाच्या पुत्रावर विश्वास ठेवि
तोस [कीं काय?] ३६ तो उत्तर देण्याने बोलला। हे प्रभू, म्या
त्याजवर विश्वास ठेवावा ह्मणोन तो कोण आहे? ३७ तेव्हां येशू
त्याला बोलला। त्वां त्याला पाहिलें आहे, आणि तुजशीं जो
बोलतो। तोच तो आहे॥ ३८ तेव्हां त्याने ह्मटलें। हे प्र
भू। मी विश्वासतों। मग त्याने त्याची भक्ती केली॥ ३९ ते
व्हां येशू बोलला, जे पाहात नाहींत। त्यानी पाहावें। आ
णि जे पाहातात। त्यानी आंधळे व्हावें। ह्मणोन न्याय ठ
रिवण्यासाठीं मी ह्या जगांत आलों आहें॥ ४० तेव्हां का

रिझी जे त्याच्या जवळ होते। त्यांतून [कित्येक] हीं ऐकून त्या
ला बोलले, आह्मीहि आंधळे आहों कीं काय? ४१ येशू
त्यांस बोलला, जर तुह्मी आंधळे असतां, तर तुमचें पाप
नसतें। परंतु आतां तुह्मी ह्मणतां, कीं आह्मी पाहातों।
यास्तव तुमचें पाप राहातें ॥

पर्व १० ॥ १ मी तुह्मास खचीत, खचीत सांगतों, जो मैं
ढवाड्यांत दाराने न शिरतो, परंतु दुसऱ्या ठायीं चढतो, तो
चोर व लुटारू आहे॥ २ परंतु जो दाराने शिरतो। तो मैं
ढ्रांचा पाळणारा आहे॥ ३ त्याच्या साठीं द्वारपाळ उघडितो।
मेंढ्रेंहि त्याचा शब्द ऐकतात। आणि तो आपल्यां मेंढ्रांस नां
वाने बोलावितांना त्यांस बाहेर नेतो॥ ४ आणि जेव्हां तो
आपलीं मेंढ्रें बाहेर काढितो, तेव्हां त्यांच्या पुढें चालतो। आ
णि मेंढ्रें त्याचा शब्द जाणतात, यास्तव त्याच्या मागें जातात॥
५ परंतु परक्याच्या मागें जात नाहींत। आणखी त्यापासून पळ
तात, कां तर तीं परक्यांचा शब्द न जाणतात॥ ६ येशूने
ही उपमा त्यांस सांगितली, परंतु जों त्याने त्यांस ह्मटलीं,
तीं काय आहेत। हें ते न समजले॥ ७ यास्तव येशू फिरो
न त्यांस बोलला, मी तुह्मास खचीत, खचीत सांगतों। कीं मी
मेंढ्रांचें दार आहें॥ ८ माझ्या पूर्वीं जितके आले। ते सर्व चोर व
लुटारू आहेत। परंतु मेंढ्रांनी त्यांचें न ऐकिलें॥ ९ मी दार
आहें। जर कोणी मजकडून शिरतो। तर तो तारला जाई
ल। आणि आंत जाईल व बाहेर निघेल। आणि चारा
पावेल॥ १० चोरी करावी व मारावें व नाश करावा।
यांवांचून दुसऱ्यासाठीं चोर येत नाहीं। त्यांस जिवन व्हा
वें। आणि तें त्यांस अतिशयें व्हावें। ह्मणोन मी आलों आ
हें॥ ११ मी उत्तम मेंढपाळ आहें। जो उत्तम मेंढपाळ।
तो मेंढ्रांकरितां आपला जीव देतो॥ १२ परंतु जो मोलकरी,
ह्मणजे मेंढपाळ नाहीं। ज्याचीं तीं मेंढ्रें नाहींतच। तो लांडग्याला
येतां पाहातो, मग मेंढ्रांस सोडून पळतो। नंतर लांडगा त्यांस

धरितो, आणि मेंढ्रांस दाणादाण करितो॥ १३ तो मोल
करी मोलकरीच आहे। आणि त्याला मेंढ्रांविषयीं चिंता नाहीं।
यास्तव तो पळतो॥ १४ मी उत्तम मेंढपाळ आहें, आणि
माझ्यांस जाणतों व माझ्यांकडून जाणला जातों॥ १५ जसें
बाप मला जाणतो, तसें मीहि बापाला जाणतों, आणि में
ढ्रांसाठीं आपला जीव देतों॥ १६ आणि दुसरीं मेंढ्रें मला
आहेत। तीं या वाड्याचीं नव्हेत। परंतु तीं मला आ
णावीं लागतात, आणि तीं माझा शब्द ऐकतील। मग
येक कळप [व] येक मेंढपाळ होईल॥ १७ ह्यासाठीं बाप मजव
र प्रीति करितो। कीं मी आपला जीव फिरोन घ्यावा ह्मणोन
देतों॥ १८ कोणी मजपासून तो घेत नाहीं, परंतु मी आ
पणच तो देतों। मला तो सोडण्याचा अधिकार आणि फिरो
न धरण्याचा अधिकार आहे। ही आज्ञा म्या आपल्या बापा
पासून घेतली आहे॥ १९ यावर ह्यां गोष्टींवरून यहूद्यां
मध्यें फिरोन फूट जाली॥ २० आणि त्यांमधून बहुत बोलले,
त्याला भूत लागलें, आणि तो वेडा आहे। त्याचें तुह्मी कां
ऐकतां? २१ दुसरे बोलले। ह्या भूतग्रस्ताच्या गोष्टी नाहीं
त। भूत आंधळ्यांचे डोळे उघडायास शक्तिमान आहे काय? ॥
२२ तेव्हां यरूशलेमांत संस्कारकार्यांचा [दिवस,] आणि
हिंवाळा होता॥ २३ आणि येशू देवळीं, शलमोनाच्या मंड
पांत फिरत होता॥ २४ यावर यहूदी त्याच्या भोंवतें ये
ऊन। त्याला बोलले। तूं कोठपर्यंत आमचा जीव संदेहांत ध
रितोस? जर तूं ख्रीस्त आहेस। तर आह्मास उघडें सांग॥
२५ येशूनें त्यांस उत्तर दिल्हें, म्या तुह्मास सांगितलें, त
थापि तुह्मी न विश्वासतां॥ जीं कामें मी आपल्या बापाच्या
नांवानें करितों, तीं मजविषयीं साक्ष देतात॥ २६ परंतु तु
ह्मी मजवर न विश्वासतां। कारण कीं तुह्मी माझ्यां मेंढ्रांतील
नव्हां। जसें म्या तुह्मास सांगितलें तसें। २७ माझीं मेंढ्रें मा
झा शब्द ऐकतात। मीहि त्यांस जाणतों, आणि तीं माझ्या

मागें येतात॥ २८ आणि मी त्यांस सर्वकाळ जिवन देतों।
ह्मणजे त्यांचा नाश सर्वकाळापर्यंत होणारच नाहीं आणि को
णी त्यांस माझ्या हातांतून हिसकणार नाहीं॥ २९ माझा बा
प, ज्याने मला दिल्हीं, तो सर्वांपेक्षां थोर आहे। आणि
[त्यांस] माझ्या बापाच्या हातांतून हिसकायास कोणी शक्तिमा
न नाहीं॥ ३० मी व बाप येक आहों॥ ३१ यावर त्याला
धोंडमार करावयास यहूद्यानी फिरोन धोंडे उचलिले॥ ३२ ये
शूने त्यांस उत्तर दिल्हें, म्या आपल्या बापाचीं बहुत चांग
लीं कामें तुह्मास दाखविलीं आहेत, त्यांतून कोणत्या कामासा
ठीं तुह्मी मला धोंडमार करितां? ३३ यहूदी त्याला उत्त
र देतां बोलले, चांगल्या कामासाठीं आह्मी तुला धोंडमार
करीत नाहीं। परंतु दुर्भाषणासाठीं। आणि यासाठीं। कीं तूं
मनुष्य असतां। आपणाला देव करितोस॥ ३४ येशूने त्यांस
उत्तर दिल्हें। काय तुमच्या शास्त्रांत न लिहिलें? [कीं] मी
बोललों। तुह्मी देव आहां॥ ३५ ज्यांस देवाची गोष्ट प्राप्त
जाली। त्यांस जर त्याने देव ह्मटले, आणि धर्मलेखाचा भं
ग होववत नाहीं, तर ३६ ज्याला बापाने पवित्र मानिलें, आ
णि जगांत पाठविलें आहे, त्याला तुह्मी ह्मणतां? कीं दुर्भाषण
बोलतोस, मी देवाचा पुत्र आहें। हें ह्मटल्यावरून? ३७ जर मी
आपल्या बापाचीं कामें न करितों, तर मजवर विश्वास ठेवूं न
का॥ ३८ परंतु जर मी करितों। मग जरीं मजवर न वि
श्वासतां, तथापि त्यां कामांवर विश्वास असा ठेवा, कीं तुह्मी
जाणावें। आणि विश्वासावें कीं मजमध्यें बाप। आणि त्याजमध्यें
मी [आहें॥] ३९ यास्तव त्यानी फिरोन त्याला धरायास पाहि
लें, परंतु तो त्यांच्या हातापासून निघाला॥

४० आणि तो फिरोन यार्देनेपलिकडे। जेथे योहान्न पहि
ल्याने बाप्तीस्मा करीत होता। त्या ठिकाणास आऊन। तेथे रा
हिला॥ ४१ तेव्हां बहुत त्याजवळ आले आणि बोलले। कीं
योहान्नाने कांहीं चमत्कार केला नाहीं खरा, परंतु योहान्ना

ने ह्याविषयीं अवघीं जीं सांगितलीं। तीं खरीं होतीं॥ ४२ आ
णि तेथे बहुतानी त्यावर विश्वास ठेविला॥

पर्व ११॥ १ तेव्हां मारया व तिची बहीण मार्था। यांचा गांव
जो बेथानी तेथील लाजारस नांवें कोणी। त्याला विकार होता॥
२ आणि ज्या मारयेने प्रभूला सुगंध तेलाने चर्चिलें। आणि त्या
चे पाय आपल्या केंसानी पुसले, ती होती। तिचा भाऊ ला
जारस याला विकार होता॥ ३ यास्तव बहिणीनी त्याच्या जवळ पा
ठवून ह्मटलें। हे प्रभू, पाहा। ज्यावर तूं प्रीति करितोस।
त्याला विकार आहे॥ ४ तेव्हां येशू ऐकून बोलला। हा विकार
मरणासाठीं नव्हे। परंतु याकडून देवाच्या पुत्राचा गौरव व्हा
वा। ह्मणोन हा देवाच्या गौरवासाठीं आहे॥ ५ तेव्हां येशू
ने मार्था व तिची बहीण व लाजारस यांवर प्रीति केली
होती॥ ६ यावर। त्याला विकार आहे हें ऐकिल्यानंतर। तो
जेथे होता। त्याच ठिकाणीं दोन दिवस राहिला॥ ७ मग त्या
नंतर तो शिष्यांस ह्मणतो। आपण यहूदांत फिरोन जाऊं॥
८ शिष्य त्याला ह्मणतात। हे राब्बी। यहूदी आतां तुला
धोंडमार करायास झटले। आणि तूं तेथे फिरोन जातोस
काय? ९ येशूने उत्तर दिल्हें। [कीं] दिवसाच्या बारा हो
रा कीं नाहींत? जर कोणी दिवसां चालतो। तो या जगाचा
उजेड पाहातो। यास्तव त्याला ठेंच लागत नाहीं॥ १० परंतु
जर कोणी रात्रीं चालतो। तर त्याला उजेड नाहीं।
यास्तव ठेंच लागती॥ ११ त्याने हीं ह्मटलीं। आणि
यानंतर तो त्यांस ह्मणतो। आमच्या लाजारस मित्राला निज
लागली। परंतु मी त्याला जागें करावयास जातों॥ १२ या
वर त्याचे शिष्य बोलले। हे प्रभू, जर त्याला नीज लागली
तर तो पार होईल॥ १३ तेव्हां येशू त्याच्या मरणावि
षयीं बोलला। परंतु झोंपेच्या निजण्याविषयीं बोलतो। असें त्यां
स वाटलें॥ १४ यास्तव त्यानंतर येशूने त्यांस उघडें सांगित
लें। लाजारस मेला आहे। १५ आणि मी तेथे नव्हतों

याखव तुह्मामुळें मी आनंद करितो। कारण कीं तुह्मी वि
श्वास धरावा। परंतु आपण त्याच्या जवळ जाऊं॥ १६ याव
र थोमा जो दिदुमस ह्मटलेला। तो सोबती शिष्यांस बोलला।
आपणहि त्या सहीत मरावयास जाऊं ※

१७ यावर येशू आला असतां। त्याला तो तेव्हांच चार
दिवस प्रेतपेटींत राहिलेला सांपडला॥ १८ बेथानी तर। यरूश
लेमाजवळ। सुमारें पंधरा धांवांभर दूर होती॥ १९ आ
णि मार्था व मारया यांच्या भावाविषयीं यांचें शांतवन क
रावयास, त्यांच्या पाशीं यहूद्यांतील बहुत आले होते॥
२० तर येशू येतो। हें मार्थेनें ऐकिलें असतां। ती जाऊन
त्याला भेटली। परंतु मारया घरांत बसली ॥ २१ तेव्हां
मार्था येशूला बोलली। हे प्रभू, जर तूं येथें असतास। त
र माझा भाउ मेला नसता॥ २२ परंतु आतांहि जीं कांहीं
तूं देवाजवळ मागसील। तीं देव तुला देईल। हें मला क
ळलें॥ २३ येशू तिला ह्मणतो। तुझा भाउ पुन्हा उठेल॥
२४ मार्था त्याला ह्मणती। शेवटील दिवशीं पुन्हा उठण्यांत।
तो पुन्हा उठेल। हें मला कळलें॥ २५ येशू तिला बोलला,
मी पुन्हा उठणें आणि जिवन आहें। जो मजवर विश्वास ठेवितो,
तो जरीं मेला तरीं वांचेल। २६ आणि जो कोणी वांचतां
ना मजवर विश्वासतो, तो सर्वकाळापर्यंत मरणारच नाहीं। या
स तूं विश्वासतीस कीं काय? २७ ती त्याला ह्मणती। हो
य प्रभू। तूं तो ख्रीस्त देवाचा पुत्र जो जगांत येतो असा
आहेस। ह्मणोन मी विश्वासलें॥ २८ आणि ती हीं बोलून
निघाली, आणि आपली बहीण जी मारया। तिला गुप्त
बोलावितां ह्मणाली, गुरू आला आहे, आणि तुला बोलावि
तो॥ २९ ती [हें] ऐकतांच वेगें उठून त्याच्या जवळ येती॥
३० आणि तोंपर्यंत येशू गावांत आला नव्हता, परंतु जेथें
मार्था त्याला भेटली, त्या जाग्यांत होता॥ ३१ यहूदी त
र, जे तिच्या जवळ घरांत असतांना तिचें शांतवन करीत

होते। त्यांनी पाहिलें। कीं मारया लवकर उठून बाहेर नि
घाली। [तेव्हां] तिच्या मागें जातां ह्मटलें, कीं ती प्रेतपेंवा
जवळ, तेथें रडावयास जात आहे॥ ३२ मारया तर जेथे
येशू होता तेथे आल्यावर। त्याला पाहात असतां त्याच्यां पायां
पडून त्याला बोलली। हे प्रभू। जर तूं येथे असतास। तर माझा
भाउ मेला नसता॥ ३३ यावर येशूनें तिला रडतां। आणि
जे यहूदी तिच्या जवळ मिळाले। त्यांस रडतां पाहिलें। ते
व्हां तो आत्म्यांत कण्हला व आपण विव्हळ जाला॥ ३४ आणि
बोलला। तुह्मी त्याला कोठे ठेविलें? ते त्याला ह्मणतात, हे
प्रभू। येऊन पाहा॥ ३५ येशू रडला॥ ३६ यास्तव यहू
दी बोलले। पाहा। त्याने त्याजवर केवढी प्रीति केली!
३७ आणि त्यांमधून कित्येक बोलले, ज्याने आंधळ्याचे डोळे
उघडिले, त्या ह्याला असें करण्याची शक्ती नव्हती काय? कीं
हाहि न मरावा॥ ३८ यावर येशू फिरोन आपणांत कण्हून
प्रेतपेंवाजवळ येतो॥ तें तर गुहा होती, आणि तिजवर धों
ड ठेविली होती॥ ३९ येशू ह्मणतो, धोंड काढा॥ त्या मेले
ल्याची बहीण जी मार्था, ती त्याला ह्मणती। हे प्रभू। च
वथा [दिवस] जाला, यास्तव आतां तो घाणतो॥ ४० ये
शू तिला ह्मणतो। जर तूं विश्वाससील, तर देवाचा गौरव पा
हासील। हें म्या तुला सांगितलें कीं नाहीं? ४१ यास्तव, जे
थे तो मेलेला ठेविला होता, तेथून त्यांनी धोंड काढिली॥
तेव्हां येशू आपले डोळे वर करून बोलला। हे बापा। त्वां
माझें ऐकिलें। यास्तव मी तुझा उपकार मानितों॥ ४२ आ
णि तूं सर्वदां माझें ऐकतोस। हें मला कळलें। परंतु जन
जे भोंवतें उभे आहे। त्यामुळें बोललों। कारण, त्यांनी विश्वास
धरावा। कीं त्वां मला पाठविलें आहे॥ ४३ मग हें बोलून।
तो उंच स्वराने ओरडला। हे लाजारसा, इकडे ये॥ ४४ ते
व्हां जो मेला होता तो बाहेर आला। पाय व हात वेष्टणांनी बां
धलेले। आणि त्याचें तोंड फडक्याने वेष्टिलेलें होतें॥ येशू त्यांस

ह्मणतो। त्याला मोकळें करा। आणि जाउं द्या॥ ४५ यास्त
व यहूदी जे मारयेच्या जवळ आले। आणि जों येशूने केलों
तों पाहात होते। त्यांतून बहुतानी त्याजवर विश्वास ठेविला॥
४६ परंतु त्यांतून कित्येकानी फारिश्यांजवळ जाऊन। येशू
ने जों केलों, तों त्यांस सांगितलों ※

४७ यावरून मुख्य उपाध्ये व फारिशो यानी सभासदवर्ग
येकच करून ह्मटलें। आह्मी काय करूं? कां कीं हा माणु
स बहुत चमत्कार करितो॥ ४८ जर आह्मी याला असा
असुं देतों, तर अवघे याजवर विश्वसतील। मग रोमी ये
तील, आणि आमचें ठिकाण व राष्ट्रहि घेतील॥ ४९ आ
णि त्यांतून कोणी येक कायाफा त्या वर्षीं मुख्य उपाध्या अ
सतां, तो त्यांस बोलला। तुह्मी कांहीं न जाणतां। ५० आ
णि विचार न करितां। कां कीं प्रजेसाठीं येका माणसाने मरा
वें, आणि सर्व राष्ट्राने नाश न पावावा। ह्मणोन आह्मास
उपयोगी आहे॥ ५१ तेव्हां तो आपल्या आपण हें बोलला
नाहीं। परंतु त्या वर्षीं तो मुख्य उपाध्या असतां, त्याने भ
विष्य ह्मटलें। कीं येशू राष्ट्रासाठीं मरणार होता। ५२ आणि
केवळ त्या राष्ट्रासाठीं नव्हे। परंतु असें। कीं त्याने देवाचीं
फांकलेलीं लेंकरेंहि येकवट मिळवावीं॥ ५३ यास्तव त्या
दिवसापासून त्याला जिवें मारावयास त्यानी मनसोबा केला॥
५४ यास्तव येशू तेव्हांपासून यहूद्यांमध्यें। प्रगटपणें फिर
ला नाहीं। परंतु तेथून रानाजवळील प्रांत यांतील ए
फ्राइम ह्मटलेल्या नगरांत गेला। आणि तेथे आपल्या शिष्यां
सुद्धां राहिला ※ ५५ आणि यहूद्यांचा वल्हांडण सण जवळ हो
ता, आणि वल्हांडण सणाच्या आगोधर बहुत, आपणांस शुद्ध
करावयास। त्या प्रांतापासून यरूशलेमास वर गेले॥ ५६ या
स्तव त्यानी येशूला शोधिलें, आणि देवळांत उभे राहात अ
सतां। येकमेकांसीं ह्मटलें, तुह्मास कसें दिसतें? कीं तो सणा
स येणारच नाहीं कीं काय? ५७ आणखी मुख्य उपाध्ये व

फारिशी यानी त्याला धरावें। ह्मणोन अशी आज्ञा दिल्ही
होती। कीं तो कोठें आहे असें जर कोणाला ठाऊक असेल,
तर त्यानें सुचना द्यावी ※

पर्व १२॥ १ यावर वल्हांडणसणाच्या साहा दिवस पूर्वीं
येशू बेथान्यास आला। ज्या मेलेल्या लाजारसाला त्यानें मेलेल्यां
मधून उठविलें होतें। तो तेथें होता॥ २ यास्तव त्यानी तेथें त्या
च्या साठीं जेवण केलें। तेव्हां मार्था सेवा करीत होती।
परंतु लाजारस त्याच्या संगतीं बसणाऱ्यांतील येक होता॥
३ मारयेनें तर फार मोलवान खरा नरद, याचें सुगंधते
ल शेरभर घेऊन येशूच्यां पायांस चर्चिलें। आणि आप
ल्या केंसानी त्यांचे पाय पुसले। तेव्हां सुगंधतेलाच्या वासा
नें घर भरलें॥ ४ यास्तव त्याच्यां शिष्यांतील येक शिमोना
चा [पुत्र] यहूदा इस्कारयोत, जो त्याला परस्वाधीन करणार
होता। तो ह्मणतो। ५ हें सुगंधतेल तीन शें पावल्यांस क
शासाठीं विकून दरिद्र्यांस न दिल्हें? ६ तथापि त्याला द
रिद्र्यांविषयीं चिंता होती यासाठीं असें ह्मटलें, हें नव्हे।
परंतु तो चोर होता, आणि त्याच्या जवळ कसणी होती।
आणि तींत जीं ठेविलीं, तीं तो वाहात होता यास्तव॥ ७ या
वर येशू बोलला। तिला असुं दे। तिनें माझ्या उत्तरकार्या
च्या दिवसासाठीं हें राखिलें आहे॥ ८ दरिद्री तर सर्वदां
तुह्माजवळ आहेत। परंतु मी सर्वदां तुह्माजवळ नाहीं ※

९ तेव्हां यहूद्यांतून फार लोकानी जाणलें। कीं तो तेथें
आहे। आणि ते आले, केवळ येशूमुळें नव्हे, परंतु त्यानें ज्या
लाजारसाला मेलेल्यांमधून उठविलें, त्यालाहि आपण पाहा
वें ह्मणोन॥ १० तेव्हां मुख्य उपाध्यानी लाजारसालाहि जिवें
मारावयास मनसोबा केला। ११ कारण कीं त्यामुळें यहूद्यांमधून
बहुतानी जाऊन येशूवर विश्वास ठेविला ※

१२ दुसऱ्या दिवशीं, येशू यरूशलेमास येतो, हें सणा
स आलेल्या फार लोकानी ऐकून, १३ खारकांच्या डाहाळ्या

घेतल्या। आणि त्याच्या भेटीस ते बाहेर गेले। नंतर [अ
से] ओरडले। तारणविनंती। प्रभूच्या नांवाने जो इस्राएला
चा राजा येतो। तो धन्यवादीत॥ १४ तेव्हां येशू लाहान
गाढव मिळवून, त्यावर बसला। जसें लिहिलें आहे तसें,
[कीं] १५ हे जोयोनाच्या कन्ये। भिऊं नको। पाहा, तुझा
राजा गाढवीच्या शिंग्यावर बसून येतो॥ १६ तथापि त्या
चे शिष्य हीं प्रथम समजले नव्हते। परंतु जेव्हां येशू
गौरविला होता, तेव्हां त्याविषयीं हीं लिहिलीं, आणि त्या
नी हीं त्याला केलीं होतीं, असें त्यांनी आठविलें॥ १७ स
मुदाय जो त्याच्या संगतीं होता, त्याने तर साक्ष दिली।
कीं ह्याने लाजारसाला प्रेतपेटींतून बोलाविलें, आणि त्याला
मेलेल्यांमधून उठविलें॥ १८ आणि यामुळें समुदाय त्याला
भेटला, कीं ह्याने हा चमत्कार केला, हें त्याने ऐकिलें होतें॥
१९ यास्तव फारिशी आपल्यांमध्यें बोलले, तुमचें कांहीं चाल
त नाहीं, हें तुम्ही पाहातां? पाहा। जग त्याच्या मागें गे
लें आहे ※

२० आणि सणांत जे भजन करावयास चढले। त्यांम
ध्यें कित्येक हेल्लासी होते॥ २१ यास्तव ते गालिलांतील बे
थसाइद्याच्या फिलीप्पसाजवळ आले। आणि त्यापाशीं माग
त बोलले। हे स्वामी, आम्ही येशूला पाहायास इच्छितों॥
२२ फिलीप्पस येऊन आंद्र्यासाला सांगतो। मग फिरोन आं
द्र्यास व फिलीप्पस येशूला सांगतात॥ २३ तेव्हां येशू त्याव
र बोलतां त्यांस ह्मणाला, माणसाचा पुत्र गौरविला जा
वा। ह्मणोन वेळ आली आहे॥ २४ मी तुह्मास खचीत
खचीत सांगतों। जर गव्हाचा दाणा भुमींत पडून न मर
तो। तर तो येकला राहातो। परंतु जर मरतो तर बहुत
पीक देतो॥ २५ जो आपल्या जिवावर प्रीति करितो। तो
त्याला गमावील। परंतु जो ह्या जगांत आपल्या जिवावर द्वेष
करितो। तो त्याला सर्वकाळीक जिवनासाठीं राखील॥ २६ ज

र कोणी माझी सेवा करितो। तर तो माझ्या मागें येवो।
मग जेथे मी आहें। तेथे माझा सेवकहि होईल। आणि जर
कोणी माझी सेवा करितो। तर त्याची मान्यता बाप करील॥
२७ आतां माझा जीव थरारला आहे। मी काय बोलुं? हे
बापा, ह्या प्रसंगापासून मला तार? तर ह्यासाठींच मी
ह्या प्रसंगास आलों॥ २८ हे बापा, तुझ्या नांवाचें गौरव
कर॥ यास्तव आकाशांतून शब्द निघाला, [कीं] म्या गौर
विलेंच; आणि फिरोन गौरवीन॥ २९ यावर समुदाय,
जो उभा राहातां ऐकत होता, त्याने ह्मटलें, गडगडाट
जाला॥ दुसऱ्यांनी ह्मटलें, त्याशीं दूत बोलला॥ ३० येशू
उत्तर देण्याने बोलला, मजसाठीं नव्हे। परंतु तुह्मासाठीं
हा शब्द जाला॥ ३१ आतां ह्या जगाचा न्याय ठरविणें
आहे। आतां ह्या जगाचा अधिकारी बाहेर घालविला जा
ईल॥ ३२ आणि जर मी पृथ्वीपासून उंच केला जातों,
तर सर्वांस आपणाकडे वोढीन॥ ३३ तेव्हां तो कोणत्या म
रणाने मरणार होता, हें सुचवीत असतां, असें बोलला॥
३४ समुदायाने त्याला उत्तर दिल्हें, ख्रीस्त सर्वकाळापर्यंत
राहील, हें आह्मी शास्त्रांतून ऐकिलें। तर माणसाचा
पुत्र उंच केला पाहिजे, असें तूं कसें बोलतोस? हा माणसाचा
पुत्र कोण आहे? ३५ यावर येशू त्यांस बोलला, थोडका
वेळ तुह्माजवळ उजेड आहे॥ तुह्मास अंधाराने न आटोपावें
ह्मणोन जोंपर्यंत तुह्मास उजेड आहे, तोंपर्यंत चाला। कां जो
अंधारांत चालतो। तो कोठें जातो, हें त्याला कळलें नाहीं॥
३६ तुह्मी उजेडाचे पुत्र व्हावे, ह्मणोन जोंपर्यंत तुह्मास
उजेड आहे, तोंपर्यंत त्या उजेडावर विश्वास ठेवा॥ येशू
हीं बोलला। मग जाऊन त्यांपासून लपाला ꣸

३७ त्याने इतकेहि चमत्कार त्यांदेखत केले असतां।
त्यांनी त्याजवर विश्वास न ठेविला। ३८ असें कीं यशा
या भविष्यवाद्याने जी गोष्ट ह्मटली। ती पूर्ण व्हावी, कीं

हे प्रभू, आमच्या परिसिवण्यावर कोणी विश्वास ठेविला?
आणि प्रभूचा भूज कोणासीं प्रगट केला? ३९ त्याकरितां
ते विश्वास ठेवूं न शकले। कां कीं यशाया फिरोन बोलला॥
४० त्यांनी डोळ्यानी न पाहावें, आणि हृदयाने बुद्धी न
पावावी। आणि परत न फिरावें। आणि म्या त्यांस बरें न क
रावें। ह्मणोन त्याने त्यांचे डोळे आंधळे केले। आणि त्यां
चें हृदय घट्टारूप केलें आहे॥ ४१ यशायाने जेव्हां ह्याचें गौर
व पाहिलें। आणि ह्याविषयीं सांगितलें। तेव्हां हीं ह्मट
लीं ※ ४२ असें असतांहि अधिकाऱ्यांतून देखील। बहुता
नी त्याजवर विश्वास ठेविला खरें। परंतु आपण सभेंतून घा
लविले न जावे, ह्मणोन फारिश्यांमुळें त्यांनी त्याचें न ह्मणविलें॥
४३ कारण कीं देवाच्या गौरवापेक्षां त्यांस माणसांचें गौरव
अधीक आवडलें ※ ४४ तेव्हां येशू आरडत बोलला। जो
मजवर विश्वासतो। तो [केवळ] मजवर नव्हे। परंतु ज्याने
मला पाठविलें। त्याजवर विश्वासतो॥ ४५ आणि जो मला
पाहातो। तो ज्याने मला पाठविलें त्याला पाहातो॥ ४६ जो को
णी मजवर विश्वासतो। त्याने अंधारांत न राहावें। ह्मणो
न मी उजेड जगांत आलों आहें॥ ४७ आणि जर कोणी
माझ्या गोष्टी ऐकून न विश्वासतो। तरीं मी त्याचा न्याय ठ
रवीत नाहीं। कारण कीं म्या जगाचा न्याय ठरवावा ह्मणोन नव्हे,
परंतु जगाला तारावें, ह्मणोन आलों॥ ४८ जो मला अव्हे
रितो। आणि माझ्या गोष्टी घेत नाहीं। त्याचा न्यायठर
विणारा असा त्याला आहे। म्या जो गोष्ट ह्मटली. ती शेवटील
दिवसीं त्याचा न्याय ठरवील॥ ४९ कां कीं मी आपल्या आ
पण बोललों नाहीं। परंतु म्या काय सांगावें। आणि काय बोला
वें हें, बाप ज्याने मला पाठविलें, त्याने मला आज्ञा दिल्ही॥
५० आणि त्याची आज्ञा सर्वकाळीक जिवन आहे। हें म
ला कळलें। यास्तव जीं मी बोलतों। तीं जसें बापाने मला सां
गितलें। तसें बोलतों ※

पर्व १३ ॥ १ तेव्हां। येशूने ह्या जगांतून पलिकडे बापाजव
ळ जावें, ह्मणोन आपली वेळ आली। हें वल्हांडणाच्या सणा
पूर्वीं त्याला कळलें असतां। त्याने जगांतल्यां आपल्यांवर प्रीति
करून। शेवटापर्यंत त्यांवर प्रीति केली ॥ २ आणि जेवण
होत असतां, तितक्यांत व्याबलसाने शिमोनाचा यहूदा ई
स्कारयोते याच्या हृदयांत त्याला परस्वाधीन करावयास घात
लें असतां। ३ [आणि] बापाने अवघीं येशूच्या हातीं दि
ल्हीं हें, आणि तो देवापासून आला व देवाजवळ जातो। हें
त्याला कळलें असतां। ४ तो जेवणावरून उठून [आपलीं] वस्त्रें
ठेवितो। मग त्याने फडका घेऊन आपणाला वेष्टिलें ॥ ५ नंत
र तो गंगाळांत, पाणी घालून। शिष्यांचे पाय धुवूं व ज्या फ
डक्याने वेष्टिला होता। त्याकडून पुसूं लागला ॥ ६ तर शि
मोनपेत्रसाजवळ येतो। मग हा त्याला ह्मणतो। हे प्रभू। तूं
माझे पाय धुतोस? ७ येशू उत्तर देण्याने त्याला बोलला,
जें मी करितों। तें आतां तुला कळलें नाहीं। परंतु यांनं
तर तूं जाणसील ॥ ८ पेत्रस त्याला ह्मणतो, तूं सर्वकाळापर्यंत
माझे पाय धुणार नाहींस॥ येशूने त्याला उत्तर दि
ल्हें, जर मी तुला धुणार नाहीं। तर माझ्या सहीत तुला
वांटा नाहीं॥ ९ शिमोनपेत्रस त्याला ह्मणतो, हे प्रभू। मा
झे पाय केवळ नव्हेत। परतु हात व डोकेंहि॥ १० येशू
त्याला ह्मणतो। ज्याची आंघोळ झाली, त्याला पायधुण्याशू
न आणखी अगत्य नाहीं। तो सर्वांगी निर्मळ आहे। आणि
तुह्मी निर्मळ आहां। परंतु सर्व नाहीं ॥ ११ कारण कीं
त्याचा परस्वाधीनकरणारा त्याला कळला। यास्तव तो
बोलला। तुह्मी सर्व निर्मळ नाहीं॥ १२ त्याने तर त्यांचे पा
य धुतले। आणि मग आपलीं वस्त्रें घेऊन फिरोन जेवा
यास बसतां त्यांस ह्मटलें। म्या तुह्मास काय केलें। तें तुह्मी
समजतां? १३ तुह्मी मला गुरु व प्रभू। असी हाक मारी
तां। आणि ठीक ह्मणतां। कारण कीं मी [तसा] आहे॥

१४ यास्तव जो प्रभू व गुरु, त्या म्या जर तुमचे पाय
धुतले, तर तुह्मीहि येकमेकांचे पाय धुण्यास बांधले
आहां॥ १५ कारण कीं जसें म्या तुह्मास केलें, तसें तुह्मी
हि करावें; ह्मणोन म्या तुह्मास उदाहरण दिल्हें आहे॥
१६ मी तुह्मास खचीत खचीत सांगतों, चाकर आपल्या
प्रभूपेक्षां थोर नाहीं॥ आणि जो प्रेषीत, तो आपल्या
पाठविणाऱ्यापेक्षां थोर नाहीं॥ १७ हीं जर तुह्मास कळलीं, त
र तुह्मीं हीं केल्यास धन्य आहां॥ १८ तुह्मा सगळ्यांवि
षयीं मी बोलत नाहीं। ज्यांस म्या निवडिलें ते मला क
ळले। परंतु यासाठीं कीं हा धर्मलेख पूर्ण व्हावा, माझ्या
जवळ जो भाकर खातो, त्याने माझ्या विरुद्ध आपली लात
उचलिली आहे॥ १९ [हें] आल्यापूर्वीं मी आतां तुह्मास यासा
ठीं सांगतों, कीं जेव्हां होत असतें, तेव्हां तुह्मी विश्वासावें
कीं मी [तो] आहें॥ २० मी तुह्मास खचीत खचीत सांग
तों, कीं ज्या कोणाला मी पाठवितों, त्याला जो अंगि
कारितो, तो मला अंगिकारितो। आणि जो मला अंगि
कारितो, तो माझ्या पाठविणाऱ्याला अंगिकारितो॥

२१ येशू हीं बोलून आत्यंत घाबरला, आणि प्रमाण
पुरवितांना बोलला, मी तुह्मास खचीत खचीत सांगतों,
कीं तुह्मामधील येक मला परस्वाधीन करील॥ २२ यास्त
व, तो कोणाविषयीं बोलतो याचा संशय शिष्यांस असतां,
त्यांनी येकमेकांस पाहिलें॥ २३ तेव्हां त्याच्यां शिष्यांमधील
येक, ज्यावर येशूने प्रीति केली, तो येशूच्या उरासीं टें
कत होता॥ २४ यास्तव ज्याविषयीं तो बोलतो, तो को
ण असेल हें पुसावें, ह्मणोन शिमोनपेत्रसाने त्याला खुणा
विलें॥ २५ तेव्हां तो येशूच्या उरासीं टेंकत असतां, त्या
ला ह्मणतो, हे प्रभू, [तो] कोण आहे? २६ येशूने उत्तर
दिल्हें, कीं मी तुकडा बुचकळून ज्याला देईन, तोच तो आ
हे॥ मग तुकडा बुचकळून शिमोनाचा यहूदा इस्कारयोते

याला दिल्हा॥ २७ आणि तुकड्यामागून सैतान त्यांत शि
रला॥ यास्तव येशू त्याला ह्मणतो। जें तूं करितोस। तें
लवकर कर॥ २८ तेव्हां त्याने कशास्तव असें सांगितलें। हें
बसणाऱ्यांमधील कोणी समजला नाहीं॥ २९ कारण कीं य
हूदाजवळ कसणी होती। यास्तव सणासाठीं आह्मास ज्यांचें
अगत्य आहे। तीं विकत घे, किंवा दरिद्र्यांस कांहीं द्यावें।
ह्मणोन येशू त्यास सांगतो। असें कित्येकांस वाटलें॥ ३० तर
तुकडा घेऊन तो तेव्हांच बाहेर गेला। आणि रात्र होती ※

३१ यावर तो बाहेर गेल्यानंतर, येशू ह्मणतो। आ
तां माणसाचा पुत्र गौरविला। आणि त्याकडून देव गौ
रविला आहे॥ ३२ जर देव त्याकडून गौरविला जा
तो। तर देव स्वतां त्यालाहि गौरवील, आणि तो त्याला वेगें
गौरवील॥ ३३ अहो धाकटीं मुलें। मी आतांपासून थोडा वेळ
तुमच्या संगतीं आहें॥ तुह्मी मला शोधाल, आणि जसें म्या
यहूद्यांस सांगितलें, कीं जेथे मी जातों, तेथे तुह्मी येउं न
शकतां। तसें तुह्मासहि आतां सांगतों॥ ३४ तुह्मास नवी
आज्ञा देतों, कीं तुह्मी येकमेकांवर प्रीति करा, कीं जशी
म्या तुह्मावर प्रीति केली। तशी तुह्मीहि येकमेकांवर प्रीति
करा॥ ३५ तुमची जर येकमेकांवर प्रीति आहे, तर ह्या
कडून सर्व जाणतील, कीं तुह्मी माझे शिष्य आहां ※ ३६ शि
मोन्पेत्रस त्याला बोलतो, हे प्रभू, तूं कोठे जातोस? येशू
ने त्याला उत्तर दिल्हें, [कीं] जेथें मी जातों। तेथे तूं मा
झ्या मागें आतां येउं शकत नाहींस, परंतु मग माझ्या
मागें येसील॥ ३७ पेत्रस त्याला ह्मणतो, हे प्रभू, मी तुझ्या
मागें आतां कशास्तव येउं न शकतों? तुझ्या साठीं माझा जी
व देईन॥ ३८ येशूने त्याला [असें] उत्तर दिल्हें। माझ्या सा
ठीं तूं आपला जीव देसील काय? मी तुला खचीत ख
चीत सांगतों, तूं मला तिनदां नकारून टाकसील, तोंपर्यं
त कोंवडा ओरडणारच नाहीं ※

पर्व १४ ॥ १ तुमचें हृदय न घाबरो। तुह्मी देवावर
विश्वास ठेवा। मजवरहि विश्वास ठेवा॥ २ माझ्या बापाच्या घरां
त बहुत वासस्थानें आहेत। आणि जर नसतीं, तर त्या
तुह्मास सांगितलें असतें॥ मी तुह्मासाठीं जागा सिद्ध करा
यास जातों। ३ आणि जर मी जातों व तुह्मासाठीं जागा
सिद्ध करितों। तर मी फिरोन येतों. आणि जेथे मी आ
हें। तेथे तुह्मीहि व्हावें। ह्मणोन आपल्या जवळ तुह्मास घेई
न॥ ४ आणि मी कोठे जातों। हें तुह्मास कळलें। वाटहि
तुह्मास कळली॥ ५ थोमा त्याला ह्मणतो, हे प्रभू, तूं को
ठे जातोस, हें आह्मांस कळलें नाहीं। मग वाट आह्मास
कशी कळूं येती? ६ येशू त्याला ह्मणतो, मी वाट व सत्य
ता व जिवन आहें। मजकडून [आल्या]वांचून कोणी बापा
पाशीं येत नाहीं॥ ७ जर तुह्मी मला जाणलें असतें। त
र माझ्या बापाला जाणलें असतें। आणि आतांपासून तुह्मी
त्याला जाणतां, आणि त्याला पाहिलें आहे॥ ८ फिलीप्पस त्याला
ह्मणतो। हे प्रभू, बाप आह्मास दाखीव, ह्मणजे आह्मास पु
रे॥ ९ येशू त्याला ह्मणतो। हे फिलीप्पसा। मी इतका का
ळ तुह्माजवळ असतांना त्वां मला न जाणलें काय? ज्याने
मला पाहिलें। त्याने बापाला पाहिलें आहे। मग बाप आ
ह्मास दाखीव। हें तूं कसें ह्मणतोस! १० मी बापांत व
बाप माझ्यांत आहे, याचा विश्वास न धरितोस काय? मी ज्या
गोष्टी तुह्मास सांगतों। त्या आपल्या आपण न बोलतों। परंतु
बाप जो माझ्यांत राहातो, तो त्या क्रिया करितो॥ ११ मी
बापांत आणि माझ्यांत बाप, असा मजवर विश्वास ठेवा।
नाहीं तर त्यां क्रियांवरून मजवर विश्वास ठेवा॥ १२ तुह्मा
स खचीत खचीत सांगतों। मी ज्या क्रिया करितों त्या।
मजवर विश्वासणारा। तोहि करील। आणि त्यांहून मोठ्या करी
ल। यास्तव कीं मी बापाकडे जातों॥ १३ जें कांहीं मा
झ्या नांवाने मागाल। तें यासाठीं करीन। कीं बाप पुत्राकडून

गैारविला जावा॥ १४ जर माझ्या नांवाने कांहीं मागाल, तर
मी करीन ॥ १५ जर तुह्मी मजवर प्रीति करितां। तर मा
झ्या आज्ञा पाळा। १६ मग मी बापाला विनंती करीन।
आणि तो तुह्मास दुसरा संबोधक। तुह्माजवळ सर्वकाळ
पर्यंत राहावयास देईल। १७ हा सत्यतेचा आत्मा [आहे॥]
याला जग घेऊं न शकतें। कां कीं तें त्याला पाहात नाहीं।
आणि त्याला जाणत नाहीं। परंतु तुह्मी त्याला जाणतां।
कां तर तो तुह्माजवळ राहातो। आणि तुह्मामध्यें होईल॥
१८ मी तुह्मास अनाथ सोडणार नाहीं। तुह्माजवळ येतों॥
१९ आतांपासून थोडक्या काळाने, जग मला आणखी पाहात
नाहीं। परंतु तुह्मी मला पाहातां। मी वांचतों। यास्तव तुह्मीहि
वांचाल॥ २० त्या दिवसीं तुह्मी जाणाल, कीं मी आपल्या बापा
मध्यें, आणि तुह्मी मजमध्यें। आणि मी तुह्मामध्यें [आहें॥]
२१ जो माझ्या आज्ञा पावतो। व त्यांस पाळितो। तोच
मजवर प्रीति करणारा आहे। आणि जो मजवर प्रीति क
रितो। तो माझ्या बापाकडून प्रीति पावेल। मीहि त्यावर
प्रीति करीन। आणि आपणाला त्याजवळ प्रगट करीन॥
२२ यहूदा जो ईस्कारयोते नव्हे, तो त्याला ह्मणतो। हे
प्रभू। काय जालें? ह्मणोन तूं आपणाला आह्माजवळ प्रगट
करणार आहेस। परंतु जगाजवळ नाहींस॥ २३ येशू उ
त्तर देण्याने त्याला बोलला। जर कोणी मजवर प्रीति करि
तो। तर तो माझी गोष्ट पाळील। मग माझा बाप त्या
वर प्रीति करील। आणि आह्मी त्याकडे येऊं व त्याजवळ
वस्ती करूं॥ २४ जो मजवर प्रीति करीत नाहीं, तो माझ्या
गोष्टी पाळीत नाहीं। आणि जी गोष्ट तुह्मी ऐकतां। ती
माझी नव्हे। परंतु बाप ज्याने मला पाठविलें त्याची॥ २५ मी
तुह्माजवळ राहातांना। हीं तुह्मास बोललों आहें। २६ परं
तु संबोधक। जो पवित्र आत्मा, ज्याला बाप माझ्या नांवा
ने पाठवील। तो तुह्मास सर्व शिकवील। आणि जों ह्या तु

ह्मास सांगितलीं। त्यां सर्वांची आठवण तुह्मास देईल॥ २७ मी
तुह्मासीं शांती ठेवितों। माझी शांती तुह्मास देतों। जसें ज
ग देतें। तसें मी तुह्मास देत नाहीं॥ तुमचें हृदय न घा
बरो। आणि न कचो॥ २८ म्या जें तुह्मास ह्मटलें, तें तु
ह्मी ऐकिलें। [कीं] मी जातों, मग तुह्माकडे येतों॥
जर तुह्मी मजवर प्रीति केली असती। तर। मी बापाकडे
जातों, हें ह्मटल्यावरून। तुह्मी आनंद केला असता। कां
तर माझा बाप मजपेक्षां थोर आहे॥ २९ आणि जेव्हां [हें]
होत असतें। तेव्हां तुह्मी विश्वास धरावा। ह्मणोन जाल्या आ
गोधर म्या आतां तुह्मास सांगितलें आहे॥ ३० आतांपासून
मी तुह्मासीं बहुत बोलणार नाहीं। कारण कीं या जगाचा
अधिकारी येतो। आणि मजकडे त्याचें कांहीं नाहीं। ३१ प
रंतु [तें] यासाठीं, कीं जगानें असें जाणावें। मीं बापावर
प्रीति करितों। आणि जसी बापानें मला आज्ञा दिल्ही, तसें
च करितों॥ उठा, आपण येथून जाऊं ※

पर्व १५॥ १ मी खरा द्राक्षवेल आहें। आणि माझा
बाप शेतकरी आहे॥ २ मजमध्यें प्रत्येक फांटा। जो फळ
देत नाहीं। त्याला तो काढितो। आणि प्रत्येक। जो
फळ देतो। त्यानें अधीक फळ द्यावें, ह्मणोन तो त्याला
शुद्ध करितो॥ ३ जी गोष्ट म्या तुह्मास सांगितली, तिज
करून तुह्मी आतां शुद्ध आहां॥ ४ मजमध्यें राहा। मग
मी तुह्मामध्यें [राहीन॥] जसा फांटा वेलांत राहिल्यावां
चून। आपल्या आपण फळ द्यावयास शक्तिमान नाहीं, त
से तुह्मीहि मजमध्यें राहिल्यावांचून [शक्तिमान] नाहीं॥
५ मी वेल आहें, तुह्मी फांटे [आहां॥] जो मजमध्यें राहातो।
मीहि त्यामध्यें [असतां।] तोच बहुत फळ देतो। कां तर म
जवांचून तुह्मी कांहीं करूं न शकतां॥ ६ जर कोणी मज
मध्यें न राहातो। तर तो फांट्यासारिखा बाहेर टाकि
ला जातो। आणि वाळतो। मग अशांस गोळा करितात, आ

णि अग्नीमध्यें टाकितात। असें ते जाळले जातात॥ ७ जर तु
ह्मी मजमध्यें राहातां, आणि माझ्या गोष्टी तुह्मामध्यें रा
हातात। तर जें जें तुह्मी इच्छितां, तें तें मागाल आणि
तुह्मास प्राप्त होईल॥ ८ यांत माझा बाप गौरविला जातो,
कीं तुह्मी बहुत फळ द्यावें। मग माझे शिष्य व्हाल ※ ९ जसी
बापाने मजवर प्रीति केली, तसी म्याहि तुह्मावर प्रीति केली
आहे। माझ्या प्रीतींत राहा॥ १० जर माझ्या आज्ञा पा
ळाल। तर जसा म्या आपल्या बापाच्या आज्ञा पाळिल्या आणि
त्याच्या प्रीतींत राहातों। तसें माझ्या प्रीतींत राहा॥ ११ तु
ह्मावर माझा आनंद राहावा, आणि तुमचा आनंद पूर्ण
व्हावा। ह्मणोन म्या तुह्मास हीं सांगितलीं आहेत॥ १२ मा
झी आज्ञा ही आहे। कीं जसी म्या तुह्मावर प्रीति केली,
त्याप्रमाणे तुह्मी येकमेकांवर प्रीति करा॥ १३ कोणाची या
हून मोठी प्रीति नाहीं, कीं कोणी आपल्या मित्रांकरितां
आपला प्राण द्यावा॥ १४ मी तुह्मास जितक्या आज्ञा देतों
त्याप्रमाणे जर तुह्मी करितां, तर माझे मित्र आहां॥ १५ आ
तांपासून मी तुह्मास चाकर ह्मणत नाहीं। कां तर जें
आपला प्रभू करितो। तें चाकराला ठाऊक नाहीं। परंतु म्या
तुह्मास मित्र ह्मटले, कां कीं सर्व जीं म्या आपल्या बापासून ऐकि
लीं, तीं तुह्मास कळविलीं आहेत॥ १६ तुह्मी मला निवडिलें
नाहीं, परंतु म्या यासाठीं तुह्मास निवडिलें आणि तुह्मास नेमि
लें। कीं तुह्मी निघून बहुत फळ द्यावें, आणि तुमचें फ
ळ राहावें। यासाठीं कीं तुह्मी जें कांहीं माझ्या नांवाने बा
पापासीं मागाल। तें त्याने तुह्मास द्यावें॥ १७ तुह्मी येक
मेकांवर प्रीति करावी, ह्मणोन मी तुह्मास ह्या आज्ञा देतों ※
१८ जरीं जग तुह्मास द्वेषितें, तरीं ह्यापूर्वीं, त्याने म
ला द्वेषिलें आहे, हें तुह्मी जाणतां॥ १९ जर तुह्मी
जगाचे असतां, तर जगाने आपलें जें यांवर प्रीति केली अस
ती। परंतु या कारणें कीं तुह्मी जगाचे नव्हां, पण म्या तु

ह्मास जगांतून निवडिलें आहे। ह्मासाठीं जग तुमचा द्वेष
करितें॥ २० चाकर आपल्या प्रभूहून थोर नव्हे, असी जी
गोष्ट म्या तुह्मास सांगितली। तिची आठवण करा॥ जर ते
माझ्या पाठीस लागले। तर तुमच्याहि पाठीस लागतील। ज
र त्यानी माझी गोष्ट पाळिली। तर तुमचीहि पाळितील॥
२१ परंतु ज्याने मला पाठविलें तो त्यांस कळला नाहीं,
यास्तव ते माझ्या नांवाकरितां तों सर्व तुह्मास करितील॥
२२ जर मी आलों नसतों। आणि त्यांस बोललों नसतों,
तर त्यांस पाप नसतें। परंतु आतां त्यांस आपल्या पापा
विषयीं निमित्य नाहीं॥ २३ जो मला द्वेषितो। तो माझ्या
बापालाहि द्वेषितो॥ २४ जीं कामें कोणी दुसऱ्याने केलीं ना
हींत, तीं जर म्या त्यांमध्यें केलीं नसतों, तर त्यांस पाप
नसतें। परंतु आतां त्यानी मला व माझ्या बापालाहि पाहिलें
आण द्वेषिलें आहे॥ २५ तथापि [हें] यासाठीं। कीं त्यां
च्या शास्त्रांत लिहिलेली गोष्ट। कीं त्यानी उगाच माझा द्वेष
केला। ही पूर्ण व्हावी॥ २६ परंतु ज्या संबोधकाला मी बापा
पासून तुह्माजवळ पाठवीन। तो सत्यतेचा आत्मा। जो बा
पापासून निघतो। तो जेव्हां येईल, तेव्हां तोच मजविष
यीं साक्ष देईल॥ २७ आणि तुह्मी पहिल्यापासून माझ्या जवळ
आहां। यास्तव तुह्मीहि साक्ष द्याल ॥

पर्व १६ ॥ १ तुह्मी न अडखळावें। ह्मणोन मी तुह्मा
स हीं बोललों॥ २ ते तुह्मास सभेबाहेर करितील। आ
णखी असी वेळ येत आहे। कीं जो कोणी तुमचा जीव घे
तो, तो देवाला सेवा अर्पितो। असें त्याला वाटेल॥ ३ आ
णि, ते बापाला व मलाहि जाणत नाहींत। यास्तव हीं
तुह्मास करितील॥ ४ परंतु मी यासाठीं तुह्मास हीं बोल
लों, कीं जेव्हां ती वेळ येईल, तेव्हां तुह्मी हीं आठवावीं। कीं
म्या तुह्मास सांगितलीं॥ आणि मी तुह्माजवळ होतों। याक
रितां म्या तुह्मास पहिल्यापासून हीं सांगितलीं नाहींत॥ ५ प

रंतु आतां ज्याने मला पाठविलें। त्याजवळ मी जातों। आ
णि कोठे जातोस। असें तुह्मामधील कोणी मला पुसत नाहीं॥
६ तथापि, म्या तुह्मास हीं सांगितलीं। यावरून तुमचें हृ
दय खेदानें भरलें आहे॥ ७ परंतु जें खरें तें मी तुह्मास
सांगतों, म्या जावें हें तुह्मास उपयोगी आहे॥ कारण कीं
जर मी जात नाहीं। तर संबोधक तुह्माजवळ येणार नाहीं।
परंतु जर मी जातों। तर त्याला तुह्माकडे पाठवीन॥ ८ आ
णि तो येऊन। पापाविषयीं व पुण्याविषयीं व न्याय ठरवि
ण्याविषयीं जगाच्या पदरीं घालील॥ ९ पापाविषयीं तर
यासाठीं। कीं ते मजवर विश्वास ठेवीत नाहींत। १० आणि
पुण्याविषयीं यासाठीं। कीं मी बापाजवळ जातों। आणि पु
ढें तुह्मी मला न पाहाल। ११ आणि न्याय ठरविण्यावि
षयीं यासाठीं। कीं ह्या जगाच्या अधिकाऱ्याचा न्याय ठरवि
ला जातो॥ १२ अद्याप मला तुह्मासीं बहुत सांगायाचीं आ
हेत। परंतु आतां तुमच्याने [तीं] सोसवत नाहींत॥ १३ त
थापि जो सत्यतेचा आत्मा। तोच जेव्हां येईल। तेव्हां तो
तुह्मास वाटेने सर्व सत्यतेंत नेईल। कारण कीं तो आपल्या
आपण बोलणार नाहीं। परंतु जितकीं ऐकेल। तितकीं बोलेल।
आणि जीं होणार। तीं तुह्मास निवेदील॥ १४ जें माझें त्यां
तून तो घेईल, आणि तुह्मास निवेदील। यास्तव माझें गौरव
करील॥ १५ जीं जीं बापाचीं आहेत, तीं सर्व माझीं
आहेत। याकरितां मी बोललों। कीं जें माझें त्यांतून तो घे
ईल। आणि तुह्मास निवेदील ※ १६ थोडक्या काळाने तु
ह्मी मला न पाहाल। आणि फिरोन थोडक्या काळाने मला
पाहाल। कारण कीं मी निघून बापाजवळ जातों॥ १७ यास्तव
शिष्यांतील [कित्येक] येकमेकांसीं बोलले, हा आह्मास ह्मण
तो, थोडक्या काळाने तुह्मी मला न पाहाल। आणि फिरोन
थोडक्या काळाने मला पाहाल। आणि, कारण कीं मी नि
घून बापाजवळ जातों। हें काय आहे? १८ याकरितां ते बो

लवे। हा थोडका काळ ह्मणतो। हें काय? काय ह्मणतो।
हें आह्मास कळलें नाहीं॥ १९ यास्तव, ते त्याला पुसा
यास इच्छीत होते। हें येशू जाणून त्यांस बोलला, थोड
क्या काळाने तुह्मी मला न पाहाल। आणि फिरोन थोड
क्या काळाने मला पाहाल, हें जें मी बोललों। याविषयीं तु
ह्मी येकमेकांशीं विचार करितां [कीं काय]? २० मी तुह्मास
खचीत खचीत सांगतों, कीं तुह्मी रडाल आणि शोक कराल।
परंतु जग आनंद करील। तुह्मी खेद पावाल। परंतु तु
मचा खेद आनंदरूप होऊन जाईल॥ २१ जेव्हां स्त्री प्र
सवती। तेव्हां तिला क्लेश आहे। कां तर तिची वेळ आली।
परंतु जेव्हां मूल जन्मलें। तेव्हां माणुस जगांत जन्मला, यास्तव
ती आनंदावरून संकट आणखी आठवीत नाहीं॥ २२ तर
आतां तुह्मासहि खेद आहे खरें। परंतु दुसऱ्याने तुह्मास
पाहीन। मग तुमचें हृदय आनंदीत होईल, आणि तुमचा
आनंद तुह्मापासून कोणी हरण करणार नाहीं॥ २३ आणि
त्या दिवशीं। तुह्मी मजवळ कांहीं मागणार नव्हां। मी तु
ह्मास खचीत खचीत सांगतों। कीं तुह्मी बापाजवळ जि
तकीं माझ्या नांवाने मागाल, तितकीं तो तुह्मास देईल॥
२४ आतांपावेतों तुह्मी माझ्या नांवाने कांहीं मागितलें नाहीं,
तुह्मी मागा, मग यासाठीं पावाल। कीं तुमचें सुख पूर्ण केलें
जावें॥ २५ हीं दृष्टांतानी तुह्मास बोललों आहें। तथापि अशी
वेळ येती। कीं तेव्हांपासून मी तुह्मास दृष्टांतानी बोलणार ना
हीं। परंतु तुह्माजवळ बापाविषयीं स्पष्ट निवेदन करीन॥ २६
त्या दिवसांत तुह्मी माझ्या नांवाने मागाल, आणि मी तु
मच्या साठीं बापाजवळ विनंती करीन, असें तुह्मास ह्मणत नो
हीं। २७ कारण कीं बाप स्वतां यामुळें तुह्मावर प्रीति क
रितो, कीं तुह्मी मजवर प्रीति केली, आणि मी देवाजवळून
निघालों। असा विश्वास धरिला आहे॥ २८ मी बापाजवळून नि
घून जगांत आलों। आणखी जग सोडून बापाजवळ जातों॥

२९ त्याचे शिष्य त्याला ह्मणतात, पाहा, आतां तूं स्पष्ट बो
लतोस। आणि कांहींच दृष्टांत बोलत नाहींस॥ ३० आतां
आह्मास कळलें, कीं तुला अवघों कळतीं। आणि कोणी
तुजपासीं विचारावें, असें तुला अगत्य नाहीं॥ यावरून आ
ह्मी विश्वासतों। कीं तूं देवापासून निघालास॥ ३१ येशूने त्यां
स [असें] उत्तर दिल्हें। आतां तुह्मी विश्वासतां कीं काय?
३२ पाहा। अशी वेळ येतो आणि आतां आली। कीं प्र
त्येक तुह्मी आपल्यां आपल्यांकडे फांकले जाल, आणि म
ला येकलें सोडाल। तथापि बाप माझ्या जवळ आहे। यास्तव
मी येकला नाहीं॥ ३३ मजकडून तुमचें कल्याण व्हावें, ह्मा
णोन हीं तुह्मास बोललों आहें॥ जगाकडून तुह्मास संकट हो
ईल, परंतु धीर धरा। म्या जगाला जिंकिलें आहे ※

पर्व १७ ॥ १ येशू हीं बोलला। मग आपली दृष्टी वर्ती
आकाशाकडे लावून ह्मणाला, हे बापा, घटका आली। तु
झ्या पुत्राचें गौरव यासाठीं कर। कीं तुझ्या पुत्रानेहि तुझें
गौरव करावें। २ जसा त्वां त्याला सर्व मासजातीवर अधि
कार दिल्हा तसा। कीं त्वां जें प्रत्येक त्याला दिल्हें। त्या
अशांस त्याने सर्वकाळ जिवन द्यावें॥ ३ आणि हें सर्वकाळी
क जिवन आहे। कीं जो केवळ खरा देव, त्या तुला, आणि
ज्या येशूख्रीस्ताला त्वां पाठविलें। त्याला त्यानी जाणावें॥
४ पृथ्वीवर म्या तुझें गौरव केलें आहे। त्वां जें काम मला
करावयास दिल्हें, तें म्या संपविलें आहे॥ ५ आणि हे बापा।
जग जाल्यापूर्वीं तुझ्या जवळ जें गौरव मला होतें, त्या
कडून तूं आतां आपणाजवळ माझें गौरव कर॥ ६ जगां
तून जीं माणसें त्वां मला दिल्हीं। त्यांस म्या तुझें नांव दा
खविलें आहे। तुझीं होतीं, आणि त्वां तीं मला दिल्हीं।
आणि त्यानी तुझी गोष्ट पाळिली आहे॥ ७ आतां तीं स
मजलीं। कीं जितकीं त्वां मला दिल्हीं, तीं अवघीं तुझ्या
जवळील आहेत। ८ कां तर ज्या गोष्टी त्वां मला दिल्या।

त्या म्या त्यांस दिल्या आहेत। आणि त्यानी घेतल्या, आ
णि मी तुझ्या जवळून निघालों। असें त्यानी खरें जाणलें। आ
णि त्वां मला पाठविलें, हा विश्वास त्यानी धरिला आहे॥
९ त्यांच्या साठीं मी विनंती करितों, मी जगासाठीं विनंती करी
त नाहीं। परंतु जीं त्वां मला दिल्हीं त्यांसाठीं। कां त
र तीं तुझीं आहेत॥ १० आणि जीं माझीं, तीं सर्व तु
झीं, व तुझीं तीं माझीं आहेत। आणि त्यांकडून माझें गौ
रव केलें आहे॥ ११ आणि आतांपासून मी जगांत नव्हें।
परंतु हे जगांत आहेत। आणि मी तुजकडे येतों॥ हे प
वित्र बापा, त्वां जे मला दिल्हे, ते आह्मासारिखे येक व्हा
वयास तुझ्या नांवाने त्यांस राख॥ १२ जोंपर्यंत मी जगां
त त्यांच्या जवळ होतों। तोंपर्यंत म्या त्यांस तुझ्या नांवाने
राखिलें। त्वां जे मला दिल्हे, त्यांस म्या पाळिलें आहे।
आणि त्यांमधील कोणी नाश न पावला। जो नाशाचा पुत्र
तो मात्र। कारण कीं धर्मलेख पूर्ण व्हावा॥ १३ परंतु आ
तां मी तुजकडे येतों। आणि त्यांमध्यें माझा आनंद पूर्ण के
ला। असें त्यांस व्हावें, ह्मणोन मी जगांत हीं बोलतों॥
१४ म्या तुझी गोष्ट त्यांस दिल्ही आहे। आणि जगाने
यामुळें त्यांस द्वेषिलें, कीं जसा मी जगाचा नाहीं, तसे ते
जगाचे नाहींत॥ १५ त्वां त्यांस जगांतून काढावें, ह्मणोन
मी न मागतों। परंतु असें कीं त्वां त्यांस त्या दुष्टापासू
न राखावें॥ १६ जसा मी जगाचा नाहीं, तसे ते जगाचे
नाहींत॥ १७ तूं आपल्या सत्यतेने त्यांस पवित्र कर। तुझी जी
गोष्ट ती सत्यता आहे॥ १८ जसें त्वां मला जगांत पाठविलें, तसें
म्याहि त्यांस जगांत पाठविलें आहे॥ १९ आणि तेहि सत्य
तेने पवित्र व्हावे, ह्मणोन मी त्यांच्या साठीं आपणाला पवित्र करि
तों॥ २० मी ह्यांच्या साठीं केवळ नव्हे, परंतु ह्यांच्या गोष्टीवरू
न जे मजवर विश्वास ठेवितील त्यांच्या साठींहि मागतों, २१ कीं
ते सर्व येक व्हावे। हे बापा, असें कीं जसें तूं मजमध्यें व मी तुज

मध्यें। तसे तेहि आह्मांमध्यें येक व्हावे। यासाठीं कीं त्वां
मला पाठविलें। असा जगानें विश्वास धरावा॥ २२ आ
णि त्वां जें गौरव मला दिल्हें, तें म्यां त्यांस यासाठीं दिल्हें।
कीं जसे आह्मी येक आहों। तसें त्यानी येक व्हावें। २३ मी
त्यांमध्यें। आणि तूं मजमध्यें। असें कीं त्यानी येकरूप सि
द्ध केले जावें। आणि असें कीं जगानें जाणावें, कीं त्वां म
ला पाठविलें, आणि जसी मजवर प्रीति केली, तसी
त्यांजवर प्रीति केली आहे॥ २४ हे बापा। मी असें
इछितों, कीं जेथे मी आहें तेथे, त्वां जे मला दिल्हे। त्यानी
हि मजपासीं यासाठीं व्हावें, कीं माझें गौरव, जें त्वां मला दि
ल्हें। त्याला त्यानी पाहावें। कां तर जगाचा पाया घात
ल्यापूर्वीं त्वां मजवर प्रीति केली॥ २५ हे यथार्थीक बापा,
जगानें तर तुला जाणलें नाहीं। परंतु म्या तुला जाणलें
आहे। आणि त्वां मला पाठविलें, असें त्यानी जाणलें आहे॥
२६ आणि म्या तुझें नांव त्यांस कळविलें आहे। आणि क
ळवीन, यासाठीं कीं ज्या प्रीतीनें त्वां मजवर प्रीति केली।
ती त्यांमध्यें व्हावी। आणि म्या त्यांमध्यें [व्हावें] ※

पर्व १८॥ १ येशू हीं बोलून आपल्यां शिष्यांसुद्धां बाहे
र केद्रोन ओहोळाच्या पलिकडे गेला। तेथे मळा होता। त्यां
त तो आणि त्याचे शिष्य गेले॥ २ आणि यहूदा। जो
त्याला परस्वाधीन करणार, त्यालाहि तो जागा कळला।
कां तर येशू आपल्यां शिष्यांसीं तेथे वेळोवेळ येकवट मि
ळत होता॥ ३ यास्तव यहूदा, मुख्य उपाध्ये व फारिशी
यांपासून पलक व हस्तक पावला असतां, फाणसें व मशाली
व शस्त्रें घेऊन तेथे येतो॥ ४ यास्तव येशू, सर्व जें आप
णावर येत होतें। तें जाणत असतां बाहेर जाऊन त्यांस
बोलला, तुह्मी कोणाला शोधितां? ५ त्यानी त्याला उत्तर दि
ल्हें, [कीं] येशू जो नाजोरेकर त्याला॥ येशू त्यांस बोलतो,
मी [तोच] आहें॥ आणि यहूदा, जो त्याचा परस्वाधीनकर

णारा। तोहि त्यांसहीत उभा होता॥ ६ तर मी [तोच]
आहें, हें तो त्यांस बोलतांच, ते मागें सरकून भूमीवर पड
ले॥ ७ यास्तव त्याने त्यांस फिरोन पुसलें, तुह्मी कोणाला
शोधितां? तेव्हां ते बोलले, येशू जो नाजोरी त्याला॥ ८ ये
शूने उत्तर दिल्हें। [कीं] मी तोच आहें। हें म्या तुह्मास सां
गितलें आहे। यास्तव जर तुह्मी मला शोधितां। तर यांस
जाउं द्या॥ ९ हें यासाठीं कीं त्याने जी गोष्ट ह्मटली। कीं
जे त्वां मला दिल्हे, त्यांतून म्या कोणी गमाविला नाहीं।
ती ही पूर्ण व्हावी॥ १० यावर शिमोनपेत्रसाजवळ तरवार
असतां, त्याने ती उपसली। आणि मुख्य उपाध्याच्या चाकराला
हाणल्याने। त्याचा उजवा कान कापून टाकला॥ आणि त्या चाक
राचें नांव मालख होतें॥ ११ यास्तव येशू पेत्रसाला बोलला,
तुह्मी तरवार म्यानांत घाल। बापाने जी वाटी मला दिल्ही,
ती म्या नच प्यावी कीं काय? ※

१२ यावर पतक व हजाराचा सरदार व यहूद्यांतील हस्तक।
यानी येशूला धरिलें। आणि त्याला बांधिलें। १३ मग
त्याला हान्नानाच्या जवळ पहिलें नेलें। कारण कीं कायाफा
जो त्या वर्षांत मुख्य उपाध्या होता, त्याचा तो सासरा हो
ता॥ १४ आणि ज्या कायाफाने यहूद्यांस बोध केला, कीं लोकां
करितां येक माणसाने मरावें हें उपयोगी आहे, तो हा होता ※
१५ तेव्हां शिमोनपेत्रस व दुसरा शिष्य येशूच्या मागें चा
लले॥ आणि तोच शिष्य मुख्य उपाध्याला माहीत असतां
ना येशूच्या संगतीं मुख्य उपाध्याच्या वाड्यांत गेला॥ १६ प
रंतु पेत्रस दरवाज्यासीं बाहेर उभा राहिला॥ यास्तव तो दु
सरा शिष्य जो मुख्य उपाध्याला माहीत होता, तो बाहेर
आला। आणि द्वारपाळीला सांगून पेत्रसाला आंत नेलें॥ १७ ते
व्हां ती तरणी द्वारपाळी पेत्रसाला ह्मणती, त्या माणसाच्या
शिष्यांतील तूंहि आहेस कीं नाहींस? तो ह्मणतो, मी नाहीं॥
१८ तेव्हां सोंव होतें, यास्तव चाकर व हस्तक कोळ

शांचा विस्तव करून उभे असतां शेकत होते। आणि त्यां
च्या संगतीं पेत्रस उभा असतांना शेकत होता ※ १९ ते
व्हां मुख्य उपाध्याने येशूला याच्या शिष्यांविषयीं आणि या
च्या उपदेशाविषयीं विचारिलें॥ २० येशूने त्याला उत्तर दि
ल्हें, [कीं] मी जगास उघडें बोललों। सभेंत व देवळांत।
जेथें यहूदी सर्वदां मिळतात, तेथें म्या सर्वकाळ शिकविलें आ
हे। आणि गुप्तांत कांहीं ह्मटलें नाहीं॥ २१ मला कां विचा
रितोस? मी ऐकणाऱ्यांस काय बोललों, तें त्यांस विचार॥ पाहा
जीं बोललों। तीं त्यांस ठाऊक आहेत॥ २२ आणि तो हीं
बोलत असतां हस्तकांतील येक, जवळ उभा असतां, येशूला चप
डाक देऊन बोलला, तूं मुख्य उपाध्याला असें उत्तर करितोस
[काय]? २३ येशूने त्याला उत्तर दिल्हें। [कीं] जर मी
वाईट बोललों। तर त्या वाइटाविषयींची साक्ष दे। परंतु
जर बरें। तर मला कां मारितोस? २४ त्यावर हान्नानानें
तो बांधलेला असतां। कायाफा जो मुख्य उपाध्या, त्याजवळ
पाठविला॥ २५ तेव्हां शिमोन्पेत्रस उभा असतांना शेकत
होता। यास्तव ते त्याला बोलले। तूंहि त्याच्या शिष्यांतील
कीं नाहींस? तो नकारितां बोलला। मी नाहीं॥ २६ मुख्य
उपाध्याच्या चाकरांतील येक, ज्याचा कान पेत्रसानें कापून
टाकिला त्याचा नातलग असतां बोलतो, म्या तुला त्यासही
त मळ्यांत न पाहिलें कीं काय? २७ यावर पेत्रसानें फिरो
न नकारिलें। आणि तेव्हांच कोंबडा आरडला ※

२८ त्यांनी येशूला तर कायाफाजवळून कचेरींत आणि
लें। तेव्हां सकाळ होती। आणि त्यांस विटाळ न व्हावा।
परंतु वल्हांडणाचें जेवावें। ह्मणोन ते कचेरींत न गेले॥
२९ यास्तव पिलातस त्यांच्या जवळ बाहेर येऊन बोलला।
तुह्मी ह्या माणसावर काय आरोप लावितां? ३० तेव्हां
ते उत्तर देण्यानें त्याला बोलले, जर तो वाईट करणारा
नसतां। तर आह्मी त्याला तुझ्या स्वाधीन केलें नसतें॥

३१ यावर पिलातस त्यांस बोलला। तुह्मी त्याला घ्या आणि तु
मच्या शास्त्राप्रमाणे त्याचा न्याय ठरवा॥ यावर यहूदी त्या
ला बोलले, कोणाचा जीव घेणें। हें आमच्याने होत नाहीं॥
३२ येशू, आपण कोणत्या मरणाने मरणार होता हें सु
चवीत असतां। जो गोष्ट बोलला। ती पूर्ण व्हावी ह्मणोन
[असें जालें] ※ ३३ यास्तव पिलातस फिरोन कचेरींत गेला,
आणि येशूला बोलावून त्याला ह्मणाला, तूं यहूद्यांचा राजा आ
हेस कीं काय?..३४ येशूने त्याला उत्तर दिल्हें। [कीं] तूं
स्वतां हें बोलतोस कीं काय? किंवा दुसऱ्याने तुला मजविष
यीं सांगितलें? ३५ पिलातसाने उत्तर दिल्हें। [कीं] मी यहूदी
आहें कीं काय? तुझे देशस्थ आणि मुख्य उपाध्ये यानी तुला
माझ्या स्वाधीन केलें आहे। त्वां काय केलें? ३६ येशूने उत्तर
दिल्हें। [कीं] माझें राज्य या जगाचें नाहीं। जर माझें राज्य
या जगाचें असतें, तर मी यहूद्यांच्या स्वाधीन केला न जावा,
ह्मणोन माझे सेवक झुंजले असते। परंतु आतां माझें राज्य येथी
ल नाहीं॥ ३७ तेव्हां पिलातस त्याला बोलला, तर तूं राजा
आहेस कीं काय? येशूने उत्तर दिल्हें, तूं ह्मणतोस तेंच। मी
राजा आहें॥ मी ह्यासाठीं जन्मलों। आणि ह्यासाठीं जगांत
आलों। कीं म्या खरेपणाविषयीं साक्ष द्यावी। प्रत्येक जो खरेप
णाचा आहे। तो माझी वाणी ऐकतो॥ ३८ पिलातस त्या
ला ह्मणतो। खरेपण काय आहे? आणि तो हें बोलून फि
रोन यहूद्यांजवळ बाहेर गेला। मग त्यांस ह्मणतो। याकडे
कांहीं अपराध मला सांपडत नाहीं॥ ३९ आणि तुह्मापाशीं
अशी चाल आहे, कीं वल्हांडणसणांत म्या तुह्मासाठीं येकाला
सोडावें। यास्तव म्या तुह्मासाठीं यहूद्यांच्या राजाला सोडा
वें। ह्मणोन इछितां कीं काय? ४० यावर सर्व फिरोन ओ
रडत बोलले। याला नको। परंतु बाराब्बाला॥ तर तो बा
राब्बा लुटारू होता ※

पर्व १९॥ १ यास्तव त्यानंतर पिलातसाने येशूला धरून

कड्या मारिल्या ॥ २ आणि सैनिकानीं कांट्यांचा मुगूट गुंफून
त्याच्या डोक्याला घातला। आणि जांवळें वस्त्र त्याला लेववून
३ ह्मटलें, हे यहूद्यांच्या राजा, सुखरूप ऐस ॥ मग त्यानीं
त्याला चपडाका मारिल्या ॥ ४ यावर पिलातस फिरोन बाहे
र जाऊन त्यांस ह्मणतो। त्याकडे कांहीं अपराध मला मिळत
नाहीं। हें तुह्मास कळावें ह्मणोन मी त्याला तुह्माजवळ बाहे
र आणितों। पाहा ॥ ५ यास्तव येशू कांट्याचा मुगूट आ
णि जांवळें वस्त्र वाह्यात असतां। बाहेर आला ॥ मग तो
त्यांस ह्मणतो। हा माणुस पाहा ॥ ६ यास्तव, जेव्हां मुख्य
उपाध्यानी व हस्तकानी त्याला पाहिलें। तेव्हां ओरडत ह्मटलें।
खांबीं मार। खांबीं मार ॥ पिलातस त्यांस ह्मणतो। तुह्मीच
त्याला घेऊन खांबीं मारा। कारण कीं मला त्याकडे अपराध
सांपडत नाहीं ॥ ७ यहूद्यानी त्याला उत्तर दिल्हें। [कीं] आ
ह्मास शास्त्र आहे। आणि आमच्या शास्त्राप्रमाणे त्याला म
रावें लागतें। कां तर त्याने आपणाला देवाचा पुत्र ह्मण
विला ॥ ८ यास्तव पिलातसाने ही गोष्ट ऐकल्यावर। अधी
कच भय धरिलें ॥ ९ मग तो फिरोन कचेरींत जाऊन येशू
ला ह्मणतो, तूं कोठला आहेस? परंतु येशूने त्याला उत्त
र न दिल्हें ॥ १० यास्तव पिलातस त्याला ह्मणतो। तूं म
जसीं बोलत नाहींस [काय?] तुला खांबीं मारायाचा अधिकार
मला आहे। आणि तुला सोडायाचा अधिकार मला आहे।
हें तुला कळलें नाहीं कीं काय? ११ येशूने उत्तर दिल्हें।
[कीं] वरून तुला दिल्यावांचून तुला मजवर कांहीं अधिकार
नसता। यासाठीं ज्याने मला तुह्मा स्वाधीन केलें। त्याचें
अधीक पाप आहे ॥ १२ तेव्हांपासून पिलातसाने त्यास
सोडायास यत्न केला। परंतु यहूदी ओरडत बोलले, जर
तूं ह्याला सोडितोस, तर कादसाराचा मित्र नाहींस ॥ प्रत्येक जो
आपणाला राजा ह्मणवितो, तो कादसाराविरुद्ध बोलतो ॥
१३ यावरून पिलातसाने ही गोष्ट ऐकून येशूला; बाहेर आ

पिलें, आणि। चिरेबंदी व इब्रीरूपें गाब्बाथा ह्मटलेला जागा।
तेथे न्यायासनावर तो बसला॥ १४ तेव्हां वल्हांडणसणासाठीं
सिद्धकरणें, आणि सुमारें दुपार होतो। तेव्हां तो यहूद्यां
स ह्मणतो। तुमचा राजा पाहा॥ १५ परंतु ते ओरडले।
ह्याला दूर कर। दूर कर। खांबीं मार॥ पिलातस त्यांस
ह्मणतो। मी तुमच्या राजाला खांबीं मारूं कीं काय? मु
ख्य उपाध्यानी उत्तर दिल्हें। [कीं] कायसारावांचून आमचा
राजा नाहीं॥ १६ तेव्हां यावरून त्याने तो खांबीं मारला जाव
यास त्यांच्या स्वाधीन केला॥ मग त्यानी येशूला घेऊन नेलें ※
१७ नंतर तो आपला मरणखांब वागवीत, कवटी ह्मट
लेला जागा। जो इब्रीने गलगथा ह्मटला आहे। तेथे बा
हेर गेला॥ १८ तेथे त्यानी त्याला, आणि त्यासुद्धां दुस
ऱ्यां दोघांस खांबीं मारिलें। यांस दोहिकडे व मध्यें येशूला
[असें मारिलें] ※ १९ आणि पिलातसाने पत्ताहि लिहून मरण
खांबावर लाविला। आणि असा लिहिला होता। येशू नाजोरी।
यहूद्यांचा राजा॥ २० तर, जेथे येशू खांबीं मारिला
होता। तें ठिकाण नगराजवळ होतें। आणि तो इब्रींत।
[व] हेल्लासींत व रोमींत लिहिला होता। यास्तव बहुत य
हूद्यानी वाचिला॥ २१ यावर यहूद्यांचे मुख्य उपाध्ये पिलातसा
ला बोलले। कीं यहूद्यांचा राजा असें लिहूं नको। परंतु
असें कीं त्यानेच ह्मटलें। मी यहूद्यांचा राजा आहें॥ २२ पि
लातसाने उत्तर दिल्हें। म्या जें लिहिलें। तें लिहिलें ※
२३ तेव्हां सैनिकानी येशूला खांबीं मारिल्यानंतर। त्याचीं व
स्त्रें घेतलीं। आणि प्रत्येक सैनिकासाठीं विभाग। [असे] चार विभा
ग केले। आणि आंगरखा [घेतला॥] तेव्हां आंगरखा शिवणीवां
चून वरपासून अगदी विणला होता॥ २४ यास्तव ते येकमेकांस
बोलले, हा न फाडूं। परंतु कोणाचा होईल। असे याविषयीं प
ण करूं। [हें] अशास्तव। कीं जो धर्मलेख ह्मणतो। [कीं] त्यानी
आपणांमध्यें माझीं वस्त्रें वांटलीं, आणि माझ्या पांघरूणावर प

ण घातला। तो पूर्ण व्हावा॥ सैनिकांनी तर हीं केलीं होतीं ※
२५ तेव्हां येशूच्या मरणखांबाजवळ त्याची आई। आणि
क्लोपासाची [स्त्री] मारया जी त्याची मावशी ती। आणि मा
रया माग्दालीण, ह्या उभ्या राहात होत्या॥ २६ यास्तव ये
शू आईला। आणि ज्या शिष्यावर आपण प्रीति केली। त्या
ला जवळ उभा राहातां पाहून। आपल्या आईला ह्मणतो।
हे स्त्री पाहा। तुझा पुत्र॥ २७ नंतर त्या शिष्याला ह्मणतो।
पाहा, तुझी आई॥ तेव्हां त्या घटिकेपासून त्या शिष्यानें तिला आ
पल्यांमध्यें घेतलें ※ २८ यानंतर अवघीं तितक्यांत समाप्त
जालीं। हें येशू पाहून। धर्मलेख पूर्ण व्हावयास, ह्मणतो। मला
ताहान लागली आहे॥ २९ तर तेथें आंबीनें भरलेलें भां
डें ठेविलें होतें। आणि त्यांनीं बादल आंबीनें भरून जुफा
वर ठेवून त्याच्या तोंडाशीं लावली॥ ३० यास्तव येशूनें आंब
घेतल्यानंतर ह्मटलें। पूर्ण जालें आहे। मग मस्तक लववून
प्राण सोडिला ※

३१ यावर। सिद्ध करण्याची वेळ होती, आणखी तो शा
ब्बाथ मोटा दिवस होता, यास्तव शाब्बाथांत त्यांच्या कुडी
खांबावर न राहाव्या ह्मणोन त्यांचे पाय मोडावे आणि [त्यां
स] न्यावें। असें यहूद्यांनीं पिलातसाजवळ मागितलें॥ ३२ या
स्तव सैनिकांनी येऊन त्यासहीत खांबीं मारलेल्या पहिल्याचे
व दुसऱ्याचे [पाय] मोडिले खरे॥ ३३ परंतु येशूजवळ येऊन
त्याला तितक्यांत मेलेला पाहिला। आणि त्याचे पाय मोडिले
नाहींत॥ ३४ तथापि सैनिकांतील येकानें त्याची कूस भाल्या
कडून भोसकिली, आणि तेव्हांच रक्त व पाणी बाहेर आलीं॥
३५ तेव्हां ज्यानें पाहिलें। त्यानें साक्ष दिल्ही। आणि त्याची
साक्ष खरी आहे। आणि तुह्मी विश्वास धरावा। यासाठीं तो
खरें बोलतो, हें त्याला कळलें आहे॥ ३६ तर हीं यासाठीं
जालीं। कीं हा धर्मलेख पूर्ण व्हावा। त्याचें हाड मोडलें जाणार
नाहीं॥ ३७ आणि फिरोन दुसरा धर्मलेख ह्मणतो। ज्याला त्या

नी भेंसकिलें, त्याकडे दृष्टी लावितील ※
३८ आणि यानंतर हारिमाथाईतला योसेफ। जो येशूचा
शिष्य। परंतु यहूद्यांच्या भयामुळें गुप्त होता। त्याने येशूची
कूड न्यावयास पिलातसाजवळ मागितली। तेव्हां पिलातसाने मान्य
केलें॥ यास्तव त्याने येऊन येशूची कूड काढिली॥ ३९ आणि
निकदेमसहि। जो पहिल्याने राचीं येशूजवळ आला। तो बो
ळ व अगरू यांची मिसळ सुमारें शंभर शेर घेऊन आला॥
४० यास्तव ह्मांनी येशूची कूड घेतली। आणि यहूद्यांच्या
उत्तरकार्याच्या रितीप्रमाणे सुवासीकांसुद्धां आळशीच्या वस्त्रा
नी त्याला गुंडाळिलें॥ ४१ तेव्हां जेथे तो खांबीं मारिला
होता, त्या ठिकाणीं मळा होता। आणि त्या मळ्यांत नवें प्रे
तपेंव। ज्यांत कोणीहि तोंपर्यंत ठेविलें नाहीं। असें [होतें॥]
४२ यास्तव यहूद्यांच्या सिद्धकरण्यामुळें त्यांनी येशूला तेथे
ठेविलें। कां तर। तें प्रेतपेंव जवळ होतें ※
पर्व २०॥ १ तेव्हां साच्याच्या प्रथम वारीं, सकाळीं काळोख
होता। तितक्यांत मारया माग्दालीण प्रेतपेंवाजवळ येती। आणि
प्रेतपेंवापासून धोंड काढलेली पाहाती॥ २ यास्तव ती धांवून
शिमोनपेत्रसाजवळ। आणि ज्या दुसऱ्या शिष्यावर येशूने प्रीति
केली। त्याजवळ येती। आणि त्यांस ह्मणती। [कीं] त्यांनी
प्रभूला प्रेतपेंवांतून नेलें। आणि त्याला कोठे ठेविलें। हें आ
ह्मांस कळलें नाहीं॥ ३ यावर पेत्रस आणि तो दुसरा शि
ष्य निघून प्रेतपेंवास जात होते। ४ तेव्हां ते दोघे संगतीं धां
वले। आणि तो दुसरा शिष्य पेत्रसापेक्षां लवकर धांवून,
प्रेतपेंवास प्रथम आला॥ ५ आणि ओणवा होऊन। त्याने आळशी
चीं वस्त्रें ठेविलेलीं पाहिलीं, तथापि आंत गेला नाहीं॥
६ शिमोनपेत्रस तर त्याच्या मागें चालत येतो। मग प्रेतपें
वांत गेला। आणि आळशीचीं वस्त्रें ठेविलेलीं। ७ आणि जो हा
टी त्याच्या डोक्याला होती, ती प्रेतवस्त्रांसुद्धां ठेविली नव्हती।
परंतु वेगळी येका ठिकाणीं घड्या केलेली पाहिली॥ ८ मग

यावरून दुसरा शिष्य। जो प्रेतपेंवाजवळ प्रथम आला, तो
हि आंत गेला। आणि त्याने पाहिलें व विश्वास धरला ॥ ९ कां
रण कीं त्याला मेलेल्यांतून पुन्हा उठणें लागतें। हा धर्मलेख
तोंपर्यंतहि ते समजले नव्हते ॥ १० तेव्हां ते शिष्य फिरोन आ
पल्यांकडे गेले ※ ११ परंतु मारया बाहेर प्रेतपेंवाजवळ
रडत उभी राहिली ॥ यास्तव ती रडत असतां। प्रेत
पेंवांत डोकावीत होती। १२ तेव्हां जेथे येशूची कूड रा
हिली होती। तेथे पांढरीं [वस्त्रें] ल्यालेले दोन दूत।
येक मस्तकजाग्यापाशीं, आणि येक पायजाग्यापाशीं। व
सलेले तिने पाहिले ॥ १३ मग ते तिला ह्मणतात।
हे स्त्री। तूं कां रडतीस? ती त्यांस ह्मणती। यासाठीं कीं
त्यांनी माझ्या प्रभूला नेलें। आणि त्याला कोठे ठेविलें असेल
हें मला कळलें नाहीं ॥ १४ मग ती हीं बोलून पाठमोरी फि
रली। आणि उभ्या राहिलेल्या येशूला पाहाती। परंतु येशू
आहे। असें ती न समजली ॥ १५ येशू तिला ह्मणतो, हे
स्त्री। तूं कां रडतीस? कोणाला शोधितीस? तो माळी आ
हे असें तिला वाटून, ती त्याला ह्मणती। हे दादा। जर
तां त्याला येथून नेलें, तर त्याला कोठे ठेविलें हें मला
सांग। मग मी त्याला नेईन ॥ १६ येशू तिला ह्मणतो,
हे मारये ॥ ती मुरडून त्याला ह्मणती। राब्बूनी। ह्मणजे।
हे गुरू ॥ १७ येशू तिला ह्मणतो। माझ्या बापाजवळ चढ
णें आजून मला जालें नाहीं। यास्तव मला शिवूं नको। प
रंतु माझ्यां भावांजवळ जाऊन त्यांस सांग। जो माझा बा
प व तुमचा बाप, आणि माझा देव व तुमचा देव। त्याजवळ
चढतों ॥ १८ मारयामाग्दालिणीने जाऊन शिष्यांस सां
गितलें। कीं आपण प्रभूला पाहिलें, आणि आपणाला त्याने
हीं सांगितलीं आहेत ※

१९ तर सात्याचा पहिला जो त्याच दिवसीं। सांज जा
ली असतां, आणि जेथे यहूद्यांच्या भयामुळें शिष्य मिळाले

होते। तेथे दारें बंद केलीं असतां। येशू येऊन [त्यां]मध्यें उभा असतांना त्यांस ह्मणतो। तुह्मास स्वस्थपण [असो॥] २० आणि हें बोलून, त्याने आपले हात व कूस त्यांस दाखविलीं॥ यास्तव शिष्य प्रभूला पाहून आनंद पावले॥ २१ यावर येशू फिरोन त्यांस बोलला, तुह्मास स्वस्थपण [असो।] जसें बापाने मला पाठविलें, तसें मीहि तुह्मास पाठवितो॥ २२ आणि तो हें बोलून। [त्यांज]वर फुंकून त्यांस ह्मणतो, तुह्मी पवित्र आत्मा घ्या॥ २३ तुह्मी ज्यां कोणांचीं पापें सोडितां। तीं त्यांस सोडलीं जातात। [आणि] ज्यां कोणांचीं तुह्मी धरितां। तीं धरलीं जातात ॐ

२४ परंतु जेव्हां येशू आला। तेव्हां बारा शिष्यांतील येक। जो थोमा दीदुमस ह्मटलेला। तो त्यांसहीत नव्हता॥ २५ यास्तव दुसरे शिष्य त्याला बोलले। आह्मी प्रभूला पाहिलें आहे॥ तेव्हां तो त्यांस बोलला। म्या त्याच्यां हातांस खिळ्यांची खूण पाहिल्यावांचून। आणि खिळ्यांच्या खुणेंत बोट घातल्यावांचून। आणि त्याच्या कुशींत माझा हात घातल्यावांचून। मी विश्वासणारच नाहीं ॐ २६ मग आठ दिवसांनंतर त्याचे शिष्य फिरोन आंत होते। आणि त्यांसहीत थोमा [होता॥ तेव्हां] दारें बंद केलीं असतां। येशू येऊन मध्यें उभा असतांना बोलला। तुह्मास स्वस्थपण [असो॥] २७ नंतर थोमाला ह्मणतो। तुझें बोट इकडे करून माझे हात पाहा। आणि तुझा हात लांबवून माझ्या कुशींत घाल। मग अविश्वासी होउं नको। परंतु विश्वासी [हो॥] २८ तेव्हां थोमाने उत्तर देण्यांत त्याला असें ह्मटलें। माझा प्रभू, माझा देवच॥ २९ येशू त्याला ह्मणतो। हे थोमा। त्वां मला पाहिलें यास्तव विश्वास केला। जे न पाहून विश्वासले। ते धन्य ॐ

३० तर येशूने आपल्यां शिष्यांच्या समक्ष बहुत दुसरेहि चमत्कार जे ह्या पुस्तकांत लिहिले नाहींत। ते केले खरें।

३१ परंतु येशू तो ख्रीस्त। तो देवाचा पुत्र आहे। असा वि
श्वास तुह्मी धरावा। आणखी विश्वास धरून। त्याच्या नां
वाकडून तुह्मास जिवन व्हावें ह्मणोन हीं लिहिलीं आहेत ※
पर्व २१ ॥ १ यानंतर तिबेरयासाच्या समुद्राजवळ येशूने
आपणाला शिष्यांसीं फिरोन दाखविलें। तेव्हां असें दाखवि
लें, कीं २ शिमोन्पेत्रस। व थोमा जो दीदुमस ह्मटलेला।
व नथानेल जो गालिलांतील कान्याचा। व जेबेदीचे [पुत्र।] व
त्याच्यां शिष्यांतील दुसरे दोन। हे येकवट होते ॥ ३ शिमोन
पेत्रस त्यांस ह्मणतो। मी मासे धरायाला जातों ॥ ते त्या
ला ह्मणतात। आह्मीहि तुझ्या संगतीं येतों ॥ तेव्हांच ते नि
घून तारवावर चढले। आणि त्या रात्रीं त्यानी कांहीं ध
रिलें नाहीं ॥ ४ मग इतक्यांत सकाळ आली असतां। ये
शू समुद्राच्या तिरीं उभा होता। तथापि तो येशू आहे।
असें शिष्य न समजले ॥ ५ यावर येशू त्यांस ह्मणतो।
अहो मुलें। तुह्मास कांहीं भक्ष्य आहे कीं काय? त्यानी त्या
ला उत्तर दिल्हें। [कीं] नाहीं ॥ ६ तेव्हां तो त्यांस बोलला।
तुह्मी तारवाच्या उजव्या अंगीं जाळें टाका, मग तुह्मी पा
वाल ॥ यास्तव त्यानी टाकिलें। आणि मग माशांच्या घोळ
क्यामुळें। ते ओढायास न शकले ॥ ७ यास्तव ज्या शिष्या
वर येशूने प्रीति केली होती। तो पेत्रसाला ह्मणतो। प्रभू आ
हे ॥ यास्तव शिमोन्पेत्रसाने। प्रभू आहे हें ऐकून। बाहेर
लें पांघरूण लेवून आंवळलें, कारण कीं तो उघडा हो
ता। मग समुद्रांत उडी घातली ॥ ८ नंतर दुसरे शिष्य होड
क्याने आले। कारण कीं कांठापासून सुमारें दोन शें हात यांहून
दूर नव्हते। [तेव्हां] त्यानी माशांचें जाळें ओढिलें ॥ ९ यावर कां
ठीं उतरले असतां कोंळशांचा विस्तव घातलेला, आणि त्यावर
मासळी घातलेली आणि भाकर हीं पाहिलीं ॥ १० येशू त्यां
स ह्मणतो। तुह्मी आतां धरलेल्यां मासळ्यांतून आणा ॥
११ शिमोन्पेत्रस चढला, आणि येकशें त्रेपन्न मोठ्या माशां

नी भरलेलें जाळें हें त्यानी कांठास ओढिलें॥ तेव्हां तितके
असतां। जाळें फाटलें नाहीं॥ १२ येशू त्यांस ह्मणतो।
या। जेवा॥ आणि तो प्रभू आहे, हें त्यांस कळलें अस
तां, तूं कोण आहेस। हें त्याला पुसायास शिष्यांतील को
णी धजला नाहीं॥ १३ यावर येशू येतो। आणि भाकर
घेऊन त्यांस देतो। आणि तसें मासळ्याहि॥ १४ येशू म
लेल्यांमधून उठल्यावर, इतक्यांत ह्या तिसऱ्या वेळेस आप
ल्या शिष्यांस प्रगट जाला॥

१५ यावर ते जेवल्यानंतर, येशू शिमोन्पेत्रसाला ह्मण
तो, योनाच्या [पुत्रा,] शिमोना, ह्यांहून तूं मजवर अ
धीक प्रीति करितोस कीं काय? हा त्याला ह्मणतो, हे प्र
भू, होय, मी तुजवर प्रीति करितों, हें तुला कळलें आ
हे॥ हा त्याला ह्मणतो। माझ्यां लाहान मेंढ्रांस चरीव॥
१६ फिरोन दुसरेदां त्याला ह्मणतो। योनाच्या शिमोना।
मजवर प्रीति करितोस कीं काय? हा त्याला ह्मणतो। हे
प्रभू, होय। मी तुजवर प्रीति करितों। हें तुला कळलें
आहे॥ हा त्याला ह्मणतो, माझ्यां मेंढ्रांस पाळ॥ १७ ति
सऱ्याने तो त्याला ह्मणतो, योनाच्या शिमोना। मजवर प्रीति क
रितोस कीं काय? तीन वेळा त्याने त्याला ह्मटलें, मजवर
प्रीति करितोस कीं काय? यास्तव पेत्रस खेद पावला आणि
त्याला बोलला। हे प्रभू, तुला अवघें कळलें। मी तुजवर प्री
ति करितों। हें तूं जाणतोस॥ येशू त्याला ह्मणतो। मा
झ्यां मेंढ्रांस चरीव॥ १८ मी तुला खचीत खचीत सांगतों।
जेव्हां तूं तरूण होतास। तेव्हां तूं आपली कंबर बांधून।
जेथे तुझी इछा जाली, तेथे हिंडलास। परंतु जेव्हां तूं वृ
द्ध होसील। तेव्हां आपले हात लांबविसील। आणि दुसरा
तुला बांधून। जेथे तुझी इछा नाहीं। तेथे नेईल॥
१९ कशा मरणाने तो देवाचें गौरव करणार, हें सुचवि
तांना त्याने असें सांगितलें॥ मग तो हें सांगून त्याला ह्म

णतो. तूं माझ्या मागें ये॥ २० तेव्हां पेत्रस मुरडून; ज्या
शिष्यावर येशूने प्रीति केली. आणि जो जेवणाच्या वेळेस
त्याच्या उराशीं टेंकला असतां ह्मणाला. हे प्रभू. तुला पर
स्वाधीन करणारा तो कोणता आहे? त्याला मागें चालतां
पाहातो॥ २१ मग पेत्रस त्याला पाहून येशूला ह्मणतो. हे
प्रभू. हा काय [करील]? २२ येशू त्याला ह्मणतो. मी
येतों तोंपर्यंत त्याने राहावें. ह्मणोन जर मी इच्छितों.
तर [तें] तुला काय? तूं माझ्या मागें ये॥ २३ यास्तव तो
शिष्य मरणार नाहीं. ही गोष्ट भावांमध्यें निघाली. तथा
पि तो मरणार नाहीं. असें येशूने त्याला सांगितलें नाहीं.
परंतु मी येतों तोंपर्यंत त्याने राहावें. ह्मणोन जर मी इ
च्छितों. तर [तें] तुला काय? ※

२४ ज्या शिष्याने ह्यांविषयीं साक्ष दिल्ही. आणि हीं लिहि
लीं. तोच हा आहे. आणि त्याची साक्ष खरी आहे. हें
आह्मी जाणतों॥ २५ आणि येशूने इतकीं केलीं. [कीं] इ
तरींहि बहुत आहेत. तीं. जर प्रत्येक लिहिलें. तरी हें
जग लिहिलेल्यां पुस्तकांचें धारण करणार नाहीं. असें म
ला वाटतें॥ आमेन ※

प्रेषितांचे वृत्तांत ॥

पर्व १ ॥ १ । २ हे थ्यफिलसा । येशूने जे प्रेषीत निवडिले।
त्यांस पवित्र आत्म्याकडून आज्ञा देऊन। तो वर घेतला गे
ला। त्या दिवसापर्यंत, जीं तो करूं आणि शिकवूंहि लागला,
त्यां सर्वांविषयीं पूर्व, ग्रंथ, तर म्या रचिली आहे॥ ३ ते
व्हां, त्याने सोसल्यानंतर आपण बहुत खुणांवरून त्यांजवळ
जिवंत उभा राहिला॥ चाळीस दिवसांपावेतों त्यांकडून पाहि
ला [गेला,] आणि देवाच्या राज्याविषयीं जों तीं बोलला॥
४ आणि त्याने त्यांसहीत मिळून त्यांस आज्ञा दिल्ही। कीं
*यरूशलेमापासून न जावें, परंतु [तेथे] बापाच्या वचनाची वाट पा
हावी। तें तुह्मी मजवळून ऐकिलें आहे। ५ कीं योहानाने पाण्या
कडून बाप्तीस्मा केला खरें। परंतु बहुत दिवस न जातां, तुम
चा बाप्तीस्मा पवित्र आत्म्याकडून केला जाईल॥ ६ यास्तव ते
मिळाले असतां ह्मणाले। हे प्रभू। तूं या वेळेस इस्राएला
चें राज्य फिरोन स्थापसील कीं काय? [असें] त्यानी त्या
ला विचारिलें खरें। ७ परंतु तो त्यांस बोलला। जे का
ळ अथवा समय बापाने आपल्या स्वाधीन ठेविले आहेत।
त्यांस जाणणें हें तुमचें नव्हे॥ ८ तथापि पवित्र आत्मा तुह्मावर
आल्यानंतर। तुह्मी सामर्थ्य पावाल। आणि यरूशलेम। व
अवघा यहूद। व शोमरोन। यांत। आणि पृथ्वीच्या शेवटापर्यंत
हि तुह्मी माझे साक्षी व्हाल॥ ९ तेव्हां तो। हीं बोलून। ते पा
हात असतां। उचलला गेला। आणि ढगाने त्याला त्यांच्या दृ
ष्टींतून झांकून घेतलें॥ १० तेव्हां तो गेल्यावर। ते आकाशाकडे

ह्योर अवलोकन करीत असतांना। पाहा। पांढरीं वस्त्रें ल्या
लेले दोन पुरुष त्यांच्या जवळ उभे राहिले॥ ११ आणि ते
बोलले। [कीं] अहो गालिली माणसें, तुह्मीं आकाशांत पाहात
कां उभीं राहातां? "हाच येशू, जो तुह्मापासून आकाशांत वर
घेतला। तो ज्या प्रकाराने आकाशांत जातां। तुह्मी पाहिला।"
त्याप्रमाणे येईल॥ १२ नंतर। जाइती ह्मटलेला डों
गर, जो शाब्बाथाच्या वाटेइतका यरुशलेमाच्या जवळ आ
हे। त्यापासून हे यरुशलेमास परतले॥ १३ आणि आंत
आल्यावर, पेत्रस। व याकोबहि। व योहान्न, व आंद्रेयास। फि
लीप्पस। व थोमा, बार्थलमी। व मात्थी। आलफीचा [पुत्र] या
कोब, व शिमोन जो जेलोतेस तो। व याकोबाचा [भाउ] यहू
दा। हे जेथे राहात होते, त्या माडीवर चढले॥ १४ हे स
र्व। स्त्रीयांसुद्धां। येशूची आईहि मारया। व त्याचे भा
ऊ। यांसुद्धां। येकचित्ताने प्रार्थनेंत व विनंतींत तत्पर राहा
त होते॥

१५ आणि नांवांची संख्या येकून सुमारें येक शें वीस ये
वढी होती॥ तेव्हां त्यां दिवसांत पेत्रस, शिष्यांच्या मध्यें
उठून। बोलला। १६ अहो भाऊमाणसें, ज्यांनी येशूला
धरिलें। त्यांचा वाटाड्या यहूदा जो होता। त्याविषयीं पवि
त्र आत्म्याने दाविदाच्या तोंडाकडून पूर्वीं सांगितला। तो धर्म
लेख पूर्ण जाला पाहिजे। १७ कां कीं तो आह्मांसुद्धां गण
लेला होता। आणि ह्या सेवेचा वांटा पावला॥ १८ त्याने
तर। अन्यायाच्या मोलाने, ठिकाण मिळविलें। परंतु पाल
था पडून मध्यें फुटला, आणि त्याचीं सर्व आंतडीं बाहेर
उसळलीं॥ १९ आणि यरुशलेमांतील अवघ्यां राहाणाऱ्यांस तें
येवढें कळलें। कीं तें ठिकाण त्यांच्या स्वकीय भाषेंत हाकेल्दमा।
ह्मणजे रक्ताचें ठिकाण। [असें] ह्मटलें जातें॥ २० तर गी
तांच्या पुस्तकांत असें लिहिलें आहे। त्याची वस्ती ओसाड
होवो। आणि तींत कोणी वसणारा न होवो। आणि त्याचें

पाहाणीकाम दुसऱ्याने घ्यावें ॥ २१, २२ यास्तव योहान्नाच्या बाप्तीस्म्यापासून आरंभून। ज्या दिवशीं प्रभू येशू आह्मापासून वर घेतला गेला तोंपर्यंत। तो आह्माजवळ आंत येत व बाहेर जात होता, त्या सर्व वेळेस। जीं माणसें आह्मासहीत चालत होतीं, त्यांतून [कोणी] त्याच्या पुन्हा उठण्याचा साक्षी आह्मासुद्धां व्हावा लागतो ॥ २३ मग त्यांनी योसेफ। जो बार्साबा ह्मटला। ज्याचें उपनांव यूस्तस। तो व मात्थया। हे दोघे उभारिले होते॥ २४, २५ तेव्हां ते प्रार्थना करीत बोलले, हे प्रभू। तूं सर्वांचा हृदयजाणणारा। ही सेवा ह्मणजे प्रेषितपण। ज्यावरून यहूदाने आपल्या ठिकाणास जाण्यासाठीं उल्लंघिलें। त्याचा वांटा घ्यावयास। या दोघांतून कोणत्याला तां निवडिलें, हें दाखीव॥ २६ मग त्यांनी आपल्या नेमखुणा दिल्ह्या, आणि मात्थयावर नेमखूण पडली। नंतर तो त्यां अकरा प्रेषितांसहीत गणला गेला ॥

पर्व २ ॥ १ मग पन्नासीचा दिवस भरत असतां। ते सर्व येकचित्ताने येकत्र होते॥ २ तेव्हां मोठ्या वाहात्या वाऱ्यासारिखा आकाशांतून नाद अकस्मात जाला। आणि जेथे ते बसले होते। तें सर्व घर त्याने भरलें॥ ३ आणि अग्नीसारिख्या वांटलेल्या जिभा त्यांस दिसल्या, आणि तो त्यांमधील प्रत्येकावर बसला॥ ४ मग ते सर्व पवित्र आत्म्याने भरले। आणि आत्म्याने त्यांस जसें परमोच्चारण दिल्हें। तसें ते दुसऱ्या भाषांनी बोलूं लागले॥ ५ तेव्हां आकाशाखालच्या प्रतिराष्ट्रांतून परमार्थीक माणसें। [असे] यहूदी यरूशलेमांत राहात होते॥ ६ तर त्याची वदंता जाल्यावर, भरणा मिळाला। आणि। त्यांतील प्रत्येकाने आपापल्या बोलीने त्यांस बोलतां ऐकिलें, यास्तव ते थक्क जाले॥ ७ आणि ते सर्व विस्मीत व चमत्कारीत होऊन येकमेकांस बोलले, कीं पाहा। हे बोलणारे सर्व गालिली नाहींत कीं काय? ८ तर आह्मी प्रत्येक आपापल्या ज्या बोलींत जन्मलों। तींत कसें ऐकतों? ९ पार्थी व मा

दी व एलामी। आणि अरामनाहाराइमांत। यहूदांतहि। व का
प्पादकींत, पंतसांत, व आशींत, १० फ्रुगींतहि व पांफुलींत।
मिसरांत। व कुरेनेजवळील फूट[देशा]च्या भागांत। जे वसणारे।
रोमी विदेशी। यहूदीहि। व अनुसारी। ११ क्रेती व आर्बी।
आह्मी त्यांस, आमच्या भाषानी देवाचीं थोरलीं, तीं बोलतां
ऐकतों॥ १२ आणि ते सर्व विस्मीत व संशययुक्त होऊन कोणी
कोणाला बोलले। कीं हें काय होत असेल? १३ परंतु दुस
रे विटंबना करीत बोलले। कीं हे मधूर द्राक्षरसाने भरले
आहेत※ १४ तेव्हां पेत्रसाने त्यां अकरांसुद्धां उभें राहून
आपला शब्द उंच करीत" त्यांसीं परमोचार केला। [कीं]
अहो यहूदी माणसें। आणि सर्व जे यरूशलेमांतील राहाणा
रे, त्यां तुह्मास हें कळलें जावो। आणि माझ्या गोष्टी कानांत
वसुं द्या॥ १५ कारण कीं, दिवसाचा पहिला प्रहर अस
ल्यावरून। हे, तुह्मी कल्पितां। असे मद्य प्यालेले नाहींत॥
१६ परंतु योवेलभविष्यभाष्याकडून जें सांगितलें तें हेंच
आहे, १७ कीं देव बोलतो। शेवटल्यां दिवसांत असें
होईल, [कीं] अवघ्या मासजातीवर मी आपल्या आत्म्यांतून
वोतीन। मग तुमचे पुत्र व तुमच्या कन्या भविष्य बोलतील।
आणि तुमचे तरूण दृष्टांत पाहातील, आणि तुमचे ह्मात
रे स्वप्न पाहातील॥ १८ आणखी त्यां दिवसांत, माझे दास
व माझ्या दासी, यांवर मी आपल्या आत्म्यांतून वोतीन।
तेव्हां ते भविष्य बोलतील॥ १९ आणि वर आकाशांत उत्पा
त, व खालीं पृथ्वींत साक्षात्कार। रक्त व अग्नी व धुराचें धु
र्कें, हीं मी देईन॥ २० प्रभूचा जो मोठा व तेजस्वी दिवस
याच्या येण्यापूर्वीं सूर्य अंधाररूप। व चंद्र रक्तरूप [असे]
पालटले जातील। २१ आणि असें होईल। [कीं] जो को
णी प्रभूच्या नांवाने हाक मारील। तो तारला जाईल॥
२२ अहो इस्राएली माणसें, तुह्मी ह्या गोष्टी ऐका। ये
शू नाजोरी। तो माणुस। चमत्कार। व उत्पात। व

साक्षात्कार। जे देवाने त्याकडून तुह्मामध्यें। जसे तुह्मी आपणां
सहि कळलें तसे केले, त्याकडून तुह्माजवळ। देवापासून [असा]
उघाड दाखविलेला। २३ तोच। देवाचा नेमलेला बेत व भ
विष्यज्ञान। यांकडून सोपून दिल्हा असतां, तुह्मी त्याला धरून
शास्त्रभंग्या हातांनी खिळून घात केला आहे॥ २४ देवाने मर.
णाचीं बंधनें सोडून त्याला उठविलें, कां तर त्याने त्याक
डून धरलेलें राहावें। हें शक्य नव्हतें॥ २५ कारण कीं त्या
विषयीं दावीद ह्मणतो। म्या आपल्या समोर प्रभूला अखंड
पाहिलें। यास्तव कीं मी हालविला न जावयास, तो मा
झ्या उजव्याकडे आहे॥ २६ याकरितां माझें हृदय आनंदो
त जालें। आणि माझी जीभ हर्षीत जाली। आणखी माझें
मासहि देखील आशेवर वस्ती करील। २७ कां कीं तूं माझा
प्राण लोकांतरीं सोडून देणार नाहींस। आणि आपल्या पुण्यवा
नाला सडलेपण अनुभवुं देणार नाहींस॥ २८ त्वां मला जिवना
च्या वाटा कळविल्या आहेत॥ तूं आपल्या तोंडाकडून मला आ
नंदाने भरसील॥ २९ अहो भाऊमाणसें, जो आदिवडी
ल दावीद। त्याविषयीं तुह्माशीं उघडेपणाने बोलायास
योग्य आहे, कीं तो मेला। आणि पुरलाहि आहे। आणि
त्याचें थडें आजपर्यंत आह्मामध्यें आहे॥ ३० यास्तव तो भ
विष्यभाषी असून। आणि असें पाहून। कीं आपल्या सिंहा
सनावर बसायासाठीं, देहाप्रमाणे आपल्या कंबरेच्या फळांतून
देवाने ख्रीस्ताला उठवावें, ह्मणोन शपतेने त्याला प्रमाण दि
ल्हें, ३१ [हें] पूर्वीं पाहून ख्रीस्ताच्या पुन्हा उठण्याविषयीं
बोलला। कीं त्याचा प्राण लोकांतरीं सोडला न गेला, आ
णि त्याच्या मासाला सडलेपण प्राप्त जालें नाहीं॥ ३२ त्या ये
शूला देवाने उठविलें आहे। याचे आह्मी सर्व साक्षी आहों॥
३३ यास्तव तो देवाच्या उजव्याकडे उंचावला होऊन, आ
णि बापापासून पवित्र आत्म्याचें वचन पावून, जें तुह्मी आ
तां पाहातां आणि ऐकतां। तें त्याने वोतिलें आहे॥ ३४।

३५ कीं तर दावीद आकाशांमध्यें चढला नाहीं। परंतु तो
च ह्मणतो। प्रभूने माझ्या प्रभूला ह्मटलें, मी तुझे वैरी
तुझ्यां पायांचें आसन ठेवीन। तोंपर्यंत तूं माझ्या उजव्याक
डे बैस॥ ३६ यास्तव सर्व इस्राएलघराणें निर्धारें जाणो,
कीं ज्या येशूला तुह्मीं खांबीं मारिलें, तोच देवाने प्रभू व
ख्रीस्त केला आहे॥

३७ तेव्हां ते ऐकून हृदयांत फार खोंचले गेले। आणि पेत्र
साला व दुसऱ्यां प्रेषितांस बोलले। अहो भाऊमाणसें। आ
ह्मी काय करूं? ३८ नंतर पेत्रस त्यांस बोलला। पापांची
क्षमा होण्यासाठीं, तुह्मी पश्चात्ताप करा। आणि येशूख्री
स्ताच्या नांवाने तुह्मामधील प्रत्येकाचा बाप्तिस्मा होवो। मग
तुह्मी पवित्र आत्मा। हें दान पावाल॥ ३९ कारण कीं तें व
चन तुह्मास, व तुमच्यां लेंकरांस। व सर्व दूरच्यांस। जितक्यां
स प्रभू आमचा देव बोलावील। त्यांस आहे॥ ४० आणखी
त्याने बहुत दुसऱ्या गोष्टीनी प्रमाण पटविलें। आणि उपदे
शीत ह्मटलें। तुह्मी आपणांस ह्या वांकड्या पिढीपासू
न वांचवा॥ ४१ तर यावरून ज्यानी त्याची गोष्ट आनंदा
ने अंगिकारिली। त्यांचा बाप्तिस्मा केला गेला। आणि त्या
दिवशीं। सुमारें तीन हज़ार प्राणी [त्यां]कडे मिळाले॥ ४२ आ
णि प्रेषितांचा उपदेश। व भागिपण व भाकरमोडणें। व प्रा
र्थनांकरणें। यांमध्यें ते तत्पर राहात होते॥ ४३ तेव्हां प्रत्ये
क प्राण्याला भय जालें, आणि प्रेषितांकडून बहुत उत्पात व
चमत्कार घडले॥ ४४ आणि सर्व विश्वासणारे येकवट होते,
आणि त्यानी अवघींच समायीक मानलीं। ४५ आणि [आपलीं]
भूधनें व वस्तभावा हीं विकलीं। मग जसें प्रत्येकाला अगत्य होतें,
तसें तीं सर्वांस वांटून दिल्हीं॥ ४६ तेव्हां ते येकचित्ताने प्र
ति दिवशीं देवळांत तत्पर राहातां। आणि घरोघरींहि भाकर
मोडितां। हर्षाने व हृदयाच्या भोळेपणाने आपलें अन्न वांटू
न पावले। ४७ देवाची स्तुती करीत। आणि अवघ्या लोका

जवळ कृपा पावत [होते॥] आणि जे तारिले। त्यांस प्रभूने
मंडळींत प्रति दिवसीं लाविलें ॥

पर्व ३॥ १ आणि प्रार्थनेच्या। [ह्मणजे] नवव्या होरेस।
पेत्रस व योहान्न बराबर देवळाकडे चढले॥ २ तेव्हां कोणी मा
णुस। आपल्या आईच्या पोटापासून पांगळा असतां। आणि
ला होता। तो देवळांत जाणाऱ्यांपासीं भीक मागायास। देव
ळाच्या सुंदर ह्मटलेल्या दरवाज्याजवळ। प्रति दिवसीं त्यानी
ठेविला होता॥ ३ ह्याने पेत्रस व योहान्न देवळांत जा
णार असे पाहून। भीक द्यावयास मागितलें॥ ४ तेव्हां पेत्रस
योहान्नासुद्धां त्याला स्थीर पाहून बोलला। तूं आह्मावर दृ
ष्टी लाव॥ ५ नंतर त्यांपासून कांहीं मिळावें ह्मणोन आशा
धरून। त्याने त्यांकडे लक्ष लाविलें॥ ६ मग पेत्रस बोलला।
रुपें व सोनें मजपासीं नाहींत। परंतु जें मजवळ आहे। तें
मी तुला देतों। येशूख्रीस्त जो नाजोरी। त्याच्या नांवाने तूं
उठ। आणि चाल॥ ७ मग त्याने उजवा हात धरून त्याला
उठविलें। आणि तेव्हांच त्याचे पाय व घोटे बळकट जाले॥
८ तेव्हां तो उडी मारीत उभा राहिला। आणि चालला। मग
चालत व उडी मारीत। आणि देवाची स्तुती करीत। त्यांसहीत
देवळांत गेला॥ ९ नंतर त्याला चालतां आणि देवाची स्तु
ती करितां। अवघ्या लोकाने पाहिलें॥ १० आणि देवळाच्या
सुंदर दरवाज्याजवळ जो भिकेसाठीं बसला होता। तोच हा।
असें त्यानी त्याला वोळखिलें। तेव्हां जें त्याला प्राप्त जालें।
त्यावरून ते थक्कपणाने आणि विस्मयाने भरले॥

११ तेव्हां जो पांगळा बरा जाला। तो पेत्रसाला व योहा
न्नाला बळकट धरीत असतां। सर्व लोक फार थक्क होऊन।
शलमोनाच्या ह्मटलेल्या पडशाळेंत त्यांजवळ येकवट धांवला॥
१२ तेव्हां पेत्रसाने पाहून लोकाला उत्तर केलें। [कीं] अहो इस्रा
एली माणसें। तुह्मी यावरून आश्चर्य कां करितां? काय!
आह्मी आपल्या शक्तीने अथवा सुभक्तीने याला चालतां केलें। अ

सो दृष्टी आह्मावर कां लावितां? १३ आब्राहाम, व इस्हा
क, व याकोब, यांचा देव, जो आमच्यां पितरांचा देव त्या
ने, आपला बाळ येशू, याला गौरविलें आहे। तुह्मी त्याला
परस्वाधीन केलें, आणि पिलातसासमोर त्याला नकारिलें।
हा सोडायास ठरवीत [होता,] १४ परंतु तुह्मी, जो पवि
त्र व न्यायवान, त्याला नकारिलें। आणि घातकमाणुस आपल्यां
जवळ कृपेने सोडला जावा ह्मणोन मागितला॥ १५ आणि
जिवनाच्या अधिकाऱ्याला जिवें मारिलें। ह्याला देवाने मेलेल्यां
मधून उठविलें। याचे साक्षी आह्मी आहों॥ १६ आणि त्या
च्या नांवाच्या विश्वासाकडून, ज्याला तुह्मी पाहतां आणि
वोळखतां, ह्याला त्याच्या नांवाने बळकट केलें आहे।
होय, त्यावरील जो विश्वास, त्याने ह्याला हें पूर्ण सांगपण तु
ह्मा सर्वांपुढें दिल्हें आहे॥ १७ आणि आतां अहो भाऊ,
तुह्मी आणि तसेंच तुमच्या अधिकाऱ्यांनी अज्ञानपणाने [तें]
केलें, हें मला कळलें। १८ परंतु देवाने आपल्यां अवघ्यां
भविष्यभाष्यांच्या तोंडाकडून पूर्वीं जीं सांगितलीं, कीं ख्रीस्ताने
सोसावीं, तीं त्याने अशीं पूर्ण केलीं आहेत॥ १९ यास्तव तु
ह्मी पश्चात्ताप करा, आणि फिरविले जा, यासाठीं कीं तुम
चीं पापें अशीं खोडून टाकलीं जावीं, कीं सावरण्याचे समय
प्रभूच्या समक्षपणापासून यावे, २० आणि तुह्मांसीं पूर्वीं
गाजलेला येशूख्रीस्त, याला त्याने पाठवावें॥ २१ अवघीं
फिरोन यथास्थीत करण्याच्यां समयांपर्यंत आकाशाने त्याला
धरावें लागतें खरें। ह्यां [समयां]विषयीं, जगकाळापासू
न देवाने आपल्यां सगळ्यां पवित्र भविष्यभाष्यांच्या तोंडाकडू
न ह्मटलें आहे॥ २२ कारण कीं मोशेच पितरांस बोलला,
कीं प्रभू जो तुमचा देव, तो तुमच्यां भावांमधून मजसारि
ख्या भविष्यभाष्याला तुह्मासाठीं उत्पन्न करील। तो जितकीं
तुह्मास बोलेल, त्यां सर्वांप्रमाणे तुह्मी त्याचें ऐका॥ २३ आ
णि असें होईल, [कीं] कोणी जो प्राणी त्या भविष्यभाष्याचें न ऐ

केल । लोकांतून त्याचा पूर्ण नाश केला जाईल॥ २४ आण
खी । शमुवेलापासून आणि जे अनुक्रमाचे । त्या जितक्यानी
ह्मटलें । त्यांनीहि ह्यां दिवसांचें वर्णन पूर्वीं केलें आहे॥
२५ तुह्मी भविष्यभाष्यांचें संतान । आणि जो करार । देव
आमच्यां पितरांपाशीं ठरवून । आब्राहामाला बोलला । कीं
तुझ्या बिजाकडून पृथ्वीवरच्या अवघ्या जाती आशिर्वाद पावतील ।
त्याचें [संतान] आहां ॥ २६ देवाने आपला जो पुत्र येशू
त्याला उठवून । त्याने तुमच्यां वाइटपणांपासून प्रत्येकाला
फिरवावें । याकडून तुह्मास कल्याण द्यावयास । त्याला पहि
ल्याने तुह्माजवळ पाठविलें आहे ॥

पर्व ४॥ १ आणि ते लोकाला बोलत असतां । उपाध्ये ।
व देवळाचा सरदार । व जादूकी । हे त्यांवर उठले॥
२ ते लोकाला उपदेशीत होते । आणि येशूकडून मेलेल्यांमधून
पुन्हा उठणें । याचें कथन करीत होते । यामुळें हे खेद पावले॥
३ आणि ह्यानी त्यांवर हात टाकिले । आणि तेव्हां संध्या
काळ आला होता । यास्तव दुसऱ्या दिवसापर्यंत [त्यांस] अटकें
त ठेविलें॥ ४ परंतु ज्यानी गोष्ट ऐकिली । त्यांतील बहु
तानी विश्वास धरिला । आणि त्यां माणसांची गणती सुमारें
पांच हजार जाली॥ ५ तेव्हां दुसऱ्या दिवसीं असें जालें ।
कीं त्यांचे अधिकारी । व पुरातन । व पंडीत । ६ व मुख्य
उपाध्या जो हान्नान । व कायाफा । व योहान्न । व आलेक्षां
द्रस । व मुख्य उपाध्याच्या गोत्रांतील जितके होते । हे यरू
शलेमांत येकवट जाले॥ ७ आणि ह्यानी त्यांस मध्यें उभें
करून विचारिलें । कीं तुह्मी कोणत्या शक्तीने । अथवा को
णत्या नावाने । हें केलें? ८ तेव्हां पेत्रस पवित्र आत्म्याने भ
रला असतां । त्यांस बोलला । अहो लोकाचे अधिकारी ।
व इस्राएलाचे पुरातन । ९ ज्या विकाऱ्या माणसावर उपकार के
ला । तो कशाने धार पडला । याविषयीं जर आमचा निवा
डा आज केला जातो । १० तर तुह्मा सर्वांस । व सगळ्या इस्रा

एललोकाला असें जाणलें जावें। कीं येशूख्रीस्त जो नाजोरी।
त्याच्या नांवाकडून [पार पडला।] ज्याला तुह्मी खांबीं मारिलें।
ज्याला देवाने मेलेल्यांमधून उठविलें। त्याकडून हा तुह्मापुढें येथे
सांग उभा राहिला„आहे॥ ११ जो धोंडा तुह्मा बांधणा
र्यांकडून धिःकारला गेला। तो हाच। तो कोंपऱ्याचा मस्त
क जाला आहे॥ १२ आणि दुसऱ्या कोणाकडूनहि तारण
नाहीं। कारण कीं ज्या नांवाने आह्मास तारलें जावें लागतें।
असें कोणतेंहि दुसरें [नांव] आकाशाखालीं माणसांमध्यें दिल्हें
नाहींच ※ १३ मग त्याह्मी पेत्रसाचें व योहान्नाचें प्रशस्तप
ण पाहून। आणि ते निरक्षर व अज्ञानी हें जाणून। आ
श्चर्य केलें। आणि ते येशूसहीत असत गेले होते। असें
ह्मांमध्ये त्यांस वोळखिलें॥ १४ आणि जो माणुस बरा के
ला होता। त्याला त्यांसुद्धां उभा राहातां पाहून विरु
द्ध बोलायाचें कांहीं त्यांस नव्हतें॥ १५ परंतु त्यांस न्याय
सभेबाहेर जाण्याची आज्ञा दिल्यावर। ते आपणांमध्यें विचा
र करीत। १६ बोलले, आह्मी ह्यां माणसांस काय करूं?
कां तर त्यानी कळावा [असा] साक्षात्कार केला खरें। हें यरूश
लेमांतील सगळ्यां राहाणाऱ्यांस प्रगट [आहे,] आणि आमच्यां
ने नकारवत नाहीं॥ १७ परंतु लोकामध्यें हें अधीक न फुटा
वें, ह्मणोन आह्मी त्यांस हडसून धमकावूं। कीं त्यानी ह्या
नांवाने लोकांतील कोणालाहि न बोलावें॥ १८ नंतर त्यानी
त्यांस बोलावून। येशूच्या नांवाने अगदीं न उच्चारावें। आ
णि न उपदेशावें, ह्मणोन त्यांस आज्ञा दिल्ही॥ १९ परं
तु पेत्रस व योहान्न त्यांस उत्तर देतां बोलले, देवाच्या पे
क्षां तुमचें अधीक ऐकावें। हें देवापुढें न्यायरूप कीं का
य? हें तुह्मी ठरवा, २० कारण कीं आह्मी जीं पाहिलीं।
आणि ऐकिलीं। तीं न ह्मणतां आह्मास येत नाहींत॥ २१ ते
व्हां त्यानी त्यांस आणखी धमकावून सोडिलें। आपण त्यांस कसें
दंडावें, हें लोकामुळें कांहीं सांपडलें नाहीं। कां कीं जें घ

डलें, त्यावरून सर्वांनी देवाची स्तुती केली। २२ कारण कीं ज्या माणसाला बरें करण्याचा साक्षात्कार घडला। तो चाळीस वर्षांवर होता ※

२३ तेव्हां ते सोडले असतां आपल्यांकडे गेले, आणि उपाध्ये व पुरातन यानी जीं जीं ह्मटलीं। तीं तीं आपण त्यांस सांगितलीं॥ २४ तेव्हां त्यानी ऐकून येकचित्ताने देवाकडे शब्द उंच करून ह्मटलें। हे स्वामी। तूं देव [आहेस।] त्वां आकाश। व पृथ्वी। व समुद्र। व ह्यांतील अवघीं जीं। त्यांस उत्पन्न केलें॥ २५ त्वां आपला सेवक जो दावीद। त्याच्या तोंडाकडून ह्मटलें। [कीं] राष्ट्रें कां गलबललीं? आणि लोकानी व्यर्थ कां कल्पिलीं॥ २६ पृथ्वीचे राजे सादर उभे राहिले। आणि अधिकारी प्रभूविरुद्ध। व त्याच्या अभिषिक्ताविरुद्ध, येकवट मिळाले होते॥ २७ तर सत्यतेने तुझें पवित्र लेंकरूं येशू। ज्याला त्वां अभिषेक केला। त्यावर हेरोद। व पंतयसपिलातसहि, राष्ट्रें व इस्राएलाचे लोक यांसुद्धां, यासाठीं मिळाले होते। २८ कीं तुझ्या हाताने व तुझ्या बेताने जीं जीं घडलीं जाण्यास पूर्वीं नेमिलीं होतीं। तीं तीं करावीं॥ २९ आणि हे प्रभू। आतां असीं [असतां।] तूं त्यांच्या धमकावण्या पाहा, आणि तुझ्या चाकरांस तुझी गोष्ट सर्व प्रशस्तपणाने बोलूं दे। ३० येणेकडून कीं त्वां। निरोगी करण्यासाठीं। आपला हात लांब करावा आणि तुझें पवित्र लेंकरूं येशू, याच्या नांवाने साक्षात्कार व उत्पात घडावे॥ ३१ नंतर त्यानी प्रार्थना केल्यावर। ज्या स्थानीं ते मिळाले होते। तें हालविलें गेलें। मग ते सर्व पवित्र आत्म्याने भरले, आणि देवाची गोष्ट प्रशस्तपणाने बोलले ※

३२ आणि विश्वासणाऱ्यांच्या भरण्याचें येक हृदय व जीव [असीं] होतीं। आणि कोणीहि, जीं आपलीं त्यांतून। कांहीं आपलें, असें ह्मटलें नाहीं। परंतु त्यांस अवघीं समायीक जालीं॥ ३३ ते

व्हां प्रेषितानी मोठ्या शक्तीने प्रभू येशूच्या पुन्हा उठण्याची सा
क्ष दिल्ही। आणि त्यां सर्वांवर फार कृपा जाली। २४ का
रण कीं त्यांतील कोणालाहि उणें नव्हतें। कां तर ठिकाणांचे
अथवा घरांचे जितके धनी होते। तितक्यानी [तीं] विकून वि
कलेल्यांचीं मोलें आणिलीं। ३५ आणि प्रेषितांच्यां पायांजव
ळ ठेविलीं। मग ज्याप्रमाणे कोणाला अगत्य होतें। त्याप्र
माणे प्रत्येकाला वांटून देणें जालें॥ ३६ आणि योसे, ज्याला प्रे
षितांकडून बार्णाबा उपनांव ठेविलें। ह्मणजे। अर्थ उतरल्याने।
शांतवनाचा पुत्र। तो जन्माकडून कुप्रसी लेवी। ३७ त्या
ला शेत असतां। त्याने [तें] विकून पैका आणिला। आणि
प्रेषितांच्यां पायांजवळ ठेविला ॥

पर्व ५॥ १ परंतु अनान्या नांवें कोणी माणुस। आपली ना
यको साप्फिरे ईजसुद्धां [होता।] त्याने विषय विकिला। २ म
ग त्याची नायकोहि संगतीं जाणत असतां। त्या मोलांतून अभिला
ष केला। आणि कांहीं भाग आणून प्रेषितांच्यां पायांजवळ
ठेविला॥ ३ तेव्हां पेत्रस बोलला। हे अनान्या। त्वां पवित्र
आत्म्यापासीं खोटें बोलावें। आणि ठिकाणाच्या मोलांतून अभिला
ष करावा। ह्मणोन साटानाने तुझ्या हृदयांत कशासाठीं भरलें
आहे? ४ तें राहात होतें, तेव्हां तुझें राहिलें कीं ना
हीं? आणि विकल्यावर तुझ्या स्वाधीन नव्हतें कीं काय?
त्वां हें काम आपल्या हृदयांत ठेविलें। हें कशासाठीं? तूं मा
णसांसीं नव्हे। परंतु देवासीं खोटें बोललास॥ ५. तेव्हां
अनान्याने ह्या गोष्टी ऐकून। पडून प्राण सोडिला॥ नंतर ज्यां
सर्वांनी हीं ऐकिलीं। त्यांस फार भय जालें॥ ६ तेव्हां तरु
णानी उठून त्याला गुंडाळिलें। आणि बाहेर नेऊन पुरिलें॥
७ मग सुमारें तीन होरांच्या अंतराने। त्याची नायको। जें
जालें तें न जाणतां। आंत आली॥ ८ तेव्हां पेत्रसाने तिला
उत्तर केलें। [कीं] मला सांग, तुह्मी तें ठिकाण येवढ्यावर
जाऊं दिल्हें कीं काय? मग ती बोलली, होय। येवढ्यावर॥

९ तेव्हां पेत्रस तिला बोलला। प्रभूच्या आत्म्याची प्रचिती
घ्यावयास तुह्मी संकेत, कशास्तव केला? पाहा, ज्यानी तु
झ्या नवऱ्याला पुरिलें, त्यांचे पाय दारासीं [आहेत।] आणि ते
तुला बाहेर नेतील॥ १० तेव्हां तिने येकायेकीं त्याच्या पायां
जवळ पडतां प्राण सोडिला॥ मग ते तरूण आंत येऊन; त्यां
स ति मेली सांपडली। आणि त्यानी तिला बाहेर नेऊन तिच्या
नवऱ्याजवळ पुरिलें॥ ११ तेव्हां अवघ्या मंडळीला। व ज्यानी
हीं ऐकिलीं, त्यां सर्वांस फार भय जालें ॥ १२ आणि प्रे
षितांच्यां हातांकडून लोकांत बहुत साक्षात्कार व उत्पात घडले
होते। आणि ते सर्व येकचित्ताने शलमोनाच्या पडशाळेंत हो
ते॥ १३ आणि दुसऱ्यांतून कोणी त्यांस जडायास न धज
ला। परंतु लोकाने त्यांस थोर मानिलें॥ १४ आणि पु
रुषांचे व स्त्रियांचेहि विश्वासणारेंभरणे प्रभूजवळ वाढवि
ले गेले। १५ असें कीं त्यानी विकाऱ्यांस मार्गांमध्यें आ
णिलें। आणि पेत्रस येत असतां। कदाचित त्याची सावली
त्यांमधील कोणावर पडावी, ह्मणोन शेजांवर व खाटल्यांवर
त्यांस ठेविलें। १६ आणखी चहूंकडल्यां नगरांतून समुदाय,
विकाऱ्यांस व अशुद्ध आत्म्यानी पिडलेले यांस आणितां। यरू
शलेमांत आले। [आणि] ते सर्व निरोगी केले गेले ॥

१७ तेव्हां मुख्य उपाध्या। आणि सर्व जे त्यासुद्धां।
ह्मणजे सादूकांचा तड। हे संतापाने भरले॥ १८ आ
णि त्यानी आपले हात प्रेषितांवर घालून त्यांस सामान्य अटकें
त ठेविलें॥ १९ परंतु रात्रीं प्रभूच्या दुताने बंदिशाळेचीं दारें
उघडिलीं। आणि त्यांस बाहेर आणून ह्मटलें, २० तुह्मी
जा, आणि देवळांत उभे राहून, ह्या जिवनाच्या सर्व
गोष्टी लोकास बोला॥ २१ तेव्हां ते ऐकून। पाहांटेस देवळां
त गेले, आणि उपदेशिते जाले॥ परंतु मुख्य उपाध्या।
आणि जे त्यासुद्धां। त्यानी येऊन न्यायसभा व इस्राएलसंता
नाचा सर्व पुरातनवर्ग येकवट बोलाविला। मग त्यांस आणावयाला

बंदिशाळेंत पाठविलें॥ २२ तेव्हां हस्तकी येऊन, त्यांस हे बंदि
शाळेंत मिळाले नाहींत। नंतर त्यानी माघारीं जाऊन वर्तमान
सांगतां २३ ह्मटलें। कीं बंदिशाळा सर्व बंदोबस्ताने बंद केलेली।
आणि पाहारेकरी दारांपुढें उभे राहातां आह्मांस मिळाले
खरें। परंतु उघडून आंत कोणी मिळाला नाहीं॥ २४ म
ग उपाध्या व देवळाचा सरदारहि व मुख्य उपाध्ये यानी
ह्या गोष्टी ऐकून। हें कसें असेल? [असें] त्यांविषयीं संशय पा
वले॥ २५ तेव्हां कोणी येऊन। त्यांस वर्तमान सांगतां ह्म
टलें। कीं पाहा, जीं माणसें तुह्मी बंदिशाळेंत ठेविलीं। तीं दे
वळांत उभीं राहून लोकांस उपदेशीत आहेत॥ २६ तेव्हां
सरदाराने हस्तक्यांसुद्धां जाऊन। त्यांस बळात्कारावांचून
आणिलें। कारण ते लोकांस भ्याले। कीं कदाचित धोंडे मार
तील॥ २७ मग त्यानी त्यांस आणून न्यायसभेमध्यें ठेवि
लें। नंतर मुख्य उपाध्याने त्यांस विचारिलें। २८ कीं तुह्मी
त्या नांवाने न उपदेशावें। ह्मणोन आह्मी तुह्मांस आग्रहावर
आज्ञा केली नाहीं कीं काय? आणि पाहा। तुह्मी आपल्या
उपदेशाने यरूशलेम भरिलें आहे। आणि त्या माणसाचा र
क्तपात आह्मावर आणायास योजितां॥ २९ तेव्हां पे
त्रस व [इतर] प्रेषीत उत्तर देतां बोलले। माणसांपेक्षां देवा
ला अधीक मानलें पाहिजे॥ ३० ज्या येशूला तुह्मी झाडावर
टांगून हातानी मारिलें, त्याला आमच्या पितरांच्या देवाने उठवि
लें आहे॥ ३१ त्याने इस्राएलास पश्चात्ताप। व पापांची
सूट द्यावी। ह्मणोन देवाने त्याला आपल्या उजव्याकडे अग्रणी
व तारणारा [होण्यास] उंचाविलें आहे॥ ३२ आणि आह्मी
ह्यां गोष्टींविषयीं त्याचे साक्षी आहों। आणि देवाने आपल्यां
मानणाऱ्यांस जो पवित्र आत्मा दिल्हा। तोहि [साक्षी आ
हे]॥ ३३ तेव्हां ते ऐकून पार चिरले गेले। आणि ह्यांचा
घात करायास योजीत होते॥ ३४ परंतु गामलियेल नांवें को
णी फारिशी। [जो] शास्त्रोपदेशक। अवघ्या लोकांत मान्य।

त्याने न्यायसभेंत उठून। त्यां प्रेषितांस कांहीं वेळ बाहेर करा
याची आज्ञा दिल्ही॥ ३५ मग तो त्यांस बोलला। अहो
इस्राएलमाणसें। तुह्मी त्यां माणसांस काय करणार आहां।
याविषयीं आपल्यांस सावध राखा। ३६ कारण कीं ह्यां
दिवसांच्या आगोधर थूदा उठला। आपण कोणी आहे।
असें ह्मणत [होता॥] त्याला सुमारें चार शें माणसांची गणती
जडली॥ तो जिवें घालविला गेला। आणि जितक्यांनी त्याला
मानिलें। ते सर्व फांकले होऊन नाहिंसे जाले॥ ३७ त्याच्या
मागें यहूदा, जो गालिली, तो झडतीलिहिण्याच्यां दिवसांत उठ
ला। आणि त्यानें आपल्या मागें बहुत लोकांस फितविलें। तो
हि नाश पावला। आणि जितक्यांनी त्याला मानिलें, ते सर्व दा
णादाण जाले॥ ३८ आणि सध्यां मी तुह्मास सांगतों। तु
ह्मी ह्यां माणसांपासून दूर होऊन त्यांस असुं द्या। कां त
र हा विचार। अथवा हें काम। जर माणसांपासून असेल।
तर मोडून जाईल॥ ३९ परंतु जर हें देवापासून आहे।
तर तुमच्यानें हें मोडून टाकवत नाहीं। आणि कदाचित तुह्मी
देवासीं भांडणारे सांपडाल॥ ४० तेव्हां त्यांनी त्याला मानिलें।
आणि प्रेषितांस जवळ बोलाविल्यावर। मार देऊन। येशू
च्या नांवानें न सांगावें, ह्मणोन आज्ञा केली। मग त्यांस सोडि
लें॥ ४१ यास्तव त्याप्रमाणें हे न्यायसभेच्या समक्षपणांतून जा
ऊन। आपण त्याच्या नांवासाठीं अपमान पावायास योग्य ठ
रले, यास्तव आनंद करीत होते॥ ४२ आणि प्रति दिवशीं।
देवळांत व घरोघरीं उपदेश करणें। आणि येशू जो ख्री
स्त त्याचें सुवर्तमान सांगणें। हें त्यांनी सोडिलें नाहीं ॐ
पर्व ६ ॥ १ आणि त्यां दिवसांत शिष्य पुष्कळ जाल्यावर। इब्री
यांसीं हेलास्त्यांची कुजबूज जाली। कीं आपल्या विधवा प्रति दिवसा
च्या वांटण्यांत अंतरल्या गेल्या॥ २ तेव्हां त्यां बारांनी। शिष्यां
चा भरणा येकवट बोलावून। ह्मटलें। [कीं] आह्मी देवाची गो
ष्ट सोडून भोजनचौरंगांची सेवा करावी, हें आह्मास योग्य नाहीं॥

३ यास्तव अहो भाऊ। तुह्मांतील पतवंत सात माणसें। प
वित्र आत्म्याने व ज्ञानाने भरलेलों। ज्यांस आह्मी ह्या कार्यावर ठे
वावें। त्यांस तुह्मी शोधून पाहा॥ ४ परंतु आह्मी प्रार्थ
नेंत। आणि गोष्टीच्या सेवेंत तत्पर राहूं॥ ५ तेव्हां ही
गोष्ट अवघ्या भरण्याला आवडली। आणि स्तेफानस वि
श्वासाने व पवित्र आत्म्याने भरलेला माणुस। व फिलीप्पस। व प्र
खरस, व निकानोर, व तीमोन। व पार्मेनास। व अंतय
खींतला अनुसारी निकलास। ह्यांस त्यांनी निवडिलें॥ ६ म
ग त्यांस प्रेषितांसमोर उभें केलें। आणि ह्यांनी प्रार्थना
करून त्यांजवर हात ठेविले॥ ७ तेव्हां देवाची गोष्ट वाढ
ली। आणि यरूशलेमांत शिष्यांची गणती फार मोठी जाली।
उपाध्यांचाहि मोठा समुदाय विश्वासाला मान्य जाला ॥
८ आणि स्तेफानस विश्वासाने व सामर्थ्याने भरला असतां।
त्याने मोठे उत्पात व साक्षात्कार लोकांत केले॥ ९ तेव्हां लिबे
र्तीनी यांची ह्मटलली सभा। तींतील कित्येक। व कुरे
नी। व आलेक्षांद्री। यांतले। आणि किलिकी, व आशी। यां
कडले। हे उठून स्तेफानसाशीं वाद करिते जाले॥ १० परंतु
ज्या ज्ञानाने व आत्म्याने तो बोलला। त्यांच्या आडवी टिकायास
ह्यांची शक्ती पुरत नव्हती॥ ११ तेव्हां ह्यांनी माणसांस आपलींशीं
केलीं असतां। तीं बोललीं। कीं आह्मी याला मोश्यावर व देवाव
र दुर्भाषणगोष्टी बोलतां ऐकिलें॥ १२ आणि ह्यांनी लोक। व
पुरातन। व पंडीत। यांस चेतविलें। तेव्हां त्यांनी त्याजवर उ
ठून। त्याला धरिलें, आणि न्यायसभेंत नेलें। १३ मग
खोटे साक्षी उभे केल्यावर, यांनी ह्मटलें। हा माणुस।
हें पवित्र स्थान। व शास्त्र, यांविरुद्ध दुर्भाषणी गोष्टी बो
लणें सोडीत नाहीं॥ १४ यास्तव कीं आह्मी त्याला असें बो
लतां ऐकिलें, कीं हा येशू नाजोरी ह्या स्थानास मोडून टा
कील। आणि मोश्याने ज्या रीती आह्मास सोपून दिल्या। त्यां
स पालटील॥ १५ तेव्हां सर्व जे न्यायसभेंत बसले। त्यांनी त्या

ला न्याहाळितां । त्याचें तोंड दुताच्या तोंडासारिखें पाहिलें ॥
पर्व ७ ॥ १ तेव्हां मुख्य उपाध्या बोलला, तर हीं असीं आ
हेत कीं काय? २ मग हा बोलला, अहो भाऊ माणसें व बाप,
तुह्मी ऐका ॥ आमचा पितर आब्राहाम अराम नाहाराइमांत अ
सतां, तो हारानांत राहिल्यापूर्वीं, गौरववान देवाने त्याला द
र्शन दिल्हें, ३ आणि त्यासीं ह्मटलें, तूं आपल्या देशापासून व
आपल्या कूळापासून नीघ, आणि जो देश मी तुला दाखवीन
त्यांत चाल ॥ ४ तेव्हां तो खास्द्यांच्या देशांतून जाऊन हारा
नांत राहिला ॥ मग त्याचा बाप मेल्यानंतर, त्याने त्याला
तेथून, ज्या देशांत तुह्मी आतां राहातां त्या ह्यांत ढळ
विलें। ५ आणि त्याला ह्यांत वतन दिल्हें नाहीं। पाऊल
भरहि नाहीं। तथापि, त्यासीं लेंकरूं नसतां, त्याला आणि
त्यामागें त्याच्या बिजाला, हाच धन असें देण्याचें वचन
दिल्हें ॥ ६ परंतु देव असें बोलला, कीं त्याचें बीज अ
न्यदेशांत राहाणारें होईल। आणि त्याला दास करिती
ल, आणि चार शें वर्षांपर्यंत दुःख देतील ॥ ७ मग ज्या रा
ष्ट्राचे दास ते होतील, त्याचा न्याय मी ठरवीन, [असें] देवाने
सांगितलें। आणि त्यानंतर ते बाहेर येतील, आणि ह्या
स्थानीं माझी सेवा करितील ॥ ८ आणि त्याने त्याला सुंतेचा करा
र दिल्हा। मग असें ह्याने इझाकाला जन्मविलें। आणि आठव्या
दिवसीं त्याची सुंता केली। नंतर [असेंच] इझाकाने याकोबाला,
आणि याकोबाने त्यां बारा आदिवडिलांस ॥ ९ नंतर त्यां
आदिवडिलानी हेवा धरून, योसेफाला मिसरांत [घालण्यास] वि
कून टाकिलें। तथापि देव त्याच्या पक्षीं होता ॥ १० आणि
त्याच्यां सर्व संकटांतून त्याने त्याला काढिलें, आणि मिसराचा
राजा फारो यासमोर कृपा व ज्ञान हीं त्याला दिल्हीं ॥ आणि ह्या
ने तो मिसरावर व आपल्या सगळ्या घराण्यावर अधिकारी
स्थापिला ॥ ११ नंतर अवघा मिसर देश व खनान, यांवर दु
काळ पडला। आणि मोठें संकट [जालें ॥] तेव्हां आमच्यां पित

त्यांस पोषण मिळालें नाहीं॥ १२ परंतु मिसरांत धान्यें आहे
त, असें याकोबानें ऐकून आमच्या पितरांस पहिल्या वेळेस
बाहेर पाठविलें॥ १३ मग दुसऱ्या वेळेस योसेफ आपल्या भावां
स वोळखविला गेला। आणि योसेफाची जात फारोला माहीत
जाली॥ १४ नंतर योसेफानें पाठवून आपला बाप याकोब
आणि आपल्या सर्व कुळांत पाउणशें जण असतां। यांस तिकडे बो
लाविलें॥ १५ तेव्हां याकोब मिसरांत खालीं गेला। आणि तो
व आमचे पितर मेले॥ १६ तेव्हां ते शखेमांत पलिकडे ने
ले गेले। आणि तेथें आब्राहामानें जें प्रेतपेव रुपें मोलावर शखे
माचा [बाप] हमोर। याच्या पुत्रांपासून विकत घेतलें, त्यांत ते
ठेविले गेले॥ १७। १८ मग वचनाचा समय। ज्याविषयीं
देवानें आब्राहामाशीं शपत वाहिली, तो जसा जवळ आला। तसा
तो लोक। दुसरा राजा उत्पन्न जाला तोंपर्यंत मिसरांत वाढतां पु
ष्कळ जाला॥ ह्यानें योसेफाला जाणलें नाहीं॥ १९ [आणि] ह्या
नेच आमच्या जातीवर धूर्तपण करितांना, आमच्या पितरांस अ
सें दुःख दिल्हें। कीं त्यांचीं बाळकें जिवंत न राहावयासाठीं
बाहेर टाकाऊ केलीं॥ २० त्या वेळेस मोशे जन्मला। आ
णि तो देवाकडून सुंदर होता॥ तो तीन महिन्यांपर्यंत आप
ल्या बापाच्या घरांत प्रतिपाळ पावला॥ २१ मग तो बाहे
र घातला असतां। फारोच्या कन्येनें त्याला उचलून घेतलें।
आणि आपला पुत्र असा त्याचा प्रतिपाळ केला॥ २२ मग
मोशाला मिसऱ्यांचें सर्व ज्ञान शिकविलें गेलें॥ आणि बोल
ण्यांविषयीं व करण्यांविषयीं तो शक्तिमान जाला॥ २३ नंत
र त्याला चाळीस वर्षांचा काळ भरल्यावर। आपले भाऊ
इस्राएलाचें संतान यांस भेटावें। असा त्याचा मनोदय जाला॥
२४ तेव्हां त्यानें कोणाला अन्याय सोसितां पाहून। [त्याचें] साह्य
केलें। आणि मिसऱ्याला मारितां। त्या क्लेशितासाठीं सूड घेतला॥
२५ तेव्हां। आपल्या हातानें आपल्या भावांस देव तारण दे
ईल। असें त्यांनी समजावें ह्मणोन त्याला वाटलें। परंतु ते

समजले नाहींत ॥ २६ मग दुसऱ्या दिवशीं। ते भांडत अस
तां। तो त्यांस दिसला। आणि त्यांस परस्परें समजतीस ला
वितां बोलला। अहो माणसें। तुह्मी भाऊ आहां। येकमे
कांचा अन्याय कां करितां? २७ तेव्हां ज्याने शेजाऱ्याचा अ
न्याय केला। तो त्याला घालवून बोलला। तुला आह्मावर अधि
कारी व न्यायाधीश [असें] कोणी स्थापिलें आहे? २८ ज्या प्रका
रें त्वां काल मिसऱ्याचा घात केला। त्या प्रकारें तूं माझा
घात करायास इच्छितोस कीं काय? २९ तेव्हां त्या गोष्टीव
रून मोशे पळाला। आणि मद्यानदेशांत परदेशी जाला॥
तेथे त्याने दोन पुत्रांस जन्मविलें॥ ३० मग चाळीस वर्षें भ
रल्यानंतर, सिना डोंगराच्या रानांत। प्रभूच्या दुताने झुड
पांतील अग्नीच्या जाळांत। त्याला दर्शन दिल्हें॥ ३१ आणि
मोश्याने पाहून त्या दृष्टांतावरून आश्चर्य केलें। मग ल
क्षांत आणायास तो जवळ जात असतां। त्याशीं प्रभूची वाणी
[असी] जाली। ३२ [कीं] मी तुह्मां पितरांचा देव। आब्राहामा
चा देव। व इझाकाचा देव। व याकोबाचा देव॥ तेव्हां मोशे
कंपीत होऊन, लक्षांत आणायास धजला नाहीं॥ ३३ आ
णि प्रभू त्याला बोलला, तूं आपल्यां पायांतील जोडा काहाड।
कारण कीं ज्या ठिकाणीं उभा राहिलास। ती पवित्र भू
मी आहे॥ ३४ मिसरांत जो माझा लोक, त्याचें दुःख म्या
पाहातांच पाहिलें। आणि त्यांचें कण्हणें ऐकिलें आहे। आणि
त्यांस काढायाला मी उतरलों आहें। तर आतां ये। मी तु
ला मिसरांत पाठवीन॥ ३५ तोच मोशे ज्याला ते नकारीत बोल
ले। तुला अधिकारी व न्यायाधीश [असें] कोणी स्थापिलें? त्याला
ज्या दुताने झुडपांत दर्शन दिल्हें त्याच्या हाताकडून। देवाने अ
धिकारी। व सुटका करणारा [असा] तोच पाठविला॥ ३६ त्या
ने त्यांस बाहेर आणितां। मिसर देशांत, व आरक्त [नांवें] समुद्रां
त व रानांत। चाळीस वर्षांपर्यंत उत्पात व साक्षात्कार केले॥
३७ ज्या मोश्याने इस्राएलाच्या संतानास सांगितलें। [कीं] प्रभू जो

तुमचा देव। तो तुमच्यां भावांमधून मजसारिख्या भविष्यभाष्याला
उत्पन्न करील, त्याचें तुह्मी ऐका, तोच हा आहे॥ ३८ जो
रानामध्यें मंडळींत होता। [आणि] सीना डोंगरांत आपणाशीं बो
लणारा दूत यापाशीं। आणि आमच्यां पितरांपाशीं [होता।] तोच
हा आहे॥ त्याने। आह्मास द्यावयासाठीं। संजिवनदेववाक्यें घेत
लीं॥ ३९ त्याला मानायास आमचे पितर वश न जाले। परं
तु [त्याला] घालविलें। आणि आपल्यां हृदयानी मिसराकडे फिरू
न। ४० आहरोनाला बोलले, तो मोशे। ज्याने आह्मास मिसर
देशांतून आणिलें। त्याला काय प्राप्त जालें। हें आह्मास कळ
लें नाहीं। यास्तव आमच्या पुढें जातील असे देव तूं आह्मासाठीं
कर॥ ४१ असें त्यां दिवसीं त्यानी वासरूं घडिलें। मग त्या मू
र्तीला यज्ञसंभार आणून दिल्हा, आणि आपल्यां हातांच्यां
कामांवरून आनंद केला॥ ४२ तेव्हां देव फिरला। आणि त्या
ने त्यांस आकाशांतील गण पूजायास सोडून दिल्हें। जसें भवि
ष्यभाष्यांच्या पुस्तकांत लिहिलें तसें। [कीं] इस्राएलाचें घराणें
अहो। तुह्मी रानामध्यें चाळीस वर्षांपावेंतों वधयज्ञ व अर्पणें
माझ्या जवळ वाहिलीं कीं काय? ४३ मलखाचाहि मंड
पिका, व तुमच्या रेमफानदेवाची तारा। ज्या प्रतिमा तुह्मी पूजा
यासाठीं केल्या, त्या तुह्मी उचलून घेतल्या। आणि मी तुह्मास
बाबेलाच्या पलिकडे प्रवासांत घालीन॥ ४४ मोश्याशीं बोलणाऱ्याने
जसें नेमिलें। कीं त्याने जी प्रतिमा पाहिली। तीजप्रमाणे साक्षी
चा मंडप करावा। तसा तो रानांत आमच्यां पितरांमध्यें होता॥
४५ आणि यहोशवासहीत आमच्यां पितरानी। तो क्रमाने पा
वून। परराष्ट्रांच्या वतनांत आणिला। त्यां [परराष्ट्रांस] देवाने
आमच्यां पितरांच्या तोंडाजवळून घालविलें॥ दाविदाच्या दि
वसांपर्यंत [तसें राहिलें॥] ४६ त्याला देवाजवळ कृपा मिळा
ली। आणि आपण याकोबाच्या देवासाठीं वस्ती मिळवावी।
ह्मणोन मागितलें॥ ४७ परंतु शलमोनाने त्याच्या साठीं घर बां
धिलें॥ ४८ तथापि परात्पर जो। तो हातानी बांधलेल्यां देव

ळांत राहात नाहीं। याप्रमाणे भविष्यभाषी ह्मणतो। ४९ [कीं]
आकाश माझें सिंव्हासन। व पृथ्वी माझ्यां पायांचें आसन
[असें] प्रभू बोलतो, माझ्या साठीं तुह्मी कसें घर बांधाल?
अथवा माझ्या विसांव्याचें स्थान काय आहे? ५० माझ्या हा
ताने हीं सर्व केलीं नाहींत कीं काय? ※ ५१ अहो ता
ठरमानाचे। आणि हृदयाविषयीं व कानांविषयीं असुंती
अहो। तुह्मी सर्वदां पवित्रआत्म्याविरुद्ध पडतां। जसे
तुमचे पितर। तसे तुह्मी॥ ५२ भविष्यभाष्यांतील कोणत्या
च्या पाठीस तुमचे पितर लागले नाहींत? आणि त्या न्याय
वानाच्या येण्याविषयीं ज्यानीं पूर्वीं सांगितलें। त्यांस त्यानीं जि
वें मारिलें, त्याचे तुह्मी आतां दगाकरणारे व घातक जा
लां आहां॥ ५३ ते तुह्मी। दुतांच्यां नेमणुकींकडून। शा
स्त्र पावलां। परंतु पाळिलें नाहीं ※

५४ तेव्हां ते हीं ऐकून आपल्यां मनांत पार चिरले गे
ले। आणि त्याजवर दांत खाते जाले॥ ५५ परंतु तो प
वित्रआत्म्याकडून भरला असतां। त्याने आकाशांत न्याहाळू
न। देवाच्या गैारवाला। आणि देवाच्या उजव्याकडे येशूला
उभें राहातां। [असें] पाहिलें॥ ५६ तेव्हां तो बोलला। पाहा।
आकाशें उघडलेलीं। आणि देवाच्या उजव्याकडे माणसाचा पु
त्र उभा असतां। हीं मला दिसतात॥ ५७ मग त्यानीं मो
ठ्या स्वराने वोरडतां आपले कान बंद केले। आणिं येकचि
त्ताने त्याजवर धांव मारिली॥ ५८ नंतर त्याला नगराबा
हेर घालवून धोंड्यानीं मारिलें॥ तेव्हां साक्ष्यानीं आपलीं व
स्त्रें काढून, शाऊल ह्मटलेला [येक] तरुण, याच्यां पायांजवळ
ठेविलीं॥ ५९ मग ते स्तेफानसाला धोंड्यानीं मारिते जाले।
तो हाक मारितांना बोलला, हे प्रभूयेशू, माझ्या आ
त्म्याचा अंगिकार कर॥ ६० आणि तो गुढघे टेंकून। मो
ठ्या स्वराने वोरडला। [कीं] हे प्रभू। त्वां हें पाप त्यांजवर न
घालावें॥ मग तो असें बोलून झोपीं गेला ※

पर्व ८ ॥ १ तेव्हां त्याच्या घाताविषयीं शाऊल संमत
देत होता॥ आणि त्या दिवसीं यरूशलेमांतील मंडळीवर मो
ठें पाठीं लागणें जालें। आणि प्रेषितांखेरीज ते अवघे। यहू
द व शोमरोन, ह्यां प्रांतांवर। दाणादाण जाले॥ २ प
रंतु परमार्थीक माणसांनी मिळून स्तेफानसाला पुरायास नेलें।
आणि त्याविषयीं बहुत शोक केला॥ ३ तेव्हां शाऊलाने मं
डळीचा नासाडा केला। घरोघरीं शिरून। पुरुषांस व स्त्रियांस
हि वोढून। बंदिशाळेंत परस्वाधीन केलें॥ ४ तर जे अशाने
दाणादाण जाले, ते गोष्टीचें सुवर्तमान सांगतां चहूंकडे गेले॥
५ तेव्हां फिलीप्पसाने खालीं शोमरोन नगरांत जाऊन त्यां
जवळ ख्रीस्त गाजविला॥ ६ आणि फिलीप्पसाकडून जीं झाट
लीं त्यांस समुदायानी येकचित्तें लक्ष लाविलें। तीं ऐकिलीं
त्यावरून। आणि जे साक्षात्कार त्याने केले। ते पाहि
ल्यावरून॥ ७ यास्तव कीं। ज्यां बहुतांस अशुद्ध आत्मे ला
गलेले। त्यांतून ते मोठ्या स्वराने गर्जतां निघाले॥ आणि ब
हुत पक्षवाती व पांगळे निरोगी केले गेले॥ ८ तेव्हां त्या
नगरांत मोठा आनंद जाला॥ ९ परंतु शिमोन नांवें कोणी
माणसाने, त्या नगरांत पूर्वीं असतां। मांत्रिकपण केलें। आ
णि आपण कोणी थोर असें ह्मणतां शोमरोन देशास थक्क
केलें॥ १० लाहानापासून थोरापर्यंत त्यां सर्वांनी त्याला चित्त
देऊन ह्मटलें। कीं हा देवाचें मोठें सामर्थ्य आहे॥ ११ आ
णि त्याने त्यांस मांत्रिकपणाकडून बहुत वेळ थक्क केलें। या
स्तव त्यांनी त्याला चित्त दिल्हें॥ १२ परंतु फिलीप्पस, दे
वाच्या राज्याविषयीं आणि येशू ख्रीस्ताच्या नांवाविषयीं जीं
सुवर्तमानें। तीं सांगत असतां। त्यावर जेव्हां त्यांनी विश्वास
केला। तेव्हां पुरुषांनी व स्त्रियांनीहि बाप्तीस्मा घेतला॥ १३ ते
व्हां शिमोनाने आपणहि विश्वास केला। आणि बाप्तीस्मा घेऊ
न। फिलीप्पसाशीं लागून राहिला॥ आणि साक्षात्कार व मोठे
चमत्कार घडतां पाहून, विस्मीत जाला॥ १४ मग, शोम

रोनानें देवाची गोष्ट अंगिकारिली, असें यरूशलेमांतील प्रे
षितांनी ऐकून, पेत्रसाला व योहान्नाला त्यांजवळ पाठविलें॥
१५ हे खालीं गेल्यावर त्यांच्या साठीं प्रार्थना करिते जा
ले। कीं त्यांनी पवित्रआत्मा पावावा॥ १६ कारण कीं तों
पर्यंत तो त्यांतील कोणावर पडला नव्हता। परंतु प्रभू ये
शूच्या नांवासाठीं त्यांचा बाप्तीस्मा मात्र जाला॥ १७ तेव्हां
ह्यांनी त्यांजवर हात ठेविले। मग ते पवित्रआत्मा पावले॥
१८ नंतर। प्रेषितांच्या हातठेवण्यानें पवित्रआत्मा दिल्हा
जातो। असें शिमोन पाहून। त्यांजवळ पैका आणून १९ बोल
ला। तुह्मी मलाहि हा अधिकार द्या। कीं ज्यावर मी हात ठेवी
न, त्यानें पवित्रआत्मा पावावा॥ २० तेव्हां पेत्रस त्याला
बोलला, देवाचें देणें पैकानी विकत घेतलें जातें। असें तां
कल्पिलें। तर तुझें रुपें तुझ्या संगतीं नाशासाठीं व्हावें॥
२१ ह्या गोष्टींत तुझा वांटा व दैवसूणहि नाहीं। कां कीं दे
वासमोर तुझें हृदय नीट नाहीं॥ २२ यास्तव तूं ह्या आ
पल्या वाइटपणावरून पश्चात्ताप कर, आणि देवाशीं विनंती
कर। ह्मणजे अशानें तुझ्या मनाची कल्पना तुला सोडली
जाईल॥ २३ कारण कीं तूं कडुपणाच्या पित्तांत, आणि
अन्यायाच्या बंदांत आहेस। हें मी पाहातों॥ २४ तेव्हां शि
मोन उत्तर देतां बोलला। जें तुह्मी सांगितलें। त्यांमधून
कांहीं मजवर न यावें। ह्मणोन तुह्मी मजसाठीं प्रभूशीं विनं
ती करा॥ २५ तर याप्रमाणें हे साक्ष पटवून व प्रभूची
गोष्ट बोलून। माघारीं यरूशलेमाकडे फिरले। आणि त्यांनी
शोमरोन्यांच्यां बहुतां गांवांत सुवर्तमान सांगितलें ※
२६ तेव्हां प्रभूचा दूत फिलीप्पसाला बोलला, कीं तूं उ
ठ। आणि। जी वाट यरूशलेमाहून खालीं गाज्यास जाती। तें
च रान आहे। तेथे दक्षणेकडे जा॥ २७ नंतर तो उठून
गेला। मग पाहा। एक हबशी माणुस। हिजडा। [जो] हबश्यांवर
ली राणी कांदेके ईचा प्रधान। तो तिच्या सगळ्या भांडारावर

होता॥ तो भजन करायासाठीं यरूशलेमास आला होता॥
२८ मग माघारीं जात असतांना आपल्या रथावर बसला
होता। आणि यशाया भविष्यभाष्याचें वाचीत होता॥ २९ तेव्हां
आत्मा फिलीप्पसाला बोलला। तूं जवळ जा। आणि त्या र
थासीं जड॥ ३० मग फिलीप्पसानें। जवळ धांवून, त्याला य
शाया भविष्यभाष्याचें वाचितां ऐकिलें। आणि ह्मटलें। [कीं]
जें तूं वाचितोस। तें जाणतोस तरीं? ३१ तेव्हां तो बोल
ला, काय! कोणी मला वाटेनें नेत नसतां। कसें [जाणतां]
येईल? मग फिलीप्पसानें चढून त्याच्या संगतीं बसावें। ह्मणो
न ह्यानें त्याजवळ मागितलें॥ ३२ तेव्हां धर्मलेखांतील जो
प्रसंग त्यानें वाचिला। तो हाच होता। [कीं] मेंढ्रासारिखा तो
वधला जाण्यास नेला गेला। आणि जसा लाहान मेंढा आपल्या
कातरणाऱ्यापुढें मुका [आहे,] तसें त्यानें आपलें तोंड उघड
लें नाहीं॥ ३३ त्याच्या लिनतेंत त्याचें न्यायठरविणें हारिलें,
आणि त्याचा जीव पृथ्वीवरून काढिला गेला। यास्तव त्याच्या
पिढीचें वर्णन कोण करील? ३४ तेव्हां हिजडा फिलीप्पसा
सा उत्तर करीत बोलला। मी तुजसीं विनंती करितों, भवि
ष्यभाषी कोणाविषयीं हें ह्मणतो? आपणाविषयीं? किंवा कोणा
दुसऱ्याविषयीं? ३५ तेव्हां फिलीप्पसानें आपलें मुख मोकळें क
रून। आणि त्याच लेखापासून आरंभ करून। येशूचें सुवर्त
मान त्याला सांगितलें॥ ३६ मग ते वाटेनें पुढें जात असतां,
कोणा पाण्याजवळ आले॥ तेव्हां हिजडा बोलला, पाहा, पा
णी [आहे।] माझा बाप्तीस्मा करण्यास काय अडतें? ३७ म
ग फिलीप्पसानें ह्मटलें। जर तूं आपल्या सगळ्या हृदयानें
विश्वास करितोस। तर योग्य आहे॥ तेव्हां त्यानें उत्तर दे
तां ह्मटलें, येशू ख्रीस्त देवाचा पुत्र आहे। असा मी विश्वा
स करितों। ३८ मग त्यानें रथ उभा करण्याची आज्ञा दि
ल्ही॥ तेव्हां ते उभयतां। ह्मणजे फिलीप्पस व हिजडा हे पा
ण्यांत उतरले। आणि त्यानें ह्याचा बाप्तीस्मा केला॥ ३९ म

ग जेव्हां ते पाण्यापासून चढले होते। तेव्हां प्रभूच्या आत्म्याने फि
लीप्पसाला हिरावलें। आणि हिजड्याने त्याला फिरोन पाहिलें
नाहीं। कारण कीं हा आपल्या वाटेने आनंद करीत गेला॥
४० परंतु फिलीप्पस आजोतसांत सांपडला। मग काइ
सारीस पोहोंचे तोंपर्यंत सर्व नगरांतून सुवर्तमान सांगत
गेला ॥

पर्व ९॥ १ तेव्हां शाऊल प्रभूच्या शिष्यांवर धमकावणी
चे व हत्येचे उश्वास तोंपर्यंत टाकीत असतां। त्याने मुख्य उ
पाध्याजवळ जाऊन २ त्यापासून दामास्केकांतील सभांसीं [अ
सीं] पत्रें मागितलीं। कीं कोणी त्या मार्गाचे [असे] पुरुष व
स्त्रियाहि सांपडल्या, तर आपण त्यांस बांधून यरूशलेमांत
आणावें॥ ३ मग तो जातांना असें जालें, कीं दामास्केका
जवळ पोहोंचला। तेव्हां अकस्मात त्याच्या भोंवतीं आकाशांतून
उजेडाचा लखलखाट जाला॥ ४ आणि त्याने भूमीवर पडून आ
पणासीं बोलतां [असा] वाणी ऐकिली, शाऊला, शाऊला, तूं
माझ्या पाठीस कां लागतोस? ५ तेव्हां तो बोलला, हे प्रभू, तूं
कोण आहेस? मग प्रभू बोलला, ज्या येशूच्या पाठीस तूं
लागतोस, तोच मी आहें। अण्यांवर लात मारणें, हें
तुला कठीण [आहे॥] ६ तेव्हां तो कंपीत आणि विस्मीत हो
ऊन बोलला। हे प्रभू, म्या काय करावें ह्मणोन तूं इच्छितो
स? नंतर प्रभू त्याला बोलला, तूं ऊठ। आणि नगरांत
जा। मग तुला काय करावें लागतें। हें तुला तेथे सांगितलें
जाईल॥ ७ तेव्हां जे त्याचे वाटेचे सोबती मनुष्य, ते स्तब्ध उ
भे राहिले॥ त्यांनी शब्द ऐकिला खरें, परंतु कोणाला पाहिलें
नाहीं॥ ८ मग शाऊल भूमीवरून उठला। आणि त्याचे डो
ळे उघडले असून, त्याने कोणाला पाहिलें नाहीं॥ परंतु
त्यांनी त्याला हाताने नेतां दामास्केकांत आणिलें॥ ९ तेव्हां
तो तीन दिवस पाहात नव्हता। आणि त्याने खालें नाहीं व पिणेंहि
घेतलें नाहीं॥ १० तेव्हां दामास्केकांत अनान्या नांवें, येक शि

थ होता। आणि प्रभू दृष्टांतामध्यें त्याला बोलला। हे
अनान्या॥ मग तो बोलला। हे प्रभू। पाहा। मी [आ
हें॥] ११ तेव्हां प्रभू त्याला [बोलला।] तूं उठून जी भ
ली नीट ह्मटलेली। तींत जा। आणि यहूदाच्या घरांत शाऊ
ल नांवें। तार्षसकर। याचा शोध कर। कां कीं पाहा। तो प्रार्थ
ना करितो॥ १२ आणि त्यानें दृष्टांतामध्यें अनान्या नांवें
माणुस। त्याला आंत येतां। आणि आपणाला दृष्टी प्राप्त
व्हावी। ह्मणोन आपणावर हात ठेवितां। पाहिलें आहे॥
१३ तेव्हां अनान्यानें उत्तर दिलें। [कीं] हे प्रभू। यरूशले
मांत तुझे जे पवित्र। त्यांस त्या माणसानें केवढें वाईट के
लें। तें म्या बहुतांपासून त्याविषयीं ऐकिलें आहेत।
१४ आणि जे तुझें नांव घेतात। त्यां सर्वांस बांधावें। असा त्या
ला मुख्य उपाध्यापासून येथेंहि अधिकार आहे॥ १५ प
रंतु प्रभू त्याला बोलला। तूं जा। कां तर। परराष्ट्रें व राजे
व इस्राएलाचें संतानहि। यांसमोर माझें नांव वाहावयास। तो
च निवडलेलें पात्र आहे॥ १६ कां कीं त्याला माझ्या नांवाकरि
तां कितीं सोसावीं लागतात। हें मी त्याला दाखवीन॥ १७ ते
व्हां अनान्या निघाला। मग घरांत गेला। आणि [आपले]
हात त्याजवर ठेवून बोलला। हे शाऊलभावा। तां दृष्टी
पावावी। आणि पवित्र आत्म्याकडून भरावें। ह्मणोन प्रभूनें
मला पाठविलें। ज्या वाटेनें तूं आलास। तींत जो येशू तु
ला दिसला। त्यानें॥ १८ मग तेव्हांच त्याच्या डोळ्यांपासून
खपल्यांसारिखें पडलें। आणि त्याला तत्क्षणीं दिसूं लागलें॥
नंतर त्यानें उठून बाप्तिस्मा घेतला॥ १९ आणि तो अन्न घेऊ
न बळावला॥ मग शाऊल दामास्केंतील शिष्यांच्या संगतीं कि
त्येक दिवस होता॥ २० तेव्हां लागलेंच त्यानें सभांमध्यें ख्रीस्त
गाजविला। कीं तोच देवाचा पुत्र आहे॥ २१ मग ज्यानीं
ऐकिलें। ते सर्व विस्मित होऊन बोलले। कीं ज्यानें ह्या नां
वाच्या घेणाऱ्यांचा नासाडा यरूशलेमांत केला। आणि जो

त्यासाठींच येथे आला। कीं त्यांस बांधून मुख्य उपाध्यांजवळ
आणावें। तो हाच नाहीं कीं काय? २२ परंतु शाऊल अ
धीक सामर्थ्य पावला। आणि जे यहूदी दामास्कोंत राहात
होते। त्यांची निशा करून असें स्थापिलें। कीं हाच ख्रीस्त आ
हे ॐ २३ नंतर बहुत दिवस भरल्यावर। यहूद्यानी त्याचा
घात करायासाठीं येकोपा केला॥ २४ परंतु त्यांचा बेत शाऊ
लास कळला॥ आणि त्यानी, आपण त्याचा घात करावा।
ह्मणोन दिवसां व रात्रींहि वेशींजवळ जपणी केली॥ २५ ते
व्हां रात्रीं शिष्यानी त्याला घेऊन पांटीने सोडवितां गांव
कुसावरून उतरविलें॥ २६ मग शाऊल। यरूशलेमांत आ
ल्यावर। शिष्यांकडे जडुं ह्मटला॥ परंतु तो शिष्य आहे।
असा विश्वास ते सर्व न करितां, त्याला भ्याले॥ २७ अंतर
बार्णाबाने त्याला घेऊन प्रेषितांजवळ आणिलें। आणि
वाटेंत त्याने प्रभू कसा पाहिला। आणखी हा त्यासीं बो
लला। आणि त्याने धैर्यपणें दामास्कोंत येशूच्या नांवाने सां
गितलें। तसें त्यांस साद्यंत कथिलें॥ २८ मग तो यरू
शलेमांत त्यांसहीत आंत येत व बाहेर जात। २९ आणि
प्रभूयेशूच्या नांवाने धैर्यपणें सांगत [असा] होता॥ आणि त्या
ने हेल्लास्त्यांसीं ह्मटलें व विवाद केला। परंतु त्यानी त्याचा
घात करायास हातीं घेतलें॥ ३० तेव्हां भावानी जाणून त्याला
कादसारींत खालीं आणिलें। नंतर त्याला तार्षसांत पाठविलें ॐ

३१ तर अशानंतर अवघा यहूद। व गालील। व शोमरोन।
यांतील मंडळ्यांचें स्वस्थपण जालें। त्या रचल्या जातां। आ
णि प्रभूच्या भयाने व पवित्रआत्म्याच्या समजिवण्याने चाल
तां वाढल्या ॐ

३२ आणि असें जालें। कीं पेत्रस सर्व [गांवां]वरून जात
असतां। लूद्दा यांत जे पवित्र राहिले। त्यांच्या जवळहि खालीं
गेला॥ ३३ आणि तेथें अइन्यास नांवें। कोणी माणुस त्याला
आढळला। तो आठ वर्षें बाजेवर पडलेला वातरोगी होता॥

३४ तेव्हां पेत्रस त्याला बोलला। हे अइन्यासा। येशू ख्रीस्त तु
ला निरोगी करितो।। तूं ऊठ। आणि आपल्यासाठीं सांवर॥
मग तो तेव्हांच उठला॥ ३५ नंतर लूद्दा व शारोन। यां
मध्यें सर्व जे राहिले। त्यांनी त्याला पाहिलें। [आणि]
ते प्रभुकडे फिरले ॥
३६ आणि टाबीथा। ह्मणजे। अर्थ उतरल्याने। दर्कास
त्या नांवाने कोणी शिष्यीण याफोमध्यें होती॥ तिने जीं चां
गलीं कामें व जीं दानें केलीं। त्यांत ती भरली होती॥
३७ आणि त्या दिवसांमध्यें असें जालें। कीं ती रोगी हो
ऊन मेली। आणि त्यांनी तिला धुवून माडीवर ठेविलें॥
३८ तर लूद्दा याफोजवळ होता यास्तव। पेत्रस तेथे आहे हें शि
ष्यांनी ऐकून। त्याकडे दोन माणसें पाठवून विनंती केली। कीं
आपणांकडे पार येण्यास उशीर न करावा॥ ३९ तेव्हां पेत्र
स उठून। त्यांच्या संगतीं गेला। [मग] पोहोंचल्यावर। त्यां
नी त्याला माडीवर आणिलें॥ नंतर सर्व विधवा रडतां।
आणि। दर्कास त्यांसहीत होती तेव्हां तिने जे आंगरखे व व
स्त्रं केलीं। तीं दाखवितां त्याजवळ उभ्या राहिल्या॥ ४० प
रंतु पेत्रसाने त्यां सर्वांस बाहेर घातल्यावर, गुढघे टेंकून
प्रार्थना केली। मग कुडीकडे मुरडून बोलला। हे टाबीथे।
तूं ऊठ॥ तेव्हां तिने आपले डोळे उघडले। आणि पेत्रसाला
पाहून ती बसली॥ ४१ मग त्याने तिला हात देऊन। उभें
केलें। नंतर जे पवित्र व विधवा। त्यांस बोलावून। तिला त्यां
जवळ जिवंत सादर केलें॥ ४२ आणि सगळ्या याफोमध्यें हें
कळलें गेलें॥ आणि प्रभूवर बहुतांनी विश्वास ठेविला॥
४३ नंतर असें जालें, कीं तो याफोमध्यें कोणा शिमोन चां
भाराजवळ बहुत दिवस राहिला ॥
पर्व १० ॥ १ तेव्हां कर्णेल्यस नांवें कोणी माणूस कार्इसा
रींत होता॥ तो इतालीक ह्मटलेल्या पलटणाचा शताधीश।
२ सुभक्त। आणि आपल्या सर्व घराण्यासुद्धां देवाचें भय धरणा

रा, आणि लोकास बहुत दानें देणारा। आणि देवाची प्रार्थना
सर्वदा करणारा [असा होता॥] ३ त्याने दृष्टांतामध्यें देवा
च्या दुताला आपणाकडे येतां, आणि, हे कर्णेल्यसा, असें
आपणाला बोलतां, दिवसाच्या सुमारें तिसऱ्या प्रहरीं स्पष्ट पा
हिलें। ४ तेव्हां त्यावर दृष्टी लावून, आणि भयाभीत
होऊन ह्मटलें। हे प्रभू। काय आहे? मग हा त्याला बोलला।
तुझ्या प्रार्थना व तुझीं दानें देवाच्या ध्यानीं स्मरणासाठीं चढ
लीं आहेत॥ ५ आणि आतां तूं माणसांस याफोस पाठवून,
शिमोन जो उपनांवें पेत्रस ह्मटलेला। त्याला बोलाव। ६ कोणी
शिमोन चांभार। ज्याचें घर समुद्राजवळ आहे। त्याच्या जव
ळ तो विह्राडास राहातो॥ त्वां काय करावें लागतें। हें तो
तुला सांगेल॥ ७ मग कर्णेल्यसाशीं बोलणारा जो दूत तो
निघाला असतां। ह्याने आपल्या घरचाकरांतून दोघांस। आ
णि त्याची नित्य सेवा करणारे। त्यांतून सुभक्त सिपायाला बो
लावून, ८ आणि त्यांजवळ सर्व सांगून। त्यांस याफोस पाठवि
लें॥ ९ आणि दुसऱ्या दिवसीं ते वाटेने चालत असतां।
आणि नगराच्या जवळ येत असतां। पेत्रस सुमारें दुपारीं प्रा
र्थना करायास धाब्यावर चढला। १० आणि फार क्षु
धीत होऊन उपाहार करायास इक्षीत होता। परंतु ते सि
द्ध करीत असतां। त्याला भानांतर पडलें॥ ११ तेव्हां आ
काश उघडलेलें [असें।] आणि कांहीं ठाय मोठ्या जोटासारिखा,
चार कोनीं बांधलेला असतां आणि पृथ्वीवर उतरतां। [असा]
त्याने पाहिला॥ १२ त्यांत पृथ्वीवरील सर्व चतुष्पदें व श्वापदें व
वळवळणारीं। व आकाशांतील पांखरें होतीं॥ १३ आणि त्यासीं
वाणी जाली। कीं हे पेत्रसा, तूं उठून मार। आणि खा॥
१४ परंतु पेत्रस बोलला। हे प्रभू। असें नकोच। कां तर
म्या कांहीं ओंवळें अथवा अशुद्ध कधींहि खालें नाहीं॥
१५ आणि मग दुसऱ्याने त्यासीं वाणी [जाली।] कीं जीं
देवाने शुद्ध केलीं। तीं तूं ओंवळीं ह्मणुं नको॥ १६ आ

णि असें तिसऱ्याने जालें। मग तो ठाय फिरोन आकाशांत व
र घेतला गेला ※ १७ नंतर पेत्रसाने जो दृष्टांत पाहिला, तो
काय असेल? असें तो आपणासीं गूढपण पावला असतांना।
पाहा। कर्णेल्यसाजवळून जीं पाठविलेलीं माणसें। तीं शिमोना
चें घर पुसत दरवाज्यापाशीं उभीं राहिलीं। १८ तेव्हां त्यांनी
हाक मारून विचारिलें। कीं शिमोन। ज्याचें उपनांव पेत्रस।
तो येथें बिह्राडास राहातो कीं काय? १९ आणि पे
त्रस त्या दृष्टांताविषयीं विचार करीत असतां। आत्मा
त्यासीं बोलला। पाहा। तीन माणसें तुला शोधितात॥
२० तर तूं उठून खालीं हो। आणि कांहीं संशय न धरि
तां, त्यांच्या संगतीं जा। कारण कीं म्या त्यांस पाठविलें
आहे॥ २१ मग पेत्रस। आपल्याकडे जीं कर्णेल्यसापासून पा
ठविलेलीं माणसें। त्यांजवळ खालीं येऊन बोलला। पाहा। ज्या
ला तुह्मी शोधितां, तोच मी आहें। तुह्मी कोणत्या कारणा
स्तव आलां आहां? २२ तेव्हां ते बोलले। कीं कर्णेल्यस [जो]
शताधीश। नीतिमान माणुस। आणि देवाला भिणारा। [आणि]
संपूर्ण यहूद्या राष्ट्राकडून प्रमाणीक मानलेला। त्याने तुला आ
पल्या घरास बोलावावें। आणि तुजपासून गोष्टी ऐकाव्या।
ह्मणोन तो पवित्र दुताकडून प्रबोधीत जाला॥ २३ त्यावर
त्याने त्यांस आंत बोलावून आतिथ्य केलें॥ मग दुसऱ्या दि
वसीं। पेत्रस उठून त्यांसहीत निघाला। आणि याफोंतील जे
भाऊ। त्यांतून कित्येक त्याच्या संगतीं गेले ※ २४ नंतर दुस
ऱ्या दिवशीं, ते कादूसारींत पावले॥ तेव्हां कर्णेल्यसाने त्यांची
वाट पाहातां आपल्यां नातलगांस व इष्टमित्रांस बोलाविलें
होतें॥ २५ आणि असें जालें। कीं पेत्रस पोहोंचला असतां, कर्णे
ल्यसाने त्याला भेटून पायां पडतां भजिलें॥ २६ परंतु पेत्र
स त्याला उठवून बोलला, तूं ऊठ। मीहि खतां माणुस आ
हें॥ २७ मग तो त्यासहीत परस्परें बोलतां, आंत आला।
आणि बहूत मिळालेले [असे] त्याला आढळले॥ २८ तेव्हां —

तो त्यांस बोलला। तुम्ही जाणतां। कीं अन्यजातीच्याशीं जड
णें। अथवा जवळ जाणें। हें यहूद्या माणसाला अशास्त्र आ
हे॥ परंतु देवाने मला असें दाखविलें। कीं कोणा माण
साला ओंवळा अथवा अशुद्ध न ह्मणावें॥ २९ आणि त्याव
रून। मी बोलावला होऊन। आडव्या बोलण्यावांचून आलों।
यास्तव पुसतों, तुह्मी मला कोणत्या गोष्टीकरितां बोला
विलें? ३० तेव्हां कर्णेल्यस बोलला, [कीं] चवथ्या मागल्या
दिवसीं ह्या घटकेपर्यंत। मी उपास करीत होतों। आणि
तिसऱ्या प्रहरीं आपल्यां घरीं प्रार्थना करीत होतों। तेव्हां
पाहा। [येक] माणुस प्रकाशमान वस्त्रें ल्यालेला [असा] मा
झ्या समोर उभा राहिला। ३१ आणि बोलला। हे कर्णेल्य
सा। तुझी प्रार्थना ऐकिली गेली। आणि तुझीं दानें देवाच्या
ध्यानीं स्मरलीं आहेत॥ ३२ यास्तव तूं याफोस पाठीव। आणि
शिमोन ज्याचें उपनांव पेत्रस, जो शिमोन चांभाराच्या घरीं।
समुद्राजवळ बिऱ्हाडास राहात आहे। त्याला येथे बोलाव।
तो येऊन तुला सांगेल॥ ३३ यास्तव म्या तेव्हांच तुजकडे
पाठविलें। आणि त्वां आल्याने बरें केलें आहे॥ तर। ज्या
आज्ञा देवाकडून तुझ्या जवळ ठेविल्या। त्या अवघ्या ऐकाया
साठीं आह्मी सर्व देवासमोर येथे आहों ※ ३४ तेव्हां पेत्रस मु
ख मोकळें करून बोलला, मी खरें समजतों। कीं देव पक्ष
पात करणारा नाहीं। ३५ परंतु प्रत्येक राष्ट्रांत जो त्याला
भितो, आणि नीतिपण करितो, तो त्यासीं मान्य आहे॥ ३६ ये
शू ख्रीस्त। हा सर्वांचा प्रभू आहे। याकडून त्याने स्वस्थपणा
चें सुवर्तमान इस्राएलाच्या संतानाजवळ सांगतां जी गोष्ट पाठ
विली। ३७ ती तुह्मी जाणतां। ह्मणजे योहान्नाने जो बाप्तिस्मा
गाजविला। त्यानंतर जी गोष्ट गालिलाहून आरंभून अवघ्या
यहूदावर प्रगट जाली। ३८ ती नाजारेथांतील येशू [विष
यीं।] कीं देवाने त्याचा अभिषेक। पवित्रआत्मा व साम
र्थ्य यांकडून केला। [आणि] तो चांगलें करीत। व त्या

त्याबळघाकडून जे जांचलेले। त्यां सर्वांस बरें करीत फिरला। कां कीं देव त्याकडे होता॥ ३९ आणि त्याने यहूद्यां प्रांतांत व यरूशलेमांत जें केलें। त्यां सर्वांचे साक्षी आह्मी आहों॥ त्याला त्यांनी लांकडावर टांगितां घात केला॥ ४० त्यालाच देवानें तिसऱ्या दिवशीं उठविलें। आणि त्याला प्रगट होऊं दिल्हें। ४१ अवघ्या लोकांस नव्हे। परंतु देवानें जे साक्षी पूर्वीं नेमून ठेविले। त्यां आह्मास॥ ते आह्मी। तो मेलेल्यांतून उठल्यानंतर। त्याच्या संगतीं जेवलों, आणि संगतीं प्यालों॥ ४२ आणि त्याने आह्मास आज्ञा केली। कीं लोकांजवळ गाजावें। आणि साक्ष पटवावी। कीं देवाकडून जो जिवंतांचा व मेलेल्यांचा न्यायाधीश नेमलेला, तो हाच आहे॥ ४३ त्याजविषयीं सर्व भविष्यभाषी प्रमाण देतात, कीं जो कोणी त्याजवर विश्वास ठेवितो, तो त्याच्या नांवाने पापांची छूट पावेल ※ ४४ पेत्रस हीं वाक्यें बोलतां तितक्यांत, ज्या अवघ्यांनी ती गोष्ट ऐकिली। त्यांजवर पवित्र आत्मा पडला॥ ४५ तेव्हां सुंती जे, त्यांतील जितके विश्वासणारे पेत्रसाच्या संगतीं गेले, ते यावरून विस्मीत जाले। कीं [अन्य] देशस्थांवरहि पवित्रआत्मा असें दान वोतलें होतें। ४६ कशानें तर त्यांनी हे [अन्य] भाषांनी बोलतांना देवाचें थोरपण मानितां ऐकिले॥ तेव्हां पेत्रसानें उत्तर दिल्हें। ४७ [कीं] जसें आह्मी तसें हे हि पवित्रआत्मा पावले। ह्यांचा बाप्तीस्मा केला न जावा। ह्मणोन पाणी वर्जायास कोणी शक्तिमान आहे कीं काय? ४८ मग प्रभूच्या नांवाने त्यांचा बाप्तीस्मा करण्याची आज्ञा त्याने दिल्ही॥ नंतर त्याने कांहियेक दिवस तेथे राहावें। असें त्यांनी त्यापाशीं मागितलें ※

पर्व ११ ॥ १ तेव्हां जे प्रेषीत व भाऊ यहूदांत होते। त्यांनी ऐकिलें। कीं [अन्य] देशस्थांनीहि देवाची गोष्ट अंगिकारिली आहे॥ २ मग जेव्हां पेत्रस यरूशलेमास चढला होता। तेव्हां। जे सुंत्यांतील, ते त्याच्या जवळ विवाद करितां ३ बोलले। कीं

ज्यां माणसांस निसुंतपण त्यांजवळ तूं गेलास। आणि त्यांसहीत
जेवलास॥ ४ तेव्हां पेत्रस आरंभ करून अनुक्रमाने त्यांजवळ [तें]
उघडें करीत बोलला। ५ [कीं] मी याफोनगरांत प्रार्थना क
रीत होतों। आणि म्या भानांतरीं दृष्टांत पाहिला। कीं कांहीं
ठाय उतरतां। तो मोठ्या जोटासारिखा। चार कोंपऱ्यांनी आ
काशांतून खालीं सोडलेला [असा होता।] आणि मजपर्यंत
आला॥ ६ त्यांत म्या अवलोकून लक्ष लाविलें। आणि भू
मीवरचीं चतुष्पदें व श्वापदें। व वळवळणारीं। आणि आका
शांतील पांखरें। यांस म्या पाहिलें। ७ आणि मजसीं बोलतां
अशी वाणी ऐकिली। [कीं] हे पेत्रसा। तूं उठ। मार आणि
खा॥ ८ परंतु मी बोललों, हे प्रभू। असें नकोच। कां कीं
ओंवळें अथवा अशुद्ध। असें कांहीं माझ्या मुखांत कधींहि
गेलें नाहीं॥ ९ मग वाणीने दुसरेदां आकाशांतून मला
उत्तर केलें। [कीं] देवाने जीं शुद्ध केलीं। तीं तूं ओं
वळीं ह्मणुं नको॥ १० आणि हें तिसऱ्याने जालें। मग
अवघीं आकाशांत फिरोन वर वोढलीं गेलीं॥ ११ आणि
पाहा। कादूसारीहून मजकडे पाठविलेलीं तीन माणसें तेव्हां
च। ज्या घरांत मी होतों। तेथे पोंहचलीं होतीं॥ १२ आ
णि आत्म्याने मला सांगितलें। कीं कांहीं संशय न धरितां
त्यांच्या संगतीं जा॥ तेव्हां हे साहा भाऊ माझ्या संगतीं
आले। नंतर आह्मी त्या माणसाच्या घरांत गेलों॥ १३ तेव्हां
त्याने आह्मास असें वर्तमान सांगितलें, कीं त्याने दूत पाहिला
होता। [आणि] हा त्याच्या घरांत उभा असतांना त्याला
बोलला, [कीं] तूं माणसांस याफोस पाठवून, ज्या शिमोनाचें
उपनांव पेत्रस, त्याला बोलाव॥ १४ तो तुजसीं असीं वा
क्यें बोलेल: कीं त्यांकडून तूं। आपल्या सर्व घराण्यासुद्धां।
तारला जासील॥ १५ मग मी बोलुं लागलों, तेव्हां जसा
प्रारंभीं आह्मावर तसा त्यांजवरहि पवित्रआत्मा पडला॥
१६ तेव्हां प्रभूचें वाक्य मला आठवलें, कीं त्याने असें ह्म

टलें, योहानाने पाण्याकडून बाप्तीस्मा केला खरें। परंतु तु
ह्मी पवित्रआत्म्याकडून बाप्तीस्मा पावाल॥ १७ यास्तव। प्र
भू येशू ख्रीस्तावर विश्वासलेल्यां आह्मास जसें। तसें त्यांसहि
देवाने जर समान दान दिल्हें। तर देवाला निवारण करायास
शक्तिमान, [असा] मी कोण होतों? १८ तेव्हां ते हीं ऐकून
उगेच राहिले, आणि देवाचें गौरव करीत बोलले। [कीं] तर दे
वाने [अन्य] देशस्थांसहि जिवनासाठीं पश्चात्ताप दिल्हा आहे खरें॥
१९ इकडे तर स्तेफानसाविषयीं जें संकट होतें। त्यावरून जे
दाणादाण झाले, ते चालून फैनिके, व कूप्रस, व अंत
यखी, तेथवर गेले। [आणि] यहूद्यांस मात्र। त्यांवांचून को
णाला ती गोष्ट सांगितली नाहीं॥ २० परंतु त्यांतील कों
णी कूप्रसी व कुरेनी माणसें होतीं। ह्यांनीं अंतयखांत जा
ऊन। प्रभू येशूचें सुवर्तमान सांगतां। हेल्लेण्यासीं ह्मटलें॥
२१ तेव्हां प्रभूचा हात त्यांकडे होता। आणि मोठी संख्या
विश्वास धरून प्रभूकडे फिरली॥ २२ तेव्हां त्यांविषयीं यरू
शलेमांतील मंडळीच्यां कानांवर गोष्ट आली। मग त्यांनी बार्णा
बाला अंतयखीपर्यंत जाण्यासाठीं पाठविलें॥ २३ तो तेथें
जाऊन। आणि देवाची कृपा पाहून। आनंद पावला॥ तेव्हां
त्यांनी मनाच्या निश्चयाने प्रभूपासीं राहावें असा त्याने त्यां
सर्वांस बोध केला॥ २४ कां कीं हा चांगला माणुस। आ
णि पवित्रआत्म्याकडून व विश्वासाकडून भरला होता॥ तेव्हां मो
ठा समुदाय प्रभूकडे लावला गेला॥ २५ मंतर बार्णाबा शा
ऊलाचा शोध करायासाठीं निघून तार्षसास गेला। आणि त्याचा
शोध लागल्यावर। त्याने त्याला अंतयखीस आणिलें॥ २६ म
ग असें आलें। कीं त्यांनी पूर्ण वर्षपर्यंत मंडळींत येकवट
असत जातांना। मोठ्या समुदायाला उपदेशिलें॥ आणि शि
ष्य पहिल्याने अंतयखींत ख्रीस्ती [असे] ह्मटले गेले॥

२७ आणि त्यां दिवसांत यरूशलेमापासून भविष्यभाषी खालीं
अंतयखीस गेले॥ २८ तेव्हां त्यांतील येक, आगाबस नां

वें। त्याने उभें राहून आत्म्यायोगें सुचविलें। कीं संपूर्ण वस्ती
वर मोठा दुकाळ होणार आहे॥ मग तो क्लाउदियसका
इसाराच्यां वेळेस जाला॥ २९ तेव्हां शिष्यांतील येकयेक
जसा सभाग्य जाला। तसें त्यांतील प्रत्येकानें नेमिलें। कीं यहू
दांत जे भाऊ राहातात। त्यांच्या सेवेसीं आपण [कांहीं]
पाठवावें ३० आणि हें त्यांनी केलें। बार्णाबा व शाऊल यां
च्यां हातें॥ पुरातनांजवळ पाठविलें ॥

पर्व १२ ॥ १ परंतु त्या वेळेस हेरोद राजानें, मंडळींतील
कित्येकांस दुःख द्यावयास, त्यांवर हात टाकिले। २ आणि
तरवारीनें योहान्नाचा भाऊ जो याकोब त्याचा घात केला।
३ मग हें यहूद्यांस संतोषकारी आहे, असें पाहातां, आ
णखी प्रवृत्त होऊन पेत्रसालाहि धरिलें। तेव्हां अफुगवणभा
करींचे दिवस होते, ४ ह्मणोन त्याला धरल्यावर बंदीशाळेंत
घातलें। मग त्याला राखायास सिपायांच्यां चार चौकड्यांच्या
स्वाधीन केलें। [आणि] वल्हांडणसणानंतर त्याला लोकां
जवळ बाहेर आणायास योजिलें॥ ५ तेव्हां पेत्रस त्याप्रमाणें
बंदिशाळेंत राखला गेला। परंतु मंडळीकडून त्याच्या साठीं
देवाजवळ निजध्यासी प्रार्थना जाली होती॥ ६ मग हेरोद त्याला
पुढें आणायास सिद्ध जाल्यानंतर त्याच रात्रीं। पेत्रस दोन सां
खळ्यांनी बांधलेला असतां। दोन सिपायांमध्यें झोंप घेत होता;
आणि पाहारेकरी दरवाज्यापुढें बंदिशाळा राखीत होते॥ ७ ते
व्हां पाहा। प्रभूचा दूत जवळ उभा राहिला। आणि शाळें
त उजेड पडला। तेव्हां ह्यानें पेत्रसाच्या कुसीवर मारून त्या
ला उठवीत ह्मटलें, तूं लवकर ऊठ॥ नंतर त्याच्या सांखळ्या
हातांतून गळून पडल्या॥ ८ मग दूत त्याला बोलला। तूं
कंबर बांध। आणि आपल्या वाहाणा पायीं घाल। तेव्हां
त्यानें तसें केलें। मग त्याला ह्मणतो, तूं आपलें वस्त्र पांघ
रून माझ्या मागें ये॥ ९ ह्मणोन तो बाहेर जाऊन ह्या
च्या मागें गेला॥ तेव्हां दुताकडून जें जालें तें खरें। असें

तो समजला नाहीं। परंतु आपण दृष्टांत पाहिला। असें त्याला
वाटलें॥ १० तेव्हां ते पहिला व दुसरा पाहारा यांवरून जाऊ
न। लोखंडी दरवाजा जो नगरांत नेतो तेथपर्यंत आले॥ तो
आपल्या आपण त्यांच्या साठीं उघडला॥ मग ते पार जाऊन ये
का आळीनें पुढें गेले। आणि तेव्हांच दूत त्याजपासून गे
ला॥ ११ नंतर पेत्रस आपलेपणांत येऊन बोलला। आतां
मला खरें कळलें। कीं प्रभूनें आपला दूत बाहेर पाठविला।
आणि मला हेरोदाच्या हातांतून। व यहूद्यां लोकांच्या सर्व
प्रतिक्षेंतून काढिलें आहे॥ १२ नंतर तो विचार करून
योहान्न ज्याचें उपनांव मार्कस। त्याची आई मारया इच्या
घरास आला॥ तेथें बहुत मिळालेले असतांना। प्रार्थना क
रीत होते॥ १३ तेव्हां पेत्रस दरवाज्याच्या दिंडीवर ठोकी
त असतां। रुदे नांवें तरुणी ऐकायास आली॥ १४ आणि
तिनें पेत्रसाचा शब्द वोळखून, आनंदामुळें दरवाजा उघडिला
नाहीं। परंतु आंत धांवून सांगितलें। कीं पेत्रस दरवाज्या
पुढें उभा राहिला आहे॥ १५ तेव्हां त्यांनी तिला ह्मटलें।
तूं वेडी आहेस॥ परंतु तिनें आग्रह धरिला। कीं असेंच आ
हे॥ तेव्हां ते बोलले। तो त्याचा दूतात्मा आहे॥ १६ प
रंतु पेत्रस ठोकीत राहातांना। त्यांनी उघडून त्याला पाहिलें।
आणि विस्मय केला॥ १७ तेव्हां त्यानी उगें राहावें। ह्मणो
न ह्याने हाताकडून त्यांस खुणाविलें। [आणि।] प्रभूनें त्याला
बंदिशाळेंतून कसें बाहेर आणिलें। हें त्यांस सविस्तर सांगि
तलें। आणि ह्मटलें। तुह्मी याकोबाला व [इतर]भावांस हीं
सांगा॥ मग तो निघून दुसऱ्या ठिकाणीं गेला॥ १८ नंतर
दिवस उगवल्यावर। सिपायांमध्यें लाहान नाहीं [असो] गडबड
जाली। काय। पेत्रस कोठें गेला! १९ मग हेरोदानें त्याला शो
धितांना न पावून। पाहारेकऱ्यांचा न्याय करून। त्यांस नेऊन
मारावें, असी आज्ञा दिल्ही॥ आणि तो यहूदाहून खालीं
कादसारीस जाऊन राहिला॥

२० आणि सोरकर व सीदोनकर। यांजवर हेरोद युद्धा
वेशी जाला॥ परंतु ते येकचित्तें त्याजवळ आले। आणि
राजाच्या रंगमाहालावर जो ब्लास्तस। त्याची वग करून। समें
ट आगते जाले। यामुळें कीं त्यांचा प्रांत राज[प्रांत]ांतून पोषण
पावत होता॥ २१ मग नेमल्या दिवशीं। हेरोद राजवस्त्रें लें
वून। आणि सिंव्हासनावर बसून, त्यांशीं लोकीक वाका बोलला॥
२२ तेव्हां लोक गर्जला। कीं [हा] शब्द देवाचा। माणसाचा ना
हींच॥ २३ तेव्हां त्याने देवाला गौरव दिल्हें नाहीं। यास्तव तेव्हां
च प्रभूच्या दुताने त्याला मारिलें। आणि तो किड्यानी खा
ल्ला होऊन। त्याने प्राण सोडिला ❀ २४ परंतु देवाची गोष्ट
वाढली। आणि विस्तीर्ण जाली॥ २५ दूकडे बार्णाबा व शा
ऊल ती दानसेवा संपवून। यरूशलेमापासून फिरतांना, योहा
न ज्याचें उपनांव मार्कस, त्याला घेऊन गेले ❀

पर्व १३ ॥ १ तेव्हां आंतयखींत जी मंडळी होती। तींत
कित्येक भविष्यभाषी व उपदेशक। ह्मणजे बार्णाबा। व शि
मोन जो निगेर ह्मटलेला। व लूकयसहि जो कुरेनेचा।
आणि मानाहेन ज्याचा प्रतिपाळ चौथाईदार हेरोदाच्या
सहीत [जाला।] व शाऊल, [असे] होते॥ २ आणि
ते प्रभूला सेवीत, व उपास करीत असतां। पवित्रआत्मा
बोलला। ज्या कार्यासाठीं म्या बार्णाबाला व शाऊलाला बोलावि
लें। त्यासाठीं तुह्मी त्यांस मजकरितां अगथ्यें वेगळें करा॥
३ तेव्हां त्यानी उपास व प्रार्थना करून। आणि त्यांजवर हात
ठेवून [त्यांस] निरोप दिल्हा ❀ ४ यास्तव ते पवित्रआत्म्या
ने असे पाठविलेले असतां, खालीं सेलूकीस गेले॥ मग तेथून
कूप्रसास तारवाने गेले॥ ५ आणि सालामिसांत असतां, त्या
नी यहूद्यांच्या सभांमध्यें देवाची गोष्ट सांगितली। आणि यो
हानहि त्यांचा हस्तकी होता॥ ६ तेव्हां त्या बेटावरू
न पाफसापर्यंत गेल्यानंतर त्यांस कोणी मांत्रीक, खोटा भ
विष्यभाषी, यहूदी। ज्याचें नांव बार्येशू। तो आढळला॥

७ तो। प्रतिनिधी सेर्गियसपाउलस समजीक माणुस। ह्या
पासीं होता॥ ह्याने बार्णाबा व शाऊल यांस बोलावून।
देवाची गोष्ट ऐकायास प्रयत्न केला॥ ८ परंतु, तो मांत्री
क एलमी [ह्मटलेला।] कारूण कीं त्याचें नांव अर्थानें तसें
आहे, त्याने त्या प्रतिनिधीला विश्वासापासून उलटावयास
यत्न करितां। त्यांस आडविलें॥ ९ तेव्हां शाऊल। जो पा
ऊलमहि [ह्मटलेला।] तो पवित्रआत्म्याने भरलेला असतां।
आणि त्याजकडे दृष्टी लावितां। १० बोलला। अरे, अव
घ्या कपटाने व अवघ्या धूर्तकर्माने भरलेल्या, द्यावलसाच्या
पुत्रा, अवघ्या नीतिपणाच्या शत्रू। तूं। प्रभूच्यां नीट मार्गांस
विपरीत करणें। हें सोडणार नाहींस कीं काय? ११ तर
आतां पाहा, प्रभूचा हात तुजविरुद्ध [आहे।] आणि तूं कांहीं
वेळपर्यंत सूर्य न पाहातां। आंधळा होसील॥ तेव्हां येकायेकीं
अंधपण, व काळोख त्याजवर पडलें। आणि तो हिंडतां।
हातें नेणारा, अशाचा शोध करिता जाला॥ १२ तेव्हां जें घ
डलें। तें त्या प्रतिनिधीने पाहिल्यावर, प्रभूच्या उपदेशावरू
न फार आश्चर्य करून विश्वास धरिला ※

१३ नंतर जे पाऊलसाच्या संगती। ते पाफसाहून तारवा
ने निघून पांफुलींतील पेर्गेस गेले॥ तेव्हां योहान त्यांपासून
निघून। यरूशलेमास माघारीं गेला॥ १४ परंतु ते पेर्गेहून
पुढें जातां पिसीदींतील आंतयखीस गेले॥ मग शाब्बाथदि
वशीं सभेंत जाऊन बसले॥ १५ तेव्हां नेमशास्त्रांतील व भ
विष्यलेखांतील वाचणें जाल्यानंतर, सभेच्यां अधिकाऱ्यांनी
त्यांजवळ पाठवून सांगितलें, अहो भाऊमाणसें। जर तुह्मा
पासीं लोकांसाठीं बोधक गोष्ट आहे। तर तुह्मी सांगा॥
१६ तेव्हां पाऊलस उठून आणि आपल्या हाताने खुणावून
बोलला। अहो इस्राएल माणसें। व देवाचें भय धरणारीं। तु
ह्मी ऐका॥ १७ ह्या इस्राएल लोकाच्या देवाने आमच्यां पि
तरांस निवडिलें। आणि त्यांस मिसरदेशांतील प्रवासांत यो

र केलें। मग त्यांतून त्यांस उंच्या हाताने बाहेर आणिलें॥
१८ आणि सुमारें चाळीस वर्षांच्या काळापर्यंत, त्याने रानां
त त्यांची वर्तणूक सोसिली। १९ नंतर खनान देशांतील सात
राष्ट्रांचा नाश करून। यांचे देश देवखुणानी त्यांस वांटिले॥
२० आणि असांनंतर सुमारें साडेचारशें वर्षें शमुवेल भवि
ष्यभाष्यापर्यंत त्याने [त्यांस] न्यायाधीश दिल्हे॥ २१ मग तेव्हां
पासून त्यानी राजा मागितला। आणि देवाने त्यांस शाऊल।
जो किशाचा पुत्र, बन्यामीनवंशांतील माणूस। तो चाळीस
वर्षांपर्यंत दिल्हा। २२ मग त्याला दूर करून। दाविदाला त्यां
चा राजा होण्यास उठविलें। आणि ह्याविषयीं साक्ष देतां ह्मट
लें। [कीं], इशायाचा पुत्र, जो दावीद, जो माझ्या मनाप्र
माणे [असा] माणुस मला मिळाला। तो माझ्या सर्व इच्छांप्र
माणे करील॥ २३ ह्याच्या बिजांतून देवाने वचनाप्रमाणे
इस्राएलासाठीं तारणारा [असा] येशू उठविला आहे॥
२४ त्याच्या येण्याच्या पूर्वीं। योहान्नाने सर्व इस्राएललोकास
पश्चात्तापसंबंधी बाप्तीस्मा गाजविला [होता॥] २५ आणि
योहान्न आपली धांव संपवीत असतां बोलला। तुह्मी मला
असें कोण कल्पितां? मी तो नव्हें। परंतु पाहा। माझ्या मा
गें असा कोणी येतो। कीं त्याच्या जोड्याचा [देखील] बंद
सोडायास मी योग्य नाहीं॥ २६ अहो भाऊ माणसें। अ
ब्राहामवंशाचे पुत्र। आणि तुह्मामध्यें जे देवाचें भय धर
णारे, त्यां तुह्मास ह्या तारणाची गोष्ट पाठविली आहे॥
२७ कारण कीं यरूशलेमांतील राहाणारे यानी। आणि यां
चे अधिकारी। यानी त्याला न जाणून आणि भविष्यभाष्यां
च्या ज्या वाण्या प्रत्येक शाब्बाथांत वाचल्या, त्यांस [न
जाणून। येशूवर] अन्याय ठरविल्याने पूर्ण केलें आहे॥
२८ आणि मरणाचें कांहीं कारण त्यांस न सांपडतां। त्या
ला मारण्याने घालवावें। असी त्यानी पिलातपासीं विनंती के
ली॥ २९ मग त्याविषयीं सर्व जीं लिहिलेलीं, तीं संपविलीं अ

सतां। [त्याला] लांकडावरून उतरवून प्रेतपेवांत ठेविलें॥ ३०
रंतु देवाने त्याला मेलेल्यांमधून उठविलें॥ ३१ जे त्याच्या
संगतीं गालिलाहून यरूशलेमास चढले। त्यांकडून तो बहुतां
दिवसांपर्यंत पाहिला गेला॥ ते लोकाजवळ त्याचे साक्षी आ
हेत॥ ३२ आणि पितरांसीं जें वचन जालें, त्याचें सुवर्त
मान आह्मी तुह्मास सांगतों। कीं देवाने त्यांच्यां आह्मा लें
करांसाठीं येशूला उठविल्याने, तेंच पूर्ण केलें आहे॥ ३३ त
सें दुसर्‍या गीतांतहि लिहिलें आहे। [कीं] तूं माझा पुत्र
आहेस। आज म्या तुला जन्मविलें आहे॥ ३४ आणि त्याने त्या
ला मेलेल्यांतून [असें] उठविलें, कीं तो आतांपासून सडण्या
स परतणार नाहीं। ह्या अर्थास त्याने असें ह्मटलें, कीं मी।
दाविदावरले जे खचीत दयाप्रकार। ते तुह्मास देईन॥ ३५
यास्तव तो दुसर्‍या [ठिकाण]ांतहि ह्मणतो। [कीं] तूं आपल्या पु
ण्यवानाला सडलेपण अनुभवुं देणार नाहींस॥ ३६ तर दा
वीद आपल्या पिढींत देवाच्या बेताप्रमाणे सेवा करून झोंपीं
गेला। आणि आपल्यां पितरांजवळ ठेविला होऊन। त्या
ने सडलेपण अनुभविलें खरें। ३७ परंतु ज्याला देवाने
उठविलें। त्याने सडलेपण अनुभविलें नाहीं॥ ३८ यास्तव
अहो भाऊमाणसें तुह्मास हें कळलें जावो। कीं ह्या [येशू]
कडून पापांची क्षमा तुह्मास सांगून दाखविली आहे॥ ३९ आ
णि ज्यांपासून तुह्मी। मोशाच्या नेमशास्त्राकडून सुटून
न्यायी ठरविले जाऊं न शकतां। त्यां अवघ्यांपासून प्रत्येक विश्वा
सणारा त्या [येशू]कडून सुटून न्यायी ठरविला जातो॥ ४० या
स्तव। भविष्यलेखांमध्यें जें सांगितलेलें। तें तुह्मावर न या
वें ह्मणोन सावध व्हा। तें हें। ४१ अहो धिःकारणारे। तु
ह्मी पाहा। व आश्चर्य माना। व नाहींसे व्हा। कां कीं जें
काम कोणीं तुह्मास सविस्तर सांगितल्यास तुह्मी विश्वासणारच
नाहीं। तें काम मी तुमच्यां दिवसांत करितों ※

४२ मग यहूदी सभेंतून गेल्यावर। [इतर]देशस्थानी मागि

तलें। कीं ह्या गोष्टी, पुढल्या शाब्बाथांत, आपल्यांस सांगितल्या
जाव्या॥ ४३ तेव्हां सभा सुटल्यावर, यहूद्यांतील व [त्यांच्या]
भक्तिमंत अनुसाऱ्यांतील बहुत, पाऊलस व बार्णाबा यांच्या
मागें गेले। [आणि] यानी त्यांसीं बोलून विश्वासविषीं कीं त्या
नी देवाच्या कृपेंत टिकावें ॥ ४४ मग पुढल्या शाब्बाथीं बहुधा
सर्व नगर देवाची गोष्ट ऐकायास मिळालें॥ ४५ परंतु यहूदी
समुदायांस पाहून आवेशाने भरले। आणि, पाऊलसाकडून जीं
सांगितलीं, त्यांविरुद्ध बोलत व निंदीत विवाद करिते जाले॥
४६ तेव्हां पाऊलस व बार्णाबा निर्भय होऊन बोलले, [कीं]
देवाची गोष्ट पहिल्यानें तुह्मासीं सांगायास अगत्य होतें। प
रंतु तुह्मी तिला अव्हेरितां, आणि आपणांस सर्वकाळ जि
ण्यासाठीं अयोग्य ठरवितां। पाहा यावरून आह्मी [इतर]दे
शस्थांकडे फिरतों॥ ४७ कारण कीं प्रभूनें आह्मास असी आज्ञा
दिल्ही आहे॥ [असा लेख, कीं] त्वां पृथ्वीच्या शेवटापर्यंत तारणा
साठीं व्हावें, ह्मणोन म्या तुला [इतर]देशस्थांस उजेडरूप ठेविलें
आहे॥ ४८ नंतर [इतर]देशस्थानी ऐकून संतोष केला,
आणि प्रभूच्या गोष्टीला गौरविलें॥ तेव्हां जितके सर्वकाळ
जिण्यासाठीं नेमिलेले, तितके विश्वासले॥ ४९ आणि त्या सर्व प्रां
तावर प्रभूची गोष्ट विस्तारली गेली॥ ५० परंतु यहूद्यानी
ज्या स्त्रिया भक्तिमंती व सन्मानी, आणि नगरांतील जे मुख्य,
त्यांस चिथावून, पाऊलस व बार्णाबा यांवर पाठींलागणें
उठविलें, आणि त्यांस आपल्यां सीमांतून घालविलें॥ ५१ प
रंतु ते त्यांविरुद्ध आपल्यां पायांची धूळ झाडून, इकनय
नास गेले॥ ५२ तेव्हां शिष्य आनंदानें व पवित्र आत्म्यानें भ
रले होते ॥

पर्व १४ ॥ १ आणि इकनयनांत असें जालें, कीं ते
यहूद्यांच्या सभेंत संगतीं गेले। मग असें बोलले, कीं यहू
दी व हेल्लासीहि यांतून मोठ्या भरण्यानें विश्वास धरिला॥ २ प
रंतु अविश्वास्यां यहूद्यानी [इतर]देशस्थांच्या मनांस उठवू

न। भावांवर विपरीत केलें॥ ३ तथापि ते फार वेळ राहून प्रभूविषयीं निर्भयें बोलले। ह्याने आपल्या कृपेच्या गोष्टीची साक्ष देतांना त्यांच्या हातांकडून चमत्कार व उत्पात घडुं दिल्हे॥ ४ परंतु नगरांतील भरण्याची फूट होतांना। कित्येक यहूद्यांकडे। आणि कित्येक प्रेषितांकडे जाले॥ ५ मग त्यांस गांजायास। आणि धोंड्यांनी मारायास। [असा] [इतर]देशस्थांचा। व आपल्यां अधिकाऱ्यांसुद्धां यहूद्यांचाहि झपाटा जाला असतां। ६ ते [हें] जाणून। लूकानींतील नगरें। लूस्त्रा व दर्बे। व चहूंकडलें स्थान। त्यांत पळाले। ७ आणि तेथे सुवर्तमान सांगत होते॥

८ तेव्हां लूस्त्रांत कोणी माणुस पायीं अशक्त [असा] बसला होता॥ तो आपल्या आईच्या पोटापासून पांगळा असतां। कधींहि चालला नव्हता॥ ९ त्याने पाऊलसाचें बोलणें ऐकिलें॥ ह्याने त्याकडे न्याहाळून। आणि निरोगी केलें जाण्याचा विश्वास त्याला आहे हें पाहून। १० मोठ्या स्वराने सांगितलें। तूं आपल्यां पायांनी नीट उभा राहे॥ तेव्हां तो उडी मारून चालला॥ ११ मग। जें पाऊलसाने केलें। तें समुदायांनी पाहिल्यावर। आपला स्वर मोठा करून। लूकानी बोलींत ह्मटलें। [कीं] देव मनुष्यरूपी होऊन आह्माजवळ उतरले आहेत॥ १२ आणि त्यांनी बार्णाबाला दिस[देव] ह्मटला। आणि पाऊलस बोलण्याचा पुढारी होता। यावरून त्याला हेर्मेस [ह्मटला॥] १३ आणि दिस। जो त्यांच्या नगरापुढें होता। त्याच्या पुजाऱ्याने [फूल]शिरपेंचांसुद्धां बोंड दरवाज्यांजवळ आणून समुदायांसहीत। पशुयज्ञ करायास इच्छिलें॥ १४ परंतु बार्णाबा व पाऊलस ह्या प्रेषितांनी [तें] ऐकिल्यावर। आपलीं वस्त्रें फाडून। समुदायांत धांवून। १५ ओरडतांना ह्मटलें। अहो माणसें, तुह्मी हीं कां करितां? आह्मीहि तुमच्या सारिखीं आधीन माणसें आहों॥ तुह्मी ह्यां व्यर्थपणांपासून सजीव देवाकडे फिरावें। ह्मणोन आह्मी, तु

त्यांस सुवार्ता सांगतों॥ ज्याने आकाश। व पृथ्वी। व समुद्र। व यांतील जीं अवघीं, तीं उत्पन्न केलीं॥ १६ [आणि] याने अव घ्यां राष्ट्रांस गेलेल्यां पिढ्यांत। आपापल्यां मार्गानी चालुं दि लें। १७ तथापि आपणाला साक्षहीनहि ठेविलें नाहीं, [परंतु] बरें केलें। आकाशांतून पाऊस, आणि फळावळी समय [असे] आह्मास देतां। अन्नाने व आनंदाने आमचीं हृदयें भरिलीं॥ १८ तेव्हां त्यानी हीं बोलून। आपणांशीं पशुयज्ञ करण्यापासून लोकांस कष्टाने निवारिलें ॥ १९ परं तु अंतयखी व दूकनयन यांपासून यहूदी तेथे आले॥ तेव्हां त्यानी समुदायांस भरास घालून। आणि पाऊलसाला धोंडे मा रून तो मेला असें कल्पितां, त्याला नगराबाहेर वोढिलें॥ २० तथापि शिष्य त्याच्या भोंवते असतां, तो उठून नगरां त गेला। आणि दुसऱ्या दिवशीं बार्णाबासुद्धां देर्बेस गेला ॥ २१ नंतर ते त्या नगरांत सुवर्तमान सांगतांना बहुतांस शि ष्य करून। माघारीं लूस्त्रास। व दूकनयनास। व अंतयखीस। फिरले॥ २२ [आणि] त्यानी। शिष्यांच्यां जिवांस स्थोर करी त। असा बोध केला, कीं विश्वासांत राहावें, आणि अ सा[हि।] कीं आह्मास बहुत संकटानी देवाच्या राज्यांत जा वें लागतें॥ २३ तेव्हां त्यानी त्यांच्या साठीं प्रत्येक मंडळींत वडिलांस नेमून, उपासानी प्रार्थना करीत असतां त्यांस। ज्या प्रभूवर त्यानी विश्वास ठेविला। त्याजवळ निरवलें॥ २४ म ग ते पिसीदीवरून जाऊन पांफुलीस गेले। २५ आणि पेर्गेंत गोष्ट सांगून आत्तालीस उतरले॥ २६ मग तेथून तारवाने अं तयखीस आले॥ येथून। जें काम त्यानी पूर्ण केलें। त्या साठीं ते देवाच्या कृपेत सोपून दिलेले होते॥ २७ आण खी तेथे आल्यावर। त्यानी मंडळी मिळवून। आपणांसीं दे वाने जितकीं केलीं। आणि [पर]राष्ट्रांसाठीं विश्वासाचें दार उघडलें। हीं सांगितलीं॥ २८ मग ते त्यां शिष्यांच्या संगतीं बहुत वेळ राहिले ॥

पर्व १५॥ १ तेव्हां कित्येकानी। यहूदापासून खालीं ये
ऊन। भावांस असें उपदेशिलें। कीं जर तुह्मी मोश्याच्या री
तीप्रमाणे सुंता न घेतां। तर तुमच्यानी तारलें जाववत ना
हीं॥ २ यास्तव पाऊलस व बार्णाबा यांचा त्यांसीं मोठा ह
ट्ट व विवाद जाल्यावर, त्यानी पाऊलसाला व बार्णाबाला व
आपल्यांतील कित्येक दुसऱ्यांस असें नेमिलें। कीं ह्या विचारा
विषयीं यरूशलेमांतील प्रेषीत व वडील यांजवळ वर जावें॥
३ यास्तव ते असें मंडळीकडून पुढें पाठविले होऊन फैनिके
व शोमरोन यांमधून [अन्य]देशस्थांचें फिरणें सांगत
सांगत गेले॥ आणि त्यानी अवघ्यां भावांस मोठा आनंद उ
त्पन्न केला॥ ४ नंतर ते यरूशलेमांत आल्यावर, मंडळी व
प्रेषीत व वडील यानी त्यांचा अंगिकार केला॥ आणि दे
वाने त्यांसीं जितकीं करविलीं। तितक्यांचें वर्तमान त्यानी
सांगितलें ※ ५ परंतु फारिश्यांच्या तडांतील जे कित्येक वि
श्वासणारे, त्यानी उठून सांगितलें। कीं त्यांची सुंता केली
पाहिजे। आणि मोश्याचें नेमशास्त्र पाळायास आज्ञा दिल्ही
[पाहिजे] ※

६ तेव्हां ह्या गोष्टीविषयीं पाहायास प्रेषीत व वडील मिळा
ले॥ ७ मग बहुत विवाद जाल्यावर, पेत्रस उठून त्यांस बोलला।
अहो भाऊसाणसें। तुह्मी जाणतां, कीं पूर्वींच्या दिवसांत
देवाने आह्मामध्यें असें निवडिलें, कीं [अन्य]देशस्थानी माझ्या
मुखें सुवर्तमानाची गोष्ट ऐकावी। व विश्वासावें॥ ८ आणि
हृदयजाणत्या देवाने। जसा आह्मास तसा त्यांसहि पवित्रआ
त्मा देतांना, त्यांविषयीं साक्ष दिल्ही आहे। ९ आणि वि
श्वासाकडून त्यांचीं हृदयें शुद्ध करून, आमच्या आणखी त्यां
च्या मध्यें कांहीं भेद केला नाहीं॥ १० यास्तव आतां जें जूं
आमचे पितर आणि आह्मीहि वागवायास शक्तिमंत नव्हतों।
तें देवाने शिष्यांच्या मानेवर ठेवावें, असें तुह्मी त्याला झट
कां लावितां? ११ आणखी ज्यां प्रकारें तें। त्या प्रकारें,

आह्मीहि प्रभू येशू खीस्ताच्या कृपेकडून तारले जाऊं, असें
विश्वासतों ॐ १२ तेव्हां अवघा भरणा उगाच राहिला।
आणि बार्णाबा व पाऊलस यांचें ते ऐकते जाले॥ यांकडून देवा
ने जे साक्षात्कार व उत्पात [पर]राष्ट्रांमध्यें केले। ते ह्यांनी सांगि
तले ॐ १३ मग हे उगे राहिल्यानंतर, याकोबाने उत्तर करीत
ह्मटलें। अहो भाऊ माणसें। तुह्मी माझें ऐका॥ १४ पहिल्या
ने देव आपल्या नांवाकरितां [पर]राष्ट्रांतून [येक] प्रजा घेण्या
स कसा भेटला। हें शिमोनाने सांगितलें आहे॥ १५ आणि
ह्यासीं भविष्यभाष्यांच्या गोष्टी संगत आहेत। ह्याप्रमाणे लि
हिलें आहे। १६ [कीं] ह्यानंतर मी फिरोन येईन, आणि
दाविदाचा पडलेला मंडप पुन्हा बांधितांना त्याच्या मोडी पु
न्हा रचीन। आणि त्याला फिरोन नीट करीन। १७ यासाठीं
कीं उरलेलीं माणसें। व सर्व [पर]राष्ट्रे ज्यांवर माझें नांव ह्म
टलें जातें। त्यांनी प्रभूला शोधावें। प्रभू जो हीं अवघीं करि
तो। तो [असें] ह्मणतो॥ १८ देवाला आपलीं सर्व कामें
प्रारंभापासून कळलीं आहेत॥ १९ यास्तव माझें मत अ
सें आहे, कीं [पर]राष्ट्रांतून जे देवाकडे फिरतात, त्यांस
आह्मी त्रास न द्यावा। २० परंतु त्यांस असें लिहून पाठवा
वें। कीं मूर्तींचीं अमंगळपणें। व व्यभिचार, व जें गुदमरून
मेलेलें। व रक्त, यांपासून दूर होणे। २१ कां तर मोशे
प्रत्येक शाब्बाथांत सभांमध्यें वाचिला असतां। त्याचे गाजविणा
रे प्राचीन पिढ्यांपासून प्रत्येक नगरीं आहेत ॐ

२२ तेव्हां संपूर्ण मंडळीसुद्धां प्रेषितांस व वडिलांस अ
सें वाटलें, कीं आपण आपल्यांतून निवडलेलीं माणसें। [ह्मणजे]
यहूदा। ज्याचें उपनांव बार्साबा। व सिलास, जे भावांमध्यें पुढारी
पुरुष, त्यांस पाऊलस व बार्णाबा यांच्या संगतीं आंतयखीस पाठ
वावें॥ २३ [आणि] त्यांच्या हातावाटें त्यांनी असीं लिहिलीं,
कीं आंतयखी। व अराम। व किलिकी। यांमध्यें जे भाऊ [पर]
राष्ट्रांतील [आहेत।] त्यांसीं कल्याणार्थी प्रेषीत व वडील

व [illegible]॥ २४ आह्मी ऐकिलें। कीं कित्येकानी आह्मापासून [illegible] बोलण्यानी तुह्मास चिंताग्रस्त केलें आहे। तुमच्या जि [illegible] विघ्नळीत करीत ह्मटलें, कीं तुह्मी सुंता घ्यावी। आ णि नेमशास्त्र पाळावें॥ आह्मी त्यांस [असी] आज्ञा केली ना हीं॥ २५। २६ त्यावरून। आह्मी येकचित्त असतां, आह्मा स असें वाटलें, कीं आमचे प्रिय बार्णाबा व पाऊलस। ज्यां माणसानी आमच्या प्रभू येशू ख्रीस्ताच्या नांवासाठीं आपले प्रा ण पराधीन केले। त्यांच्या संगतीं निवडलेल्यां माणसांस तुह्मा जवळ पाठवावें॥ २७ यास्तव यहूदा व सिलास यांस आह्मी पाठविलें आहे। आणि बोलण्याने हे असेंच सांगतील॥ २८, २९ कारण कीं। मूर्तीस अर्पिलेलीं। व रक्त। व गुदमरून मेलेलें। व व्यभिचार। यांपासून तुह्मी दूर व्हावें। ह्या अग त्य [गोष्टीं]पेक्षां तुह्मावर कांहीं अधीक भार न ठेवावा। असें पवित्र आत्म्याला व आह्मास वाटलें आहे॥ त्यांपासून तुह्मी आपणांस राखिल्याने बरें आचराल॥ सुखरूप असा॥ ३० नंतर ते निरोप घेऊन आंतयखीस गेले। मग त्यानी भरणा मिळवून पत्र दिल्हें॥ ३१ तेव्हां ह्यानी वाचल्यावर। त्या शांतवनावरून आनंद केला॥ ३२ आणि यहूदा व सिलास यानी। आपणहि भविष्यभाषी असून, फार बोल ण्याने भावांस बोध करितांना स्थिराविलें॥ ३३ नंतर ते [कांहीं] वेळ राहून। भावांपासून प्रेषितांजवळ [जायास] स्वस्थपणाने निरोप पावले॥ ३४ तथापि सिलासाला वाटलें, कीं आपण तेथे आणखी राहावें॥ ३५ पाऊलस व बार्णाबा हेहि आं तयखींत राहात जाऊन। दुसऱ्यांहि बहुतांसुद्धां प्रभूच्या गोष्टी चा उपदेश करीत व सुवर्तमान सांगत [illegible] ※

३६ मग कांहीं दिवस [गेल्यां]नंतर। पाऊलस बार्णाबा ला बोलला। तूं चाल। ज्यां प्रत्येक नगरीं आह्मी प्रभूची गो ष्ट सांगितली। त्यांतील आमचे जे भाऊ। ते कसे आहेत। ह्मणोन आपण फिरोन जाऊन त्यांस भेटून पाहूं॥ ३७

व्हां बार्णाबाने असें योजिलें। कीं योहान्न जो मार्कस म्हट
लेला त्याला संगतीं घ्यावें॥ ३८ परंतु पाऊलसाला असें वा
टलें। कीं जो आपल्यांपासून पांफुलीहून निघाला। आणि आ
पल्यां संगतीं कामास आला नाहीं। त्याला समागमें घ्यावें।
हें अयोग्य [आहे॥] ३९ यास्तव असें फार चिडणें जालें। कीं
ते येकमेकांपासून वेगळे जाले। तेव्हां बार्णाबा मार्कसाला घे
ऊन तारवानें कुप्रसास गेला ※ ४० परंतु पाऊलस सिलासा
ला निवडून घेऊन। भावांकडून देवाच्या कृपेंत निरवला असतां।
गेला॥ ४१ आणि त्यानें अराम व किलिकी यांवर फिरतां
मंडळ्यांस स्थिर केलें ※

पर्व १६॥ १ नंतर तो दर्बेंत, मग लूस्रांत पावला। तेव्हां
पाहा। कोणी शिष्य नांवें तिमथ्यस तेथें होता। तो विश्वासी
यहूदी स्त्रीचा पुत्र। परंतु त्याचा बाप हेल्लासी [होता॥] २ तो
लूस्रांतील व इकनयनांतील भावांकडून प्रमाणिला होता॥ ३ पा
ऊलसानें इच्छिलें। कीं आपल्या संगतीं ह्यानें निघावें॥ तेव्हां
त्यां स्थानांमध्यें जे यहूदी होते। त्यांमुळें त्याला घेऊन त्या
ची सुंता केली। कां तर त्याचा बाप सर्वांस कळला, कीं हे
ल्लासी होता॥ ४ आणि त्यां नगरांतून जात असतां। जे
नेम यरूशलेमांतील प्रेषीत व वडील यानीं ठरविले, ते त्या
नीं त्यांस पाळायास दिल्हे॥ ५ तर ह्या मंडळ्या विश्वासांत स्थि
राविल्या। आणि गणतीनें प्रति दिवसीं वाढल्या ※ ६ नंतर ते
फ्रूगी व गालाती प्रांतांतून फिरल्यावर। आशींत गोष्ट सांगण्याचा
प्रतिबंध पवित्रआत्म्याकडून पावले असतां। ७ मुसीस जाऊन।
बिथुनीस जाण्यास म्हटले। परंतु आत्म्यानें त्यांस जाऊं दिल्हें ना
हीं॥ ८ मग ते मुसीजवळून जाऊन त्रोवासास खालीं गेले॥
९ आणि रात्रीं पाऊलसानें दृष्टांत पाहिला। कीं कोणी मा
केदनीय माणस उभा होऊन। त्याला विनंती करितांना बोल
ला, कीं माकेदनींत पार येऊन आमचें साह्य कर॥ १० आ
णि त्यानें दृष्टांत पाहिला असतां। प्रभूनें आह्मास, त्यांसीं सुव

तेमान सांगायास बोलाविलें, असें खचीत समजून, आह्मी मा
केदनीस जायाला तेह्मांच उद्योग केला ※
११ यास्तव त्रोवासापासून हाकारून, आह्मी नीट वाटेनें साम
थ्राकेस गेलों। आणि दुसऱ्या [दिवशीं] न्यापलोसास [गेलों॥]
१२ आणि तेथून फिलोप्पैस [गेलों।] तें माकेदनीच्या त्या भागां
तील श्रेष्ठ [नगर] व परवस्ती आहे॥ तेव्हां आह्मी त्या न
गरांत कित्येक दिवस कर्मीत होतों। १३ आणि शाब्बाथ दि
वशीं नगराबाहेर नदीच्या जवळ जेथें नेमानें प्रार्थना केली जा
त होती। तेथें गेलों॥ तेव्हां आह्मी बसल्यावर। ज्या स्त्रिया
तेथें मिळत होत्या। त्यांस बोललों ※ १४ आणि थुआती
रानगरची येक स्त्री नांवें लुदिया। जांवळें [वस्त्र] विकणारीण।
[जी] देवाची भक्तीण। तिनेंहि ऐकिलें॥ तिचें हृदय प्रभूनें
असें उघडिलें, कीं पाऊलसाकडून जीं ह्मटलेलीं त्यांस तिनें
ध्यानांत धरावें॥ १५ मग तिला व तिच्या घराण्याला बाप्ती
स्मा दिल्यावर। तिनें विनंती करीत ह्मटलें। [कीं] मी प्रभूव
र विश्वासी आहें। असें जर तुह्मी ठरविलें, तर माझ्या घ
रांत येऊन राहा॥ तेव्हां तिनें आह्मावर बळें आग्रह केला ※
१६ आणि आह्मी प्रार्थनेच्या स्थळीं गेलों। तेव्हां असें
झालें। [कीं] येक कुमारी। जिला संचारी आत्मा होता। [आ
णि] जिनें आपल्यां धन्यांस मांत्रिकपणानें फार जोड मिळवून
दिल्ही। ती आह्मास भेटली॥ १७ ती पाऊलसाच्या व आ
मच्या मागें येतांना वोरडत बोलली, [कीं] हीं माणसें परा
त्पर देवाचे सेवक आहेत। हे आह्मास तारणाची वाट सां
गतां दाखवितात॥ १८ तेव्हां तिनें बहुत दिवसांपर्यंत हें केलें।
मग पाऊलस कष्टी होऊन, आणि मागें फिरून। आत्म्याला
बोलला, त्वां ईजमधून निघावें। असी मी येशू ख्रीस्ताच्या नां
वानें तुला आज्ञा करितों॥ तेव्हां त्याच घटकेस तो निघा
ला ※ १९ मग तिच्यां धन्यानी। आपल्या लाभाची आशा गे
ली। हें पाहून। पाऊलस व सिलास यांस धरून हाटीं अ

धिकाऱ्यांकडे वोढिलें॥ २० तेव्हां त्यांस सर्कांच्यांजवळ आणून
म्हटलें। [कीं] हीं माणसें यहूदी। म्हणोन आमच्या नगरा
स फार चाळवितात। २१ आणि ज्या रीती आम्ही रोमी
यावरून आम्हांस अंगिकारायास व आचरायास योग्य नाहींत।
त्या उपदेशितात॥ २२ तेव्हां त्यांविरुद्ध समुदाय बरोबर
उठला। आणि सर्कान्यांनी त्यांचीं वस्त्रें फाडून काढितां। छड्या
मारायास आज्ञा दिल्ही॥ २३ आणि त्यांस बहुत फटके
मारून बंदिशाळेंत टाकिलें। [मग] बंदिरक्षकाला अशी आज्ञा के
ली। कीं त्यांस बंदोबस्तानें राखावें॥ २४ [तेव्हां] त्याने अशी
आज्ञा पावून। त्यांस आंतल्या बंदिशाळेंत टाकिलें। आ
णि त्यांचे पाय खोड्यांत बंद केले॥ २५ परंतु मध्यरात्रीं
पाउलस व सिलास यानी प्रार्थना करून देवाचें स्तोत्र गायि
लें, आणि बंदिवानानी त्यांचा कानवसा घेतला॥ २६ तेव्हां
येकायेकीं भूमीकंप असा मोठा जाला। कीं बंदिशाळेचे पा
ये हालले, आणि सगळीं दारें अकस्मात उघडीं जालीं। आ
णि सर्वांचे बंद सुटले॥ २७ मग बंदिरक्षक झोंपेंतून
जागा होऊन। आणि बंदिशाळेचीं दारें उघडलेलीं पाहून।
बंदिवान पळून गेले असें समजला असतां। तरवार उप
सून। आपला घात करायास सिद्ध जाला॥ २८ परंतु पाउ
लस उंच स्वरानें वोरडत बोलला, [कीं] आम्ही सर्व येथे आ
हों, यास्तव तूं आपणाला कांहीं वाईट करूं नको॥ २९ तेव्हां
तो, दिवा मागून। आंत उडत गेला, आणि कंपीत हो
ऊन। पाउलस व सिलास यांच्या पायां पडला॥ ३० आणि
त्यांस बाहेर आणून बोलला। अहो प्रभू, म्या तारलें जावें
म्हणोन मला काय करावें लागतें? ३१ तेव्हां ते बोलले।
तूं प्रभू येशू खीस्तावर विश्वास ठेव। मग तूं आपल्या घराण्यासु
द्धां तारला जासील॥ ३२ नंतर त्यानी त्याला, व त्याच्या घ
रांत जे त्यां अवघ्यांस। प्रभूची गोष्ट सांगितली॥ ३३ मग
रात्रीच्या त्याच घटकेस। त्यानें त्यांस घेऊन। [त्यांच्यां] फ

टपकांस धुतलें। आणि तेव्हांच त्याने व त्याच्यां सर्वांनी बाप्ति
स्मा घेतला॥ ३४ आणि त्याने त्यांस आपल्या घरांत आणून।
त्यांपुढें अन्नणी मांडली। आणि त्याने सर्व घराण्यासुद्धां देवावर
विश्वास ठेवून। हर्ष केला ※ ३५ मग दिवस उगवल्यावर।
सर्कार्यानी हविदारांस पाठवून सांगितलें। [कीं] तूं त्यां मा
णसांस सोड॥ ३६ मग बंदिरक्षकाने ह्या गोष्टी [त्यां]पा
सून पाऊलसाला सांगितल्या। कीं सर्कार्यानी तुह्मास सोडा
वयास पाठविलें आहे। यास्तव तुह्मी आतां निघून सुख
रूप जा॥ ३७ तेव्हां पाऊलस त्यांस बोलला। आह्मी अन्या
यी न ठरविलेलीं [असीं] रोमी माणसें असतां। त्यानी आ
ह्मास प्रगटपणें मारून बंदिशाळेंत टाकिलें। तर आतां ते
आह्मास गुप्तपणें बाहेर घालवितील कीं काय? [असें] नकोच।
परंतु त्यानी आपण येऊन आह्मास बाहेर न्यावें॥ ३८ म
ग हविदारानी हीं बोलणीं सर्कार्यांस सांगितलीं। आणि ते।
हे रोमी आहेत, असें ऐकून भ्याले॥ ३९ नंतर त्यानी
येऊन ह्यांची समजूत केली। आणि [त्यांस] बाहेर आणून
विनंती केली। कीं नगरांतून जावें॥ ४० तेव्हां ते बं
दिशाळेंतून बाहेर जाऊन, लुदियेजवळ आंत गेले। आणि
आपण भावांस पाहून त्यांचें शांतवन केलें, मग निघाले ※

पर्व १७ ॥ १ आणि ते आंफिपलीस व आपल्लोनी यां
मधून जाऊन। थेस्सालनिके जेथे यहूद्यांची सभा होती।
तेथे पावले॥ २ आणि पाऊलस आपल्या रीतिप्रमाणें। त्यां
जवळ आंत गेला। आणि तीन शाब्बाथांत त्याने धर्मलेखां
तून त्यांशीं प्रतिवाद करितां। ३ उघडें केलें। आणि असें
स्थापिलें, कीं ख्रीस्ताने सोसावें आणि मेलेल्यांमधून पुन्हा उ
ठावें, हें अगत्य होतें। आणखी हा येशू, ज्याचें वर्तमान
मी तुह्माजवळ सांगतों। तोच ख्रीस्त आहे॥ ४ तेव्हां त्यां
मधील कित्येक आणि भक्तिशील हेल्लासीहि यांतील मोठा भ
रणा। व श्रेष्ठ नायकाहि थोडक्या नव्हत्या। असीं विश्वासिलीं

गेलीं। मग पाऊलस व सिलास यांचीं भागी जालीं ※ ५ प
रंतु अविश्वासी यहूद्यानी आवेश धरिला। मग अडूद्यांतल्यां
कित्येक वाईट माणसांस आपणांसीं घेऊन। आणि घोळका
मिळवून। नगरास गलबलविलें। तेव्हां यासोनाच्या घरावर ये
ऊन। त्यांस जनाकडे काढावयास शोधिलें। ६ परंतु त्यां
स न पाऊन। यासोन व कित्येक भाऊ यांस नगराच्या अधि
काऱ्यांजवळ वोढून गर्जिलें। कीं ज्यानी जगवस्ती पालथी के
ली। ते येथेहि आले। ७ त्यांस यासोनानें अंगिकारिलें आ
हे। आणि हे सर्व कादूसाराच्यां आज्ञांविरुद्ध करीत ह्मणतात।
कीं दुसरा राजा येशू। [असा] आहे॥ ८ असें त्यानी समुदाया
ला, व हीं ऐकणारे जे नगराचे अधिकारी। त्यांस घाबरें
केलें॥ ९ तेव्हां त्यानी यासोन व दुसरे यांपासून निश्चा घेऊन
यांस सोडिलें ※ १० मग भावानी पाऊलस व सिलास यांस
तेव्हांच रात्रीं बेरैयास पाठविलें। [तेव्हां] ते [तेथे] पोंहचून
यहूद्यांच्या सभेंत गेले॥ ११ आणि तेथले थेस्सालनिकेंतल्यां
हून अधीक सज्जन होते। त्यानी अवघ्या आवेशें गोष्ट
अंगिकारिली। आणि, हीं अशीं आहेत कीं नाहींत, [यावि
षयीं] प्रतिदिवशीं धर्मलेखांतील ठराव काढिला॥ १२ तर
यावरून त्यांमधील बहुत। आणि पतवान हेल्लासणी स्त्रिया
व पुरुष यांमधून थोडीं नाहींत। अशीं विश्वासलीं ※ १३ प
रंतु पाऊलसाकडून देवाची गोष्ट बेरैयांतहि सांगितली आहे।
असें थेस्सालनिकेंतल्यां यहूद्यानी जाणून। तेथेहि येऊन घोळ
क्यांस गलबलविलें॥ १४ मग तेव्हांच्या तेव्हांच भावानी पाऊ
लसाला समुद्रावरून असें जाण्यास पाठविलें। परंतु सिलास
व तिमथ्यस तेथे आणखी राहिले॥ १५ तेव्हां जे पाऊलसा
ला वाटेस लावीत होते। त्यानी त्याला आथेनादूपर्यंत नेलें।
मग सिलास व तिमथ्यस यानी त्याजवळ लवकरच यावें,
अशी आज्ञा त्यांसीं पावून ते निघाले ※

१६ आणि पाऊलस आथेनांदंत त्यांची वाट पाहात अस

तां। तें नगर फार मूर्तीयुक्त असें पाहून। त्याचा आ त्मा त्याजमध्यें चेष्टविला गेला॥ १७ यास्तव त्याप्रमाणें त्या नें सभेंत यहुद्यांसीं। व भजन करणाऱ्यांसीं। व हाटांत जे भे टले त्यांसीं। प्रतिदिवशीं संवाद केला॥ १८ तेव्हां एपिकू रेयी व स्तोइकी ज्ञानपत्करणारे। यांतील कित्येकानी त्यासीं झटापट केली। आणि कित्येक बोलले। कीं हा वा चाळ काय बोलुं इच्छीत असेल? आणि कित्येक [बोलले, कीं] हा अन्यभूतदेवांचा प्रतिपादक असा दिसतो। कारण कीं त्यानें। येशू व पुन्हा उठणें। यांचें सुवर्तमान त्यांस सां गितलें॥ १९ आणि ते त्याला घेऊन आरेयसपागसांत ने ऊन बोलले, जो नवा उपदेश त्वां सांगितला। तो हा काय। हें आह्मास जाणतां येईल कीं काय? २० कां कीं तूं कित्ये क नवलें आमच्या ऐकण्यांत आणितोस। यास्तव हीं काय अ सतील। हें आह्मी जाणायास इच्छितों॥ २१ तेव्हां अवघे आथेनाइकर। व तेथे राहाणारे विदेशी। ह्यानी कांहीं नवें तें बोलणें। अथवा ऐकणें। यांखेरीज कशानेंहि कर्मणूक केली ना हीं॥ २२ तेव्हां पाऊलस आरेयसपागसांत उभा राहून बोलला, अहो आथेनाइकर लोक। तुह्मी सर्वथा भूतदेवांचे अ ति भक्त आहां। हें मी पाहातों॥ २३ कारण कीं मी फिरतां ना तुमचे भजाऊ पाहात असतां। वेदीहि जीवर। न जाणलेल्या देवाची। असें लिहिलें होतें। ती मला आढळली। यास्तव ज्याला तुह्मी जाणत नसतां भजितां। त्याला मी तुह्माजवळ प्रगट क रितों॥ २४ ज्या देवानें हें जग। आणि ह्यांत जों सर्व। तों उत्पन्न केलीं। तो, आकाश व पृथ्वी। यांचा प्रभु असतां। हातानी जीं देवळें बांधिलीं। त्यांत राहात नाहीं॥ २५ आणि त्याला कांहीं उणें असल्यानें माणसांच्या हातांकडून त्याची सेवा हो तो [असें] नाहीं। तो आपण अवघ्यांस। जिवन व श्वासोश्वास। व अवघां जों, तों देतो॥ २६ आणि त्यानें मनुष्यांतील प्रत्येक राष्ट्र पृथ्वीच्या सर्व पाठिवर वस्ती करायास येकाच्या रक्तापासून

उत्पन्न केलें। त्यांचे पूर्वी नेमलेले काळ। व वस्तींच्या सीमा
त्याने ठरविल्या। २७ यासाठीं कीं त्यांनी प्रभूला शोधा
वें। ह्मणजे त्यावरून त्यांनी त्याला चांपलून मिळवावें खरें।
तथापि तो आह्मा प्रत्येकापासून दूर नाहीं। २८ कारण कीं
आह्मी त्याच्याने जगतों। व हालतों। व आहों। तसेंहि
तुमच्या कवींतील कित्येकानी ह्मटलें आहे। कारण कीं आह्मी
त्याचा वंश आहों॥ २९ यास्तव आह्मी देवाचा वंश असतां।
आह्मी असें न कल्पावें। कीं सोनें। किंवा रुपें। किंवा धोंडा
माणसांच्या कळेचें व युक्तीचें कोरिवणें यासारिखें दे
वपण आहे॥ ३० तर अशा अज्ञानाच्या काळांवर देवाने काणा
डोळा केला खरें। परंतु तो आतां सर्वच अवघ्यां माणसांस आ
ज्ञा करितो। कीं पश्चात्ताप करावा। ३१ कां तर त्याने असा
दिवस नेमिला। कीं त्यांत तो। ज्या माणसाला त्याने नेमिला त्या
कडून। जगवस्तीचा न्याय नीतिपणाने ठरवील। याविषयीं त्या
ने। त्याला मेलेल्यांमधून उठविण्याने। अवघ्यांस प्रमाण दिल्हें
आहे ॥ ३२ तेव्हां त्यांनी मेलेल्यांचें पुन्हा उठणें ऐकिल्यावर।
कित्येकानी थट्टा केली। आणि कित्येक बोलले। [कीं] आह्मी
याविषयीं फिरोन तुझें ऐकूं॥ ३३ आणि अशाने पाऊलस
त्यांच्या मधून निघून गेला॥ ३४ परंतु कित्येक माणसें त्याक
डे जडून विश्वासलीं। त्यांमध्यें दयनुसयसहि जो आरेयसपा
गसी। आणि दामारिस नांवें स्त्री। आणि ह्यांसुद्धां दुसरे
[होते]॥

पर्व १८॥ १ यांवर पाऊलस आथेनाइस सोडून करींथास
आला। २ तेव्हां कोणी यहूदी आकुला नांवें, जन्माने पंतसी।
तो आढळला। तो आपल्या बायको प्रीस्कीलसुद्धां इतालीपा
सून नुक्ता आला होता। कां कीं रोम्यापासून सर्व यहूद्यांनी नि
घावें। असी क्लाउदयसाने आज्ञा दिल्ही होती। त्यांजवळ हा
गेला। ३ आणि त्यासारिखा कर्मी होता। ह्मणोन याने त्यां
जवळ राहून काम केलें। तीं तर धंद्याने राहोटी करणारीं हो

तीं॥ ४ तेव्हां प्रत्येक शाब्बाथीं त्याने सभेंत विवाद केला।
आणि यहूद्यांस व हेल्लास्यांस विश्वासविलें॥ ५ आणि सिलास व
तिमथ्यस माकेदनीहून खाली आले होते। तेव्हां। येशू तो ख्रीस्त
[आहे। असें] पाऊलस यहूद्यांस प्रमाण पटवितां। आत्म्याने द
डपला होता॥ ६ परंतु ते आडवीत आणि दुर्भाषण करीत अस
तां, त्याने [आपलीं] वस्त्रें झटकून त्यांस ह्मटलें। तुमचा घातदो
ष तुमच्या डोक्यावर [आहे।] मी निर्दोषी। आतांपासून [अ
न्यदेशस्थांजवळ जाईन॥ ७ मग तो तेथून ढळून। यूस्तस नांवें
कोणी। देवाचा भक्त। ज्याचें घर सभेसीं लागलेलें, त्याच्या घरांत
गेला॥ ८ तथापि सभेचा अधिकारी जो क्रीस्पस। तो। आपल्या
सगळ्या घराण्यासुद्धां। प्रभूवर विश्वासला। आणि बहुत करीं
थकर ऐकून विश्वासले। व बाप्तीस्मा पावले ॐ ९ तेव्हां प्रभू
ने रात्रीं दृष्टांतामध्यें पाऊलसाला ह्मटलें। तूं भिऊं नको। आ
णखी बोल। तूं उगें नच राहावें। १० कां तर मी तुजकडे आहें।
आणि तुला नडायास, कोणी तुजवर येणार नाहीं। कारण
कीं। ह्या नगरांत माझा फार लोक आहे॥ ११ तेव्हां तो त्यां
मध्यें देवाची गोष्ट उपदेशीत येक वर्ष व साहा महिने राहिला ॐ

१२ मग गाल्लियो आखाईयेचा प्रतिनिधी असतां। यहू
द्यानी येकचित्तें पाऊलसावर हल्ला उठविला। आणि त्याला न्याया
सनाजवळ आणून। १३ ह्मटलें, कीं हा माणसांस। देवाचें भ
जन नेमशास्त्राविरुद्ध करायास। विश्वासवितो॥ १४ तेव्हां पा
ऊलस [आपलें] मुख उघडायास सिद्ध असतां, गाल्लियो यहू
द्यांस बोलला। अहो यहूदी। हें जर कांहीं अन्याय, अथ
वा दुष्ट कुकर्म असतें। तर तर्काप्रमाणे म्यां तुमचें सोसावें खरें।
१५ परंतु जर गोष्ट, अथवा नांवें। अथवा तुह्मांतील जें नेम
शास्त्र, ह्यांविषयीं जर हा विचार आहे। तर तुह्मी स्वतां
पाहा। कां कीं मी अशांचा न्यायाधीश होऊं इछीत नाहीं॥
१६ मग त्याने त्यांस न्यायासनापासून घालविलें॥ १७ तेव्हां
सगळ्यां हेल्लास्यानी सोस्थेनेस। जो सभेचा अधिकारी। त्याला ध

रून न्यायासनापुढें मार दिल्हा। परंतु गाल्लियोने त्याचें कां हीं मनास आणिलें नाहीं ॐ

१८ नंतर पाऊलस तेथे आणखी बहुत दिवस राहिल्यावर। भावांपासून निरोप घेऊन। तारवाने अरामास गेला। आणि त्याच्या संगतीं प्रिस्कील्ला व आकुलाहि [निघालीं।] त्याचा नवस होता। यास्तव केंखरईत त्याने आपलें डोकें कातरलें होतें॥ १९ तेव्हां त्याने एफेसस्थांत पोंहचल्यानंतर त्यांस तेथे सोडि लें। परंतु आपण सभेंत जाऊन। यहूद्यांशीं विवाद केला॥ २० नंतर त्यांनें त्यांजवळ अधीक वेळ राहावें ह्मणोन ते मा गत असतां। त्याने मानिलें नाहीं। २१ परंतु त्यांपासून निरो प घेऊन, ह्मटलें। [कीं] मला पुढील सण सर्वथा यरूशलेमांत पाळिला पाहिजे। परंतु देवाची इच्छा असल्यास। मी पुन्हा तु ह्माजवळ परत येईन॥ असें तो एफेससापासून निघाला। २२ आणि कादसारीस पोंहचल्यावर चढला। आणि मंडळीस क्षेम बोलला। [मग] उतरून आंतयखीस गेला॥ २३ नंतर तो [तेथे] कांहीं वेळ करून निघाला, [आणि] सर्व शिष्यांस स्थिरावीत गालाती प्रांत व फ्रुगी यांवरून अनुक्रमाने गेला ॐ

२४ तेव्हां आपल्लोस नांवें कोणी यहूदी। [जो] जन्माने आलेक्षांद्रीकर, वक्ता माणुस। धर्मलेखांत निपूण, तो एफेससां त आला॥ २५ तो प्रभूच्या मार्गांत शिकविलेला होता, आ णि आत्यांत आवेशी असून। त्याने प्रभूविषयीं जीं तीं येका ग्रतेने सांगतांना उपदेशिलीं। तो केवळ योहानाचा बाप्तीस्मा समजला॥ २६ तेव्हां तो सभेंत धैर्याने बोलुं लागला। नंतर आकुला व प्रीस्कील्ला यानी त्याचें ऐकून, त्याला जवळ घेत लें। आणि देवाचा मार्ग त्याला अधीक सविस्तर फोडून सां गितला॥ २७ मग त्याने पार आखाईंत जायास योजिल्यावर, भावानी [त्याला] प्रेरितां शिष्यांशीं लिहिलें, कीं त्यानी त्याला अंगिकारावें॥ हा पोंहचल्यावर, कृपेकरून जे विश्वासले त्यां स फार साह्य जाला। २८ कां कीं येशू तो ख्रीस्त आहे।

असें धर्मलेखांवरून दाखवितां त्याने प्रगटांत यहूद्यांची निशा बळकटपणें केली ※

पर्व १९॥ १ तेव्हां असें जालें। कीं आपल्लोस करींथांत असतां। पाऊलस वरल्यां देशांमधून जाऊन एफेससास आला। आणि कित्येक शिष्य पावून। २ त्यांस बोलला। तुह्मी वि श्वासल्यावर पवित्रआत्मा पावलां आहां कीं काय? मग हे त्या ला बोलले। पवित्रआत्मा आहे किंवा नाहीं, हेंच आह्मी ऐकिलेंहि नाहीं॥ ३ तेव्हां तो ह्यांस बोलला। तर तुमचा बाप्तिस्मा कोणासाठीं जाला? मग ह्यांनी ह्मटलें। [कीं] योहान्नाच्या बाप्तिस्म्यासाठीं॥ ४ तेव्हां पाऊलस बोलला। योहान्ना ने पश्चात्तापाचा बाप्तिस्मा दिल्हा खरें। तो लोकांस सांगत होता, कीं आपल्या मागें जो येणार त्यावर, ह्मणजे ख्रीस्त येशूवर। विश्वास धरावा॥ ५ मग त्यांनी [हें] ऐकिल्यावर, प्रभू येशूच्या नांवासाठीं बाप्तिस्मा घेतला॥ ६ आणि पाऊलसा ने [आपले] हात त्यांवर ठेविल्यानंतर। पवित्र आत्मा त्यांवर आला। आणि ते [अन्य]भाषांनी बोलले। व भविष्य सांगते जाले॥ ७ तेव्हां सर्व माणसें सुमारें बारा होतीं॥ ८ नंतर तो सभेंत जाऊन विवाद करीत। आणि देवाच्या राज्याविषयीं जीं तीं विश्वासवीत। तीन महिन्यांपर्यंत धैर्याने बोलला ※

९ परंतु कित्येक कठीण व अविश्वासी होत असतां। समुदा यासमोर त्या मार्गास वाईट ह्मणते जाले। यास्तव तो त्यां पासून निघून। शिष्यांस वेगळें करून। कोणा तुरान्नसाच्या शा ळेंत प्रतिदिवशीं विवाद करिता जाला॥ १० आणि दोन वर्षां पर्यंत असें जालें। यास्तव आशींतील सर्व राहाणारे यहूदी व हेल्लासीहि, यांनी प्रभू येशूची गोष्ट ऐकिली॥ ११ आणि दे वाने पाऊलसाच्यां हातांकडून अपूर्व चमत्कार असे केले। १२ कीं त्याच्या आंगापासून फडकीं। किंवा उपवस्त्रें। रोग्यांजवळ ने लीं जात होतीं। मग रोग त्यांपासून दूर जाते। आणि दुष्ट आत्मे त्यांमधून निघाले ※

१३ तेव्हां ज्यांमध्यें दुष्ट आत्मे होते त्यांवर, कित्येक फि-
रणारे यहूदी पंचाक्षरी। प्रभू येशूचें नांव घेणें, हें हातीं धरून
बोलले। ज्या येशूचें गाजविणें पाऊलस करितो। त्याची शपत
तुला घालितों॥ १४ आणि स्कवा [येक] यहूदी। जो मु
ख्य उपाध्या, त्याला सात पुत्र होते। त्यांनी हें केलें॥
१५ परंतु दुष्ट आत्म्याने उत्तर करीत ह्मटलें। कीं मी येशू
ला जाणतों। आणि पाऊलस मला माहीत आहे, परंतु तु
ह्मी कोण आहां? १६ मग ज्या माणसांत दुष्ट आत्मा होता,
त्याने त्यांजवर उडी मारून। त्यांचें धनिपण करितां त्यांवर
असा जय साधिला। कीं ते नागवे व घायाळ होऊन। त्या घरा
पासून पळाले॥ १७ आणि एफेससांत सर्व जे यहूदी व हेल्ला
सोहि राहात होते। त्यांस हें कळलें गेलें। मग त्यां सर्वांस
भय पडलें। आणि प्रभू येशूचें नांव थोर मानिलें गेलें॥
१८ तेव्हां विश्वास करणाऱ्यांतील बहुतानी येऊन आपलीं
कामें पदरीं घेतलीं। आणि सांगून दाखविलीं॥ १९ आणि गा
रुडी कामें करणारें। यांतील बहुतानी आपल्या पोथ्या गोळा क
रून, अवघ्यांपुढें जाळून टाकिल्या॥ तेव्हां त्यांच्यां मोलांची बे
रीज करून, रुप्याच्या [मुद्रा] पन्नास हजार निघाल्या॥ २० अ
सी प्रभूची गोष्ट बळाने वाढली। आणि जय पावली ※

२१ मग हीं घडल्यावर। पाऊलसाने आत्म्यांत असें धरि
लें। कीं आपण माकेदनी व आखाई यांवरून चालून। य
रुशलेमास जावें। [आणि] ह्मटलें। कीं मी तेथे गेल्यानंतर,
मला रोमें पाहिलें पाहिजे॥ २२ मग तो, आपली सेवा क
रणारे यांतील तिमथ्यस व एरास्तस, या दोघांस मा
केदनीस पाठवून, आपण [कांहीं] वेळ आशींत राहिला ※
२३ आणि त्या समयीं त्या मार्गाविषयीं थोडि नाहीं [अ
शी] गडबड जाली। २४ कारण कीं देमेत्रयस नांवें कोणी
सोनार। ज्याने आर्तेमिसेचे रुपी देव्हारे करून। कारागिरांसाठीं
थोडी नाहीं [असी] जोड मिळविली। २५ तो यांस। व

अस्यांविषयीं कामकरी यांस, येकवट करून बोलला। अहो मा
णसें। हें काम करण्याने आमची जिविका आहे। हें तुह्मी स
मजलां। २६ तर तुह्मी पाहातां व ऐकतां। कीं एफेससां
तमात्र नव्हे। परंतु, बहुधा सगळ्या आशींत हा पाउलस
बहुत लोकास विश्वासविण्याने फितवून ह्मणतो। कीं हातांकडून जीं
घडिलीं। ते देव नाहींत॥ २७ आणि हा आमचा उद्योग अ
पकीर्तींत जाउं पाहातो। हें केवळ नव्हे। परंतु मोठी आ
र्तेमीसदेवी हिचें देखील देऊळ शून्य मोजिलें जाउं [पाहा
तें]। असें जिची पूजा अवघी आशी व जगवस्ती करिती।
तिचें महत्व खालीं जाउं [करतें॥] २८ मग त्यांनी [हें]
ऐकिल्यावर आवेशाने भरून बोरडत ह्मटलें, एफेसस्करांची
आर्तेमीस थोर [आहे॥] २९ तेव्हां अवघें नगर गलबल्या
ने भरलें। आणि ते। माकादनींतले गायस व आरीस्तार्खस
पाउलसाचे सोबती प्रवासी। ह्मांस संगतीं वोढून खेळाखाड्यांत
येकचित्तें धांवले॥ ३० तेव्हां पाउलस लोकांत जायास
योजितां। शिष्यांनी त्याला जाउं दिल्हें नाहीं॥ ३१ आणि
आशीचे अधिकारी। यांतील कित्येक त्याचे मित्र होते, त्यां
नींहि त्याजवळ पाठवून बोध केला, कीं त्याने आपणाला खेळा
खाड्यांत न द्यावें॥ ३२ तेव्हां कित्येक तर वेगळें वेगळें प्रका
रें बोरडले। कां तर मंडळी गलबलली, आणि काय कार
णास्तव ते मिळाले, हें त्यांतल्या मोठ्या भागास कळलें ना
हीं॥ ३३ तेव्हां त्यांनी आलेक्षांद्राला समुदायांतून पुढें ढक
लिलें। यहूदी त्याला पुढें करीत होते॥ मग आलेक्षांद्राने हा
ताने खुणावून। समुदायाजवळ तोंड काढायास इछिलें॥
३४ परंतु तो यहूदी आहे, असें ते जाणत असतां, सु
मारें पांच घटकांपर्यंत सर्वांचा येक शब्द जाला। त्यांनी ग
र्जिलें। [कीं] एफेसस्करांची आर्तेमीस थोर [आहे॥] ३५ मग
कुळकर्णी। समुदायास स्वस्थ करून बोलला, अहो एफेसस्कर मा
णसें। जी थोर आर्तेमीस तिचा। व आकाशांतून पडलेली [मूर्त।]

ह्या गुरव असें एफेसकरांचें नगर आहे। हें न जाणता।
असा तरीं कोण माणुस आहे? ३६ यास्तव हीं विरुद्ध
ह्मटलेलीं जात नसतां। तुह्मी स्वस्थ असावें। आणि साहसानें कां
हीं न करावें॥ ३७ कां कीं जीं माणसें धर्मादायहारक ना
हींत। आणि तुमच्या देवीचे निंदकहि नाहींत। त्यांस तुह्मी
येथें आणिलें॥ ३८ यास्तव देमेत्रयस व त्याच्या संगतीचे
जे कारागीर, त्यांस जर कोणावर गोष्ट आहे, तर सभा
सद् वागत आहेत। आणि प्रतिनिधी आहेत। ते येकमेकां
स सर्कारांत नेवोत॥ ३९ आणि जर तुह्मी दुसऱ्यांविषयीं
कांहीं विचारितां, तर नीतीच्या मंडळींत तें निवडिलें जाई
ल॥ ४० कां तर कांहीं निमित्त। ज्यावरून आह्मी या मि
ळण्याचें कारण सांगुं शकूं, असें नसतां, आह्मी आजच्या
दंग्याविषयीं आरोप पावण्याच्या भयगतींत आहों॥ ४१ आणि
त्यानें हीं बोलून मंडळीस निरोप दिल्हा॥

पर्व २०॥ १ मग गलबला निवारल्यावर। पाऊलस शि
ष्यांस बोलावून। आणि क्षेमादिक करून। माकेदनीस जाण्यास
निघाला॥ २ आणि त्यां प्रांतांवरून जातांना त्यांतल्यांस फा
र बोलण्यानें बोधून हेल्लासांत गेला। ३ आणि तेथें तीन म
हिने राहिला॥ मग तो तारवानें अरामाकडे निघायास सि
द्ध असतां। यहूद्यांकडून त्यावर कट जाला असतां। त्यानें
परतून माकेदनीवरून जायाचा निश्चय केला॥ ४ त्याच्या सं
गतीं हे गेले। बेरैंतला सोपातेर। आणि थेस्सालनिकेकरां
तले आरीस्तार्खस व सेकूंदस। आणि देर्बैतले गायस व ति
मथ्यस। आणि आशींतले तुखिकस व त्रफिमस। ५ हे पुढें
जाऊन त्रोवासांत आमची वाट पाहात राहिले॥ ६ आणि आ
ह्मी। अफुमवण भाकरिच्यां दिवसांनंतर। फिलोप्पैहून तारवा
नें निघालों। मग पांचां दिवसांनीं त्रोवासांत त्यांच्या जवळ
पोंहचलों॥ तेथें आह्मी सात दिवसांपर्यंत राहिलों॥ ७ आणि
सातवारांतील प्रथमांत शिष्य भाकर मोडायासाठीं मिळाले अस

तां। पाऊलसाने त्यांसीं गोष्ट केली। आणि दुसऱ्या दिवसीं निघा
यास सिद्ध होऊन। मध्यरात्रिपर्यंत बोलणें लांबविलें॥ ८ ते
व्हां माडीवर। जेथे ते मिळाले होते। तेथे बहुत दिवे होते॥
९ आणि खिडकींत। यूतुखस नांवें कोणी तरूण बसलेला अ
सतां। गाढ झोंपेंत भारावला [होता। आणि] पाऊलस फार
गोष्ट करीत असतां। तो झोंपेनें भारावला होऊन तिसऱ्या मज
ल्यावरून खालीं पडला। आणि मेलेला उचलला गेला॥ १० ते
व्हां पाऊलस उतरून त्याजवर पडतांना। आलिंगून बोलला। या
चा जीव यांत आहे। यास्तव तुह्मी घाबरूं नका॥ ११ नंतर
तो चढला। आणि भाकर मोडून खाल्यावर। बहुत वेळ [ह्मण
जे] पाहांटपर्यंत संभाषण करून। असा निघाला॥ १२ तेव्हां ते
त्या तरूणाला जिवंत नेऊन। अपरिमितपणें समाधान पावले ※
१३ नंतर आह्मी पुढें तारवावर जाऊन। आसूसाकडे नि
घालों। तेथून पाऊलसाला वर्ती घेणार होतों। कारण कीं त्या
नें, आपण [तेथवर] पायीं जायास सिद्ध असतां। असें नेमिलें
होतें॥ १४ आणि जेव्हां तो आह्मास आसूसांत भेटला। तेव्हां
आह्मी त्याला वर्ती घेऊन मितुलेनेस आलों॥ १५ आणि तेथून
तारवानें निघून। पुढल्या [दिवसीं] खियसासमोर पोंहचलों।
आणि दुसऱ्या [दिवसीं] सामसाजवळ पावलों। मग त्रोगूल्य
नांत राहिल्यावर। पुढल्या [दिवसीं] मिलेतसास आलों॥ १६ का
रण कीं पाऊलसानें आपला काळ आशींत न घालवावा। ह्मा
णोन एफेससाच्या बाहेरून तारूं न्यावें असें ठरविलें। कां
तर त्यानें असी घाई केली। कीं जर आपणाला साध्य असे
ल। तर पन्नासीच्या दिवसीं आपण यरूशलेमांत व्हावें ※

१७ मग त्यानें मिलेतसाहून एफेससास पाठवून। मंडळी
च्यां वडिलांस आपल्याकडे बोलाविलें॥ १८ आणि ते
त्याच्या जवळ आल्यावर, तो त्यांस बोलला। ज्या पहिल्या दि
वसीं मी आशींत आलों तेव्हांपासून मी सगळा वेळ तु
ह्माजवळ कसा होतों। [हें] तुह्मी समजतां, १९ [कीं] अवघी

नम्रता। व बहुत अश्रु। व यहूद्यांच्या कटांकडून मला ला
गलेलीं जीं संकटें। ह्यांयुक्त मी प्रभूची सेवा करीत होतों।
२० [आणि] असें। कीं प्रगटांत व घरोघरीं तुह्मास वर्त
मान न सांगितल्याने व तुह्मास उपदेश न केल्याने। ज्या
जीं उपयोगी त्यांतील कांहीं अटकून ठेविलें नाहीं॥ २१ दे
वाकडे मनपालटणे व आमच्या प्रभू येशू ख्रीस्तावर विश्वास
हीं यहूद्यांस व हेल्लाण्यांसहि म्या प्रमाणाने पुरविलीं॥ २२ आणि
आतां पाहा। मी आत्म्याने बांधलेला असून यरूशलेमास जातों।
तेथे जीं मला प्राप्त होतील। तीं मला कळलीं नाहींत। २३ के
वळ हें [कळलें।] कीं बंधनें व संकटें हीं माझी वाट पाहाता
त। असें पवित्रआत्मा प्रत्येक नगरीं प्रमाण पुरवितो॥ २४ प
रंतु मी कशास मोजीत नाहीं। आणि आपला प्राण आप
णाला मोलवान मानीत नाहीं। यासाठीं कीं माझी धांव। ह्म
णजे देवकृपेचें सुवर्तमान प्रमाणाने पटवावयास जी सेवा प्रभू
येशूपासून मी पावलों, ती म्या आनंदाने संपवावी॥ २५ आ
णि आतां पाहा। ज्यांमध्यें मी देवाचें राज्य गाजवीत फिर
लों। ते तुह्मीअवघे यापुढें माझें तोंड पाहाणार नाहींत।
हें मला कळलें। २६ यास्तव ह्याच दिवशीं मी तुह्मास प्रमाण
सांगतों। कीं मी अवघ्यांच्या रक्तपाताविरहीत शुद्ध [आहें॥]
२७ कारण कीं देवाचा सर्व बेत तुह्मास सविस्तर न सांगा
वा। असें मी कचलों नाहीं॥ २८ यास्तव तुह्मी आपणांसीं सं
भाळा। आणि। पवित्रआत्म्याने तुह्मी पाहाणीकरी [असे] ज्या
कळपावर ठेविले आहां। त्या अवघ्यासीं [संभाळा।] कीं दे
वाची जी मंडळी त्याने आपल्या रक्ताकडून विकत घेतली तिचें
पाळण तुह्मी करावें॥ २९ कां तर हें मला कळलें। कीं मी
गेल्यानंतर भारी लांडगे। कळपाला न राखितां। तुह्मामध्यें ये
तील॥ ३० आणि स्वतां तुह्मांतून माणसें उठून। आपणांमागें
शिष्यांस वोढायासाठीं। विपरीत गोष्टी सांगतील॥ ३१ यास्तव
तुह्मी चौकी करा। [आणि] आठवीत [असा।] कीं तीन

वर्षें रात्रंदिवस म्यां अश्रूंसहीत येकयेकाला बोधणें हें सो
डिलें नाहीं ॥ ३२ आणि अहो भाऊ, आतां मी तुह्मास दे
वापासीं, व त्याच्या कृपेच्या गोष्टिपासीं सोपून देतों। ती [गो
ष्ट] तुह्मास रचायास, आणि सर्व जे पवित्र केलेले, त्यांमध्यें
वतन द्यावयास समर्थ आहे॥ ३३ म्यां कोणाच्या रुप्यावर,
अथवा सोन्यावर। अथवा वस्त्रावर, लोभ ठेविला नाहीं ॥
३४ आणि तुह्मी आपण जाणतां, कीं ह्यां हातानीं माझ्यां,
व माझ्यां संगत्यांच्यां अगत्यता, यांसाठीं सेवा केली आहे ॥
३५ म्यां तुह्मास अवघीं दाखविलीं, कीं तुह्मी असें खपत असतां,
जे अशक्त त्यांचें साह्य केलें पाहिजे। आणि प्रभू येशूच्या
गोष्टी आठविल्या [पाहिजेत,] कीं पावण्यापेक्षां देणें अधीक
धन्य आहे। [असें] त्यानें ह्मटलें होतें ❀ ३६ तेव्हां त्यानें हीं
ह्मटल्यावर आपले गुडघे टेंकून, त्यां सर्वांसुद्धां प्रार्थना केली ॥
३७ आणि अवघ्यांस फार शोक जाला। तेव्हां त्यानीं पाऊ
लसाच्या मानेवर पडून। त्याचें चुंबन केलें। ३८ ते त्याचें तों
ड आणखी पाहाणार नव्हते, असी जी गोष्ट त्यानें ह्मट
ली। तिजवरून विशेष खेद करीत होते॥ मग त्यानीं त्याला
तारवापर्यंत बोळविलें ❀

पर्व २१ ॥ १ तेव्हां असें जालें, कीं आह्मी त्यांपासून
सुटून हाकारल्यावर नीट वाटेनें कोस[बेट]ास आलों। मग दु
सऱ्या [दिवशीं] रूदसास, आणि तेथून पाताऱ्यास [पोंहचलों ॥]
२ मग फैनिकेस पार जाणारें [असें] तारूं पावून, आह्मी त्यावर
चढून निघालों॥ ३ नंतर कुप्रस दृष्टीस पडतां, आह्मी त्याला
डाव्याकडे टाकून, अरामास वाहाविले गेलों। आणि जोरास
उतरलों। कां तर तेथें तारवाचें वोझें काढायाचें होतें॥ ४ ते
व्हां आह्मी शिष्यांस पावून, सात दिवस तेथें राहिलों। त्यानीं
आत्म्याकडून पाऊलसाला ह्मटलें, कीं यरूशलेमास न चढावें॥
५ मग असें जालें, कीं ते दिवस पूर्ण केल्यानंतर, आह्मी
निघून गेलों। [तेव्हां] त्यां सर्वांनीं बायकां लेंकरांसुद्धां आ

ह्मास नगराबाहेर येथवर बोळविलें॥ मग आह्मी कांठावर
गुडघे टेंकून प्रार्थना केली। ६ नंतर येकमेकांस भेटून। आह्मी
तारवावर चढलों। आणि ते आपल्यांकडे माघारें फिरले॥
७ मग आह्मी शोरापासून तारवाची वाट संपवून। प्तलेमाई
सांत उतरलों। आणि भावांस क्षेमगोष्टी करून त्यांजवळ येक
दिवस राहिलों॥ ८ मग दुसऱ्या [दिवशीं], पाउलसाचे सोबती
आह्मी निघून कादूसारींत आलों। आणि फिलीप्पस, जो सु
वार्तीक। त्याच्या घरांत जाऊन त्याजवळ राहिलों। तो त्यां
सातांतील होता॥ ९ त्याला भविष्यभाषिणी अशा चार कु
मारीकन्या होत्या ※ १० आणि आह्मी तेथे बहुत दिवस
राहिल्यावर। आगाबस नांवें कोणी भविष्यभाषी यहूदाहून
उतरला॥ ११ तेव्हां तो आह्माजवळ येऊन। आणि पाउ
लसाचा कंबरकसा घेऊन। आणखी आपले हात व पाय यां
स बांधून। बोलला। [कीं] पवित्रआत्मा असें ह्मणतो। ज्या
माणसाचा हा कंबरकसा आहे। त्याला यरूशलेमांत यहूदी
असें बांधितील। आणि [अन्य]देशस्थांच्या हातीं स्वाधीन क
रितील॥ १२ तेव्हां हीं ऐकिल्यावर आह्मी, आणि त्या स्था
नांतील जे त्यानीहि त्याला विनंती केली। कीं यरूशलेमा
स न चढावें॥ १३ नंतर पाउलसाने उत्तर दिल्हें। [कीं]
तुह्मी रडतांना माझें हृदय फाडून। काय करितां? कां
तर मी बांधला जाण्यास केवळ नव्हें। परंतु यरूशलेमांत
प्रभू येशूच्या नांवासाठीं मरण्यासहि सिद्ध आहें॥ १४ तेव्हां
तो विश्वासनिला होत नसतां। आह्मी स्वस्थ होतांना बोललों।
प्रभूची इछा घडो॥ १५ मग त्यां दिवसांनंतर। आह्मी खटलें
घेऊन। यरूशलेमाकडे वर आलों॥ १६ आणि शिष्यांतील
हि [कित्येक] कादूसारीपासून आमच्या संगतीं आले। त्यानी
कोणी कूप्रसी म्नासोन। पुरातन शिष्य। ज्याजवळ आह्मी
बिह्राडीं राहावें। त्याला आणिलें॥ १७ मग आह्मी यरूशले
मांत पोंहचल्यावर। भावानी आमचें आतिथ्य आनंदाने केलें॥

१८ आणि दुसऱ्या [दिवशीं] पाऊलस आमच्या संगतीं या
कोबाजवळ आंत आला। आणि सर्व वडील तेथे आले हो
ते॥ १९ तेव्हां त्याने त्यांस क्षेम बोलून आपल्या सेवेकडून [पर]
राष्ट्रांमध्यें देवाने जीं जीं केलीं। तीं तीं प्रत्येक सविस्तर
सांगितलीं॥ २० आणि त्यांनी ऐकून प्रभूचें गौरव केलें। ते
व्हां त्याला ह्मटलें। हे भाऊ। यहूद्यांतील किती अयुतें विश्वास
करणारीं आहेत। [हें] तूं पाहातोस। आणि ते सर्व नेमशास्त्रा
चा आवेश धरितात। २१ आणि त्यांच्या चित्तांत तुजविषयीं
भरविलें आहे। कीं तूं [पर]राष्ट्रांतल्यां सर्व यहूद्यांस मोश्यापा
सून फितणें शिकवीत ह्मणतोस। कीं त्यांनी लेंकरांची सुंता न
करावी। आणि रीतींप्रमाणे न चालावें॥ २२ तर काय
आहे? भरणा मिळणे हें सर्वथा अगत्य। कां कीं तूं आला
आहेस। [हें] ते ऐकतील॥ २३ यास्तव आह्मी जें तुला सां
गतों। तें हें तूं कर। ज्यांच्यांवर नवस आहे। असीं आम
चीं चार माणसें आहेत। २४ त्यांस घेऊन। डोक्याचें मुंडन
करायासाठीं त्यांच्या संगतीं शुद्ध हो। आणि त्यांसुद्धां खर्च
कर। ह्मणजे सर्वांनी जाणावें, कीं त्यांच्या चित्तांत जीं तु
जविषयीं भरविलीं। तीं कांहीं नाहींत। परंतु तूं आपणच
नेमशास्त्र पाळितां आचार करितोस॥ २५ तथापि विश्वासणारे
जे [अन्य]देशस्थ। त्यांविषयीं आह्मी असें ठरवून पाठविलें। कीं
त्यांनी तसें कांहीं न पाळावें। केवळ मूर्तिला अर्पिलेलें। व रक्त व
गुद्मरून मेलेलें। व शिंदळकी। यांपासून त्यांनी आपणांस राखा
वें॥ २६ तेव्हां पाऊलस त्यां माणसांस घेऊन दुसऱ्या दिवशीं त्यां
च्या संगतीं शुद्ध होऊन, आपल्यांतील प्रत्येकासाठीं अर्पण दि
ल्हें जाई तोंपर्यंत। शुद्ध होण्यास दिवसांची समाप्ती कळवितां।
देवळांत जाऊन [राहिला॥] २७ आणि ते सात दिवस समा
प्त होणार असतां, आशीयांतून जे यहूदी। त्यांनी त्याला देव
ळांत पाहून। सर्व समुदायाची घालमेल केली। आणि त्यावर
हात टाकितां। २८ गर्जिलें। [कीं] अहो इस्राएल माणसें।

तुह्मी साह्य करा। जो मांणुस सर्व ठिकाणीं अवघ्यांस, ह्या लोक व नेमशास्त्र व हें स्थान, यांविरुद्ध शिकवितो, तो हाच आहे। आणखीहि त्याने हेलाग्यांस देवांत देवळांत आणून, हें पवित्र स्थान विटाळिलें आहे॥ २९ कां तर त्यानी, त्रफिमस येक इफेसस्कर, याला त्याच्या संगतीं नगरांत पूर्वीं पाहिलें होतें। तो पाऊलसाने दे वळांत आणिला, असें त्यानी कल्पिलें होतें॥ ३० तेव्हां सगळें नगर खवळलें गेलें। आणि लोक धांवण्याने येकवट जाला। तेव्हां त्यानी पाऊलसाला धरून देवळाबाहेर वो ढिलें, आणि तेव्हांच दारें बंद केलीं गेलीं॥ ३१ नंतर ते त्याला जिवें मारायास झटत असतां, पलटणीतील सहस्रप तीजवळ वर असें निवेदन जालें, कीं अवघ्या यरूश लेमाची घालमेल जाली॥ ३२ तो तत्काळीं सैनिकांस व शताधीशांस घेऊन, त्यांवर खालीं धांवला॥ मग त्यानी स हस्रपती व सैनीक यांस पाहून, पाऊलसाला मारणें सोडिलें॥ ३३ तेव्हां सहस्रपतीने जवळ जाऊन त्याला धरिलें, आणि दोन सांखळ्यानी बांधावें, अशी आज्ञा दिल्ही। मग विचा रिलें, हा कोण असेल? आणि याने काय केलें आहे? ३४ तेव्हां समुदायांत कोणी कोणी कांहीं कांहीं गर्जत अ सतां, आणि तो गलबल्यामुळें निश्चय जाणुं न शकतां, त्या ने आज्ञा दिल्ही, कीं याला किल्ल्यांत न्यावें॥ ३५ मग हा पायऱ्यांवर पावल्यानंतर, असें जालें, कीं समुदायाच्या बळात्कारामुळें सैनिकांकडून वाहिला गेला॥ ३६ कां कीं लोकाचा भरणा पाठीमागें जाऊन, त्याला दूर कर, असें वो रडत होता॥ ३७ तेव्हां पाऊलस किल्ल्यांत नेला जाणार अ सतां सहस्रपतीला ह्मणतो, मला तुजशीं कांहीं बोलायास योग्य आहे कीं काय? मग त्याने ह्मटलें, तूं हेलासीभाषा जा णतोस कीं काय? ३८ ज्या मिसऱ्याने या दिवसांपूर्वीं दंगा केला, आणि हत्यारी चार हजार माणसें यांस बाहेर रा

नांत नेलें। तो तर तूंच आहेस कीं नाहींस? ३९ तेव्हां
पाऊलसानें ह्मटलें। मी किलिकींतील तार्षसकर यहूदीच मा
णुस आहें। मी अप्रसिद्ध नगरचा नागरीक नव्हें, आणि त्वां
मला लोकांशीं बोलूं द्यावें। ह्मणोन मी तुजपाशीं विनंती करितों॥
४० नंतर त्यानें मानल्यावर। पाऊलसानें पायऱ्यांवर उभें
राहून। हाताकडून लोकांस खुणाविलें, आणि फार मौन्य
जाल्यावर, तो इब्रीभाषेंत मोठ्यानें बोलतां ह्मणाला ॥

पर्व २२ ॥ १ अहो भाऊ व बाप माणसें। तुह्मांजवळ जो
माझा सध्यां तोडवाका, तो तुह्मी ऐका॥ २ तेव्हां तो त्यां
शीं इब्रीभाषेंत मोठ्यानें बोलता जाला, हें त्यांनी ऐकून अधीक
स्वस्थता धरिली॥ नंतर तो ह्मणतो, ३ मी यहूदीच माणु
स आहें। किलिकींतील तार्षसांत जन्मलों, परंतु ह्या नग
रांत। गामलियेलाच्यां पायांजवळ प्रतिपाळ पावलों। पि
तरी शास्त्राच्या सूक्ष्मतेप्रमाणें शिकविला होतों। जसे तुह्मी
सर्व आज आहां। तसा मी देवाचा आवेशी होतों॥ ४ तो
मी पुरुषांस व स्त्रियांसहि बांधीत आणि बंदिशाळेंत टाकी
त असतां। मरणापर्यंत ह्या पंथाच्या पाठीस लागलों॥
५ आणि मुख्य उपाध्या वडीलवर्गासुद्धां मजविषयीं तसें प्र
माण देतो। ह्यांपासून दामास्कांतल्यां भावांशीं पत्रेंहि
पावून। जे तेथें होते त्यांनीहि दंडिलें जावें। ह्मणोन त्यांस
बांधून यरूशलेमास आणायास मी गेलों॥ ६ आणि अ
सें जालें, कीं मी जातांना दामास्काजवळ पोंहचून। सुमारें म
ध्यान्हीं आकाशांतून मोठा उजेड माझ्या भोंवता अकस्मात
लखलखाटला॥ ७ तेव्हां मी भूमीवर पडलों। आणि मजशीं बो
लतां [असा] शब्द म्यां ऐकिला। हे शाऊला। शाऊला। तूं
माझ्या पाठीस कां लागतोस? ८ मग म्यां उत्तर [असें] दिल्हें।
हे प्रभू। तूं कोण आहेस? नंतर तो मजशीं बोलला। [कीं]
येशू नाझोरी। ज्याच्या पाठीस तूं लागतोस। तोच मी आ
हें॥ ९ तेव्हां जे माझ्या संगतीं होते, त्यांनी तो उजेड पा

हिला खरें, आणि ते भयाभीत जाले। परंतु मजशीं बोल
णारा याचा शब्द त्यांनी ऐकिला नाहीं॥ १० तेव्हां मी बो
ललों, हे प्रभू म्यां काय करावें? नंतर प्रभूने मला ह्मटलें,
तूं उठून दामासेकांत जा। मग जीं अवघीं तुला करायास
नेमिलीं, त्यांविषयीं तुला तेथे सांगितलें जाईल॥ ११ तेव्हां
त्या उजेडाच्या तेजामुळें मला दिसलें नाहीं। यास्तव माझ्या
संगत्यांकडून मी हातीं नेला असतां। दामासेकांत गेलों॥
१२ मग कोणी अनान्या। [जो] नेमशास्त्राप्रमाणे सुभक्तिमान
माणुस तेथल्या अवघ्या राहाणाऱ्या यहूद्यांकडून प्रमाणलेला।
१३ तो माझ्या जवळ येऊन आणि उभा राहून, मजशीं बोलला।
हे शाऊलभावा, तूं दृष्टी पाव॥ तेव्हां माझी दृष्टी त्याच वेळेस
त्यावर जाली॥ १४ मग तो बोलला, आमच्यां पितरांच्या देवाने
तुला असें निवडिलें। कीं त्वां त्याची इच्छा जाणावी, आणि त्या
पुण्यवानाला पाहावें, आणि त्याच्या मुखांतील शब्द ऐकावा॥
१५ कां तर त्वां जें पाहिलें आणि ऐकिलें। त्यांविषयीं
तूं सर्व माणसांजवळ त्याच्या साठीं साक्षी होसील॥ १६ तर आतां
तूं उशीर कां करितोस? उठून बाप्तिस्मा घे। आणि प्रभूचें
नांव घेतां आपलीं पापें धुवून टाक॥ १७ नंतर असें जा
लें। कीं मी यरूशलेमास परतल्यावर देवळांत प्रार्थना करी
त असतां। भानांतरीं जालों। १८ आणि त्याला पाहिलें।
[तेव्हां] तो मजशीं बोलला, कीं तूं घाई करून यरूशलेमांतू
न निघ। कारण कीं ते मजविषयीं तुझी साक्ष अंगिकार
णार नाहींत॥ १९ परंतु मी बोललों, हे प्रभू, ते आपण
समजले, कीं जे तुजवर विश्वासणारे। त्यांस म्यां बंदीस घा
तलें। आणि प्रतिसभेंत झोडिलें॥ २० आणि तुझा साक्षी
स्तेफानस। याचें रक्त जेव्हां वोघळविलें, तेव्हां मीहि जवळ
उभा होतों। आणि त्याच्या घातसम्मतांत होतों। आणि
त्याच्या घातकरणाऱ्यांचीं वस्त्रें राखीत होतों॥ २१ तरी

त्याने मला ह्मटलें। तूं येथून जा। कां कीं मी तुला [पर] राष्ट्रांकडे दूर पाठविणार आहें ॐ

२२ तेव्हां त्यांनी ह्या गोष्टिपर्यंत त्याचें ऐकिलें। मग आपला शब्द उंच करून ह्मटलें। अशाला पृथ्वीवरून दूर कर। कारण कीं तो जगायास योग्य नाहीं॥ २३ तेव्हां ते ओरडत। आणि आपलीं वस्त्रें आदळीत। आणि वाऱ्यांत धूळ उडवीत असतां। २४ त्याला किल्ल्यांत आणावें। अशी आज्ञा सहस्रपतीने दिल्ही। [आणि।] ते कोणत्या कारणास्त व त्यावर असें ओरडले हें आपण जाणावें। ह्मणोन फटके मारण्याने त्याला शोधायास सांगितलें॥ २५ मग ते त्याला वाद्या यांकडून पुढें ताणीत असतां। पाऊलसाने शताधीश जो उभा होता त्याला ह्मटलें। कीं [जो] माणुस रोमी आणि अन्यायी ठरविला नाहीं। त्याला फटके मारणे। हें तुह्मास योग्य आहे कीं काय? २६ तेव्हां शताधीशाने ऐकून। सहस्रपतीजवळ जाऊन सांगितलें। कीं तूं जें काय करायास सिद्ध आहेस त्याविषयीं पाहा। कां कीं हा माणुस रोमी आहे॥ २७ तेव्हां सहस्रपती। जवळ येऊन त्याला बोलला। मला सांग। तूं रोमी आहेस कीं काय? मग त्याने ह्मटलें। होय॥ २८ तेव्हां सहस्रपतीने उत्तर केलें। मी फार मोलानें हें नागरीकपण विकत घेतलें॥ तेव्हां पाऊलसाने ह्मटलें। मी तरीं तसाच जन्मलों होतों॥ २९ यावरून जे त्याला शोधायास सिद्ध होते, ते तेव्हांच त्यापासून गेले। आणि तो रोमी आहे, असें सहस्रपतीहि जाणून भ्याला। कां कीं आपण त्याला बांधलेंहि होतें ॐ

३० दुसऱ्या दिवशीं। यहूद्यानी कशावरून त्यावर आरोप ठेविला होता। याचें निश्चयपण त्याने जाणायास इच्छून त्याला बंधनांपासून सोडिलें। आणि मुख्य उपाध्ये व त्यांची सगळी न्यायसभा। यांस मिळण्याची आज्ञा दिल्ही। नंतर पाऊलसाला खालीं आणून त्यांमध्यें ठेविलें ॐ

पर्व २३ ॥ १ तेव्हां पाऊलस न्यायसभेला स्थीर पाह
तां बोलला। अहो भाऊ माणसें। मी ह्या दिवसापर्यंत सर्व
चांगल्या भावाने देवासीं आचरलों आहें॥ २ तेव्हां अना
न्या जो मुख्य उपाध्या, त्याने त्याजवळच्यां उभेराहाणाऱ्यांस
त्याच्या तोंडावर मारायाची आज्ञा दिल्ही॥ ३ तेव्हां पाऊ
लसाने त्याला ह्मटलें। हे पांढऱ्ये केलेल्ये भिंती। देव तुला मा
रायास सिद्ध आहे। कां तूं माझा न्याय नेमशास्त्राप्रमाणे
ठरवायास बसला असतांना, नेमशास्त्राविरुद्ध मला मारावें असी
आज्ञा देतोस। ४ तेव्हां जवळच्यां उभेराहाणाऱ्यानी ह्मटलें।
तूं देवाच्या मुख्य उपाध्याला निंदितोस कीं काय? ५ नंतर पाऊल
साने ह्मटलें, अहो भाऊ। हा मुख्य उपाध्या आहे। हें मी समज
लों नाहीं। कां तर तूं आपल्या लोकाच्या अधिकाऱ्यास वाई
ट बोलु नको, असें लिहिलें आहे ※ ६ तेव्हां येक भाग
जादूक्यांचा आणि दुसरा फारिश्यांचा आहे। हें पाऊलस जाणून।
न्यायसभेंत वोरडला। कीं अहो भाऊ माणसें। मी फारिशी।
फारिश्याचा पुत्र आहें। मेलेल्यांचें पुन्हा उठणें याच्या आशे
विषयीं माझा न्याय ठरविला जातो॥ ७ तेव्हां तो हें बोल
ल्यावर, फारिशी व जादूकी यांमध्यें उठणे जालें। आ
णि तो मेळा फुटला गेला॥ ८ कारण कीं पुन्हा उठणें ना
हीं। आणि दूत नाहीं व आत्मा नाहीं। असें जादूकी ह्मण
तात खरें। परंतु फारिशी दोघांस पत्करतात॥ ९ तेव्हां मो
ठा आकांत जाला। आणि फारिश्यांच्या पक्षांतील जे पंडीत,
ते उठून भांडत बोलले, [कीं] ह्या माणसावर कांहीं दोष
आह्मास सांपडत नाहीं। आणि जर आत्मा अथवा दूत
त्यासीं बोलला आहे। तर आह्मी देवासीं न भांडावें॥ १० ते
व्हां मोठें भांडण जाल्यावर, सहस्रपतीने, पाऊलस त्यांकडू
न फाटला जाईल, असें भिऊन सैन्यांस उतरवून, त्या
ला त्यांमधून बळात्काराने काढावें व किल्ल्यांत आणावें। असी
आज्ञा दिल्ही ※

११ आणि पुढल्या रात्रीं। प्रभू त्याजवळ उभा राहून बोलला। हे पाऊलसा। तूं धीर धर। कारण कीं जसें त्वां मजविषयीं जीं। तीं यरूशलेमांत प्रमाणानें पटविलीं। तसें रोम्यांतहि तुला साक्ष दिल्ही पाहिजे॥ १२ आणि दिवस उगवल्यावर। कित्येक यहूद्यांनी कट्ट करून आपण पाऊलसाला जिवें मारूं तोंपर्यंत न खाऊं आणि न पिऊंहि। असें बोलून आपणांस शापिलें॥ १३ तेव्हां ज्यांनी असी सहशपत केली। ते चाळिसांवर अधीक होते॥ १४ ते मुख्य उपाध्ये व पुरातन यांजवळ येऊन बोलले। आह्मी पाऊलसाला जिवें मारूं तोंपर्यंत कांहीं चाखणार नाहीं, अस्या शापानें आह्मी आपणांस शापिलें आहे। १५ यास्तव आतां त्याविषयीं जीं तीं अधीक पक्कें जाणायाचें असें निमित्त, तुह्मी न्यायसभेसुद्धां सहस्रपतीला यासाठीं दाखवा। कीं ह्यानें त्याला उद्यां तुह्माजवळ खालीं आणावें। आणि तो जवळ आल्यापूर्वीं आह्मी त्याचा जीव घालवायास सिद्ध आहों॥ १६ तेव्हां पाऊलसाचा भाचा। यानें ह्याविषयीं ऐकिल्यावर। जाऊन आणि किल्ल्यांत शिरून। पाऊलसाला वर्तमान सांगितलें॥ १७ नंतर पाऊलसानें शताधिशांतील येकाला बोलावून ह्मटलें, ह्या तरूणाला सहस्रपतीजवळ कांहीं सांगायाचें आहे। यास्तव तूं याला त्याच्या जवळ घेऊन जा॥ १८ तर त्याप्रमाणे तो त्याला घेऊन सहस्रपतीजवळ नेऊन बोलला, [कीं] बंदीवान पाऊलसानें मला बोलावून मागितलें, कीं हा तरूण तुह्मा जवळ आणला जावा। याला तुजसीं कांहीं सांगायाचें आहे॥ १९ तेव्हां सहस्रपतीनें त्याचा हात धरून। आणि येकांतीं नेऊन। पुसलें [कीं] तुला मजसीं सांगायाचें काय आहे? २० तेव्हां तो बोलला। कीं यहूद्यांनी असा येकोपा केला, कीं आपण पाऊलसाविषयीं कांहीं अधीक पक्कें विचारणार या निमित्तें तुह्मा जवळ मागावें। कीं त्वां त्याला उद्यां न्यायसभेंत खालीं न्यावें॥ २१ यास्तव तूं त्यां

सीं विश्वासविला जाउं नको। कां तर त्यांतील चाळिसांवर अधीकमाणसांनी त्याविषयीं दवा धरिला। त्यांनी आपणां स असें शापिलें। कीं आपण त्याला जिवें मारूं तोंपर्यंत न खा ऊं आणि न पिऊंहि॥ आणि आतां ते तुजपासून वचनाची वाट पाहात सिद्ध आहेत॥ २२ यास्तव त्याप्रमाणें सहस्त्रप तीनें त्या तरुणाला निरोप देतां आज्ञा केली। कीं त्वां मज सीं हीं दाखविलीं। हें तूं कोणाला सांगुं नको॥ २३ मग त्याने शताधिशांतील दोघांस बोलावून सांगितलें। तुह्मी दोन शें सैनीक। व सत्तर स्वार, व दोन शें बर्चीदार। यांस रा त्रीच्या तिसऱ्या होरेस कादसारोपर्यंत जावयास सिद्ध करा। २४ आणि पाखाळें आणावीं। ह्मणजे त्यांवर पाऊलसाला बसवून। फेलीक्ष सुभेदार याजवळ सुरक्षीत न्यावें॥ २५ [ते व्हां] त्याने हा प्रकार मावलेलें पत्र लिहिलें। २६ [कीं] रा जमान्य सुभेदार फेलीक्ष। यांसीं कल्याण इच्छक क्लाउदियस लु सियास। [विशेष।] २७ हा माणुस यहूद्यांकडून धरिला गेला। आणि त्यांकडून याचा घात घडणार होता। [तेव्हां] रोमी आहे हें म्या जाणून। सैन्यासुद्धां जाऊन याला सोड विलें॥ २८ तेव्हां कोणत्या कारणास्तव त्यांनी याजवर आ रोप ठेविला। हें जाणायास म्या इकून याला त्यांच्या न्यायसभें त खालीं नेलें॥ २९ यावर त्यांच्या नेमशास्त्रांतील विचारां विषयीं आरोप ठेविला होता। परंतु मरणास अथवा बंध नांस योग्य असा कांहीं आरोप यावर नव्हता। असा मला सां पडला॥ ३० आणि या माणसावर यहूद्यांकडून कट्ट लागणा र होता, याची सुचना मला जाल्यावर। म्या [त्याला] ल वकर तुजकडे पाठविलें आहे। आणि याच्या वाद्यांस जों याविरुद्ध। तों त्यांनी तुजवळ सांगावें। असी आज्ञा केली आहे॥ कल्याण असो ❊

३१ तर त्यावरून, सैनिकांस नेमणूक जाल्याप्रमाणें त्या नी पाऊलसाला घेऊन। रात्रीं आंतिपात्रिसास नेलें॥ ३२ म

ग दुसऱ्या [दिवशीं] ते। स्वारांस त्यांसहीत जाण्यास सोडून। किल्ल्याकडे परतले ॥ ३३ त्यांनी। कादूसारींत येऊन आणि सुभेदाराला पत्र देऊन। त्याजवळ पाऊलसालाहि ठेविलें ॥ ३४ तेव्हां सुभेदाराने [पत्र] वाचून। हा कोणत्या अधिकारांतील आहे, असें पुसलें। आणि किलीकींतील आहे, असें उत्तर ऐकिल्यावर। ३५ त्याने म्हटलें। [कीं] जेव्हां तुझे वादीहि समक्ष होतील। तेव्हां मी तुझें सांग्यंत ऐकेन॥ नंतर त्याने असी आज्ञा दिल्ही कीं त्याला हेरोदाच्या वाड्यांत राखावें ॐ

पर्व २४ ॥ १ मग पांच दिवसांनंतर, वडील व कोणी वक्ता तेर्तुलस त्यांसुद्धां मुख्य उपाध्या अनान्या उतरला। त्यांनी पाऊलसाविरुद्ध सुभेदाराला सांगून दाखविलें॥ २ तेव्हां त्याला बोलाविलें असतां तेर्तुलस [त्याजवर] दोष ठेवूं लागतां बोलला। हे राजमान्य फेलिक्षा। तुजकडून आह्मी बहुत स्वस्थता पावतों। आणि तुझ्या पूर्वज्ञानानें यशस्वी क्रिया ह्या देशासाठीं घडल्या आहेत। यास्तव ३ आह्मी सर्वकृतज्ञपणें सर्वदां आणि सर्वत्रहि त्या स्वीकारितों। ४ परंतु म्या तुला अधीक न अडयळावें। ह्मणोन त्वां आपल्या विनयतेने, संक्षेपांत आमचें ऐकावें। असी मी विनंती करितों ॥ ५ कां तर आह्मास हा माणुस पिडाकारी। आणि जगवस्तींतील अवघ्यां यहूद्यांमध्यें दंग्याचा उठविणारा। आणि जे नाजोरी त्यांच्या तडाचा पुंड असा सांपडला॥ ६ हा देवळासहि अपवित्र करायास झटला॥ तेव्हां आह्मी याला धरून। आमच्या नेमशास्त्राप्रमाणे न्याय ठरवायास इछिलें होतें॥ ७ परंतु लुसियास जो सहस्रपती। त्याने जवळ येऊन मोठ्या बळात्काराने आमच्यां हातांतून [याला] काढून नेलें। ८ [आणि] याच्यां वाद्यांस तुझ्या जवळ येण्याची आज्ञा दिल्ही। त्याजवळून। शोध केल्याने। ज्यांविषयीं आह्मी यावर आरोप आणितों त्यां सर्वांविषयीं तूं स्वतां जाणुं शकसील॥ ९ आणि हीं तसींच आहेत, असें यहूद्यांनीहि सांगून सम्मत दिल्हें आहे ॐ १० तेव्हां सुभेदाराने पाऊल

साला खुणाविल्यावर। याने उत्तर दिल्हें। कीं तूं बहूतव र्षांपासून ह्या देशाचा न्यायाधीश आहेस, [हें] मी जाणून। अधीक संतुष्टचित्ताने आपल्याविषयीं जों। त्यांचा तोडवा का सांगतों।॰ ११ कां तर तूं जाणुं शकतोस। कीं मी भजन करायास यरूशलेमास वर गेलों। तेव्हांपासून बारांवर अधीक दिवस जाले नाहींत॥ १२ आणि कोणाजवळ वि वाद करीत। अथवा॰ समुदायाचा दंगा करीत। असा मी देवळांत अथवा सभांत। अथवा नगरांत, त्यांस सांपडलों नाहीं। १३ आणि ज्यांविषयीं ते आतां मजवर आरोप आणितात। त्यांची पुरवणी करायास ते समर्थ नाहीं त॥ १४ परंतु हें मी तुजवळ पत्करितों, कीं ज्या मार्गा ला ते मतभ्रष्टता ह्मणतात। त्याप्रमाणे मी पूर्वजांच्या दे वाला भजतों। नेमशास्त्रांत व भविष्यलेखांमध्यें जों लिहिलीं। त्यां अवघ्यांवर विश्वासतों। १५ [आणि] देवावर आशा बा ळगितों। कीं न्यायी व अन्यायीहि ह्यां मेलेल्यांचें फिरोन उ टणें होणार आहे। ही ते आपणहि अंगिकारितात॥ १६ आ णि याविषयीं मी झटतों। कीं देवाजवळ व मनुष्यांजवळ नि र्दोषी भाव मला सर्वदां व्हावा॥ १७ आतां बहूत वर्षें [जा ल्या]वर। मी आपल्या देशासाठीं धर्म व अर्पणें करायास आलों। १८ ह्यांविषयीं मी देवळांत शुद्ध केलेला। समुदायासुद्धां नसतां। आणि गडबडीसुद्धां नसतां, असा सांपडलों। आणि आशींतील कित्येक यहूदी [होते।] १९ त्यांस जर कांहीं मजविरुद्ध असतें, तर त्यानी येथे तुजवळ येऊन। आरोप ठेवायाचा होता॥ २०। २१ अथवा, ही येकच गोष्ट। जी मी ह्यांमध्यें उभा असतां बोरडलों। कीं मेलेल्यांचें फिरोन उठण्या विषयीं माझा न्याय तुह्माकडून आज ठरविला जातो। ह्याविषयींच्या वांचून। मजकडे कांहीं अन्याय। मी न्या यसभेमध्यें उभा राहात असतां। जर ह्यांस सांपडला, तर हे आपण ह्मणोत॥ २२ मग फेलीक्ष ह्मीं ऐकून।

त्या मार्गाविषयीं, जों तों अधीक पक्कें जाणत असतां, त्यां
स यांवरून बोलला, जेव्हां सहस्रपती लुसियास उतरेल, ते
व्हां मी तुमचीं सायंत जाणेन॥ २३ आणि त्याने ये
का शताधीशाला आज्ञा दिल्ही। कीं पाऊलसाला राखावें। आ
णि त्याला मोकळीक व्हावी, आणि त्याच्या स्वकीयांमधील
कोणालाहि त्यास सेवावयास। अथवा त्याच्या जवळ जावया
स, मना न करावें ※

२४ आणि कित्येक दिवसांनंतर। फेलिक्षाने, आपली बा
यको द्रुसीला जी यहूदीण होती। हजसुद्धां जवळ येऊन पा
ऊलसाला बोलावून ख्रीस्तावरल्या विश्वासाविषयीं त्याचें ऐकिलें॥
२५ तेव्हां तो नीतिपण, व दमनपण। व होणार न्याय ह्यांविषयीं
सविस्तर सांगत असतां। फेलिक्षाने भयाभीत होऊन उत्तर दि
ल्हें। तूं आतां जा। आणि मी प्रसंग पावल्यावर तुला
बोलावीन॥ २६ आणखी आपण पाऊलसाला सोडावें। ह्या
णोन त्याकडून आपणास पैकाहि दिल्हा जाईल। असी आशा
ह्याने धरिली। यास्तव त्याला अधीकच वारंवार आणवून त्या
सीं संवाद केला॥ २७ परंतु दोन वर्षें भरल्यानंतर फेलि
क्ष। [आपला] बदला पर्कयस फेस्तस याला पावला। ते
व्हां फेलिक्षाने यहूद्यांस संतोष करायास इछून। पाऊलस
बांधलेला ठेविला ※

पर्व॥ २५॥ १ मग फेस्तस अधिकारावर येऊन। तीन दि
वसांनंतर काइसारीहून यरूशलेमास चढला॥ २ तेव्हां मु
ख्य उपाध्या व यहूद्यांमधील जे श्रेष्ठ, त्यानी पाऊलसाविरुद्ध
ह्याला समजाविलें। ३ आणि वाटेंत त्याचा घात करायासा
ठीं दबा धरीत असतां। त्याविरुद्ध कृपा मागत ह्याजवळ वि
नंती केली। कीं ह्याने पाठवून त्याला यरूशलेमांत आणावें॥
४ अशावरून फेस्तसाने उत्तर दिल्हें। कीं पाऊलसाला काइ
सारींत राखावें। आणि आपणाला [तेथे] लवकर जायाचें आहे।
५ यास्तव। तो ह्मणतो। तुह्मामधील जे शक्तिमान। ते [मा

ह्या] सहीत उतरून। या माणसाकडे जर कांहीं आहे। तर त्यावर आरोपीत॥ ६ मग तो त्यांमध्यें दाहा दिवसांपेक्षां अधीक राहून। कादूसारीस उतरला। [आणि] दुसऱ्या दिवशीं। त्याने न्यायसनावर बसून। पाऊलसाला आणावयास आज्ञा दिल्ही॥ ७ मग तो जवळ आल्यावर। यरूशलेमाहून जे यहूदी उतरले होते। ते भोंवते उभे राहात असतां। बहुत आणि भारी आरोप।। ज्यांचें प्रमाण ते दाखवायास समर्थ न व्हते। असे पाऊलसावर आणिते जाले॥ ८ ह्याने असी तोड काढिली। कीं यहूद्यांच्या नेमशास्त्राविरुद्ध। अथवा देवळाविरुद्ध। अथवा कादूसाराविरुद्ध। म्या कांहीं पाप केलें नाहीं॥ ९ तथापि फेस्तस यहूद्यांकडे कृपा सांठवायास इछून। पाऊलसाला उत्तर करीत बोलला, तूं यरूशलेमास चढून तेथे मजकडून यांविषयीं आपला न्याय ठरविला जाण्यास इछितोस कीं काय? १० तेव्हां पाऊलसाने ह्मटलें। कादूसाराच्या न्यायासनापुढें मी उभा राहातों। तेथे माझा न्याय ठरला पाहिजे। म्या यहूद्यांचा अन्याय केला नाहीं। असें तूंहि चांगलेपणें जाणतोस॥ ११ कारण कीं जर म्या अन्याय केला खरें। अथवा मरणाचें योग्य कांहीं केलें आहे। तर मी मरण टाळायास मागत नाहीं। परंतु ज्यांविषयीं हे मजवर आरोप ठेवितात। त्यांतील जर कांहीं नाहीं। तर कोणाच्याने मी ह्यांजवळ दिल्हा जाववत नाहीं। मी कादूसाराजवळ न्याय मागतों॥ १२ तेव्हां फेस्तसाने न्यायसभेशीं ह्मटल्यावर। उत्तर दिल्हें। कीं त्वां कादूसाराजवळ न्याय मागितला? [तर] कादूसाराजवळ जावें ※

१३ आणि कित्येक दिवस गेल्यानंतर, आग्रीप्पा राजा व बेरनीके। हीं फेस्तसाची भेट घ्यायास कादूसारीस पावलीं॥ १४ मग यानी तेथे बहुत दिवस क्रमिले असतां। फेस्तस पाऊलसाविषयीं जीं। तीं राजाजवळ निवेदन करीत बोलला। [कीं] कोणी माणुस फेलिक्षाने बंदिवान ठेविलेला आहे। १५ मी

यरूशलेमांत होतों। तेव्हां मुख्य उपाध्ये व यहूद्यांतील जे व डील। त्यांनी ह्याविरुद्ध न्याय मागतां। ह्याविषयीं मला दाखवीत सांगितलें॥ १६ त्यांस म्या उत्तर दिल्हें, कीं जो आरोपी। त्याजवळ आरोपठेवणारे तोंडोतोंड व्हावे, आणि त्याने वादाविषयीं तोंड काढायाचें ठिकाण पावावें, यापूर्वीं कोण्या माणसाला नाशासाठीं द्यावें। ही रोम्यांची रीत नाहीं॥ १७ यास्तव ते तेथें मिळाल्यावर म्या कांहीं उशीर न करितां। दुसऱ्या [दिवशीं] न्यायासनावर बसून, त्या माणसाला आणावें। असी आज्ञा दिल्ही॥ १८ [नंतर] वाद्यानी त्या भोंवतीं उभे राहून। जीं म्या कल्पिलीं त्यांतील कांहीं आरोप त्यावर आणिला नाहीं। १९ परंतु त्यांच्याच देवधर्माविषयीं। व कोणी मेलेला येशू, जो जिवंत आहे असें पाऊलसाने निश्चयें ह्मटलें। त्याविषयीं कित्येक विचार त्यांस ह्यासीं होते॥ २० तेव्हां अस्या विचाराविषयीं म्या संशय धरीत असतां ह्मटलें। कीं तूं यरूशलेमास जाऊन। तेथे त्यांविषयीं न्याय पावायास इछितोस कीं काय? २१ परंतु पाऊलसानें। आपण वंद्य[कादूसारा]कडून निवाडा यासाठीं ठेविला जावा। असें न्यायाविषयीं मागितल्यावर, म्या आज्ञा दिल्ही। कीं मी त्याला कादूसाराकडे पाठवीं तोंपर्यंत त्याला ठेवावें॥ २२ तेव्हां आग्रीप्पाने फेस्तसाला ह्मटलें। मी आपणहि त्या माणसाचें ऐकायास योजिता जालों॥ मग हा ह्मणतो, उद्यां लां त्याचें ऐकावें ※

२३ यास्तव दुसऱ्या दिवशीं, आग्रीप्पा व बेरनीके हीं मोठ्या थाटाने आलीं। आणि जे सहस्रपती व नगरांतील श्रेष्ठ माणसें, यांसुद्धां ऐकण्याच्या ठिकाणांत गेलीं। मग फेस्तसाने आज्ञा दिल्यावर पाऊलस आणला गेला॥ २४ तेव्हां फेस्तस ह्मणतो। अहो आग्रीप्पा राजा, व आमच्या जवळील सगळीं माणसें, ज्याविषयीं यहूद्यांतील अवघा भरणा। यरूशलेमांत आणि येथेहि मला काकुळत करीत। वोरडला कीं अगत्य हा अधीक न जगावा। त्याला तुह्मी पाहातां॥ २५ प

रंतु त्यानें मरणास योग्य असें कांहीं केलें नाहीं। हें मी समजल्यावरून। आणि त्यानें स्वतांहि वंद्याजवळ न्याय मागितला आहे। यावरून म्या त्याला पाठवायास निश्चय केला आहे॥ २६ त्याविषयीं प्रभूकडे लिहिण्यासाठीं मला कांहीं निश्चयी [असें] नाहीं। यास्तव म्या त्याला काढून तुह्मा जवळ आणिलें आहे। आणि। हे आग्रीप्पा राजा। विशेष तुह्मा जवळ। ह्मणजे निवाडा झाल्यावर। मला कांहीं लिहायास व्हावें॥ २७ कां कीं बंदिवान पाठविणे। आणि त्याचे आरोप न दर्शविणे। हें मला असंगत दिसतें ※

पर्व २६॥ १ तेव्हां अग्रीप्पानें पाऊलसाला ह्मटलें। तुला आपल्यासाठीं बोलायास मान्यता आहे॥ तेव्हां पाऊलसानें हात लांबवून [असो] तोंड काढिलो। २ हे आग्रीप्पा राजा। ज्यां अपराधांविषयीं मी यहूद्यांकडून आरोपीत आहें। त्यांविषयीं मी तुजपासीं आज तोंड काढणार। यास्तव मी आपणाला धन्य मानितों। ३ विशेष यासाठीं। कीं ज्या रीती व विचारहि यहूद्यांमध्यें। त्यां सर्वांचा तूं जाणणारा आहेस। यास्तव त्वां सहनतेनें माझें ऐकावें। असें मी तुजसीं विनंती करितों॥ ४ तर बाळपणापासून माझी वर्तणूक जी यरूशलेमांत। माझ्या राष्ट्रांत पहिल्यापासून जाली। ती सर्व यहूद्यांस कळलीच। ५ त्यांनी पूर्वींपासून मला वोळखिलें। जर त्यांस साक्ष द्यायाची इच्छा असेल। तर [ते असी देतील] कीं आमच्या धर्मांतील सर्वांहून पक्क्या तडाप्रमाणे। मी फारिशी वर्तलों॥ ६ आणि आतां देवाकडून जें वचन पूर्वजांसीं जालें। त्याच्या आशेसाठीं मी उभा राहून। माझा न्याय ठरविला जातो। ७ त्या [वचना]पर्यंत पावायास। आमच्यां बारा वंशांचा वर्ग रात्रंदिवस अखंडीत भजन करितां आशा धरितो॥ हे आग्रीप्पा राजा। त्या आशेविषयीं मी यहूद्यांकडून आरोपीत जालों आहें॥ ८ देव मेलेल्यांस फिरोन उठवितो, हें तुह्माजवळ अविश्वास्य कां मोजलें जातें? ९ तर खरें। स्व

तां मला नाझोरी येशू याच्या नांवाविषयीं वाटलें। कीं बहु
त विरुद्धं केलीं पाहिजेत॥ १० आणि म्या यरूशलेमांत त
सें केलें। तेव्हां मुख्य उपाध्यांपासून अधिकार पावून। पवि
त्रांतील बहुतांस बंदिशाळांमध्यें कोंडून टाकिलें। आणि ते
जिवें घालविले गेले। तेव्हां म्या त्यांविरुद्ध संमतखूण दि
ल्ही॥ ११ आणि त्यांस अवघ्यां सभांत वारंवार दंडून। दु
र्भाषण बोलवायास बळात्कार केला। आणि त्यांसीं अति च
ळला होऊन, अन्यनगरांपर्यंतहि मी त्यांच्या पाठीस लागलों॥
१२ आणि मुख्य उपाध्यांपासून अधिकार व प्रेरणा पावून।
मी ह्यां [कामां]वर दामास्कास जात होतों। तेव्हां। १३ हे
राजा। मध्यान्हीं म्या वाटेवर। आकाशांतून [आलेला] उजेड
सूर्याच्या तेजापेक्षां [अधीक तेजस्वी।] असा पाहिला। तो
माझ्या व माझ्या संगतीं जाणारे यांच्या भोंवतीं चकचकाट
ला॥ १४ तेव्हां सर्व आह्मी भूमीवर पडल्यानंतर। म्या श
ब्द ऐकिला। तो मजसीं इब्री भाषेंत बोलतांना ह्मणाला।
[कीं] शाऊला। शाऊला। तूं माझ्या पाठीस कां लागतोस?
अण्यांवर लात मारणें। हें तुला कठीण [आहे।] १५ तेव्हां
मी बोललों। हे प्रभू, तूं कोण आहेस? आणि तो बोलला।
ज्या येशूच्या पाठीस तूं लागतोस, तोच मी आहें॥ १६ आ
णखी तूं ऊठ। आणि आपल्यां पायीं उभा राहे। कां तर
मी तुला ह्यासाठीं दिसलों, कीं त्वां जें पाहिलें। आणि
ज्यांविषयीं मी तुला दिसेन त्यांविषयींहि म्या तुला साह्य
कारी व साक्षी असा निवडून ठेवावा। १७ मी तुला लोकांपा
सून व ज्यां [पर]राष्ट्रांजवळ तुला आतां पाठवितों त्यांपासू
न सोडवितों॥ १८ ह्यासाठीं [पाठवितों] कीं त्वां त्यांचे डोळे उ
घडावे। आणि [त्यांस] काळोखापासून उजेडाकडे। व सटानाच्या
अधिकारापासून देवाजवळ फिरवावें। ह्मणजे त्यानी, मजवर
च्या विश्वासाकडून। पापांची सुटका व पवित्र केलेल्यांमध्यें वतन।
हीं पावावीं॥ १९ हे आग्रीप्पा राजा। तेव्हांपासून मी त्या

आकाशीदृष्टांताला अमान्य न जालों। २० परंतु पहिल्या ने दामास्केकांतल्यांस। मग यरूशलेमकरांस। आणि यहूदांत ल्या सर्व ठिकाणीं जे त्यांस, आणि [पर]राष्ट्रांस म्या हें व र्तमान सांगितलें, कीं पश्चात्ताप करावा, आणि देवाकडे फिर तां पश्चात्तापास योग्य [असीं] कामें करावीं॥ २१ ह्यांमुळें यहूदी मला देवळांत धरून हातानी वधायास झटले॥ २२ मी तर देवाकडून सांभाळ पावून ह्या दिवसापर्यंत उभा आहें। लाहान व थोरहि यांस प्रमाण देत [आलों।] जीं होणा र आहेत, असें भविष्यभाष्यानी व मोश्याने सांगितलें। त्यांवांचून म्या कांहीं सांगितलें नाहीं। २३ [तीं असीं] कीं ख्रीस्ताने सोसा वें। आणि तो मेलेल्यांचा फिरोन उठण्यांत प्रथम होणार। [आ णि] लोकास व [पर]राष्ट्रांस उजेडाचें वर्तमान सांगणार आहे॥ २४ तेव्हां तो हीं तोंडोने सांगत असतां। फेस्तस मोठ्या शब्दाने बोलला, [कीं] हे पाऊलसा। तूं वेडा आहेस। बहुत विद्यानी तुला वेडेपणांत फिरविलें आहे॥ २५ मग तो ह्मणतो। हे माहाराज फेस्तसा। मी वेडा नाहीं। परंतु सत्यतेच्या व सा वधपणाच्या गोष्टी उच्चारितों॥ २६ कारण कीं ह्यांविषयीं रा जा समजला आहे। आणि मी त्याला उघडें बोलतों। कां तर ह्यांमधील कांहींच त्याविषयीं लपलें नाहीं, असा मला धडा आहे। यास्तव कीं, हें कोंपऱ्यांत घडलें नाहीं॥ २७ हे आग्रीप्पा राजा, तूं भविष्यभाष्यांवर विश्वासतोस कीं काय? तूं विश्वासतोस हें मला कळलें॥ २८ तेव्हां आग्रीप्पाने पा ऊलसाला ह्मटलें। कीं तूं मला ख्रीस्ती व्हावयास थोडसें वि श्वासवितोस॥ २९ तेव्हां पाऊलसाने ह्मटलें, मी देवाला प्रा र्थितों। कीं तूंच केवळ नव्हेस, परंतु जे सर्व आज माझें ऐ कतात। त्यानीहि, केवळ ह्यां बंधनांविरहीत [राहून,] थो डसें आणि फारसें मजसारिखें व्हावें॥

३० तेव्हां त्याने हीं ह्मटल्यावर। राजा व सुभेदार व बेरनीके। आणि जीं त्यांच्या संगतीं बसलीं होतीं। तीं उठ

लों। ३१ आणि येकिकडे जाऊन। येकमेकांसीं बोलतां ह्म
णालों। कीं मरणास किंवा बंधनांस योग्य। असें हा माणुस
कांहीं करीत नाहीं॥ ३२ तेव्हां आग्रीप्पाने फेस्तसाला ह्मट
लें। जर ह्या माणसाने कादूसाराजवळ न्याय मागितला न
सता, तर त्याला सोडायास शक्य असतें ॥

पर्व २७॥ १ मग आह्मी इतालीकडे हाकारले जावे असें
ठरलें गेल्यावर। त्यानी पाऊलसाला, व कित्येक दुसऱ्यां बंदि
वानांस बंद्याच्या पतकावर्चा यूलीयस नांवें शताधीश। या
च्या स्वाधीन केलें॥ २ तेव्हां आह्मी आद्रामूत्ती तारवावर
चढलों। [आणि] आशींतील कित्येक ठिकाणांवरून तारूं नेणार
असून, माकेदनींतल्या थेसूसालनिकेचा आरीस्तार्खस आमच्या
संगतीं असतां, आह्मी निघालों। ३ मग दुसऱ्या [दिवसीं]
आह्मी सीदोनास पावलों॥ तेव्हां यूलीयसाने पाऊलसाला मनु
ष्यसभ्यतेने वर्त्तिवाटितां। [त्याला] मित्रांजवळ जाऊन सांभा
ळ पावुं दिल्हा॥ ४ मग तेथून निघाल्यावर वारे समोरचे
होते। यास्तव आह्मी कूप्रसाखालीं हाकारून गेलों॥ ५ नंतर
आह्मी किलिकी व पांफुली यांच्या जवळल्या समुद्रावरून हाकारू
न लुकींतल्या मुऱ्यांत पोंहचलों॥ ६ आणि तेथे आलेक्षांद्रीं
चेंच तारूं। [जें] इतालीस हाकारलें जाणार, तें शताधीशाला
मिळाल्यावर। त्याने आह्मास त्यावर चढविलें॥ ७ परंतु आह्मी
कित्येक दिवसानी मंद गमन केल्यावर। वारा आह्मास पावुं दे
त नसतां। कनिदसासमोर श्रमाने पोंहचून। आह्मी साल
मोनेच्या समोर क्रेतेखालीं हाकारून गेलों॥ ८ तेव्हां तिला श्र
माने वल्हांडून। सुंदर बंदर ह्मटलेली येक जागा। जिच्या जवळ
लासाई नगर होतें। तेथे आलों ॥ ९ मग बहुत वेळ गेला
असतां आणि तितक्यांत उपास टळला। यास्तव तेव्हां तारवाने
जाणें हें विघ्नकारी असतां, पाऊलस त्यांस निषेधीत बोलला।
१० अहो माणसें। हानी व बहुत अनहीत। भार व तारूं यांचीं
केवळ नव्हेत। परंतु आमच्यां जिवांचींहि। असानी ही वणज होईल।

असें मी पाहातों॥ ११ तथापि पाऊलसाने जों ह्मटलों। त्यां पेक्षां तांडेल व तारवाचा धनी यांच्यावर शताधीश विश्वासला॥ १२ आणि तें बंदर हिंवाळ्यांत राहाण्याजोगें नव्हतें। यास्तव बहुतांनी बेत केला कीं तेथून निघावें। आणि कसेंहि साध्य अस ल्यास फैनिकेस पावून हिंवाळ्यांत राहावें। [तो] क्रेतेंतील येक बंदर। याचें तोंड नैऋत्यदिशेस व वायव्यदिशेस आहे॥ १३ तेव्हां दक्षिणवारा मंद वाहात असतां। ते योजना साधिली असें कल्पितां। काढून क्रेतेच्या जवळच गेले॥ १४ परंतु फार अंतर न [पडतां] तिच्या विरुद्ध वादळी वा रा जो युरक्लुदोन ह्मटलेला। तो सुटला॥ १५ तेव्हां तारूं अ डलें असतां। आणि वाऱ्यासमोर टिकायास समर्थ नसतां। आह्मी [त्याला] सोडून देऊन। धकावले गेलों॥ १६ मग ये क बेट क्लाउदी ह्मटलेलें। त्याच्या खालीं धांवल्यावर, आह्मी होडी राखायास कष्टानें समर्थ जालों। १७ ती उचलून घेतल्या वर। तारवाच्या खालीं तरविणीं बांधून लाविलीं। आणि ते भा टावर पडायाचें भय धरीत असतां। शीड उतरून तसेंच धकाव ले गेले॥ १८ तेव्हां आह्मास फार वादळ लागत असतां, दुस ऱ्या [दिवशीं] त्यांनी उपसणें केलें। १९ आणि तिसऱ्या [दिवशीं] आह्मी स्वहातानी तारवाचें साहित्य टाकिलें॥ २० तेव्हां सू र्य व तारेहि बहुत दिवसांपावेतों प्रकाशीत नसतां। आणि थोडें नव्हे असें वादळ लागत असतां। शेवटीं आमची तरा याची सगळी आशा हरली गेली॥ २१ तेव्हां फार उपास जाल्यावर, पाऊलस त्यांमध्यें उभा राहून बोलला। अहो माणसें। तुह्मी माझ्या बोधास मानायाचें होतें। क्रेतेपासून निघायाचें नव्हतें। ह्मणजे ही हानी व अनहीत वांचवायाचीं होतीं। असें पाहिजे होतें खरें। २२ तथापि तुह्मी आतां स्वस्थचित्त व्हावें। हें बरें असें मी तुह्माजवळ सांगतों। कां कीं तुमच्या जिवाचें कांहीं हरण होणार नाहीं। केवळ तारवाचें। २३ कां कीं ज्या देवाचा मी आहें। आणि ज्याची सेवा मी

करितों। त्याचा दूत या रात्रीं माझ्याजवळ उभा राहून।
२४ बोलला। हे पाउलसा, भिऊं नको, तुला कैसाराजवळ
उभें राहिलें पाहिजे। आणि पाहा। सर्व जे तारवांत तुझ्या
संगतीं जातात। ते देवानें तुला कृपेनें दिल्हे आहेत॥ २५ या
स्तव अहो माणसें। स्वस्थचित्त व्हा। कां तर मी देवाव
र विश्वासतों; कीं ज्याप्रमाणे मला ह्मटलें त्याप्रमाणे होई
ल॥ २६ तथापि आह्मास येका बेटावर पडावें लागतें॥
२७ मग चवदावी रात्र जाल्यावर, आह्मी हाद्रीयांत आर
पार धकावले जात असतां, सुमारें मध्यरात्रीं तारूंकरीं
उमजलें कीं आपणास कोणी देश आढळणार आहे। २८ ते
व्हां लंबक टाकून वीस वांवा [पाणी] सांपडलें। मग कांहीं
पुढें जाऊन आणि फिरोन लंबक टाकून पंधरा वांवा सांप
डलें॥ २९ तेव्हां आपण कदाचित खडकाळठिकाणावर आद
ळूं असें भीत असतां। त्यांनी वरामावरून चार नांगर टाकून।
दिवस व्हावा। ह्मणोन इच्छिलें॥ ३० तेव्हां तारूंकऱ्यांनी तारवां
तून पळायास यत्न केला, आणि आपण नाळेवरून नांगरांस
सोडणार या मिषानें होडी समुद्रांत उतरिली। यास्तव ३१ पा
ऊलसानें शताधीशाला व सैनिकांस ह्मटलें। जर हे तारवांत
राहात नाहींत। तर तुमच्यानें तारलें जाववत नाहीं॥ ३२ ते
व्हां सैनिकांनी होडिचे दोर कापिले, आणि तिला पडूं दिल्हें॥
३३ मग दिवस उगवूं लागणार असतां। त्यां सर्वांनी अन्न
खावें। ह्मणोन पाऊलसानें त्यासीं विनंती करीत ह्मटलें।
[कीं] आज चवदाव्या दिवसीं तुह्मी वाट पाहात असतां कां
हीं न खातां उपासी राहिलां आहां। ३४ यासाठीं तुह्मी
अन्न खावें ह्मणोन मी विनंती करितों। कारण कीं हें तुम
च्या तारणासाठीं आहे। आणखी तुह्मामधून कोणाच्या डो
क्यापासून येक केंस पडणार नाहीं॥ ३५ मग त्यानें हीं
बोलून। आणि भाकर घेऊन, त्या अवघ्यांसमोर देवाची आभार
स्तुती केली। मग तो [ती] मोडून खाऊं लागला॥ ३६ तेव्हां

सर्व स्वस्थचित्त होऊन आपणहि अन्न घेतलें॥ ३७ तेव्हां अवघे जे जीव तारवांत। ते आह्मी दोनशें शाहात्तर होतों॥ ३८ आणि अन्नाने तृप्त जाल्यावर। त्यानी गहूं समुद्रांत टाकून। तारूं हलकें केलें॥ ३९ नंतर दिवस उगवल्यावर। त्यानी ती भूमी वोळखिली नाहीं। परंतु कोणी खोंची। जिला सपाट तीर होतें, ती पाहिली। म्हणी शक्यास त्यानी तींत तारूं घालावयास योजिलें॥ ४० तेव्हां चहूंकडे नांगरांस काढून [तारूं] समुद्राच्या स्वाधीन केलें। आणखी सुकाणांचीं बंधनें सोडून। आणि मोठें शीड वाऱ्याकडे उभारून। सपाट तीराजवळ ते जाते जाले॥ ४१ मग दोहों समुद्रसंगमाच्या ठिकाणीं पडून। तारवाला भूमीस लागविलें। आणि नाळ रुपली असतां। अचळ राहिली खरें। परंतु वराम लाटांच्या बळाने फुटलें गेलें॥ ४२ तेव्हां सैनिकांचा बेत असा जाला। कीं बंदिवानांस जिवें मारावें। नाहीं तर कोणी पोंहून पळेल॥ ४३ परंतु शताधीशाने पाऊलसाला वांचवायास योजून। त्यांस बेताविषयीं अडविलें। आणि ज्यांस पोंहतां येत होतें। त्यांस आज्ञा दिल्ही। कीं प्रथम तुह्मी समुद्रांत उड्या टाकून। तिरास जा॥ ४४ मग जे उरले। ते तुह्मी कित्येक फळ्यांवर आणि कित्येक तारवांतील जों कांहीं। त्यांवर [जा॥] तर असें जालें। कीं तिरास सर्व सुरक्षीत पावले ※

पर्व २८॥ १ आणि ते सुरक्षीत पावल्यावर समजले। कीं तें बेट मेलिते ह्मटलेलें आहे॥ २ तेव्हां त्या अन्यदेशस्थानी आह्मावर सामान्य नाहीं। अशी मनुष्यरूपें प्रीति केली। कां तर लागलेला पाऊसाळा व हिंवाळा। यांसाठीं त्यानी धगाटा पेटवून, आह्मा अवघ्यांचा अंगिकार केला॥ ३ तेव्हां पाऊलसाने कवळभर काडकें गोळा करून धगाट्यावर ठेविल्यानंतर। उष्णतेंतून सापाने निघून त्याच्या हाताला वेंटाळिलें॥ ४ तेव्हां ते अन्यदेशस्थ तें किरडुं त्याच्या हाताला लोंबलेलें पाहून। येकमेकांशीं बोलले। हा माणुस निश्चयें घातक

आहे । तो समुद्रापासून वांचविला असतां । त्याला न्याय
जगुं देत नाहीं ॥ ५ त्याने तरीं किरडुं अग्नींत झटकल्या
वर । कांहीं वाईट सोसिलें नाहीं ॥ ६ परंतु तो सुजेल । अ
थवा अकस्मात मेलेला खालीं पडेल । असें त्यांनी त्याची वा
ट पाहिली । परंतु ते फार [वेळ] वाट पाहातां । आणि त्या
ला कांहीं असंगत न जालें असें पाहात असतां । निराळें क
ल्पितां बोलले । कीं तो देव आहे ॥ ७ तेव्हां त्या बेटाचा
अग्रणी नांवें पब्लियस । याचीं ठिकाणें त्या स्थानाच्या भोंव
तीं त्यांमध्यें होतीं । याने आह्मांस अंगिकारून तीन दिव
स मित्रबुद्धीने आमचें आतिथ्य केलें ॥ ८ तेव्हां असें जालें ।
कीं पब्लियसाचा बाप । तो ताप व आंवरक्त यांकडून पिडलेला
होऊन निजला होता । त्याच्या जवळ पाऊलसाने आंत जाऊन
व प्रार्थना करून । [आपले] हात त्याजवर ठेवून त्याला निरोगी
केलें ॥ ९ यास्तव हें जाल्यावर बेटांत दुसरेहि ज्यांस रोग
होते । ते जवळ आले । आणि निरोगी केले गेले ॥ १० तेव्हां
त्यांनी बहुत सन्मानांकडून आमचा सन्मान केला । आणि । आ
ह्मी निघत असतां । जीं अगत्याचीं तीं भरून दिल्हीं ※

११ आणि तीन महिन्यांनंतर आलेक्षांद्रींतील [येक]
तारूं जें हिंवाळ्यांत त्या बेटीं राहिलें होतें । ज्याची खूण द
यस्कुरै होती । त्यावर आह्मी निघालों ॥ १२ मग सुराकु
सास पोंहचून । आह्मी तेथें तीन दिवस राहिलों ॥ १३ ते
थून घेऱ्याने येऊन । रेगयनास पावलों । आणि येका दि
वसानंतर दक्षिणवारा सुटला असतां । दुसऱ्या [दिवशीं]
पतयलैंत आलों ॥ १४ तेथें आह्मांस भाऊ सांपडून आह्मी
सात दिवस त्यांच्या जवळ राहावें । ह्मणोन त्यांकडून विनंती
पावलों । आणि असें आह्मी रोमेकडे आलों ॥ १५ मग ते
थून भाऊ आह्माविषयीं ऐकून । आमच्या भेटीसाठीं । आप्पयो
फरम व तीन धर्मशाळा तेथपर्यंत । बाहेर आले । यांस पाऊ
लसाने पाहिल्यावर । देवाचा आभार स्तुती करून धीर धरिला ※

१६ नंतर आह्मी रोमेंत आल्यावर, शताधीशाने बंदिवानांस सेनापतीच्या स्वाधीन केलें। परंतु पाऊलसाला, ज्या सैनिकाने त्याला राखिलें। त्यासुद्धीत आपल्यासीं राहूं दिल्हें होतें॥ १७ तेव्हां तीन दिवसांनंतर असें जालें। कीं पाऊलसाने, यहूद्यांमधील जे श्रेष्ठ होते। त्यांस येकत्र बोलाविलें। आणि ते मिळाल्यावर तो त्यांस बोलला। अहो भाऊमाणसें। लोकांविरुद्ध, अथवा आमच्यां पूर्वजोरीतींविरुद्ध। म्या कांहीं च केलें नसतां। यरूशलेमापासून रोम्यांच्या हातीं मी बंदिवान सोपिला गेलों॥ १८ त्यानी माझा निवाडा करून। मजकडे मरणाचें कारण कांहीं नव्हतें। यास्तव मला सोडायास पाहिलें॥ १९ परंतु यहूदी विरुद्ध बोलत असतां। कायसाराजवळ न्याय मागणें, हें मला अगत्य जालें होतें। मला आपल्या देशावर कांहीं आरोप आणायाचा आहे। असें नाहीं। २० या कारणास्तव तर म्या तुह्मास। पाहायासाठीं आणि [तुह्मासीं] ह्मणायासाठीं। बोलाविलें आहे। कां कीं इस्राएलाच्या आशेकरितां। मी ह्या सांखळीने बांधला आहें॥ २१ तेव्हां ते त्याला बोलले। [कीं] आह्मास तुजविषयीं यहूदाहून पत्रें पावलीं नाहींत। आणखी भावांतील कोणी येऊन तुजविषयीं वर्तमान आणिलें, अथवा कांहीं वाईट सांगितलें। असें नाहीं॥ २२ परंतु तुझ्या बुद्धींत काय। हें तुजपासून ऐकायास आह्मास योग्य वाटतें। यास्तव कीं हें मत सर्वत्र अपवादीत आहे। हें त्याविषयीं आह्मास कळलें खरें॥ २३ तेव्हां त्यानी त्यासीं दिवस नेमल्यावर, बहुत त्याच्या जवळ बिऱ्हाडीं आले। त्यांसीं त्याने देवाच्या राज्याविषयीं प्रमाण देतां। आणि मोश्याचें नेमशास्त्र व भविष्यभाषी यांहून येशूविषयीं जों तीं त्यांसीं विश्वासवितां, सकाळापासून सांजपर्यंत फोडून सांगितलें॥ २४ तेव्हां जीं ह्मटलीं। त्यांवर कित्येक विश्वासविले गेले खरें। परंतु कित्येक विश्वासले नाहींत॥ २५ तेव्हां ते आपल्यांसीं असंगत होऊन, सुटून जात असतां, पाऊलसाने

येक गोष्ट ह्मटली, कीं पवित्र आत्म्याने यशाया भविष्यभा
ष्यकाडून आमच्यां पूर्वजांजवळ ठीक सांगितलें। २६ कीं
तूं ह्या लोकांजवळ जाऊन [असें] बोल। तुह्मी ऐकण्याने ऐका
ल, परंतु न समजाल। आणि पाहातांना पाहाल, परंतु न
जाणाल। २७ कारण कीं या लोकाचें हृदय जड जालें, आणि
कानानी ते मंद ऐकतात। आणि त्यानी आपले डोळे मिट
ले आहेत, नाहीं तर कदाचित ते डोळ्यानी पाहातील। आ
णि कानानी ऐकतील। आणि हृदयाने समजतील। आणि फि
रतील। आणि मी त्यांस निरोगी करीन॥ २८ यास्तव तु
ह्मास कळलें जावें। कीं देवाकडलें तारण हें [अन्य] देशस्थांसीं पा
ठविलें आहे। आणि ते ऐकतील॥ २९ तेव्हां त्याने हीं ह्म
टल्यावर। यहूदी आपणांमध्यें बहुत विवाद करीत असतां
निघाले ※

३० परंतु पाऊलस। आपल्या भाड्याच्या बिहाडीं। पूर्ण दो
न वर्षें राहिला। आणि जीं त्याच्या जवळ आलीं, त्यां अव
घ्यांस त्याने अंगिकारून, ३१ अगदी उघडेपणाने। [व] म
ना न पावल्याने, देवाचें राज्य गाजवितां। प्रभूयेशू ख्रीस्ता
विषयीं जीं तीं उपदेशिलीं होतीं ※

रोमेकरांस पत्र ॥

पर्व १ ॥ ७। १ देवाचे प्रिय। पवित्र ह्मटलेले , जे रोमें
त आहेत। त्यां अवघ्यांस। येशू ख्रीस्ताचा सेवक पाऊलस [लि
हितो। तो] प्रेषीत ह्मटलेला , देवाच्या सुवर्तमानाकरितां वेग
ळा केलेला [आहे।] २ तें [सुवर्तमान] ह्याने आपल्यां भविष्य
भाष्यांकडून पवित्र धर्मलेखांमध्यें पूर्वीं भाकिलें होतें। ३ तें त्या
च्या पुत्रसंबंधी [आहे।] हा देहाविषयीं दाविदाच्या विजां
तील जाला। ४ [आणि] मेलेल्यांतून पुनर्ह्याउठण्यावरून पवि
त्रपणाच्या आत्म्याकडून सामर्थ्याने देवाचा पुत्र ओळखिला।
[तोच] आमचा प्रभू येशू ख्रीस्त। ५ ह्याकडून आह्मी कृपा
व प्रेषितपण याच्या नांवामुळें सर्व राष्ट्रांमध्यें विश्वासाला मानण्या
साठीं पावलों आहों। ६ त्यांमध्यें तुह्मीहि येशू ख्रीस्ताचे ह्म
टलेले आहां ॥ ७ देव आमचा बाप यापासून। व प्रभू येशू
ख्रीस्त यापासून , कृपा व समाधान तुह्मास [असो ॥]

८ तर प्रथम। तुमच्या विश्वासाचें वर्तमान संपूर्ण ज
गांत सांगितलें आहे, यास्तव तुह्मा सर्वांमुळें मी येशू ख्री
स्ताकडून आपल्या देवाशीं आभारस्तुती करितों ॥ ९ कां कीं
देव। ज्याची सेवा मी आपल्या आत्म्याने त्याच्या पुत्राच्या सु
वर्तमानाकडून करितों, तो माझा साक्षी आहे। कीं मी कसें
अखंड तुमची आठवण करितों। २० [आणि] सर्वदां माझ्यां
प्रार्थनांमध्यें असें प्रार्थितों, कीं म्या आतां कधीं देवाच्या इच्छेने
तुह्माकडे यावयास सुवाट पावावी॥ ११ कां तर तु
ह्मास पाहायास मी आसावतों। कीं तुह्मी स्थिरावले जावयासाठीं।
म्या तुह्मास कांहीं आत्मवान दान वांटून द्यावें॥ १२ आ

णि तें हेंच आहे, कीं परस्परें तुमच्या व माझ्याहि विश्वा साकडून, म्या तुह्मासहीत संबोधिलें जावें॥ १३ आणि अ हो भाऊ। जसें इतर राष्ट्रांमध्यें। तसेंहि तुह्मामध्यें म ला कांहीं फळ व्हावें। ह्मणोन म्या बहुत वेळा। तुह्माकडे ये ण्याचा बेत केला। परंतु आतांपावेतों मी अडविला गेलों। हें तुह्मास न कळावें। असें मी इच्छीत नाहीं॥ १४ मी हे लास्यांचा व अन्यदेशस्थांचाहि। ज्ञान्यांचा व अज्ञान्यांचाहि, ऋणी आहें॥ १५ असें। जे रोमेंत त्यां तुह्मासहि सुवर्तमा न सांगायास मी आपल्याप्रमाणे आवेशी आहें॥ १६ कां तर ख्रीस्ताच्या सुवर्तमानाविषयीं मी लाजत नाहीं। या स्तव कीं तें प्रथम यहूद्याच्या। नंतर हेल्लास्याच्याहि। [अशा] प्रत्येक विश्वासणाऱ्याच्या तारणासाठीं देवाचें सामर्थ्य आहे। १७ कारण कीं त्यांत देवाचें पुण्य विश्वासापासून विश्वासासाठीं प्र गट केलें आहे। जसें लिहिलेलें तसें। कीं जो पुण्यवान। तो विश्वासाकडून वांचेल ॐ

१८ आणखी जीं माणसें अन्यायानें सत्यता वाळगिता त, त्यांच्या सर्व अभक्तीवर व अन्यायावर देवाचा राग आकाशांतून प्रगट केला आहे॥ १९ यास्तव कीं देवाविष यीं जें जाणायाचें, तें त्यांस प्रसिद्ध आहे। कां तर देवा नें त्यांसीं प्रसिद्ध केलें आहे॥ २० कारण कीं त्याचीं जीं अदृश्य, ह्मणजे त्याची अनादी शक्ती व देवपण, हीं नि र्मिलेलीं जीं त्यांकडून जाणलेलीं असतां। जगाच्या उत्पत्तीपासून स्पष्ट दिसतात। ह्यावरून ते अनुत्तर आहेत॥ २१ कां तर त्यांनी देवाला जाणून। त्याला जसें देवास तसें गौरविलें नाहीं। आणि आभारस्तुती केली नाहीं। परंतु त्यांच्या विचारांत ते व्यर्थ जाले, आणि त्यांचें अबुद्ध हृदय काळोखमय जा लें॥ २२ आपण ज्ञानी आहों। असें ह्मणतां मूर्ख जाले॥ २३ आणि त्यांनी अनाशवंत देवाच्या गौरवाला नाशवंत माणसाचों व पांखरांचों, व चतुष्पदांचों, व वळवळणाऱ्यांचों

आकारमूर्ति असें पालटिलें आहे ॥ २४ आणि यावरून देवानें
त्यांस। त्यांच्या हृदयांतील आभिलाषांनी त्यांचीं शरीरें आ
पणांमध्यें अपमानायास, नासकेपणाच्या स्वाधीन केलें ॥ २५ त्या
नी देवाच्या सत्यतेला खोटेंपणांत पालटिलें। आणि उत्पन्न
करणारा, जो सर्वकाळांपर्यंत स्तुतीमान्य, आमेन। त्यापेक्षां
उत्पत्तीचें भजन व सेवा केली ॥ २६ ह्यासाठीं देवानें त्यां
स अमान्य चेतनांच्या स्वाधीन केलें। कां तर त्यांतल्या स्त्रिया
नींहि प्रकृतीरूपव्यव्हाराला प्रकृतीविरुद्ध असें पालटिलें।
२७ आणि तसें पुरुषहि स्त्रिचा प्रकृतीव्यव्हार सो
डून। पुरुष पुरुषांसीं लज्जितपण आचरतां येकमेकांसीं आ
पल्या हांवेनें जळत होते। आणि आपल्या चुकण्याची जी यो
ग्य फेड होती। ती आपणांमध्यें भरून पावले॥ २८ आणि
देवाला वोळखींत राखणें हें जसें त्यांस न आवडलें। तसें
देवानें त्यांस, जीं संगत नाहींत तीं करायाला। अव्हेरलेल्या
बुद्धींत सोडून दिल्हें॥ २९ सर्व अन्याय, शिंदळकी। वाइटप
ण। लोभ। दुष्टपण, यांकडून ते भरलेले [होते।] हेवा, हत्या,
भांडण। कपट। दुर्व्यवहार। ह्यांकडून भरीव। ते पिशून;
३० निंदणारे, देवाचे द्वेष्टे। गांजणारे। अहंकारी, आपनांवा
ज्ये। वाईट अस्या युक्तीकाढणारे। आईबापांसीं अनमान
करणारे, ३१ निर्बुद्धी। करारमोडणारे। गोत्रप्रीतिहीन।
अशमक। निर्दय। ३२ ते देवाचा न्याय जाणतात। कीं
जे असीं आचरतात ते मरणास योग्य आहेत। तथापि तीं
च केवळ करीत नाहींत। परंतु जे तींच आचरतात, त्यां
सहित त्यांचा फार संतोष आहे ※

पर्व २ ॥ १ यास्तव अरे माणसा। जो कोणी न्याय ठरवि
तो, तो तूं अनुत्तर आहेस। कां तर ज्याविषयीं तूं दुसऱ्याचा
न्याय ठरवितोस। त्यांत तूं आपल्यावर अन्याय ठरवितोस।
कां कीं तूं न्यायठरविणारा तींच आचरतोस॥ २ आणि जे
असीं आचरतात। त्यांवर देवाचा न्याय सत्यतेप्रमाणें आहे। हें

आह्मास कळलें ॥ ३ तर अरे माणसा। जे असीं आचरतात त्यांचा न्याय तूं ठरवितांना तोंच करितोस। तूं देवाचा न्याय चुकसील। हें कल्पितोस काय? ४ अथवा। देवाचें उपकारीकपण तुला पश्चात्तापाकडे नेतें। हें तूं न जाणून। त्याचें उपकारिकपण। व सहनता। व क्षमापण। यांची संपत्ती धिःकारितोस कीं काय? ५ आणि आपलें कठोणपण। व अपश्चात्तापी हृदय। यांप्रमाणे शापल्यासाठीं क्रोधाच्या दिवसांतील। व देवाकडचा यथार्थ न्याय प्रगटण्याच्या [दिवसांतील] क्रोध सांठवितोस काय? ६ तो प्रत्येकाला। त्याच्यां त्याच्यां कामांप्रमाणे। फेड देईल॥ ७ जे चांगल्या करण्यांत त्या टिकण्याकडून। गौरव। व सन्मान। व अविनाश, ह्यांस शोधितात। त्यांस सर्वकाळ जिवन [देईल] खरें। ८ परंतु जे भांडखोर [आहेत।] आणि सत्यता मानितच नाहींत। पण अन्याय मानितात, त्यांवर फुरण व क्रोध [देईल।] ९ वाईट करणारा मनुष्य। प्रथम यहूदी नंतर हेलासोहि। ह्या प्रत्येक जिवाला संकट व संकोचन [देईल।] १० परंतु प्रत्येक चांगलें करणाऱ्याला। प्रथम यहूद्याला नंतर हेलाख्यालाहि। गौरव। व सन्मान। व समाधान [देईल॥] ११ कां तर देवापासीं पक्षपात नाहीं॥ १२ यास्तव कीं शास्त्रहीन जितक्यानी पाप केलें। तितके शास्त्रहीन नाश पावतील। आणि जितक्यानी शास्त्रासहीत पाप केलें, तितके शास्त्राकडून अन्यायी ठरविले जातील॥ १३ कां तर शास्त्राचे ऐकणारे। ते देवापासीं न्यायी नव्हेत। परंतु शास्त्र पाळणारे न्यायी ठरविले जातील॥ १४ कारण कीं ज्यां राष्ट्रांस शास्त्र नाहीं। ते जेव्हां स्वभावाने शास्त्रांतील जीं तीं पाळितात। तेव्हां त्यांस शास्त्र नसतां। ते आपणांस शास्त्र आहेत॥ १५ असें जे ते शास्त्राचें काम आपल्यां हृदयांमध्यें लिहिलेलें दाखवितात। त्यांचा भाव संगती प्रमाण देतो। आणि त्याच काळीं [त्यांचे] विवेक परस्परें दोष लावितात। अथवा तोड काढितात॥ १६ त्या दिवसीं [न्याय होईल।]

जेव्हां देव। माझ्या सुवर्तमानाप्रमाणे। येशू ख्रीस्ताकडून, मा णसांच्या गोष्ट्यांचा न्याय ठरवील तेव्हां ※ १७ पाहा। तूं यहूदी ह्मटलेला आहेस। आणि शास्त्रावर टेंकतोस, आणि देवाविषयीं नांवाजून घेतोस। १८ [त्याची] इच्छाहि जाणतो स। आणि शास्त्रांतून शिकविलेला असतां। वेगळाल्यांस पार खतोस॥ १९। २० आणि तुला भंवसा आहे। कीं आपणा ला शास्त्रांत ज्ञानाचें व सत्यतेचें स्वरूप असतां। आपण आं धळ्यांचा वाटाड्या आहें। जे काळोखांत त्यांस उजेड। अज्ञा न्यांचा शिकविणारा। व बाळकांचा उपदेशक आहें। २१ तर तूं दुसऱ्याचा उपदेशणारा। आपणाला उपदेशीत नाहींस कीं का य? चोरी न करावी, असें तूं गाजवितां। चोरितोस कीं का य? २२ व्यभिचार न करावा, असें सांगतां व्यभिचार करि तोस कीं काय? मूर्ती तुला उमळवीत असतां, तूं धर्मादा यांस लुटतोस कीं काय? २३ जो तूं शास्त्राविषयीं नांवाजू न घेतोस। तो तूं शास्त्र उल्लंघण्याने देवाला अपमानितोस कीं काय? २४ कां तर जसें लिहिलेलें, तसें तुह्माकडून दे वाचें नांव राष्ट्रांमध्यें निंदिलें आहे॥ २५ तरीं जर तूं शास्त्र आ चरतोस। तर सुंता उपयोगी आहे खरें। परंतु जर तूं शा स्त्राचा उल्लंघणारा आहेस। तर तुझी सुंता असुंता झाली आहे? २६ यास्तव असुंती जर शास्त्राच्या नीति पाळितो। त र त्याची जी असुंता। ती सुंता असी मोजली जाणार नाहीं कीं काय? २७ आणि प्रकृतीचें असुंतीपण। तें। शास्त्र पाळी त असतां। तुला। ह्मणजे अक्षर व सुंता यांकडून शास्त्राचा उल्लंघणारा। याला अन्यायी ठरविणार नाहीं कीं काय? २८ कां तर जो दिसण्यांत [यहूदी,] तो यहूदी नव्हे। आ णि जी दिसण्याने, मासांत, ती सुंता नव्हे। २९ परंतु जो गु प्तांत। तो यहूदी [आहे।] आणि सुंता हृदयाची, [व] आ त्म्यांत [आहे।] अक्षरांत नाहीं। इची स्तुती माणसांपासून नव्हे। परंतु देवापासून ※

पर्व ३॥ १ तर यहूद्याची विशेषता काय? अथवा सुंते
चा उपयोग काय? २ सर्वप्रकारें फार। विशेषें तर देवा
चीं वाक्यें त्यांच्या विश्वासावर ठेविलीं होतीं यास्तव। ३ का
रण कीं जरीं कित्येक विश्वासले नव्हते। तर काय? त्यांचा अ
विश्वास देवाच्या विश्वासाला निरर्थ करील कीं काय? ४ अ
सें होववत नाहीं। देव खराच असो। आणि प्रत्येक माणुस
लबाड [असो।] जसें लिहिलेलें तसें। ह्मणजे त्वां आपल्यां वा
क्यांत न्यायी ठरविला जावा। आणि तुझा न्याय ठरविला जा
ण्यांत त्वां जिंकावें॥ ५ आणि जर आमचा अन्याय देवाच्या
न्यायाला पटवितो। तर आह्मी काय बोलूं? देव क्रोध ला
वितो। तो अन्यायी कीं काय? मी माणसासारिखें बोलतों।
६ त्याच्याने [तसा] होववत नाहीं। असता तर देव जगाचा न्याय
कसा ठरवील? ७ आणखी जर देवाच्या खरेपणाने माझ्या खो
टेपणाकडून त्याच्या गौरवाला फार वाढविलें। तर अद्यापि
मी पापी असा कां ठरविला जातों? ८ आणि हें कां ना
हीं? कीं बरीं प्राप्त व्हावीं ह्मणोन वाईट जीं तीं करूं।
तसें आह्मी निंदिले जातों, ह्मणजे आह्मी तसें बोलतों। असें
कित्येक ह्मणतात। त्यांचा दंड न्यायाने आहे॥ ९ तर का
य? आह्मी [त्यांहून] उत्कृष्ट मोजले जातों कीं काय? अ
गदी नाहीं। कारण कीं यहूदी व हेल्लासोहि सर्व पापाखा
लीं आहेत, हें आह्मी आगोधर प्रमाण केलें आहे। १० ज
सें लिहिलेलें तसें, कीं [कोणी] न्यायी नाहीं, येकहि ना
हीं। ११ जो समजतो, असा [कोणी] नाहीं, जो देवाचा
शोध काढितो। असा [कोणी] नाहीं। सर्वांनी मार्ग सोडला।
१२ ते येकसारिखे निरुपयोगी जाले। उत्तम करणारा ना
हीं। येक देखील नाहीं॥ १३ त्यांचा गळा उघडलेलें प्रेतपे
व [आहे।] त्यांनी आपल्यां जिभांनी कपट केलें। त्यांच्यां ओं
ठांत सर्पांचें वीष [आहे॥] १४ त्यांचें तोंड शापाने व कडूप
णाने भरलें आहे॥ १५ रक्त पाडायास त्यांचे पाय वेगवा

न [आहेत॥] १६ त्यांच्यां मार्गामध्यें संव्हार, व क्लेश [आ
हे॥] १७ आणि त्यांनी समाधानाचा मार्ग जाणला नाहीं॥
१८ त्यांच्या डोळ्यांपुढें देवाचें भय नाहीं॥ १९ तर आ
ह्मी जाणतों; कीं शास्त्र जितकीं ह्मणतें तितकीं शास्त्रवाल्यां
स ह्मणतें, असें कीं प्रत्येक तोंड कोंडलें जावें। आणि सर्व
जग देवाजवळ दंड्य असें व्हावें॥ २० यास्तव त्यासमोर।
कोणी मांसमय शास्त्रकर्मांकडून पुण्यवान ठरविलें जाणार ना
हीं। कारण कीं शास्त्राकडून पापाची वोळख [आहे॥]

२१ परंतु आतां शास्त्राविरहित देवाचें पुण्य दाखविलें
आहे। नेमशास्त्राकडून व भविष्यभाष्यांकडून प्रमाणलेलें [आहे।]
२२ ह्मणजे येशू ख्रीस्तावर्च्या विश्वासाकडून देवाचें पुण्य। [तें]
सर्वांसाठीं। आणि सर्व विश्वासणाऱ्यांस प्राप्त [आहे।] कां तर भेद
नाहीं॥ २३ कारण कीं सर्व पापी जाले, आणि देवाच्या गौर
वाविषयीं उणे जाले आहेत॥ २४ त्याच्या कृपेने फुका पुण्यवान
मोजलेले [आहेत।] येशू ख्रीस्ताकडून जी खंडणी तिजमुळें। २५।
२६ ह्याला याच्या रक्तपातावरल्या विश्वासाकडून प्रायश्चित्त [अ
सें] देवाने [लोकां]पुढें ठेविलें आहे। [हें।] देवाच्या सहनतेने
पूर्वीं जालेल्यां पापांची सूट। दृजकडून त्याचें पुण्य दाखविण्यासा
ठीं आहे। [ह्मणजे] सध्यां काळीं त्याचें पुण्य असें दाखविण्यासा-
ठीं कीं तो। येशूवर्च्या विश्वासांतल्यास पुण्यवान मोजतांना। पुण्य
वान व्हावा॥ २७ तर नांवाजून घेणे हें कोठे? घालवि
लें आहे। कोणत्या शास्त्राकडून? कर्मांच्या? नव्हे, परंतु विश्वासा
च्या शास्त्राकडून॥ २८ यास्तव आह्मी असें मोजितों। कीं माणुस
शास्त्रकर्मांवांचून, विश्वासाने पुण्यवान ठरविला जातो॥ २९ देव के
वळ यहूद्यांचा कीं काय? राष्ट्रांचाहि नाहीं कीं काय? होय, रा
ष्ट्रांचाहि। ३० अस्यावरून कीं जो सुंत्यांस विश्वासाने। आणि अ
सुंत्यांस विश्वासाकडून। पुण्यवान ठरवितो। तो येक देव [आहे॥]
३१ तर आह्मी विश्वासाकडून शास्त्र निरर्थ करितों कीं का
य? असें होववत नाहीं। परंतु आह्मी शास्त्र स्थापितों॥

पर्व ४॥ १ तर आमचा पूर्वज आब्राहाम याला देहावि षयीं काय मिळालें ह्मणोन आह्मी बोलूं? २ कां कीं, आब्रा हाम जर कर्मांकडून पुण्यवान ठरविला असतां, तर त्याचें नांवाजून घेणें असेल। परंतु देवाजवळ [असें] नाहीं॥ ३ यास्त व कीं धर्मलेख काय ह्मणतो? तर आब्राहाम देवावर वि श्वासला। आणि तें त्याला पुण्य असें मोजलें गेलें॥ ४ आ तां जो काम करितो, त्याला मोल, हें कृपारूप नव्हे। ऋ णरूपच मोजलें आहे॥ ५ परंतु जो काम न करितांना अ भक्तिवंताला पुण्यवान ठरविणारा यावर विश्वासतो। त्याचा वि श्वास हा, पुण्य असें मोजला जातो॥ ६ याप्रमाणे ज्या मा णसाकडे देव कामांवांचून पुण्य मोजितो। त्या माणसाचें धन्य पण दावीदहि सांगतो। ७ ज्यांचे शास्त्रभंग क्षमा जाले। आणि ज्यांचीं पापें झांकलीं। ते धन्य [आहेत।] ८ प्रभू ज्या माणसाकडें पाप मोजणार नाहींच, तो धन्य॥ ९ तर हें धन्यपण सुंत्या जातीला [केवळ।] किंवा असुंत्या जातीलाहि [प्राप्त होतें] कीं काय? कां तर आह्मी ह्मणतों, कीं वि श्वास हा आब्राहामाला पुण्य असें मोजला गेला। १० तर कसा मोजला? तो सुंती। किंवा असुंती असतां? सुंती ना हीं। परंतु असुंती॥ ११ मग तो सुंताखूण पावला॥ तो अ सुंतीपणांतल्या विश्वासाच्या पुण्याचा ठसा। ह्मणजे असुंतीपणा कडून जे सर्व विश्वासतात त्यांचा तो पूर्वज व्हावा। अशासा ठीं कीं पुण्य त्यांकडेहि मोजलें जावें। १२ आणि तो सुंत्या जा तीचा पूर्वज [व्हावा।] सुंती जे त्यांचा केवळ नव्हे। परंतु आ मच्या आब्राहामपूर्वजाचा असुंतीपणांतील विश्वास याच्यां पाउ लांमध्यें जे चालतात। त्यांचाहि [व्हावा।] १३ कारण कीं तो ज गाचा वतंदार होणार। हें वचन आब्राहामाला। अथवा त्या च्या बीजाला नेमशास्त्राकडून नव्हतें। परंतु विश्वासाच्या पुण्या कडून [होतें॥] १४ कां कीं जर ते नेमशास्त्राकडून वतंदार [होते।] तर विश्वास व्यर्थ जाला। आणि वचन निरर्थ जा

लें आहे ॥ १५ यास्तव कीं नेमशास्त्र क्रोध घडवितें। कां तर जेथे नेमशास्त्र नाहीं। तेथे उल्लंघणेंहि नाहीं ॥
१६ [वतन] ह्यासाठीं विश्वासावरून [आहे।] कीं कृपेकडून [व्हावें।] ह्मणजे वचन अवघ्या बिजाला स्थीर व्हावें। जें नेम शास्त्राकडील त्याला केवळ नव्हे। परंतु आब्राहामाच्या विश्वासा कडील जें त्यालाहि। तो आह्मा सर्वांचा पूर्वज आहे। १७ जसें लिहिलेलें तसें। कीं म्या॰तुला बहुत राष्ट्रांचा पूर्वज केला आ हे। देवाच्या विचारांत [तसें होतें।] हा मेलेल्यांस जीववितो। आणि जीं नाहींत। तीं असल्यासारिखीं ह्मणतो। यावर तो विश्वासला ॥ १८ तो आशेच्या पलिकडल्या आशेवर विश्वासला। असें कीं तो बहुत राष्ट्रांचा पूर्वज जाला। सांगितलेल्याप्रमाणे। [कीं] तुझें बीज तसें होईल। १९ आणि विश्वासांत अबळ नसतां। त्याने आपलें शरीर ध्यानास आणिलें नाहीं। तो सु मारें शंभर वर्षांचा असतां। तितक्यांत तें मेल्या[सारिखें।] आ णि सारेच्या गर्भस्थानाचें मेलेपण हें [ध्यानास आणिलें ना हीं॥] २० आणि देवाच्या वचनाविषयीं त्याने अविश्वासाकडून संशय न धरिला, परंतु विश्वासांत बळकट असतां देवाचें गौरव मानिलें। २१ आणि ज्याने वचन दिल्हें, तो कराया सहि शक्तिमान आहे, असा त्याला पूर्ण निश्चय होता॥ २२ आणि त्यावरून तें त्याचें पुण्य असें मोजलें गेलें॥ २३ तर तें त्याकडे मोजलें। हें केवळ त्याच्या साठीं लि हिलें नाहीं। २४ परंतु आमच्या साठींहि॥ ज्याने आमचा प्रभूयेशूख्रीस्त याला मेलेल्यांमधून उठविलें। त्यावर जे विश्वा सतात त्यां आह्माकडे मोजलें जाईल। २५ तो आमच्या पातकांसाठीं परस्वाधीन केला होता। आणि आह्मी पुण्यवान ठरविले जावयासाठीं फिरोन उठविला गेला ॥

पर्व ५॥ १ यास्तव विश्वासाकडून पुण्यवान ठरविले असतां। आह्मास आमच्या प्रभूयेशूख्रीस्ताकडून देवाजवळ समाधान आहे॥ २ त्याकडूनहि आह्मास। ज्या कृपेने आह्मी॰उभे रा

दिलों तिजकरितां, विश्वासाने शरणाभय आहे। आणि आह्मी देवाच्या गौरवाच्या आशेवरून आनंदतों॥ ३ आणि [असें] केवळ नव्हे। परंतु आह्मी संकटांमध्येंहि आनंदतों। हें कळलें असतां। कीं संकट सहनतेस घडवितें। ४ आणि सहनता अनुभवास। आणि अनुभव आशेस [घडविता।] ५ आणि आशा लाजवीत नाहीं। कारण कीं जो पवित्रआत्मा आह्मास दिल्हा। त्याकडून देवाची प्रीति आमच्यां हृदयांत वोतली आहे। ६ कारण. कीं आह्मी निर्बळ असतां, तितक्यांत वेळेप्रमाणे अभक्तांसाठीं ख्रीस्त मरण पावला॥ ७ तर नीतिवंतासाठीं कोणी मरावें हें दुर्लभ। तरीं चांगल्यासाठीं कदाचित कोणीहि मरायास धजेल॥ ८ परंतु देवाने आपली आह्मावरील प्रीति असी पटविली। कीं आह्मी तितक्यांत पापी असतां। ख्रीस्त आह्मासाठीं मरण पावला॥ ९ तर आह्मी, आतां त्याच्या रक्तपाताने पुण्यवान ठरविले असतां, किती विशेषें त्याकडून क्रोधापासून तारले जाऊं? १० कां तर आह्मी वैरी असतां, जर देवासीं त्याच्या पुत्राच्या मरणाकडून समेट पावलों। तर समेट पावल्यावर त्याच्या जीवाकडून किती विशेषें तारले जाऊं? ११ आणि [हेंच] केवळ नव्हे। परंतु आमचा प्रभू येशू ख्रीस्त। यावरून आह्मी देवाविषयीं आनंदहि करितों। याकडून आह्मी आतां समेटपण पावलों आहों ※

१२ यास्तव ज्या प्रकारें येका माणसाकडून पाप जगांत आलें, तसें [तें आहे।] आणि पापाकडून मरण [आलें।] मग तसें, अवघ्यांनी पाप केल्यावरून। अवघ्यां माणसांवर मरण आलें आहे॥ १३ कां तर नेमशास्त्रापर्यंत। पाप जगांत होतें। परंतु शास्त्र नसतां। पाप मोजिलें जात नाहीं॥ १४ तथापि आदामापासून मोशेपर्यंत मरणाने राज्य केलें। ह्मणजे ज्यांनी आदामाच्या उल्लंघनाच्या प्रतिमेने पाप केलें नव्हतें, त्यांवर। तो होणाऱ्याचा ठसा आहे॥ १५ परंतु जसें पातक तसा उपकारहि असें नाहीं। कां कीं जर येकाच्या पातकाकडून बहु

न मेले। तर त्यापेक्षां येक माणूस येशूख्रीस्त याकडून देवा
ची कृपा। व कृपेकडून दान। हीं बहुतांस केवढीं अधीक
वाढलीं आहेत॥ १६ आणि येकाने पाप केलें त्याकडून ज
सें, तसें दान नाहीं। कां तर दंडण्यासाठीं येकाचा न्याय
[ठरविला] खरें, परंतु बहुतां पातकांपासून पुण्यवान ठरवि
ण्यासाठीं हा उपकार [आहे॥] १७ कां कीं येकाच्या पात
काकडून। जर मरणाने येकाकडून राज्य केलें, तर जे कृ
पेचा व पुण्य दानाचा अतिशय पावतात ते। येशूख्रीस्त ह्या
येकाकडून। जीवनांत केवढें विशेषें राज्य करितील॥ १८ या
वरून तर जसें येकाच्या पातकाकडून। दंडण्यासाठीं अवघ्यां
माणसांवर [न्याय जाला।] तसेंहि येकाच्या पुण्यवानपणाक
डून सर्व माणसांवर जीवनपुण्य ठरविलें जाण्यासाठीं [दान
जालें आहे॥] १९ कां कीं जसें येका माणसाच्या अनमानाकडू
न बहुत पापी ठरविले गेले। तसेंहि येकाच्या मानण्याकडून
बहुत पुण्यवान ठरविले जातील॥ २० परंतु पातक फार
होण्याकरितां नेमशास्त्र शिरलें। तथापि जेथे पाप बहुत जा
लें, तेथे कृपा फार अधीक वाढली। २१ अस्यासाठीं कीं
जसें पापाने मरणाकडून राज्य केलें, तसेंहि कृपेने येशूख्रीस्त
आमचा प्रभू याकडून। सर्वकाळ जीवनासाठीं पुण्याकडून। रा
ज्य करावें॥

पर्व ६॥ १ तर आह्मी काय बोलूं? कृपा वाढायासाठीं आ
ह्मी पापांत टिकूं कीं काय? असें नसावें। २ जे आह्मी पापा
विषयीं मेलों। ते आह्मी त्यांत आणखी कसें जीव नेऊं? ३ का
य! तुह्मी न जाणतां? कीं ख्रीस्तयेशूसाठीं बाप्तीस्मी जालों।
तितके आह्मी त्याच्या मरणासाठीं बाप्तीस्मी जालों होतों॥
४ यास्तव आह्मी मरणासाठीं बाप्तीस्म्याने पुरलों। ह्मणजे ज
सें ख्रीस्त। बापाच्या गौरवाकडून, मेलेल्यांतून उठविला गे
ला। तसे आह्मीहि वागण्याच्या नवेपणांत चालावें॥ ५ कार
ण कीं जर आह्मी त्याच्या मरणाच्या समानतेने बरोबर रों

पें लाविलीं जालों, तर आणखी त्याच्या पुन्हाउठण्याच्याहि [समानतेनें] होऊं। ६ कां, हें जाणतों। कीं आमचें जुनें मनुष्यपण संगतीं मरणखांबीं दिलेंं आहे। ह्मणजे आह्मी आणखी पापाची सेवा न करायास। पापाचें हें शरीर मारिलें जावें॥ ७ कारण कीं जो मेला। तो पापापासून सोडविला आहे॥ ८ आणि जर आह्मी खीस्ताच्या संगतीं मेलों आहों, तर आह्मी त्यासंगतींहि वांचूं, असें आह्मी विश्वासतों॥ ९ कां, हें जाणतों। कीं खीस्त मेलेल्यांमधून उठविला होऊन आणखी मरत नाहीं। मरण आणखी त्यावर धनिपण करीत नाहीं॥ १० कां तर तो मेला। [ह्मणजे] येकदांच पापाविषयीं मेला। परंतु तो वांचतो। [ह्मणजे] देवाविषयीं वांचतो॥ ११ तसें तुह्मींहि पापाविषयीं मेलेले खरे। परंतु खीस्तयेशू जो आमचा प्रभू, त्याकडून देवाविषयीं जीवंत असें मोजा॥ १२ यास्तव तुह्मी आपल्या मरणाच्या शरिरांत पापाला असें राज्य करूं देऊं नका। कीं तुह्मी त्याच्या लोभानी त्याला मानावें॥ १३ आणि तुह्मी आपलीं अंगें पापासीं अन्यायाचीं हातेरें। [असीं] सादर करूं नका। परंतु मेलेल्यांमधून जीवंत असे आपणांस देवासीं। आणि आपलीं अंगें पुण्याचीं हातेरें असीं त्यांस देवासीं सादर करा॥ १४ कारण कीं पाप तुह्मावर धनिपण करणार नाहीं। कां तर तुह्मी नेमशास्त्राखालीं नव्हां। परंतु कृपेखालीं आहां॥ १५ तर काय? आह्मी नेमशास्त्राखालीं नाहीं, परंतु कृपेखालीं। यास्तव आह्मी पाप करूं कीं काय? असें नसावें॥ १६ काय। तुह्मास हें कळलें नाहीं। कीं ज्यासीं तुह्मी मानण्यासाठीं आपणांस चाकर [असे] सादर करितां। ज्याला मानितां त्याचे चाकर आहां? जर पापाचे तर मरणासाठीं, अथवा मानण्याचे [तर] पुण्यासाठीं॥ १७ तुह्मी पापाचे चाकर होतां। परंतु उपदेशाचा जो ठसा तुह्मास शिकविला, त्याला तुह्मी हृदयापासून मानिलें आहे। यास्तव देवापासीं आभारमान [असो॥]

१८ आणि तुह्मी पापापासून सोडविले असतां। पुण्याचे चा
कर केले गेलां॥ १९ तुमच्या देहाच्या अबळपणामुळें मी
मानवरूपें बोलतों। कां तर जसें तुह्मी आपलीं अंगें शास्त्र
भंगासाठीं अशुद्धपणासीं व शास्त्रभंगासीं चाकर [असीं] साद
र केलीं आहेत। तसें आतां पवित्रपणासाठीं आपलीं अंगें
पुण्यासीं चाकर [असीं] सादर करा॥ २० कां कीं जेव्हां
तुह्मी पापाचे चाकर होतां। तेव्हां पुण्याविषयीं मोकळे हो
तां॥ २१ तर ज्यांविषयीं तुह्मी आतां लाजतां। त्यांविषयीं
तुह्मास तेव्हां काय फळ जालें? कां तर त्यांचा शेवट मर
ण [आहे॥] २२ परंतु आतां पापापासून सोडविले असतां।
आणि देवाचे चाकर जाले असतां, तुह्मास आपलें फळ प
वित्रपण असें आहे। आणि शेवट सर्वकाळ जीवन [आहे॥]
२३ कां तर पापाचीं वेतनें मरण [आहे।] परंतु देवा
चा उपकार। आमच्या प्रभू ख्रीस्त येशूकडून। सर्वकाळ जीवन।
[आहे॥]

पर्व ७॥ १ अहो भाऊ। जितका काळ माणूस जगतो।
तितक्यापर्यंत नेमशास्त्र त्यावर धनिपण करितें, हें तुह्मी
जाणत नाहीं कीं काय? कां कीं जे नेमशास्त्र जाणतात, त्यांस
मी बोलतों॥ २ कां तर। सवाशिणी स्त्री जो भ्रतार वांचतो।
तोंपर्यंत ती नेमशास्त्रानें त्यासीं बांधली आहे। परंतु जर भ्र
तार मेला। तर ती भ्रताराच्या नेमापासून सुटली आहे॥
३ यावरून तर। भ्रतार वांचत असतां, जर ती दुसऱ्या पु
रुषाची होती। तर ती व्यभिचारीण ह्मटली जाईल। परंतु
जर भ्रतार मेला। तर ती नेमापासून [असी] मोकळी, कीं
ती दुसऱ्या पुरुषाची होत असतां[हि] व्यभिचारीण नाहीं॥
४ तसे। अहो माझे भाऊ। तुह्मीहि नेमशास्त्राविषयीं ख्रीस्ता
च्या शरिराकडून मारले आहां। असे कीं तुह्मी दुसऱ्याचे व्हा
वे। जो मेलेल्यांमधून उठविलेला त्याचे। ह्मणजे आह्मी देवासा
ठीं फळ द्यावें॥ ५ कां तर जेव्हां आह्मी देहिकपणानें हो

तें। तेव्हां पापाच्या चेतना ज्या नेमशास्त्राकडून, त्या। आम
च्यां अंगांकडून मरणासाठीं फळ देणें हें करवीत होत्या॥
६ परंतु आतां। ज्याकडून आह्मी धरिले होतों तें मेलें
असतां। आह्मी नेमशास्त्रापासून सोडविले आहों। असें कीं
अक्षराच्या जुनेपणानें नव्हे। परंतु आत्म्याच्या नवेपणानें आह्मी
सेवा करावी॥ ७ तर आह्मी काय बोलूं? नेमशास्त्र पापरूप
[आहे] कीं काय? असें होववत नाहीं। आणखी नेमशास्त्राक
डून [कळलें] नसतें। तर मी पाप समजलों नसतों। आणखी,
तूं लोभ ठेवूं नको। असें जर नेमशास्त्रानें सांगितलें नसतें।
तर लोभहि मी समजलों नसतों॥ ८ परंतु पापानें। आज्ञेकडून
निमित्त धरून। मजमध्यें अगदी लोभ घडविला। कां तर ने
मशास्त्रावांचून पाप मेलें [आहे॥] ९ आणि पूर्वीं नेमशास्त्रा
वांचून मी जीवंत होतों। परंतु आज्ञा आल्यावर। पाप फि
रोन जिवंत जालें। आणि मी मेलों॥ १० तेव्हां जी आज्ञा
जीवनासाठीं [होती।] ती मरणासाठीं [असी] मला सांपड
ली॥ ११ कां कीं पापानें, आज्ञेकडून निमित्त धरून, मला
ठकविलें। आणि तिजकडून मला जीवें मारिलें॥ १२ यास्त
व नेमशास्त्र पवित्र खरें, आणि आज्ञा पवित्र व न्यायी व
चांगली [आहे॥] १३ तर जें चांगलें। तें मला मरण जालें
कीं काय? असें होववत नाहीं। परंतु पाप तें पाप दिसावें,
ह्मणोन त्यानें चांगल्याकडून मजमध्यें मरण घडविलें। ह्मणजे
आज्ञेकडून पाप अतिशयें पापीष्ठ व्हावें॥ १४ कां तर आ
ह्मास कळलें। कीं नेमशास्त्र आत्मीक आहे, परंतु मी दैही
क पापाखालीं विकलेला आहें॥ १५ कारण कीं जें मी क
रितों, त्याला माझें संमत नाहीं, कां कीं जें मी इछितों। तें आ
चरत नाहीं। परंतु ज्याला मी द्वेषितों। तें करितों॥ १६ आ
णि जें मी इछीत नाहीं। तें जर करितों, तर मी नेमशास्त्राला
संमत देतों। कीं तें चांगलें [आहे।] १७ तर आतां मी पुढें
तें करीत नाहीं। परंतु मजमध्यें जें पाप राहातें। तें [करितें॥]

१८ कां तर मी जाणतों। कीं मजमध्यें। ह्मणजे माझ्या दे
हांत [कांहीं] चांगलें राहात नाहीं। कारण कीं इच्छणें मा
झ्याने घडतें। परंतु जें चांगलें। तें करणें हें मी पावत
नाहीं॥ १९ कां तर जें चांगलें मी इच्छितों, तें करीत
नाहीं। परंतु जें वाईट मी इच्छीत नाहीं। तें आचरतों॥
२० आणि जें मी इच्छीत नाहीं। तें जर करितों। तर ते
व्हांपासून मी तें करीत नाहीं। परंतु पाप जें मजमध्यें राहातें।
तें [करितें॥] २१ तर चांगलें करायास इच्छितां मला हा
नेम सांपडतो। कीं वाईट मजवळ आहे॥ २२ कां तर मी
आंतल्या मनुष्यपणानें देवाच्या नेमशास्त्रासीं संतोषीत होतों।
२३ परंतु माझ्या अंगांमध्यें दुसरा नेम पाहातों। कीं हा
माझ्या मनाच्या नेमाविरुद्ध लढतो। आणि पापाचा जो नेम
माझ्या अंगांमध्यें आहे। त्याच्या जवळ मला पाडाव करून
नेतो॥ २४ अहा। मी विपत्तिवान माणूस। मला ह्या मरणा
च्या शरिरापासून कोण सोडवील? २५ आमचा प्रभू येशू
ख्रीस्त याकडून [सुटेन। यास्तव] मी देवासीं आभारस्तुती क
रितों॥ तर यावरून मी स्वतां मनानें देवाचें नेमशास्त्रसे
वा करितों खरें। परंतु देहानें पापाच्या नेमाला [सेवितों॥]
पर्व ८॥ १ तर जे ख्रीस्तयेशूमय [असतां।] देहाप्रमाणें
[चालत] नाहींत। परंतु आत्म्याप्रमाणें चालतात। त्यांचा कां
हीं दंड ठरविणें नाहीं॥ २ कां तर ख्रीस्तयेशूकडून। जी
वनाच्या आत्म्याच्या नेमानें मला पापाच्या व मरणाच्या नेमा
पासून मोकळें केलें आहे॥ ३ कारण कीं। देहामुळें नेमशा
स्त्र अबळ जाल्यावरून, त्याला जे अशक्य तें [घडलें।] देवानें
आपल्या पुत्राला पापी देहाच्या समानतेनें, आणि पापामुळें।
पाठवून। देहाजे पापाचा दंड ठरविला आहे। ४ ह्मणजे जे
देहाप्रमाणें नाहीं। परंतु आत्म्याप्रमाणें चालतात, त्यां आ
ह्मांविषयीं नेमशास्त्राचें पुण्य पूर्ण व्हावें॥ ५ तर जे देहाप्र
माणें आहेत, ते देहाचीं जीं, तीं चिंतितात। परंतु जे

आत्म्याप्रमाणें। ते आत्म्याचीं जीं। तीं [चिंतितात ॥] ६ आ
णखी देहाचें चिंतन, तें मरण। परंतु आत्म्याचें चिंतन तें
जीवन। व समाधान [आहे।] ७ यास्तव कीं देहाचें चिंतन। तें
देवाशीं वैर [आहे।] कां तर देवाच्या नेमशास्त्राच्या स्वाधी
न नाहीं। आणखी [होउं]हि शकत नाहीं ॥ ८ आणि जे दे
हिकपणांत आहेत। त्यांच्याने देवाला संतोषववत नाहीं ॥ ९ परं
तु जर देवाचा आत्मा तुह्मामध्यें राहातो। तर तुह्मी देहि
कपणांत नव्हां। पण आत्म्यांत [आहां ॥] आणि जर कोणा
ला ख्रीस्ताचा आत्मा नाहीं। तर तो त्याचा नाहीं ॥ १० आ
णि जर ख्रीस्त तुह्मामध्यें [आहे।] तर पापामुळें शरीर मे
लें आहे खरें। परंतु पुण्यामुळें आत्मा जगणें आहे ॥ ११ आ
णि ज्याने येशूला मेलेल्यांमधून उठविलें। त्याचा आत्मा, ज
र तुह्मामध्यें राहातो। तर ज्याने ख्रीस्त मेलेल्यांमधून उठवि
ला। तो आपला आत्मा जो तुह्मामध्यें राहातो त्याकडून,
तुमचीं मरणारीं शरीरें जीववील ॥ १२ तर अहो भाऊ
यावरून, आह्मी ऋणी आहों। देहाप्रमाणें वांचायाला देहा
चे नाहीं। १३ कां कीं जर तुह्मी देहाप्रमाणें वांचतां। त
र मराल। परंतु जर तुह्मी आत्म्याकडून। शरिराचीं आच
रणें जीवें मारितां। तर वांचाल ॥ १४ कारण कीं देवाच्या
आत्म्याकडून। जितके नेले जातात, तितके देवाचे पुत्र आहे
त ॥ १५ तुह्मी तर फिरोन भयाकरितां चाकरपणाचा आ
त्मा घेतला नाहीं। परंतु दत्तपुत्रपणाचा आत्मा। ह्याकडून
आह्मी आब्बा। ह्मणजे बापा। [असी] हाक मारितों। हा
तुह्मी घेतला आहे ॥ १६ आत्मा स्वतां आमच्या आत्म्याशीं
साक्ष देतो। कीं आह्मी देवाचीं लेंकरें आहों ॥ १७ आणि
जर लेंकरें, तर वतंदारहि। देवाचे वतंदार खरें। आणि
ख्रीस्तासहीत वतंदार। ह्मणजे जर आह्मी संगतीं सोसिलें। त
र संगतीं गौरविलेहि जावे ※

१८ कां कीं मी असें मोजितों। कीं आह्मासाठीं जें गौरव

प्रगट केलें जाणार। त्यांसीं सध्या काळांतील सोसणीं योग्य
नाहींत॥ १९ कां तर उत्पत्तीची फार अपेक्षा देवाच्या
पुत्रांच्या प्रगटण्याची वाट पाहाती॥ २० कारण कीं उत्पत्ती,
व्यर्थपणाच्या स्वाधीन जाली। [हें] इच्छेने नव्हतें, परंतु ज्या
ने [तिला] स्वाधीन केलें, त्याकडून। [ह्या] आशेवर, २१ कीं
उत्पत्ती स्वतांहि नासण्याच्या चाकरपणांतून, देवाच्या लेंकरां
च्या गौरवमोकळिकेने मोकळी केली जाईल॥ २२ कां तर
आह्मी जाणतों, कीं आतांपावेतों अवघी उत्पत्ती कुंथती,
व सहीत प्रसूतवेणा सोसती॥ २३ आणि [ती] केवळ न
व्हे। परंतु आपणहि, ज्यांस आत्म्याचें प्रथम फळ आहे,
आह्मी स्वतांहि दत्तपुत्रपण, [ह्मणजे] आमच्या शरिराची
सुटका, इची वाट पाहात असतां आपणांमध्यें कुंथतों॥
२४ कां तर आह्मी आशेने तारले आहों। परंतु अनुभव
लेली आशा, ती आशा नाहीं। कां तर कोणी जें अनुभ
वितो, त्याची आशा कसी धरितो? २५ परंतु जें आ
ह्मी अनुभवीत नाहीं। त्याची आशा जर धरितों, त
र सहनतेने त्याची वाट पाहातों॥ २६ आणि तसेंहि आत्मा
आमचीं अबळपणें जीं, त्यांस साह्य करितो। कां तर जें
पाहिजे, त्याप्रमाणे आह्मी काय प्रार्थावें, हें आह्मी जाणत
नाहीं। परंतु अवाच्य कुंथणीं ह्यांकडून आत्मा स्वतां आह्मा
करितां आग्रहाने विनंति करितो॥ २७ आणि जो हृदयांचा
शोध घेतो, तो आत्म्याचें चिंतन काय हें जाणतो। यास्तव
कीं तो देवापासीं पवित्रांसाठीं विनंति करितो॥ २८ आणि
आह्मी जाणतों, कीं जे देवावर प्रीति करितात, ह्मणजे
[त्याच्या] बेताप्रमाणे बोलाविले आहेत, त्यांच्या बऱ्याकरितां
सगळीं येकत्र घडतात॥ २९ यास्तव कीं ज्यांस त्याने पूर्वीं
जाणलें, त्यांविषयीं त्याने [असा] नेमहि पूर्वीं केला, कीं आपल्या
पुत्राच्या आकृतीप्रमाणे समरूपी त्यानी व्हावें। ह्यासाठीं कीं
तो बहुतां भावांमध्यें मुख्य जन्मी व्हावा॥ ३० आणि ज्यां

स त्याने पूर्वीं नेमिलें। त्यांस त्याने बोलावणेंहि केलें। ३० आणि ज्यांस त्याने बोलाविलें। त्यांस त्याने पुण्यवानहि ठरविलें। आणि ज्यांस त्याने पुण्यवान ठरविलें। त्यांस त्याने गौरवहि दिलें॥ ३१ तर य विषयीं आह्मी काय बोलूं? जर देव आह्माकडे। तर आह्माविरुद्ध कोण? ३२ ज्याने आपल्या पुत्राला देखील जोपासलें नाहीं। परंतु आह्मा अवघ्यांसाठीं तो अगदीं दिल्हा। त्यासहीत आह्मास कृपेने सगळींहि वस्तीं न देईल? ३३ जे देवाचे निवडलेले। त्यांजवर कोण आरोप ठेवील? जो पुण्यवान ठरवितो। तो देव [आहे॥] ३४ जो अन्याय्य ठरवितो। तो कोण? जो मेला। आणि त्याहून अधीक; पुन्हा उठलाहि तो खीस्त आहे। आणि तो देवाच्या उजव्याकडे आहे। तो आह्माकरितां विनंतीहि करितो॥ ३५ खीस्ताच्या प्रीतिपासून आह्मास कोण तोडील? संकट अथवा संकोचन। अथवा पाठलाग अथवा दुष्काळ। अथवा नागवेपण। अथवा भयप्रती, अथवा तरवार, हीं [तोडतील कीं काय?] ३६ तसें लिहिलें आहे कीं तुजकारितां आह्मी सगळा दिवस वधले जातों। आह्मी खाटीकपणाचीं मेंढें यासारिखे मोजले आहों॥ ३७ तथापि ज्याने आह्मावर प्रीति केली। त्याकडून, ह्या सर्वांमध्यें आह्मी जिंकणाऱ्यांपेक्षां अधीक आहों॥ ३८ कां तर मी विश्वासविलों आहें। कीं मरण। किंवा जगणें, किंवा जे दूत ते। किंवा अधिकारपणें। किंवा सामर्थ्यें किंवा सांप्रत जीं। किंवा व्हायाचीं जीं, ३९ किंवा उंचपण। किंवा खोलपण। किंवा कोणीहि दुसरी उत्पत्ती, आह्मास देवाची प्रीति। जी खीस्तयेशू आमचा प्रभू याकडून [आहे।] तिजपासून तोडुं शकणार नाहीं॥

पर्व ९॥ १ मी खीस्तावरून खरें बोलतों। मी खोटें बोलत नाहीं। पवित्रआत्म्यावरून माझा भाव माझ्या संगतीं साक्ष देतो। २ कीं मला मोठा कष्ट। व अखंड खेद माझ्या अंतःकरणांत आहे। ३ कां तर माझे भाऊ। जे देहाविषयीं

माझे सजाती त्यांच्या ठिकाणीं मी स्वतां खीस्तापासून उत्सृ
ष्ट जाला जावा। ह्मणोन म्या इच्छिलें असतें। ४ ते इस्राए
ल आहेत। दत्तपुत्रपण, व गौरव, व जे करार ते, व शा
स्त्रदान, व भजन, व वचनें, हीं त्यांचीं [आहेत।] ५ पूर्व
ज त्यांचे [आहेत।] आणि त्यांपासून देहाविषयीं खीस्त
[जाला।] तो सर्वांवर सर्वकाळांपर्यंत स्तुतीमान्य देव आहे।
आमेन ॥

६ तर देवाची गोष्ट जशी गळून गेली। तसें नाहीं। कां
तर जे इस्राएलाचे। ते सर्व इस्राएल नाहींत। ७ आणि
ते अब्राहामाचें बीज, यावरून ते सर्व लेंकरें आहेत। असें नाहीं।
परंतु इसाकावरून तुझें बीज ह्मटलें जाईल॥ ८ ह्मणजे दे
हाचींच जीं लेंकरें। तीं देवाचीं लेंकरें नाहींत। परंतु वचना
चीं लेंकरें। तीं बीज असें मोजलीं जातात॥ ९ कां कीं वच
नाची गोष्ट हीच। त्या काळीं मी येईन। आणि सारेला पुत्र
होईल॥ १० आणि ती केवळ नव्हे, परंतु रिबेकाहि येका
आमच्या इसाक पूर्वजाकडून गर्भार जाली। ११ तीं [जा
वळीं] तर जोंपर्यंत जन्मलीं नव्हतीं। आणि कांहीं बरें। किं
वा वाईट त्यानीं आचरलें नव्हतें तेव्हां। निवडण्याप्रमाणे दे
वाचा हेतु। कामांकडून नव्हे। परंतु जो बोलाविता त्याकडून।
तो राहायासाठीं, १२ तिला ह्मटलें होतें। कीं जो वडील
तो धाकट्याची सेवा करील॥ १३ त्याप्रमाणे लिहिलें आहे।
[कीं] म्या याकोबावर प्रीति केली। परंतु एसावावर द्वेष के
ला आहे॥

१४ तर आह्मी काय बोलूं? देवापाशीं अन्याय आहे कीं
काय? असा होववत नाहीं॥ १५ कां तर तो मोश्याला ह्म
णतो, कीं ज्यावर मी दया करितों, त्यावर दया करीन।
आणि ज्यावर मी करुणा करितो, त्यावर करुणा करीन॥
१६ यास्तव जो इच्छितो। त्याचें नव्हे। आणि जो धांवतो,
त्याचें नव्हे। परंतु देव जो दया करितो, त्याचें [आहे॥]

१७ आणखी धर्मलेख फारोला बोलतो। कीं तुजकडून मा
झी दया दाखवायासाठीं, आणि माझें नांव सर्व पृथ्वींत व
र्णिलें जाण्यासाठीं। ह्याच कारणास्तव म्या तुला उंचाविलें आ
हे॥ १८ यास्तव ज्यावर तो दया [करायास] इच्छितो, त्या
वर करितो। आणि, ज्याला तो कठीण [करायास] इच्छितो।
त्याला करितो॥ १९ तर तूं मला बोलसील। तो आजून
दोष कां लावितो? यास्तव कीं त्याच्या इच्छेस कोणी आड
विलें आहे? २० होय खरें। अरे माणसा। जो देवाविरुद्ध
उत्तर देतो। तो तूं कोण आहेस? जें घडलेलें। काय! तें
आपल्या घडणाऱ्याला बोलेल? [कीं] त्वां मला असें कां
केलें? २१ येकाच गोळ्यापासून येक पात्र मानासाठीं। व
दुसरें पात्र अवमानासाठीं करायास। कुंभाराला मातीवर अधि
कार नाहीं कीं काय? २२ आणि देवाने जर आपला क्रो
ध दाखवायास। आणि आपली सत्ता कळवावयास इच्छीत अ
सतां। क्रोधाचीं पात्रें नाशासाठीं सिद्ध जालेलीं, तीं फार स
हनतेने साहिलीं। [तर काय?] २३ आणि असें इच्छीत अ
सतां। कीं दयेचीं पात्रें। जीं त्याने गौरवासाठीं पूर्वीं सिद्ध के
लीं। त्यांवर आपल्या गौरवाची संपत्ती कळवावी। २४ ह्मण
जे ज्यां आह्मास त्याने बोलावणें केलें। यहूद्यांतील केवळ न
व्हे, परंतु राष्ट्रांतीलहि त्यांवर। २५ तसेंहि तो होश्याकडून बोल
तो, कीं जी माझी प्रजा नव्हती। तिला मी आपली प्रजा
ह्मणेन। आणि जी प्रीय नव्हती। तिला प्रीय [ह्मणेन॥]
२६ आणि असें होईल। [कीं] तुह्मी माझी प्रजा नव्हां।
असें ज्या ठिकाणीं त्यांस ह्मटलें होतें। तेथे ते। जीवंत दे
वाचें संतान ह्मटलें जातील॥ २७ आणि यशाया इस्राएला
विषयीं ओरडतो। [कीं] इस्राएलसंतानाची गणती जरीं
समुद्राच्या रेतीसारिखी आहे। तथापि शेष तारलें जाईल॥
२८ कां तर तो कार्य संपवीत, आणि न्यायीपणाने तोडून टा
कीत [आहे।] कारण कीं प्रभू पृथ्वींत तोडून टाकलेलें कार्य

करील॥ २९ आणि असें यशायाने पूर्वीं सांगितलें तसें [आ
हे। कीं] समुदायाच्या प्रभूने आमच्या साठीं बीज जर राह
विलें नसतें। तर आह्मी सदोमासारिखे जालों असतों। आणि
गमोऱ्यासमान जालों असतों ॥

३० तर आह्मी काय बोलूं? असें कीं राष्ट्रें, जीं पुण्या
च्या शोधास लागलीं नाहींत तीं। पुण्य ह्मणजे जें पुण्य वि
श्वासाकडून। तें पावलीं आहेत॥ ३१ परंतु इस्राएल जो
पुण्याच्या नेमशास्त्रामागें लागला। तो पुण्याच्या नेमशास्त्रापर्यंत
पोहंचला नाहीं॥ ३२ कशास्तव? यास्तव। कीं त्यानी विश्वासा
कडून नाहीं। परंतु नेमशास्त्रकर्मांकडून [शोधिलें॥] कां तर
त्यांस त्या ठेंचलागण्याच्या धोंड्याशीं ठेंच लागली॥ ३३ तसें
लिहिलें आहे। [कीं] पाहा, मी जीयोनांत ठेंच लागण्याचा
धोंडा। ह्मणजे अडखळण्याचा खडक ठेवितों। आणि जो को
णी त्यावर विश्वास ठेवितो। तो लाजणार नाहीं ॥

पर्व १०॥ १ अहो भाऊ। इस्राएलाविषयीं माझ्या हृदयां
तील मनोदय, आणि देवाजवळ प्रार्थना तारणासाठीं आहे
खरें। २ कां तर मी त्यांविषयीं साक्ष देतों। की त्यांस देवसंबं
धी आवेश आहे। परंतु [तो] ज्ञानाप्रमाणे नाहीं॥ ३ कां कीं
ते देवाचें पुण्य जाणत नसतां। आणि आपलें पुण्य स्थापायास
शोधीत असतां। देवाच्या पुण्याला राजी जाले नाहींत॥
४ कां तर जो कोणी विश्वासतो। त्याला पुण्यार्थीं ख्रीस्त ने
मशास्त्राचें संपविणें आहे॥ ५ कारण कीं नेमशास्त्राकडून जें पु
ण्य। तें मोशे वर्णितो, कीं जो माणुस हीं करितो। तो ह्यां
कडून वांचेल॥ ६ परंतु विश्वासाकडून जें पुण्य, तें असें ह्मण
तें। कीं तूं आपल्या हृदयीं असें न ह्मणावें। [कीं] आकाशां
त कोण चढेल? ह्मणजे ख्रीस्ताला खालीं आणायासाठीं।
७ किंवा [असें। कीं] अथांगस्थळीं कोण उतरेल? ह्मणजे मे
लेल्यांमधून ख्रीस्ताला फिरोन वर आणायासाठीं? ८ परंतु
तो काय ह्मणतो? ती गोष्ट तुझ्या जवळ। तुझ्या तोंडांत।

आणि तुझ्या हृदयांत आहे। ह्मणजे विश्वासाची ही गोष्ट जी आह्मी गाजवितो, तोच, ९ कीं जर तूं आपल्या तोंडाने प्रभूयेशूला प्रकटकरसील, आणि देवाने त्याला मेलेल्यांमधून उठविलें आहे। असें आपल्या अंतःकरणांत विश्वासशील। तर तूं तारला जासील? १० कारण कीं पुण्यासाठीं अंतःकरणांत विश्वास होतो। आणि तारणासाठीं प्रकट तोंडाने घडतो॥ ११ यास्तव कीं धर्मलेख बोलतो। कीं कोणी जो त्याजवर विश्वासतो, तो लाजणार नाहीं॥ १२ यहूदी व हेल्लासीहि यांमध्यें तर भेद नाहीं। कां कीं सर्वांचा येकच प्रभू, सर्व जे त्याला हाक मारितात। त्यांसीं धनवान आहे॥ १३ कां कीं कोणी जो प्रभूचें नांव घेतो। तो तारला जाईल॥ १४ तर ज्यावर ते विश्वासले नाहींत। त्याला कसे हाक मारितील? आणि ज्याचें त्यानी ऐकिलें नाहीं। त्यावर ते कसे विश्वासतील? आणि गाजविणाऱ्यावांचून ते कसे ऐकतील? १५ आणि जर ते पाठविले नाहींत। तर कसे गाजवितील? त्याप्रमाणे लिहिलें आहे। [कीं] जे समाधानाचें सुवर्तमान सांगतात। [व] चांगलीं जीं त्यांचें सुवर्तमान सांगतात। त्यांचे पाय किती शोभिवंत! १६ परंतु त्यां सर्वांनी सुवर्तमान मानिलें नाहीं। कां तर यशाया ह्मणतो। हे प्रभू, आमच्या आवईवर कोण विश्वासला आहे? १७ तर विश्वास ऐकण्यावरून। आणि ऐकणें देवाच्या गोष्टीवरून [आहे॥] १८ परंतु मी ह्मणतों। त्यानी ऐकिलें नाहीं कीं काय? होय खरें। त्यांचा शब्द सर्वपृथ्वींत निघाला, आणि त्यांच्या गोष्टी जगाच्या सीमांपर्यंत [गेल्या॥] १९ आणखी मी ह्मणतों। इस्राएल न समजला कीं काय? प्रथम मोशे ह्मणतो। [कीं] जें राष्ट्र नाहीं। त्याकडून मी तुह्मास चेतवीन। आणि अज्ञानीराष्ट्राकडून तुह्मास चिढवीन॥ २० आणि यशाया निर्भय असून ह्मणतो। ज्यानी मला शोधिलें नाहीं, त्यांस मी सांपडलों गेलों। ज्यानी मजविषयीं विचारिलें नाहीं। त्यांस मी प्रगट जालों॥

२१ परंतु इस्राएलाविषयीं तो ह्मणतो। [कीं] सगळा दिव
स अमान्य व विरुद्ध बोलणारे लोक याकडे म्या आपले हात
लांबविले आहेत ॥

पर्व ११.॥ १ यास्तव मी ह्मणतों। देवाने आपल्या लो
कास घालविलें आहे कीं काय? तसें होववत नाहीं। कां त
र मीहि इस्राएली। आब्राहामाच्या बिजांतील। बन्यामीन वंशां
तला आहें॥ २ देवाने आपला लोक। ज्याला त्याने पूर्वीं जा
णलें। त्याला घालविलें नाहीं॥ धर्मलेख एलियाविषयीं काय
ह्मणतो। तें तुह्मी न जाणतां काय? कीं तो देवापाशीं इ
स्राएलाविरुद्ध विनंती करितो, ३ कीं हे प्रभू, त्यानी तुझ्यां
भविष्यवाद्यांस जिवें मारिलें आहे। आणि तुझीं खंडिलें ख
णून टाकिलीं। आणि मी येकटा उरला असतांना। ते मा
झ्या प्राणाला शोधितात॥ ४ परंतु भाकीत त्याला काय ह्म
णतें? ज्यानी बालाजवळ गुडघा टेंकला नाहीं। असीं सात ह
जार माणसें म्या आपणासाठीं उरविलीं आहेत॥ ५ तर तसें
सध्या वेळेस कृपेच्या निवडण्याप्रमाणे शेष जालें आहे॥ ६ आ
णि जर कृपेकडून। तर मग कामावरून नाहीं। वेगळें तर
कृपा, ती तेव्हांपासून कृपा होत नाहीं। परंतु जर कामाव
रून। तर मग कृपा नाहीं। वेगळें तर काम। तें काम ना
हीं॥ ७ तर काय? जें इस्राएलाने फार शोधिलें, तें
त्याने साधिलें नाहीं। परंतु निवडल्या वर्गाने साधिलें आ
हे। आणि जे उरले, ते आंधळे केले गेले। ८ जसें लिहिलें।
तसें [कीं] देवाने त्यांस आजदिवसापर्यंत। झोंपेचा आत्मा।
जे डोळे पाहात नाहींत ते, आणि जे कान ऐकत नाहींत ते।
दिल्हे॥ ९ आणि दावीद ह्मणतो, [कीं] त्यांची आडणी
फांसरूप, आणि सांपळारूप। आणि अडखळणेंरूप। आणि
फेडरूप त्यांसीं होवो॥ १० त्यानी न पाहावें ह्मणोन त्यां
चे डोळे काळोखमय होवोत। आणि ते सर्वकाळ आपली
पाठ ओणवोत ॥

११ तर मी बोलतों। ते पडायासाठीं अडखळले कीं काय? असें होवखत नाहीं। परंतु त्यांच्या पडण्याकडून। त्यांस चे तवायासाठीं राष्ट्रांस तारण [प्राप्त जालें॥] १२ आणि त्यां चें पडणें हें जर जगाचें धन। आणि त्यांचें थोडेहोणें। हें [जर] राष्ट्रांचें धन। तर त्यांची पूर्णता कोवढी विशेष? १३ तर तुह्मा राष्ट्रांस मी बोलतों। तर जितक्यावरून मी राष्ट्रांकडला प्रेषित आहें। तितक्यावरून मी आपणावरची से वा गौरवितों। १४ कदाचित म्या आपल्या देहजातीला कसें तरीं चेतवावें। आणि त्यांमधून कित्येकांस तारावें॥ १५ कां तर त्यांस त्यागणें। हें जर जगाचा समेट। तर अंगीकारणें। हें मेलेल्यांमधून जगणें याखेरीज काय [होईल।] १६ आ णि पहिला उपज जर पवित्र। तर गोळाहि पवित्र आहे। आणि जर मूळ पवित्र। तर खांद्याहि पवित्र आहेत॥ १७ आ णि जर खांद्यांमधून कित्येक मोडून टाकल्या। व तूं रानटी जैतून असतां। त्यांमध्यें कलम लाविला गेलास आणि त्यां च्यासहीत जैतूनाचें मूळ व मेद। यांचा भागीदार जालास। १८ तर खांद्यांविरुद्ध ताठा करूं नको। आणि जरीं तूं [त्यां विरुद्ध ताठा करितोस। तरीं तूं मुळास वागवीत नाहींस, प रंतु मूळ तुला॥ १९ तर तूं ह्मणसील। कीं मी आंत क लम लाविला जावा। याकरितां त्या खांद्यां मोडून टाकल्या गेल्या॥ २० बरें। अविश्वासामुळें त्या मोडून टाकल्या गेल्या। आणि तूं विश्वासाकडून उभा राहिलास। उंचपण चिंतुं नको। परंतु भय धर॥ २१ यास्तव कीं जर दे वानें प्रकृतीच्या खांद्या जोपासल्या नाहींत। तर कदाचित तुलाहि जोपासणार नाहीं॥ २२ यास्तव देवाचें उपकारिक पण व कठोरपण पाहा। जे पडले त्यांवर कठोरपण खरें। प रंतु जर तूं उपकारिकपणांत राहातोस, तर तुजविषयीं उपकार। नाहीं तर तूंहि तोडून टाकला जासील॥ २३ आणि तेहि जर अविश्वासांत राहात नाहींत। तर

आंत कलम लाविले जातील। कां तर देव त्यांस पुन्हा आंत कलम करूं शकतो ॥ २४ कां कीं जर तूं प्रकृतीने रानटी जैतून यांतून तोडून घेतला गेलास। आणि प्रकृतीविरुद्ध चांगल्या जैतूनांत कलम लाविला गेलास। तर ज्या प्रकृतीने [खांद्या।] त्या आपल्या जैतूनांत केवढ्या विशेषें कलम लाविल्या जातील? २५ कां तर। अहो भाऊ। राष्ट्रांचें पूर्णपण आंत येई तोंपर्यंत इस्राएलास मंदपण वांट्याने जालें आहे। ह्या गोष्टीविषयीं तुह्मी न जाणतां व्हावें। हें मी इछीत नाहीं। कारण कीं तुह्मी आपणांसीच बुद्धिमंत न व्हावें॥ २६ मग [तें] असें [आल्यावर] अवघा इस्राएल तारला जाईल। जसें लिहिलेलें तसें। [कीं] सीयोनांतून सोडविणारा येईल। आणि तो याकोबापासून अभक्तिपण फिरवील॥ २७. आणि जेव्हां मी त्यांचीं पापें दूर करीन। तेव्हां मजकडील त्यांसीं हा करार [आहे॥] २८ सुवर्तमानाविषयीं [ते] तुह्मामुळें वैरी खरे। परंतु निवडण्याविषयीं [ते] पूर्वजांमुळें प्रीय [आहेत॥] २९ कारण कीं देवाचे उपकार व बोलावणें, हीं पश्चात्तापाचीं नाहींत॥ ३० आणखी जसें तुह्मीहि पूर्वीं देवावर विश्वासलां नव्हतां। तथापि आतां त्यांच्या अविश्वासामुळें दया पावलां आहां, ३१ तसें हेहि आतां विश्वासले नाहींत। असें कीं ह्यानीहि तुमच्या दयेकडून दया पावावी॥ ३२ कां तर देवाने सर्वांवर दया करायासाठीं। त्यां सर्वांस अविश्वासांत सहीत कोंडलें आहे॥ ३३ वाहवा। देवाचें ज्ञान व जाणणेंहि। यांच्या संपत्तीचें [किती] खोलपण! त्याचीं ठरवणीं केवढीं अशोध्य! आणि त्याचे मार्ग केवढे अतळ! ३४ कां कीं प्रभूचें मन कोणी जाणलें आहे? किंवा त्याचा बोधक कोण जाला आहे? ३५ किंवा त्याला पूर्वीं कोणी दिल्हें? मग त्याला परत दिल्हें जाईल॥ ३६ कारण कीं त्यापासून। आणि त्याकडून। आणि त्याजकरितां सगळीं [आहेत॥] त्याला सर्वकाळांपर्यंत गौरव [असो]॥ आमेन ※

पर्व १२ ॥ १ यास्तव। अहो भाऊ। मी देवाच्या कळ
वळ्यांवरून तुह्मास विनंती करितों। कीं तुह्मी आपलीं श
रिरें जिवंत। पवित्र। देवाला फार आवडत असा यज्ञ अ
र्पावा। ही तुमची तर्क्य सेवा [आहे॥] २ आणि तु
ह्मी ह्या जगाचें अनुरूप धरूं नका। परंतु तुमच्या मनाच्या नवे
पणानें परमरूप धरा यासाठीं कीं देवाची जो चांगली व फा
र आवडत। व पूर्ण इच्छा, ती काय। ह्याची प्रचिती तु
ह्मी घ्यावी। ३ कां तर जी कृपा मजवर ठेविली। तिजकडू
न मी। तुह्मामधील प्रत्येक जो आहे। त्याला सांगतों। कीं
जें कल्पायास योग्य। त्यापेक्षां अधीक [आपणाविषयीं] न
कल्पावें। परंतु जसें देवानें प्रत्येकाला विश्वासाचें माप वांट
लें आहे। त्याप्रमाणें सद्बुद्धीनें कल्पावें॥ ४ कारण कीं ज
सें आह्मास येका शरिरीं बहुत अवयव आहेत। परंतु
सर्व अवयवांस तसाच उद्योग नाहीं। ५ तसें आह्मी बहुत
[असतां,] ख्रीस्तांत येक शरीर आहों। आणि येकयेक प
रस्परांचे अवयव [आहों॥] ६ आणि आह्मावर जी कृपा
ठेविली। तिजप्रमाणें आह्मास निराळे निराळे उपकार असतां।
[आह्मी वहिवाट करावी।] जर भविष्यसांगणें। तर प्रत्ये
काच्या विश्वासपरिमाणाप्रमाणें [सांगावें।] ७ किंवा जर से
वा करणें। तर सेवेंत [राहावें,] आणि जर कोणी उपदेशि
तो, तर तो उपदेशकरण्यांत [राहो॥] ८ आणि जर कोणी
बोध करितो। तर तो बोधकरण्यांत [राहो॥] जो दान
करितो। तो भोळेपणानें [देवो॥] जो पुढारी होतो। तो
लगटानें [होवो॥] जो दया करितो। तो संतोषानें [करो॥]
९ प्रीति ढोंगाविरहीत [असो॥] जें वाईट। त्याला तुह्मी
धरारा॥ जें चांगलें त्याला चिकटा॥ १० तुह्मी बंधूप्री
तींत येकमेकांविषयीं प्रेमळ व्हा॥ सन्मानानें येकमेकांस पुढें
न्या॥ ११ लगटानें [असा।] आळसी [होऊं] नका॥ आ
त्म्यानें आवेशी असत [जा॥] प्रभूची सेवा करीत [जा॥]

१२ आशेंत आनंदीत [असा।।] संकटांत सहन करीत [अ
सा।।] प्रार्थनेंत तत्पर राहात [असा।।] १३ पवित्रांच्या अग
त्यपणांमध्यें भागी असत [जा।।] आतिथ्यकरण्याची प्रीति
अनुसरीत [जा।।] १४ जे तुमच्या पाठीस लागतात, त्यां
स आशिर्वाद द्या।। आशिर्वादच द्या। परंतु शाप देउं नका।।
१५ जे आनंदतात। त्यांसहीत आनंद करावा। आणि जे
रडतात त्यांसहीत रडावें।। १६ तुह्मी येकमेकांविषयीं येक
च चित्त देत [जा।।]' उंचीं जीं त्यांस चित्त देत [जाउ] नका।
परंतु जे नम्र। त्यांची सोबत धरीत [जा।।] तुह्मी आपणां
सींच ज्ञानी होउं नका।। १७ कोणाला वाईटासाठीं वाईट फेडी
त [असुं] नका।। अवघ्यां माणसांच्या दृष्टींत जीं चांगलीं, तीं पू
र्वींच ध्यानांत आणीत [जा।।] १८ तुमच्याने जर साध्य, त
र सर्वमाणसांसहीत समाधान धरीत [असा।।] १९ अहो
प्रीय। तुह्मी आपला सूड घेउं नका। परंतु क्रोधाला जागा
द्या। कां तर असें लिहिलें आहे। [कीं] सूडघेणें हें मा
झें। मी परत देईन। [असें] प्रभू ह्मणतो।। २० यास्तव
जर तुझा वैरी भुकेला। तर त्याला खायाव दे। जर तो
तान्हेला। तर त्याला प्यायास दे। कां तर हें करीत असतां
तूं त्याच्या मस्तकावर अग्नीच्या इंगळांची रास करसील।।
२१ ।। वाईटाने तूं जिंकला जाउं नको। परंतु बऱ्याने वा
ईटाला जिंक ※

पर्व १३ ।। १ प्रत्येक प्राणी। वरिष्ठ अधिकारांच्या
स्वाधीन असो। कारण कीं देवाकडल्यावांचून अधिकार ना
हीं।। जे अधिकार आहेत, ते देवाकडून लावलेले आहे
त।। २ यास्तव जो अधिकाराला विरोधितो। तो देवाच्या
नेमणुकीला अडवितो। आणि जे अडवितात, ते आप
णांसीं दंड पावतील।। ३ कां तर अधिकारी जे। ते चांग
ल्यां कामांस भयरूप नव्हेत। परंतु वाईटांस [आहेत।।] आणि
तूं अधिकाराला भ्यायास मान्य नाहींस कीं काय? तूं बरें क

र। ह्मणजे त्यापासून स्तुती पावसील॥ ४ कां कीं तो तुझ्या बऱ्यासाठीं देवाचा सेवक आहे॥ परंतु जर तूं वाईट करितोस। तर भय धर। कारण कीं तो तरवार फुकट वागवीत नाहीं। कां तर जो वाईट आचरतो। त्याला तो क्रोधासाठीं देवाचा सेवक। सूड घेणारा आहे॥ ५ यास्तव क्रोधामुळें केवळ नव्हे। परंतु भावामुळेंहि आधीन होण्याचें अगत्य [आहे॥] ६ तर ह्यासाठींहि तुह्मी कर द्या। कां कीं ते ह्याच कामांत तत्पर राहात असतां। देवाचे सेवक आहेत॥ ७ यास्तव तुह्मी सर्वांस त्यांचीं देणीं भरून द्या। ज्याचा कर। त्याला कर। ज्याची जकात। त्याला जकात। ज्याचें भय त्याला भय। ज्याचा सन्मान, त्याला सन्मान असीं [द्या] ※

८ येकमेकांवर प्रीति दृजवांचून कशांत कोणाचे ऋणी होउं नका। कां तर जो दुसऱ्यावर प्रीति करितो। त्याने शास्त्र पूर्ण केलें आहे॥ ९ कारण कीं तूं व्यभिचार करूं नको। तूं हत्या करूं नको। तूं चोरी करूं नको, तूं खोटी साक्ष देउं नको। तूं लोभ करूं नको हें, आणि जर कांहीं दुसरी आज्ञा [आहे।] तर ती ह्या गोष्टींत सारांशाने घेतली आहे। कीं तूं आपल्यासारिखी आपल्या शेजाऱ्यांवर प्रीति कर॥ १० प्रीति शेजाऱ्याला वाईट करीत नाहीं। यास्तव प्रीति शास्त्राचें पूर्णकरणें आहे॥ ११ आणि प्रसंग जाणून हें [समजा,] कीं आह्मी निद्रेंतून आतांच उठावयाची वेळ [आहे।] कां तर जेव्हां आह्मी विश्वासलों। तेव्हांपेक्षां आमचें तारण जवळ आहे॥ १२ रात्र फार गेली। आणि दिवस जवळ आहे। यास्तव आह्मी अंधाराचीं कामें टाकावीं। आणि प्रकाशाचीं हातेरें आंगीं ल्यावीं॥ १३ दिवसांत [असण्या]प्रमाणे। आह्मी उत्तम प्रकारें चालावें। रंगांमध्यें व मद्यपानांमध्यें नाहीं। संभोगांमध्यें। व मदनांमध्यें नाहीं। भांडणांत व हेव्यांत नाहीं। १४ परंतु तुह्मी प्रभूयेशू

ख्रीस्त आंगीं ल्या। आणि देहाच्या वांवांसाठीं योजना करूं नका॥

पर्व १४॥ १ आणि जो विश्वासांत अबळ, त्याला अंगि
कारा। विचारांच्या ठरिवण्यांत [लागुं] नका॥ २ कोणी वि
श्वासतो, कीं सगळीं खावीं खरें। परंतु जो अशक्त, तो भा
ज्या खातो॥ ३ जो खातो, तो नखाणाऱ्याला न धिःका
रो। आणि जो खात नाहीं, तो खाणाऱ्याचा न्याय न ठर
वो। कारण कीं देवानें त्याला स्विकारलें आहे॥ ४ जो दु
सऱ्याच्या घरचाकरावर न्याय ठरवितो, तो तूं कोण? तो
आपल्या धन्याजवळ उभा राहातो, किंवा पडतो। परंतु तो
उभा राहील, कां तर त्याला उभे राहवावयास देव शक्तिमा
न आहे॥ ५ कोणी [येका] दिवसाहून [दुसरा] दिवस अधो
क [असा] ठरवितो खरें। परंतु दुसरा प्रत्येक दिवस [दुस
ऱ्यासमान] ठरवितो॥ येकयेक आपल्या मनांत पूर्ण निश्चय क
रो॥ ६ जो दिवसाला मानितो, तो प्रभूसाठीं मानितो। आ
णि जो दिवसाला मानीत नाहीं, तो प्रभूसाठीं मानीत नाहीं॥
जो खातो, तो प्रभूसाठीं खातो। कां तर तो देवासीं आभार
मानितो। आणि जो खात नाहीं तो प्रभूसाठीं खात नाहीं, आ
णि देवासीं आभार मानितो॥ ७ कां तर आह्मामध्यें
कोणी आपणासाठीं वांचत नाहीं, आणि कोणी आपणा
साठीं मरत नाहीं॥ ८ कारण कीं जर आह्मी वांचतों,
तर प्रभूसाठीं वांचतों। आणि जर आह्मी मरतों, तर प्रभू
साठीं मरतोंहि। यास्तव जर आह्मी वांचतों। किंवा मरतों,
तरीं आह्मी प्रभूचे आहों॥ ९ कां तर ह्यासाठीं ख्रीस्त मे
ला, आणि उठला आणि जिवंत राहिला, कीं तो मेलेल्यां
चा व जिवंतांचाहि प्रभू व्हावा। १० तर तूं आपल्या भावा
चा न्याय कां ठरवितोस? अथवा तूं आपल्या भावाचा धिः
कारहि कां करितोस? कारण कीं आह्मी सर्व ख्रीस्ताच्या न्या
यासनापुढें उभे राहाणार आहों॥ ११ कां तर असें लिहिलें
आहे, कीं प्रभू ह्मणतो, मी वांचतों। माझ्या समोर प्रत्ये

क गुढघा टेंकील। आणि प्रत्येक जीभ देवाशीं पतकरील॥
१२ यावरून तर आह्मामधील प्रत्येक आपला हिशेब देवा
ला देईल॥ १३ यास्तव आह्मी येकमेकांचा न्याय आणखी
न ठरवावा। परंतु त्यापेक्षां तुह्मी हा न्याय ठरवा। कीं कोणी
आपल्या भावापुढें ठेंचविणारें अथवा अडखळविणारें न ठे
वावें॥ १४ प्रभूयेशूकडून मी जाणतों। आणि विश्वासवि
लों गेलों आहें। कीं कांहीं आपणच अपवित्र नाहीं। परं
तु जो कशाला अपवित्र मोजितो। त्याला तें अपवित्र [आहे॥]
१५ परंतु जर तुझा भाउ [तुझ्या] अन्नाकडून खेद पावतो।
तर तेव्हांपासून तूं प्रीतीप्रमाणे चालत नाहींस॥ ज्यासाठीं
ख्रीस्त मेला, त्याचा नाश तूं आपल्या अन्नानें करूं नको॥
१६ तर तुमचें जें चांगलें, तें निंदलें जाउं देउं नका॥
१७ कां तर देवाचें राज्य। तें खाणें व पिणें नाहीं। परं
तु पुण्य। व समाधान; व पवित्रआत्म्याकडून आनंद॥ १८ का
रण कीं जो ह्यांविषयीं ख्रीस्ताची सेवा करितो। तो देवाला
फार आवडता। आणि माणसांशीं पतवान आहे॥ १९ ह्या
स्तव समाधानाचीं जीं। आणि येकमेकांस रचण्याचीं जीं, त्यां
स आह्मी अनुसरावें॥ २० अन्नाकरितां देवाचें काम मोडून
टाकूं नको॥ अवघीं शुद्ध [आहेत] खरें। परंतु जो माणु
स ठेंचविण्याकडून खातो। त्याला वाईट [आहे॥] २१ मांसा
ली न खाणे, आणि द्राक्षरस न पिणे। आणि जेणेकडून तु
झा भाउ ठेंचतो, किंवा अडखळतो। किंवा अशक्त होतो।
तें [न करणें।] हें बरें [आहे॥] २२ तुला विश्वास आहे?
तो आपणाशीं देवासमोर असो॥ जो कशाला बरें मानण्यानें
आपणास अन्यायी ठरवीत नाहीं, तो धन्य॥ २३ जो संश
य धरितो तो जर खातो, तर तो दंडला जातो। कां तर
विश्वासानें [खात] नाहीं। आणि जें कांहीं विश्वासानें नाहीं,
तें पाप आहे ※

पर्व १५॥ १ तर जे शक्तिमान ते आह्मी अशक्तांचीं अ
बळपणें वागवायास बांधले आहों, आणि आह्मी आपणां
स न संतोषवावें॥ २ तर आह्मांमधील प्रत्येक [आपल्या] शे
जाऱ्याला बऱ्यासाठीं रचण्याकरितां, संतोषवो। ३ कां तर
ख्रीस्तानेंहि आपणाला संतोषविलें नाहीं। परंतु लिहिलेल्याप्र
माणें [जालें, कीं] ज्यानीं तुला निंदिलें, त्यांच्या निंदा म
जवर पडल्या॥ ४ तर जितकीं पूर्वीं लिहिलीं। तितकीं आ
मच्या उपदेशासाठीं पूर्वीं लिहिलीं होतीं। अशास्तव कीं सह
नता व धर्मलेखांतील संबोध, यांकडून आह्मास आशा व्हावी॥
५ आणि सहनता व संबोध, ह्यांच्या देवानें तुह्मास असें द्या
वें, कीं तुह्मी, ख्रीस्तयेशूप्रमाणे, येकमेकांविषयीं तेंच चिं
तावें। ६ यासाठीं कीं तुह्मी। येकचित्तेंकडून येकमुखानें दे
वाचें, ह्मणजे आमच्या प्रभूयेशूख्रीस्ताच्या बापाचें गौरव क
रावें॥ ७ यास्तव देवाच्या गौरवासाठीं। जसें ख्रीस्तानें आह्मा
स अंगिकारिलें, तसें तुह्मी येकमेकांस अंगिकारा॥ ८ आ
णि मी ह्मणतों। कीं देवाच्या खरेपणाकरितां येशूख्रीस्त सुं
तीजातीचा सेवक ह्यासाठीं जाला। कीं पूर्वजांसीं जीं वच
नें [केलीं होतीं,] त्यांस आपण स्थिरवावें। ९ आणि
राष्ट्रानी दयेकरितां देवाचें गौरव करावें। जसें लिहि
लें तसें। [कीं] ह्यासाठीं मी राष्ट्रांमध्यें तुजसीं पत्करीन,
आणि तुझ्या नांवानें गाईन॥ १० आणि फिरोन तो ह्मण
तो, अहो राष्ट्रें, तुह्मी त्याच्या लोकांसहीत आनंद क
रा॥ ११ आणि फिरोन, अहो सर्व राष्ट्रें, तुह्मी प्रभूची स्तु
ती करा। आणि सर्व लोकांहो, तुह्मी त्याला फार स्तवा॥
१२ आणि फिरोन यशाया ह्मणतो, कीं इशायचें मूळ, ह्मणजे
जो राष्ट्रांचें राज्य करायाला उभा राहील, तो होईल, आणि
त्याजवर राष्ट्रें आशा ठेवितील॥ १३ तर पवित्रआत्म्याच्या
सामर्थ्यानें तुह्मास फार आशा व्हावी। ह्मणोन आशेचा देव
तुह्मास, विश्वास धरण्यांत सर्वआनंदानें, आणि समाधाना

ने भरा॥ १४ आणि अहो माझे भाऊ। मी स्वतांच तु
ह्माविषयीं विश्वासविलों आहें। कीं तुह्मी आपण चांगले
पणाने भरले। सर्व जाणण्याने पुरविलेले। येकमेकांस बोधायास
हि शक्तिमान आहां॥ १५ परंतु अहो भाऊ। जी कृपा देवाकडून
मजवर ठेविली तिजकडून, तुह्मास आठवण फिरोन देत अ
सतां। ह्या विशेष धीटपणाने तुह्मास लिहिलें आहे। १६
यासाठीं कीं देवाच्या सुवर्तमानाचें उपाध्यपण करीत अस
तां। ह्या राष्ट्रांसाठीं येशू ख्रीस्ताचा सेवक व्हावें। अशा
स्तव कीं राष्ट्रांचें अर्पण पवित्रआत्म्याकडून पवित्र केलें
होऊन। फार ग्राह्य व्हावें॥ १७ यास्तव ख्रीस्त येशू
कडून। देवाविषयीं जीं। त्यांवरून मला नांवाजणें आहे॥
१८ कारण कीं ह्यांतील कांहीं। राष्ट्रांच्या बोलण्यांती
ल व करण्यांतीच मान्यतेकरितां। ख्रीस्ताने मजकडून न घड
विलें। [असें] मी बोलूं धजणार नाहीं॥ १९ चमत्कारांच्या
व उत्पातांच्या सामर्थ्याने। देवाच्या आत्म्याच्या सामर्थ्याने [घड
विलें।] असें कीं यरूशलेमापासून चहूंकडे इल्लुरिकमापर्यंत। ह्या
ख्रीस्ताचें सुवर्तमान पूर्ण सांगितलें आहे॥ २० आणि मी असें
निजध्यासी [होतों।] कीं सुवर्तमान सांगावें, ह्या दुसऱ्याचा पाया
यावर न रचावें, ह्मणोन जेथे ख्रीस्ताचें नांव घेतलें होतें,
तेथे नाहीं। २१ परंतु लिहिलेल्याप्रमाणे। कीं त्याविषयीं ज्यां
स सांगितलें नव्हतें। ते पाहातील। आणि ज्यांनी ऐकिलें ना
हीं। ते समजतील॥ २२ आणि त्याकरितां मी तुह्माजव
ळ यावयास फार अडला गेलों। २३ परंतु आतां ह्यां
प्रांतखंडांमध्यें मला आणखी ठिकाण नसतां, आणि बहु
त वर्षें तुह्माजवळ येण्यास फार इच्छीत असतां। २४ जेव्हां
मी स्पानीकडे जातों। तेव्हां तुह्माजवळ येईन। कां तर मी
पार जातांना। तुह्मास पाहायास। आणि जर मी तुमच्या
ने कांहीं तृप्त असेन। तर तुह्माकडून तेथे पोहंचविला जाण्या
स इच्छितों॥ २५ परंतु आतां मी। पवित्रांस सेवितां। य

रूशलेमास जातों ॥ २६ कां तर माकेद्नी व आखाई यां
स। यरूशलेमांत जे पवित्र, त्यांतल्या दरिद्र्यांसों कांहीं वां
टादान करायास आवडलें आहे ॥ २७ त्यांस तर आवडलें, आ
णि ते त्यांचे ऋणी आहेत। कां कीं त्यांनी आपलीं जीं आत्मीक।
तीं जर राष्ट्रांसीं वांटलीं। तर ते दैहीक जीं त्यांकडून त्यांची
सेवा करायास बांधले आहेत। २८ यास्तव हें समाप्त करून।
आणि त्यांसीं हें फळ शिक्कावून। मी माघारें तुह्माकडून स्पा
नीस जाईन ॥ २९ आणि मी तुह्माजवळ येतां ख्रीस्ताच्या सु
वर्तमानआशिर्वादाच्या पूर्णपणानें येईन, हें मी जाणतों ॥
३० आणि अहो भाऊ, आमचा प्रभूयेशूख्रीस्त यावरून।
आणि आत्म्याच्या प्रीतीवरून। मी तुह्मास विनंती करितों।
कीं तुह्मी मजसाठीं देवाजवळ प्रार्थनांमध्यें माझ्या सहीत प्रयत्न
करावा। ३१ यासाठीं कीं यहूद्यांत जे अविश्वासी। त्यांपा
सून मी सोडविला जावा। आणि यासाठीं, कीं माझें वांटादान जें
यरूशलेमासाठीं [आहे।] तें पवित्रांजवळ सुग्राह्य व्हावें।
३२ यासाठीं कीं देवाच्या इच्छेकडून। म्या आनंदानें तुह्माज
वळ यावें। आणि तुह्मासहीत विसांवा पावावा॥ ३३ तर
समाधानाचा देव तुह्मा अवघ्यांसहीत [असो॥] आमेन ※

पर्व १६ ॥ १ आणखी। आमची बहीण फेबी। जी कें
ख्रयांतील मंडळीची सेवक आहे। तिला मी तुह्माजवळ त्या
साठीं वाखाणितों। २ कीं जसें पवित्रांस योग्य तसें। तुह्मी
प्रभूविषयीं तिला अंगिकारावें। आणि ज्या कामाविषयीं तु
मचें अगत्य तिला असेल। त्याविषयीं तुह्मी तीचें साह्य क
रावें। कां तर ती आपणच बहुतांची, आणि स्वतां माझी
साह्यकरणारी जाली ॥ ३ प्रीस्कीला व आकुला जीं ख्री
स्तयेशूविषयीं मजसहीत कामकरी, त्यांस क्षेम द्या॥
४ त्यांनी माझ्या जिवासाठीं आपली मान खालीं ठेविली आहे।
त्यांचा उपकार केवळ मीच मानीत नाहीं, परंतु [इतर]
राष्ट्रांतील सर्व मंडळ्याहि [मानितात॥] ५ आणि जो मंडळी त्यां

च्या घरांत आहे। तिला [क्षेम द्या ॥] एपाईनेतस माझा प्री
य, जो ख्रीस्तासाठीं आखाईचा प्रथम उपज आहे, त्याला
क्षेम द्या ॥ ६ मार्या जिने आमच्या साठीं बहुत श्रम केले। ति
ला क्षेम द्या ॥ ७ आंद्रनीकस व यूनियास। जे माझे गोत्रज, आ
णि माझे सोबती बंदिवान। त्यांस क्षेम द्या॥ ते प्रेषितांमध्यें नामां
कीत आहेत। आणि माझ्या पूर्वीं ख्रीस्ताकडले झाले ॥ ८ आंप्ली
यास जो प्रभूविषयीं माझा प्रीय। त्याला क्षेम द्या ॥ ९ उर
बानस। जो ख्रीस्ताविषयीं आमचा सोबती कामकरी। आणि
माझा प्रीय स्ताखुस। त्यांस क्षेम द्या॥ १० आपेल्लेस। जो
ख्रीस्ताविषयीं पारखलेला आहे। त्याला क्षेम द्या॥ आरीस्तबू
लसाच्यांतील जे, त्यांस क्षेम द्या ॥ ११ हेरोदियोन जो माझा
गोत्रज। त्याला क्षेम द्या॥ नार्कीस्ससाचे जे प्रभूकडले आहेत।
त्यांस क्षेम द्या॥ १२ त्रुफाइना व त्रुफोसा, जे प्रभूसाठीं
श्रम करितात, त्यांस क्षेम द्या ॥ पेर्सीस जी प्रीय। जिने प्रभू
साठीं बहुत श्रम केले, तिला क्षेम द्या ॥ १३ रूफस जो प्रभूकडून
निवडलेला। त्याला आणि त्याची व माझी आई। हिला क्षे
म द्या॥ १४ आसुंक्रितस। फलेगन। हेर्मास। पात्रबास।
हेर्मेस। यांस व यांच्या संगतीं जे भाऊ। यांस क्षेम द्या॥
१५ फिललगस व यूलिया। नेरूस। व त्याची बहीण। व अ
लुंपास। यांस व यांच्या सह्रीत सर्व जे पवित्र। यांस क्षेम
द्या॥ १६ पवित्र चुंबनाने येकमेकांस क्षेम द्या॥ ख्रीस्ताच्या
मंडळ्या तुह्मास क्षेम देतात॥ १७ आणि अहो भाऊ।
मी तुह्मास विनंती करितों, कीं जो उपदेश तुह्मी शिकलां,
त्याविरुद्ध जे तुह्मामध्यें फुटा व अडखळवणीं करितात। त्यां
स न्याहाळा। आणि त्यांपासून वळा॥ १८ यास्तव कीं जे असे
[आहेत।] ते। आमचा प्रभू येशू ख्रीस्त याची सेवा नाहीं। परं
तु आपल्या पोटाची करितात॥ आणि कनवाळू गोष्टी। व
स्तुती गोष्टी यांकडून भोळ्यांच्या अंतःकरणांस भुलवितात॥
१९ तुमच्या मानण्याचें [वर्तमान] तर सर्वांपर्यंत पोहंचलें

आहे, यास्तव तुह्माविषयीं मी आनंद करितों॥ आणि मी इ
च्छितों, कीं जें चांगलें त्याविषयीं तुह्मी ज्ञानी व्हावें खरें, प
रंतु जें वाईट त्याविषयीं तुह्मी निर्लेप [व्हावें॥] २० आ
णि समाधानाचा देव साटानाला तुमच्या पायांखालीं लवकर चेंची
ल॥ आमचा प्रभू येशू ख्रीस्त याची कृपा तुह्मासहीत [असो]
आमेन ※

२१ तिमथ्यस, जो माझा सोबतीकामकरी तो, व
लूकयस, व यासोन, व सोसिपातेर, जे माझे गोत्रज, ते
तुह्मास क्षेम देतात॥ २२ तेर्तयस, ज्यानें [हें] पत्र लिहिलें,
तो मी तुह्मास प्रभूविषयीं क्षेम देतों॥ २३ माझा व सर्व
मंडळीचा आतिथ्यकर्ता, जो गायस तो तुह्मास क्षेम देतो॥ एरा
स्तस, जो नगराचा कारभारी, व कुवार्तस, जो भाउ, हे
तुह्मास क्षेम देतात॥ २४ आमचा प्रभू येशू ख्रीस्त याची कृ
पा तुह्मा सवव्यांसहीत [असो॥] आमेन॥ २५ तर माझें
सुवर्तमान, आणि येशू ख्रीस्तसंबंधी गाजवणें यांकडून, [ह्मणजे]
जें गौप्य सर्वकाळांच्यां काळांत मौन्य राखिलें होतें त्याकडून
तुह्मास स्थीर करायास शक्तिमान, त्याला [गौरव असो॥]
२६ तें [गौप्य] तरीं विश्वासाच्या मान्यतेसाठीं सर्वकाळीक
देवाच्या नेमणुकीप्रमाणें भविष्यार्थक लिहिणीं यांकडूनहि
आतां उघडें केलें असतां, सर्व राष्ट्रांस कळविलें [आहे।]
२७ केवळ ज्ञानी देवाला येशू ख्रीस्तावरून सर्वकाळंपर्यंत गौ
रव [असो॥] आमेन ※

करींथकरांस पाऊलसाचें पहिलें पत्र ॥

पर्व १ ॥ १। २ देवाची जी मंडळी करींथांत आहे।
[ह्मणजे] ख्रीस्तयेशूकडून [जे] पवित्र जालेले। पवित्र ह्मणवि
लेले त्यांस। [आणि त्यां]सुद्धां सर्वठिकाणीं जे सर्व आमच्या
प्रभूयेशूख्रीस्ताचें नांव घेतात। तो त्यांचा व आमचाहि [प्रभू।]
त्यांस। देवाच्या इच्छेकडून पाऊलस। येशूख्रीस्ताचा प्रेषीत ह्मण
विलेला। तो आणि सोस्थेनेसभाऊ। ते [असें लिहितात।
कीं।] ३ आमचा बाप [जो] देव। व प्रभूयेशूख्रीस्त। यांपा
सून तुह्मांकीं कृपा व समाधान [असो] ※

४ ख्रीस्तयेशूकडून देवाची जी कृपा तुह्मावर ठेविली ती
वरून मी आपल्या देवाजवळ तुह्माविषयीं सर्वदां आभारस्तुती
करितों ॥ ५ कारण कीं तुह्मी अवघ्यांत। त्याकडून। अवघ्या
बोलाण्यांत व अवघ्या जाणण्यांत धनवान जालां आहां। ६ अ
सी ख्रीस्ताची साक्ष तुह्मामध्यें स्थिरावली गेली तसें। ७ असें
कीं तुह्मी, आमच्या प्रभूयेशूख्रीस्ताच्या प्रगटण्याची वाट, पा
हात असतां, कोणत्याहि कृपादानांत उणे न जालां ॥ ८ आणि
सेवटापर्यंत तोच। आमचा प्रभू येशूख्रीस्त याच्या दिवशीं। तु
ह्मास अपराधविरहीत करील ॥ ९ देव। ज्याकडून आपला पुत्र
येशूख्रीस्त आमचा प्रभू। याच्या भागीपणासाठीं तुह्मी ह्मणविले
आहां। तो विश्वासू [आहे] ※

१० आणि अहो भाऊ। तुह्मी सर्वांनी येकच बोलावें।
आणि तुह्मामध्यें फुटी न व्हाव्या। परंतु तुह्मी येकच मना
नें व येकच मतानें यथास्थीत जडलें व्हावें। ह्मणोन आमचा

प्रभू येशू ख्रीस्त याच्या नांवानें मी तुह्मास विनंती करितों ॥
११ कां तर । अहो माझे भाऊ, ख्लवेचे जे त्यांकडून म
ला तुह्माविषयीं असें विदीत जालें, कीं तुह्मामध्यें भांडणें
आहेत॥ १२ आणि मी हें सांगतों । कीं तुह्मामध्यें प्रत्येक
ह्मणतो , मी तर पाऊलसाचा । आणि मी आपलोसाचा । आणि
मी कैफाचा । आणि मी ख्रीस्ताचा आहें॥ १३ ख्रीस्त विभागला
आहे कीं काय? पाऊलस तुह्मासाठीं खांबीं दिल्हा गेला कीं का
य? किंवा पाऊलसाच्यां नांवासाठीं तुमचा बाप्तीस्मा जाला कीं
काय? १४ मी देवाशीं आभारस्तुती यासाठीं करितों । कीं
क्रीस्पस व गायस , त्यांवांचून म्या तुह्मामधील कोणाचा बा
प्तीस्मा केला नाहीं । १५ यासाठीं कीं कोणी न ह्मणावें । कीं
म्या आपल्यां नांवासाठीं बाप्तीस्मा केला॥ १६ आणि म्या
स्तेफानसाच्या कुटुंबाचाहि बाप्तीस्मा केला । आणखी दुसऱ्या
कोणाचा बाप्तीस्मा केला, हें मला कळलें नाहीं ※

१७ कां तर ख्रीस्तानें मला बाप्तीस्मा करायास पाठवि
लें नाहीं । परंतु सुवर्तमान सांगायास । ख्रीस्ताचा मरणखांब नि
ष्कामी न व्हावा , ह्मणोन बोलण्याच्या ज्ञानानें असें नव्हे ॥ १८ कां
तर जे नाश पावतात , त्यांस मरणखांबाची गोष्ट मूर्खपण आहे
खरें । परंतु जे तारले । त्यां आह्मास ती देवाचें सामर्थ्य आ
हे । १९ कारण कीं [हें] लिहिलें आहे । मी ज्ञान्यांचें ज्ञान
नाशीन । आणि बुद्धिमंतांची बुद्धी अव्हेरीन ॥ २० ज्ञानी
कोठें? पंडीत कोठें? ह्या जगाचा प्रतिवादी कोठें? देवानें
ह्या जगाचें ज्ञान मूर्खरूप केलें नाहीं कीं काय? २१ कां
तर देवाच्या ज्ञानाकडून । जगानें ज्ञानाकडून देवाला जाणलें
नाहीं । यावरून देवाला [हें] बरें वाटलें, [कीं] गाजवण्या
च्या मूर्खपणाकडून विश्वासणाऱ्यांस तारावें । २२ यहूदी सा
क्षात्कार मागतात । व हेल्लासी ज्ञान शोधितात । यावरूनहि ॥
२३ परंतु खांबीं दिल्हेला ख्रीस्त । त्याला आह्मी गाजवितों ।
हें यहूद्यांस अडखळण खरें , आणि हेल्लास्यांस मूर्खपण ।

२४ परंतु जे यहूदी व हेल्लासीहि ह्मणविलेले, त्यांसी देवा
चें सामर्थ्यरूप व देवाचें ज्ञानरूप [असा] ख्रीस्त त्याला [गाजवितों॥]
२५ वास्तव कीं देवाचें मूर्खपण माणसांपेक्षां अधीक ज्ञानी
आहे। आणि देवाचें जें अबळ। तें माणसांपेक्षां अधीक बळ
कट आहे॥ २६ कीं तर अहो भाऊ। तुमचें ह्मणवणें
तुह्मी पाहातां। कीं देहाप्रमाणे ज्ञानी [असे] बहुत [ह्मण
विले] नाहींत। बहुत पराक्रमी नाहींत। बहुत सुकुलीन ना
हींत। २७ परंतु ज्ञान्यांस लाजवावयास, देवानें जगांतील
जीं मूर्ख। त्यांस निवडिलें आहे। आणि बळवान जीं त्यांस
लाजवावयास, देवानें जगांतील अबळ जीं। त्यांस निवडिलें
आहे। २८ आणि जगांतील जीं अकुलीन। व जीं धिःका
रलेलीं। आणि नसणारीं। त्यांस देवानें असणाऱ्यांस निष्का
मी करावयास ह्यासाठीं निवडिलें। २९ कीं त्याच्या समोर।
देहजातींतल्या कोणी ताठा न करावा॥ ३० आणि तुह्मी ख्री
स्त येशूकडून त्याचे आहां। हा। देवापासून। आह्मास ज्ञानरूप।
व पुण्यरूप। व पवित्रपणरूप। व खंडणीरूप ह्यासाठीं जा
ला आहे। ३१ कीं जसें लिहिलें तसें [व्हावें। कीं] जो ता
ठा करितो। तो प्रभूविषयीं ताठा करो ※

पर्व २॥ १ आणि अहो भाऊ। मी तुह्माजवळ येत अ
सतां, बोलण्याच्या अथवा ज्ञानाच्या उत्कृष्टपणाकडून देवाची
साक्ष तुह्मास सांगत आलों नाहीं। २ कारण कीं येशू
ख्रीस्त। आणि तोच खांबीं दिल्हेला यांवांचून कांहीं तुह्मां
मध्यें न जाणावें ह्मणोन म्या ठरविलें होतें॥ ३ आणि मी तु
ह्माजवळ अबळपणांत। व भयांत व फार कांपण्यांत होतों॥
४ आणि माझें बोलणें, व माझें गाजवणें। हीं मनुष्यज्ञानाच्या मो
हक गोष्टींकडून नव्हतीं। परंतु आत्म्याच्या व सामर्थ्याच्या दाखवि
ण्याकडून [होतीं।] ५ ह्यासाठीं कीं तुमचा विश्वास माणसांच्या
ज्ञानाकडून नसावा। परंतु देवाच्या सामर्थ्याकडून [व्हावा ※]
६ तथापि जे पूर्ण त्यांमध्यें आह्मी ज्ञान बोलतों। परंतु

ह्या जगाचें नाहीं। आणि ह्या जगाचे अधिकारी. जे काढून टा
किले जातात। त्यांचें [ज्ञान] नाहीं॥ ७ [त्या]वेगळें आह्मी दे
वाचें गौप्यांतील ज्ञान। जें गुप्त ठेविलें [होतें,] जें देवाने पूर्वी
काळांच्या आगोधर। आमच्या गौरवाकरितां नेमिलें, तें आ
ह्मी सांगतों॥ ८ तें ह्या जगाच्यां अधिकाऱ्यांतल्या कोणी
जाणलें नाहीं। कां कीं जर त्यानी जाणलें असतें। तर गौर
वीप्रभूला खांबीं दिल्हें नसतें॥ ९ परंतु जसें लिहिलेलें तसें
[आहे।] कीं देवाने आपल्या प्रीतिकरणाऱ्यांसाठीं जीं सिद्ध
केलीं। तीं डोळ्याने पाहिलीं नाहींत। आणि कानाने ऐकिलीं
नाहींत। आणि माणसाच्या अंतःकरणांत आलीं नाहींत॥
१० परंतु देवाने आपल्या आत्म्याकडून आह्मासीं प्रगट केलीं
आहेत। कां तर आत्मा अवघीं शोधितो देवाचीं खोल
पणेंहि॥ ११ कां कीं माणसाचीं जो तीं। त्यांतील मनुष्यआ
त्म्यावांचून, माणसांतल्या कोणास कळलीं? तसें देवाचीं जीं।
तींहि देवाच्या आत्म्यावांचून कोणाला कळलीं नाहींत॥ १२ आ
णि आह्मी जगाचा आत्मा पावलों नाहीं, परंतु जो आत्मा दे
वापासून तो ह्यासाठीं [पावलों,] कीं जीं देवाने कृपेकडून आ
ह्मास दिल्हीं। तीं आह्मी जाणावीं॥ १३ आणि तीं आह्मी
बोलतों, मानवीज्ञानाच्या शिकविलेल्या गोष्टी त्यांकडून नाहीं।
परंतु आत्मीक जीं त्यांस आत्मीकांच्या संगतीने ठरवीत असतां,
पवित्रआत्म्याच्यां शिकविलेल्यां [गोष्टीं]कडून [बोलतों॥] १४ प
रंतु संसारीक माणूस देवाच्या आत्म्याचीं जीं। तीं घेत नाहीं।
कारण कीं तीं त्याला मूर्खपण आहेत। आणि त्यांचा निवाडा आ
त्म्याच्या प्रकारें होतो। यास्तव त्याच्याने [त्यांस] जाणवत नाहीं॥
१५ परंतु जो आत्मीक। तो अवघीं निवडितो खरें। तथा
पि तो आपण कोणाकडूनहि निवडला जात नाहीं॥ १६ कां
तर प्रभूचें मन कोणी असें जाणलें कीं त्याला बोधील? प
रंतु आह्मास ख्रीस्ताचें मन आहे ॐ

पर्व ३॥ १ आणि अहो भाऊ। मी जसें आत्मिकांस तसें तुह्मा
स बोलुं न शकलों। परंतु जसें दैहिकांस तसें। ख्रीस्ताकडील बाळ
कांस तसें॥ २ म्या तुह्मास दूध पाजिलें। पण खाद्य नाहीं।
कारण कीं तोंपर्यंत [तें घ्यावयाला] तुह्मास शक्ती नव्हती।
आणखी आतांपर्यंतहि तुह्मास शक्ती नाहीं। ३ कारण कीं तुह्मी
आझून दैहीक आहां। कां तर जोंपर्यंत तुह्मामध्यें हेवा। व
भांडण। व फुटी। तोंपर्यंत तुह्मी दैहीक आणि माणसासारि
खे चालत नाहीं कीं काय? ४ आणखी जेव्हां कोणी ह्मण
तो। मी तर पाऊलसाचा आहें। आणि दुसरा [ह्मणतो।]
मी आपल्लोसाचा [आहें।] तेव्हां तुह्मी दैहीक नाहीं कीं
काय? ॐ

५ पाऊलस तरीं कोण आहे? आणि आपल्लोस कोण?
केवळ सेवक। जसें प्रभूने प्रत्येकाला दिल्हें। तसें त्यांकडून तुह्मी
विश्वासलां॥ ६ म्या लाविलें। आपल्लोसाने शिंपिलें, परंतु देवाने
वाढविलें आहे॥ ७ यास्तव जो लावितो तो कांहीं नाहीं। आणि
जो शिंपितो तोहि [कांहीं] नाहीं। परंतु देव जो वाढवितो। तो
[आहे॥] ८ आणि लावणारा। व शिंपणारा हे येक आहेत।
आणि प्रत्येक आपल्या श्रमाप्रमाणे आपलें वेतन पावेल॥
९ कारण कीं आह्मी देवासहीत कामकरी आहों। तुह्मी दे
वाचें शेत। देवाचें रचणें आहां॥ १० देवाची कृपा जी
मजवर ठेविली, तीजप्रमाणे म्या ज्ञानी घरबांधणाऱ्यासा
रिखें पाया घातला। आणि दुसरा त्यावर बांधितो। परं
तु प्रत्येक त्यावर कसें बांधितो, याविषयीं न्याहाळो॥ ११ कां
तर घातलेला पाया, जो येशू ख्रीस्त आहे। त्यावांचून दु
सरा, कोणी घालुं शकत नाहीं॥ १२ आणि जर कोणी ह्या
पायावर सोनें। रुपें। उंच पाषाण। लांकुड, गवत। धस्कट।
बांधितो। १३ तर प्रत्येकाचें काम प्रगट होईल। कां
तर तो दिवस त्याला स्पष्ट करील। कारण कीं अग्नीने प्र
गट होईल। आणि प्रत्येकाचें काम कशाचें आहे। हें अग्नी

पाग्खील॥ १४ त्यावर जें काम कोणी बांधिलें, तें जर रा
होल, तर तो वेतन पावेल॥ १५ जर कोणाचें काम जळून जाईल।
तर त्याची हानी होईल। तथापि तो आपण तारला जाई
ल। परंतु जसें अग्नीमधून तसें॥ १६ तुह्मी देवाचें देऊ
ळ आहां, आणि तुह्मामध्यें देवाचा आत्मा राहातो, हें तु
ह्मास कळलें नाहीं कीं काय? १७ जर कोणी देवाच्या देव
ळास नाशितो, तर देव त्याला नाशील। कां तर देवाचें जें दे
ऊळ तुह्मी आहां। तें पवित्र आहे॥ १८ कोणी आपणाला
न ठकवो। जर तुह्मामध्यें कोणाला असें वाटतें, कीं आपण ह्या
जगांत ज्ञानी आहें। तर तो ज्ञानी होण्याकरितां मूर्ख होवो॥
१९ कां कीं देवाजवळ ह्या जगाचें ज्ञान मूर्खपण आहे।
कां तर असें लिहिलें आहे। कीं तो ज्ञान्यांस त्यांच्या का
व्याने धरितो॥ २० आणि फिरोन, प्रभू ज्ञान्यांचे विचार जा
णतो। कीं ते व्यर्थ आहेत॥ २१ यास्तव कोणी माणसांवि
षयीं ताठा न करो। कां तर अवघीं तुमचीं आहेत।
२२ जर पाउलस। किंवा आपलोस, किंवा केफा। किंवा ज
ग। किंवा जीव। किंवा मरण। किंवा सध्या जीं तीं। किंवा जीं
व्हायाचीं तीं। अवघीं तुमचीं आहेत। २३ आणि तुह्मी
ख्रीस्ताचे [आहां।] आणि ख्रीस्त देवाचा [आहे] ※
पर्व ४॥ १ माणुस आह्मास असें मोजो। कीं ख्रीस्ता
चे हस्तकी। आणि देवाच्या गोप्यांचे कारभारी॥ २ आ
णि हें विशेष। कारभाऱ्यांविषयीं असें मागितलें आहे। कीं
कोणी विश्वासू सांपडावा॥ ३ परंतु तुह्मांकडून। किंवा मा
नवी दिवसाकडून, माझा निवाडा केला जावा। हें मला फा
र लाहान आहे। होय, मीहि आपलाच निवाडा करीत ना
हीं॥ ४ यास्तव कीं मी आपणाशीं कांहीं जाणत नाहीं। त
थापि मी ह्यावरून पुण्यवान ठरविला जात नाहीं। परंतु जो
माझा निवाडा करितो। तो प्रभू आहे॥ ५ यास्तव प्रभू येई
ल तोंपर्यंत तुह्मी कशाचा न्याय काळापूर्वीं ठरवूं नका। तो

च अंधाराचीं जीं लपविलेलीं तीं प्रकाशवील। आणि हृदयां च्या योजना उघड्या करील। आणि तेव्हां प्रत्येकाची स्तुती देवापासून होईल॥

६ आणि अहो भाऊ। तुमच्या साठीं म्या हीं दाखल्या ने आपल्यादर व आपल्लोसावर ह्याकरितां उतरविलीं आहेत। कीं जें लिहिलेलें, त्यापेक्षां न मोजायास तुह्मी शिकावें। ह्मण जे येकाने येकासाठीं दुसऱ्याविरुद्ध फुगलें न जावें॥ ७ आ णखी तुला कोण वेगळें करितो? आणि जें तूं पावला नाहींस, असें तुला काय आहे? आणि आतां जर तूं पावलास च। तर न पावल्यासारिखें ताठा कां करितोस? ८ आतां तुह्मी तृप्त आहां। आतां तुह्मी मनस्वार जालां आहां। तुह्मी आह्मांवांचून राज्य केलें आहे। आणि तुह्मी राज्य केल्याने मला बरें असतें। ह्मणजे आह्मीहि तुह्मासहीत राज्य करूं। ९ कां तर मला असें वाटतें। कीं आह्मा प्रे षितांस मरणासाठीं शेवटीं नेमलेले, असे देवाने ह्याकरितां प्रगट दाखविले, कीं आह्मी जगाला व दूतांस व माणसां स देखाव व्हावें॥ १० ख्रीस्तामुळें आह्मी मूर्ख। परंतु तुह्मी ख्रीस्ताकडून बुद्धिमंत [आहां॥] आह्मी अबळ। परंतु तुह्मी सबळ [आहां॥] तुह्मी गौरववान। परंतु आह्मी अपमान ले [आहों॥] ११ सध्या घटकेपर्यंत आह्मास भूक व त हानहि लागती। आणि आह्मी नागवे आहों। आणि चा पट मारले जातों। आणि आह्मास कायम स्थळ नाहीं॥ १२ आ णि आह्मी आपल्यां हातांनी खपतां श्रम करितों। गांजिले अस तां आह्मी आशिर्वाद देतों। [आमच्या] पाठीस लागलें अस तां। आह्मी साहातों॥ १३ निंदले असतां। आह्मी विनं ती करितों। जगाचें खस [आणि] सर्वांचो उटोवलेली केंदर यासारिखे आह्मी आजपावेतों जालों आहों॥ १४ मी तुह्मा स भोड भरवितां हीं लिहीत नाहीं। परंतु माझ्या प्रीयलें करांसारिखें तुह्मास बोधितों॥ १५ कां तर जरी तुह्मास

ख्रीस्ताविषयीं दाहा हजार पंतोजी । तथापि तुम्हास बहुत बा
प नाहींत ॥ म्या तर ख्रीस्तयेशूविषयीं तुम्हास सुवर्तमानाक
डून जन्मविलें आहे ॥ १६ यास्तव मी तुम्हास विनंती करि
तों । तुम्ही माझें अनुकरण करणारे व्हा ॥ १७ या कार
णास्तव तिमथ्यस जो माझें प्रीय लेंकरूं । आणि प्रभूविषयीं
विश्वासू आहे । तो म्या तुम्हाकडे पाठविला आहे । तो ख्री
स्ताविषयीं माझे मार्ग । जसें मी सर्वत्र प्रत्येक मंडळींत उप
देशितों । तसी तुम्हास आठवण देईल ॥ १८ आणि मी तु
म्हाकडे येणार नसतां । याप्रमाणें कित्येक फुगले आहेत ।
१९ परंतु प्रभूची इच्छा असेल । तर मी तुम्हाकडे लवकर
येईन । आणि जे फुगले । त्यांची गोष्ट नव्हे । परंतु
सत्ता मी जाणेन ॥ २० कां तर देवाचें राज्य तें गो
ष्टीकडून नव्हे । परंतु सत्तेकडून ॥ २१ तुम्ही काय इच्छितां ?
मी काठीनें किंवा प्रीतीनें व नम्रतेच्या आत्म्यानें येउं कीं
काय ? ※

पर्व ५ ॥ १ सर्वच ऐकलें आहे । [कीं] तुम्हामध्यें शिंदळकी
[आहे,] आणि जसी राष्ट्रांमध्यें नामोच्चारहि पावत नाहीं ।
तसीच शिंदळकी । असी कीं कोणाला [आपल्या] बापा
ची बायको आहे ॥ २ आणि तुम्ही फुगलां आहां । आणि
त्यापेक्षां असा शोक न केला । कीं ज्यानें हें काम केलें, तो
तुम्हामधून घालविला जावा ॥ ३ मी तर शरिरानें अप्रत्यक्ष
खरें, परंतु आत्म्यानें प्रत्यक्ष असतां । ज्यानें हें काम के
लें । त्याचा न्याय, म्या इतक्यांत प्रत्यक्ष असल्यासारिखें अ
सा ठरविला आहे । ४ कीं तुम्ही आणि माझा आत्मा आ
मचा प्रभूयेशूख्रीस्ताच्या सत्तेसहीत मिळाले असतां । आ
मच्या प्रभूयेशूख्रीस्ताच्या नांवानें । ५ असाला । [त्याचा]
आत्मा प्रभूयेशूच्या दिवशीं तारला जावा । म्हणोन देहाच्या
नाशासाठीं सटानाच्या स्वाधीन करावें ॥ ६ तुमचें ताठाकर
णें बरें नाहीं । थोडें फुगवण सगळ्या गोळ्याला फुगवितें ।

हें तुह्मी न जाणतां कीं काय? ७ यास्तव, जसे तुह्मी फुगव
णावांचून आहां, तसे तुह्मी नवा गोळा व्हावें। ह्मणोन शु
द्ध होऊन जुनें फुगवण काढा, कां तर ख्रीस्त, आमचें व
ल्हांडणवल्हांडण। तो आमच्या साठीं मारला गेला आहे॥
८ यास्तव तो सण आह्मी पाळूं। जुन्या फुगवणानें नव्हे। आ
णि वाईटपण व दुष्टपण यांच्या फुगवणानें नव्हे। परंतु भो
ळेपण व खरेपण यांच्या निर्फुगवणानी॥ ९ तुह्मी शिंदळांची सं
गत न धरावी। असें म्या तुह्मांसीं पत्रांत लिहिलें होतें॥
१० तथापि ह्या जगांतील शिंदळांची। किंवा लोभीष्टांची।
किंवा हरणाऱ्यांची। किंवा मूर्तिपूजकांची सर्वस्वें [असें] नव्हे।
यास्तव कीं जर असें। तर जगांतून तुह्मास निघावें लागतें।
११ परंतु आतां म्या तुह्मास असें लिहिलें। कीं कोणी भाऊ
ह्मटलेला, जर तो शिंदळ। किंवा लोभी। किंवा मूर्तिपूजक
किंवा निंदक। किंवा मद्यपी किंवा हरणारा। तर अशाची
संगत न करावी। त्याच्या संगतीं न खावेंहि॥ १२ कां तर
जे बाहेर [आहेत।] त्यांचेंहि न्याय ठरविणें हें कशानें माझें
आहे? जे आंत त्यांचा न्याय तुह्मी ठरवीत नाहीं कीं का
य? १३ परंतु जे बाहेर त्यांचा न्याय देव ठरवितो॥ आ
णि तुह्मी आपणांमधून त्या दुष्टाला बाहेर काढा॥

पर्व ६ ॥ १ तुह्मामधील कोणाला जर दुसऱ्यासीं कार्य
आहे। तर तो पवित्रांजवळ नव्हे, परंतु अन्यायी जे त्यां
जवळ न्याय ठरवून घ्यायाला धजतो कीं काय? २ काय हें तु
ह्मास कळलें नाहीं? कीं पवित्र ते जगाचा न्याय ठरवि
तील॥ आणि जर तुमच्यानें जगाचा न्याय ठरविला जातो।
तर अगदी लाहान न्याय। यांस तुह्मी अयोग्य कीं काय?
३ आह्मी दूतांचा न्याय ठरवूं। हें तुह्मास कळलें नाहीं कीं
काय? तर आयुष्यांतील जीं। त्यांचा कां नाहीं? ४ यास्तव
जर तुह्मास आयुष्यविषयींचे न्याय आहेत खरें। तर [त्यांवर]
मंडळींतील जे धिःकारले। त्यांस बसवा॥ ५ मी तुह्मास ला

श्रवण्यासाठीं बोलतों॥ काय असेंच आहे? कीं तुह्मामध्यें ज्ञा
नी माणुस जो आपल्या भावांविषयींचा निवाडा करूं शकतो।
असा कोणच नाहीं? ६ परंतु भाउसीं भाउचा न्याय ठरविला
जातो। आणि तेंच अविश्वास्यांजवळ॥ ७ यास्तव आतां तुह्मामध्यें
अगदी उणेपण आहे खरें। कां कीं तुह्मास आपल्यां
आपल्यांसीं न्यायठरविणीं आहेत। त्यापेक्षां तुह्मी अन्याय
कां न सोसितां? त्यापेक्षां नाडलां कां न जातां? ८ परंतु
तुह्मी अन्याय करितां। व नाडितां। आणि तीं भावांस [क
रितां॥] ९ जे अन्यायी, ते देवाच्या राज्याचें वतन पाव
णार नाहींत। हें तुह्मास न कळलें कीं काय? तुह्मी ठक
विले जाउं नका। छिंदळ ते। आणि मूर्तीपूजक ते। आणि व्य
भिचारी ते, आणि बायकोरूपी ते। आणि पुरूषसंभोगी
ते। १० आणि चोरटे। आणि लोभी ते। आणि मद्यपी ते।
[आणि] निंदक ते। [आणि] हरणारे। असे देवाच्या राज्या
चें वतन पावणार नाहींत॥ ११ आणि तसे तुह्मी कित्येक
होतां। तथापि तुह्मी धुतले आहां। तथापि तुह्मी पवित्र के
ले आहां। तथापि तुह्मी प्रभूयेशूच्या नांवानें। आणि आम
च्या देवाच्या आत्म्यानें पुण्यवान ठरविले आहां॥

१२ मला अवघीं उचीत आहेत। परंतु अवघीं उपयो
गी नाहींत। मला अवघीं उचीत आहेत। परंतु मी कोणा
कडून आधीन केला जाणार नाहीं॥ १३ अन्नें पोटासाठीं।
आणि पोट अन्नांसाठीं। परंतु देव त्याचा आणि त्यांचाहि
नाश करील॥ आणि शरीर छिंदळकीसाठीं नाहीं। परंतु प्र
भूसाठीं। आणि शरिरासाठीं प्रभू॥ १४ आणि देवानें प्र
भूला उठविलें, व आपल्या सामर्थ्यानें आह्मासहि उठवील॥
१५ तुमचीं शरीरें खीस्ताचीं अंगें आहेत, हें तुह्मास क
ळलें नाहीं कीं काय? तर मी खीस्ताचीं अंगें घेऊन। वेश्येचीं
अंगें करूं कीं काय? असें नसावें॥ १६ जो वेश्येसीं जडला।
तो [तिच्या सुद्धां] एक शरीर। हें तुह्मास कळलें नाहीं कीं

कार्य? कां तर तो ह्मणतो। कीं तीं दोघें येक देह होतील॥
१७ परंतु जो प्रभूशीं जडला, तो [त्यासुद्धां] येक आत्मा
आहे॥ १८ शिंदळकीपासून पळा॥ जें प्रत्येक पाप माणुष
करीत असेल। तें शरिराबाहेर आहे। परंतु जो शिंदळ
की करितो। तो आपल्या शरिरांत पाप करितो॥ १९ का
य तुह्मास हें कळलें नाहीं? कीं जो पवित्रआत्मा तुह्मामध्यें
आहे। जो देवापासून तुह्मास आहे। त्याचें देऊळ तुमचें श
रीर आहे, आणि तुह्मी आपले नव्हां। २० कां तर तु
ह्मी मोलाने विकत घेतले गेलां। तर अगत्यें। तुमचें शरी
र। व तुमचा आत्मा। जीं देवाचीं आहेत, त्यांकडून देवा
चें गौरव करा ॥

पर्व ७ ॥ १ आणि ज्यांविषयीं तुह्मी मजशीं लिहिलें। त्यांवि
षयीं [असें आहे। कीं] पुरुषाने स्त्रीला न शिवावें। हें त्याला बरें
[आहें।] २ तथापि शिंदळक्यांमुळें प्रत्येकाला आपापली बायको
असो। आणि प्रत्येकीला आपापला नवरा असो॥ ३ नवरा
ऋणरूपी सुबुद्धी नवरीशीं भरून देवो। आणि त्याप्रमाणे नव
रीहि नवऱ्याशीं [देवो॥] ४ नवरीला आपल्या शरिराचा
अधिकार नाहीं, परंतु नवऱ्याला। आणि त्याप्रमाणे नवऱ्या
लाहि आपल्या शरिराचा अधिकार नाहीं, परंतु नवरीला॥
५ तुह्मी येकमेकाला नाडुं नका। केवळ उपासासाठीं व प्रा
र्थनेसाठीं तुह्मी मिस्तर व्हावें, ह्मणोन कांहीं वेळपावेतों
संकेताने। मग फिरोन येकच यावें। यासाठीं। कीं सटानाने
तुमच्या अदमनपणाकडून तुह्मास न छळावें॥ ६ परंतु हें,
मी संमताप्रमाणे बोलतों। आणि नेमणुकीप्रमाणे नाहीं॥ ७ कां
कीं जसा मी, तसें सर्व माणसांनी व्हावें। ह्मणोन मी इच्छि
तों। परंतु प्रत्येकाला देवापासून आपापलेंच कृपादान आहे,
येकाला याप्रमाणे खरें। आणि येकाला त्याप्रमाणे॥ ८ प
रंतु अलग्नी यांस, व विधवां यांस मी ह्मणतों, जसा मी,
तसे जर तींहि राहातात, तर त्यांस बरें आहे॥ ९ त

थापि जर तीं स्वइमनीक नाहींत। तर लग्न करोत। कारण
कीं जळणे यापेक्षां लग्न करणे बरें आहे॥ १० आणि
वडाडलेल्यांस मी आज्ञा करितों। [तथापि] मी नव्हे। प
रंतु प्रभू [करितो।] कीं नवरा नवऱ्यापासून वेगळी न होवो।
११ परंतु जर ती वेगळा होती। तर अलग्नी राहो। किंवा स
मेटाने नवऱ्याशीं फिरोन मिळो। आणि नवऱ्याने नवरीला
न सोडावें। १२ परंतु दुसऱ्यांस प्रभू नाहीं। मी बोलतों। कीं
जर कोणा भाऊला अविश्वासी बायको आहे। आणि तिला
त्यासहीत राहाणें आवडतें। तर तो तिला न सोडो।
१३ आणि ज्या स्त्रीला अविश्वासी नवरा आहे। आणि त्या
ला तिच्या सहीत राहाणे आवडतें। तर ती त्याला न सो
डो॥ १४ कां तर नवरीला अविश्वासी नवरा पवित्र आहे,
आणि नवऱ्याला अविश्वासी स्त्री पवित्र आहे। असें नसतें। तर
तुमचीं लेंकरें अशुद्ध असतीं, परंतु तीं आतां पवित्र आ
हेत॥ १५ तथापि जर अविश्वासी वेगळें होतें, तर वेग
ळें होवो॥ असांमीं भाऊ किंवा बहीण दासपणांत नाहीं।
परंतु देवाने आह्मांस समाधानांत बोलाविलें आहें॥ १६ कां
तर। हे नवरे। तूं नवऱ्याला न तारसील, हें तुला
कसें कळलें? किंवा। हे नवऱ्या। तूं नवरीला न तारसील,
हें तुला कसें कळलें? १७ केवळ जसें देवाने प्रत्येका
ला वांटलें। प्रभूने जसें प्रत्येकाला बोलाविलें। तसें तो चा
लो। आणि याप्रमाणे मी सर्व मंडळ्यांस नेम देतों॥ १८ सुं
ता केलेला कोणी जर बोलाविला आहे। तर तो असुंती न हो
वो। असुंतेंत कोणी बोलविला आहे। तर तो सुंता न घे
वो॥ १९ सुंता कांहीं नाहीं, आणि असुंता कांहीं नाहीं।
परंतु देवाच्या आज्ञा पाळणे हें [आहे॥] २० प्रत्येक ज्या
ह्मणवण्यांत ह्मणविला। त्यांत राहो॥ २१ तूं चाकर [अस
तां] बोलाविला आहेस [कीं काय?]. त्याची चिंता करूं नको।
तथापि जरीं मोकळा होण्याची शक्ती तुला आहे। तर त्या

पेक्षां तिची वहिवाट कर॥ २२ कां तर जो चाकर [अ
सतां।] प्रभूकडून बोलाविला [आहे।] तो प्रभूचा मोकळा के
लेला आहे। याप्रमाणे जो मोकळा [असतां।] बोलाविला आ
हे। तो ख्रीस्ताचा चाकर आहे॥ २३ तुह्मी मोलाने विकत
घेतले गेलां आहां। माणसांचे चाकर होउं नका॥ २४ अ
हो भाऊ। प्रत्येक। ज्यांत बोलविला। त्यांत देवाजवळ राहो॥
२५ आणि कुंवाऱ्यांविषयीं प्रभूची नेमणूक मला नाहीं। परं
तु जो विश्वासी असायास प्रभूकडून दया पावला। त्यासारिखा
मी संमत देतों॥ २६ तर प्रस्तुतसंकोचामुळें हें बरें आहे।
ह्मणजे माणुस असेंच असणे बरें। असें मला वाटतें॥ २७ तूं
काय नवरीला बांधला आहेस? तर सुटका शोधुं नको।
तूं काय नवरीपासून मोकळा आहेस? तर नवरी शोधुं न
को॥ २८ आणि जरीं तूं वऱ्हाडतोस। तर त्वां पाप केलें नाहीं।
आणि जर कुंवारि वऱ्हाडती। तर तिने पाप केलें नाहीं।
तथापि अशांस देहांत संकट होईल। परंतु मी तुमची मम
ता धरितों॥ २९ अहो भाऊ, मी हेंच ह्मणतों। [कीं]
काळ आंखूड [आहे।] शेष अर्थ असा आहे। कीं ज्यांस बा
यका आहेत। ते आपणांस नसतां असे असावे। ३० आणि
जे शोक करितात। ते शोक करीत नसते असे। आणि जे आ
नंदतात। ते आनंदत नसते असे। आणि जे विकत घेतात।
ते आपणांस नसतां असे। ३१ आणि जे ह्या जगाचा व्य
व्हार करितात। ते विपरीत व्यव्हार न कर्ते असे [असावे।]
कारण कीं ह्या जगाचें रूप गततें॥ ३२ परंतु तुह्मी चिं
तेविरहीत व्हावें। ह्मणोन मी इछितों॥ जो अलग्नी। तो।
आपण प्रभूला कसें संतोषवावें। असें प्रभूचीं जीं त्यांची चिं
ता करितो॥ ३३ परंतु जो वऱ्हाडला। तो। आपण आपल्या बा
यकोला कसें संतोषवावें। असें जगाचीं जीं त्यांची चिंता करि
तो॥ ३४ बायको व कुंवारि ह्यांत [असा] भेद आहे।
अलग्नी जी। ती आपण शरिरांत व आत्म्यांतहि पवित्र व्हावें

असें प्रभूचीं जीं त्यांची चिंता करिती। परंतु जी वह्राडली। ती ज
गाविषयीं जीं त्यांची चिंता करिती। कीं आपण आपल्या
नवऱ्याला कसें संतोषवावें॥ ३५ आणि मी तुमच्याच उ
पयोगासाठीं हें बोलतों। तुह्मावर जाळें घालायास नाहीं।
परंतु, जें उत्तमरितीचें। आणि जें ओढावोढीवांचून प्रभूपासीं
तत्पर सेवारूप त्यांसाठीं॥ ३६ परंतु जर कोणी समजतो।
कीं आपण आपल्या कुंवारिविषयीं अयोग्य करितो। जर ती
फार उपवर जाली आहे। आणि असें अगत्य आहे। तर जें इछि
लें तें करो। पाप करीत नाहीं। लग्न करोत॥ ३७ तथापि जो।
आपणाला अगत्य नसतां, अंतःकरणाने स्थीर राहातो, आणि
आपणाला आपल्या इछेविषयीं सत्ता आहे। आणि आपल्या कुंवा
रीस पाळावें, असें आपल्या अंतःकरणांत ठरविलें आहे। तो बरें
करितो॥ ३८ यास्तव जो [तिला] वह्राडतोच। तो बरें क
रितो। परंतु जो वह्राडीत नाहीं। तो त्यापेक्षां बरें करि
तो॥ ३९ नवरी। आपला नवरा जितका काळ वांचतो,
तोंपर्यंत शास्त्राकडून बांधली आहे। परंतु जर तिचा नवरा
मेला। तर ज्यासीं इछिती। त्यासीं लग्न करायास ती मोक
ळी आहे, केवळ प्रभूमध्यें त्यासीं॥ ४० परंतु माझ्या संमताप्रमा
णें जर ती तसीच राहाती, तर अधीक सुखी आहे। आणि
देवाचा आत्मा मजकडे आहे। असें मी समजतों ❋
पर्व ८ ॥ १ आतां साकारदेवाच्या नैवेद्यांविषयीं आह्मां
स कळलें। कीं आह्मा सर्वांस समज आहे। समज फुगविती,
परंतु प्रीति रचिती॥ २ आणि जर कोणी कल्पितो, कीं
आपण कांहीं जाणतों। तर ज्याप्रमाणें जाणलें पाहिजे। त्या
प्रमाणें तो अद्यापि कांहीं जाणत नाहीं॥ ३ परंतु जर को
णी देवावर प्रीति करितो, तर तो त्याकडून जाणला जातो॥
४ तर साकारदेवाचे नैवेद्य खाण्याविषयीं आह्मास कळलें। कीं
जगांतील साकारदेव कांहीं नाहीं। आणि असें। कीं येकां
वांचून दुसरा कोणी देव नाहीं॥ ५ आणि बहुत देव व ब

येत प्रभू असल्याप्रकारें। आकाशांत व पृथ्वींतहि ह्मटलेले देव
तर जरी आहेत। ६ तथापि आह्मास येकच देव। तो बाप।
त्यापासून अवघों। आणि आह्मी त्यासाठीं। आणि येकच प्रभू
येशू ख्रीस्त। त्याकडून अवघों। आणि त्याकडून आह्मी। [असें
आहे॥] ७ तथापि हा समज सर्वांस नाहीं। परंतु कित्येक।
साकारदेवाच्या भावनेने, जसा साकारदेवाचा नैवेद्य तसें खा
तात। आणि त्यांचा भाव अशक्त असतां। विटाळला जातो॥
८ परंतु भक्ष्य आह्मास देवाजवळ पाववीत नाहीं। कां कीं
जर आह्मी खातों। तर आह्मी विशेष नाहीं। आणि जर
आह्मी खात नाहीं। तर आह्मी उणे नाहीं॥ ९ परंतु हा
तुमचा अधिकार अशक्तांस अडखळण न व्हावा। ह्मणोन त्या
सांभाळा॥ १० कां तर ज्याला समज आहे। त्या तुला सा
कारदेवाच्या देवळांत जेवायास बसलेला जर कोणी पाहा
तो। तर त्याचा भाव अशक्त असतां। साकारदेवाचे नैवेद्य
खायास उभारिला जाणार नाहीं कीं काय? ११ मग तुझा
अशक्त भाऊ। ज्यासाठीं ख्रीस्त मेला। तो तुझ्या समजाकडून
नाश पावणार [नाहीं कीं काय?] १२ आणि जेव्हां तुह्मी
भाऊविरुद्ध असें पाप करितां। आणि त्यांचा अशक्त भाव मा
रितां। तेव्हां तुह्मी ख्रीस्ताविरुद्ध पाप करितां॥ १३ या
साव जर भक्ष्य माझ्या भाऊला अडखळवितें। तर माझ्या
भाऊला न अडखळावयाकरितां। म्या सर्वकाळांपर्यंत मा
सोती न खावी ※

पर्व ९॥ १ मी प्रेषीत नाहीं कीं काय? मी मोकळा
नाहीं कीं काय? येशू ख्रीस्त आमचा प्रभू। याला म्या पा
हिलें नाहीं कीं काय? प्रभूविषयीं तुह्मी माझें करतब ना
हीं कीं काय? २ जरी मी दुसऱ्यांस प्रेषीत नाहीं। तथापि
तुह्मास आहें खरें। कां तर प्रभूविषयीं तुह्मी माझ्या प्रे
षीतपणाची मोहोर आहां॥ ३ जे माझा निवाडा करितात।
त्यांस माझें प्रत्युत्तर हें आहे। ४ आह्मास खायाचा आणि

प्यायाचा अधिकार नाहीं कीं काय? ५ दुसरे प्रेषीत। आणि
प्रभूचे भाऊ। व केफा ह्यांसारिखें आह्मांसहि बहीण ना
यकोला घेऊन चहूंकडे नेण्याचा अधिकार नाहीं कीं काय?
६ अथवा केवळ मी व बार्णाबा। ह्यां आह्मांस न खपण्याचा
अधिकार नाहीं कीं काय? ७ आपल्या खर्चानी लढाईंत कोण
कधीं सेवितो? द्राक्षमळा लावून त्याचें फळ खात नाहीं
[असा] कोण? किंवा कळपाला पाळून कळपाचें दूध खात ना
हीं [असा] कोण? ८ काय। मी माणसाप्रमाणे हीं बोलतों?
किंवा शास्त्रहि हींच बोलत नाहीं कीं काय? ९ कां तर मो
शाच्या नेमशास्त्रांत [असें] लिहिलें आहे। दाणे मळणाऱ्या बैला
चा मुसकी घालुं नको॥ काय। देवाला बैलांची चिंता आहे?
१० किंवा सर्वथा आमच्या साठीं तो हें बोलतो कीं काय?
आमच्या साठीं तर लिहिलें आहे। असें कीं जो नांगरणी
करितो, तो आशेवर असावा। आणि जो आशेने मळितो,
त्याने आपली आशा भरून पावावी॥ ११ जर आह्मी आ
त्मीक जीं। तीं तुह्मासाठीं पेरिलीं, तर तुमचीं दैहीक जीं
तीं कापितों। [हें] मोठें [आहे] कीं काय? १२ जर दु
सरे तुह्मावरल्या अधिकाराचे भागीदार आहेत। तर आ
ह्मी विशेषें नाहीं कीं काय? तथापि ह्या अधिकाराची वहि
वाट आह्मी केली नाहीं। परंतु आह्मी ख्रीस्ताच्या सुवर्त
मानाला कांहीं अडचण न घालावी। ह्मणोन आह्मी अवघीं
साहातों॥ १३ काय तुह्मी न जाणतां? कीं जे उपाध्यकार्यें
करितात, ते उपाधिकांतलीं खातात। आणि जे खंडिला
सीं सिद्ध राहातात। ते खंडिलासीं भागीदार आहे
त॥ १४ तसेंहि जे सुवर्तमान सांगतात। त्यानी सुवर्तमाना
कडून वांचावें। असें प्रभूने नेमलें आहे॥ १५ परंतु म्या
ह्यांतील कशाचीहि वहिवाट केली नाहीं। आणि असें मला
प्राप्त व्हावें। ह्मणोन म्या हीं लिहिलीं नाहींत। कां तर को
णी माझें नांवाजूनघेणें निरर्थ करावें। यांपेक्षां मरणें मला

खरें आहे॥ १६ कां कीं जरी मी सुवर्तमान सांगतों। त
थापि माझें नांवाजून घेणें नाहीं। कारण कीं मला अगत्य
ता लागली। आणि जर मी सुवर्तमान, सांगत नाहीं, तर मला
हायहाय आहे॥ १७ तर मी जर हें हक्कें करितों। तर
मला वेतन आहे। परंतु जर हक्केंवांचून। तरी मला कारभार
सोंपला आहे॥ १८ यास्तव माझें वेतन काय आहे? हें।
कीं सुवर्तमानाविषयीं माझा जो अधिकार त्याची वहिवाट
म्या विपरीत न करायासाठीं ख्रीस्ताचें सुवर्तमान सांगतांना तें
खर्चाविरहित करावें॥ १९ कां तर सर्वांपासून मी मोकळा
असतांहि, अधीक मिळवावयासाठीं म्या आपणाला सर्वांचा सेवक
केलें आहे॥ २० म्या यहूद्यांस तर मिळवावें। ह्मणोन यहूद्यां
मध्यें मी यहूद्यासारिखा जालों। जे नेमशास्त्राखालचे, त्यां
स म्या मिळवावें। ह्मणोन नेमशास्त्राखालच्यांमध्यें [मी] नेमशा
स्त्राखालच्यासारिखा [जालों॥] २१ जे नेमशास्त्राविरहित त्यांस
मिळवावयासाठीं मी त्यांमध्यें नेमशास्त्राविरहित असा जालों।
तरी देवाशीं नेमशास्त्राविरहित नव्हतों। परंतु ख्रीस्ताशीं
नेमशास्त्रवान [होतों॥] २२ जे अशक्त त्यांस म्या मिळवावें
ह्मणोन मी अशक्तांशीं अशक्तांसारिखा जालों॥ म्या कित्येकां
स अवश्यें तारावें। ह्मणोन मी अवघ्यांशीं अवघीं जालों॥
२३ आणि मी हें सुवर्तमानामुळें यासाठीं करितों। कीं म्या
त्यांतला सहभागीदार व्हावें॥ २४ काय तुह्मास हें कळ
लें नाहीं? कीं जे धांवण्याच्या आखाड्यांत धांवतात, ते स
र्वे धांवतात खरें। परंतु येकच पण घेतो। तुह्मी पावावें
असें धांवा॥ २५ आणि जो कोणी झटतो। तो अवघ्यां
विषयीं स्वदमनीक आहे॥ तर हे नाशवंत मुगुट मिळवावया
साठीं [असे आहेत] खरें। परंतु आह्मी अनाशवंतासाठीं॥
२६ यास्तव मी असें धांवतों। कीं मला न दिसल्यासारिखें
असें नव्हे। मी अशी कुस्ती करितों। कीं वाऱ्याला मारितों
यासारिखें नाहीं। २७ परंतु मी आपल्या शरिराला कुमल

तों, आणि दासपणांत घालतों। नाहीं तर दुसऱ्यांसीं गाज
विल्यावर। कदाचित मी आपण अव्हेरला असेन॥

पर्व १०॥ १ आणि अहो भाऊ। आमचे सर्व पूर्वज त्या ढगा
खालीं होते। आणि समुद्रांमधून सर्व पार गेले, याविषयीं
तुह्मी न जाणतें व्हावें ह्मणोन मी इच्छीत नाहीं॥ २ आणि
ढगांत। व समुद्रांत। मोश्यासाठीं सर्व बाप्तीस्मा पावले होते॥
३ आणि सर्वांनी तेंच आत्मीक अन्न खाल्लें॥ ४ आणि सर्व
येकच आत्मीक पिणें प्याले। कां तर ते त्या आत्मीक अनु
सरणाऱ्या खडकाचें प्याले। आणि तो खडक ख्रीस्त होता॥
५ परंतु त्यांतील बहुतांविषयीं देव संतोषीत न जाला। कां
तर ते रानांत खालीं पाडून टाकिले गेले॥ ६ आणि तीं आमचीं
उदाहरणें जालीं, यासाठीं कीं जसें त्यांनी लोभ धरिला, तसें
आह्मीहि वाईटांविषयीं लोभीष्ठ न व्हावें॥ ७ आणि जसे
त्यांतील कित्येक [जाले।] तसे तुह्मी मूर्तीपूजक होऊं नका।
असें लिहिलें आहे। कीं लोक खायाला आणि प्यायाला ब
सला। आणि खेळायाला उठला॥ ८ आणि त्यांतील कित्येकां
नीं शिंदळकी केली, मग येकदिवसांत तेवीस हजार पड
ले। त्याप्रमाणे आह्मी शिंदळकी न करावी॥ ९ आणि त्यां
तल्यां कित्येकांनी झट लाविलें, मग सापांकडून ते नाश पा
वले। त्याप्रमाणेहि आह्मी ख्रीस्ताला झट न लावावें॥ १० आ
णि जसें त्यांतील कित्येकांनी कुरकूर केली, मग नाशकरणा
ऱ्याकडून नाश पावले। त्याप्रमाणे तुह्मीहि कुरकूर करूं नका॥
११ तर हीं अवघीं त्यांस लागलीं। [हीं] उदाहरणें [आ
हेत।] आणि ज्यांस शकांच्या शेवटाली आटोपलें आहे। त्यां
आमच्या बोधासाठीं लिहिलीं आहेत॥ १२ यास्तव जो क
ल्पितो, कीं आपण उभा राहातों। त्याने न पडावें ह्मणो
न तो सावध असो॥ १३ मानवी। यावांचून [कांहीं] झट तुह्मास
लागलें नाहीं। आणि देव विश्वासू। तो तुमच्या शक्तीपेक्षां [अ
धीक] झट तुह्मास लागुं देणार नाहीं। परंतु वागवायाची शक्ती

तुह्मास . सोसवे। ह्मणोन तो निघण्याचा उपाय करील॥ १४ यास्तव अहो माझे प्रीय। तुह्मी साकारभक्तीपासून पळा॥ १५ जसें बुद्धिमंतांस तसें मी बोलतों। जें बोलतों तें तुह्मी ठरवा॥ १६ ज्या स्तुतिच्या वाटीवरून आह्मी स्तुती करितों। ती ख्रीस्ताच्या रक्ताचें भागीपण नाहीं कीं काय? जी भाकर आह्मी मोडितों। ती ख्रीस्ताच्या शरिराचें भागीपण नाहीं कीं काय? १७ कारण कीं आह्मी बहुत। येक भाकर। [आणि] येक शरीर आहों। कां तर आह्मी सर्व त्या येका भाकरीचा भाग घेतों॥ १८ देहाप्रमाणे जो इस्त्राएल। त्याकडे पाहा। जे अर्पणांतील खातात. ते खंडिलावरचे भागीदार नाहींत कीं काय? १९ तर मी काय ह्मणतों? [असें] कीं साकारदेव कांहीं आहे? अथवा असें कीं साकार देवाचा नैवेद्य कांहीं आहे? २० [असें नाहीं.] परंतु असें. कीं राष्ट्रें जीं अर्पितात। तीं देवाला नव्हे, परंतु भूतांस अर्पितात। आणि तुह्मी भूतांचे भागीदार व्हावें। हें मी इछीत नाहीं॥ २१ प्रभूची वाटी आणखी भूतांची वाटी तुह्मी पिऊं शकत नाहीं। तुह्मी प्रभूच्या अडणीवरचे आणखी भुतांच्या अडणीवरचे भाग घेऊं न शकतां। २२ आह्मी प्रभूला ईर्षेत घालतों कीं काय? त्यापेक्षां आह्मी बळवान आहों कीं काय? ※ २३ मला अवघीं उचीत आहेत। परंतु अवघीं उपयोगी नाहींत। मला अवघीं उचीत आहेत। परंतु अवघीं उभारीत नाहींत॥ २४ कोणीहि आपलें जें तें न शोधो। परंतु प्रत्येक दुसऱ्याचें जें तें [शोधो॥] २५ अवघें जें हाटांत विकलें जातें। तें। भावासाठीं कांहीं निवाडा न करितां। खा। २६. कारण कीं पृथ्वी व तिचें पूर्णपण प्रभूचें आहे॥ २७ जे अविश्वासी त्यांतील जर कोणी तुह्मास पाचारितो, आणि तुह्मी जायास इछितां। तर जें कांहीं तुह्माजवळ वाढिलें। तें। भावासाठीं कांहीं निवाडा न करितां। खा। २८ परंतु जर कोणी तुह्मास सांगतो। [कीं] हा साकारदेवाचा नैवेद्य आहे, तर ज्या

जे तें दाखविलें। त्याच्या साठीं। आणि भावासाठीं। तुह्मी खा
उं नका। कारण कीं पृथ्वी व तिचें पूर्णपण प्रभूचें [आहे॥]
२९ आणि मी भाव ह्मणतो। तो तुझा नाहीं। परंतु दु
सऱ्याचा। कां तर माझ्या मोकळेपणाचा न्याय दुसऱ्यांच्या भा
वाकडून कां ठरविला जातो? ३० आणि जर मी कृपेकडून भा
ग पावतों, तर ज्यासाठीं मी आभार मानितों। त्यासाठीं मी
कां निंदीत होतों? ३१ यास्तव जर तुह्मी खातां। अथवा
जर पितां, अथवा जर कांहीं करितां। तर तुह्मी देवाच्या
गौरवासाठीं अवघें करा॥ ३२ तुह्मी यहूद्यांसीं। व हेल्ला
ण्यांसीं। व देवाच्या मंडळीसींहि अडखळवण्याखेरीज व्हा।
३३ जसा मिहि अवघ्यांविषयीं सर्वांस संतोषवितों। आपलेंच हो
त शोधीत नाहीं। परंतु बहुतांचें। यासाठीं कीं त्यांनी तार
लें जावें। तसे तुह्मीहि [व्हा ※]

पर्व ११॥ १ जसा मी ख्रीस्ताचें। तसे तुह्मीहि माझे अ
नुकरण करणारे व्हा॥ २ आणि अहो भाऊ, अवघ्यांविषयीं
तुह्मी माझी आठवण करितां। आणि जे सोपलेले उपदेश,
जसे म्या तुह्मास दिल्हे, तसे तुह्मी बाळगितां, यास्तव मी
तुह्मास स्तवितों॥ ३ प्रत्येक माणसाचा मस्तक ख्रीस्त। आणि
स्त्रीचा मस्तक पुरुष। आणि ख्रीस्ताचा मस्तक देव आहे,
हें तुह्मी जाणावें। ह्मणोन मी इच्छितों॥ ४ प्रत्येक पुरुष
[जो] प्रार्थना करितां। किंवा भविष्य सांगतां, आपल्या मस्तका
वर [कांहीं] राखितो। तो आपल्या मस्तकाला लाजवितो॥
५ परंतु प्रत्येक स्त्री। [जी] उघड्या मस्तकानें प्रार्थना करि
ती। अथवा भविष्य सांगती, ती आपल्या मस्तकाला लाजविती।
कां तर हें, आणि ती भादरली असणें येकच आहे॥
६ यास्तव जर स्त्री घुंगुटली नाहीं, तर ती कातरलीहि
जावी। परंतु जर कातरली जाणें। किंवा भादरली जाणें स्त्रीला
लाज आहे। तर ती घुंगुटली असो॥ ७ कां तर पुरुषाला
मस्तक घुंगुटला जाणें योग्य नाहीं खरें। तो देवाचें स्वरूप

व गौरव आहे। परंतु स्त्री पुरुषाचें गौरव आहे॥ ८ कां
तर पुरुष स्त्रीपासून जाला नाहीं। परंतु स्त्री पुरुषापासून॥
९ कां कीं पुरुष स्त्रीच्या साठीं उत्पन्न केला गेला नाहीं।
परंतु स्त्री पुरुषासाठीं॥ १० यावरून दूतांमुळें स्त्री [आपल्या]
मस्तकावर अधिकार राखायास बांधली आहे॥ ११ तथा
पि प्रभूविषयीं पुरुष स्त्रीच्या विरहित नाहीं। आणि स्त्री पुरु
षाविरहित नाहीं॥ १२ कारण कीं। जसें स्त्री पुरुषापासून।
तसेंहि पुरुष स्त्रीद्वारून [आहे।] परंतु अवघीं देवापासून [आ
हेत॥] १३ तुह्मी आपल्यां आपणांसीं ठरवा। स्त्रीला झुंगु
टल्यावांचून देवाजवळ प्रार्थना करणें शोभतें कीं काय?
१४ काय प्रकृती स्वतां तुह्मास न शिकविती। कीं जर पु
रुषाला लांब केंस आहेत। तर ते त्याला अपमान आहे खरें?
१५ परंतु जर स्त्रीला लांब केंस आहेत। तर तिची शोभा
आहे। कां तर ते तिला झांकणासाठीं दिल्हे आहेत। १६ प
रंतु जर कोणी भांडाळ दिसतो। तर आह्मास किंवा देवाच्यां
मंडळ्यांस असी रीत नाहीं॥

१७ परंतु हें सांगतां मी वाखाणीत नाहीं। कीं अधी
क चांगल्यासाठीं नाहीं। परंतु अधीक वाइटासाठीं तुह्मी ये
कवट येतां॥ १८ कां तर पहिल्याने। तुह्मी मंडळींत येकवट
होत असतां। तुह्मामध्यें फुटी आहेत, असें मी ऐकतों।
आणि कांहीं वांच्याने विश्वासतों॥ १९ आणखी। जे स्वीकारले
आहेत, ते तुह्मामध्यें प्रगट व्हावे। ह्मणोन तुह्मामध्यें तड
होऊं लागतातच॥ २० तर तुह्मी येकवट येत असतां हें
प्रभूचें जेवण खाणे नाहीं। २१ कीं खाण्यांत प्रत्येक आपलें
जेवण पूर्वीं घेतो। आणि येक तर भुकेला आहे। आणि येक
तृप्त आहे॥ २२ तर तुह्मास खायाला आणि प्यायाला,
घरें नाहींत कीं काय? किंवा तुह्मी देवाच्या मंडळीस धिःका
रितां? आणि ज्यांस नाहींत। त्यांस लाजवितां कीं काय? मी
तुह्मास काय बोलुं? यामुळें तुह्मास वाखाणुं कीं काय?

मी वाखाणीत नाहीं॥ २३ कां तर जें म्या तुह्मासहि सो
पिलें। तें मी-प्रभूपासून पावलों। कीं ज्या रात्रीं प्रभू येशू प
रस्वाधीन केला गेला। तींत त्यानें भाकर घेतली। २४ आ
णि आभारस्तुती करून मोडिली। आणि ह्मटलें। तुह्मी
घ्या। खा। हें माझें शरीर तुह्मासाठीं मोडलेलें असें आहे।
हें माझ्या आठवणीसाठीं करा॥ २५ त्याप्रमाणेंहि जेवल्यानं
तर। तो वाटी [घेऊन] बोलला। ही वाटी माझ्या रक्ताकडून
नवा करार असा आहे। जितकेदां तुह्मी हें पितां। तितकेदां
माझ्या आठवणीसाठीं करा॥ २६ यास्तव कीं जितकेदां तु
ह्मी ही भाकर खातां। आणि ही वाटी पितां। तितकेदां
तुह्मी प्रभूचें मरण। तो येतो तोंपावेतों। सांगून दाखवितां॥
२७ यास्तव जो जो अयोग्यतेनें ही भाकर खाईल। अ
थवा प्रभूचा वाटी पिईल। तो प्रभूचें शरीर व रक्त, यांविष
यीं दोषी होईल॥ २८ परंतु माणुस आपल्याला पारखो।
आणि तसें भाकरींतील खावो। आणि वाटींतील पिवो। २९ कां
तर जो अयोग्यतेनें खातो आणि पितो। तो प्रभूचें शरीर
न निवडून पाहातां। आपणावरचा न्याय खातो आणि पितो॥
३० ह्यामुळें तुह्मांतील बहुत अशक्त व रोगी। आणि पुष्क
ळ निजले आहेत॥ ३१ कां कीं जर आह्मी आपलाच नि
वाडा केला असता। तर आह्मावर न्याय लाविला गेला नसता।
३२ परंतु आह्मावर न्याय लावला जात असतां। आह्मी प्र
भूकडून शिक्षा यासाठीं पावतों। कीं जगाच्या संगतीं आह्मी
दंडले न जावें॥ ३३ यास्तव। अहो माझे भाऊ। तुह्मी
खायाला येकवट आलां असतां, येकमेकांची वाट पाहा॥
३४ आणि जर कोणी भुकेला। तर तो घरीं खावो। या
साठीं। कीं तुह्मी दंडासाठीं येकवट न यावें॥ आणि जीं
उरलीं, तीं। जेव्हां मी येईन। तेव्हां यथास्थीत करीन॥

पर्व १२ ॥ १ आतां। अहो भाऊ। आत्मीक जीं त्यांविष
यीं तुह्मी अज्ञानी व्हावें। असें मी इछीत नाहीं॥ २ तुह्मा

स कळलें। कीं तुह्मी राष्ट्रें होतां। त्यां मूक्यां साकारदेवां
कडे जसें लावले गेलां। तसें नेले गेलां॥ ३ यास्तव मी तु
ह्मास कळवितों। कीं कोणी। देवाच्या आत्म्याकडून बोलत अ
सतां। येशूला शापीत ह्मणत नाहीं। आणि पवित्र आत्म्याक
डून [ह्मटल्या]वांचून। कोणी येशूला प्रभू ह्मणायाला शक्तिमा
न नाहीं॥ ४ आणि कृपादानांचे भेद आहेत। परंतु येकच
आत्मा॥ ५ सेवांचेहि भेद आहेत। परंतु येकच प्रभू॥
६ घडवण्यांचे भेद आहेत। परंतु देव जो अवघ्यांकडून अवघीं
घडवितो। तो तोच आहे॥ ७ तथापि आत्म्याचें प्रगटणें प्र
त्येकाला हितासाठीं दिल्हें आहे॥ ८ कारण कीं येकाला तर
ज्ञानाची गोष्ट आत्म्याकडून दिल्ही आहे। आणि दुसऱ्याला त्या
च आत्म्याकडून जाणण्याची गोष्ट। ९ आणि दुसऱ्याला त्या
च आत्म्याकडून विश्वास। आणि दुसऱ्याला त्याच आत्म्याकडून नि
रोगी करण्याचीं कृपादानें। १० आणि दुसऱ्याला चमत्कार घड
णीं। आणि दुसऱ्याला भविष्यबोलणें। आणि दुसऱ्याला आत्म्यां
स निवडणें। आणि दुसऱ्याला भाषणांच्या जाती। आणि दुसऱ्या
ला भाषणांचें समजिवणें। ११ परंतु तो येकच, तोच आत्मा,
जो आपली, जसें इछितो, तसें प्रत्येकास वांटितो, तो हीं अव
घीं करितो॥ १२ कां तर जसें शरीर येक आहे, आणि त्याला
अंगें बहुत आहेत, आणि त्या येका शरीराचीं अवघीं अंगें
बहुत असतांच, येक शरीर आहे, तसें ख्रीस्तहि [आहे॥]
१३ कां तर आह्मी, जरीं यहूदी किंवा हेल्लासी, किंवा दास
किंवा मोकळे, तरीं सर्व येका आत्म्याकडून येक शरीर [होण्या]
साठीं बाप्तीस्मा पावलों आहों। आणि आह्मी सर्व येका आत्म्या
कडून पाजले गेलों आहों॥ १४ कां तर शरीरहि येक अंग
नव्हे, परंतु बहुत॥ १५ जर पाय बोलेल, कीं मी हात
नाहीं, यास्तव मी शरीराचा नाहीं। तर यावरून तो श
रीराचा नाहीं कीं काय? १६ आणि जर कान बोलेल,
कीं मी डोळा नाहीं, यास्तव मी शरीराचा नाहीं। तर

यावरून तो शरीराचा नाहीं कीं काय ? १७ जर सगळें शरी
र डोळा। तर ऐकणें कोठें ? जर सगळें ऐकणें। तर हुंग
णें कोठें ? १८ परंतु आतां देवाने अंगें। यांतील येकये
काला जसें त्याने इच्छिलें। त्याप्रमाणे शरीरांत ठेविलें आहे॥
१९ आणि जर तीं अवघीं येक अंग असतीं। तर शरीर
कोठें [असतें?] २० तर आतां अंगें बहुत [आहेत] खरें।
तथापि शरीर येक॥ २१ आणि डोळ्याश्याने हाताला न बोल
वतें। [कीं] मला तुझें अगत्य नाहीं॥ किंवा फिरोन मस्तका
च्याने पायांस न बोलवतें। [कीं] मला तुमचें अगत्य नाहीं॥
२२ आणखी फार विशेषें। जीं शरीराचीं अंगें अधीक अ
बळ असीं दिसतात। तीं अगत्य आहेत॥ २३ आणि
शरीराचीं जीं [अंगें] मर्यादेहीन असीं आह्मास दिसतात।
त्यांभोंवतीं आह्मी अधीक मर्यादा ठेवितों। असीं आमचीं
कुरूप अंगें। यांस विशेष सुरूप आहे॥ २४ आमचीं जीं
सुरूप त्यांस तर अगत्य नाहीं। परंतु जें उणें होतें, त्याला
देवाने अधीक मर्यादा देऊन। शरिराला असें संगत जोडलें
आहे, २५ कीं शरीरांत फूट नसावी। परंतु अंगा
नी येकमेकांसाठीं तसीच चिंता करावी॥ २६ आणि जर
येक अंग सोसतें। तर सर्व अंगें त्यासहीत सोसतात। जर
येक अंग गौरवी केलें जातें। तर त्यासहीत सर्व अंगें हर्षता
त॥ २७ तुह्मी तर ख्रीस्ताचें शरीर। आणि वांट्याने अंगें
आहां॥ २८ आणि त्याप्रमाणें देवाने कित्येकांस मंडळींत ठे
विलें आहे। प्रथम प्रेषितांस। दुसऱ्याने भविष्यभाष्यांस। ति
सऱ्याने उपदेशकांस। मग चमत्काऱ्यास, मग निरोगी
करण्यांच्या कृपादानांस, साहाय्यांस, आवाऱ्यांस, भाषाणांच्या
जातींस॥ २९ काय, सर्व प्रेषीत? काय, सर्व भविष्यभाषी?
काय। सर्व उपदेशक? काय। सर्व चमत्कारी? ३० निरोगी क
रण्याचीं कृपादानें सर्वांस आहेत कीं काय? [अन्य]भाषणानी
सर्व बोलतात कीं काय? सर्व समजवितात कीं काय? ३१ त

र सर्वांहून चांगलीं कृपादानें, तीं तुह्मी फार इच्छितां। तथापि त्यांपेक्षां अधीक उत्कृष्ट मार्ग मी तुह्मास दाखवितों ॥

पर्व १३ ॥ १ जरी मी मनुष्यांच्यां व दूतांच्यां भाषानी बोलतों। आणि जर मला प्रीति नाहीं। तर मी वाजत पितळ। किंवा झणझणीत टाळ जालों आहें॥ २ आणि जर मला भविष्यबोलणें आहे। आणि जर मी अवघीं गौप्यें व अवघी विद्या समजतों। आणि डोंगरांस ढळावें। असा जर मला अवघा विश्वास आहे। आणि मला जर प्रीति नाहीं। तर मी कांहीं नाहीं॥ ३ आणि जर मी आपलीं सगळीं द्रव्यें [दरिद्र्यांस] पोसण्याला देतों। आणि मी जाळला जावा ह्मणोन जर आपलें शरीर देतों। आणि मला जर प्रीति नाहीं, तर मला कांहीं लाभ होत नाहीं॥ ४ प्रीति गंभीर आहे। उपकारीक आहे। प्रीति हेवा करीत नाहीं। प्रीति अहंकार करीत नाहीं। फुगली जात नाहीं। ५ कुरूपें वागत नाहीं। आपलींच जीं तीं शोधीत नाहीं। संतापविली जात नाहीं। वाईट कल्पीत नाहीं। ६ अन्यायांविषयीं आनंदत नाहीं। परंतु खरेपणासहीत आनंदती। ७ अवघीं झांकिती। अवघीं विश्वासती। अवघ्यांची आशा धरिती। अवघीं साहाती॥ ८ प्रीति कधींहि खुंटत नाहीं॥ परंतु जरी भविष्यबोलणीं। तरी तीं निष्कामी केलीं जातील। आणि जरी [अन्य]भाषाबोलणीं, तरी तीं खुंटतील। आणि जरी विद्या। तरी ती निष्कामी केली जाईल॥ ९ कारण कीं आह्मी वांट्याने जाणतों। आणि वांट्याने भविष्य बोलतों। १० परंतु जें पूर्ण। तें जेव्हां येईल। तेव्हां जें वांट्याने तें निष्कामी केलें जाईल॥ ११ जेव्हां मी लेंकरूं होतों, तेव्हां मी लेंकरासारिखें बोललों। म्या लेंकरासारिखें कल्पिलें। म्या लेंकरासारिखा तर्क केला। परंतु जेव्हां मी माणुस जालों। तेव्हां म्या लेंकराचीं जीं। तीं निरर्थ मोजलीं॥ १२ कां तर आह्मी आतां आरशीकडून पर्यायाने पाहातों। परंतु

तेव्हां तोंडोतोंड॥ आतां मी वांठ्याने जाणतों। परंतु तेव्हां जसें मी वोळखला जातों, तसें मी वोळखीन॥ १३ तर आतां विश्वास, आशा, प्रीति, हीं तिघें राहातीळ। परंतु यांमधीळ प्रीति श्रेष्ठ [आहे ※]

पर्व १४॥ १ तुह्मी प्रीतीच्या पाठीं चाला। आणि आत्मीक जीं। तीं साधायाचा आवेश धरा। परंतु त्यापेक्षां ह्याचा। कीं तुह्मी भविष्य बोलावें॥ २ कां कीं जो [अन्य]भाषेने बोलतो। तो माणसांसीं बोलत नाहीं। परंतु देवासीं। कां तर कोणी ऐकून घेत नाहीं। तथापि तो आत्म्याने गोष्टें बोलतो॥ ३ परंतु जो भविष्य बोलतो तो माणसांसीं, रचणें व प्रबोध व शांतवन, हीं बोलतो॥ ४ जो [अन्य]भाषेने बोलतो, तो आपणाला उभारितो। परंतु जो भविष्य बोलतो। तो मंडळीस उभारितो॥ ५ तुह्मी सर्व [अन्य]भाषांनी बोलावें ह्मणोन मी इच्छितों। परंतु त्याहून हें अधीक [इच्छितों,] कीं तुह्मी भविष्य बोलावें। कां तर जो [अन्य]भाषांनी बोलतो। तो मंडळीने उपदेश घ्यावयासाठीं, जर अर्थ उलगडीत नाहीं। तर जो भविष्य बोलतो। तो त्याहून मोठा आहे॥ ६ आणि अहो भाऊ, आतां, जर मी तुह्माजवळ [अन्य]भाषा बोलत असतां येईन, तर मी प्रगटण्याने, अथवा जाणण्याने। अथवा भविष्यबोलण्याने। अथवा उपदेशाने तुह्मांसीं बोलल्यावांचून तुह्मांस काय लाभ देईन? ७ त्याप्रमाणे निर्जीव जीं शब्द देतात, छिद्रवाद्य। अथवा तंतुवाद्य, तीं जर नादांचा भेद करीत नाहींत, तर छिद्रवाद्याने जें वाजविलें, अथवा तंतुवाद्याने जें वाजविलें, तें कसें कळेल? ८ आणि यासाठीं, जर रणशिंग अस्पष्ट शब्द देतें, तर लढण्यासाठीं कोण सिद्ध होईल? ९ त्याप्रमाणेहि तुह्मी जर भाषेने स्पष्ट गोष्ट न देतां। तर जें ह्मटलें। तें कसें कळेल? कां तर तुह्मी वाऱ्याला बोलते व्हाल॥ १० कदाचित जगांत भाषांच्या इतक्या जाती असतील। आणि त्यांतील कोणी

अर्थविरहित नाहीं" ॥ ११ यास्तव जर मी शब्दाचें बल समजत नाहीं, तर बोलणाऱ्यासीं वडबड्या होईन। आणि बे.लणारा मसीं वडबड्या [होईल ॥] १२ त्याप्रमाणे तुह्मीहि आत्मीक जीं त्यांचे आवेश धरल्यावरून मंडळीच्या उभारण्यासाठीं फार कगावें ह्मणोन झटा॥ १३ यावरून जो भाषा बोलतो, तो अर्थ उतरावयास प्रार्थना करो ॥ १४ कां कीं जर मी [अन्य]भाषेने प्रार्थना करितों, तर माझा आत्मा प्रार्थितो। परंतु माझी बुद्धी निष्फळ आहे ॥ १५ तर काय आहे? मी आत्म्याने प्रार्थना करीन। आणि बुद्धीनेहि प्रार्थना करीन ॥ मी आत्म्याने । आणि बुद्धीनेहि गाईन ॥ १६ नाहिंतर तूं आत्म्याने स्तुती करीत असल्यास, जो अशिक्षिताचें ठिकाण भरतो। तो। तुझ्या आभारस्तुतीवरून। आमेन, हें कसें ह्मणेल? कारण कीं तूं जें बोलतोस। तें तो जाणत नाहीं ॥ १७ कां तर तूं आभारस्तुती बरें करितोस खरें, परंतु तो दुसरा उभारिला जात नाहीं ॥ १८ मी तुह्मा सर्वांपेक्षां [अन्य]भाषानी बोलत असतां। माझ्या देवासीं आभारस्तुती करितों। १९ तथापि मंडळींत [अन्य]भाषेने दाहा हजार गोष्टी बोलल्यापेक्षां, म्या दुसऱ्यांस शिकवावयासाठीं पांच गोष्टी माझ्या बुद्धीने बोलाव्या। हें मला अधीक आवडतें॥ २० अहो भाऊ। तुह्मी बुद्धींत लेंकरें होऊं नका। परंतु वाईटांत लेंकरें व्हा। आणि बुद्धीनी प्रौढ व्हा ॥ २१ शास्त्रांत असें लिहिलें आहे। कीं मी ह्या लोकाशीं, अन्य जिभानी। व अन्य होंटानी बोलेन। तथापि असाने ते माझें ऐकणार नाहींत, असें प्रभू बोलतो ॥ २२ यास्तव [अन्य]भाषा चिन्हासाठीं आहेत। विश्वासणाऱ्यांसीं नव्हेत। परंतु अविश्वासणाऱ्यांसीं ॥ भविष्यबोलणें तर अविश्वासणाऱ्यांसाठीं नव्हे। परंतु जे विश्वासतात त्यांसाठीं ॥ २३ यास्तव जर सगळी मंडळी येकवट मिळून सर्व [अन्य]भाषानी बोलतात, आणि अशिक्षीत ते। अथवा अविश्वासी आंत ये

तात। तर तुह्मी वेडे आहां। असें ते न ह्मणतील कीं
काय? २४ परंतु जर सर्व भविष्य बोलतात। आणि कोणी
अविश्वासी। अथवा अशिक्षीत आंत येतो। तर तो सर्वांकडून
निश्चय पावतो। सर्वांकडून निवाडा पावतो॥ २५ आणि असें
त्याच्या अंतःकरणांतील गुप्तपणें प्रगटलीं जातात। आणि असें
तो पालथा पडून। देवाला भजेल। [आणि] देव तुह्मांमध्यें
सत्यतेनें आहे। असें तो प्रगट सांगेल॥ २६ तर अहो भा
ऊ। काय आहे? तुह्मी येकवट येतां, तेव्हां तुह्मांतील प्र
त्येकाला गीत आहे। उपदेश आहे। [अन्य]भाषा आहे। प्रग
ट करणें आहे, अर्थ सांगणें आहे। अवघीं उभारण्या
साठीं होवोत॥ २७ आणि जर कोणी [अन्य]भाषेनें बोलतो,
तर दोघे दोघे। किंवा पराकाष्ठेनें तिघे तिघे [बोलोत।] आ
णि [तें] पाळीकडून [होवो।] आणि येक अर्थ उतरो॥
२८ परंतु जर कोणी दुभाषी नाहीं, तर तो मंडळींत
उगाच असो। आणि आपणासीं व देवासीं बोलो॥
२९ भविष्यभाषीहि। ते दोघे किंवा तिघे बोलोत। आ
णि दुसरे निवाडा करोत॥ ३० तेव्हां दुसऱ्या बसणाऱ्याला ज
र [कांहीं] प्रगटलें असेल। तर जो पहिला। तो उगाच
असो॥ ३१ कां तर सर्वांनी शिकावें। आणि सर्वांनी शां
तविलें जावें। ह्मणोन तुह्मी सर्व। येकामागें येक, भवि
ष्य बोलूं शकतां॥ ३२ भविष्यभाष्यांचे आत्मे तर। भविष्य
भाष्यांच्या स्वाधीन आहेत॥ ३३ कां कीं देव। तो गडबडीचा
[देव] नव्हे। परंतु स्वस्थपणाचा। जसा सर्व पवित्रांच्या मंड
ळ्यांत तसा॥ ३४ मंडळ्यांमध्यें तुमच्या स्त्रिया उगाच असो
त। कां तर त्यांस बोलूं दिल्हें नाहीं, परंतु जसें शास्त्रहि
सांगतें। तसें त्यांनी आधीन असावें॥ ३५ आणि जर त्या
कांहीं शिकायास इच्छितात। तर घरीं, आपापल्या नवऱ्यांस पु
सोत। कां तर स्त्रियांनी मंडळींत बोलावें, हें लाज आहे॥
३६ काय? देवाची गोष्ट तुह्मांपासून निघाली कीं काय?

अथवा ती केवळ तुह्मास प्राप्त जाली कीं काय? ३७ आ
पण भविष्यभावी अथवा आत्मीक। असें जर कोणी मानि
तो। तर जों मी तुह्माकडे लिहितों। तीं प्रभूच्या आज्ञा
आहेत। असें तो स्वकारो॥ ३८ परंतु जर कोणी जाणत
नाहीं, तर तो न जाणता असो॥ ३९ यास्तव, अहो भा
ऊ, भविष्यबोलाण्याचा आवेश धरा। आणि [अन्य]भाषानीं बो
लायास वर्जू नका॥ ४० अवघीं उत्तमप्रकाराने, आणि अ
नुक्रमाने होवोत ※

पर्व १५ ॥ १ आणखी। अहो भाऊ। जें सुवर्तमान म्या
तुह्मास सांगितलें आहे। जें तुह्मी घेतलेंहि। आणि ज्याकडू
न तुह्मी उभे राहातां। तें मी तुह्मास कळवितों। २ त्याकडूनहि
तुह्मी तारले जातां। म्या कोणत्या गोष्टीने तुह्मास सुवर्तमा
न सांगितलें, हें तुह्मी बळकट धरिल्यास। नाहिंतर तुह्मी
विश्वास व्यर्थ धरला आहे॥ ३ कां तर जें म्या अंगिकारिलें। तें
तुह्माजवळ पहिल्यांमध्यें दिल्हें। कीं धर्मलेखांप्रमाणे ख्रीस्त
आमच्यां पापांसाठीं मेला। ४ आणि असें कीं तो पुरला
गेला। आणि असें कीं धर्मलेखांप्रमाणे तो तिसऱ्या दिवशीं
उठला। ५ आणि असें कीं तो केफाला। मग त्यां बारांस
दिसला। ६ त्यानंतर तो येकदांच पांच शंभरांपेक्षां अधी
क भाऊ यांस दिसला। त्यांतील फार आतांपावेतों राहा
तात। परंतु कित्येक निजलेहि॥ ७ त्यानंतर तो याकोबा
ला। मग सर्व प्रेषितांस दिसला॥ ८ आणि सर्वांच्या शेवटीं।
मो, असें गर्भपाताला तसें। मलाहि दिसला॥ ९ कां तर प्रेषितां
त मी लाहान आहें। तो मी प्रेषीत ह्मटला जाण्यास यो
ग्य नाहीं। कारण कीं म्या देवाच्या मंडळीचा पाठलाग के
ला॥ १० परंतु जें मी आहें, तें देवाच्या कृपेने आहें॥
आणि त्याची कृपा जी मजवर, ती व्यर्थ जाली नाहीं। परं
तु त्यां सर्वांहून म्या फार श्रम केले। तथापि म्या नव्हे।
परंतु देवाची कृपा। जी मजसहीत तिने॥ ११ तर जरीं

मी। किंवा ते। तरीं आह्मी असें गाजवितों। तुह्मीहि असें
विश्वासलां। १२ आणि ख्रीस्त। मेलेल्यांमधून उठलेला, अ
सा जर गाजला, तर तुह्मामध्यें कित्येक कसें ह्मणतात?
कीं मेलेल्यांचें पुनरुठणें नाहीं॥ १३ मग जर मेले
ल्यांचें पुनरुठणें नाहीं, तर ख्रीस्तहि उठला नाहीं॥
१४ आणि जर ख्रीस्त उठला नाहीं, तर आमचें गाज
वणें व्यर्थ। आणि तुमचा विश्वासहि व्यर्थ [आहे॥] १५ आ
णखी आह्मी देवाविषयीं खोटे साक्षी सांपडलों। कां तर
देवाविषयीं आह्मी असी साक्ष दिल्ही। कीं त्याने ख्रीस्ता
ला उठविलें। [परंतु] जर मेलेले उठत नाहींत। तर त्याने त्या
ला उठविलें नाहीं॥ १६ कारण कीं जर मेलेले उठत ना
हींत। तर ख्रीस्तहि उठला नाहीं॥ १७ आणि जर ख्री
स्त उठला नाहीं। तर तुमचा विश्वास फुकट। तुह्मी अजून
आपल्यां पापांमध्यें आहां॥ १८ तर ख्रीस्ताकडील जे नि
जले, तेहि नाश पावले॥ १९ जर केवळ ह्या आयुष्यांत
आह्मास ख्रीस्तावर आशा आहे। तर सर्व मनुष्यांपेक्षां आ
ह्मी करुणापात्र आहों॥ २० परंतु आतां ख्रीस्त मेलेल्यां
मधून उठला आहे। तो निजलेल्यांतील प्रथमफळ जाला
आहे॥ २१ कारण कीं मनुष्याकडून मरण [जालें।] यास्तव
मनुष्याकडून मेलेल्यांचें पुनरुठणेंहि [जालें॥] २२ कां तर
जसें आदामाकडून सर्व मरतात। तसें ख्रीस्ताकडून सर्व जिव
विलेहि जातील। २३ परंतु प्रत्येक आपापल्या गणांत। ख्री
स्त प्रथम फळ, मग त्याच्या समक्ष होण्यांत जे ख्रीस्ताचे
[आहेत,] ते॥ २४ नंतर, जेव्हां हा देवाजवळ ह्मणजे बापा
जवळ राज्य देईल। जेव्हां सर्व धनीपण। व सर्व अधिकार,
व सत्ता यांस मोडील। तेव्हां शेवट [होईल॥] २५ कां
तर ह्याच्यां पायांखालीं त्याने सर्व शत्रू ठेविले होतील। तों
पर्यंत याला राज्य करणें लागतें॥ २६ शेवटील शत्रु
मरण। हें नाहिंसें केलें जाईल॥ २७ कारण कीं

त्याने त्याच्यां पायांखालीं अवघीं आधीन केलीं आहेत। परंतु जेव्हां तो ह्मणतो, कीं अवघीं आधीन केलीं आहेत। तेव्हां ज्याने अवघीं त्याच्या स्वाधीन केलीं, तो वेगळा। [हें] उघडें [आहे॥] २८ आणि जेव्हां अवघीं त्याच्या स्वाधीन केलेलीं होतील। तेव्हां। देव अवघ्यांविषयीं अवघीं व्हावा। ह्मणोन ज्याने अवघीं त्याच्या स्वाधीन केलीं। त्याच्या स्वाधीन पुत्र आपणहि होईल॥ २९ नाहितर मेलेले जर अगदी उठत नाहींत। तर मेलेल्यांसाठीं जे बाप्तीस्मी केलेले आहेत। ते काय करतील? आणि ते मेलेल्यांसाठीं बाप्तीस्मी कां होतात? ३० आणि आह्मी घडीघडीं भयांतींत कां आहों? ३१ ख्रीस्त येशू। जो आमचा प्रभू। त्याकडून तुह्माविषयीं जो उल्हास मला आहे। त्याच्या प्रमाणाने मी प्रतिदिवशीं मरतों॥ ३२ एफेससांत जर म्या माणसाप्रमाणे श्वापदांशीं लढाई केली। तर। मेलेले उठत नसल्यास, मला काय लाभ? उद्यां आह्मी मरतों। यास्तव आह्मी खावें आणि प्यावें॥ ३३ तुह्मी फसूं नका। वाईट संवाद। हे उत्तम रीतींस नासवितात॥ ३४ तुह्मी नीतीने सावध व्हा। आणि पाप करूं नका। कां तर कित्येकांस देवाविषयीं अज्ञानपण आहे। तुह्मास लाज [होण्या]साठीं मी बोलतों ※

३५ परंतु कोणी ह्मणेल, [कीं] मेलेले कसे उठतात? आणि कोणत्या शरीराने येतात? ३६ निर्बुद्धा। जें तूं पेरितोस, तें जर मरत नाहीं, तर जिवविलें जात नाहीं,॥ ३७ आणि जें तूं पेरितोस तें [पाहे।] जें आंग होईल। तें तूं पेरीत नाहींस। परंतु नागवें धान्य। कदाचित गहूं। किंवा दुसरांतील कोणतें असेल॥ ३८ परंतु जसें देवाने इच्छिलें। तसें तो त्याला आंग देतो। आणि बीजांतील प्रत्येकाला आपापलें आंग [देतो॥] ३९ सर्व देह येकासारिखाच देह नाहीं। परंतु मनुष्यांचा येक देह [आहे] खरें। आणि प

पूंचा दुसरा देह, आणि माशांचा दुसरा, आणि पांखरांचा दुसरा [आहे ॥] ४० आणि आकाशावरील शरीरें, व पृथ्वीवरील शरीरें [आहेत।] परंतु आकाशावरल्यांची कांती निराळी खरें। आणि पृथ्वीवरल्यांची जी। ती निराळी आहे॥ ४१ सूर्याची कांती निराळी। आणि चंद्राची कांती निराळी। आणि तार्‍यांची कांती निराळी। कां तर कांतीविषयीं [येका] तार्‍याहून [दुसर्‍या] तार्‍याचा भेद आहे॥ ४२ तसेंहि मेलेल्यांचें पुनरुठणें [आहे।] नाशांत पेरलें जातें। अनाशांत उठविलें जातें। ४३ अवमानांत पेरलें जातें। गौरवांत उठविलें जातें। अबळपणांत पेरलें जातें। सामर्थ्यांत उठविलें जातें॥ ४४ जिवाचें शरीर पेरलें जातें। आत्म्याचें शरीर उठविलें जातें॥ जिवाचें शरीर आहे। आणि आत्म्याचें शरीर आहे॥ ४५ आणि तसें लिहिलें आहे। कीं पहिला माणूस जो आदाम, तो जिवंत प्राणी असा [जाला।] शेवटील आदाम। तो जिवविणारा आत्मा असा [जाला॥] ४६ तथापि जें आत्म्याचें। तें प्रथम [नव्हतें,] परंतु जिवाचें, तें। मग जें आत्म्याचें, तें॥ ४७ जो प्रथम माणूस, तो पृथ्वीपासून। मातीचा। जो दुसरा माणूस। तो आकाशापासून। प्रभू [आहे॥] ४८ जसा मातीचा, तसे मातीचेहि [आहेत॥] आणि जसा तो आकाशावरला, तसेच आकाशावरलेहि [आहेत॥] ४९ आणि जसें आह्मी मातीचा याची प्रतिमा वाहिली आहे। तसें आकाशावरल्याचीहि प्रतिमा आह्मी वाहूं ॥

५० आणि अहो भाऊ। मी हें ह्मणतों। कीं मांस व रक्त हीं देवाच्या राज्याचें वतन पावूं शकत नाहींत। आणि नाशपण अनाशपणाचें वतन पावत नाहीं॥ ५१ पाहा। मी तुह्मास गौप्य सांगतों। आह्मी सर्व मरणार नाहीं खरें, परंतु आह्मी सर्व पालटले जाऊं। ५२ क्षणांत। नेत्रनिमिषांत। शेवटील तुतारी वाजण्यांत। कां कीं तुतारी वाजेल, आणि जे मेले। ते अनाशी उ

ठविले जातील। आणि आह्मी पालटले जाऊं॥ ५३ कां त
र ह्या नास्याला अनास्के नेसावें लागतें। आणि हें मर
णारें याला अमरपण नेसावें [लागतें॥] ५४ आणि जेव्हां
हें नास्केपण अनास्केपण नेसेल। आणि हें मरणा
रें अमरपण नेसेल, तेव्हां हि लिहिलेली गोष्ट पू
र्ण होईल। [कीं] मरण जयाने गोळलें गेलें आहे॥ ५५ अ
रे मरणा। तुझी नांगी कोठे? अरे लोकांतरा। तुझा ज
य कोठे? ५६ तर मरणाची नांगी पाप [आहे।] आणि
पापाचें सामर्थ्य नेमशास्त्र [आहे॥] ५७ परंतु देव। जो
आमच्या प्रभू येशू ख्रीस्ताकडून। आह्मास जय देतो। त्यासीं
आभारस्तुती [असो॥] ५८ यास्तव। अहो माझे प्रीय भा
ऊ। प्रभूविषयीं तुमचा श्रम व्यर्थ नाहीं। हें जाणत असतां।
तुह्मी स्थीर। अचळ। सर्वदां प्रभूचें काम पुष्कळ करीत
असा ॐ

पर्व १६॥ १ आतां पवित्रांसाठीं वर्गणी दूजविषयीं।
जसें म्यां गालातींतील मंडळ्यांस नेमिलें। त्याप्रमाणे तुह्मीहि क
रा॥ २ जेव्हां मी येईन। तेव्हां वर्गण्या न व्हाव्या। ह्मणोन
तुह्मामधील प्रत्येकाला जें कांहीं सभाग्याने जालें। तें,
तो। सात्र्याच्या पहिल्या [दिवसीं।] आपल्याजवळ सांठवून ठेवो॥
३ आणि जेव्हां मी तिकडे येईन। तेव्हां तुह्मी ज्यां
कोणांस मान्य ठरवाल। त्यांस मी तुमचें उपकार[द्रव्य]
यरूशलेमास न्यावयाला पत्रें देऊन पाठवीन॥ ४ आणि ज
र मलाहि जाणें योग्य असेल, तर ते माझ्या संगतीं जाती
ल॥ ५ आणि मी माकेदनीवरून जाणार आहें। यास्तव
जेव्हां मी माकेदनीवरून जातों, तेव्हां तुह्माजवळ येईन॥
६ आणि कदाचित तुह्माजवळ राहीन। आणि। जेथे मी जात
असेन तेथे [जायास] तुह्मी मला पुढें पाठवावें, ह्मणोन हिंवा
ळ्यांत राहीन॥ ७ कां तर आतां वाटेने तुह्मास पाहावें।
हें मला मान्य नाहीं। परंतु मी अशी आशा धरितों। कीं

जर. प्रभू राऊं देतो, तर मी कांहीं वेळ तुह्माजवळ राही न॥ ८ परंतु पन्नासीपर्यंत मी एफेससांत राहीन, ९ कां तर मोठा आणि सार्थकी दरवाजा माझ्यासाठीं उघडला आ हे। आणि बहुत विरोधणारे [आहेत ॐ]

१० आतां जर तिमथ्यस येतो। तर तो तुह्माजवळ निं र्भयें व्हावा, ह्मणोन तुह्मी पाहा। कां तर जसें मी। तसें तोहि प्रभूचें काम करितो॥ ११ यास्तव कोणी त्याला न धिः कारावें। परंतु तो मजकडे यावा। ह्मणोन तुह्मी त्याला सुखरूप पुढें पाठवा। कां तर भाऊंसहीत त्याची मी वाट पाहातों॥ १२ आतां आपल्लोसभाउ याविषयीं। त्याने भा ऊंच्या संगतीं तुह्माकडे यावें, ह्मणोन म्या त्याला फार वि नंती केली। तथापि आतां यावयास त्याची इछा अगदी न जाली। परंतु तो सत्काळ पावेल, तेह्वां येईल॥ १३ तुह्मी जपणी करा। विश्वासांत उभे राहा। पुरुषार्थें वर्ता। सबळ व्हा॥ १४ तुमचीं अवघीं प्रीतीने होवोत ॐ १५, १६ अ हो भाऊ। तुह्मी स्तेफानासाचें घर जाणतां। कीं तें अ खाईचें प्रथम फळ आहे। आणि त्यानी आपणांस पवित्रांच्या सेवेसाठीं लाविलें आहे। अशांच्या। व प्रत्येक जो सहीत का म करितो, आणि श्रम करितो, त्याच्या स्वाधीन तुह्मी व्हा वें, ह्मणोन मी तुह्मांशीं विनंती करितों॥ १७ आणखी स्तेफानास। व फूर्तूनातस, व आखाइकस, यांच्या येण्या वरून मी आनंदतों। कारण कीं तुमचें नसणें, हें त्यानी पुरविलें॥ १८ कां तर त्यानी माझ्या व तुमच्या आत्म्यास विसांवा दिल्हा। यास्तव अशांस वोळखा ॐ १९ आशींतल्या मंडळ्या तुह्मास क्षेम देतात॥ आकुला व प्रीस्कीला, तु ह्मास प्रभूविषयीं फार क्षेम देतात। [आणि] त्यांसहीत त्यांच्या घरांत जी मंडळी। ती [देती॥] २० सर्व भा ऊ तुह्मास क्षेम देतात॥ तुह्मी पवित्र चुंबनाने येकमेकांस क्षेम द्या ॐ

२१ [मी] पाउलस, माझ्या हाताने क्षेम ॥ २२ जर कोणी आम
च्या प्रभू येशू ख्रीस्तावर प्रीति करीत नाहीं। तर तो। जेव्हां प्रभू
येतो। तेव्हां शापीत [असो ॥] २३ आमच्या प्रभू येशू ख्रीस्ताची
कृपा तुह्मासहीत [असो ॥] २४ ख्रीस्त येशूविषयीं तुह्मा स
र्वांसहीत माझी प्रीति [असो ॥] आमेन ※

करींथकरांस पाउलसाचें दुसरें पत्र ॥

पर्व १ ॥ १ करींथांत देवाची जी मंडळी आहे तिला। [आणि]
तिच्या सहीत संपूर्ण आखाईंत जे सर्व पवित्र आहेत। त्यांस पाउल
स। [जो] देवाच्या इच्छेकडून येशू ख्रीस्ताचा प्रेषीत तो। आणि
तिमथ्यस भाऊ [लिहितो ॥] २ देव आमचा बाप। व प्रभू येशू
ख्रीस्त। यांपासून तुह्मावर कृपा व समाधान [असो ※]
३ देवाची स्तुती असावी। तोच आमच्या प्रभू येशू ख्रीस्ताचा
बाप। तो कळवळ्यांचा बाप। आणि सर्व शांतवनाचा देव।
४ तो आमच्या सर्व संकटांत आमचें शांतवन यासाठीं क
रितो। कीं ज्या शांतवनानें आह्मी आपण देवाकडून शांतवि
ले जातों। त्याकडून आह्मी। सर्व संकटांतील जे। त्यांचें
शांतवन करायास शक्तिमान व्हावें ॥ ५ कां तर जसें ख्रीस्ताचीं सोस
णीं आह्मास पुष्कळ होतात, तसें ख्रीस्ताकडून आमचें शांतवनहि
पुष्कळ होतें ॥ ६ आणि जरीं आह्मी संकट पावतों। तरीं
[हें] तुमच्या शांतवनासाठीं [आहे।] आणि तारण यासाठीं।
हें। जीं सोसणीं आह्मीहि सोसितों तीं साहिल्यानें घडतें ॥
आणि जरीं आह्मी शांतवन पावतों। तरीं [हें] तुमचें शां
तवन व तारण, यांसाठीं [आहे ॥] आणि तुह्माविषयीं आ
मची आशा खंबीर [आहे।] ७ कां, आह्मी हें जाणतों।
कीं जसें तुह्मी सोसण्यांचे भागिदार आहां। तसें शांतवनाचे
हि [भागिदार व्हाल ॥] ८ कां तर। अहो भाऊ। आशींत
जें संकट आह्मास जालें। त्याविषयीं तुह्मी न जाणते व्हावें।
हें आह्मी इच्छीत नाहीं। असें [जालें।] कीं आह्मी शक्तीपे

क्षां येवढे पराकाष्टां भारावलों। कीं आमच्या जगण्याविषयीं आशा खुंटली ॥ ९ तथापि आह्मास आपणांमध्यें मरण्याचा निवाडा यासाठीं जाला। कीं आह्मी आपणांवर आशा न ठेवावी। परंतु देव जो मेलेल्यांस उठवितो, त्यावर [ठेवावी ॥] १० त्याने आह्मास येवढ्या मरणापासून सोडविलें, आणि तो सोडवीत आहे। त्यावर आह्मी अशी आशा ठेवितों। कीं यापुढेंहि सोडवील। ११ तुह्मीहि आह्मासाठीं प्रार्थनेनें असें सहीत साह्य करीत असतां, कीं जो उपकार बहुतांच्या योगानें आह्मावर [होतो।] त्याची आभारस्तुती बहुतांकडून आह्मामुळें व्हावी ※

१२ कां तर हा आमचा उल्हास आहे, ह्मणजे आमच्या मनोभावाची साक्ष। कीं देवाविषयींचें भोळेपण व साळसुदपण यांकडून। देहीक ज्ञानाकडून नव्हें, परंतु देवाच्या कृपेकडून आह्मी जगांत वर्तणूक केली आहे। आणि विशेष तुह्माजवळ [असी केली ॥] १३ कां तर जीं तुह्मी वाचितां। अथवा वोळखून मानितांहि, त्यांवांचून आह्मी तुह्मासीं दुसरीं लिहीत नाहीं। आणि शेवटापावेतोंहि तुह्मी वोळखून मानाल। असी आह्मी आशा धरितों ॥ १४ आणि त्याप्रमाणे तुह्मी आह्मास कांहीं वोळखून मानिलें आहे। कीं प्रभू येशूच्या दिवसीं। जसें तुह्मी आमचा। तसें आह्मी तुमचा उल्हास आहों ※

१५ आणि ह्या भरवस्यानें म्या तुह्माजवळ यावयास यासाठीं पूर्वीं योजिलें। कीं तुह्मास दुसरा उपकार व्हावा। १६ मग तुह्माकडून माकेदनीस जावें। नंतर फिरोन माकेदनीपासून तुह्माजवळ यावें। आणि तुह्माकडून यहूदास पुढें पाठविलें जावें असें [योजिलें ॥] १७ तर म्या हें योजून चंचळपण केलें कीं काय? अथवा जीं मी योजितों। तीं देहाप्रमाणे योजितों? असीं कीं मजपासीं होय होय। मग नाहीं नाहीं व्हावें कीं काय? १८ परंतु देव विश्वासू। कां तर तुह्मासीं आमची गोष्ट,

तो होय व नाहीं, असो नव्हतो। १९ कां कीं देवाचा पुत्र
येशू ख्रीस्त, जो आह्माकडून। [ह्मणजे] मी व सिल्वानस व तिम
थ्यस। यांकडून तुह्मामध्यें गाजला। तो होय व नाहीं असा
न जाला। परंतु त्याविषयीं होय जाहें॥ २० कारण कीं दे
वाचीं जितकीं वचनें तितकीं त्याविषयीं होय। आणि त्यावि
षयीं खचीत [आहेत॥ हें] आह्माकडून देवाचें गौरव [होण्या]सा
ठीं [आहे॥] २१ आणि जो आह्मास तुह्मासुद्धां ख्रीस्तासाठीं
स्थिर करितो। आणि ज्यानें आह्मास न्हाणिलें। तो देव [आहे॥]
२२ आणि त्यानें आह्मावर मुद्रा केली। आणि आमच्यां हृ
दयांमध्यें आत्मा हा विसार दिल्हा आहे॥ २३ आणि मी
आपल्या जिवावरून देवाचें नांव घेतों। तो साक्षी। कीं मी
तुह्मास ममतेनें ठेवीत असतां। अद्याप करींथांत आलों ना
हीं॥ २४ आह्मी तुमच्या विश्वासावर धनिपण करितों। असें
नव्हे। परंतु आह्मी तुमच्या आनंदाचे साहाकारी आहों।
कां तर तुह्मी विश्वासानें उभे राहातां॥

पर्व २ ॥ १ आणि म्या खेदानें तुह्माकडे फिरोन न यावें। हें
आपणांत ठरविलें॥ २ कारण कीं जर मी तुह्मास खेद दे
तों। तर जो माझ्यानें खेदीत होतो। त्यावांचून जो मला सुखी
करील। तो कोण आहे? ३ आणि म्या हेंच तुह्मास। यासाठीं
लिहिलें। कीं मी आल्यावर। ज्यांकडून मला आनंदणें योग्य।
त्यांपासून मला खेद नसावा। कां। मला तुह्मा सर्वांविषयीं
असा भरवसा जाला। कीं माझा आनंद। हा तुह्मा सर्वांचा आहे॥
४ म्या तर। फार संकटानें। व हृदयांतील पेंचानें। बहुत अश्रवें
पाडितां लिहिलें। तुह्मी खेदीत व्हावें। यासाठीं नाहीं। परंतु
तुह्मावर जी प्रीति मला पुष्कळ आहे। ती तुह्मी जाणावी॥
५ परंतु जर कोणी खेद दिल्हा। तरीं त्यानें मला केवळ वां
ट्यानें खेद दिल्हा आहे। कारण कीं म्या तुह्मा सर्वांवर भा
र न ठेवावा॥ ६ अशाला ही शिक्षा। जी बहुतांनी [ला
विलेली।] ती पुरे॥ ७ यास्तव हिच्या पेक्षां निराळ्या प्रकारें।

तुह्मी क्षमा करावी। आणि प्रांतवन असें करावें। कीं अ
सा जो तो फारच खेदांत न बुडावा॥ ८ यास्तव तुह्मी
त्यावर प्रीति स्थापावी। असी मी तुह्मास विनंती करितों॥
९ कारण कीं म्या ह्यासाठींच लिहिलें। कीं तुह्मी अवघ्यांम
ध्यें आज्ञांकीत आहां किंवा नाहीं, याविषयीं तुमची परि
क्षा जाणावी॥ १० ज्याला तुह्मी कांहीं क्षमा करितां। त्या
ला मीहि [करितों।] कां कीं जर म्या कोणाला कांहीं क्ष
मा केलें। तर त्याला तुमच्या साठीं। ख्रीस्ताच्या वत्तीनें क्ष
मा केलें। ११ ह्याकरितां। कीं आह्मी साटानाकडून फट
विले न जावे। कां तर त्याच्या योजनांविषयीं आह्मी ने
णते नाहीं ※

१२ तर ख्रीस्ताच्या सुवर्तमानासाठीं त्रोवासास आल्या
वर। आणि प्रभूकडून दार उघडल्यावर। १३ मला
तितसभाउ न सांपडल्यावरून। आत्म्यांत स्वस्थता न आ
ली। परंतु त्यांपासून आज्ञा घेऊन। मी तेथून माकेदनी
स गेलों ※

१४ आणि देवासीं आभारमान [होवो।] तो ख्रीस्ताकडून आ
ह्मास सर्वदां जयानें मिरवितो। आणि प्रत्येकठिकाणीं आह्मा
कडून त्याला जाणण्याचा गंध प्रगट करवितो॥ १५ कां त
र जे तारले जातात। त्यांविषयीं, आणि जे नाश पावतात। त्यां
विषयीं आह्मी देवासाठीं ख्रीस्ताचा सुवास आहों। १६ ह्यांस।
मरणासाठीं मरणाचा गंध [आहों] खरें। परंतु त्यांस जी
वनासाठीं जिवनाचा गंध। आणि ह्यांसाठीं कोण पुरे?
१७ कां तर बहुत, जे देवाच्या गोष्टिंत भेळ करितात।
त्यांसारिखे आह्मी नाहीं। परंतु साळसुदपणाकडील तसे।
आणखी देवाकडील तसे। देवाच्या देखतां। ख्रीस्ताकडील।
[असे] बोलतों ※

पर्व ३॥ १ आह्मी आपणास फिरोन वाखाणुं लागतों
[कीं काय?] अथवा गूणपटण्याचीं पत्रें तुह्माकडे। किंवा तुह्मा

पासून, गुणपटण्याचीं [पत्रें।] जसें कित्येकांस पाहिजेत। तसें आह्मास [पाहिजेत] कीं काय? २ तुह्मी आमचें पत्र, आमच्या ह्रदयांत लिहिलेलें, सर्व माणसांकडून जाणलेलें। व वाचलेलें असें आहां॥ ३ तुह्मी असे प्रगट केलेले। कीं ख्रीस्ताचें पत्र आहां। आह्माकडून सेविलेलें। शाईने लिहिलें [असें] नव्हे। दगडी पाट्यांवर नाहीं। परंतु जीवंत देवाच्या आत्याने ह्रदयाच्या मासवान पाट्यांवर [लिहिलेलें असें॥] ४ आह्मास तर देवाविषयीं ख्रीस्ताकडून असा भरंवसा आहे॥ ५ आह्मी, जसें आपणांकडून तसें। आपल्या आपण कांहीं कल्पायास पुरे असें नव्हे। परंतु आमचें पुरेपण देवापासून [आहे॥] ६ आणि त्याने आह्मास नव्या कराराचे पुरे सेवक केले। अक्षराचे नाहीं। परंतु आत्म्याचे। कां तर अक्षर जिवें मारितें। परंतु आत्मा जिवंत करितो॥ ७ आणि मरणरूपी सेवा। अक्षरांकडून धोंड्यांवर खोदलेली, ती जर असी गौरवयुक्त जाली, कीं इस्राएलाचीं संतानें। मोश्याच्या तोंडाची कांती जी [आतां] नाहिंसी जाली, तिजमुळें त्याच्या तोंडावर दृष्टी लावायास शक्तिमान नव्हतीं। ८ तर तिजपेक्षां आत्मारूप सेवा अधीक गौरवयुक्त कसी नाहीं? ९ कां कीं जर अन्यायी ठरविणेरूप सेवा गौरवाने [होती।] तर न्यायी ठरविणेरूप सेवा केवढी विशेषें गौरवयुक्त असती! १० आणखी जें गौरवी जालें। तें वरिष्ठ गौरवामुळें। या प्रकाराने गौरवी न जालें। ११ कारण कीं जें गौरवाने नाहिंसें जालें। तें जर [गौरवी।] तर जें राहातें। तें केवढें अधीक गौरवयुक्त! १२ तर आह्मास असी आशा असतां। आह्मी फार धीट बोलण्याची वहिवाट करितों। १३ आणि मोश्यासारिखें [करीत] नाहीं। त्याने आपल्या तोंडावर यासाठीं मुखवस्त्र घातलें, कीं जें [आतां] नाहिंसें जालें। त्याच्या परिणामास इस्राएलाच्या संतानानी दृष्टी न लावली। १४ परंतु त्यांचीं मनें दाठरलीं गेलीं। कां तर जुना क

रार वाचण्यांत। तें मुखवस्त्र आजपर्यंतच राहातें। जें ख्रीस्ताकडून निरर्थ जालें, तें काढलें नाहीं। १५ परंतु आजपावेतों जेव्हां मोशे[शास्त्र] वाचलें जातें। तेव्हां तें मुखवस्त्र त्यांच्या अंत:करणावर राहातें॥ १६ तथापि जेव्हां हें प्रभूकडे फिरेल। तेव्हां तें मुखवस्त्र काढलें जाईल॥ १७ आतां जो प्रभू। तो आत्मा आहे। आणि जेथें प्रभूचा आत्मा। तेथें मोकळेपण [आहे॥] १८ तेव्हां आह्मी सर्व मुखवस्त्रारहीततोंडानें प्रभूचें गौरव आरशींत पाहात असतां, त्याच रूपांत। जसें प्रभूच्या आत्म्याकडून। तसें गौरवाहून गौरव होण्यासाठीं पालटलें जातों ※

पर्व ४ ॥ १ यास्तव। दया पावल्याप्रमाणे। ही सेवा आह्मास असतां। आह्मी थकत नाहीं॥ २ परंतु आह्मी लाजेचीं गुप्तपणें नकारिलीं। काव्यांत चालत नाहीं। आणि देवाच्या गोष्टिविषयीं कपट करीत नाहीं। परंतु खरेपण प्रगट करण्यानें आपणांस सर्वमाणसांच्या मनोभावाजवळ पटवितों। [हें] देवासमोर॥ ३ तथापि जरीं आमचें सुवर्तमान झांकलें, तरीं जे नाश पावतात। त्यांविषयीं झांकलें आहे॥ ४ त्यांविषयीं [असें आहे।] ह्या जगाच्या देवानें त्यां अविश्वासणाऱ्यांच्यां मनांस यासाठीं आंधळें केलें। कीं ख्रीस्त जो देवाची प्रतिमा आहे। त्याच्या गौरवाच्या सुवर्तमानाच्या प्रकाशानें त्यांमध्यें तेज न पाडावें॥ ५ कां तर आह्मी आपणांस नव्हे, परंतु ख्रीस्त येशू [जो] प्रभू। त्याला गाजवितों। आणि आपणांस येशूमुळें तुमचे सेवक [असे॥] ६ कारण कीं देव। ज्यानें उजेडाला अंधारांतून प्रकाशायास सांगितलें। तो। येशू ख्रीस्ताच्या तोंडीं देवाचें गौरव जाणण्याचा प्रकाश देण्यासाठीं। आमच्यां हृदयांमध्यें प्रकाशला आहे ※

७ तथापि पराक्रमाचें उत्कृष्टपण आमचें न [व्हावें।] परंतु देवाचें व्हावें। ह्मणोन हा संग्रह मातीच्यां पात्रांमध्यें आह्मास आहे॥ ८ आह्मी अवघ्यांत संकट पावलों। परं

तु पेंचलों नाहीं। आह्मी गुढांत पडलों, परंतु नि
राश गुढांत नाहीं॥ ९ आमच्या पाठीस लागले, परंतु आ
ह्मी टाकले न गेलों। खालीं पाडले गेलों, परंतु नाश पा
वलों नाहीं॥ १० आह्मी प्रभूयेशूचें मारलें जाणें, हें सर्व
दां शरिरांत याशाठीं वाहातों, कीं येशूचें जीवनहि आमच्या शरि
राकडून प्रगट केलें जावें॥ ११ कां तर आह्मी जगणारे,
येशूमुळें। मरणासाठीं पराधीन सर्वदां याकरितां आहों।
कीं येशूचें जगणेंहि आमच्या मरणाऱ्या देहांकडून। प्रगट केलें
जावें॥ १२ तर आह्मामध्यें मरण घडतें खरें। परंतु तु
ह्मामध्यें जीवन॥ १३ तथापि आह्मास विश्वासाचा येकच आ
त्मा आहे। जें लिहिलें त्याप्रमाणे, [कीं] मी विश्वासलों,
यास्तव बोललों। आह्मीहि विश्वासतों। आणि याशाठीं बोल
तों। १४ कां, हें कळलें, कीं ज्याने प्रभूयेशूला उठविलें।
तो येशूकडून आह्मासहि उठवील। आणि तुमच्या संगतीं
सादर ठेवील॥ १५ कां तर अवघीं तुह्मासाठीं, असें कीं क
पा विशेष होऊन बहुतांच्या आभारस्तुतीकडून देवाच्या गौरवा
साठीं फार वाढावी॥ १६ यास्तव आह्मी थकत नाहीं। प
रंतु जरीं आमचें बाहेरील मनुष्यपण नासतें। तथापि जें आं
तील, तें दिवसोदिवसीं नवें केलें जातें॥ १७ कां तर आ
मचें क्षणीक हलकेंच संकट। हें आह्माशाठीं पराकाष्ठेंतील
पराकाष्ठेने गौरवाचा सर्वकाळ भार घडवितें॥ १८ जीं दि
सतात त्यांस आह्मी न्याहाळीत नाहीं, परंतु जीं दिसत ना
हींत त्यांस। कारण कीं जीं दिसतात। तीं क्षणभंगूर, परंतु
जीं दिसत नाहींत। तीं सर्वकाळ [आहेत॥]

पर्व ५॥ १ कां तर आह्मी जाणतों, कीं जर आ
मचें पृथ्वीवरील मांडवरूप घर मोडलें असतें, तर आह्मा
स देवाची रचना। हातकामी नाहीं [असें] सर्वकाळचें
घर आकाशांमध्यें आहे॥ २ आणखी ह्यांत आह्मी कण्ह
तों। कां, आह्मी आपल्या आकाशांतील वस्तीकडून झांकले जा

वे ह्मणोन फार इछितों। ३ ह्मणजे जर आंकल्यावरहि नागवे न सांपडूं तर॥ ४ आणखी घे आह्मी ह्यां मांडवांत आहों। ते आह्मी भारावले असतां कण्हतों। यावरून कीं आह्मी वस्त्र फेडायास इछितों, असें नव्हे। परंतु असें पांघरलें जायास। कीं जें मरणारें। तें जीवनाकडून गिळिलें जावें॥ ५ आणि ज्याने आह्मास ह्याकरितांच घडून केलें। तो देव [आहे।] त्याने आह्मास आत्माविसारहि दिल्हा आहे॥ ६ यास्तव आह्मास सर्वदां धीर आहे। आणि आह्मी हें जाणतों। कीं शरिरांत वस्ती करण्याने आह्मी प्रभूपासून प्रवासी आहों। ७ कां तर आह्मी पाहाण्याने नव्हे। परंतु विश्वासाने चालतों॥ ८ तथापि आह्मास धीर आहे। आणि शरिराबाहेर प्रवास करणें, व प्रभूपासीं वस्ती करणें, हीं आह्मास विशेष आवडतात॥ ९ आणि यास्तव आह्मी प्रेमाने ही मर्यादा शोधितों। कीं जरीं वस्तींत असतां। किंवा प्रवासांत असतां। तरीं आह्मी त्याला फार आवडते व्हावें॥

१० कां कीं आह्मा सर्वांस ख्रीस्ताच्या न्यायासनासमोर उघडें व्हावें लागतें। यासाठीं कीं प्रत्येकाने शरिरासहीत [असतां,] जीं केलीं त्यांप्रमाणें। जरीं बरें किंवा वाईट। तरीं तें पावावें॥

११ यास्तव आह्मी प्रभूचें भय जाणून, माणसांस विश्वासवितों। आणि आह्मी देवाजवळ प्रगट आहों। आणि मी असी आशा धरितों। कीं आह्मी तुमच्यां मनोभावांतहि प्रगट आहों॥ १२ कां तर आह्मी आपणांस तुह्माजवळ फिरोन वाखाणीत नाहीं। परंतु तुह्मास आह्माविषयीं नावांजून घ्यायाचें निमित्त। यासाठीं देतों। कीं जे तोंडीं नावांजतात। आणि हृदयीं नाहींत। त्यांजवळ तुह्मास [उत्तर] असावें॥ १३ कां कीं जरीं आह्मी भ्रम पावलों। तरीं देवासाठीं [आहे।] आणि जरीं आह्मी सावधहि आहों। तरीं [हें] तुह्मासाठीं॥ १४ कारण कीं ख्रीस्ताची प्रीति आह्मास दडपती। कां। आह्मी हें ठरवितों, कीं जर येक सर्वांसाठीं मेला। तर सर्व

मेले होते। १५ आणि तो सर्वांकरितां, यासाठीं मेला, कीं जे ज
गतात, त्यांनी आपणांसाठीं आणखी न जगावें, परंतु आ
पणांकरितां जो मेला व उठला, त्यासाठीं॥ १६, या
स्तव आतांपासून आह्मी कोणाला देहाप्रमाणे जाणत नाहीं।
आणि जरीं आह्मी ख्रीस्ताला देखील देहाप्रमाणे जाणलें होतें,
तथापि आतांपासून पुढें [तसें] जाणत नाहीं॥ १७ या
स्तव जर कोणी ख्रीस्ताकडील [आहे,] तर तो नवा उत्प
न्न [आहे।] जीं जुनीं तीं होऊन गेलीं। पाहा। अवघीं न
वीं जालीं आहेत॥ १८ परंतु अवघीं देवापासून [आहेत।]
त्याने आपणाशीं आमचा समेट येशू ख्रीस्ताकडून करविला, आ
णि समेटाची सेवा आह्मास दिल्ही आहे। १९ ह्मणजे देव ख्री
स्ताकडून आपणाशीं जगाचा समेट करवीत आहे। [त्यांतील जे]
त्यांचीं पातकें त्यांशीं मोजीत नाहीं। आणि समेटाची गोष्ट
आह्माजवळ ठेविली आहे॥ २० यास्तव आह्मी ख्रीस्तासाठीं व
किलपण करितों। जसें देव आह्माकडून बोध करविता तसें।
आह्मी ख्रीस्ताकरितां विनंती करितों, [कीं] तुह्मी देवाशीं समे
टाने मिळावें। २१ कारण कीं त्याने पाप न जाणणारा
त्याला आह्माकरितां यासाठीं पापरूप केलें, कीं आह्मी
त्याकडून देवाकडचें पुण्यरूप व्हावें ॥

पर्व ६ ॥ १ आणि आह्मी सहीत काम करीत असतां, तु
ह्मास विनंती करितों। कीं तुह्मी देवाची कृपा व्यर्थ न घ्या
वी॥ २ कां तर तो बोलतो। [कीं] ग्या याह्य वेळेस तुझें ऐ
किलें आहे। आणि तारणाच्या दिवसीं तुझें साह्य केलें आ
हे॥ पाहा, आतां फार याह्य वेळ। पाहा, आतां तार
णाचा दिवस [आहे॥] ३ सेवा खोडली न जावी, ह्मणोन
[आह्मी] कोणाला कांहीं अडखळणें देत नाहीं। ४ परंतु
अवघ्यांत आपणांस देवाचे सेवक असे पटवितों। फार सहनतेने।
संकटाने। अगत्यानी। पेंचानी। ५ फटक्यानी। अटकानी।
दंग्यानी। श्रमानी। जागरणानी। उपासानी। ६ निर्मळपणा

ने। जाणण्याने। गमखाण्याने, सालसपणाने, पवित्र आत्म्याने। ढों गरहित प्रीतीने। ७ खरें बोलण्याने। देवाच्यां सामर्थ्याने। उज व्याकडलीं व डाव्याकडलीं, पुण्य हातेरें यांकडून। ८ सन्मान व अप मान यांकडून। अपकीर्ती व सत्कार्ती यांकडून। ठकविणाऱ्यां सारिखे। तथापि खरे। ९ अनवोळख्यांसारिखे। तथापि व. रें वोळखिले। मरत्यांसारिखे। परंतु पाहा, आह्मी जग तों। शिक्षा पावल्यांसारिखे। परंतु जिवें मारिले नाहीं। १० खेदितांसारिखे, परंतु सर्वदां आनंदते। दरिद्री यांसारि खे। तथापि बहुतांस धनवान करिते। आपल्यांस कांहीं नस तां। तथापि अवघें असतां असे [आहों ॥] ११ अहो करींथ कर, तुह्मासीं आमचें तोंड उघडलें आहे। आमचें हृदय वाढलें आहे॥ १२ तुह्मी आह्माकडून पेंचलां नाहीं। परंतु आपल्यां आंतड्यांकडून पेंचलां आहां॥ १३ आणि तीच फेड [घ्या।] तुह्मींहि वाढले जा। मी लेंकरांस असें बोलतों॥ १४ अ विश्वास्यांसीं तुह्मी असंगत जुंपले जाउं नका। कां कीं नीति व नेमभंग यांचा काय संबंध? आणि उजेडाला काळोखासीं काय भागीपण? १५ ख्रीस्ताला बलीयालासीं काय येकता ळ? विश्वासणाऱ्याला अविश्वासणाऱ्यासीं काय भाग? १६ आ णि देवाच्या देवळाला साकार देवांसीं काय संकेत? तुह्मी त र जिवंत देवाचें देउळ आहां। त्याप्रमाणे देवाने ह्मटलें। कीं मी त्यांमध्यें वस्ती करीन। व चालेन। आणि मी त्यां चा देव होईन। व ते माझे लोक होतील। १७ यास्तव, तुह्मी त्यांमधून निघा। आणि वेगळे व्हा। असें प्रभू सांग तो। आणि अपवित्राला शिवूं नका। मग मी तुह्मास अंगिका रीन। १८ आणि मी तुमचा बाप असा होईन। आणि तु ह्मी माझे पुत्र व कन्या असीं व्हाल। सर्वधारी प्रभू, [तो असें] सांगतो ※

पर्व ७ ॥ १ यास्तव। अहो प्रीय। आह्मास हीं वचनें अ सतां। आह्मी देवाच्या भयाने पवित्रपण पूर्ण करीत असतां।

देह व आत्मा यांच्या सर्व अशुद्धपणापासून आपणांस शुद्ध
करावें ॥
२ तुम्ही आम्हांस स्वीकारा। आम्ही कोणाचा अन्याय
केला नाहीं। कोणास नासविलें नाहीं। कोणास ठकविलें नाहीं॥
३ अन्यायी ठरविण्यासाठीं। मी बोलत नाहीं। कां तर म्या
पूर्वीं सांगितलें। कीं तुम्ही सहीत मरायास, आणि सहीत
जगायास आमच्या हृदयांमध्यें आहां॥ ४ मला तुम्हांसीं फा
र निर्भयबोलणें। मला तुम्हांविषयीं फार नावाजणूककरणें
[आहे॥] मी शांतवनाने भरलों आहें। आमच्या अवघ्या सं
कटांत मी आनंदाने परिपूर्ण जालों आहें। ५ कां कीं आ
म्ही माकेदनींत आल्यावर। जरीं आमच्या देहाला कांहीं चैन
नव्हतें। आणखी आम्ही अवघ्यांत संकट पावलों [होतों।] बाहेर
भांडणें। आंत भयें [होतीं।] ६ तथापि लिनांचा शांतवन
करणारा। जो देव। त्याने तितसाच्या येण्याकडून आमचें शांतवन
केलें॥ ७ आणि त्याच्या येण्याकडून केवळ नव्हे, परंतु त्या
ला तुम्हांविषयीं जें शांतवन जालें त्याकडूनहि। मजविषयीं
तुमची उत्कंठा। तुमचा शोक। तुमचा आवेश। हीं त्याने
आम्हांस सांगितलीं। असें कीं मी विशेष आनंद पाव
लों॥ ८ कां तर जरीं म्या पत्राने तुम्हांस खेद दिल्हा, आ
णि जरीं म्या अनुताप केला होता। तथापि मी [आतां]
अनुताप करीत नाहीं। कां तर। मी पाहातों। कीं, जरीं
त्या पत्राने तुम्हांस घटकेपर्यंत खेद दिल्हा। ९ तरीं आ
तां मी आनंदतों। तुम्ही खेद पावलां। यावरून नव्हे। परंतु
तुम्ही पश्चात्ताप करण्यापर्यंत खेद पावलां। यावरून। कां त
र तुम्ही देवाजवळ असा खेद पावलां। कीं तुम्ही आ
म्हाकडून कशाविषयीं अनहीत न पावावें॥ १० कारण
कीं देवाजवळचा खेद। हा। तारण होण्यासाठीं। अनुता
पाविरहीत अशा पश्चात्ताप घडवितो॥ परंतु जगसंबंधी
खेद। हा मरण घडवितो॥ ११ कारण कीं। देवाप्रमाणें तु

मचें खेद पावणें। तेंच पाहा। त्यानें तुमचा केवढा लगट घडविला! आणखी तोंडबोलणें। आणखी संताप। आणखी भय। आणखी उत्कंठा। आणखी आवेश। आणखी न्याय पुरविणें! ह्या कामांत तुह्मी आपणांस सर्वस्वें निर्लेप करून ठेविलें आहे॥ १२ तर जरीं म्या तुह्मांसीं लिहिलें। तथापि। ज्यानें अन्याय केला त्याच्या साठीं नव्हे। आणि ज्यावर अन्याय जाला त्याच्या साठीं नव्हे। परंतु देवाच्या दृष्टींत तुह्मा करितां आमचा लगट। हा तुह्माजवळ प्रगट व्हावा। ह्मणोन [लिहिलें॥] १३ यासाठीं तुमच्या शांतवनावरून आह्मी शांतवन पावलों। आणि विशेष तितसाच्या आनंदावरून आह्मी फारच आनंदलों। तुह्मा सर्वांकडून त्याचा आत्मा विसांवा पावला ह्मणोन॥ १४ यास्तव जरीं म्या त्याजवळ तुह्माविषयीं कांहीं नावाजून घेतलें, तरीं मी लाजत नाहीं। परंतु जसें आह्मी तुह्मांसीं अवघीं खरेपणानें बोललों, तसें तितसाजवळ आमची नावाजणूक तीहि खरीच जाली आहे॥ १५ आणि तुह्मी भय व कांपणें। यांसुद्धां जसें त्याला अंगिकारिलें, तसें तो तुह्मा सर्वांची मान्यता आठवीत असतां, त्याचे कळवळे तुह्मावर फारच आहेत॥ १६ मला सर्वस्वें तुह्मावर भरंवसा आहे, यास्तव मला आनंद होतो॥

पर्व ८॥ १ आतां, अहो भाऊ, देवाची कृपा। जी माकेदनींतील मंडळ्यांवर ठेविली। ती आह्मी तुह्मास कळवितों। २ कीं संकटरूप फार प्रचिति होत, त्यांच्या आनंदाचा अतिशय, आणि समुद्राप्रमाणें त्यांचें दरिद्र। ह्यांनी त्यांचें उदारपणरूप धन याला फार वाढविलें आहे॥ ३ कांतर मी साक्ष देतों। [कीं] ते शक्तीप्रमाणें। आणि शक्तीपेक्षां अधीक। आपसुखें सिद्ध [होते॥] ४ त्यांनी फार विनंतीनें आह्मांसीं हें मागितलें, कीं आह्मी तें उपकारद्रव्य। ह्मणजे सेवारूप समागीत दान। घ्यावें॥ ५ आणि जसें आह्मी आशा धरिली होती। तसें [केवळ] नव्हे, परंतु त्यांनी पहिलें प्रभू

ह्या आपणास दिल्हे। मग देवाच्या इच्छेप्रमाणे आह्मास [दि ल्हे।] ६ यास्तव आह्मी तितसाजवळ असें मागितलें। कीं जसें त्या ने पूर्वीं प्रारंभ केला होता। तसेंच त्याने ह्या उपकाराची स माप्तीहि तुह्मामध्यें करावी॥ ७ आणखी [आह्मी मागतों।] कीं। जसें तुह्मी अवघ्यांत फार करीत असतां। विश्वासांत। व बोलण्यांत, व जाणण्यांत। व सर्व लगटांत, व आह्मावरील तुमच्या प्रीतींत। तसें तुह्मी ह्या उपकारांतहि फार करावें॥ ८ मी नेमणुकीने बोलत नाहीं। परंतु दुसऱ्यांच्या लगटामुळें। आणि तुमच्या प्रीतीचें कुळीणपण पारखीत [बो लतों॥] ९ कां तर आमच्या प्रभू येशू ख्रीस्ताचा उपकार तुह्मी जाणतां, कीं तो धनवान असतां। तुह्माकरितां यासाठीं दरिद्री जाला, कीं तुह्मी त्याच्या दरिद्राने धनवान व्हावें॥ १० आणि याविषयीं मी संमत देतों। कां कीं हें तुह्मास उपयोगी आहे। तेच तुह्मी पूर्वीं, वर्षामागें। [हें] करूं केवळ नव्हे। परंतु [याची] आवड धरूंहि। लागलां॥ ११ आणि आतां [हें] करणेंहि समाप्त करा। ह्मणजे ज्या प्रकारें आवड धरण्याचें फुरण। तसें, तुमचें जें आहे त्यांतून। समाप्त करणेंहि व्हावें॥ १२ कां कीं जें कोणाला नाहीं। त्याप्रमाणे नव्हे। परंतु। जें आहे। त्याप्रमाणे जर फुरण आहे। तर तें सुग्राह्य आहे॥ १३ कां तर दुसऱ्यांस सुटका, आणि तुह्मास संकट व्हावें, असा हेतु नाहीं। परंतु समानतेने। या सध्यां काळीं। तुमचा अतिशय त्यांच्या खुटीच्या ठिकाणीं [व्हावा।] १४ हा हेतु कीं त्यांचा अतिशय तुमच्या खुटीच्या ठिकाणीं व्हावा। ह्मणजे समानता व्हावी। १५ जसें लिहिलेलें तसें। [कीं] ज्याचें फार। त्याचें उरलें नाहीं। आणि ज्याचें थोडें त्याचें खुटलें नाहीं॥ १६ आणि देव। ज्याने तितसाच्या हृदयांत तुह्मासाठीं तसाच लगट घातला, त्यासीं आभारमान [असो॥] १७ कां कीं ह्याने विनंती मानून घेतली खरें। आणि फार लगटवान असतां, आपसुखें

तुह्माकडे निघाला॥ १८ आणि यासहीत आह्मी असा भा
उ पाठविला आहे। कीं सुवर्तमानाविषयीं त्याची वाखणणू
क सर्व मंडळ्यांतून [आहे।] १९ आणि हें केवळ नव्हे। प
रंतु मंडळ्यांकडून असा निवडलेलाहि। कीं ह्या जो उपकार त्याच
प्रभूच्या गौरवासाठीं, आणि तुमच्या फुरणासाठीं। आह्मा
कडून सेविलेला। ह्याविषयीं तो आमचा सहप्रवासी [व्हावा।]
२० कां, हि प्रेरणा आह्मास लागली, कीं हें विपुळप
ण। ज्याविषयीं आह्माकडून सेवा घडली। त्याविषयीं कोणी
आह्मावर दोष न लावावा॥ २१ प्रभूच्या दृष्टींत केवळ नव्हे।
परंतु माणसांच्या दृष्टींतहि। जीं चांगलीं। तीं पूर्वीं आह्मी यो
जिलीं। २२ आणि त्यांसहीत आह्मी आपला असा भाउ पा
ठविला आहे। कीं तो लगटवान आहे। असी त्याची प्रचि
ती आह्मी बहुतांविषयीं घेतली आहे। आणि आतां तु
ह्मावरच्या फार भर्वस्यावरून तो फार अधीक लगटवान।
[असी प्रचिती घेतली आहे॥] २३ आणि जर तितसाविषयीं
[विचाराल,] तर [तो] माझा भागिदार व तुह्मासाठीं
सहकामकरी [आहे॥] अथवा जर आमचे भाऊ यांविषयीं
[विचाराल।] तर [ते] मंडळ्यांचे प्रेषीत। [व] खीस्ताचें गौर
व [आहेत॥] २४ यास्तव तुह्मी आपल्या प्रीतीचें, व आ
मचें तुह्माविषयीं नावाजूनघेणें याचें प्रमाण त्यांजवळ, आ
णि मंडळ्यांच्या दृष्टीस दाखवा॥

पर्व ९॥ १ तरी पवित्रांसाठीं हें वांटादान, याविषयीं
तुह्मासीं माझें लिहिणें हें अतिरिक्त आहे खरें। २ कां
कीं तुमचें फुरण मला कळलें। ह्या तेंच तुह्माविषयीं मा
केदनींतल्यांजवळ असें नावाजलें आहे। कीं आखाई [येक] वर्षा
मागें सिद्ध जाली होती। आणि तुमच्या आवेशानें बहुतांस चे
तविलें आहे। ३ तथापि ह्या गोष्टींत। तुह्माविषयीं आम
चें नावाजूनघेणें पोकळ न व्हावें। ह्मणोन ह्या ह्या भाऊंस
असासाठीं पाठविले आहे। कीं जसें ह्या ह्मटलें। तसें तु

ह्मी सिद्ध व्हावें॥ ४ नाहींतर कदाचित माकेदनी माणसें
माझ्या संगतीं आल्यास। आणि तुह्मी सिद्ध नाहीं ह्मणोन पाहि
ल्यास। आह्मी नावाजण्याच्या निर्धारावरून लाजावें। ह्मणजे
तुह्मी [लाजाल।] हें आह्मी न ह्मणावें॥ ५ तर ह्या हें
अगत्य मोजिलें। कीं ह्यां भाऊंजवळ असें मागावें कीं यांनी
पुढें तुह्माजवळ जावें। आणि तुमचा पूर्वीं सांगतलेला प्रसाद
आगोधर पूर्ण करवावा। ह्मणजे तें सिद्ध करणें लोभिष्टपणा
प्रमाणे न व्हावें। परंतु जसा प्रसाद तसें॥ ६ परंतु हें [जा
णा।] जो चुंबकपणें पेरितो। तो चुंबकपणें कापीलाहे। आ
णि जो प्रसादानी पेरितो। तो प्रसादानी कापीलहि॥ ७ जसें प्र
त्येक आपल्या हृदयांत पूर्वीं पत्करतो। त्याप्रमाणे [देवो।]
खेदाने अथवा बळात्काराने न [देवो।] कां तर संतुष्ट देणारा
यावर देव प्रीति करितो॥ ८ आणि ह्मास देव शक्तिमान [आ
हे।] कीं त्याने तुह्मावर सर्व कृपा अशी वाढवावी। कीं तु
ह्मास संपूर्ण पुरवठा सर्वांत सर्वदां असतां। तुह्मी प्रत्येक चां
गलें काम फार करावें। ९ जसें लिहिलेलें तसें। [कीं] त्या
ने पसरविलें। दरिद्र्यांस दिल्हें। त्याचें पुण्य सर्वकाळापर्यंत
राहातें। १० आतां जो पेरणाऱ्याला बीज पुरवितो। त्याने खा
ण्यासाठीं पुरवावें। आणि तुमचें पेरणें फार करवावें। आणि तुम
च्या पुण्याचे उपज वाढवावे। ११ सर्व उदारपणासाठीं अवघ्यांत तु
ह्मी धनवान केले [जावे॥] हें [उदारपण] आह्माकडून देवाजवळ
आभारस्तुती घडवितें। १२ कां तर ह्या सेवेचें काम पवित्रां
च्यां तोट्यांस परिपूर्ण करितें। हें केवळ नव्हे। परंतु देवाज
वळ बहुत आभारस्तुतींविषयीं फार सफळ असतें॥ १३ ह्या
सेवेच्या अनुभवावरून, ते। ख्रीस्ताच्या सुवर्तमानाजवळ तुमच्या
पत्करण्यांतील आधीनपण यामुळें। आणि त्यांजवळ व सर्वांजवळ
तुमचें भागीपणरूप उदारपण यामुळें देवाचें गौरव करितात।
१४ आणि तुह्माकरितां त्यांचें प्रार्थना करणें। यांत तुह्मा
वर देवाच्या अतिशय कृपेवरून तुह्माविषयीं फार इच्छितात॥

१५ आतां देवाचें न वर्णवणारें देणें। यामुळें त्याशीं आभा रमान [असो ※]

पर्व १० ॥ १ आतां मी पाउलस स्वतां, जो समक्षपणांत तुह्मामध्यें नीच खरें। परंतु असमक्ष असून तुह्माविषयीं धीट [आहें।] तो मी। ख्रीस्ताच्या नम्रतेवरून व सालसपणावरून तुह्मासीं विनंती करितों। २ आणि मी मागतों। कीं जे कित्येक आह्मास देहाप्रमाणे चालणारे असें मोजितात। त्यांवर ज्या निर्धाराने मी धैर्य करायास योजितों। त्याकडून धीट। असें म्या समक्ष जाल्यावर न व्हावें॥ ३ आह्मी तर देहाने चालत असतां[हि] देहाप्रमाणे लढत नाहीं। ४ कारण कीं आमच्या लढाईचीं हातेरें दैहीक नव्हेत। परंतु देवाकडून दुर्गें मोडून टाकायास शक्तिवंत [आहेत।] ५ कल्पनां। व प्रत्येक उंचो। जी देवाला जाणणें याविरुद्ध चढती। त्यांस मोडून टाकितों। आणि ख्रीस्ताला मानण्यास प्रत्येक भावनेला पाडाव करून नेतों। ६ आणि जेव्हां। तुमचें मानणें पूर्ण होईल। तेव्हां सर्व अनमान दंडायास सिद्धतेने असतों ※ ७ जीं दिसण्यांत, त्यांस तुह्मी पाहातां कीं काय? जर कोणाला आपल्यावर भरंवसा आहे। कीं [आपण] ख्रीस्ताचा आहें। तर तो आपल्या आपण फिरोन हा विचार करो। कीं जसें तो ख्रीस्ताचा। तसें आह्मीहि ख्रीस्ताचे [आहों॥] ८ तर। आमचा जो अधिकार प्रभूने तुमच्या पाडण्यासाठीं नव्हे। परंतु रचण्यासाठीं आह्मांस दिल्हा। त्याविषयीं जरीं मी कांहीं अधीकहि नावाजून घेतों। तरी मी लाजणार नाहीं॥ ९ हेतु असा। कीं म्या पत्रांकडून तुह्मास भय घालतां यासारिखें न दिसावें। १० कां तर ते ह्मणतात। कीं [त्याचीं] पत्रें वजनी व बळकट खरें। परंतु [त्याच्या] शरिराचें दिसणें अबळ। आणि [त्याचें] बोलणें धि:कारीत [आहे॥] ११ असा [ह्मणणारा] हें लेखो। कीं आह्मी असमक्ष असतां। पत्रांकडून गोष्टीने असे

आहों। तसेच आह्मी समक्ष जाल्यावर करण्यानेहि [होऊं] ※
१२ कारण कीं जे कित्येक आपणांस वाखाणितात। त्यांसहीत आ
ह्मी आपणांस मोजायाला। अथवा रुजू करायाला न धजतों।
आणखी ते आपणांकडून आपणांस मोजीत असतां। आणि
आपणांसीं आपणांस रुजू करीत असतां। समजत नाहींत॥
१३ आणि आह्मी अनेमितांविषयीं नावाजून घेणार नाहीं।
परंतु जें परिमाणसूत्र देवाने आह्मास वांटून दिल्हें। त्याप्रमा
णें। [तें] मेज तुह्मापर्यंतहि पोहंचायाचें आहे। १४ कां कीं
तुह्मापर्यंत पुरत नसल्यासारिखे। आह्मी आपणांस आगळें
ताणीत नाहीं। कारण कीं ख्रीस्ताचें सुवर्तमान सांगण्याने आ
ह्मी तुह्मापर्यंतहि पोहंचलों आहों॥ १५ अनेमितांविषयीं दु
सऱ्यांच्या श्रमानी आह्मी नावाजून घेत नाहीं। परंतु आह्मास
असी आशा आहे। कीं तुमचा विश्वास वाढविला गेल्यावर।
आह्मी आपल्या सूत्राप्रमाणे तुह्माकडून अतिशयाने असे वाढ
विले जावे। १६ कीं तुह्मापलीकडील जे [प्रांत।] त्यांमध्यें सु
वर्तमान सांगावें। [आणि] दुसऱ्याच्या सूत्रांत जीं सिद्ध [जा
लीं।] त्यांविषयीं न नावाजून घ्यावें। १७ आणि जो नावाजतो।
तो प्रभूविषयीं नावाजो। १८ कां कीं जो आपणाला वाखाणि
तो। तो परिक्षापटीत नाहीं। परंतु ज्याला प्रभू वाखाणि
तो। तो ※

पर्व ११॥ १ तुह्मी माझें निर्बुद्धीपण थोडें साहिलें पाहिजे
होतें। आणखीहि माझें साहा। २ कां तर मी देवाच्या आ
वेशाने तुह्मासाठीं आवेश धरितों। कारण कीं म्या येक न
वऱ्यासाठीं तुमचें लग्न योजिलें। कीं म्या तुह्मास शुद्ध कुंवारि।
[असी।] ख्रीस्ताला सादर ठेवावें॥ ३ परंतु जसें सापाने आपल्या
काव्याने हाव्वेला ठकविलें, तसें ख्रीस्ताकडलें भोळेपण। यापा
सून तुमचीं मनें कशानेहि नासविलीं असतील असें मी भितों॥
४ कां तर जो येतो, तो जर दुसरा येशू। ज्याला आ
ह्मी गाजविलें नाहीं। त्याला गाजवितो। किंवा तुह्मी दुसरा

आत्मा। ज्याला [आम्ही] घेतलें नाहीं। त्याला घेतां।
अथवा दुसरें सुवर्तमान ज्याला तुम्ही अंगिकारिलें नव्हतें।
तें [जर आतां घेतलें।] तर तुम्ही ठिकपणें साहावें॥ ५ त
र प्रेषितांतील जो श्रेष्ठ। त्यापेक्षां [मी] कांहींच उणा ना
हीं। असें मी मोजितों॥ ६ आणि जरी मी बोलण्यांत अ
शिक्षितच [आहें] तथापि जाणण्यांत नाहीं। परंतु आम्ही
सर्वस्वें अवघ्यांत तुम्हामध्यें प्रगटच आहों॥ ७ तुम्ही उंच
व्हावें म्हणोन म्या आपणाला नीच केलें। यांत पाप केलें कीं
काय? देवाचें सुवर्तमान तर म्या मोलावांचून तुम्हास सांगित
लें॥ ८ तुमच्या सेवेसाठीं म्या दुसऱ्यां मंडळ्यांपासून वेत
न घेण्यानें त्यांस लुटलें॥ आणि मी तुम्हापाशीं समक्ष अ
सतां। आणि अबाळींत असतां। कोणाला जड जालों
नाहीं। ९ कारण कीं जे भाऊ माकेदनीहून आले। त्यांनी
माझें चितवण पूर्ण भरिलें॥ आणि सर्वस्वें म्या आपणाला
तुम्हासीं भारावांचून राखिलें आहे, आणि राखीन। १० ख्री
स्ताची सत्यता मजमध्यें आहे। कां तर आखाईतल्यां प्रांतां
मध्यें कोणी ह्या नावाजणुकीला मजसीं कुंठीत करणार नाहीं॥
११ [असें राखणें] कशासाठीं? मी तुम्हावर प्रीति करीत
नाहीं म्हणोन कीं काय? देवाला कळलें॥ १२ परंतु जें
मी करितों तें यासाठीं करीनहि, कीं जे निमित्त पाहाता
त, त्यांपासून म्या निमित्त कापून टाकावें। म्हणजे ज्याविष
यीं ते नावाजून घेतात। त्याविषयीं ते आम्हासारिखेच सांपडावे॥
१३ कां तर असे जे, ते खोटे प्रेषीत। कपटकरणा
रे, ख्रीस्ताचें प्रेषतरूप नटून घेणारे [आहेत।] १४ आणि
[हें] आश्चर्याचें नाहीं। कां तर साटान आपण उजेडी दुताचें
रूप नटून घेतो। १५ यास्तव त्याचे सेवकहि जर पालटून पुण्या
च्यां सेवकांसारिखे होतात। तर [हें] मोठें नाहीं। त्यांचा शे
वट त्यांच्यां कामांप्रमाणें होईल॥ १६ मी आणखी म्हणतों।
कोणी मला बुद्धीहीन असें न कल्पावें। परंतु जर अन

या। जरीं बुद्धिहीनाला जसें। तसें तरीं मला यासाठीं अं
गिकारा। कीं म्या कांहीं थोडी नावाजणूक करावी॥ १७ ना
वाजणुकीच्या ह्या निर्धाराने जें मी बोलतों। तें प्रभूप्रमाणें बो
लत नाहीं। परंतु जसें निर्बुद्धीने तसें॥ १८ देहाप्रमाणें बहू
त नावाजून घेतात। यावरून मीहि नावाजून घेईन। १९ का
तर तुह्मी शाहाणे असतां, सुखाने बुद्धिहीनांचें साहातां॥
२० कां कीं जर कोणी तुह्मास चाकरपणांत घालितो। जर कोणी
तुह्मास खाऊन टाकितो। जर कोणी [तुमचें] घेतो। जर को
णी आपणाला थोर ह्मणवितो। जर कोणी तुमच्या तोंडांत
मारितो। तर तुह्मी साहातां॥ २१ आह्मी अबळ असलों।
असें मी अपमानाविषयीं बोलतों। परंतु ज्यांत कोणी धी
ट असेल। त्यांत मीहि धीट आहें। मी निर्बुद्धिरूप बोलतों॥
२२ काय, ते इब्री आहेत? [तसा] मीहि। काय। ते इ
स्राएली आहेत? [तसा] मीहि। काय। ते आब्राहामाचें
बीज आहेत? [तसा] मीहि। २३ काय, ते ख्रीस्ताचे से
वक आहेत? मी बुद्धिबाहेर बोलतों। अतिशयें श्रम यां
कडून। पराकाष्ठेने फटक्यांकडून। अतिशयें बंदिशाळांकडून।
क्षणक्षणीं मरणांकडून। [असें] मी अधीक [आहें।] २४ यहूद्यांपा
सून पांच वेळ। म्या येकों उणे चाळीस [फटके] घेतले। २५ मी
छडीनीं तीनदां मारला गेलों। येकदां धोंडमार पावलों।
तीनदां नौकाफुटण्यांत होतों। म्या अहोरात्र समुद्रडोहांत
क्रमिलें। २६ बहुत वेळ मार्गगमनांमध्यें, नद्यांतील भयग
तींमध्यें। लुटाऱ्यांकडच्यां भयगतींमध्यें। स्वजाती यांकडून भय
गतींमध्यें। परप्रजांकडून भयगतींमध्यें। नगरांतील भयगतीं
मध्यें। रानांतील भयगतींमध्यें। समुद्रांतील भयगतींमध्यें, खोटे
भाऊ यांतील भयगतींमध्यें। २७ श्रम करण्यांत। आणि कष्टी
कामांत। बहुत वेळ उजागऱ्यांमध्यें। भुकेंत व तान्हेंत, बहुत वेळ
उपासांमध्यें। थंडींत व उघडेपणांत [असा मी होतों॥]
२८ बाहेरील जीं यांच्या खेरीज प्रतीदिवसीं माझा उपाधी, सग

व्यां मंडळ्यांची चिंता [आहे॥] २९ मी अशक्त होत न
सतां। कोण अशक्त आहे ? मी संतापल्यावांचून। कोण अड
खळविला जातो ? ३० जर नावाजणूक केली पाहिजे। तर
माझ्या अबळपणाचीं जीं त्यांविषयीं मी नावाजणूक करीन॥
३१ आमच्या प्रभू येशू ख्रीस्ताचा जो देव व बाप, जो
सर्वकाळांपर्यंत स्तुतीमान्य। त्याला कळलें आहे। कीं मी खो
टें बोलत नाहीं॥ ३२ आरेतास राजा याचा जो दामास्कांत
देशाधिकारी। त्यानें मला धरायास इच्छिलें असतां। दामा
स्करांचें नगर पाहाऱ्याकडून राखिलें। ३३ परंतु मी
खिडकींतून पाटीकडून गांवकुसावरून उतरविला गेलों। आ
णि त्याच्यां हातांतून वटांवलों ॥

पर्व १२ ॥ १ नावाजणें मला सयुक्त नाहीं खरें।
तर मी प्रभूच्यां साक्षात्कारांवर व प्रगटविण्यांवर जाईन॥
२ चवदां वर्षांमागें ख्रीस्ताकडील माणूस [असा] मला कळला।
तो शरिरांत असला। तर मला कळलें नाहीं। आणि शरि
राबाहेर असला। तर मला कळलें नाहीं। देवाला कळलें।
तोच तिसऱ्या आकाशापर्यंत हिरावला गेला॥ ३ आणि
तोच माणूस। शरिरांत असला। किंवा शरिराबाहेर। त
र मला कळलें नाहीं। देवाला कळलें। त्याविषयीं मला
असें कळलें। ४ कीं तो स्वर्गांस हिरावला गेला। आणि त्या
नें अवाच्य वाक्यें ऐकिलीं। असीं कीं माणसाला बोलायास
घटीत नाहींत॥ ५ असा जो त्याविषयीं मी नावाजीन। परं
तु मी आपल्याविषयीं नावाजणार नाहीं। माझ्यां अबळपणां
विषयीं मात्र [नावाजीन॥] ६ कां कीं जरीं मी नावाजणूक कराया
स इच्छीन, तरीं मी मूर्ख होणार नाहीं। कां तर मी खरे
पण बोलेन। परंतु मी [तो] यासाठीं ठेवितों। कीं मी जें
आहें। ह्मणोन कोणी पाहातो। किंवा मजपासून कांहीं ऐ
कतो। त्याहून मजविषयीं अधीक न मोजावें ॥ ७ आणि
प्रगटण्यांचें बहुत्व यामुळें। ह्मणजे म्या न माजावयास म

स्या देहांत कांटा। [असा] साटानाचा दूत, मला बुक्की मा
रावयास, दिल्हा आला। [हा] ह्यासाठीं। कीं म्या न माजावें॥
८ ह्याविषयीं म्या प्रभूजवळ तिसर्दां विनंती केली। कीं हा नि
घावा॥ ९ परंतु तो मला बोलला। [कीं] आह्मी कृपा तुला
पुरे आहे। कां तर माझी शक्ती अबळपणानें पूर्ण आ
हे॥ तर ख्रीस्ताची शक्ती मजवर राहावी। ह्मणोन मी आपल्या
अबळपणांविषयीं अतिहर्षे विशेष नावाजीन॥ १० यास्तव
ख्रीस्तामुळें अबळपणें। गांजणूक। अगत्यें। पाठलाग। संको
च। यांवरून मी फार संतोषीत आहें। कां तर जेव्हां
मी अबळ आहें, तेव्हां मी शक्तिवंत आहें॥ ११ मी ना
वाजण्यानें मूर्ख जालों [कीं काय?] तुह्मी मजवर बळात्कार
केला आहे। कां तर तुमच्यानें माझी वाखाणणूक जाली पा
हिजे होती। यास्तव कीं मी जरीं कांहींच नाहीं। तथापि
प्रेषितांतला जो श्रेष्ठच। त्याहून मी कांहीं उणा नाहीं॥
१२ चिन्हें व उत्पात व चमत्कार। ह्यांकडून प्रेषिताचीं चि
न्हें तुह्मामध्यें अवघ्या सहनतेनें निश्चयें घडलीं होतीं॥
१३ कां तर मी स्वतां तुह्मास जड जालों नाहीं। या
वांचून ज्यांत तुह्मी दुसऱ्या मंडळ्यांहून लहान। तें
काय आहे? हा अन्याय तुह्मी मला क्षमा करा॥ १४ पा
हा। तिसरेंदां मी तुह्माजवळ येण्यास सिद्ध आहें। आणि
मी तुह्मास जड होणार नाहीं। कां तर जें तुमचें त्यां
स नव्हे। परंतु तुह्मास मी शोधितों। यास्तव कीं लेंकरांस आ
ईबापांसाठीं सांठविलें पाहिजे नाहीं। परंतु आईबापांस
लेंकरांसाठीं॥ १५ आणि तुमच्या जिवांसाठीं मी अति हर्षें ख
र्चीन। आपणहि खर्चला जाईन। होय, जरीं मी तुह्मावर
अतिशयें प्रीति केल्यानें उणी प्रीति पावतों। तथापि [तसें
करीन॥] १६ परंतु असें असो। [कीं] म्या तुह्मावर भार घात
ला नाहीं। तथापि म्या कावेबाज असतां, तुह्मास कपटानें
धरिलें [कीं काय?] १७ म्या ज्यांस तुह्माजवळ पाठविलें।

त्यांतील कोणाकडून तुम्हांस कांहीं हरण केलें कीं काय? १८ म्या तितसाजवळ विनंती केली। आणि त्यासहीत येक भाऊ पाठ विला। तितसाने तुमचें कांहीं हरण केलें कीं काय? आह्मी त्याच आत्म्याने। त्यांच पाउलांमध्यें चाललों नाहीं कीं काय? ※

१९ आह्मी फिरोन आपला तोडवाका तुह्मास सांगतों। असें तुह्मी कल्पितां कीं काय? आह्मी देवासमोर ख्रीस्ताक डोच [असा] बोलतों। आणि अहो प्रीय। अवघीं तुमच्या र चण्यासाटीं [आहेत।] २० कां तर मी भितों। कीं मी आ ल्यावर। जसे मी न इछितों। तसे तुह्मी मला कसेंहि सां पडाल। आणि जसा तुह्मी न इछितां। तसा मीहि तुह्मास सांपडेन। ह्मणजे कसेंहि भांडणीं। आवेश। फुरणें। भांडाळप णें। निंदणीं। कुजबुजी। फुगणीं। फितणीं। [हीं असती ल।] २१ ह्मणजे। मी फिरोन आल्यावर। माझा देव म ला तुह्माजवळ नीच करील। आणि ज्यानी यापूर्वीं पाप के लें। परंतु आपली मळिनता। व शिंदळकी। व कामातुरपण। जीं त्यानी केलीं। त्यांचा पश्चात्ताप केला नाहीं। त्यांतील बऊतांविषयीं मी शोक करीन ※

पर्व १३ ॥ १ हें तिसरेंदां मी तुह्माजवळ येतों। दोघां। होय तिघां साक्षांच्या तोंडाने प्रत्येक गोष्ट स्थापिली जाईल॥ २ म्या पूर्वीं सांगितलें। आणि दुसऱ्याने समक्ष असल्यासारि खा आगोधर सांगतों। आणि ज्यानी पूर्वीं पाप केलें, त्यां सीं व अवघ्यां दुसऱ्यांसीं मी असमक्ष असतां आतां लिहितों। कीं जर मी फिरोन येतों। तर तुमची ममता राखणार नाहीं। ३ यास्तव कीं। ख्रीस्त मजकडून बोलतो। याची प्रचिति तुह्मी पाहातां। तो तुह्मासाठीं अबळ नाहीं। परंतु तुह्मामध्यें साम र्थ्यवान आहे। ४ कां कीं तो जरीं अबळपणाने मरणखांदीं दिल्हा गेला। तथापि तो देवाच्या सामर्थ्याने जगतो। कां कीं, आह्मीहि त्याविषयीं अबळ आहों। तथापि, तुह्मावर

देवाचें सामर्थ्य याकडून त्यासहीत जगूं॥ ५ तुह्मी विश्वासांत आ हां कींवा नाहीं। याविषयीं आपली परीक्षा घ्या । आपली प्र चिति पाहा। काय। तुह्मी आपणांस वोळखत नाहीं? कीं ज र तुह्मी कशाकरितां नकारले नाहीं। तर येशू ख्रीस्त तुह्मा मध्यें आहे? ६ परंतु आह्मी नकारले नाहीं, हें तुह्मी जा णाल। अशी मी आशा धरितों॥ ७ आणि मी देवाजवळ अशी इछा करितों। कीं तुह्मी कांहीं वाईट न करावें। आह्मी स्वकारले दिसावयासाठीं नव्हे.। परंतु यासाठीं, कीं आह्मी नकारल्यासारिखे असतांहि तुह्मी चांगलेपण करा वें॥ ८ कां तर खरेपणाविरुद्ध आह्मास कांहीं शक्ती नाहीं। परंतु खरेपणासाठीं [आहे॥] ९ तर जेव्हां आह्मी अवळ आहों। आणि तुह्मी शक्तिमान आहां, तेव्हां आह्मी आनंद तों। आणि तुमचें यथास्थितपण याचीहि इछा आह्मी करि तों॥ १० मी असमक्ष असतां। ह्यासाठीं हीं लिहितों। कीं समक्ष असतां म्या कठोरपणाची वहिवाट अशी न करावी। कीं प्रभूने जो अधिकार मला दिल्हा त्याप्रमाणें। तो मोडून टाकण्यासाठीं नव्हे। परंतु रचण्यासाठीं [दिल्हा ※]

११ शेवटीं अहो भाऊ। सुखरूप असा। तुह्मी यथास्थीत असा। संबोध घ्या। सारिखेंच चिंतन करा। स्वस्थ असा। मग प्रीतीचा व स्वस्थतेचा देव तुह्माकडेस होईल॥ १२ पवि त्रचुंबनाने येकमेकांस क्षेम द्या। सर्व पवित्र तुह्मास क्षे म देतात॥ १३ प्रभू येशू ख्रीस्त याची कृपा। आणि देवा ची प्रीति। आणि पवित्रआत्म्याचें भागीपण तुह्मा सर्वांक डेस [असोत॥] आमेन ※

गालातीयांस पाऊलसाचें पत्र॥

पर्व १॥ १ । २ गालातींतील मंडळ्यांसीं पाऊलस।
माणसांपासून नव्हे। आणि माणसाकडून नव्हे। परंतु येशू
ख्रीस्त याकडून। आणि देव बाप ज्याने त्याला मेलेल्यांतून उठवि
लें त्याकडून [असा] प्रेषीत। आणि माझ्या संगतीं जे सर्व
भाऊ ते॥ ३ देवबापापासून। व आमचा प्रभू येशू ख्रीस्त
यांपासून तुह्मावर कृपा व स्वस्थता [असो॥] ४ ह्याने आ
पल्यासच। आमच्यां पापांकरितां, यासाठीं दिल्हें, कीं या
ने आह्मास। आमचा देव व बाप याच्या इच्छेप्रमाणें। ह्या स
ध्या दुष्ट जगापासून काढावें॥ ५ त्याला गौरव सर्वकाळांच्यां
सर्वकाळांपर्यंत [असो॥] आमेन ॥
६ हें मला आश्चर्य वाटतें। कीं। ज्याने तुह्मास ख्रीस्ताच्या
कृपेंत बोलाविलें। त्यापासून तुह्मी इतके लवकर अन्य सुवर्त
मानाकडे ढळलां आहां। ७ तें दुसरें नाहीं। केवळ कित्ये
क जे तुह्मास खळबळवितात। आणि ख्रीस्ताचें सुवर्तमान
विपरीत करायाला इच्छितात। असे आहेत॥ ८ परंतु जें
सुवर्तमान आह्मी तुह्माजवळ सांगितलें। त्याहून आणखी सुवर्त
मान जरीं आह्मी। अथवा आकाशांतील दूत तुह्माजव
ळ सांगतो। तरीं तो शापीत होवो॥ ९ जसें आह्मी अगो
धर सांगितलें। तसें मी आतांहि फिरोन ह्मणतों। [कीं] जें
तुह्मी स्वीकारिलें। त्याहून आणखी सुवर्तमान जर कोणी तु
ह्मास सांगतो। तर तो शापीत होवो॥ १० तर मी आतां
काय। माणसांस किंवा देवाला विश्वासवितों? अथवा मी मा

णसांस संतोषवायाला शोधितों काय? तर म्या अद्याप मा
णसांस जर संतोषविलें असतें, तर मी ख्रीस्ताचा सेवक न
सतों॥ ११ परंतु अहो भाऊ, मी तुह्मास जाणवितों,
कीं जें सुवर्तमान मजकडून सांगितलें गेलें, तें माणसाप्रमाणें
नव्हे। १२ कां तर म्या तें माणसापासून घेतलें नाहीं। आ
णि [तें] मला शिकविलें नव्हतें। केवळ येशू ख्रीस्ताच्या प्रगट
ण्याकडून [शिकलों॥] १३ कां तर पूर्वीं यहूदीपणांत मा
झी वर्तणूक, ती तुह्मी ऐकिली आहे। कीं म्या देवाच्या मं
डळीचा अत्यंत पाठलाग केला, आणि तिचा नाश केला हो
ता॥ १४ तेव्हां माझ्यां पितरांच्यां दंतकथांविषयीं अतिशयें
आवेशी असतां, माझ्या जातींतील बहुत समवयी, यांहून
मी यहूदीपणांत अधीक प्रवीण जालों॥ १५ परंतु देव,
ज्याने मला माझ्या आईच्या पोटापासून वेगळें केलें। आणि
आपल्या कृपेकडून बोलाविलें। त्याला जेव्हां हें बरें वाटलें,
१६ कीं त्याने आपला पुत्र मला असा प्रगट करावा, कीं
म्या त्याचें सुवर्तमान परराष्ट्रांमध्यें सांगावें। तेव्हांच म्या मां
स व रक्त यांचें अनुमत घेतलें नाहीं॥ १७ आणि जे मा
झ्या पूर्वीं प्रेषीत [होते,] त्यांजवळ मी यरूशलेमास वर गे
लों नाहीं। परंतु अराबांत गेलों। आणि फिरोन दामा
सेकास परतलों॥ १८ मग तीन वर्षांनंतर, पेत्रसाची वोळख
करायास वर यरूशलेमास गेलों। आणि त्याच्या जवळ पंधरा
दिवस राहिलों॥ १९ परंतु प्रभूचा भाऊ याकोब, यावांचून
म्या प्रेषितांतील दुसरा पाहिला नाहीं॥ २० आणि, देवास
मोर पाहा, मी तुह्मास जें लिहितों, त्यांत खोटेपण
करीत नाहीं॥ २१ मग अराम व किलिकी, यां खंडांमध्यें मी
गेलों॥ २२ आणि ख्रीस्ताकडील ज्या यहूदांतील मंडळ्या,
त्यांस मी तोंडाने अनवोळखी होतों॥ २३ परंतु त्यांनी हें
मात्र ऐकिलें होतें, कीं जो पूर्वीं आमच्या पाठीस लागला,
तो ज्या विश्वासाचा नाश अगोधर करीत होता, त्याचें

सुवर्तमान आतां सांगतों॥ २४ तेव्हां त्यानी मजमुळें देवा चें गौरव मानिलें ॥

पर्व २॥ १ मग चौदा वर्षानी। मी बार्णाबासुद्धां। तितसालाहि समागमें घेऊन। वर यरूशलेमास फिरोन गेलों॥ २ तेव्हां मी सा क्षात्कार पावून वर गेलों। आणि जें सुवर्तमान मी परप्रजांमध्यें गाजवितों, तें त्यांजवळ निवेदिलें। परंतु येकांतीं। [आणि] जे प्रसिद्ध दिसले त्यांजवळ, नाहींतर कदाचित मी व्यर्थ धां वतों। अथवा धांवलों असतों॥ ३ तथापि तितस जो मा झ्या संगतीं। तो हेल्लासी असतां। त्यावर देखील सुंता घेविव ण्याचा बळात्कार जाला नाहीं। ४ आंत गुप्त आणिलेले खो टे भाऊ यांजकरितांहि [नाहीं।] हे आह्मास चाकरपणांत ला वावयास, आमची जी स्वतंत्रता ख्रीस्त येशूकडून आहे। ती हे रायास चोरून आंत आले॥ ५ त्यांस आह्मी आधीनपणानें येक घटकाभरहि मानिलें नाहीं। यासाठीं कीं सुवर्तमानाची स त्यता तुह्मापाशीं राहावी॥ ६ आणि जे कांहीं प्रसिद्ध असे दिसले। त्यांविषयीं [असें आहे। कीं] ते कधीं केवढे होते। हें मला कांहीं भेद करीत नाहीं। देव माणसाचें तोंड अं गिकारीत नाहीं॥ कां तर जे प्रसिद्ध दिसले। त्यानी मला कां हीं अधीक लावलें नाहीं। ७ परंतु निराळें, त्यानी हें पाहि लें असतां, कीं जसें सुंतीजातीसाठीं सुवर्तमान पेत्रसाजवळ। तसें असुंतीजातीसाठीं। हें मजवळ सोपलें। ८ कां तर ज्यानें पेत्रसाला सुंतीजातीकडल्या प्रेषितपणास प्रेरिलें, त्यानें मलाहि परप्रजांकडे प्रेरिलें। ९ आणि मजवर ठेवलेली जी कृपा, ती। याकोब व केफा व योहान्न जे स्तंभ असे दि सले। त्यानी जाणून। मला व बार्णाबाला ह्यासाठीं भागीपणा चे उजवे हात दिल्हे, कीं आह्मी परप्रजांकडे। आणि आप ण सुंतीजातीकडे [जावें।] १० केवळ हा हेतु [त्या नी धरिला।] कीं आह्मी दरिद्र्यांची आठवण करावी। आणि तसीच करायाला ह्या झगट केला॥ ११ परंतु जेव्हां

पेत्रस आंतयखीस आला होता। तेव्हां म्या त्याला तोंडावर
अडविलें। कां तर तो दोषीत कराचाचा होता। १२ कां
रण कीं याकोबापासून कित्येकांच्या येण्यांपूर्वीं। तो परप्रजां
च्या संगतीं जेवीत होता। परंतु ते आल्यावर। तो सुंतेचे
यांस भिऊन लपाला। आणि आपणास वेगळें केलें॥ १३ आ
णि दुसऱ्यां यहूद्यांनी त्यासहीत येवढें ढोंग केलें। कीं बा
र्णाबाहि त्यांच्या ढोंगानें नेला गेला॥ १४ परंतु सुवर्तमा
नाच्या सत्यतेप्रमाणें ते नीट चालत नाहींत। हें जेव्हां म्या
पाहिलें, तेव्हां सर्वांसमोर पेत्रसाला ह्मटलें। [कीं] जर तूं
यहूदी असतां। यहूदीप्रकारें नव्हेस। परंतु परप्रजां
च्या प्रकारें जगतोस। तर परप्रजानी यहूदीपण वर्तावें।
ह्मणोन तूं त्यांवर बळात्कार कां करितोस? १५ [जे] आ
ह्मी जातीनें यहूदी। आणि परप्रजांतील पापी नाहीं। [ते आह्मी]
१६ हें जाणत असतां। कीं माणूस नेमशास्त्रांतील कामांकडून
पुण्यवान ठरविला जात नाहीं। केवळ येशू ख्रीस्तावरील विश्वा
साकडून [जातो।] आह्मी देखील ख्रीस्त येशूवर असे विश्वासलों।
कीं आह्मी नेमशास्त्रांतील कामांकडून नव्हे। परंतु ख्रीस्तावरी
ल विश्वासाकडून पुण्यवान ठरविले जाऊं। यावरून मासजातीं
तील कोणी नेमशास्त्रकर्मांकडून पुण्यवान ठरविलें जाणार
नाहीं॥ १७ परंतु ख्रीस्ताकडून पुण्यवान ठरविले जाण्यास पा
हात असतां। आह्मी आपणहि जर पापी सांपडलों। तर
ख्रीस्त पापाचा सेवक [आहे] कीं काय? हें होववत नाहीं।
१८ कां तर ज्यांचा नाश म्या केला। तीं जर मी फिरो
न रचितों। तर आपणाला उल्लंघणारा स्थापितों॥ १९ का
स्तव कीं मी देवासाठीं जगावयास नेमशास्त्राकडून नेमशा
स्त्राविषयीं मेलों आहें॥ २० मी ख्रीस्तासहीत मरणखांबीं
दिल्हा गेलों। परंतु मी जगतों। तथापि मी नव्हें, परंतु
ख्रीस्त मजमध्यें जगतो। आणि आतां मी देहांत। जें ज
गणें जगतों। तें देवाच्या पुत्रावरच्या विश्वासानें जगतों।

त्याने मजवर प्रीति केली। व आपणाला मजकरितां पर
स्वाधीन केलें॥ २१ मी देवाची कृपा घालवीत नाहीं। कां
कीं जर पुण्य नेमशास्त्राकडून [आहे।] तर ख्रीस्त फुकट मे
ला ॥

पर्व ३ ॥ १ अहो निर्बुद्धी गालातीय। तुह्मी सत्यता
न मानावयाला, तुह्मास कोणी मोहिलें आहे? त्यांच तुम
च्यां डोळ्यांपुढें येशू ख्रीस्त मरणखांबीं दिल्हेला असा तुह्मा
मध्यें प्रगट दाखविला गेला॥ २ मी तुह्माजवळून केवळ
हें शिकायास इछितों, [कीं] तुह्मी नेमशास्त्रकर्मांकडून तो आ
त्मा पावलां, किंवा विश्वास ऐकण्याकडून [पावलां?] ३ काय
तुह्मी येवढे निर्बुद्धी आहां? कीं आत्म्याने प्रारंभ केल्यावर,
आतां देहाने समाप्त होतां कीं काय? ४ तुह्मी इतकीं व्यर्थ सो
सलीं आहेत कीं काय? व्यर्थच, हें खरें कीं काय? ५ त
र जो तुह्मास आत्मा पुरवितो, आणि तुह्मामध्यें चमत्का
र करवितो, तो काय, नेमशास्त्रकर्मांकडून, किंवा विश्वा
स ऐकण्याकडून [करितो?] ६ त्याप्रमाणें आब्राहाम देवावर
विश्वासला, आणि हें त्यासीं पुण्य असें मोजिलें गेलें॥ ७ या
स्तव तुह्मी जाणा, कीं विश्वासाकडील जे, हेच आब्राहामा
चे वंशस्थ आहेत॥ ८ आणि देवाने परप्रजांस विश्वासाकडून
पुण्यवान ठरवावें, हें धर्मलेखाने अगोधर पाहून, सुवर्तमान
आब्राहामाजवळ पूर्वीं सांगितलें, कीं तुजकडून सर्व राष्ट्रें आ
शिर्वाद पावतील॥ ९ यास्तव जे विश्वासाकडील ते, विश्वासी
आब्राहामासहीत, आशिर्वाद पावतात॥ १० कां कीं नेमशा
स्त्रकर्मांकडील जितके आहेत, तितके शापाच्या स्वाधीन आ
हेत। कां तर असें लिहिलें आहे, [कीं] नेमशास्त्रपुस्तकां
त जीं लिहिलेलीं, तीं आचरायास जो कोणी त्यां सर्वांकडे रा
हात नाहीं, तो शापितच [आहे॥] ११ आणि कोणीहि
नेमशास्त्राकडून देवाजवळ पुण्यवान ठरविला जात नाहीं, हें
उघडें। कां कीं जो पुण्यवान, तो विश्वासाकडून जगेल।

१२ आणि नेमशास्त्र जें। तें विश्वाकडील नव्हे। परंतु [असें, कीं]
जो माणूस हीं करितो। तो ह्यांकडून जगेल॥ १३ प्रत्येक जो
झाडावर टांगलेला तो शापीत। असें लिहिलें आहे। तर ख्रीस्त
त्याने आमच्या ठिकाणीं शापपात्र होऊन। आह्मास नेमशा
स्त्रांतील शापापासून विकत घेतलें आहे। १४ त्यासाठीं।
कीं आब्राहामावरचा आशिर्वाद। ख्रीस्त येशूकडून परप्रजांस
प्राप्त व्हावा। [आणि] यासाठीं कीं आह्मी विश्वासाकडून त्या
आत्म्याविषयींचें वचन पावावें॥ १५ अहो भाऊ। मी माण
सावरून बोलतों। [हें] तसेंच। माणसाच्या स्थापिलेल्या करा
रास कोणी घालवीत। किंवा वाढवीत नाहीं॥ १६ आणि
वचनें आब्राहामाला व त्याच्या बिजाला ह्मटलीं होतीं। आ
णि बहुतांविषयीं तसें बिजांस [देव] ह्मणत नाहीं। परंतु येका
काविषयीं तसें। आणि तुझ्या बिजाला। तो ख्रीस्त आहे॥
१७ आणि जो करार। ख्रीस्ताविषयीं देवाकडून पूर्वीं स्थापिले
ला। त्याविषयीं मी हें ह्मणतों। [कीं] चार शें तीस वर्षांनंतर जा
लेलें नेमशास्त्र ह्याने त्याला असें निरस न करावें, कीं त्या वचनाला
निरर्थ करावें॥ १८ कां कीं जर तें वतन नेमशास्त्राकडून [होतें।]
तर वचनाकडून नव्हतें। परंतु देवानें [तें] वचनाकडून आ
ब्राहामाला कृपेने दिल्हें॥ १९ तर नेमशास्त्र कशासाठीं?
ज्या बिजाला वचन दिल्हें, तें येई तोंपर्यंत, तें [नेमशास्त्र]
मध्यस्थाच्या हाताने दूतांकडून नेमिलेलें होऊन। उल्लंघनांमुळें
लाविलें होतें॥ २० आणि मध्यस्थ जो तो येकाचा नाहीं।
परंतु देव येक आहे। २१ तर नेमशास्त्र देवाच्यां वचनां
विरुद्ध [आहे] कीं काय? तसें होववत नाहीं। कां तर ज
गण्यास शक्तिमान असें नेमशास्त्र जर दिल्हें असतें। तर पु
ण्य नेमशास्त्राकडून निश्चयें जालें असतें। २२ परंतु। येशू
ख्रीस्तावरच्या विश्वासाकडून वचन विश्वासणाऱ्यांस दिल्हें जावें,
ह्मणोन धर्मलेखाने सर्वांस पापाच्या स्वाधीन येकवट कोंडि
लें आहे॥ २३ परंतु विश्वास आल्यापूर्वीं, आह्मी, जो वि

त्यास प्रगट केला जाणार होता तो [पावण्या]साठीं, सही
त कोंडलेले असतां। नेमशास्त्राच्या आधीन राखिले होतों॥
२४ यास्तव। आह्मी विश्वासाकडून पुण्यवान ठरविले जाव
यास। नेमशास्त्र आह्मास ख्रीस्ताकडे [पोहंचवायास] बाळशिक्षक
होतें। २५ परंतु विश्वास आल्यावर। आह्मी आणखी बा
ळशिक्षकाच्या स्वाधीन नाहीं। २६ कां तर ख्रीस्तयेशूवरच्या
विश्वासाकडून, सर्व तुह्मी देवाचे पुत्र आहां। २७ कां कीं
जितके तुह्मी ख्रीस्तासाठीं बाप्तीस्मी जालां। तितके तुह्मी अं
गीं ख्रीस्त ल्यालेले आहां॥ २८ कोणी यहूदी नाहीं।
आणि हेल्लासी नाहीं। कोणी चाकर नाहीं आणि स्वतंत्र
नाहीं। कोणी पुरुष नाहीं। आणि स्त्री [नाहीं।] कां तर
सर्व तुह्मी ख्रीस्तयेशूकडील येक आहां॥ २९ आणि जर
तुह्मी ख्रीस्ताचे [आहां।] तर आब्राहामाचें बीज आणि।
वचनाप्रमाणें। वतनपावणारे आहां ※

पर्व ४॥ १ आणि मी ह्मणतों। [कीं] वतनपावणारा
जितका वेळ बाळ आहे। तितक्यापर्यंत, अवघ्यांचा धनी अ
सतां[हि,] चाकरापासून कांहीं भिन्न नाहीं। २ परंतु
बापाच्या वायद्यापर्यंत। तो फिरविणारे व कारभारी, यां
च्या स्वाधीन आहे॥ ३ तसें आह्मीहि जेव्हां बाळ होतों।
तेव्हां पृथ्वीतत्वांच्या आधीन चाकरपणांत होतों॥ ४ परं
तु काळाची पूर्णता पोहंचली। तेव्हां देवाने आपला पुत्र बा
हेर पाठविला। [हा] स्त्रीपासून जाला। [व] नेमशास्त्राच्या आधी
न जाला। ५ [तें] ह्यासाठीं, कीं ह्याने नेमशास्त्राच्या आधीन जे
त्यांस खंडून घ्यावें। हा हेतु। कीं आह्मी [त्या]पासून दत्तपुत्रपण
पावावें॥ ६ आणि तुह्मी पुत्र आहां। यास्तव देवाने आपल्या
पुत्राचा आत्मा बाहेर। तुमच्यां हृदयांमध्यें। पाठविला आ
हे। हा। आब्बा ह्मणजे बापा। [असी] हाक मारितो॥
७ अशाने तूं आणखी चाकर नव्हेस। परंतु पुत्र। आणि
जर पुत्र। तर ख्रीस्ताकडून देवाचा वतंदारहि [आहेस] ※

८ तथापि जेव्हां तुह्मी देवाला जाणत नव्हतां। तेव्हां जे प्रकृतीने देव नाहींत। त्यांची चाकरी तुह्मी केली खरी। ९ परंतु आतां तुह्मी देवाला जाणत असतां। आणि त्यापेक्षां देवाकडून जाणले असतां, अशक्त व अर्थहीन आचरणें, ज्यांकडून तुह्मी चाकरपण फिरोन पूर्वींपासून करायास इच्छितां। त्यांकडे दुसऱ्याने कसें फिरतां? १० दिवस, व मास, व वेळा, व वर्षें, हीं तुह्मी पाळितां॥ ११ ह्या तुह्मासाठीं व्यर्थ श्रम केला असेल, ह्मणोन मी तुह्मास भितों॥ १२ अहो भाऊ, मी तुह्मासीं विनंती करितों, तुह्मी मजसारिखे व्हा, कां कीं मीहि तुह्मासारिखा [आहें॥] तुह्मी माझा कांहीं अन्याय केला नाहीं। १३ आणि तुह्मास कळलें, कीं ह्या, पहिलें देहाच्या अशक्तपणाने, तुह्माजवळ सुवर्तमान सांगितलें॥ १४ तेव्हां माझ्या देहांत जी कळणूक ती तुह्मी धिक्कारिली नाहीं, व अव्हेरिली नाहीं। परंतु जसें देवाच्या दुताला तसें, [होय] जसें ख्रीस्तयेशूला तसें मला अंगिकारिलें॥ १५ तर तुमचें धन्यपण काय होतें? कां कीं जर घडीत [असतें,] तर तुह्मी आपले डोळे उपटून मला दिल्हे असते, असी मी तुमची साक्ष देतों॥ १६ तर तुह्मासीं सत्य वर्तल्याने मी तुमचा वैरी जालों कीं काय? १७ ते तुह्मास आवेशी करितात। [तथापि] बऱ्या प्रकारें नाहींत। आणखी तुह्मी त्यांस आवेशी करावयाला ते तुह्मास बाहेर करून टाकायाला इच्छितात॥ १८ तर जें चांगलें, त्यासाठीं सर्वदां आवेशी होणें चांगलें [आहे।] परंतु मी तुह्माजवळ प्रत्यक्ष आहें। तेव्हांच केवळ नव्हे॥ १९ अहो माझीं लाहान लेकरें, तुह्मामध्यें ख्रीस्ताचें रूप उत्पन्न होई। तोंपर्यंत त्यां तुह्मासाठीं मला फिरोन प्रसवायाचा कष्ट आहे॥ २० आणि मी आतां तुमच्याजवळ व्हावयास, आणि माझी वाणी परस्परें काढायास इच्छितों। कां तर तुह्माविषयीं मला संशय आहे॥

२१ जे तुह्मी नेमशास्त्राच्या आधीन होऊं इच्छितां। ते

तुह्मी नेमशास्त्र न ऐकतां? मला सांगा॥ २२ तर असें लि
हिलेलें आहे, कीं आब्राहामाला दोन पुत्र होते। येक दासी
चा, व येक स्वतंत्रिणीचा॥ २३ आणखी जो दासीपासून तो
देहाप्रमाणें जन्मला होता खरें। परंतु जो स्वतंत्रिणीपासून तो
वचनाकडून॥ २४ हींच उपमारूप आहेत। कां कीं त्या ते
दोन करार आहेत। येक तर सिनाडोंगरापासून चाकरप
णासाठीं जन्मवितो। तो हीच। हागार आहे॥ २५ कां कीं
ही हागार आर्बस्थानांतील सीनाडोंगर आहे। आणि प्रस्तु
त यरूशलेम ईच्या अनुरूपाने आहे। आणि आपल्यां लेंक
रांसुद्धां चाकरपणीं आहे॥ २६ परंतु वरील यरूशलेम
स्वतंच आहे। हीच आह्मा सर्वांची आई आहे। २७ कां
तर असें लिहिलेलें आहे। [कीं] हे वांझ। जी तूं गर्भ ध
रीत नाहींस। ती तूं आनंदीत हो। ज्या तुला प्रसूतवेणा ना
हींत, ती तूं हाक फोडून बोरड। कां तर जिला नवरा
आहे। तिच्यां पेक्षां सडोचीं लेंकरें अधीक [होतात॥]
२८ तर, अहो भाऊ। इस्हाकाप्रमाणें आह्मी वचनाचीं
लेंकरें आहों॥ २९ परंतु तेव्हां। जो देहाप्रमाणें जन्मले
ला। तो जसा आत्याप्रमाणें [जन्मलेल्याच्या] पाठीस लागला।
तसें आतांहि [आहे॥] ३० तथापि धर्मलेख काय सांगतो?
दासी व तिचा पुत्र यांस बाहेर घाल। कां तर दासीचा
पुत्र स्वतंत्रिणीच्या पुत्रासुद्धां वतन पावणारच नाहीं॥ ३१ या
स्तव अहो भाऊ, आह्मी दासीचीं लेंकरें नव्हों, परंतु स्व
तंत्रिणीचीं [आहों ॐ]

पर्व ५॥ १ यास्तव जी स्वतंत्रता ख्रीस्ताने आह्मास दि
ल्ही। त्या स्वतंत्रतेंत उभे टिका। आणि चाकरपणाच्या जु
वांत फिरोन धरले जाउंनका॥ २ पाहा। मी पाऊलस तुह्मास
सांगतों। कीं जर तुह्मी सुंता घेतां। तर ख्रीस्त तुह्मास कां
हीं उपयोगी नाहीं॥ ३ आणि प्रत्येक सुंती जालेल्या माणा
साला मी फिरोन प्रमाण सांगतों। कीं तो सगळें नेमशास्त्र

पाळायास ऋणकरी आहे॥ ४ तुह्मी जे कोणी नेमशास्त्रा
कडून पुण्यवान होत आहां। ते तुह्मी ख्रीस्तापासून निरर्थ
क जालां। तुह्मी कृपेंतून पडून गेलां आहां। ५ कां तर आ
ह्मी आत्म्याने विश्वासाकडून पुण्यवान होण्याची आशा धरून
राहातों। ६ तर ख्रीस्त येशूजवळ सुंता कांहीं सफळ नाहीं।
आणि असुंताहि नाहीं। परंतु जो विश्वास प्रीतिकडून प्रेरितो।
तो [आहे॥] ७ तुह्मी बरें धांवलां होतां। तुह्मास कोणी
असें खुंटविलें? कीं तुह्मी सत्यता न मानावी। ८ हें मान
विणें तुमच्या बोलावणाऱ्याकडून नाहीं॥ ९ थोडें फुगवण सग
ळ्या गोळ्याला फुगवितें॥ १० प्रभूकडून मला तुह्मावर भरवसा आ
हे। कीं तुह्मी कांहीं दुसरा भाव धरणार नाहीं। आणि
जो तुह्मास खवळतो। तो कोणीहि असो। आपला दंड वा
हील॥ ११ परंतु। अहो भाऊ। जर मी अजून सुंता
गाजवितों। तर अद्याप माझा पाठलाग कां होतो? तर
मरणखांबाचा अडखळ नाहिसा जाला असतां। १२ मला
[असी] इच्छा जाली। आणि जे तुह्मास उलटवितात ते के
दून टाकिले जातील॥

१३ कां तर, अहो भाऊ। तुह्मी स्वतंत्रतेस बोलाविले गेलां
आहां। केवळ ती स्वतंत्रता देहाच्या निमित्तासाठीं [घेऊं] न
का। परंतु प्रीतिकडून येकमेकांची चाकरी करा॥ १४ कां
तर अवघें नेमशास्त्र येका गोष्टीने पूर्ण आहे। [ह्मणजे] हि
ने। [कीं] तूं जसी आपणावर। तसी आपल्या सेजाऱ्यावर प्री
ति कर॥ १५ परंतु जर तुह्मी येकमेकांस चावितां व खातां।
तर येकमेकांकडून। तुमचा क्षय केला न जावयास सावध
व्हा॥ १६ आणि मी सांगतों। [कीं] तुह्मी आत्म्याने चाला।
मग तुह्मी देहसंबंधी हांव पूर्ण करणारच नाहीं॥ १७ या
स्तव कीं देह आत्म्याविरुद्ध हांव करितो। व आत्मा देहा
विरुद्ध। आणि हीं परस्परें येवढा विरोध घेतात। कीं जीं
तुह्मी इच्छितां। तीं तुह्मी न करितां॥ १८ परंतु जर तु

ह्मी आत्म्याने चालविले जातां, तर तुह्मी नेमशास्त्राच्या आ
धीन नव्हां॥ १९ आणि देहाचीं कामें उघडीं आहेत। तीं
हीं आहेत। व्यभिचार। शिंदळकी। अशुद्धता। कामातु
रपण। २० मूर्तीभक्ती। चेटकें। वैरें। भांडणें। आवेश।
संताप। तंटे। फुटा। तड। २१ द्वेष। हत्यां। मद्यपानें।
विलास। आणि ह्यांच्या सारिखीं जीं तीं। ह्यांविषयीं। जसें मी
पूर्वीं बोललों। तसें तुह्मास आणखी अगोधर सांगतों। कीं जे
असीं करितात। ते देवाचें राज्यरूप वतन पावणार नाहींत॥
२२ परंतु आत्म्याचें फळ [हें] आहे। प्रीति। आनंद। शां
ती। क्षमा। उपकारिकपण। चांगलेपण, विश्वास। २३ नम्रता।
इंद्रियदमन। अशांच्या विरुद्ध नेमशास्त्र नाहीं॥ २४ आणि
ख्रीस्ताचे जे। त्यानीं चेतनां व हांवां यांसुद्धां देह मरण
खांबीं दिल्हा आहे॥ २५ जर आह्मी आत्म्याने जगतों।
तर आह्मी आत्म्याने चालावेंहि॥ २६ आह्मी पोकळ प्रति
ष्ठेत। येकमेकांस कुचेष्टा करीत, परस्परें द्वेष करीत, [असे]
नसावे॥

पर्व ६॥ १ आणि अहो भाऊ। जर माणूस कोणा पातकांत
सांपडतो। तर अशाला। आत्मनिष्ठ जे ते तुह्मी नम्रतेच्या आ
त्म्याने यथास्थित करा। तूंहि भरीस घातला न जावा। ह्मा
णोन आपणाला न्याहाळितां [करा॥] २ तुह्मी येकमेकांचीं
ओझीं वाहा। आणि अशाने ख्रीस्ताचें नेमशास्त्र पूर्ण करा।
३ कां तर कोणी। आपण कांहीं नसतां, जर कांहीं आहे
असें कल्पितो, तर तो आपणाला बुद्धिभ्रंश करितो॥
४ परंतु प्रत्येक आपलें काम परीक्षेचें असें करो।
आणि मग त्याला दुसऱ्यासीं नव्हे। परंतु आपल्यासीं केवळ
वाखाणणूक होईल। ५ कां तर प्रत्येक आपापलें ओझें वाही
ल॥ ६ आणि जो गोष्टिविषयीं शिकविला [जातो।] तो शि
कविणाऱ्याला अवघ्यां उत्तमांतील वांटा देवो॥ ७ फसूं
नका। देव नाकारला जात नाहीं। कां तर माणूस जें जें पे

रितो। तेंच पीक पावेल। ८ ह्मणजे जो आपल्या देहाशीं
पेरितो। तो देहाचें नाशकें पीक पावेल। परंतु जो आत्म्या
शीं पेरितो, तो आत्म्याचें सर्वकाळ जीवनपीक पावेल॥
९ तर बरें करीत असतां, आह्मी न थकावें। कां कीं
आह्मी शिथील नसल्यास, पीक याच्या समयीं पावूं। १० तर
त्यासाठीं, जशी आमची संधी आहे। तसें आह्मी सर्वांजवळ।
आणि विशेषें विश्वाससंबंधी घरांतल्यांजवळ चांगलें करावें ※

११ ह्या आपल्या हातें केवढ्यां लिखितानी तुह्मांशीं लि
हिलें। हें तुह्मी पाहातां॥ १२ देहाविषयीं शोभायास जि
तिके इछितात। तितके केवळ ह्यासाठीं तुमची सुंता बळात्का
रानें करवितात। कीं त्यांचा पाठलाग। ख्रीस्ताच्या मरणखांबा
मुळें न व्हावा॥ १३ कां तर जे सुंता घेतात, ते आपण
हि नेमशास्त्र पाळीत नाहींत। परंतु ते। तुमच्या देहाविष
यीं नावाजून घ्यावयास। तुमची सुंता व्हावी असें इछिता
त॥ १४ परंतु मला आमचा प्रभू येशू ख्रीस्त याच्या मरण
खांबाविषयीं ह्याखेरीज नावाजून घेणें नसावें। त्याकडून म
जविषयीं पृथ्वी खांबीं मारली। आणि मी पृथ्वीविषयीं [मारला
गेलों॥] १५ कां तर ख्रीस्त येशूजवळ सुंता कांहीं सफळ नाहीं,
व असुंताहि नाहीं। केवळ नवें उत्पन्न होणें॥ १६ आणि
जितके ह्या सूत्राप्रमाणें चालतात। त्यांजवर व देवाच्या इस्रा
एलावर स्वस्थता व दया [असोत॥] १७ शेवटीं कोणी म
ला श्रम न देवो, कां तर मी आपल्या शरिरावर प्रभू येशू
च्या खुणा वागवितो ※ १८ अहो भाऊ, आमचा प्रभू ये
शू ख्रीस्त याची कृपा तुमच्या आत्म्याकडेस [असो॥] आमेन ※

एफेसस्करांस पाउलसाचें पत्र ॥

पर्व १ ॥ १ एफेससांत जे पवित्र आणि ख्रीस्तयेशूवर
विश्वासणारे आहेत, त्यांसीं पाउलस। [जो] देवाच्या इच्छेकडू
न येशू ख्रीस्ताचा प्रेषीत [तो॥] २ देव आमचा बाप, व प्र
भू येशू ख्रीस्त। यांपासून तुह्मास कृपा व स्वस्थता [असो※]
३ जो देव व आमच्या प्रभू येशू ख्रीस्ताचा बाप,
त्याचा धन्यवाद होणे। त्याने आह्मास आकाशावरल्यांविषयीं,
प्रत्येक आत्मीक धन्यपणाकडून, ख्रीस्तामुळें, धन्य केलें आहे॥
४ त्याप्रमाणें ह्यामुळें जसें त्याने जगाच्या मांडण्यापूर्वीं आ
ह्मास असें निवडलें आहे। कीं आह्मी त्याच्या दृष्टींत पवि
त्र व निर्दोषी व्हावें। [हें] प्रीतिकडून [केलें।] ५ आपल्या इच्छे
च्या मनोदयाप्रमाणें। आपल्यासाठीं आह्मास येशू ख्रीस्ताकडू
न दत्तपुत्रपण पावण्याला पूर्वीं नेमिलें। ६ [हें] त्याच्या ज्या
कृपेकडून त्याने त्या प्रियामुळें आह्मास कृपापात्र केलें। तिच्या
तेजाच्या स्तुती होण्यास [केलें※] ७ त्याच्या कृपेच्या संपत्ती
प्रमाणें, त्या [प्रिया]कडून त्याच्या रक्तपाताने आह्मास खं
डरूप सुटका, [ह्मणजे] पातकांची क्षमा। असी आहे॥
८ त्याने ही [कृपा,] सर्व ज्ञान व सावधानपण। यांसहीत
आह्मावर अतिशयें केली आहे। ९ आपला जो मनोदय आप
ल्या आपण योजिला त्याप्रमाणें त्याने आपल्या इच्छेचें गुज आ
ह्मास कळविलें। १० कीं जों आकाशांमध्यें आणि जों पृथ्वी
वरहि त्यां अवघ्यांस। काळांच्या पूर्णपणाच्या चालविण्यांत,
ख्रीस्ताकडून येकुणांत करावें। ११ ज्याच्यानेच आह्मी

वतन पावलों। त्याकडून॥ जो आपल्या इच्छेच्या घो जनेप्रमाणें अवघीं करवितो। त्याच्या बेताप्रमाणें आह्मी पूर्वी यासाठीं नेमलेले [होतों,] १२ कीं ज्यानी पूर्वी ख्रीस्तावर आ शा ठेवली। ते आह्मीं त्याच्या गौरवाच्या स्तुतिसाठीं व्हावे॥ १३ त्यावर तुह्मींहि। खरेपणाची गोष्ट। तुमच्या तारणा चें सुवर्तमान। हें ऐकल्यावर [आशा ठेविली।] आणि त्या वर विश्वासल्यानंतर। तुह्मी वचनाचा पवित्रआत्मा याकडून शिक्का मारलेले आहां। १४ हा [आत्मा।] मिळविलेल्याला खंडून घेण्यापर्यंत, आमच्या वतनाचा विसार आहे। [तें] त्याच्या गौरवाची स्तुति होण्यासाठीं [जालें॥]

१५ ह्यावरून मीहि तुह्मांविषयीं प्रभू येशूवरील विश्वा स। आणि सर्वपवित्रांवरील प्रीति हीं ऐकून १६ तुह्मां विषयीं उपकार स्तवितां सोडीत नाहीं। माझ्यां प्रार्थनां मध्यें तुमची आठवण अशी करितों। १७ कीं आमचा प्र भू येशू ख्रीस्त, याचा देव जो गौरवी बाप। त्याने, आ पल्या वोळखींतील ज्ञान व प्रगटणें। यांचा आत्मा तुह्मां स द्यावा। १८। १९ त्याच्या पाचारण्याची आशा काय। आणि पवित्रांसीं त्याच्या वतनाच्या तेजाची संपत्ती काय। आ णि त्याच्या बळसामर्थ्याच्या करविण्याप्रमाणें जे विश्वासतात। त्यां आह्मासाठीं त्याच्या शक्तीचें परम थोरपण काय आहे। हें तुह्मी जाणायासाठीं तुमचे बुद्धिरूप डोळे प्रकाशीत [व्हा वे॥] २०। २१ तें करविणें त्याने ख्रीस्ताला केलें। या ला मेलेल्यांतून उठविलें। आणि आपल्या उजव्याकडे आ काशावरल्यांमध्यें। सर्व सत्ता। व अधिकार। व पराक्रम। व धनीपण। व प्रत्येक नांव जें या काळांत केवळ नव्हे। परंतु होणार [काळ] यांतहि ह्मटलें। त्यापेक्षां फार उंच बसविलें आहे। २२ आणि अवघीं त्याच्यां पायांखालीं आधीन के लीं। आणि त्याला अवघ्यांविषयीं मंडळीचा मस्तक ठेविलें

आहे। २३ हीच त्याचें शरीर। [व] त्याचें भरण आहे। जो अवघ्यांमध्यें अवघ्यांस भरितो त्याचें ※

पर्व २ ॥ १ आणि पातकें व पापें यांमध्यें जे मेलेले होते, त्यां तुह्मांस [भरितो।] २ त्यांमध्यें तुह्मी ह्या जगाच्या धोरणाप्रमाणें, अंतरिक्षांतील सत्तेचा अधिकारि, जो आत्मा मानभंगणाच्यां लेंकांस आतां प्रेरितो, त्याप्रमाणें पूर्वीं चाललां। ३ त्यांमध्यें आह्मीहि सर्वांनी अगोधर आपल्या देहसंबंधी ह्यावानी वर्तणूक केली। देहाच्यां व बुद्धींच्यां इच्छानुरूप करीत [होतों।] आणि प्रकृतीने दुसऱ्यांसारिखींच क्रोधपात्र लेंकरें होतों ※ ४। ५ परंतु देव दयेने संपत्तीवान असून, आह्मी पातकांमध्यें मेले असतांच। त्याने आपली फार प्रीति जी आह्मावर केली। तिजकडून ख्रीस्तासहीत आह्मास जिवंत केलें आहे। तुह्मी कृपेकडून तारले जातां। ६ आणि त्याने [आह्मास त्या]सहीत उठविलें, आणि आकाशांत त्यांमध्यें [त्या]सहीत बसविलें आहे। हें ख्रीस्त येशूकडून। ७ यासाठीं [केलें,] कीं होणार युगांमध्यें, त्याने आपल्या कृपेची अतिशय संपत्ती दाखवावी। ती [कृपा] ख्रीस्त येशूकडून आह्मावरच्या उपकारिकपणांत [आहे॥] ८ कां तर तुह्मी। कृपेने, विश्वासाकडून, तारले जातां। आणि हेंच तुह्मापासून नव्हे। देवापासून दान [आहे।] ९ करण्यांपासून नाहीं। यास्तव कीं कोणी नावाजून न घ्यावें। १० कां तर आह्मी त्याचें काम। चांगलीं करणीं करायासाठीं ख्रीस्त येशूकडून उत्पन्न केलेले [आहों॥] त्यां करण्यांविषयीं देवाने पूर्वीं असें योजिलें। कीं आह्मी त्यांत चालावें ※

११ यास्तव तुह्मी आठवण धरा। कीं तुह्मी अगोधर देहाने परप्रजा। [आणि] देहांतील हातकामी जी सुंता ह्मटली, त्या जातीकडून असुंती जात ह्मटलेली [होतां।] १२ आणखी। त्या वेळेस। तुह्मी ख्रीस्ताविरहीत। [व] इस्राएलप्रजेपणाविषयीं फार परके। आणि वचनाच्यां करारांविषयीं

विदेशी। [व] आशेविरहीत। आणि जगांत देवहीन असे होतां॥ १३ परंतु आतां। जे अगोधर दूर होते। ते तुह्मी खीस्तयेशूकडून। खीस्ताच्या रक्तपाताने जवळ जालां आहां॥ १४ कां तर हा आमचा समजुती आहे। याने दोघांस येक केलें। आणि वांटणीची आडभींत फोडली। १५ तें वैर [ह्मणजे] विधींतील आज्ञांचें नेमशास्त्र। याला त्याने आपल्या देहाकडून निरर्थ केलें। अशास्तव कीं त्याने समजूत करीत असतां, आपल्याकडून दोघांचा येक नवा माणूस उत्पन्न करावा। १६ आणि त्याने त्या वैराला मरणखांबीं जिवें मारितां। ह्याकडून देवाशीं, येका शरिरांत। दोघांचा समेट करावा॥ १७ आणि त्याने येऊन। तुह्मा दुरल्यांसीं, व जवळील यांसीं, स्वस्थतेचें सुवर्तमान सांगितलें आहे। १८ कां कीं त्याकडून आह्मा उभयतांस। येक आत्याने बापाजवळ शरणांगत आहे ॐ १९ तर ह्यावरून तुह्मी यापुढें विदेशी व प्रवासी नव्हां। परंतु पवित्रांचे सोबतीनगरीक। आणि देवाच्या घरचे [आहां॥] २० प्रेषीत व भविष्यभाषी यांचा जो पाया। त्यावर तुह्मी रचलेले [आहां।] स्वतां येशू खीस्त उत्कृष्ट कोन आहे॥ २१ त्यासीं अवघें रचणें संगत जोडलें असतां। प्रभूसाठीं पवित्र देऊळ असें वाढतें॥ २२ आणि त्यासीं तुह्मी। देवाच्या वस्तीसाठीं। आत्याने संगत रचिले जातां ॐ

पर्व ३॥ १ त्या कारणें मी पाऊलस तुह्मा परप्रजांसाठीं खीस्त येशूसंबंधी बंदिवान [जालों॥] २ तरीं देवाची कृपा। जी तुह्मासाठीं मजवर ठेविली। तीचा कारभार तुह्मी ऐकिला आहे खरें। ३ कीं त्याने प्रगटण्याकडून तें गुज मला कळविलें। त्याप्रमाणें म्या अगोधर थोडक्यांत लिहिलें। ४ तें तुह्मी वाचण्याने। खीस्ताच्या गुजाविषयीं माझी बुद्धि। ही समजूं शकतां॥ ५ तें [गुज] जसें आतां त्याच्यां पवित्रप्रेषितांस व भविष्यभाष्यांस आत्याकडून प्रगटलें। तसें इतरपिढ्यां

मध्यें मनुष्यलेंकांस कळविलें नव्हतें। ६ कीं परराष्ट्रें। ख्रीस्ता
च्या योगानें सुवर्तमानाकडून, संगतवतनीक। व संगतांगांतील। आ
णि त्याच्या वचनाचे संगत भागी। [असीं] व्हावीं ॥ ७ त्या [सुवर्तमा
नाचा] सेवक। देवाच्या कृपा दानाप्रमाणें। मी जालों। ही [कृपा],
त्याच्या सामर्थ्याच्या करविण्याकडून मजवर ठेविली ॥ ८ जो सर्व
पवित्रांहून लाहानांतील लाहान। त्या मजवर ही कृपा ठेविली। कीं
म्या ख्रीस्ताविषयींच्या सुवर्तमानाचें उत्कृष्टपण ज्याचा शोध लाग
वत नाहीं। तें परराष्ट्रांमध्यें सांगावें। ९ आणि देव। ज्यानें ये
शू ख्रीस्ताकडून अवघीं उत्पन्न केलीं। त्यापासीं जें गुज सर्वका
ळांपासून गुप्त ठेविलेलें। त्यांतील भागीपण काय, हें सर्वांसीं
प्रकाशीत करावें। १०। ११ यासाठीं कीं, जो सर्वकाळांचा बेत
त्यानें आमच्या प्रभू ख्रीस्त येशूसीं केला। त्याप्रमाणें देवाचें बहु
त प्रकारचें ज्ञान। हें आकाशावरल्यांतल्यां श्रेष्ठपणांत व अधि
कारांत मंडळीकडून आतां कळविलें जावें॥ १२ त्या [प्रभू]
कडून। त्यावरच्या विश्वासानें आह्मास धिटपण। व भर्वसानें श
रणांगत आहे॥ १३ यास्तव तुह्मासाठीं माझीं संकटें यांमुळें
[तुह्मी] न थकावें ह्मणोन मी मागतों। तींच तुमचें गौरव[रू
प] आहेत॥ १४, १५ त्या कारणें। आमचा प्रभू येशू
ख्रीस्त। ज्यापासून आकाशांतील व पृथ्वीवरील अवघें कुटुंब
ह्मटलें आहे, त्याच्या बापापासीं मी यासाठीं आपले गुढघे टें
कितों; १६ कीं त्यानें। आपल्या गौरवाच्या संपत्तिप्रमाणें।
तुह्मास असें करून द्यावें, कीं तुह्मी त्याच्या आत्म्याकडून।
आंतल्या मनुष्यपणांत सामर्थ्यानें बळकट केले जावे। १७ [आ
णि] विश्वासाकडून। ख्रीस्तानें तुमच्यां अंतःकरणांमध्यें वस्ती क
रावी। [तुह्मी] प्रीतिंत असें मुळावलेले। व पाया घातलेले [व्हा
वें।] १८। १९ कीं [ख्रीस्ताच्या प्रीतिची] रुंदी। व लांबी। व
खोली। व उंची काय, हें तुह्मी सर्व पवित्रांच्या संगतीं समजून घ्या
वयास। आणि ख्रीस्ताची जी प्रीति जाणण्यापेक्षां वरचढ, ती
जाणण्यास तुह्मी सबळ केले जावे! असें कीं तुह्मी देवाच्या सर्व

पूर्णपणानें भरले जावें॥ २० तर जें सामर्थ्य आह्मामध्यें करवि
लेलें त्याप्रमाणें। आह्मी मागतों अथवा कल्पितों। त्यापे
क्षां अवघ्यांविषयीं फार अधीक करायास जो शक्तिमान।
२१ त्याला काळांच्या काळांतील सर्व पिढ्यांपर्यंत। ख्रीस्त ये
शूच्या योगें मंडळीकडून गैारव [असो॥] आमेन ॥

पर्व ४ ॥ १ तर जो प्रभूसाठीं बंदिवान। तो मी तुह्मा
जवळ विनंती करितों। कीं ज्या पाचारण्याने तुह्मी बोलाव
ले गेलां आहां। त्याच्या योग्य चालावें, २ सर्व लीनभाव व न
म्रपण यांसहीत। [आणि] क्षमा धरण्यासहीत। प्रीतिने येक
मेकांचें सहन करीत असतां। ३ शांतीरूप जें परस्परें बंध
न। त्याकडून आत्म्याची ऐक्यता राखायास लगट देत अस
तां। ४ जसें तुमच्या पाचारण्याच्या येक आशेंत तुह्मी बो
लाविले गेलां आहां। तसेंच येक शरीर। व येक आत्मा।
५ येक प्रभू। येक विश्वास। येक बाप्तीस्मा [आहे।] ६ देव ह्म
णजे सर्वांचा बाप [असा] येक। तो सर्वांवर व सर्वांमधून। आणि
तुह्मा सर्वांत [आहे॥] ७ आणि ख्रीस्ताच्या दानाच्या परिमाणा
प्रमाणें। आह्मांतील येकयेकावर कृपा ठेविली आहे॥ ८ या
स्तव तो ह्मणतो, [कीं] उंचीवर चढतां। नेलेल्या पाडावास
त्याने पाडाव करून नेलें। आणि माणसांस दानें दिल्हीं॥ ९ आतां
तो चढला ह्मणजे पहिलें पृथ्वीच्या विशेष खालील ठिकाणांमध्यें
उतरलाच। याखेरीज तें काय आहे? १० जो उतरला।
तोच हा आहे। कीं जो। आपण अवघीं भरावीं ह्मणोन
सर्वआकाशांवर चढलाहि। तो॥ ११ आणि त्याने कोणी तर
प्रेषीत। व कोणी भविष्यभाषी। व कोणी सुवार्तीक। व कोणी
पाळक। व उपदेशक। असे दिल्हे आहेत। १२ पवित्रांचें
यथास्थितपण करण्यासाठीं। सेवेच्या कामासाठीं। ख्रीस्ताच्या
आंगाच्या रचण्यासाठीं [दिल्हे।] १३ सर्व आह्मी विश्वासा
च्या ऐक्यतेंत। व देवाच्या पुत्राच्या वोळखींत। सिद्धपुरुषपणा
स। [व] ख्रीस्ताच्या पूर्णपणांतल्या वाढिच्या परिमाणास पावतों,

तोंपर्यंत [द्यावे।] १४ ह्यासाठीं कीं आह्मी यापुढें तान्हीं। उपदेशाच्या प्रत्येक वाऱ्यानें। [व] माणसांच्या गुंडपणानें। [व] फसविण्याच्या युक्तीकडल्या कावयानें हेलावलेलीं। व फिरविलेलीं। अशीं न व्हावीं॥ १५ परंतु आह्मी प्रीतिनें खऱ्या प्रकारें वर्तून। ख्रीस्त जो मस्तक आहे। त्यांत अवघ्यांविषयीं वाढावें। १६ त्यापासून सगळें शरीर। यथास्थित जोडलें असतां। आणि प्रत्येक सांध्याच्या पुरवठ्याकडून सहीत घट्ट केलें असतां। येकयेक भागांतील परिमाणानें करविणें। याप्रमाणें प्रीतिंतील आपल्या रचण्यानें शरिराचीच वाढ करितें ※

१७ तर मी हें ह्मणतों। आणि प्रभूकडून प्रमाण सांगतों। कीं दुसऱ्या राष्ट्रांप्रमाणें तुह्मीहि न चालावें। तीं आपल्या बुद्धिच्या व्यर्थपणानें चालतात। १८ तर्कांविषयीं काळोखमय। [व] देवसंबंधी जगणें यापासून फार भिन्नजातिचीं आहेत। त्यांतील अजाणपणाकडून। त्यांच्या हृद्यांतील घट्टपणाकडून [तीं अशीं आहेत॥] १९ तीं सुनमेहिरावलेलीं असतां। त्यांनी लोभानें सर्व अशुद्धता करण्यासाठीं। आपणांस कामातुरपणाच्या स्वाधीन केलें आहे॥ २० परंतु तुह्मी त्याप्रमाणें ख्रीस्त शिकलां नव्हां। २१ हें खरें असल्यास। कीं तुह्मी त्याचें ऐकिलें आहे। आणि जसें येशूविषयीं खरेपण आहे। तसें त्याविषयीं उपदेशिले गेलां। २२ कीं पूर्वीच्या वर्तणुकींतील जुनें मनुष्यपण। जें भोंदण्याच्या हावांप्रमाणें नासकें आहे। त्याला तुह्मी दूर करावें। २३ आणि तुमच्या बुद्धिच्या आत्म्यांत नवे केले जावे। २४ आणि नवें मनुष्यपण। जें देवाप्रमाणें नीतिपणांत। व खरेपणाच्या धार्मिकपणांत उत्पन्न केलें। तें तुह्मी आंगीं ल्यावें ※

२५ यास्तव तुह्मी खोटेपण दूर करीत असतां। प्रत्येक तुह्मी आपल्या सेजाऱ्याशीं खरेपण बोला। कां तर आह्मी येकमेकांचीं अंगें आहों॥ २६ तुह्मी रागें भरा। परंतु पाप करूं नका। तुमच्या चिडित सूर्य न मावळो। २७ आणि

त्या चाहाडाला ठिकाण देऊं नका॥ २८ ज्याने चोरी केली,
तो यापुढें न चोरो॥ परंतु निराळ्या प्रकारें, हातानी बरें
करीत असतां। यासाठीं काम करो। कीं ज्याला पाहिजे।
त्याला वांटा द्यावयास आपल्या जवळ व्हावें॥ २९ कांहीं वा
इट शब्द तुमच्या मुखांतून न निघो। केवळ जें कांहीं रचण्याच्या
उपयोगास चांगलें, असें कीं ज्याने ऐकणाऱ्यांस कृपा पावव
वी। तें [बोला।] ३० आणि देवाचा पवित्र आत्मा। ज्याकडून
तुह्मास। खंडून घेण्याच्या दिवसासाठीं। शिक्का मारला आहे,
त्याला खेद देऊं नका॥ ३१ सर्व कडुपण। व फुरण।
व राग। व बडबडणें। व निंदा। हीं। अवघ्या वाइटपणासुद्धां।
तुह्मापासून काढून जाऊं द्या॥ ३२ आणि तुह्मी येकमेकां
सीं उपकारीक। [व] फार कणवाळू असा। तुह्मी। जसें देवानेहि
खीस्तामुळें तुह्मासीं क्षमा केली आहे। तसें आपापल्यांसीं क्ष
मा करीत [असा॥]

पर्व ५ ॥ १ यास्तव तुह्मी प्रियलेंकरांसारिखे देवाचें अ
नुकरण करणारे व्हा॥ २ आणि प्रीतिने चाला, जसे खी
स्तानेहि आह्मावर प्रीति केली, आणि आपणालाच आह्मासा
ठीं अर्पण। जीवार्पण देखील [असें] देवासीं सुगंधाच्या वा
सासाठीं पराधीन केलें। तसें [चाला॥] ३ परंतु व्यभिचार,
व सर्वअशुद्धपण, अथवा लोभ। हीं तुह्मामध्यें उच्चारवीं
च न जावोत, जसें पवित्रांस शोभतें तसें। ४ लाजाउहि।
व मूर्खभाषण, अथवा टवाळी। हीं उचीत नाहींत। [उच्चा
रूं नका।] परंतु निराळ्या प्रकारें, आभारस्तुती [करा॥]
५ कां तर तुह्मी हें जाणत आहां। कीं कोणी व्यभिचा
री, अथवा अशुद्ध, अथवा लोभिष्ठ, हा मूर्तिभक्त आ
हे। त्यांस। खीस्ताच्या व देवाच्या राज्यांत, वतन होत ना
हीं॥ ६ व्यर्थगोष्टींकडून, कोणी तुह्मास न भोंदो। कां
तर त्यां [कामां] करितां देवाचा राग अनमानी लेंकांवर
येतो॥ ७ तर तुह्मी त्यांसहीत भागी होऊं नका। ८ कां

कीं तुह्मी अगोधर अंधार[रूप] होतां। परंतु आतां प्रभूकडून
उजेड[रूप] आहां। उजेडांतील लेंकरांसारिखे चाला॥ ९ कां
कीं आत्म्याचें फळ। सर्व चांगलेपण। व नीतिपण। व ख
रेपण। यांतील आहे॥ १० प्रभूला काय संतोषकारी, हें पारखून
घ्या॥ ११ आणि अंधारांतील निष्फळ कामें। यांच्या संगतीं भा
ग घेऊं नका। परंतु निराळ्या प्रकारें, निषेधच करा॥ १२ कां
तर त्यांकडून जीं गुप्तांत होतात। तीं बोलायास देखील लाज
आहे॥ १३ परंतु जीं निषेधिलीं। तीं अवघीं उजेडाकडून प्रगट के
लीं जातात। कां तर कांहीं। जें प्रगट करितें। तो उजेड
आहे॥ १४ यास्तव तो सांगतो। [कीं] हे निद्रिस्था। तूं जा
गा हो, आणि मेलेल्यांतून फिरून उठ। मग ख्रीस्त तुजव
र प्रकाशील ※ १५ तर तुह्मी केवळें येकाग्रचित्तें वागाल।
याविषयीं पाहा। अज्ञानी असे नका, परंतु ज्ञानी असे [वा
गा॥] १६ तुह्मी रिकामकीपासून वेळ खंडून घेत [असा।] कां
तर दिवस वाइट आहेत॥ १७ यामुळें तुह्मी निर्बुद्धि होऊं
नका। परंतु प्रभूची इछा काय, हें समजत [असा ※]
१८ आणि तुह्मी मद्याने माजूं नका। यांत अनिवारण आहे।
परंतु तुह्मी आत्म्याकडून पूर्ण व्हा॥ १९ गीतें। व स्तोत्रें,
व आत्मनिष्ठ प्रबंध यांकडून आपापल्यांसीं बोलत [असा।]
आपल्यां हृदयांत प्रभूसीं गात व गीत बोलत [असा॥]
२० आमचा प्रभू येशू ख्रीस्त याच्या नांवाने देवासीं ह्मणजे
बापासीं अवघ्यांसाठीं सर्वदां आभारस्तुती करीत[जा ※]

२१ देवाच्या भयाने येकमेकांसीं आधीन असत [जा ※] २२ स्त्रि
यांहो, तुह्मी। जसें प्रभूसीं। तसें आपापल्यां नवऱ्यांसीं। आ
धीन व्हा। २३ कारण कीं नवरा स्त्रिचा मस्तक आहे। ज
सा ख्रीस्तहि मंडळीचा मस्तक तसा। आणि हा शरिराचा
तारणारा आहे॥ २४ तर जसी मंडळी ख्रीस्तासीं आधीन
आहे। तसें स्त्रियाहि अवघ्यांत आपापल्यां नवऱ्यांसीं [होवोत ※]
२५ अहो नवरे। तुह्मी आपापल्यां स्त्रियांवर प्रीति करा। ज

से ख्रीस्तानेहि मंडळीवर प्रीति केली तसी। आणि त्याने आ
पणासच तिच्या साठीं सोपून दिल्हें। २६ [तें] ह्यासाठीं कीं
त्याने तिला। गोष्टिकडून पाण्याच्या आंघोळिने। स्वछ करू
न पवित्र करावें॥ २७ [तें] यासाठीं कीं त्याने तिला आ
पल्या जवळ असी ठेवावी। कीं गौरवी मंडळी। तिला डा
ग अथवा सुरकुति। अथवा असांतील कांहीं नसतां। परं
तु ती पवित्र व ठपक्याविरहीत व्हावी ह्मणोन॥ २८ याप्र
माणें नवऱ्यांस आपल्यां स्त्रियांवर प्रीति केली पाहिजे। कीं
जसी आपल्यां शरिरांवर तसी। जो आपल्या स्त्रिवर प्रीति
करितो। तो आपणावर प्रीति करितो॥ २९ तर कोणी क
धीं। आपल्या देहाला देषिलें नाहीं। परंतु तो त्याचा प्रति
पाळ व जतन करितो। जसी प्रभूहि मंडळीची तसी। ३० कार
ण कीं आह्मी त्याच्या शरिराचीं अंगें। त्याच्या मासांती
ल। व त्याच्यां हाडांतील आहों॥ ३१ यामुळें मा
णूस आपला बाप व आई यांस सोडील। आणि आपल्या
स्त्रिसीं लगटेल। आणि तीं उभयतां येक देह होतील॥
३२ हें मोठें गुज आहे। परंतु ख्रीस्त व मंडळी यांविषयीं
मी बोलतों॥ ३३ तथापि तुह्मी [हें]हि [करा।] येकये
क। जसी आपणावर। तसीच आपापल्या स्त्रिवर प्रीति क
रो॥ आणि स्त्रिने आपल्या नवऱ्याला भ्यावें। असें [ती जाणो ※]
पर्व ६॥ १ अहो लेंकरें। तुह्मी प्रभूमुळें। आपल्यां आ
ईबापांस माना। कां तर हें नीतिचें आहे॥ २ हेंच व
चनयुक्त प्रथम आज्ञा आहे। कीं तूं आपला बाप व आई यां
ची मर्यादा राख। ३ तुला बरें व्हावें। आणि त्वां पृथ्वीवर
बहुकाळीक व्हावें ह्मणोन ※ ४ आणि बापांहो। तुह्मी
आपल्यां लेंकरांस चिडवूं नका। परंतु प्रभूची शिक्षा व बोध
ह्यांकडून त्यांचा प्रतिपाळ करा ※ ५ अहो चाकर। देहा
विषयीं प्रभू यांस। भयाने व कांपण्याने। [व] तुमच्या हृद
यांतील भोळेपणाकडून। जसें ख्रीस्ताला तसें माना॥ ६ मनुष्यां

स संतोषविणाऱ्यांसारिखें दृष्टीचाकरीनें नका। परंतु ख्रीस्ता
चे चाकर। जीवापासून देवाची इछा आचरीत। असें [मा
ना।] ७ माणसांची नव्हे। परंतु प्रभूची चाकरी सुबुद्धिनें करी
त [असें।] ८ हें जाणल्यानें, कीं प्रत्येक जें कांहीं बरें करितो।
तेंच तो जरीं चाकर किंवा स्वतंत्र। तरीं प्रभूजवळून पावेल ※
९ आणि। अहो धनी। तुह्मी सारिखेंच [कामें] त्यांजवळ करा।
धमकावणें टाळीत [असा।] कां। हें तुह्मास कळलें। कीं स्वतां
तुमचाहि धनी आकाशांमध्यें आहे। आणि त्याजवळ पक्षपा
त नाहीं ※

१० शेवटीं। माझे भाऊ। तुह्मी प्रभूकडून आणि त्या
च्या शक्तीबळाकडून सबळ व्हा॥ ११ तुह्मी त्या चाहाडा
च्या युक्तींविरुद्ध उभे राहूं शकावें। ह्मणोन देवाचें सगळें
हातेरबंधन आंगीं ल्या॥ १२ कारण कीं आमची झोंबी ही रक्त व
मांस यांसीं नव्हे, परंतु श्रेष्ठपणांसीं [व] अधिकारांसीं। [व]
या काळांतील अंधाररूपजगधारी यांसीं। [व] आकाशांतल्यां
तील वाइटपणाचीं जीं आत्मनिष्ठ। त्यांसीं आहे॥ १३ यासाठीं।
तुह्मी वाइटदिवसांत आडवे टिकूं। आणि अवघेंच केल्या
वर उभे राहूं शकावें ह्मणोन। देवाचें सगळें हातेरबंधन ध
रा॥ १४ तर तुह्मी [असे] उभे राहा। खरेपणानें आप
ली कंबर बांधलेली। आणि नीतिपणाचें चिलखत आंगीं ल्याले
लें। १५ आणि स्वस्थतेच्या सुवर्तमानाच्या सिद्धपणाकडून पा
य भरलेले। १६ अवघ्यांवरिष्ठ विश्वासरूप ढाल धरलेली
[असे व्हा।] इजकडून त्या दुष्टाच्या सर्व जळतभाली विझवूं
शकाल। १७ आणि तारणरूप शिरटोपण, व आत्मारूप
तरवार, ही देवाची गोष्ट आहे। यांस [घ्या॥] १८ अव
घी प्रार्थना व काकुळति यांकडून। अवघ्या वेळेस। आत्म्या
ने प्रार्थना करीत [असा।] आणि ह्याविषयींच अवघ्या निज
ध्यासानें, व सर्व पवित्रांकरितां काकुळतिनें जागे असत [जा॥]
१९। २० मजसाठींहि [प्रार्थना करा।] कीं। त्या सुवर्तमाना

साठीं मी सांखळींत वकिली करितों। त्याचें गुज कळविण्या
स। धिटपणाकडून माझें मुख उघडण्याने मला बोलणें दिल्हें
जावें। जसें मला बोलावें लागतें, तसें म्या त्याविषयीं धीट व्हा
वें ह्मणोन॥ २१ आणखी मजविषयीं जीं तीं। [आणि] मी काय
करितों। हें तुह्मी जाणावें। ह्मणोन तुखिकस जो प्रिय भाऊ। आ
णि प्रभूकडे विश्वासू सेवक, तो [तीं] अवघीं कळवील॥ २२ या
करितांच म्या त्याला तुह्माकडे पाटविलें आहे। कीं आ
ह्माविषयीं जीं। तीं तुह्मी जाणावीं। आणि त्याने तुम
च्यां ह्रदयांस शांतवावीं॥ २३ देवबाप। व प्रभू येशू ख्रीस्त।
यांपासून भाऊंसीं विश्वासासहीत स्वस्थता व प्रीति [असो॥]
२४ आमचा प्रभू येशू ख्रीस्त। यावर जे निर्मळपणाने प्रीति
करितात। त्यां सर्वांकडेस कृपा [असो॥] आमेन ※

फिलीप्पैकरांस पाउलसाचें पत्र ॥

पर्व १ ॥ १ ख्रीस्तयेशूकडील पवित्र जे फिलीप्पैंत
आहेत। पाहाणेकऱ्यांच्या व कारभाऱ्यांच्या सुद्धां। त्यां
सर्वांसीं येशूख्रीस्ताचे सेवक। पाउलस व तिमथ्यस॥ २ आम
चा बाप [जो] देव। व प्रभूयेशूख्रीस्त। ह्यांपासून तुह्मास
कृपा व स्वस्थता [असो ॐ]
३। ४ सर्वदां माझ्या प्रत्येकप्रार्थनेंत मी आनंदाने तु
ह्मा सर्वांसाठीं विनंती करीत असतां। तुमच्या प्रत्येकआठवणीं
त। आपल्या देवाची कृपा स्तवितों। ५ पहिल्या दिवसापासून
आतांपर्यंत। सुवर्तमानांतील तुमचें समाचीकपण यावरून [स्त
वितों।] ६ कां। तेंच हा मला भर्वसा आहे। कीं ज्याने तुह्मां
त चांगल्या कामाचा प्रारंभ केला। तो [त्याला] येशूख्रीस्ता
च्या दिवसापर्यंत नेऊन समाप्त करील ॐ ७ ह्याप्रमाणें तु
ह्मा सर्वांविषयीं होच चिंताकरणें मला यथार्थ आहे। या
स्तव कीं। माझ्यां बंधनांमध्यें। आणि सुवर्तमानाविषयीं तोडसां
गणें व स्थापणें यांमध्येंहि। तुह्मी सर्व माझ्या संगतीं कृपेचे भा
गी असतां। मी तुह्मास हृदयांत राखितों। ८ देव तर मा
झा साक्षी आहे। कीं मी येशूख्रीस्ताच्यां कळवळ्याने। तुह्मा
सर्वांसाठीं किती उत्कंठीत आहें ॐ ९ आणि मी ही प्रार्थना
करितों। कीं समजण्याने आणि सर्वअनुभवाने तुमची प्रीति
अद्याप अधीक अधीकच अतिशयें वाढावी। १० यासाठीं कीं
जीं उत्कृष्ट तीं तुह्मी असें पारखून घ्यावीं। कीं तुह्मी। ख्रीस्ताच्या
दिवसापर्यंत। भावार्थी व अडखळण्यावांचून व्हावें। ११ दे
वाचें गौरव व स्तुती होण्यासाठीं। येशूख्रीस्ताकडून पुण्यरूप फ
ळांनी भरलेसे असावे येणेकडून [तसें व्हावें ॐ]

१२ आणि, अहो भाऊ, हें तुह्मी जाणावें ह्मणोन
मी इछितों। कीं मजविरुद्ध जें, तें सुवर्तमानाच्या अधीक सर
सावणें कामास आलें। १३ असें कीं खीस्ताशाठीं माझीं बंधनें
अवघ्या सर्कारवाड्यांत। आणि इतर सर्वत्रांस प्रगट जालीं
आहेत॥ १४ आणि प्रभूकडील भाऊ यांतील बहुत। मा
झ्यां बंधनांकडून भरवसा पावून। निर्भयानें गोष्ट बोलायास
फार अधीक धीर धरितात॥ १५ कित्येक तर हेव्यानें व भां
डणानेदेखील। परंतु कित्येकहि मनोदयानें खीस्त गाजवि
तात॥ १६ कोणी तर। माझ्यां बंधनांवर संकट आणिता
घर चालवावें, अडविणाऱ्याला उपकार निंदायाचें कांहीं नि
मित्त न द्यावें॥ १५ कां तर कित्येक आतां साटानामागें वळू
न गेलीं आहेत॥ १६ जर कोणा विश्वासणाऱ्याला, अथवा
विश्वासणारिणीला विधवा आहेत, तर त्यांस पुरवठा देवो।
ह्मणजे मंडळीनें वास्तवीक विधवांस पुरवठा द्यावा, ह्मणोन हि
जवर भार न घालो ❀

१७ जे वडील चांगलें चालवितात, ते दुपट सन्मा
नास योग्य [असें] मोजले जावोत। विशेषें, गोष्ट व उपदेश यां
विषयीं, जे श्रम करितात ते। १८ कां तर शास्त्रलेख सांगतो,
[कीं] जो बैल मळणी करितो, त्याला तूं मुसकें देऊं नको।
आणि कामकरी आपल्या मोलास योग्य आहे॥ १९ दोघां
अथवा तिघां साक्ष्यांकडून घेतल्यावांचून वडिलावरचा आरोप
अंगिकारूं नको॥ २० जे पाप करितात, त्यांस तूं सर्वांपुढें ध
मकाव। कारण कीं दुसऱ्यांसहि धाक व्हावा ह्मणोन॥ २१ दे
व, व प्रभू येशू ख्रीस्त, व निवडलेले दूत, यांसमोर मी
प्रमाण सांगतों, कीं त्वां, पक्षपाताप्रमाणें कांहीं करीत नसतां,
अगोधर ठरविण्यावांचून, हीं पाळावीं॥ २२ हात, हे तूं कोणा
वर एकाएकीं ठेवूं नको। आणि दुसऱ्यांचीं पापें यांतील भागी
होऊं नको। आपणाला शुद्ध राख ❀

२३ कें पाणीच आणखी पिवूं नको। परंतु आपल्या पो

टामुळें ; ह्मणजे आपल्या घडीघडीच्या रोगामुळें; थोडा द्राक्षर
साचों वहिवाट कर ॐ २४ कित्येक माणसांचीं पापें, फार उ
घडीं असून, अगोधर देवास जातात । परंतु कित्येकांचीं मागें
हि जातात ॥ २५ आणि त्याप्रमाणें, कांहीं चांगलीं कामें फा
र उघडीं आहेत । परंतु जीं दुसऱ्या प्रकारें असतात, त्यांचें गु
प्त राहाणें घडवत नाहीं ॐ

पर्व ६॥ १ जितके चाकर जुंवाखालीं आहेत, तितके
आपल्या स्वाम्यास सर्व सन्मानयोग्य [असें] मोजोत। हेतु हा,
कीं देवाचें नांव व उपदेश, हीं निंदलीं न जावीं ॥ २ आणि ज्यां
स विश्वासणारे स्वामी आहेत, हे भाऊ असण्यावरून [त्यांस] हीं
न असें, ते न मोजोत। परंतु हे विश्वासी व प्रिय, [ह्मण
जे] ह्या उपकारास साह्यकर्ते आहेत, यावरून विशेषेंच [त्यांची]
चाकरी करोत ॥ हीं शिकीव, आणि ह्यांचा प्रबोध कर ॐ

३ जर कोणी दुसरा उपदेश करितो, आणि आमचा
प्रभू येशू ख्रीस्त, याच्या ज्या निखोड गोष्टी, व सुभक्तीप्रमा
णें जो उपदेश, त्यांचें सम्मत धरीत नाहीं, ४ तर तो धू
र्तपणें अभिमानी, कांहीं न समजला [असा] आहे। केवळ वा
द व शब्दभांडण, ह्यांविषयीं रोगी आहे। ह्यांपासून हेवा, कि
टकट, निंदणी, दुष्ट कल्पना, हीं होतात। ५ [आणि] जीं माण
सें मनांत नासकीं, व खरेपणाविषयीं व्यंग जालेलीं, त्यांचे कर्मणुकी
वाईट संवाद [होतात।] मिळकत सुभक्ती आहे, असें तीं कल्पि
तात। तशांपासून तूं दूर हो ॐ ६ सुभक्ती तर निरपेक्षपणासु
द्धां मोठी मिळकत आहे। ७ कां कीं आह्मी जगांत कांहीं
आणिलें नाहीं। [आणि] आमच्याने त्यांतून कांहीं नेववत ना
हीं, हें उघडें [आहे॥] ८ तर आह्मास पोषणें व झांकणें
असल्यास, आह्मी त्यांकडून निरपेक्ष व्हावें ॥ ९ आणखी जे
धनवान व्हायास इच्छितात, ते दुर्भरोस व फांसांत, आणि बहु
त निर्बुद्धि व बाधीत हावांमध्यें पडतात। ह्या। माणसांस
नाशांत व निरुपायांत बुडवितात॥ १० कां तर, पैका लोभ स

वे वादटांचें मूळ आहे॥ त्याची उत्कंठा धरण्याने कित्येक वि
श्वासापासून भुलले गेले। आणि त्यांनी आपणांस बहुत खेदांक
डून सभोंवतें भोसकिलें आहे ꧂ ११ परंतु। हे देवाच्या मा
णसा। तूं त्यांपासून पळ। आणि नीति। सुभक्ती। विश्वास।
प्रीति। सहनता। सौम्यता। त्यांच्या मागें चाल॥ १२ विश्वा
ससंबंधीचें चांगलें झटणें झटून कर। सर्वकाळ जीवन धर। त्याक
रितांच तुला बोलावणें आलें। आणि त्वां बहुत साक्ष्यांसमोर चां
गलें सन्मत पत्करलें आहे॥ १३ जो देव अवघीं जिवंत करितो।
त्यासमोर आणि ज्या ख्रीस्त येशूने पंतयस पिलातसाजवळ चांगला
पत्कर प्रमाणपटोत केला। त्याच्या समोर मी आग्रहाने तुला सां
गतों। १४ कीं त्वां [ही] आज्ञा डागावांचून व दोषोत नसावी
सून आमचा प्रभू येशू ख्रीस्त याच्या प्रगट होण्यापर्यंत रा
खावी॥ १५, १६ जो धन्य। आणि येकला स्वामी। जो
राज्य करणाऱ्यांचा राजा व प्रभूंचा प्रभू। ज्याला मात्र अमरप
ण आहे। तो तें प्रगटणें त्याच्यांच वेळांमध्यें करील। [ज्या]
उजेडाजवळ जाववत नाहीं। [आणि] ज्याला माणसांतील कोणी
पाहिलें नाहीं। आणि कोणाच्याने पाहावत नाहीं। त्यांत तो राहा
तो॥ त्याचा सन्मान व सर्वकाळ सामर्थ्य [मानलेलें असो॥] आमेन ꧂

१७ सध्यांचे लोकीं जे धनवान, त्यांस तूं आग्रहाने असें सांग।
कीं त्यांनी वरचढ भावना न धरावी। आणि धनाच्या चंचळपणावर
नव्हे। परंतु जो जिवंत देव आह्मास उपभोगासाठीं धनरूपें अव
घीं देतो। त्यावर आशा ठेवावी। १८ चांगलें करावें। उत्तम
कर्मांकडून धनवान व्हावें। उदार। समाधीक भागी व्हावें। १९ हो
ढुकासाठीं उत्तम पाया। हें सांठवण आपणासाठीं करीत
[व्हावें।] कीं त्यांनी सर्वकाळ जीवन धरावें ꧂

२० हे तिमथ्थसा, अधर्मी व्यर्थ बोलणीं, आणि खोट्या नांवाची
विद्या इच्यीं विरोधणीं, यांपासून तूं फिरत असतां। [आपल्या] जव
ळ जी ठेव, ती पाळ॥ २१ कित्येक। ती [विद्या] पत्करण्याने।
विश्वासाविषयीं फसले गेले॥ तुजवर कृपा [असो॥] आमेन ꧂

तिमथ्याला पाऊलाचें दुसरें पत्र ॥

पर्व १ ॥ १ । २ प्रिय लेंकरूं तिमथ्यास याशीं पाऊलास ।
[जो] ख्रीस्त येशूकडल्या जीवनाच्या वचनाप्रमाणें। देवाच्या इ
छेने। येशू ख्रीस्ताचा प्रेषीत [तो ॥] देव बाप। व आमचा
प्रभू ख्रीस्त येशू। यांपासून कृपा। दया। कल्याण [असो ※]
३ ज्या देवाला मी आपल्या वाडवडिलांपासून शुद्ध भा
वाने भजतों। त्याचा आभार मानितों। कां तर रात्रीं व दि
वसीं माझ्यां प्रार्थनांमध्यें। तुजविषयीं मला अखंडीत आठवण
आहे। ४ कां। मी तुझीं अश्रें आठवून। फार इछितों। कीं
म्या। आनंदाने पूर्ण व्हावयास। तुला पाहावें। ५ कां। तुजम
ध्यें निर्ढोंग विश्वास, जो पहिल्याने तुझी आजी लोईस इज
मध्यें। मग तुझी आई यूनीके इजमध्यें। आणि मला भरंवसा
आहे कीं तुजमध्येंहि राहिला। त्याचें स्मरण मी धरितों ※
६ ह्या कारणावरून मी तुला सुचना देतों, कीं देवाचा जो
उपकार अर्थ माझे हात [तुज]वर ठेवण्याने। तुला आहे।
त्याला त्वां फिरोन चेतवावें। ७ कां कीं देवाने आम्हा
स घाबरण्याचा आत्मा नव्हे। परंतु सामर्थ्याचा व प्रीति
चा व सावधबुद्धिचा [असा] दिल्हा आहे॥ ८ यास्तव। आम
च्या प्रभूच्या साक्षिविषयीं। आणि त्याचा बंदिवान ह्या मजवि
षयीं। त्वां न लाजावें। परंतु सुवर्तमानासाठीं देवाच्या सामर्थ्या
प्रमाणें। तूं संगतीं वाईट सोस। ९ त्याने आम्हास तारिलें। आणि
पवित्र बोलावणें केलें आहे। आमच्यां कामांप्रमाणें नव्हे। परंतु
त्याचीच योजना व कृपा यांप्रमाणें। हो [कृपा] युगांच्या काळां

पूर्वीं खीस्त येशूकडून आह्मावर ठेविली होती। १० आणि
आतां। आमचा तारणारा येशू खीस्त याच्या प्रगट होण्याकडू
न दाखविली आहे। ह्याने मरणाला निरर्थच केलें। आणि
सुवर्तमानाकडून जीवन व अमरपण हीं प्रकाशविलीं आहेत।
११ त्या [सुवर्तमाना]साठीं मी गाजविणारा। व प्रेषीत। व पर
राष्ट्रांचा उपदेशक। [असा] ठेविला गेलों॥ १२ आणि ह्या
कारणावरून हीं दुःखें मला लागतात। परंतु मी लाजत नाहीं।
कां, तर ज्यावर विश्वासलों। तो मला कळला। आणि म
ला असा भरवसा आहे। कीं माझी ठेव, त्या दिवसापर्यंत पा
ळायास। तो शक्तिमान आहे॥ १३ ज्या निखोडी गोष्टी त्वां
माझ्या जवळून ऐकिल्या। त्यांरूपें किता प्रकरण। हें तूं वि
श्वासाकडून आणि जी खीस्त येशूकडे प्रीति तिजकडून राख॥
१४ जो पवित्र आत्मा आह्मामध्यें वस्ती करितो। त्याकडून
तूं ती चांगली ठेव पाळ ※
१५ हें तुला कळलें, कीं आशींतील जे ते सर्व मजपा
सून फिरले आहेत। त्यांमधील फुगेलस व हेर्मगेनेस आहेत॥
१६ अनेसिफरसाच्या घरावर प्रभूने दया ठेवावी। कां, तर त्या
ने बहुत वेळां मला सावरिलें, आणि तो माझ्या सांखळाला ला
जला नव्हता। १७ परंतु रोमेंत असून। त्याने फार लगटा
ने मला शोधिलें, आणि मिळविलें॥ १८ प्रभूने। त्या दिवशीं
त्याला प्रभूजवळ दया मिळवुं द्यावी॥ आणि एफेससांत त्याने
किती सेवा केली, [हें] तूं बरेंच जाणतोस ※
पर्व २॥ १ तर माझ्या मुला, खीस्त येशूकडे जी कृ
पा तींत तूं सबळ हो॥ २ आणि जीं त्वां, बहुत साक्ष्यांपुढे,
माझ्या जवळ ऐकिलीं, तीं तूं विश्वासू माणसांसीं सोपून दे।
जे दुसऱ्यांसहि शिकवायास पुरे होतील, त्यांसीं॥ ३ तूं त
र। येशू खीस्ताच्या चांगल्या सैनिकासारिखें। वाईट सोस॥
४ [जो] लढतो, तसा कोणी संसाराच्या कार्यामध्यें गुंतत
नाहीं। हेतु हा, कीं ज्याने त्याला निवडून सैन्यांत घेतलें।

त्याला त्याने संतोषवावें॥ ५ आणि जर कोणी मल्लयुद्धहि करि
तो, तर मल्लपण नेमरूपें केल्यावांचून त्याला मुगूट मिळत
नाहीं॥ ६ जो शेतकरी श्रम करितो, त्याने फळांचा वांटा
पहिलें घेतला पाहिजे॥ ७ मी जों सांगतों, तीं तूं मनन कर,
तशास प्रभूने तुला अवघ्यांविषयीं समज द्यावा॥ ८ तूं ये
शू ख्रीस्ताची आठवण कर, तो मेलेल्यांतून उठलेला, [आणि]
दावीदाच्या बिजांतील तसा, माझ्या सुवर्तमानाप्रमाणें [आ
हे।] ९ ह्यामुळें मी वाईट करणाऱ्यासारिखा, बंधनांपर्यं
त, वाईट सोसितों, परंतु देवाची गोष्ट बंद न जाली॥
१० त्याकरितां मी, निवडलेल्यांसाठीं, अवघीं साहातों, हेतु
हा, कीं ख्रीस्त येशूकडून जें तारण, तें त्यांसहि सर्वकाळ
गौरवासुद्धां प्राप्त व्हावें। ११ ही विश्वासू गोष्ट, कां कीं ज
र आह्मी [त्याच्या] संगतीं मेलों, तर संगतीं जिवंतहि हो
ऊं॥ १२ जर आह्मी साहातों, तर संगतीं राज्यहि करूं॥
जर आह्मी नकारितों, तर तोहि आह्मास नकारील॥ १३ ज
रीं आह्मी अविश्वासी आहों, तरीं तो विश्वासू राहातो,
त्याच्याने आपणालाच नकारवत नाहीं॥ १४ तूं ह्याविषयींची
सुचना देत असतां, प्रभूसमोर हें प्रमाण पटीव, कीं श
ब्द भांडण [जें] कशास उपयोगी नाहीं, ऐकणाऱ्यांस पालथें
करण्याचें [मात्र आहे,] तें [कोणी] न करावें॥ १५ तूं लज्जा
कारणाविरहित कामकरी, खरीच गोष्ट नीट वांटणारा, [असा]
आपणाला देवाजवळ स्वीकारलेला ठेवायास झगट कर॥ १६ प
रंतु अधर्मी, पोकळ ललकारणीं यांस टाळ, कां तर तीं अभ
क्ती अधीकच वाढवितील, १७ आणि [जे तसें बोलतात] त्यां
ची गोष्ट नासुरासारिखें खात जाईल॥ त्यांमधील हुमेनायस व
फिलेतस आहेत॥ १८ हे खऱ्याविषयीं चुकत चालले, [असें]
ह्मणतात, कीं पुन्हा उठणें हतक्यांत होऊन गेलें आहे, आणि ते
कित्येकांचा विश्वास पालथा करितात॥ १९ तथापि देवाचा पाया
स्थीर राहिलेला आहे, ह्याला हा शिक्का असतो, [कीं] प्रभू

चे जे आहेत। त्यांस तो जाणतो। आणि प्रत्येक जो नांव व्यवहारांत ख्रीस्ताचें नांव घेतो। तो अन्यायापासून दूर हो वो॥ २० आतां मोठ्या घरीं। सोनें व रुपें यांचीं पात्रें केवळ नव्हेत। परंतु लांकडांचींहि व मातीचीं। आणि कित्येक माना साठीं खरें। परंतु कित्येक अवमानासाठीं [आहेत॥] २१ यास्तव, जर कोणी आपणाला ह्यांपासून शुद्ध करितो। तर तो मा नासाठीं पात्र, पवित्र केलेलें। आणि स्वामीस फार उपयो गी। प्रत्येक चांगल्या कामास सिद्ध केलेलें। [असा] होईल॥ २२ आणि तूं तरुणाच्यां हावांपासून पळ। परंतु जे शु द्ध हृदयांतून प्रभूला हाका मारितात त्यांच्या संगतीं न्यायो पण। विश्वास। प्रीति। शांती। यांच्या मागें लाग॥ २३ परं तु मूर्खरूपी व अशिक्षीत वाद यांस टाळ। कां। हें क ळतें, कीं ते भांडणें उपजवितात॥ २४। २५ आणि प्र भूच्या चाकराने अगत्य भांडुं नये। परंतु त्याने सर्वांजवळ सा लस। उपदेशाळू। वाईट साहातां, लीनपणाने अडविणार्‍यां स उपदेशितां। असें असावें। कदाचित देव त्यांस। खरेपणा च्या वोळखीसाठीं। पश्चात्ताप देईल। २६ आणि त्या चाहा डाकडून। त्याच्या इच्छेप्रमाणें जे जिवंत धरलेले। ते त्याच्या फांसांतून फिरोन सावध होतील॥

पर्व ३ ॥ १ आणि हें जाण, कीं शेवटल्यां दिवसांत अवघड समय होतील। २ कां तर माणसें आपप्रि य, पैकाप्रिय। नावाजणारे। गर्विष्ठ। निंदक। आईबापांशीं अमानिते। उपकार न मानिते, अधर्मी। ३ गोत्रप्रीतिहीन। अ करारी। चाहाड। इंद्रियदमनहीन। अविनयी। चांगल्यांशीं प्रीति हीन। ४ दगेखोर। हट। धूररूपें अभिमानी, देवप्रियांपेक्षां विलासप्रिय, ५ सुभक्तीची आकृती राखितां। परंतु तिचें सत्व नकारितां। [असीं] होतील॥ तर तूं अशांपासून फीर। ६ कां तर त्यांतील हे आहेत। कीं जे घरांमध्यें शिरतात। आणि दुच्या नायका पाडाव करून नेतात ते। त्या। पापानी लादलेल्या।

बङ्करूप ह्यांवांकडून नेलेल्या । ७ सर्वदां शिकत असतांहि क
धींहि खरेपणाच्या वोळखीस पावूं न शकत्या अश्या [आहेत ॥]
८ ह्या प्रकारेंहि । कीं यान्नेस व यांब्रेस । यानी जसें मोश्या
ला अडविलें । तसें हेहि खरेपणाला अडवितात । मनाविषयीं
फार नासविलेलीं माणसें, विश्वासाविषयीं नकारलेलीं । [असीं
आहेत ॥] ९ तथापि हे फारपर्यंत पुढें चालणार नाहींत ।
कां तर जसें त्यांचें अज्ञान [उघडें] जालें, तसें ह्यांचेंहि
सर्वांसीं फार उघडें होईल ॥ १० परंतु माझा उपदेश । व
चिवाट, योजना । विश्वास । गंभीरपण, प्रीति । सहनता ।
११ । १२ ते पाठलाग । किती सोसणीं अंतयखींत, इकनय
नांत । लूस्रांत । मला जालीं, [ह्मणजे] किती पाठलाग म्या सोसिले,
तथापि प्रभूने मला सर्वांमधून काढिलें, ह्यांचें मागोमाग त्वां
धरिलें आहे ॥ आणि सर्वहि, जे ख्रीस्त येशूकडे सुभक्तीरूपें
जगायास इछितात । त्यांस पाठलाग होतील ॥ १३ आणि
दुष्ट माणसें व भोंदू । हे फसवून आणि फसले जाऊन । अधीक
च वाइटांत पुढें चालतील ॥ १४ परंतु तूं । ज्यांविषयीं शिकलास
आणि निर्धारी जालास । त्यांमध्यें राहे । कां । तूं कोणाजवळू
न शिकलास हें तुला कळलें । १५ आणि हेंहि, कीं पवित्र शा
स्त्रलेख तुला बाळपणापासून कळले ते तुला । ख्रीस्त येशूवरील
विश्वासाकडून, तराया इतकें ज्ञान द्यायास शक्तिमान [आहेत ॥]
१६ प्रत्येक शास्त्रलेख देव श्वासाचा [आहे ।] आणि उपदेशासाठीं ।
दोष पदरीं घालण्यासाठीं । नीट करण्यासाठीं । नीतींतील शि
क्षेसाठीं । उपयोगी [आहे ।] १७ हेतु असा । कीं देवा
चा माणूस निपूण व्हावा । प्रत्येक चांगल्या कामाला पूर्ण सिद्ध
केलेला असा [व्हावा ॥]

पर्व ४ ॥ १ तर देवाच्या समक्ष, आणि प्रभू येशू ख्रीस्त । जो
आपल्या प्रगटण्याच्या व राज्य होण्याच्या वेळेस जिवंतांचा व मे
लेल्यांचा न्याय ठरविणार आहे । त्याच्या समक्ष, मी साक्षिने सां
गून ठेवितों । २ [कीं] तूं ती गोष्ट गाजीव । सुकाळीं अकाळीं ।

तत्पर अस। प्रमाण पटीव। निषेध कर। सर्व गंभीरपणाने
व उपदेशाने समजीव। ३ कां तर अशी वेळ होईल, कीं ते नि
खोडी उपदेश साहणार नाहींत। परंतु कान खाजत असतां।
आपल्यां हावांप्रमाणें। उपदेशकांस गोळा करितील। ४ ते
ऱ्हां खरेपणापासूनच कान फिरवितील। आणि काहाण्यांकडे
वळले जातील॥ ५ परंतु तूं अवघ्यांविषयीं सावध अस। वा
ईट सोस। सुवार्तिकाचें काम कर। आपली सेवा पूर्ण वागी
व॥ ६ कां तर मी तर्पणरूपें आतां अर्पिला जातों। होय।
माझ्या निघण्याचा वेळ लागला आहे॥ ७ म्या चांगलें झुंज
केलें। धांवणें संपविलें। विश्वास राखिला॥ ८ शेवटीं मजसा
ठीं न्यायीपणरूप मुगूट ठेविला आहे। त्याला। प्रभू जो न्याय
वान न्यायाधीश। तो त्या दिवशीं काढून मला देईल। आणि
केवळ मला नव्हे। परंतु ज्यां सर्वांनी त्याच्या प्रगटण्याची आ
वड धरिली। त्यांसहि ※

९ तूं माझ्या जवळ लवकर येण्यास लगट कर। १० कां
तर देमास। ह्या सध्यां लोकावर प्रीति करील असतां, मला
टाकून थेस्सालनिकेस गेला आहे॥ क्रेस्केंस [तो] गालातीस, तितस
दालमातीस [गेला आहे॥] ११ केवळ लूका माझ्या जवळ आहे।
तूं मार्कसाला घेऊन आपल्या संगतीं आण। कां कीं तो से
वेसाठीं मला फार उपयोगी आहे॥ १२ म्या तुखिकस तर
एफेससास पाठविला आहे ※ १३ जें वेष्टण म्या त्रोवासांत का
र्पसाजवळ ठेविलें। तें येत्या वेळेस आण। पुस्तकेंहि। विशे
षेंकडून कागद पत्रें ※ १४ आलेक्षांद्रस जो कांसार। त्याने म
ला बहुत दुष्टपणें दाखविलीं। प्रभूने त्याच्यां कामांप्रमाणें त्या
ला फेडावें। १५ त्याविषयीं तूंहि संभाळ। कां कीं तो आ
मच्यां गोष्टींविरुद्ध फार उभा राहिला॥ १६ माझ्या पहिल्या
प्रतिपादण्यांत, कोणी मजकडे राहिला नाहीं। परंतु अवघे
मला टाकून गेले। हें त्यांजवर मोजलें न जावें॥ १७ त
थापि प्रभू माझ्या जवळ उभा राहिला। आणि त्याने मला अशें

बळाविलें। कीं मजकडून गाजविणें पूर्ण वागविलें जावें। आणि
सर्व राष्ट्रांनी ऐकावें। आणखी मी सिंहाच्या तोंडापासून सो
डविला गेलों॥ १८ आणि प्रभू मला प्रत्येक दुष्ट कामापासून
सोडवील। आणि त्याच्या आकाशावरच्या राज्यासाठीं तारील॥
त्याला सदां सर्वकाळांपर्यंत गौरव [असो] आमेन ॐ

१९ प्रीस्का व आकुला। आणि अनेसिफरसाचें घर।
यांस क्षेम दे॥ २० एरास्तस करींथांत राहिला। आणि त्रफि
मस मिलेतसांत रोगी असा म्यां ठेविला आहे॥ २१ तूं हिंवाळ्यापू
र्वीं यावयास लगट कर॥ यूबूलस, व पुदेंस। व लीनस। व क्ला
उदिया, व सर्व भाऊ तुला क्षेम सांगतात॥ २२ प्रभू येशू
ख्रीस्त तुझ्या आत्म्याच्या सहीत [असो॥] तुह्मावर कृपा
[असो॥]। आमेन ॐ

तितसाला पाऊलसाचें पत्र ॥

पर्व १ ॥ १ देवाचा सेवक व येशू ख्रीस्ताचा प्रेषीत । पाऊ
लस । [तो] देवाच्यां निवडलेल्यांच्या विश्वासांत । आणि सुभक्ती
तील सत्यता इच्या वोळखींत [आहे । २ , ३ आणि] ज्या देवा
च्याने लबाडी होत नाहीं त्याने जें सर्वकाळ जीवन युगांच्यां काळीं
पूर्वीं देऊं केलें । नंतर योग्य वेळांमध्यें आपला वचन अर्थ गाजविण्या
ने उघडा केला , त्या [जीवना]च्या आशेवर [आहे ।] आमच्या ता
रणाऱ्या देवाच्या नेमणुकिप्रमाणें । तें [गाजविणें] माझ्या विश्वा
सावर ठेविलें आहे ॥ ४ समायीक विश्वासांतील औरस लेंकरूं ति
तस । याला देव बापापासून व प्रभू येशू ख्रीस्त आमचा तारणारा
यापासून कृपा । दया । कल्याण [असो ॥]

५ या हेतुमुळें , म्या तुला क्रीतेंत ठेविलें । कीं जों उ
रलीं । तीं त्वां आणखी यथास्थीत करावीं । आणि जसें म्या
तुला नेमिलें । तसें त्वां प्रति नगरांत वडिलांस स्थापावें ॥ ६ ज
र कोणी आरोपाविरहीत आहे । येकी बायकोचा नवरा [आ
हे ।] ज्याला विश्वासणारीं लेंकरें आहेत , उधळेपणाच्या आ
रोपांत । अथवा अनाधीन असीं नाहींत । [तर तो स्थापावा ॥]
७ कां तर , अपणारा देवाच्या कारभाऱ्यासारिखा । आरोपाविरहि
त असावा लागतो । स्वछंदी नसावा , रागीट नसावा , मद्यपी नसा
वा । फटकळ नसावा , लाजाऊलोभी नसावा । ८ परंतु परक्यासीं
मित्र । चांगल्यासीं मित्र , सद्बुद्धिमान , नीतिवंत । धार्मीक , इं
द्रिय दमनी । असा [असावा ।] ९ उपदेशाप्रमाणें विश्वासू गोष्ट
इचा बंदोबस्त राखणारा । असा यासाठीं [व्हावा ।] कीं याने

निखोडी उपदेशाकडून। संबोध करायास। आणि आड बोलणा त्यांची निशा करायासहि शक्तिमान व्हावें॥ १० कां तर बहुतच अनाधीन। व्यर्थ बोलणारे, आणि बुद्धि ठकविणारे। विशेषेंकडून ते सुंतेचे आहेत। ११ त्यांचें तोंड कुंठीत केलें पाहिजे। जीं अगत्य नसावीं तीं। लज्जीत लाभाच्या हेतुने। ते शिकवून। संपूर्ण घरांस विपरीत करितात॥ १२ त्यांतील कोणी स्वतां त्यांचा भविष्यभाषी बोलला। [कीं] क्रेती सर्वदां लबाड। दुष्ट श्वापदें। आळसी पोटें॥ १३ । १४ ही साक्ष खरी आहे, ह्या कारणावरून। तूं त्यांस असें खडतरें निषेध। कीं त्या नी यहूदी काहाण्यांवर, आणि जीं माणसें खरेपणाला पाठमो रीं होतात त्यांच्यां आज्ञांवर चित्त न ठेवून। विश्वासांत सांगो पांग व्हावें। १५ जे शुद्ध त्यांसीं अवघीं शुद्ध [आहेत] खरें। परंतु जे विटाळले व अविश्वासी। त्यांसीं कांहीं शुद्ध नाहीं। आणखी त्यांची बुद्धि व भावहि विटाळलीं आहेत॥ १६ दे वाला जाणतों ह्मणोन पत्करितात। परंतु करण्यानी नकारिता त। कां। ते मळमळकारी। व अमानिते। आणि प्रत्येक चांग ल्या कामाविषयीं नाकारे आहेत ※

पर्व २॥ १ परंतु जीं निखोडी उपदेशास शोभतात। तीं तूं बोल। २ [असें] कीं जे वडील त्यानी। विश्वास। प्रीति, सहनता। यांविषयीं सांगोपांग असून। सावध। परमार्थी, सद् बुद्धिमान असें असावें॥ ३ तस्याच ह्मातारणि वर्तणुकींत ध र्मशोभीत [असाव्या।] चाहाड नसाव्या। फ़ार सुरा न सेवणाऱ्या। उत्तम उपदेशित्या [असाव्या।] ४ असें कीं त्यानी तरण्यांस अ सी सुबुद्धि द्यावी। कीं ह्यानी नवरे प्रिय। लेंकरें प्रिय। ५ दक्ष। कामबंध। घर जपणारिणी। चांगल्या, स्वनवऱ्यांसीं आधीन अ सणाऱ्या व्हाव्या। हेतु हा। कीं देवाची गोष्ट निंदली न जावी॥ ६ तसेंच जे तरूण त्यांस सद्बुद्धिमान होण्यास संबोध कर। ७ तूं हीं प्रत्यक्ष दाखवीत [जा। कीं] अवघ्यांविषयीं आपणच चांगल्यां कामांचा कित्ता। उपदेशांत अनासक्तपण। परमार्थ।

निर्मळपण । ८ खोड न लावणारें सांगोपांग बोलणें, असें कीं जो विपक्षांतील । त्याला तुह्माविषयीं कांहीं दुष्ट बोलायाचें नसतां । भीड लागावी । ९ [असेंहि] कीं चाकरानी आपल्यां स्वामीं च्या आधीन असावें । अवघ्यांविषयीं संतोषकारी व्हावें । विरुद्ध बोलत नसतां । १० अभिलाष करीत नसतां, परंतु अवघा उत्तम विश्वास वर्तून पटवीत [व्हावें ।] असें कीं त्यांनी आमचा तारणारा देव । याच्या उपदेशास अवघ्यांविषयीं शोभवावें । ११ कां तर देवाची तारणारी कृपा सर्व माणसांस प्रसिद्ध जाली आहे । १२ ती आह्मास असें शिकविती । कां आह्मी अभक्तपणाला व जगरूपी हांवांस नकारीत असतां । ह्या स्थां लोकीं सुबुद्धिने । व न्यायाने । व सुभक्तीने । जीव वागवीत असतां । १३ धन्य आशा आशेची । ह्मणजे जो मोठा देव व आमचा तारणारा येशू ख्रीस्त याच्या गौरवाचें प्रसिद्ध होणें याची । वाट पाहावी । १४ ह्याने आपणच आह्मासाठीं अशास दिल्हा । कीं याने आह्मास सर्व नेमभंगापासून खंडून घ्यावें । आणि आपणासाठीं विशेष लोक । चांगल्यां कामांस आवेशी असा शुद्ध करावा ॥ १५ तूं पूर्ण नेमितपणाने हीं बोल । व संबोध, व पटीव । कोणी तुला तुच्छ न करो ॐ

पर्व ३ ॥ १ तूं त्यांस असें सुचीव । कीं त्यानी श्रेष्ठपणांच्या व अधिकारांच्या स्वाधीन व्हावें । श्रेष्ठांसीं मान्य व्हावें । प्रत्येक चांगल्या कामाला सिद्ध असावें । २ कोणाला न निंदावें । अभांडाळ । विनयी । सर्व माणसांसीं पूर्ण लीनता उघडी वर्तते । असें असावें ॥ ३ कां तर । आह्मीहि अगोधर अज्ञानी । अमानिते । चुकते । बहुरूप हांवां व विलास यांची चाकरी करिते । दुष्टपण व हेवा यांमध्यें काळ घालविते । द्वेषाळ [आणि] येकमेकांस द्वेषिते असे होतों । ४ परंतु देव आमचा तारणारा याचें कनवाळुपण व मनुष्यांवरील प्रीति जेव्हां प्रसिद्ध जाली । ५ तेव्हां । जीं न्यायरूपें कामें आह्मी केलीं होतीं त्यांकडून नव्हे । परंतु त्याने आपल्या दयेने आह्मास तारिलें ।

फिरोन जन्मरूप स्नान। आणि पवित्र आत्म्याच्याने नवें कर
णें। ह्यांकडून। ६ त्याने हा [आत्मा,] आमचा तारणा
रा येशू ख्रीस्त यामुळें। आम्हावर भरपूर वोतिला आहे।
७ हेतु हा। कीं आम्ही त्याच्या कृपेकडून पुण्यवान ठरल्या
वर। सर्वकाळ जिवनाच्या आशेंतील वतन पावणारे व्हावें॥
८ ही विश्वासू गोष्ट। आणि यांविषयीं मी इछितों। कीं
तां असें वळकट प्रकारें पटवावें। कीं ज्यानी देवावर विश्वास
ठेविला। त्यानी चांगलीं कामें चालतीं राखायास मनन करा
वें। जीं माणसांशीं चांगलीं व उपयोगी तींच तीं आहेत॥
९ परंतु जे मूर्खरूपी वाद। व वंशावळ्या। व तंटे। व नेमशा
स्त्राविषयींचीं भांडणें। यांस चुकीव। कां तर तीं निरूपयोगी व व्य
र्थ आहेत॥ १० पहिल्या व दुसऱ्या बोधण्यानंतर। फितलेल्या मा
णसाजवळून निरोप घे। ११ कां। हें कळलें, कीं जो असा।
तो आड वळला आहे। आणि स्वदंडी असतां पाप करितो ※

१२ जेव्हां मी आर्तेमासाला, अथवा तुखिकसाला तु
झ्या जवळ पाठवीन। तेव्हां माझ्या जवळ निकपलिसांत येण्यास
लगट कर। कां कीं तेथे हिंवाळ्यांत राहायास म्या ठरविलें
आहे॥ १३ जेनास शास्त्री, व आपलोस। यांस तूं ल
गटाने असें पुढें पाठीव। कीं त्यांस कांहीं उणें न व्हावें॥
१४ आणखी आमचे जे। ते अगत्य उपयोगांसाठीं चांग
लीं कामें चालतीं राखायास असें शिकोत। कीं त्यानी निर्फळ न
व्हावें॥ १५ माझ्या जवळ जे सर्व। ते तुला क्षेम सांगतात।
विश्वासाकडील जे आम्हावर प्रीति करितात। त्यांस क्षेम सां
ग॥ तुम्हा सर्वांवर कृपा [असो॥] आमेन ※

फिलेमोनाला पाऊलसाचें पत्र ॥

१, २ फिलेमोन जो प्रिय। व आमचा संगती
कामकरी। त्यासीं, आणि अप्फिया जी प्रिय तिसीं। आ
णि आर्खीप्पस जो आमचा संगती सैनीक त्यासीं। आणि तु
झ्या घरीं जी मंडळी तिसीं। ख्रीस्त येशूचा बंदिवान पाऊलस,
आणि तिमथ्यस भाऊ ॥ ३ आमचा बाप [जो] देव, आ
णि प्रभू येशू ख्रीस्त। त्यांपासून तुह्मासीं कृपा व कल्याण
[असोत ॥]

४ माझ्यां प्रार्थनांमध्यें तुझी आठवण करून। मी आप
ल्या देवाची उपकार स्तुति सर्वदां करितों। ५ कां। प्रभू
येशूवर आणि सर्व पवित्रांवर तुझी प्रीति व विश्वास। जो तुला
आहे। त्यांविषयीं म्या ऐकिलें आहे॥ ६ यासाठीं [प्रार्थितों।]
कीं ख्रीस्त येशूकडील जी तुह्मामध्यें प्रत्येक चांगली [गोष्ट।]
तिची वोळख होण्याकडून तुझें विश्वासांतील भागीपण सफळ व्हा
वें। ७ कां तर, तुझ्या प्रीतिमुळें। आह्मास फार आनंद
व सांतवन आहेत। कारण कीं। हे भाऊ। तुझ्याने पवित्रांचीं
आंतडीं सांवरतात ॥

८ यास्तव जें उचित। तें तुला आज्ञेने सांगावयाचें ब
हुत धिटपण ख्रीस्ताकडून मला असतां[हि।] ९ त्यापेक्षां मी प्री
तिकडून तुजसीं विनंति करितों। मी असा असतां[हि] कीं ह्मा
तारा पाऊलस, आणि आतां येशू ख्रीस्ताचा बंदिवानहि ॥
१० अनेसिमस माझ्या ज्या मुलाला म्या आपल्यां बंधनांमध्यें
जन्मविलें। त्याविषयीं मी तुजसीं विनंति करितों॥ ११ तो अ

गोधर तुला निरुपयोगी। परंतु आतां तुला व मला फार
उपयोगी। १२ त्याला म्या माघारें पाठविलें आहे। तर
तूं त्याचा अंगीकार कर। तोच माझें काळवळेपाच आहे॥
१३ म्या त्याला आपल्या जवळ राखायास याशाठीं इच्छीत
होतों। कीं सुवर्तमानाविषयींच्यां बंधनांमध्यें माझी सेवा त्यानें
तुझ्या ठिकाणीं करावी॥ १४ तथापि तुझ्या संमतावांचून म्या
कांहीं करायास इच्छिलें नाहीं। हेतु हा। कीं जो तुझा उप
कार। तो अगत्यतेने [जाल्या]सारिखा नव्हे। परंतु स्वभावाने व्हा
वा॥ १५ तर कदाचित तो यामुळें घडीभर वेगळा जाला। कीं
त्वां त्याला घेऊन सर्वकाळ ठेवावें॥ १६ आतांपासून चाकरा
सारिखा नव्हे। परंतु चाकरापेक्षां प्रियभाउ [असा ठेवावा।]
तो तसा मला विशेष [आहे।] आणि देहाविषयीं व प्रभूविषयीं
तुला किती अधीक! १७ यास्तव जर तूं मला ऐक्यरूपी
मोजितोस। तर जसा माझा तसा त्याचा अंगीकार कर॥ १८ आ
णि जर त्यानें तुझा कांहीं अन्याय केला। अथवा देणें ठेवि
लें आहे। तर तें माझ्या खात्यांत धर॥ १९ म्या पाऊ
लसानें आपल्या हातानें लिहिलें आहे। मी फेडून देईन। कां
तर म्या तुला न म्हणावें। कीं तूं माझें देणें स्वयंभच आ
हेस॥ २० हे भाऊ। होय। प्रभूविषयीं तुझें सार्थक मला अ
सावें। प्रभूविषयीं माझीं आंतडीं सांवर॥ २१ म्या तुझ्या
मानण्याचा भरवंसा धरून तुला लिहिलें आहे। कां। हें कळलें,
कीं मी जें सांगतों, त्यापेक्षां तूं अधीकच करिशील ※

२२ आणखी माझ्या साठीं बिह्राडही सिद्ध कर। कां
तर मी आशा धरितों। कीं तुमच्यां प्रार्थनांकडून मी कृपेनें तु
म्हास दिल्हा जाईन॥ २३ । २४ एपाफ्रास। जो खीस्त येशू
विषयीं माझा संगती बंदिवान तो। मार्कस। आरीस्तार्खस। देमा
स। लुका। हे माझे संगती कामकरी। तुला क्षेम मागतात॥
२५ आमचा प्रभू येशू खीस्त याची कृपा तुमच्या आत्म्यावर
[असो॥] आमेन ※

इब्रीयांस पत्र ॥

पर्व १ ॥ १ देवाने। पूर्वी। बहुत विभागें। आणि बहुत प्रका
रें। वाडवडिलांस भविष्यभाष्यांकडून ह्मटल्यावर। २ ह्यां शेवट
ल्यां दिवसीं आह्मास पुत्राकडून ह्मटलें आहे। ह्याला। अवघीं
यांचा वतनधनी असें ठेविलें आहे। आणि ह्याकडून भुवनें उ
त्पन्न केलीं। ३ हा त्याच्या गौरवाचें तेज। व तत्वतेची प्र
तिमा आहे। आणि आपल्या सामर्थ्य शब्दाकडून अवघीं वाग
विता। यास्तव हा स्वतां। पापांविषयीं आमची शुद्धता करू
न परमेश्वराच्या उजव्याकडे उंचांमध्यें बसला आहे। ४ कां।
हा दुतांपेक्षां जेवढें उत्कृष्ट नांव असें वतन पावला आहे।
तेवढ्याने त्यांपेक्षां उत्तम आहे ※
५ कां तर [देवाने] दुतांतल्या कोणत्याला कधीं असें
ह्मटलें? [कीं] तूं माझा पुत्र आहेस। आज म्या तुला जन्मवि
लें आहे। आणि फिरोन। मी त्याचा बाप असा होईन।
आणि तो माझा पुत्र असा होईल। ६ आणि फिरोन।
तो जेव्हां श्रेष्ठजन्माच्या पुरुषाला जगांत आणितो। तेव्हां ह्म
णतो। कीं देवाचे सर्व दूत त्याला भजोत॥ ७ दुतांविषयीं
तर तो [असें] ह्मणतो खरें। [कीं] तो आपले दूत असे आत्मे।
आणि आपले सेवक असे अग्नीचें ज्वाळ[रूप] करितो।
८ परंतु पुत्राला [असें ह्मणतो। कीं] हे देवा। तुझें
सिंहासन सदा सर्वकाळ [आहे।] तुझी राज्यकाठी सर
ळपणाची काठी [आहे।] ९ त्वां नितिची प्रीति केली आ
हे। आणि नेमभंगाचा द्वेष केला आहे। यास्तव। हे देवा।

तुझा, देवाने, तुझ्या सवंगड्यांपेक्षां तुला हर्षरूप तेल
याचा अभिषेक केला आहे॥ १० आणखी, हे प्रभू, त्वां
प्रारंभीं, पृथ्वीचा पाया घातला, आणि आकाशें तुझ्या हातांचीं
कामें आहेत। ११ तीं नाश पावतील। परंतु तूं राहून टि
कतोस। आणि तीं सगळीं वस्त्रासारिखीं जुनीं होतील। १२ आ
णि तूं त्यांस पांघरुणासारिखें गुंडाळिसील। असें तीं पालटलीं
जातील। परंतु तूं तसाच आहेस। आणि तुझीं वर्षें कधीं
सरणार नाहींत॥ १३ आणि त्याने दुतांतील कोणत्याला क
धीं [असें] ह्मटलें? [कीं] मी तुझ्या वैऱ्यांस तुझ्या पायांचें
आसन ठेवीन। तोंपर्यंत तूं माझ्या उजव्याकडे बैस। १४ ते
सर्व सेवा करणारे आत्मे। तारणरूप वतन जे पावणार। त्यां
मुळें सेवा करण्यासाठीं। बाहेर पाठविलेले असे नाहींत कीं
काय? ※

पर्व २ ॥ १ ह्यामुळें, जीं ऐकलेलीं त्यांस आह्मी कधीं
गळूं न द्यावयास। त्यांवर फारच चित्त ठेवावें लागतें॥ २ कां
कीं दुतांकडून सांगितलेली गोष्ट जर खचीत जाली। आणि
प्रत्येक उल्लंघनाला व अवमानाला न्यायपूर्वक फेड लागली। ३ त
र आह्मी येवढ्या मोठ्या तारणाची निष्काळजी केल्यावर कसें निभ
वूं? ह्या [तारणाचें] सांगणें प्रभूकडून होऊं लागलें। [मग] ऐकणा
ऱ्यांकडून आह्माशीं खचीत करून दाखविलें गेलें। ४ [त्यां]स
हीत देवाची आणीक साक्ष। खुणांनी व उत्पातांनीहि व बहुत
प्रकारच्यां चमत्कारांनी, जाली। आणि आपल्या इच्छेप्रमाणें पवि
त्र आत्मारूप देणीं वांटण्याने [जाली ※] ५ कां तर होणार
लोक ज्याविषयीं आह्मी बोलतों। तो त्याने दुतांच्या स्वाधीन ठे
विला नाहीं। ६ परंतु कोणी कोठें असी साक्ष दिल्ही आ
हे। कीं माणूस काय आहे! कीं तूं त्याची आठवण करि
तोस। अथवा मनुष्य वंशस्थ [काय!] कीं तूं त्याची भेट घेतोस,
७ त्वां त्याला थोडक्यापर्यंत दुतांपेक्षां कांहीं उणें केलें आ
हे। त्वां त्याजवर गौरवाचा व सन्मानाचा मुगूट घातला आहे।

आणि आपल्या हातांच्या कामांवर त्याला स्थापिलें आहे।
८ तूं त्याच्या पायांखालीं सगळीं आधीन ठेवलीं आहेत।
तर त्याच्या स्वाधीन सगळीं ठेवण्याकडून, त्याच्या स्वाधीन
न केलेलें [असें] कांहीं राहूं दिल्हें नाहीं। तथापि सगळीं त्याच्या
स्वाधीन ठेवलेलीं, असीं आजपर्यंत आमच्या दृष्टीस पडत
नाहींत॥ ९ परंतु येशू थोडक्यापर्यंत दुतांपेक्षां कांहीं उणा
केलेला जाल्यावर, मरण सोसल्यामुळें, त्यावर गौरव व स
न्मान यांचा मुगूट घातलेला, असा आमच्या दृष्टीस पड
तो। तो यासाठीं [उणा जाला।] कीं त्यानें देवाच्या कृपे
कडून प्रत्येकाच्या ठिकाणीं मरण भोगावें। १० कारण कीं
ज्यासाठीं सगळीं, आणि ज्याकडून सगळीं [आहेत।] त्याच्या
योग्य हें दिसत होतें, कीं त्यानें, पुष्कळ संतानांस गौरवांत
आणणारा म्हणजे त्यांच्या तारणाचा अधिकारी, याला दुः
ख भोगाविषयीं परिपूर्ण करावें। ११ आणि हें कारण, कीं जो
पवित्र करितो आणि जे पवित्र केले जातात, ते सर्व येकापासू
न [आहेत॥] ह्या कारणास्तव तो त्यांस भाऊ म्हणायास न
लाजतां म्हणतो, १२ कीं मी तुझ्या नांवाचें वर्णन माझ्या
भाऊंजवळ करीन। मंडळीच्या मध्यें मी गीत गाऊन तु
झी स्तुति करीन॥ १३ आणि फिरोन, मी त्याजवर भर्व
सा ठेवीत जाईन॥ आणि फिरोन, पाहा, मी आणि जीं लें
करें देवानें मला दिल्हीं आहेत, तीं॥ १४ तर तीं लेंकरें मा
सरक्तयुक्त होतीं, यास्तव तोहि सारिख्या प्रकारें त्यांयुक्त
यासाठीं जाला, कीं आपण मरण्याकडून, मारण्याच्या बळाच्या
चा, म्हणजे सावलसाचा, नाश करावा। १५ आणि जे म
रणाच्या भयानें आपल्या सर्व आयुष्यभर दासपणांत होते, त्यां
स मोकळें करावें। १६ कां तर तो दुतांची [प्रकृती] कसें
हि धरीत नाहीं, परंतु आब्राहामाच्या बिजाची धरि
तो॥ १७ यास्तव तो अवघ्यांविषयीं आपल्या भाऊंसारिखा
जाला पाहिजे। हेतु हा, कीं लोकांच्या पापांचें प्रायश्चित्त

घेण्यास त्याने देवाकडल्यांविषयीं दयाळू व विश्वासू मुख्य उ
पाध्या असा व्हावा। १८ कां तर त्यावर दुष्ट प्रयत्न जा
ल्याने जें दुःख त्याने भोगिलें। तेणेंकडून तो। ज्यांवर दुष्ट प्रयत्न
आहे। त्यांचें साह्य करायास शक्तिमान आहे ※

पर्व ३॥ १ यास्तव। अहो पवित्र भाऊ। आकाशावरील बोला
वणें पावलेले सोबती, आह्मी जो प्रेषीत व मुख्य उपाध्या पत्कर
ला आहे। [ह्मणजे] ख्रीस्त येशू। त्याचें ध्यान तुह्मी करा॥ २ ज
सा मोशे आपल्या सर्व घराविषयीं [विश्वासू होता।] तसा हाहि
आपल्या ठेवणाऱ्याशीं विश्वासू होता॥ ३ तर जितक्याने घरा
पेक्षां घराच्या मांडणाऱ्याला अधीक सन्मान आहे। तितक्याप्र
माणें हा मोशाहून अधीक सन्मानयोग्य मोजला जातो॥ ४ कां त
र प्रत्येक घर कोणाकडून मांडलें असतें। परंतु ज्याने सगळीं मांड
लीं। तो देव [आहे॥] ५ मोशे तर, ह्मटल्या जाणाऱ्या [गोष्टीं]
चें प्रमाण स्थापण्यासाठीं। आपल्या संपूर्ण घराविषयीं सेवकासा
रिखा विश्वासू [होता] खरें। ६ परंतु ख्रीस्त पुत्रासारि
खा आपल्या घरावर [तसा होता॥] जर आह्मी आशेचा भ
र्वसा व आनंद शेवटपर्यंत बळकट राखितों। तरच आह्मी
त्याचें घर आहों ※

७ यास्तव पवित्र आत्मा जसें ह्मणतो, तसें तुह्मी
आज त्याची वाणी अवश्य ऐकावी। ८ कडवट संतापवि
ण्यांत। रानांतील परिक्षेच्या दिवसीं जसें, तसें तुह्मी आ
पलीं अंतःकरणें कठीण करूं नका। ९ तेथें तुमच्यां वाड
वडिलानी माझी परिक्षा केली। माझा अनुभव घेतला। आ
णि चाळीस वर्षांपर्यंत माझीं कामें पाहिलीं॥ १० यास्तव त्या
पिढीविषयीं मी कंटाळलों। आणि बोललों। [कीं] ते अंतः
करणाने सर्वकाळ कुमार्गी जातात। आणि त्यानी माझे मार्ग
जाणले नाहींत॥ ११ यास्तव म्या आपल्या रागाने शपथ
वाहिली, कीं ते माझ्या विसांव्यांत येणारच नाहींत॥ १२ अ
हो भाऊ। तुह्मी असे सावध व्हा। कीं जिवंत देवापासून नि

घण्याने तुह्मामधील कोणाला अविश्वासाचें दुष्ट अंतःकरण न
सावें॥ १३ परंतु तुह्मी प्रति दिवसीं, जोंपर्यंत आज ह्मट
लेला आहे। तोंपर्यंत येकमेकांसीं प्रबोध करा। ह्यासाठीं।
कीं पापाच्या ठकपणाने तुह्मामधील कोणी कठीण न व्हावें॥
१४ कां कीं जर आह्मी आपल्या अवस्थाचा प्रारंभ शेवटपर्यंत
बळकट धरितों। तरच आह्मी ख्रीस्ताच्यांतील भागीदार आहों।
१५ हें ह्मटलेल्यावरून, कीं। आज तुह्मी त्याची वाणी अगत्य
ऐका। असें कडुरूपी संतापविण्याच्या वेळेस। तसें आपलीं अं
तःकरणें कठीण करूं नका॥ १६ कां तर कित्येकानी ऐकि
ल्यावर। कडुरूपें संतापविलें। होय। जे मोशाच्या योगें मिसरां
तून निघाले। त्यां सर्वानी कीं नाहीं? १७ आणि [देव] कोणां
विषयीं चाळीस वर्षांपर्यंत कंटाळला होता? ज्यानी पाप के
लें, ज्यांचीं प्रेतें रानांत पडलीं। त्यांविषयीं नव्हतें कीं काय?
१८ आणि जे अविश्वासी जाले। त्यांखेरीज कोणांसीं त्याने
असी शपथ वाहिली। कीं त्यानी त्याच्या विसांव्यांत न शिरा
वें? १९ तर आह्मास दिसतें, कीं अविश्वासामुळें त्यांच्याने
शिरवलें नाहीं ॥

पर्व ४॥ १ यास्तव, त्याच्या विसांव्यांत शिरण्याचें वचन
ठेवलेलें असतांहि। तुह्मामधील कोणी कधीं उणा सांपडणार
असेल। ह्मणोन आह्मी भ्यावें॥ २ कां तर आह्मासीं सुवर्तमा
न सांगितलेंच आहे। त्याप्रमाणें त्यांसीहि [होतें।] परंतु
ऐकलेल्या गोष्टिच्या संगतीं ऐकणाऱ्यांचा विश्वास न जाल्या
मुळें। ती त्यांस उपयोगी जाली नाहीं॥ ३ जे विश्वासतात
ते आह्मी तर विसांव्यांत जातों। ह्याप्रमाणें त्याने ह्मटलें।
[कीं।] यास्तव म्या आपल्या रागाने शपथ वाहिली, कीं ते मा
झ्या विसांव्यांत शिरणारच नाहींत। तथापि कामें उत्पत्तीच्या
मांडण्यापासून जालेलीं [आहेत।] ४ कां तर सातव्या [दि
वसां]विषयीं कोठे असें ह्मटलेलें आहे। कीं तेव्हां सातव्या दि
वसीं देवाने आपल्यां सगळ्यां कामांपासून विसांवा घेतला॥

५ आणखी फिरोन। ते माझ्या विसांव्यांत शिरणारच नाहींत। ह्यां
त [तोच अर्थ आहे॥] ६ तर ज्यांस सुवर्तमान पहिलें सांगितलें।
ते अविश्वासामुळें शिरलेच नाहींत । ह्यावरून हें राहातें। कीं कि
त्येकांनी त्यांत शिरविं॥ ७ आणखी येकादा दिवसाचा नेम क
रून दावीदाच्याने तो ह्मणतो। आज इतक्या काळानंतर।
ह्मटलेल्याप्रमाणें आज तुह्मी त्याची वाणी अगत्य ऐका।
आपलीं अंतःकरणें कठीण करूं नका॥ ८ कां कीं जर यहोशु
वाने त्यांस [तो] विसांवा दिल्हा असतां। तर [देवाने] त्या
नंतर दुसऱ्या दिवसाविषयीं ह्मटलें नसतें॥ ९ तर देवाच्या
लोकांसाठीं विसांवा राहातो॥ १० कां तर त्याच्या विसां
व्यांत जो शिरला आहे। त्यानेहि आपल्यां कामांपासून विसां
वा घेतला आहे। जसें देवाने आपल्यांपासून तसें। ११ या
स्तव आह्मी त्या विसांव्यांत शिरायास झटावें। ह्मणजे अ
विश्वासाच्या त्याच उदाहरणाप्रमाणें। कोणी न पडावें॥
१२ कां कीं देवाची गोष्ट जिवंत व सार्थक। आणि कोणत्या
हि दुधारी तरवारिपेक्षां तिखट। आणि जीव व आत्माहि
सांधे व मज्जेनेंहि यांतून पार जाणारी। आणि अंतःकरणाचे
विचार व भावना यांचा निवाडा करणारी आहे॥ १३ आ
णि त्याच्या समोर कांहीं उत्पन्न वस्तु अदृश्य नाहीं। परंतु
ज्याजवळ आमची झडती [घ्यायाची।] त्याच्यां दृष्टींस अवघीं
उघडीं। आणि उफराटलेलीं आहेत॥ १४ तर, दे
वाचा पुत्र येशू आकाशांमधून पार गेलेला। असा थोर मुख्य
उपाध्या आह्मास आहे। यावरून आह्मी आपला पत्करलेला पंथ
बळकट धरावा॥ १५ कां तर ज्याला आमच्यां अशक्तपणांविष
यीं संगतीं कळकळ होतच नाहीं। असा आह्मास मुख्य उपाध्या
नाहीं। परंतु तो पापावांचून सर्व प्रकारें समानतेने, छळलेला
होता॥ १६ तर। आह्मावर दया प्राप्त व्हावयास। आणि
सुकाळीक साह्यतेसाठीं कृपा मिळावयास। आह्मी धिटपणा
ने कृपेच्या सिंहासनाजवळ यावें॥

पर्व ५ ॥ १ तर माणसांतून घेतलेला प्रत्येक मुख्य उपाध्या।
देवाकडील जीं त्यांविषयीं माणसांकरितां असा स्थापिला आ
हे। कीं त्याने पापांमुळें दानें व यज्ञपशूहि वाहावे॥ २ आ
णि अज्ञानांचें व चुकणाऱ्यांचें कांहीं सहन त्याच्याने करवतें। कां
तर तो आपणहि अशक्तपणाने वेढला आहे। ३ आणि ह्याकरितां
त्याने जसें लोकांसाठीं। तसें आपणासाठींहि पापांमुळं अर्पण
केलें पाहिजे॥ ४ आणि कोणी आपल्या आपण हा मान
घेत नाहीं। केवळ जो आहरोनासारिखा देवाकडून बोलावले
ला तो मात्र [घेतो॥] ५ तसें ख्रीस्तानेहि मुख्य उपाध्या होण्याचें
आपलेंच गौरव केलें नाहीं। परंतु ज्याने त्याला ह्मटलें।
[कीं] तूं माझा पुत्र आहेस। आज म्या तुला जन्मविलें आहे।
त्याने [केलें॥] ६ आणि त्याप्रमाणें [देव] दुसऱ्या [ठिकाणा]म
ध्यें ह्मणतो। [कीं] मल्खीजेदेकाच्या नेमीत प्रकाराप्रमाणें।
तूं सर्वकाळापर्यंत उपाध्या आहेस॥ ७ त्याने आपल्या देहांतील दि
वसांमध्यें बळकट वोरडणें व अश्रें यांसहीत प्रार्थना व का
कुळती ह्या। आपणाला मरणापासून तारायास जो शक्ति
मान। त्यासीं अर्पिल्या। आणि सद्भयाविषयीं त्याचें ऐकलें।
तसा ८ तो जरीं पुत्र होता। तथापि आपण जीं सोसिलीं।
त्यांकडून मान्यता शिकला। ९ आणि पूर्ण होऊन। आपल्यां
सर्व मानणाऱ्यांसीं अक्षय तारणाचा कारणीक जाला। १० म
ल्खीजेदेकाच्या नेमीत प्रकाराप्रमाणें मुख्य उपाध्या [असा] दे
वाकडून ह्मणविलेला [जाला ※]

११ ह्या [मल्खीजेदेका]विषयीं आमची फार गोष्ट
बोलायाची [आहे।] परंतु ती समजवायास अवघड, कां कीं
तुह्मी ऐकण्याविषयीं मंद जालां आहां। १२ आणखी ज्या
काळाने तुह्मी उपदेशक असावे। त्या ह्यांत कोणी तुह्मास दे
वाच्यां वाक्यांतील मुळ प्रकरणें कोणतीं। हें शिकवावें ह्मणो
न तुह्मास फिरोन अगत्य आहे। आणि तुह्मी असें जालां।
कीं तुह्मास दुधाचें अगत्य आहे। परंतु जड अन्न नाहीं॥

१३ कां तर जो दुध घेत असतो। असा प्रत्येक। पुण्याच्या गो
ष्टिविषयीं। अपरिचीत [आहे।] कारण कीं तो बाळक आहे॥
१४ परंतु जे पूर्ण आहेत। ज्यांचीं इंद्रियें चांगल्याचा व वा
ईटाचाहि निवाडा करण्यास सवयीने वहिवाटलेलीं आहेत।
जड अन्न त्यांचें आहे॥

पर्व ६ ॥ १, २ यास्तव आह्मी ख्रीस्ताविषयींची प्रा
रंभ गोष्ट सोडून। निर्जीव कामांविषयीं पश्चात्ताप, आणि देवा
वरील विश्वास। [आणि] बाप्तिस्म्यांविषयीं उपदेश। आणि
हात [कोणा]वर ठेवणें। आणि मेलेल्यांचें पुन्हा उठणें। आणि
अक्षय न्यायठरणें। ह्यांचा पाया फिरोन घालीत नसतां।
पूर्णपणापर्यंत शीघ्ररूपें जावें॥ ३ आणि जर देव होउं देतो।
तर आह्मी हें करूं। ४। ५, ६ कां तर। जे येकदा
प्रकाशमय जाले। ज्यानी आकाशावरील दान चाखिलेंहि आ
हे। जे पवित्र आत्म्याच्यांतील वांटेकरीहि जाले। आणि देवाची
चांगली गोष्ट व होणार लोकांतील पराक्रम ज्यानी चाखिले।
नंतर ते पतीत जाले आहेत। त्यांस पश्चात्तापाने फिरोन नवें करा
वें हें शक्य नाहीं। कां। ते आपणच देवाच्या पुत्राला मरणखांबीं
फिरोन देतात। आणि त्याचा धिंडवडा करितात॥ ७ कां
तर जी भूमि। आपणावर हरवेळ येतो जो पाऊस। तो पि
ती। आणि ज्यांकडून शेतकामहि पावती त्यांसाठीं उपयोगी
हिरवळ उपजविती। ती देवापासून आशिर्वाद पावती। ८ परंतु
जी कांटळ व कुसळ वाढविती। ती नाकारलेली, आणि शापाजव
ळ [आहे।] तिचा परिणाम जाळण्यासाठीं [आहे]॥ ९ तथापि।
अहो प्रिय, जरीं आह्मी असें बोलतों। तरीं तुह्माविषयीं
त्यांपेक्षां ज्या चांगल्या। आणि ज्यांस तारण आहे। अ
स्यां गोष्टींचा भरवसा आह्मास आहे॥ १० कारण कीं, देव
असा अन्यायी नाहीं। कीं त्याने तुमचें काम व प्रीतिमुळें क
ष्ट। हीं विसरावीं। जी [प्रीति] तुह्मी त्याच्या नांवासाठीं ऊह
न दाखविली ती। कां, तुह्मी पवित्रांची सेवा केली आहे,

आणि करीत आहों ॥ ११ आणि आह्मी फार इछितों । कीं
तुह्मामधील प्रत्येकाने । आशेचा निर्धार होण्यासाठीं । तसेंच
लगटपण शेवटापावेतों करून दाखवावें । १२ ह्मणजे तुह्मी
आळसी न व्हावें । परंतु विश्वास व धीर धरल्याने जे वचनांचें
फळ असें वतन पावत आहेत । त्यांचें अनुकरण करणारे [व्हावें ॥]
१३ [तीं धरण्याचें] कारण हें । कीं देवाने आब्राहामाला वचन दि
ल्यानंतर, ज्याची शपथ आपण वाहावी । अशा त्याला कोणी
अधीक मोठा नव्हता । यावरून त्याने आपलीच शपथ वाहून ।
१४ ह्मटलें । [कीं] मी तुला आशिर्वाद देईनच देईन । आ
णि तुला वाढवीनच वाढवीन ॥ १५ मग ह्याने धीर धरिल्या
वर याला वचन फळ तसेंच प्राप्त जालें ॥ १६ त्याप्रमाणें त
र माणसें मोठ्याची शपथ घेतात । आणि स्थापण्यासाठीं शपथ ।
ही त्यांशीं सर्व वादाचा शेवट आहे ॥ १७ तिजकडून देवाने
आपल्या योजनेचें अत्यंत अपालटपण वचनांचें वतन पावणा
ऱ्यांस दाखवायाला इछून, त्याने मध्यें शपथरूप बंधारण केलें ।
१८ हेतु हा । कीं ज्या दोन अपालट कर्मांविषयीं खोटें बो
लणें देवाला असंभव आहे । त्यांकडून आह्मास बळकट शां
तवन व्हावें । ह्मणजे दाखविलेली आशा धरायास जे पळाले
त्यांस ॥ १९ ती [आशा] आमच्या जीवास नांगर यासारिखी आ
हे । अचळ व बळकटहि । आणि पडद्याच्या आंतील ठिकाणीं शि
रलेला [आहे ।] २० तेथे पुढे धांवणारा येशू आह्माकरितां शि
रला आहे । [आणि] मलखी जेदेकाच्या नेमीत प्रकाराप्रमाणें सर्व
काळांपर्यंत मुख्य उपाध्या जालेला [आहे ॥]

पर्व ७ ॥ १ तर हा मलखी जेदेक, शालेमाचा
राजा । परात्पर देवाचा उपाध्या । त्यां राजांस मारण्यापासू
न माघारें येणाऱ्या आब्राहामाला भेटला । त्याला । आशिर्वा
दहि याने दिल्हा । २ आणि याला आब्राहामाने अवघ्यांतू
न दाहावा भाग दिल्हा । [नांवाचा] अर्थ उतरला । तर पहि
लें हा पुण्यरूपी राजा । आणि मग शालेमाचाहि राजा । ह्म

णजे कल्याणी राजा। ३ बापहीन, आईहीन। वंशावळिहीन। ज्याला दिवसांचा प्रारंभ आणि आयुष्याचा शेवटहि नव्हता। परंतु देवाच्या पुत्रासारिखाच जालेला असतां। उपाध्या अखंड राहतो। ४ तर। ज्याला आदी वडील आब्राहामानेच लुटींतून दाहावा वांटा दिल्हा। हा केवढा मोठा हें पाहा॥ ५ आणि लेवीच्या संतानांतील जे उपाध्यपण घेतात। त्यांनीहि लोकांपासून। ह्मणजे आपले भाऊ .जरीं आब्राहामाच्या कंबरेपासून उत्पन्न जाले। तथापि त्यांपासून दाहावा वांटा शास्त्राप्रमाणें घ्यावा। ह्मणोन त्यांस आज्ञा आहे खरें। ६ परंतु ज्याची वंशावळि त्यांपासून मोजलेली नाहीं। त्याने आब्राहामापासून दाहावा वांटा घेतला। आणि ज्याला वचनें जालीं होतीं। त्याला आशिर्वाद दिल्हा॥ ७ आतां अवघ्या वादावांचून। लाहानाला उत्तमाकडून आशिर्वाद होतो। ८ तर येथे मरणारे पुरुष दाहावे भाग घेतात खरें। परंतु तेथे, ज्याविषयीं प्रमाण दिल्हेलें [आहे] कीं तो जगतो, तो [घेतो॥] ९ आणि असें सांगतां येतें, कीं लेवी जो दाहावे भाग घेतो। त्यानेहि आब्राहामाच्या द्वाराने दाहावें दिल्हें। १० कां तर जेव्हां मलखीजेदेक त्याच्या बापाला भेटला। तेव्हांपर्यंत त्याच्या कंबरेंत होता ※ ११ तर ह्यावरून, लेवीच्या उपाध्यपणाकडून पूर्णपण जर जालें। त्या [उपाध्यपणाच्या] वेळेस लोकास शास्त्र जालें यास्तव [ह्मणतों,] तर आहरोनाच्या नेमीत प्रकाराप्रमाणें नव्हे। परंतु मलखीजेदेकाच्या नेमीत प्रकाराप्रमाणें दुसरा उपाध्या उत्पन्न व्हावा। असें आणखी काय अगत्य [होतें?] १२ तर उपाध्यपण पालटलें असतां, अगत्याने नेमशास्त्रहि पालटणें प्राप्त होतें॥ १३ कां तर ज्याविषयीं हीं ह्मटलीं आहेत, तो ज्या दुसऱ्या वंशांतील कोणी यज्ञस्थंडिलाजवळ सेविलें नाहीं। त्यांतला आहे। १४ कां तर हें फार उघडें आहे। कीं आमचा प्रभू यहूदापासून उगवला। ज्या. वंशांतील उपाध्यपणाविषयीं मोश्याने कांहीं सांगितलें

नाहीं॥ १५ आणि त्यापेक्षां हें फार अधीक उघडें आहे, कीं मलखीजेदेकाच्या समानतेने दुसरा उपाध्या उत्पन्न व्हावा। १६ ह्मणजे जो देहीक आज्ञेच्या शास्त्राप्रमाणें जाला नव्हे, परंतु अक्षय जीवनाच्या पराक्रमाप्रमाणें [झालेला] तसा। १७ कां तर तो प्रमाण देतो, कीं तूं। मलखीजेदेकाच्या नेमीत प्रकाराप्रमाणें। सर्वकाळापावेतों उपाध्या [आहेस॥] १८ तर पूर्वीची आज्ञा अशक्त आणि निरुपयोगी यावरून। तिचें घालविणें प्राप्त आहे खरें॥ १९ कां कीं नेमशास्त्राने कशास पूर्ण केलें नाहीं। परंतु ज्या अधीक चांगल्या आशेकडून आह्मी देवाजवळ येतों। तिला प्रगट करण्याने [पूर्णता जाली॥] २०, २१ आणि हे शपथ वाहाण्यावांचून उपाध्ये होतात खरें, परंतु ज्याने याला सांगितलें। [कीं] तूं मलखीजेदेकाच्या नेमीत प्रकाराप्रमाणें सर्वकाळापावेतों उपाध्या आहेस असें प्रभूने शपथ वाहिली आहे आणि तो पश्चात्ताप करणार नाहीं। त्याकडून शपथ वाहिल्याने, हा [उपाध्या जाला।] तर जितक्यावरून शपथ वाहाण्यावांचून न [आला।] २२ तितक्यावरून येशू अधीक चांगल्या कराराचा जामीन जाला आहे ॐ २३ आणि हे उपाध्ये बहुत जाले आहेत खरें। कारण कीं मरणाने राहायास अडविले आहेत। २४ परंतु हा सर्वकाळापर्यंत राहातो। यास्तव ह्याला न जायाचें उपाध्यपण आहे। २५ आणि ह्यावरून। आपल्याकडून जे देवाजवळ येतात। त्यांस तारायाला पूर्ण शक्तिमान आहे। कां, त्यांच्या साठीं विनंती करायास सर्वदां जगतो॥ २६ तर आह्मास असा मुख्य उपाध्या शोभत होता। परमार्थीक, निष्पापी, ठपक्याविरहित पाप्यांपासून भिन्न राहिलेला, आणि आकाशांपेक्षां अधीक वर जालेला असा। २७ आणि असा, कीं ह्याला, त्यां मुख्य उपाध्यांसारिखें। पहिलें आपल्यां पापांसाठीं, मग लोकाच्यां साठीं प्रति दिवशीं यज्ञ जीव वाहावे असें अगत्य नाहीं। कां तर ह्याने आपणालाच अर्पिल्याने तें [काम] येकदाच केलें

आहे। २८ [त्यांस तसें कारण] यावरून। कीं नेमशास्त्र अ
शक्तपणयुक्त माणसांस मुख्य उपाध्ये स्थापितें। परंतु नेमशास्त्रा
नंतर जी शपथेची गोष्ट। ती पूर्ण जालेल्या पुत्राला सर्वकाळापा
वेतों [स्थापिती ॐ]

पर्व ८॥ १ आतां जीं म्हटलेलीं। त्यांची येकुणात [अ
सी आहे, कीं] आम्हास असा मुख्य उपाध्या आहे। तो आ
काशांमध्यें अती थोरल्याच्या सिंहासनांतील उजव्याकडेस बसलेला
आहे। २ [तो] पवित्र संग्रहाचा। व जो खरा मंडप प्रभूने घा
तला। मनुष्याने नव्हेच। याचा कारभारी [आहे॥] ३ कां
कीं। प्रत्येक मुख्य उपाध्या दानें व यज्ञपशूहि अर्पायास स्था
पिला असतो। यास्तव ह्यालाहि कांहीं अर्पावयास व्हावें हें
अगत्य [होतें।] ४ आणखी हा जर पृथ्वीवर असता। तर
उपाध्या नसताच। कां कीं। जे उपाध्ये नेमशास्त्राप्रमाणें
दानें अर्पितात, असे आहेत। ५ हे आकाशावरल्यांचें उदा
हरण व सावली, यावरून सेवा करितात। त्याप्रमाणें मोशे।
मंडप यथास्थीत मांडणार असतां। देव बोध पावला होता।
कां तर हा म्हणतो, [कीं] जो कित्ता तुला डोंगरावर दा
खविला, त्याप्रमाणें त्वां सगळीं करावीं। म्हणोन सावध अ
स॥ ६ परंतु आतां हा अधीक उत्तम कारभार पावला आ
हे, इतक्यांत कीं अधीक चांगल्या कराराचा मध्यस्थ आहे।
हा [करार] अधीक चांगल्यां वचनांकडून नेमलेला आहे॥
७ कां कीं जर तो पहिला [करार] निर्दोषी असता। तर दु
सऱ्यासाठीं ठिकाण शोधलें नसतें। ८ परंतु खोड काढीत असतां
[देव] त्यांस म्हणतो। पाहा। प्रभू हें सांगतो। [असे] दिवस येतात।
कीं मी। इस्राएल घराण्याजवळ। आणि यहूदा घराण्याजवळ
नवा करार स्थापीन। ९ त्यांच्यां वाडवडिलांस मिसर देशांतू
न बाहेर आणण्यासाठीं ज्या दिवशीं म्या त्यांचा हात धरिला।
तेव्हां त्यांशीं जो करार म्या केला, त्याप्रमाणें नव्हे। कार
ण कीं माझ्या त्या करारांत ते राहिले नाहींत। आणि प्रभू

ह्मणतो। कीं म्यां त्यांची काळजी केली नाहीं॥ १० त
र त्यां दिवसांनंतर इस्राएलाच्या घराण्यापाशीं जो करार मी
स्थापीन। तो हाच [असें] प्रभू ह्मणतो, माझीं शास्त्रें त्यां
च्या बुद्धिमध्यें ठेवीन, आणि तीं त्यांच्या अंतःकरणावर लिही
न। आणि मी त्यांचा देव असा होईन। आणि ते माझी प्र
जा असे होतील। ११ तेव्हां प्रभूला जाण, असें प्रत्येक आपल्या
शेजाऱ्याला आणि प्रत्येक आपल्या भावला ह्मणत असतां। ते
उपदेशणार नाहींत। कां कीं। त्यांतील लाहानापासून त्यां
तील मोठ्यापर्यंत। सर्व मला वोळखतील॥ १२ कारण कीं त्यां
च्यां अन्यायांविषयीं मी क्षमाशीळ होईन। आणि त्यांचीं पा
पें व त्यांचीं अशास्त्रें मी आणखी आठविणारच नाहीं॥
१३ त्याने नवा [असें] ह्मटल्याने। पहिल्याला जुना केला
आहे॥ आणि जें जुनें व जरजर जालें। तें नाहीसें होण्याज
वळ [आहे ❊]

पर्व ९ ॥ १ तर पहिल्या [करार]ांत भजनाच्या नेमण
कीहि। व भूलोकी पवित्र स्थान होतें खरें। २ कां तर पु
ढील मंडप। जो पवित्र ह्मटलेला आहे। तो सिद्ध केलेला
होता। त्यांत दिवा झाड। व चवरंग, व भाकरी पुढें ठेवणें
हीं [होतीं॥] ३ आणि दुसऱ्या पडद्यापलिकडे जो मंडप। प
वित्रांतील पवित्र ह्मटलेला। तो [होता॥] ४ ह्यांत सोन्याचें
धुपाटणें। व सोन्याने सभोंवतें मढलेली कराराची पेटी होती॥
हींत मान्ना मावलेलें सोन्याचें पात्र। व आहरोनाची कल्या आ
लेली काठी। आणि कराराच्या पाट्या [होत्या।] ५ आणि ति
च्या वर। गौरवी करूबीम [होते।] ह्यांची सावली प्रसन्न स्थ
ळावर पडली। ह्यांविषयीं आतां सविस्तर बोलायाचें नाहीं॥
६ तर हीं असीं सिद्ध केलेलीं असतां, उपाध्ये पुढल्या
मंडपांत मात्र। भजनें उरकायास। नित्य शिरतात। ७ प
रंतु दुसऱ्यांत मुख्य उपाध्या येकला प्रति वर्षीं येकदा [जातो।]
जें रक्त तो आपल्यां व लोकाच्यां अजाणपणांसाठीं अर्पि

तो। त्यावांचून न [जातो।] ८ पवित्र-आत्मा हें दाखवीत [होता।] कीं पहिल्या मंडपाची जोंपर्यंत स्थिति आहे, तोंपर्यं त परम-पवित्र-स्थानांतील वाट प्रगट केलेली नाहीं। ९ ज्या वेळेस दानें व जिव-अर्पणेंहि असीं वाहिलीं आहेत। कीं तीं भजन-करणा ऱ्याला भावाविषयीं पूर्ण करायास शक्तिमान नाहींत। त्या वर्तमान-काळाविषयीं तो [मंडप] दाखला [होता।] १० खाणीं व पिणीं, व अनेक आंघोळी, व देहसंबंधी नेमणुकी याविषयीं तो नी ट-करण्याच्या काळापावेतों घातला [होता॥] ११ परंतु। जो अधीक-मोठा व अधीक-पूर्ण मंडप, हातानी केलेला न व्हे। ह्मणजे ह्या उत्पत्तीचा नव्हे। त्याकडून होणार जीं चांगलीं त्यांविषयींचा मुख्य-उपाध्या असा ख्रीस्त आला असतां। १२ प रम-पवित्र-स्थानांत येकदाच गेला आहे। बकरें व वांसरें यां चें रक्त घेऊन असें नव्हे, परंतु आपलेंच रक्त घेऊन [गेला।] त्याने अक्षयी सुटका मिळविली [आहे॥] १३ कां कीं जर बैलां चें व बकऱ्यांचें रक्त आणि कालवडीची राख, हीं विटा ळलेल्यांस शिंपडलीं असतां देहाच्या शुद्धतेपर्यंत पवित्र करिता त, १४ तर ख्रीस्त। ज्याने सर्वकाळच्या आत्म्याकडून आ पणाला निर्लेप असें देवाला अर्पिलें आहे, त्याचें रक्त किती विशेषें तुमच्या भावांस, सजीव-देवाला भजायास निर्जीव-कामां पासून शुद्ध करील! १५ आणि तो ह्याकरितां नव्या करा राचा मध्यस्थ आहे। कीं पहिल्या करारावर जीं उल्लं घणीं। त्यांच्या सुटकेसाठीं [आपलें] मरण जाल्याने, बोला विलेले जे त्यानी अक्षयी वतन होण्याचें वचन पावावें॥ १६ कां तर जेथे मरणाऱ्याचा करार आहे। तेथे नेमणा ऱ्याचें मरण अगत्य धरलें आहे॥ १७ कां कीं तसा करा र मेलेल्यांविषयीं खचीत आहे। ह्मणजे नेमणारा जी वंत आहे। तोंपर्यंत कधीं सबळ नाहीं॥ १८ यास्तव पहिल्या [क राराचा] संस्कार रक्तावांचून न जाला। १९ कां कीं मोश्याने शास्त्राप्रमाणें प्रत्येक आज्ञा सर्व-लोकांस ह्मटल्यावर,

पाणी व किरमजी लोकर व एजोब यांकडून। वांसरांचें व बकऱ्यांचें रक्त हें पुस्तकावर व सर्व लोकावरहि शिंपडीत असतां। २० तो बोलला। कीं जो करार देवानें तुह्माजवळ नेमला आहे। त्याचें रक्त हेंच। २१ आणि त्यानें मंडप व सेवेचीं अवघीं साहित्येंहि रक्तानें तसीं शिंपडिलीं॥ २२ आणि नेमशास्त्राप्रमाणें बहुतकरून अवघीं रक्तानें शुद्ध होतात आणि रक्त ओघळविल्यावांचून क्षमा प्राप्त होत नाहीं॥ २३ तर आकाशांमध्यें जीं त्यांचीं उदाहरणें। हीं तस्यांकडून शुद्ध जालीं पाहिजेत खरें। परंतु आकाशावरलींच जीं। तीं त्यांपेक्षां अधीक चांगल्यां जिव अर्पणांकडून [शुद्ध व्हावीं।] २४ यास्तव कीं ख्रीस्त हातकामी पवित्र स्थानांमध्यें गेला नाहीं। हीं खऱ्यांचीं प्रतिबिंबें। परंतु आकाशांतच। यासाठीं [गेला।] कीं त्यानें आह्मामुळें देवासमोर सादर व्हावें॥ २५ आणि जसें मुख्य उपाध्या प्रति वर्षीं दुसऱ्याचें रक्त घेऊन परम पवित्र स्थानांत जातो। तसें ह्यानें बहुतदां आपल्याला अर्पावें असें नव्हे। २६ कांतर उत्पत्तीच्या प्रारंभापासून त्याला बहुत वेळा सोसावें लागलें असतें। परंतु आतां युगें संपल्यावर। पापें घालविण्यासाठीं हा आपणच जिव अर्पण होण्यानें प्रगट जाला आहे॥ २७ आणि ज्या प्रकारें माणसांस येकदा मरणें। आणि त्यानंतर न्याय ठरणें हें नेमून ठेविलें आहे। २८ तसें ख्रीस्त बहुतांचीं पापें आंगावर घ्यावयासाठीं। येकदा अर्पिलेला असतां। जे त्याची वाट पाहातात। त्यांस तारण्यासाठीं पापावांचून दुसरेदा दिसेल ※

पर्व १० ॥ १ नेमशास्त्राला तर होणार जीं चांगलीं त्यांची सावली असतां। आणि त्यां कार्यांचा आकारच नसतां। तें। जीव अर्पणें जीं ते प्रति वर्षीं अखंड वाहातात। त्यांकडून शरणागतांस कधींहि पूर्ण करायास शक्तिमान नाहीं। २ जर असतें। तर तीं अर्पणें करणें हें खुंटलें नसतें कीं काय? कारण कीं सेवक येकदा खरे जाले असतां। तेव्हांपासून

पापांची कांहीं भावना नसती॥ ३ परंतु त्यां [अर्पणां]नी
प्रति-वर्षीं पापांची आणखी आठवण [आहे॥] ४ कां तर बै
लांचें व बकऱ्यांचें रक्त पापांस काढून टाकायाला शक्तिमान ना
हीं। ५ यास्तव तो पृथ्वींत येत असतां ह्मणतो। पशू-अर्प
णें व दानें यांची इच्छा त्वां धरिली नाहीं। परंतु माझ्या सा
ठीं त्वां शरीर सिद्ध केलें आहे॥ ६ सर्वांग-होम व पापा
साठीं [अर्पणें] यांत तुझा संतोष न जाला। ७ तेव्हां म्या
ह्मटलें, हे देवा। पाहा। पुस्तकाच्या भेंडाळ्यांत मजविषयीं
लिहिलेलें आहे। तुझी इच्छा पाळायास मी येतों॥ ८ वरतें
तो बोलला। कीं पशू-अर्पण व दान। व सर्वांग-होम। व पापा
साठीं [अर्पणें।] जीं नेमशास्त्राप्रमाणें वाहिलीं जातात त्यांची
इच्छा त्वां धरिली नाहीं। आणि त्यांत तूं संतोषीत जाला नाहींस।
९ तेव्हां त्याने ह्मटलें। हे देवा। पाहा। तुझी इच्छा पाळायास मी
येतों। त्याने दुसरें स्थापावें। ह्मणोन आपण पहिल्याला काढून टाकि
तो॥ १० त्या इच्छेने। येशू-ख्रीस्ताचें शरीर येकदाच अर्पिल्या
कडून। आह्मी पवित्र केलेले आहों॥ ११ आणि प्रत्येक उपा
ध्या तर। प्रति-दिवशीं सेवा करीत असतां। आणि जीं
पशू-अर्पणें पापांस काढायाला कधींहि शक्तिमान नाहींत
तींच बहुत-वेळा वाहात असतां। उभा राहातो। १२ परंतु
हा पापांसाठीं येक-जिव-अर्पण वाहून। देवाच्या उजव्याकडे नि
रंतर बसला आहे। १३ आणि त्याचे वैरी त्याच्यां पायांचें
आसन ठेविले जातील, तोंपर्यंत परिणामाची वाट पाहातो॥
१४ कां तर जे पवित्र होतात। त्यांस त्याने येक अर्पणाकडून।
सर्वकाळापर्यंत पूर्ण केलें आहे॥ १५ आणि पवित्र-आत्माहि
आह्मास साक्ष देतो। तर जें पूर्वीं सांगितलें, त्यावरून।
१६ [कीं] प्रभू ह्मणतो। त्यां दिवसांनंतर जो करार मी
त्यांजवळ स्थापीन। तो हाच, मी आपलीं शास्त्रें त्यांच्या
अंतःकरणामध्यें ठेवीन। आणि तीं त्यांच्यां बुद्धींवर
लिहीन। १७ आणि मी त्यांचीं पापें व त्यांचे शास्त्रभंग

आणखी आठविणार नाहीं॥ १८ आतां जेथे हीं क्षमा [जः
लीं आहेत।] तेथे पापांसाठीं अर्पण आणखी [लागत] नाहीं॥
१९ तर अहो भाऊ, येशूच्या रक्ताकडून परम पवित्र स्थानांत
शिरण्याचें अभय आह्मास आहे। यास्तव [आह्मी शरण जा
वें।] २० तें [शिरणें।] पडद्यांतून। ह्मणजे त्याच्या देहाकडू
न। नुतन व जिवनी वाट। हिचा संस्कार त्याने आह्मासा
ठीं केला आहे॥ २१ आणि देवाच्या घरावर मोठा उपाध्या
[आह्मास आहे। २२ यास्तव] आह्मी असें शरण जावें, कीं खऱ्या
अंतःकरणासुद्धां विश्वासाच्या पूर्ण निर्धाराने। दुष्ट भावनेपासून
[सुटण्यास] अंतःकरणें शिंपडलेलीं [असावीं।] आणि निर्मळ
पाण्याने शरीर धुतलेलें [असावें॥] २३ आह्मी आशेविषयींचा
पत्करलेला पंथ अचळ असा धरावा। कां कीं ज्याने वचन
दिल्हें। तो विश्वासू [आहे॥] २४ आणि येकमेकांस प्रीतींत व
चांगल्यां कामांत चेतवायासाठीं आह्मी ध्यान लावावें। २५ आ
पलें येकत्रट मिळणें हें आह्मी, कित्येकांच्या चालिप्रमाणें सो
डीत नसावे, परंतु हितोपदेश करीत [असावे।] आणि तुह्मी
तो दिवस जेवढें जवळ येतो ह्मणोन पाहातां, तेवढे अ
धीक [करावे॥] २६ कां तर आह्मी खरेपणाची वोळख घे
तल्यावर, जर इछेने पाप करितों। तर पापांविषयीं जीव
अर्पण आणखी न राहातें। २७ परंतु न्याय ठरण्याची। आ
णि जें अग्नीरूप तप्तपण वैऱ्यांस खाईल त्याची भ
यंकर प्रकारची वाट पाहाणें [आहे॥] २८ ज्या की
णी मोशाचें नेमशास्त्र अव्हेरिलें। तो करूणां पावल्यावांचून। दो
न किंवा तीन साक्षीदारांकडून मेला। २९ [तर] ज्याने दे
वाच्या पुत्राला तुडविलें। आणि ज्या कराराच्या रक्ताक
डून आपण पवित्र मानलेला होता। त्याला सामान्य मोजिलें।
आणि कृपेच्या आत्म्याला गांजिलें, तो केवढ्या अधीक कठी
ण दंडास योग्य ठरेल। ह्मणोन तुह्मास वाटतें? ३० कां तर
ज्याने असें ह्मटलें। [कीं] प्रभू ह्मणतो। सूड देणें हें माझें। मी

फेडून देईन। तो आह्मास कळला। आणि फिरोन [त्याने ह्म
टलें।] प्रभू आपल्या लोकाचा न्याय ठरवील। ३१ जीवता
न देवाच्यां हातांत पडणें हें भयंकर [आहे ॐ] ३२ परंतु
पूर्वींचे दिवस फिरोन ध्यानांत आणा। त्यांमध्यें तुह्मी प्रकाश
मय जाल्यावर। दुःखांचें फार बळाव्यपण साहिलें। ३३ ये
क प्रकारें तर। निंदा व संकटें घालणें हीं दांखविण्याचा आ
खाडा तुह्मी जालां। आणि दुसऱ्या प्रकारें ज्यांवर असी वर्त
णूक जाली। त्यांचे सोबती [होतां॥] ३४ कारण कीं माझ्यां
बंधनांमध्येंहि तुह्मी संगतीं सोसिलें। आणि आपल्यां वस्तभा
वांचें हरण आनंदाने अंगीकारिलें। कां तुह्मी हें जाणत
होतां, कीं आपणांसाठीं आकाशांमध्यें अधीक चांगलें आ
णि टिकाऊ धन आहे। ३५ तर तुमचा भंवसा, ज्याला
मोठी फळरूपें फेड आहे। तो टाकून देऊं नका। ३६ कां त
र तुह्मास सहनतेचें अगत्य आहे। ह्मणजे तुह्मी देवाची इछा
पाळिल्यानंतर वचन फळ पावाल॥ ३७ कां कीं जो येणार। तो
कांहीं थोडक्याच वेळानंतर येईल। आणि उशीर करणार
नाहीं॥ ३८ आणि जो पुण्यवान तो विश्वासाने जगेल। परं
तु जर कोणी आड सरकेल। तर त्याविषयीं माझा जीव सं
तोष पावणार नाहीं॥ ३९ तथापि आह्मी नाशांत सरकण्यांतील
नव्हों। परंतु प्राण साधण्याच्या विश्वासांतील आहों ॐ

पर्व ११ ॥ १ विश्वास तर। आशेंतील जीं त्यांचा भंव
सा। आणि जीं कार्यें पाहिलेलीं नाहींत त्यांचें प्रमाण पटणें। असा
आहे। २ कारण कीं त्याकडून वाडवडील प्रमाणीक ठरले गे
ले ॐ ३ विश्वासाकडून आह्मी समजतों। कीं भुवनें देवाच्या सां
गण्याने निर्माण जालीं। असें कीं जीं पाहिलेलीं आहेत। तीं दि
सलेल्यांपासून न जालीं ॐ ४ विश्वासाकडून हाबेलाने काइनापे
क्षां अधीक चांगलें अर्पण देवाला वाहिलें। त्याकडून
तो पुण्यवान आहे। असें त्याविषयीं प्रमाण ठरलें गेलें। दे
वाने त्याच्यां दानांविषयीं प्रमाण दिल्हें। त्याकडूनहि तो मेल्या

नंतर बोलत जातो ※ ५ विश्वासाकडून हनोख असा पार जाला, कीं त्याला मरण लागलें नाहीं, आणि तो सांपडला नाहीं। कारण कीं देवानें त्याला पार केलें। कां तर त्याच्या पार हो ण्यापूर्वीं त्याविषयीं हें प्रमाण जालें। कीं त्यानें देवाला संतो षविलें॥ ६ आणि विश्वासावांचून [देवाला] संतोषविणें हें होतच नाहीं। कारण कीं जो देवाजवळ जातो। त्यानें असा विश्वास धरिला पाहिजे, कीं [देव] आहे, आणि जे त्याला साधायास फार झटतात। त्यांस तो फळ देणारा आहे ※ ७ विश्वासाकडून नोहानें। जीं तोंपर्यंत न पाहिलेलीं। त्यांविष यीं प्रबोध पावून [आणि] सद्भय धरून आपल्या कुटुंबाच्या तारणासाठीं पेटा मांडून सिद्ध केला। त्या [विश्वासा]कडून त्या नें जगाला अन्यायी ठरविलें। आणि विश्वासाकडून जें पुण्य त्या चा वतंदार जाला ※ ८ विश्वासाकडून आब्राहाम। जें ठिकाण आपण वतनरूप घेणार होता। त्यांत जायास बोलावला गेल्यावर, मान्य जाला। ह्मणजे आपण कोठे जातों। हें न जाणतां निघाला॥ ९ विश्वासाकडून त्यानें राहोव्यांमध्यें वस्ती करून प रदेशांत असें तसें वचनाच्या देशांत प्रवास केला। [त्याच्या] मागून इस्साक व याकोब त्याच वचनाचे सोबती वतंदार [या नी तसा प्रवास केला॥] १० कां कीं ज्या नगराला पाये आ हेत। ज्याचा योजणारा व बांधणारा देव आहे। त्याची वा ट त्यानी पाहिली ※ ११ विश्वासाकडून सारा ती देखील बीज संभवण्यासाठीं बळ पावली। आणि काळाच्या मर्यादेपलिक डे असतां। प्रसवली। कारण कीं ज्यानें वचन दिल्हें होतें, त्याला तिनें विश्वासू मोजिलें॥ १२ आणि त्याकरितां फारपणा विषयीं आकाशांतील तारांसारिखीं। आणि समुद्राच्या कांठावरी ल वाळूसारिखीं असंख्य। अशीं येकापासून। ह्मणजे तितकीं निर्जीवापासून उपजलीं॥ १३ हे सर्व विश्वासांत मेले। वचन फळें न पावले। परंतु त्यानी तीं दुरून पाहिलीं। आणि भरंवसा धरिला। आणि [तीं] आलिंगून घेतलीं, आणि असें पत्कर

लें, कीं आपण पृथ्वीवर विदेशी व प्रवासी आहों॥ १४ कारण कीं जे तसें ह्मणतात। ते कूळदेशाला मिळवायास झटतात। हें उघडें दाखवितात॥ १५ आणि ज्या [देशा]पासून ते निघाले। त्यावर जर त्यांनी चित्त राखिलें असतें। तर त्यांस माघारें फिरायाचा वेळ असता खरें॥ १६ परंतु आतां अधीक चांगला। ह्मणजे आकाशावरील। याची फार आस्था धरितात। ह्यासाठीं देव त्यांचा देव ह्मटला जाण्यास त्यांविषयीं लाजत नाहीं। कारण कीं त्याने त्यांसाठीं नगर सिद्ध केलें आहे ※ १७ आब्राहामाची परीक्षा होत असतां। त्याने विश्वासाकडून इझाक अर्पिला। ह्मणजे ज्याने वचनें अंगीकारून घेतलीं होतीं। त्याने आपला येकुलता अर्पिला। १८ त्या विषयींच असें सांगितलेलें होतें। कीं इझाकावरून तुझें बीज ह्मटलें जाईल॥ १९ तो असें मोजीत [होता।] कीं ह्याला मेलेल्यांमधूनहि उठवायास देव शक्तिमान [आहे।] आणि त्यांतून दृष्टांताने तो त्याला मिळाला ※ २० होणार जीं त्यांविषयीं इझाकाने विश्वासाकडून याकोबाला व एसावाला आशिर्वाद दिल्हा ※ २१ याकोब मरत असतां, त्याने विश्वासाकडून योसेफाच्या प्रत्येक पुत्राला आशिर्वाद दिल्हा। आणि आपल्या काठीच्या शेंड्यावर [टेंकता।] भजन केलें ※ २२ योसेफ अंतीं असून। त्याने विश्वासाकडून इस्राएली संतानांच्या निघण्याविषयीं सुचना दिल्ही। आणि आपल्या हाडांविषयीं आज्ञा केली ※ २३ मोशे जन्मलेला होऊन। तीन महिने त्याच्या आईबापाकडून विश्वासानें लपविला गेला। कारण कीं तो सुंदर बाळक असें त्यांनी पाहिलें। आणि राजाच्या नेमणुकिचें भय धरिलें नाहीं॥ २४ मोशे प्रौढ जाल्यावर। त्याने फारोच्या कन्येचा पुत्र ह्मटला जाण्यास विश्वासाकडून नकारिलें॥ २५ पापाचा उपभोग कांहीं वेळ अनुभवण्यापेक्षां। देवाच्या लोकांसहीत दुःख भोगणें हें त्याने निवडिलें॥ २६ मिसरांतील संग्रहापेक्षां ख्रीस्तसंबंधी गांजणूक ही अधीक धन

असें त्याने मोजिलें॥ क्यांकीं त्याने फळरूप फेडीपर्यंत दूर पाहिलें ※ २७ विश्वासाकडून त्याने। राज्याच्या क्रोधाला न भिऊन। मिसरास सोडिलें। कारण कीं जो अदृश्य त्याला पाहात असल्यासारिखें त्याने साहिलें॥ २८ विश्वासाकडून त्याने वल्हांडण सण व रक्त लावणें पाळिलें। असें कीं ज्याने पहिल्यां जन्मलेल्यांचा नाश केला। त्याने त्यांचीं यांस न शिवावें॥ २९ विश्वासाकडून। ते जसें कोरड्यावरून। तसें तांबड्या समुद्रांतून गेले। तोच अनुभव घ्यावयास मिसरी झटत असतां। बुडून गेले ※ ३० विश्वासाकडून यरीहोच्यां गांवकुसांभोंवतें सात दीवसपर्यंत फेरे घातल्यावर, तीं पडलीं॥ ३१ विश्वासाकडून राहाब भाडोत्रीण। त्यां टेहेल्यांस सुखरूपें अंगीकारून। अविश्वास्यांसहीत नाश न पावली ※ ३२ तर मी आणखी काय बोलुं? कारण कीं गीदोन। आणि बाराक। व शाम्शोन। व इफ्ताह। आणि दावीद। व शमुवेल, व भविष्यभाषी। यांविषयीं सविस्तर सांगायास मला वेळ खुटेल॥ ३३ ह्यानी विश्वासाकडून राज्यें जिंकिलीं। पुण्य केलें। वचनें साधिलीं। सिंहांचीं तोंडें बंद केलीं। ३४ अग्नीचें बळ विझविलें। तरवारिचीं चाभाडें टाळिलीं। ते अबळपणापासून सबळ केले गेले। युद्धांत पराक्रमी जाले। त्यानी परदेशी सैन्यांस पळविलें॥ ३५ स्त्रियांस आपले मेलेले। पुन्हा उठण्याने। मिळाले। आणि कित्येक जिवें झाडिले गेले। ह्यानी अधीक उत्तम पुनरुठणें मिळवायासाठीं। सुटका न अंगीकारिली॥ ३६ आणि दुसरे, टवाळ्यानी। व मारानी। आणखी बंधनानीहि। व बंदिशाळेने कळणा पावले॥ ३७ ते धोंडमाराने मारले गेले। करवताने चिरले गेले। कळले गेले। तरवारीच्या घाताने मेले। मेंढ्री कातडें। व बकरी कातडें पांघरून हिंडले। दुबळे। संकटमय। चासलेले असे [होते॥] २८ जग त्यांच्या योग्य नव्हतें। ते रानांमध्यें, व डोंगरांमध्यें। आणि भूमिच्या गुहांमध्यें। व दरी यांमध्यें भडकलेले होते॥ ३९ त

र हे सर्व विश्वासाकडून चांगले ठरले। त्यांस वचनफळ न मि ळालें। ४०कां। ते आमच्या वांचून पूर्ण न व्हावयास, दे वाने आह्मासाठीं कांहीं अधीक चांगलें असें पूर्वीं पाहून सि द्ध केलें होतें॥

पर्व १२॥ १ तर। आह्मास सभोंवती घातलेली सा क्षीदारांची येवढी ढगारूप दाटी आहे, यास्तव आह्मी हि। प्रत्येक वोझें व सभोंवतें सहज अडणारें पाप। हीं टा कून, आमच्या पुढें घातलेली मल्लधांव इजवरून सहनतेने धां वावें। २ आमच्या विश्वासाचा मुळकारणीक व संपविणारा येशू, याकडे लांब पाहात असतां [धांवावें।] ह्याने। आपल्या पु ढें जो आनंद ठेवलेला। त्यामुळें लाजेस निरर्थ मोजून मरण खांब साहिला। आणि देवाच्या सिंहासनांतील उजव्याकडे बसला आहे॥ ३ तर ज्याने आपणावर इतका उलटवाद पाप्यांपासून साहिला। त्याचा विचार यासाठीं सविस्तर करा। कीं तुह्मी आपल्यां जिवीं लुले होण्याने दमले न जावे॥

४ तुह्मी पापाविरुद्ध झटत असतां, अजून रक्तापावेतों अडविलें नाहीं॥ ५ आणखी जो हितोपदेश तुह्मासीं जसें पु त्रांसीं तसा संवाद करितो। तो हा, तुह्मी विसरलां। [कीं] हे माझ्या पुत्रा, तूं प्रभूची शिक्षा हलकी मानुं नको, आ णि त्याजकडून निषेधलेला असतां। विरघळुं नको। ६ कां कीं ज्यावर प्रभू प्रीति करितो, त्याला शिक्षा करितो। आणि ज्या प्रत्येक पुत्राला अंगीकारितो। त्याला फटके मारितो॥ ७ जर तुह्मी शिक्षा साहातां। तर जसें पुत्रांसीं तसें तुह्मा सीं देव वागतो। कां कीं ज्याला बाप शिक्षा करीत नाहीं। अ सा कोणता पुत्र आहे? ८ परंतु शिक्षा। जिचे वांटेकरी स र्व आहेत। तिजवांचून जर तुह्मी आहां। तर पुत्र नव्हां। परंतु जार जन्माचे आहां॥ ९ आणखी आमच्या देहाचे बाप, अ से शिक्षक तरी आह्मास जाले होते। आणि आह्मी त्यांची भीड धरिली। तर आह्मी आत्म्यांच्या बापासीं फार विशेषें आ

धीन होऊन जगावें कीं नाहीं? १० कां कीं थोडक्यां दिवसां पर्यंत, त्यांनी। आपणांस जें बरें वाटलें, त्याप्रमाणें शिक्षा दिल्ही खरें। परंतु ह्याने [आमच्या] हितासाठीं। कां। [आह्मी] त्याच्या पवित्रतेचा वांटा पावावा ह्मणोन॥ ११ कोणती शिक्षा तर सध्या आनंदकारी असें वाटत नाहीं। परंतु खेदकारी खरें। तथापि जे तिजकडून वहिवाटलेले आहेत, त्यांसीं तो मागें पुण्यकर्मरूप शांतीक फळ भरून देतो ※ १२ यास्तव लुले जालेल्यां हातांस व अबळ जालेल्यां गुडघ्यांस तुह्मी फिरोन उभारा। १३ आणि आपल्यां पायांसाठीं नीट वाटा करा। असास कीं जें लंगडें तें आड न वळावें। परंतु त्यापेक्षां बरें केलें जावें ※ १४ सर्वांसीं सुख याला तुह्मी अनुसरा। आणि पवित्रतेला[हि।] हिजवांचून कोणी प्रभूला पाहाणार नाहीं॥ १५ तुह्मी यासाठीं जपत [जा।] कीं देवाच्या कृपापावण्यापेक्षां कोणी उणें न [व्हावें।] कोणी कडुपणरूप मूळ वर रुझण्याने [तुह्मास] न खवळवावें। आणि त्याकडून बहुत विटाळले न जावे। १६ कोणी शिंदळ न [व्हावा।] किंवा एसावासारिखा कोणी भ्रष्ट [न व्हावा।] ह्याने येक जेवणासाठीं आपल्या जेष्टपणाचीं फळें जाऊं दिल्हीं। १७ तर तुह्मी जाणतां, कीं त्यानंतरच तो आशिर्वाद वतन पावायास इछीत होता। परंतु नकारला गेला। कारण कीं मन फिरविणें हें जरीं त्याने अश्रूंवांकडून फार शोधिलें। तथापि याचें ठिकाण त्याला मिळालें नाहीं ※ १८ आणखी तुह्मी ह्यांजवळ न आलां, कीं शिवंवणारा डोंगर, व जळत अग्नी, व आकाशी निबिडता, व काळोख, व वादळ, १९ व शिंगाचा नाद, व गोष्टींची असी वाणी कीं तिच्यां ऐकणाऱ्यांनी विनंती केली। कीं तें बोलणें आपणांसीं आणखी न व्हावें। २० कां तर जें नेमून घातलें। तें त्यांच्याने साहावलें नाहीं, आणि जर पशु डोंगराला शिवत असेल, तर त्याचा धोंडमार करायाचा। किंवा भालीने पार विंधायाचा [होता॥]

२१ आणि जें दिसलें। तें येवढें भयंकर जालें। कीं मो
शे बोलला। मी फार भयाभीत आणि कंपीत आहें॥ २२ प
रंतु तुह्मी सियोन डोंगराजवळ आलां आहां। आणि जि
वान देवाच्या नगराजवळ। आकाशावरील यरुशलेमाजवळ।
आणि दुतांच्या दाहा हजार संख्यांजवळ। २३ जेष्ठ जन्मा
चे ज्यांचीं नांवें आकाशांमध्यें लिहून घेतलेलीं। त्यांची सर्व
सभा ह्मणजे खोस्ती मंडळी। इच्या जवळ। आणि [जो] न्यायाधीश
सर्वांचा देव। त्याजवळ। आणि पूर्ण जालेले पुण्यवान। यां
च्यां आत्म्यांजवळ। २४ आणि नव्या कराराविषयींचा मध्यस्थ
येशू। याजवळ, आणि जें शिंपडण्याचें रक्त हाबेलाच्या
पेक्षां चांगलें बोलतें। त्याजवळ [आलां आहां ※] २५ जो
बोलतो। त्याचा अव्हेर तुह्मी न करावा ह्मणोन न्याहाळा।
कां कीं ज्यानें पृथ्वीवर प्रबोध केला। त्याला ज्यानी अव्हेरिलें।
ते जर निभवले नव्हते। तर आह्मी आकाशांतला याला अव्हे
रिल्यास, किती विशेषें [निभवणार नाहीं!] २६ त्याच्या वा
णीनें तेव्हां पृथ्वी हालविली। परंतु आंतां तो असें वचन
देतो। कीं आणखी येकदा मी केवळ पृथ्वीला नव्हे। परंतु आ
काशालाहि हालवितों॥ २७ तरि। आणखी येकदा। हें असें दा
खवितें। कीं जीं हालविलेलीं त्यांचें केलेल्यांच्या प्रमाणें ढळवि
णें, असें कीं जीं हालविलेलीं नाहींत त्यानीं राहावें॥ २८ या
स्तव आह्मी। न हालणारें राज्य पावत असतां। उपकार मा
नावा। येणेंकडून आह्मी देवाची सेवा आवडत्या प्रकारें। भि
डेनें। व सद्भावानें। करावी। २९ कारण तर हें। कीं
आमचा देव खाऊन टाकणारा अग्नी [असा आहे ※]

पर्व १३॥ १ भाऊजातिवरील प्रीति राहो॥ २ तुह्मी आ
तिथ्य करण्याची आवड विसरूं नका। कां कीं तिजकडून कित्येकानीं
दुतांचें आतिथ्य न जाणतां केलें आहे ※ ३ तुह्मी आपण
संगतीं बंद जाल्यासारिखे। बंदिवानांची आठवण करा॥ आ
पणहि शरिरांत आहां याप्रमाणें दुःखितांची [आठवण क

रा ※] ४ लग्न सर्वांशीं मान्य, आणि अंथरूण निर्मळ हें [मा
न्य असो।] परंतु शिंदळांवर व व्यभिचाऱ्यांवर देव न्याय ठ
रवील ※ ५ व्यवहार पैक्या लोभावांचून [होवो।] आपल्यां जवळ
जीं आहेत। त्यांकडून तृप्त [असा।] कां कीं त्यानें असें ह्मटलें आ
हे। [कीं] मी तुझा अव्हेर करणारच नाहीं। आणि तुला
टाकणारच नाहीं॥ ६ तर आह्मी धीट होऊन [असें] ह्मणावें।
प्रभु माझा साह्य करणारा [आहे।] आणि मनुष्य मला का
य करील, याविषयीं मी भिणार नाहीं ※ ७ जे तुमचे पुढा
री आहेत। ज्यानी देवाची गोष्ट तुह्मास सांगितली आहे।
त्यांची आठवण तुह्मी करा। त्यांच्या वर्तणुकिचा परिणाम
न्याहाळीत असतां। [त्यांच्या] विश्वासाचें अनुकरण करा॥ ८ ये
शू ख्रीस्त। काल। आणि आज। आणि सर्वकाळांपर्यंत। त
साच [आहे ※] ९ नाना प्रकारचे आणि नवल उपदेश। यां
कडून फिरविले जाऊं नका। कां कीं अंतःकरण कृपेनें स्थिरा
विलें असणें हें बरें [आहे।] खाण्यांकडून [होणें हें बरें] ना
हीं। त्यांकडून आचरणाऱ्यांस सार्थक जालें नाहीं॥ १० आ
ह्मास असें यज्ञ खंडील आहे। कीं त्यासंबंधीं खायाचा अधि
कार मंडपांतील सेवा करणाऱ्यांस नाहीं॥ ११ कां तर ज्या
पशूंचें रक्त पापासाठीं मुख्य उपाध्याकडून पवित्र स्थानांमध्यें नेलें जा
तें। त्यांचीं शरिरें गोटाच्या तळाबाहेर जाळलीं जातात॥
१२ यास्तव येशूनेंहि आपल्या रक्ताकडून लोकाला पवित्र करा
वें ह्मणोन वेसीबाहेर सोसिलें॥ १३ तर आतां आह्मी त्या
चा अपमान साहात असतां। त्याच्या जवळ गोटाच्या तळाबाहे
र जावें॥ १४ कारण कीं येथें आह्मास राहाणारें नगर
नाहीं। परंतु येक होणार। त्याला आह्मी प्रयत्नानें शोधि
तों॥ १५ त्यामुळें तर आह्मी देवाला स्तुतिरूप यज्ञ। ह्म
णजे त्याच्या नांवाला पत्करण्यानें ओंठांचें फळ। असें अखंड अ
र्पावें॥ १६ आणि सुकर्म करणें व ऐक्यरूपी देणें। हीं तुह्मी
विसरूं नका। कारण कीं असल्यां अर्पणानी देव फार संतो

होत आहे॥ १७ तुह्मी आपल्यां पुढाऱ्यांस मानून आधीन अ
सा। कां कीं झडती देणाऱ्यांसारिखे ते तुमच्यां जिवांसाठीं पा
हारा करितात॥ [तुह्मी] यासाठीं [आधीन असा।] कीं त्या
नी आनंदाने ती द्यावी। परंतु कण्हण्याने नव्हे। हें तर तुह्मा
स अनहीत [होईल ※] १८ तुह्मी आह्मासाठीं प्रार्थना क
रा। कां तर आह्मास असा भरवसा आहे। कीं सर्वांविषयीं चां
गली वर्तणूक करायास इछीत असतां।" आह्मास चांगला भा
व आहे॥ १९ आणि तुह्मी हें करावें ह्मणोन विनंती मी
विशेष आग्रहाने यासाठीं करितों। कीं तुह्माजवळ माझें मा
घारें येणें अधीकच लवकर घडावें ※

२० तर कल्याणाचा देव। ज्याने। अक्षय करारविष
यींच्या रक्ताकडून जो मेंढ्रांचा मोठा मेंढपाळ। आमचा प्रभू येशू।
त्याला मेल्ल्यांमधून माघारें आणिलें। २१ त्याने तुह्मास प्रत्ये
क चांगल्या कामासाठीं असें सिद्ध करावें। कीं तुह्मी त्याची
इछा पाळावी। आणि त्याच्या दृष्टींत जें संतोषकारी तें
त्याने तुह्मामध्यें येशू ख्रीस्तामुळें करावें॥ त्याला सदां सर्व
काळांपर्यंत गौरव [असो॥] आमेन ※

२२ तर अहो भाऊ। तुह्मी हितोपदेशाची ही गोष्ट
सोसावी ह्मणोन मी तुह्मासीं विनंती करितों। कां कीं म्या थो
डक्यानीच तुह्मास पत्र लिहिलें आहे ※ २३ तिमथ्यस भा
ऊ सोडलेला आहे, हें तुह्मी जाणा। जर तो लवकर येतो।
तर त्यासहीत मी तुह्मास पाहीन ※ २४ तुमच्यां सर्व पु
ढाऱ्यांस। आणि सर्व पवित्रांस क्षेम सांगा॥ इतालींतील जे।
ते तुह्मास क्षेम सांगतात॥ २५ तुह्मा सर्वांवर कृपा [अ
सो॥] आमेन ※

याकोबाचें पत्र ॥

पर्व १ ॥ १ दाणादाण जे बारा वंश, त्यांसीं कल्याणार्थी
देवाचा व प्रभू येशू ख्रीस्ताचा चाकर याकोब ※
२ अहो माझे भाऊ। जेव्हां तुह्मांस नाना प्रकारच्या कळणुकी
प्राप्त होतात, तेव्हां [त्या] संपूर्ण आनंद[रूप] मोजा। ३ कां।
तुह्मांस कळलें। कीं तुमच्या विश्वासाची परीक्षा सहनता घ
डविती। ४ आणि सहनतेचें काम पूर्ण होऊं द्या। ह्मणजे
तुह्मी पूर्ण व सांगोपांग व्हावें। कशांतहि उणें न [व्हावें] ह्मणोन ॥
५ आणि तुह्मामधील जर कोणी ज्ञानाविषयीं उणा आहे,
तर जो देव सर्वांस उदारपणें देतो। व टपका लावीत ना
हीं। त्यापासीं मागो। मग त्याला दिल्हें जाईल ॥ ६ परंतु वि
श्वासाने मागो। कांहीं संशय न धरो। यास्तव कीं जो संशय
धरितो। तो। समुद्राची लाट वाऱ्याने वादळलेली व हेलकावले
ली, इच्या सारिखा आहे ॥ ७ तर तो माणूस। आपणा
ला प्रभूपासून कांहीं मिळेल। असें न कल्पो ॥ ८ द्विचित्ती
माणूस आपल्यां अवघ्यां मार्गांमध्यें स्थीर नाहीं ※ ९ आ
णि जो भाऊ नीच, तो आपल्या उंचपणावि
षयीं आनंद करो। १० परंतु जो धनवान। त्याने आ
पल्या नीचपणाविषयीं [आनंदावें।] कारण कीं तो गवताच्या
फुलासारिखें जाईल। ११ कां तर सूर्य जाळण्याने उगवून गवतास
कोमविता। तेव्हां त्याचें फूल गळतें। आणि त्याच्या दिसण्या
ची शोभा नाश पावती। तसा धनवानहि आपल्यां मार्गांमध्यें
कोमून जाईल ॥ १२ दुष्टपणांकडे घातलें जाणें याविरुद्ध जो टिक

तो। तो धन्य [आहे।] कां तर परीक्षेस उतरल्यावर। जिवना
चा जो मुगूट प्रभूने आपल्यावरील प्रीती करणाऱ्यांस देऊं केला। तो
पावेल॥ १३ कोणी दुष्टपणाकडे घातलेला असतां। त्याने न म्हणा
वें। कीं मी देवाकडून घातला जातों। कां तर देव वाइटानी दुष्टप
णांत घातला जात नाहीं। आणि तो कोणालाहि दुष्टपणांत घालीत ना
हीं॥ १४ परंतु प्रत्येक। आपल्या हांवेने वोढलेला व लालचू होऊन।
दुष्टपणांत घातला जातो॥ १५ मग हांव पोटासीं असून पापास
प्रसवतो। आणि पाप समाप्त जालें असतां। मरणास उपजवि
तें ※ १६ अहो माझे प्रीय भाऊ। तुह्मी ठकूं नका। १७ प्र
त्येक उत्तम देणें व प्रत्येक पूर्ण दान वरून आहे। प्रकाशां
च्या बापापासून उतरतें। त्याला पालटणें नाहीं। आणि फि
रण्याची छाया नाहीं॥ १८ त्याने स्वबुद्धिने। खरे
पणाच्या गोष्टिकडून। आह्मास यासाठीं जन्मविलें। कीं आह्मी
त्याच्यां उत्पन्नांतील कांहीं प्रथम जालेल्यामधील अर्पण व्हावें॥
१९ यास्तव। अहो माझे प्रीय भाऊ। प्रत्येक माणूस ऐका
यास उतावळा। बोलायास सावकाश, रागास सावकाश, असा
असावा। २० कां कीं माणसाचा राग देवसंबंधी पुण्याला घडवी
त नाहीं॥ २१ यास्तव तुह्मी, सर्व मलिनपण आणि निरर्थक दु
ष्टाई टाकून। ती रोंपरूप लावलेली गोष्ट नम्रतेने बाळ
गा। ती तुमच्यां प्राणांस तारायाला शक्तिमान [आहे ※]

२२ तुह्मी गोष्टिचे पाळणारे असा। केवळ ऐकणारेच।
आपणांस भुलवितां असे [होऊं] नका॥ २३ कां कीं कोणी
जर गोष्टिचा पाळणारा नव्हे, परंतु ऐकणारा [मात्र।] तर तो।
प्रकृतिचें आपलें तोंड आरश्यांत पाहाणाऱ्या माणसासारिखा।
आहे॥ २४ कां तर तो आपणाला न्याहाळितो। मग तेथून
जातो। आणि आपण कसा होता हें तेव्हांच विसरतो॥ २५ परंतु
जो मोकळेपणाच्या पूर्ण शास्त्रांत डोकावून पाहातो। आणि त्याप्र
माणें राहातो। तोच विसरण्याचा ऐकणारा होत नाहीं। परंतु का
मा वा करणारा [होतो]। तोच आपल्या करण्यांत धन्य होईल ※

२६ आपण भक्तिशील आहें। असें जर तुह्मा मधील कोणी कल्पितो, तथापि आपल्या जिभेला वागदोराने जसें तें सें आवरीत नाहीं। परंतु आपल्या अंतःकरणाला भुलवितो। तर त्याची भक्ती व्यर्थ [आहे॥] २७ जो देव व बाप। त्याजवळ शुद्ध व निर्मळ भक्ती हीच आहे। कीं पोरटीं, व विधवा ज्या। त्यांच्या संकटांत त्यांस भेटावें। [आणि] आपणाला जगा पासून डागाविरहित राखावें॥

पर्व २ ॥ १ अहो माझे भाऊ। तुह्मी आमचा गौरवी प्रभू येशू खीस्त याचा विश्वास दर्शनी मानाने न धरितां [कीं काय?] २ कां कीं सोन्याची माणूस, ज्याच्या आंगावर शो भायमान वस्त्रें। तो जर तुमच्या सभेंत शिरतो, आणि दरि द्री, ज्याच्या आंगावर मळीन वस्त्रें। तोहि जर शिरतो। ३ आणि तुह्मी शोभायमान वस्त्र वाहाणाऱ्याला पाहून ह्मण तां। [कीं] तूं येथे उत्तम प्रकारें बैस। परंतु दरिद्र्याला ह्म णतां। [कीं] तूं तेथे उभा राहे। अथवा येथे माझ्या पा यासनाजवळ बैस। ४ तर तुह्मी आपणांमध्यें भेद करितां, आणि वाईट कल्पनांयुक्त, [असे] न्यायाधीश झालां नाहीं कीं का य? ५ अहो माझे प्रीय भाऊ। तुह्मी ऐका। दुह लोकीं द रिद्री, यानी विश्वासाने धनवान [व्हावें।] आणि जें राज्य देवाने आपल्यां प्रीति करणाऱ्यांस देऊं केलें। त्याचें वतन पावणा रे [व्हावें।] ह्मणोन त्याने त्यांस निवडिलें नव्हे कीं काय? ६ परंतु तुह्मी दरिद्र्याचा अपमान केला आहे॥ जे धनवा न ते तुह्मास बळात्काराने जाचितात कीं नाहींत? आणि ते तुह्मास न्यायस्थानांकडे वोढितात कीं नाहींत? ७ जें उत्तम नांव तुह्मावर ठेवलेलें, त्याला ते निंदितात कीं नाहींत? ८ तथापि, शास्त्र लेखाप्रमाणें राजमान्य नेमणूक। कीं तूं आ पल्यासारिखी आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर। ही जर तुह्मी पूर्ण करीत आहां, तर उत्तम करितां॥ ९ परंतु जर तु ह्मी दर्शनी मान करितां। तर पाप करितां, आणि उल्लं

गणाऱ्यांसारिखे शास्त्राकडून कुंठीत जालां आहां॥ १० कां तर जो कोणी संपूर्ण शास्त्र पाळील। केवळ येक [गोष्टि]विष यीं चुकेल, तो सर्वांविषयीं दोषी जाला आहे। ११ कां कीं ज्याने सांगितलें, [कीं] त्वां व्यभिचार न करावा, त्यानेच सांगितलें। [कीं] त्वां हत्या न करावी। आतां तूं जर व्यभिचार करीत नाहींस, परंतु हत्या करितोस, तर शास्त्राचा उल्लं घणारा जालास॥ १२ तुह्मी असें बोला आणि असें करा, कीं मोकळेपणाच्या शास्त्राकडून आपला न्याय ठरविला जाणा र आहे तसें। १३ कारण कीं ज्याने दया केली नाहीं। त्यावरचें न्याय ठरणें दयेवांचून [होईल।] परंतु न्याय ठरण्या वर दया आनंदती ※

१४ अहो माझे भाऊ। जर कोणी ह्मणतो। [कीं] आपणा ला विश्वास आहे, परंतु जर त्याला करणीं नाहींत, तर ला भ काय? विश्वास त्याला तारायास शक्तिमान आहे कीं काय? १५ आणि भाउ अथवा बहीण। हीं जर उघडीं असतील, व प्रति दिवसाच्या अन्नाविरहित असतील। १६ आणि तु ह्मामधील कोणी त्यांस बोलतो। सुखरूप जा, शेका, आ णि तृप्त व्हा। तथापि जीं शरीराला अगत्य। तीं जर तुह्मी त्यांस न देतां। तर लाभ काय? १७ तसें विश्वासालाहि जर करणीं नाहींत। तर तो निर्जीव, आपल्यासींच आहे॥ १८ प रंतु कोणी ह्मणेल। तुला विश्वास आहे, आणि मला करणीं आहेत। तूं आपला विश्वास आपल्यां करण्यांवांचून मला दा खीव। आणि मी आपला विश्वास आपल्यां करण्यांकडून तुला दाखवीन॥ १९ तूं असा विश्वास धरितोस। कीं येक देव आहे। बरें करितोस। भुतेंहि विश्वासतात, आणि कांपतात॥ २० परंतु हे हीन माणसा। करण्यांवांचून विश्वास निर्जीव आहे। हें जाणायास तूं मान्य आहेस कीं काय? २१ आ मचा पूर्वपुरुष आब्राहाम। याने आपला पुत्र इस्हा क यज्ञवेदिजावर वाहून दिल्हा। यांत तो करण्यांकडून

पुण्यवान ठरविला न गेला कीं काय? २२ त्याच्या विश्वासा
ने त्याच्यां करण्यांसहित घडविलें। आणि करण्यांकडून विश्वा
स पूर्ण जाला, असें तूं पाहातोस॥ २३ आणि हा शास्त्र
लेख पूर्ण जाला। कीं तेव्हां आब्राहामाने देवावर विश्वास ठे
विला। आणि हा त्यासीं पुण्य असें मोजला गेला। आणखी
तो देवाचा मित्र ह्मटला गेला॥ २४ यास्तव तुह्मी पाहा
तां, कीं केवळ विश्वासाकडून नव्हे। परंतु करण्यांकडून माणूस पु
ण्यवान ठरविला जातो॥ २५ आणि त्याप्रमाणेंहि भाडोत्रीण
राहाब। तिने त्यां दुतांचें आतिथ्य केलें। आणि त्यांस दु
सऱ्या वाटेने काढून दिल्हें, तेव्हां ती करण्यांकडून पुण्यवान
ठरविली न गेली कीं काय? २६ तर असें शरीर आत्म्यावां
चून निर्जीव आहे। तसा करण्यांवांचून विश्वासहि निर्जीव
आहे ※

पर्व ३ ॥ १ अहो माझे भाऊ। तुह्मी बहूत [असे] उप
देशक होऊं नका। कां हें कळलें। कीं आह्मी अधीक दंड पा
वूं॥ २ कां तर आह्मी सर्वच बहूतांविषयीं चुकतों॥ जर को
णी बोलण्याविषयीं चुकत नाहीं। तर तो पूर्ण माणूस। आपल्या
सर्व शरिरालाहि वागदोराने जसें तसें आकळायास शक्तिमा
न [आहे॥] ३ पाहा। घोड्यानीं आह्मास मानावें, ह्मणोन
आह्मी त्यांच्यां तोंडांमध्यें ओंठाळ्या घालितों। आणि त्यां
चें सर्व शरीर फिरवितों॥ ४ पाहा। तारवेंहि येवढीं मोठीं
आहेत। आणि अवघड वाऱ्यानी लोटलीं जातात। त
थापि। जेथे जेथे सुकाण्याचा छंद लागतो। तेथे तेथे
फार लाहान सुकाणाकडून फिरविलीं जातात॥ ५ तशी जीभ
हि लाहान अंग आहे। परंतु मोठ्यांविषयीं ताठा करिते॥ पा
हा। थोडका अग्नी केवढा संग्रह पेटवितो। ६ आणि जीभ।
ही अग्नी। अन्यायाचें भुवन [आहे॥] जीभ आमच्यां अंगांम
ध्यें असी ठेवली आहे। कीं ती सगळ्या शरिराला विटाळ
विती। आणि जन्माच्या फेऱ्याला पेटविती। आणि ती नरका

कडून पेटली जाते॥ ७ कां तर श्वापदांची व पांखरां
चीहि। आणि वळवळणाऱ्यांची व जळचरांची प्रत्येक जात
वश होत असते, आणि मानवी जातिकडून वश केलेली आहे।
८ परंतु माणसांच्या जिभेला वश करायास कोणी शक्तिमान ना
हीं। [ती] अनिवार दुष्ट, मरण आणणाऱ्या विषाने भरले
ली। [असी आहे॥] ९ जो देव व बाप त्याची आह्मी ति
जकडून स्तुति करितों। आणि जीं माणसें देवाच्या समानते
प्रमाणें जालेलीं, त्यांस आह्मी तिजकडून शाप देतों॥ १० त्या
च तोंडांतून आशिर्वाद व शाप निघतात॥ अहो माझे भा
ऊ, हे अगत्याने असे नसावे॥ ११ झरा येक भोंकांतून गोड
आणि कडू [पाणी] काढितो कीं काय? १२ अहो माझे
भाऊ। अंजीर झाडाने जाइताची फळें, किंवा द्राक्ष वेलाने अं
जीर फळें द्यावीं। हें घडतें कीं काय? तसे कोणीहि झऱ्याने
खारट आणि गोड पाणी द्यावें [हें घडत] नाहीं ॥ १३ तु
ह्मामध्यें ज्ञानी आणि समजीक कोण? तो आपलीं करणीं
उत्तम वर्तणुकिकडून ज्ञानाच्या लीनतेने दाखवो॥ १४ परंतु
तुह्मास आपल्या अंतःकरणांत जर कडू आवेश, आणि भांडा
ळपण आहे। तर तुह्मी खरेपणाविरुद्ध ताठा व लबाडी न
करितां कीं काय? १५ हें ज्ञान वरून उतरत नाहीं। पर
तु पृथ्वीवरलें, देहीक, भुतरूपी, असें आहे॥ १६ कां त
र जेथे आवेश। व भांडाळपण [आहे।] तेथें दंगा आणि
प्रत्येक वाईट काम [आहे॥] १७ परंतु जें ज्ञान वरून,
तें पहिलें तर निर्मळ, नंतर शांतीक, विनयी, सहज विश्वा
सणारें, दयेने व चांगल्या फळानी भरलेलें, पक्षपातावांचू
न, आणि ढोंगाविरहित, [असें] आहे॥ १८ आणखी जे
शांती करितात, त्यांच्याने पुण्याचें फळ शांतीने पेरलें जातें॥
पर्व ४ ॥ १ तुह्मामध्यें लढाया आणि झगडे, हीं को
ठून? तुमच्यां अंगांमधील लढणाऱ्या विलास वांचो। यांपासून
नाहींत कीं काय? २ तुह्मी फार इच्छितां। परंतु तुह्मास ना

हों। तुह्मी घात करितां। आणि आवेश धरितां। परंतु तु मच्याने पावत नाहीं॥ तुह्मी झगडा करितां। आणि लढतां। परंतु तुह्मास नाहीं। कारण कीं तुह्मी मागत नाहीं॥ ३ तुह्मी मागतां। परंतु तुह्मास मिळत नाहीं। कां कीं तुह्मी आपल्यां विलासांवर खर्चावयास। वाईट प्रकारें मागतां॥ ४ अहो व्यभिचारी, आणि व्यभिचारिणी। काय। हें तुह्मास न कळलें? कीं जगाशी मैत्री ही देवाचें वैर आहे॥ यास्तव जो कोणी जगाचा मित्र व्हावयास इच्छितो, तो देवाचा वैरी स्थापलेला आहे॥ ५ काय। तुह्मी कल्पितां। कीं शास्त्र लेख फुकट बोलतो? जो आत्मा आह्मामध्यें वस्ती करितो। तो हेव्यावर आस ठेवितो? ६ परंतु तो अधीक कृपा करितो। यास्तव तो ह्मणतो। [कीं] गर्विष्ठांस देव विरोधितो। परंतु नम्र जे त्यांवर तो कृपा करितो॥ ७ यास्तव देवाच्या स्वाधीन असा। द्याबलसाविरुद्ध उभे राहा। मग तो तुह्मापासून पळेल॥ ८ तुह्मी देवाजवळ जा। मग तो तुह्माजवळ येईल॥ अहो पापी। तुह्मी [आपले] हात शुद्ध करा। द्विचित्ती अहो। तुह्मी [आपलीं] अंतःकरणें सोवळीं करा॥ ९ तुह्मी आपले फार हाल जाणा। आणि शोक करा व रडा। तुमचें हांसणें शोकरूप। आणि आनंद अधोमुखरूप [असें] पालटो॥ १० प्रभूच्या पुढें तुह्मी नम्र व्हा। मग तो तुह्मास उंच करील॥ ११ अहो भाऊ। तुह्मी येकमेकांविरुद्ध बोलूं नका। जो [आपल्या] भाऊविरुद्ध बोलतो। आणि आपल्या भाऊवर न्याय ठरवितो, तो शास्त्राविरुद्ध बोलतो। आणि शास्त्रावर न्याय ठरवतो। आणि जर तूं शास्त्रावर न्याय ठरवितोस। तर शास्त्राचा पाळणारा नव्हेस। परंतु न्यायाधीश [आहेस॥] १२ येक शास्त्र देणारा आहे। तो तारायास, आणि नाश करायास शक्तिमान आहे॥ दुसऱ्यावर न्याय ठरवितोस, तूं कोण आहेस?॥

१३ आतां तुह्मी चला, जे तुह्मी ह्मणतां, [कीं] आज

किंवा उद्यां। आह्मी अमुक नगरास जाऊन। तेथें येक वर्षभ
र राहूं, आणि व्यापार करून लाभ मिळवूं। १४ ते तुह्मी
उद्यांचें, हें समजत नाहीं। कां कीं तुमचें आयुष्य कसें?
तर तें वाफ आहे। थोडाच वेळ दिसतें, आणि म
ग नाहींसें होतें॥ १५ त्यापेक्षां तुह्मी असें ह्मणावें। जर
प्रभू इछीत असेल। तर आह्मी जगूं, आणि हें किंवा तें
करूं॥ १६ परंतु आतां तुह्मी आपल्यां नावाजणुकींमध्यें ताठा
करितां। असा सर्व ताठा वाईट आहे॥ १७ तर जो चांगलें
करायास जाणतो, परंतु करीत नाहीं। त्याला पाप आहे ※

पर्व ५ ॥ १ अहो धनवान। तुह्मी आतां चला। तुमचे
जे हाल [तुह्मां]वर येणार। त्यांविषयीं तुह्मी आकांत करी
त रडा॥ २ तुमचें धन नासलें आहे। आणि तुमचीं वस्त्रें
कसरिनें खाल्लेलीं झालीं॥ ३ तुमचें सोनें, व रुपें कळंकलें आ
हे। आणि त्यांचा कळंक तुह्मावर साक्ष असी होईल। आ
णि अग्नीसारिखें तुमचीं अंगें खाईल॥ तुह्मी शेव
टील दिवसांसाठीं सांचविलें आहे॥ ४ पाहा, ज्यां कामकऱ्यानीं
तुमचीं शेतें कापिलीं आहेत। त्यांचें जें मोल तुमच्या कपटा
नें अटकलेलें, तें वोरडतें। आणि कापणाऱ्यांच्या हाका समु
दायांच्या प्रभूच्यां कानांमध्यें शिरल्या आहेत॥ ५ तुह्मी पृ
थ्वीवर खुराक खाल्ला। आणि कामातूर झालां आहां। तुह्मी
वधण्याच्या दिवसासाठीं असें आपलीं अंतःकरणें पुष्ट केलीं आहे
त॥ ६ जो न्यायी त्याला तुह्मी अन्यायी ठरविलें आहे।
घात केला आहे। तो तुह्मास अडवीत नाहीं ※

७ तर अहो भाऊ। प्रभूच्या येण्यापर्यंत तुह्मी धीर
धरा॥ पाहा, जो शेतकरी। तो भूमिच्या मोलवान फळाची वाट
पाहात असतां। पहिला आणि शेवटला पाऊस घेईपर्यंत त्या
विषयीं धीर धरितो॥ ८ तुह्मीहि धीर धरा। आपल्यां अं
तःकरणांस स्थीर करा। कारण कीं प्रभूचें येणें जवळ आहे ※
९ अहो, भाऊ। तुह्मावर अन्याय ठरविला न जावा, ह्म

णोन येकमेकांवर कण्हूं नका। पाहीं, न्यायाधीश दरवाज्यांपु ढे उभा राहातो॥ १० अहो माझे भाऊ। जे भविष्यभा षी प्रभूच्या नांवाने बोलले आहेत। त्यांस वाइटांच्या सोस ण्याविषयीं आणि धिराविषयीं उदाहरण[रूपें] तुह्मी घ्या॥ ११ पाहा, जे साहातात ते धन्य, असें आह्मी ह्मणतों॥ तुह्मी ईयोबाच्या सहनतेविषयीं ऐकिलें आहे। आणि प्रभूक डून परिणाम हा पाहिला आहे। कीं प्रभू फार कनवाळू आ णि करुणावंत आहे ॐ

१२ आणि, अहो माझे भाऊ। अवघ्यांपेक्षां। तुह्मी शपथ करूं नका। आकाशाची। किंवा पृथ्वीची। किंवा कोण तीहि दुसरी शपथ नका। परंतु। तुह्मी दंडांत न पडावें ह्मणोन। तुमचें होय। तें होय। आणि नाहीं। तें नाहीं असो ॐ

१३ तुह्मामध्यें कोणी दुःख सोसितो कीं काय? तो प्रार्थ ना करो॥ कोणी हर्षित आहे कीं काय? तो गीत गावो॥ १४ तुह्मामध्यें कोणी रोगी आहे कीं काय? तो मंडळीं तील वडिलांस बोलावो। आणि ते प्रभूच्या नांवाने त्याला तेल ला वून। त्याजविषयीं प्रार्थना करोत॥ १५ मग विश्वासी प्रार्थ ना रोग्याला तारील। आणि प्रभू त्याला उठवील। आण खी जरीं त्याने पापें केलीं असतील। तरीं तीं त्याला क्षमा होतील॥ १६ तुह्मी निरोगी केले जावे। ह्मणोन [आपलीं] पा तकें येकमेकांजवळ पत्करा। आणि येकमेकांसाठीं प्रार्थना करा॥ पुण्यवानाची अंतर बळें घडलेली प्रार्थना फार सार्थक करिती॥ १७ एलीया आह्मासारिखा चेतनी माणूस होता। परंतु त्याने प्रार्थनेंत विनंती केली, कीं पाऊस न पडावा। आणि तीन वर्षें साहा मासपर्यंत पाऊस भूमिवर पडला नाहीं॥ १८ म ग त्याने फिरोन प्रार्थना केली। आणि आकाशाने पाऊस दि ला। आणि भूमिने आपलें फळ उपजविलें ॐ १९ अहो भाऊ। तुह्मामधील कोणी जर सत्यतेपासून भुलला जातो। आणि कोणी त्याला माघारें फिरवितो। २० तर तो हें जाणो।

कीं जो पाप्याला त्याच्या वाटेच्या भुलिपासून माघारें फिरवि
तो, तो प्राण्याला मरणापासून तारील। आणि पापांच्या समुदा
याला झांकील ⁂

पेत्रसाचें पहिलें पत्र ॥

पर्व १ ॥ १, २ पन्तस, गालाती। काप्पाद्की, आशी,
व बिथुनी; यांत दाणोदाण दशेंतील प्रवासी। [जे] देव बा
पाच्या पूर्व जाणण्याप्रमाणें। आत्म्याच्या पवित्र करण्याकडून।
मानण्यासाठीं आणि येशू खीस्ताचें रक्त शिंपडण्यासाठीं निवड
लेले। त्यांसीं पेत्रस। येशू खीस्ताचा प्रेषीत [लिहितो ॥]
तुह्मासीं कृपा व कल्याण। हीं फार वाढविलीं जावीं ⁂
३ जो देव व आमच्या प्रभू येशू खीस्ताचा बाप। तो
स्तुतिमान्य। त्याने आपल्या फार दयेप्रमाणें। आह्मास। मेले
ल्यांमधून येशू खीस्ताच्या पुनरुठण्याकडून। सजीव आशा प्राप्त हो
ण्यासाठीं। फिरोन जन्मविलें आहे। ४ अविनाशी। व निर्मळ।
व न कोमणारें वतन। तुह्मासाठीं आकाशांमध्यें राखलेलें, तें प्रा
प्त होण्यासाठीं [जन्मविलें ॥] ५ विश्वासाकडून ते तुह्मी देवाच्या
शक्तीने तारण पावण्यासाठीं राखलेले आहां। हें शेवटल्या वेळेस प्रग
ट होण्यास सिद्ध [आहे ॥] ६ त्यावरून तुह्मी फार हर्ष करि
तां। केवळ आतां थोडा वेळ बहूत कळणुकींमुळें, जर अगत्य
आहे। तर तुह्मी दुःखीत आहां। ७ [त्या] साठीं, कीं
तुमच्या विश्वासाची परीक्षा। जो, अग्नीकडून परीक्षापटीत
सोनें नाश पावतें। याच्या पेक्षां फार मोलाविषयीं [आहे।]
तो। येशू खीस्ताच्या प्रगटण्याच्या वेळेस। स्तुति व मान व
गौरव। ह्यां रूपानी सांपडावी ॥ ८ त्याला पाहात नसतां। तु

ह्मी त्यावर प्रीति करितां। आतां तुमची दृष्टी त्यावर ना
हीं। परंतु विश्वास ठेवीत असतां। तुह्मी। न बोलवणारा व गौ
रवयुक्त आनंद, याकडून हर्ष करितां। ९ कां। तुह्मी आ
पल्या विश्वासाचा परिणाम [ह्मणजे] जिवांचें तारण साधीत
आहां॥ १० ज्या भविष्यभाष्यांनी तुह्मावरल्या कृपेविर्षयीं भवि
ष्य गोष्ट सांगितली आहे, त्यांनी त्या तारणाविषयीं फार
प्रयत्न केले। आणि फार शोधिलें आहे। ११ खीस्ताचा आत्मा जो
त्यांमध्यें [होता।] त्यानें। खीस्तासाठीं जीं सोसणीं आणि त्यां
नंतर जीं गौरवें त्यांविषयींच ही साक्ष पूर्वीं देत असतां। कोण
ता किंवा कसा समय दाखविला त्याविषयीं ते शोधीत [होते॥]
१२ त्यांस असें प्रगट केलें गेलें। कीं त्यांनी आपणांसाठीं न
व्हे। परंतु आह्मासाठीं त्याविषयीं सेवा केली। [ह्मणजे] आका
शांतून पवित्र आत्मा पाठविलेल्यानें तुह्मास सुवर्तमान सां
गणाऱ्यांकडून जीं तुह्मासीं आतां सविस्तर सांगितलेलीं आहे
त, त्यांविषयीं। त्यांवर लवून न्याहाळणें यांत दुतांची फा
र इच्छा आहे ※

१३ यास्तव तुह्मी आपल्या वुद्धिच्या कंबरांस बांधून।
सावध असतां। येशू खीस्ताच्या प्रगटण्यानें जी कृपा तुह्माव
र प्राप्त होणार। तिजवर पुर्णपणपर्यंत आशा ठेवा॥ १४ तु
ह्मी मान्यपणयुक्त लेंकरांसारिखें [असा।] आपल्या पूर्व अज्ञान
पणांतील हावांच्या संगतीचा प्रकार धरूं नका॥ १५ परंतु
ज्यानें तुह्मास बोलाविलें। तो पवित्र [आहे।] त्याप्रमाणें तु
ह्मीहि सर्व वर्तणुकींत पवित्र व्हावें। १६ कां तर [असें] लि
हिलें आहे। [कीं] मी पवित्र आहे, यास्तव तुह्मी पवि
त्र व्हा॥ १७ आणि। जो वाप पक्षपातावांचून प्रत्येकाच्या
कामाप्रमाणें न्याय ठरवितो। त्याचें नांव जर तुह्मी घेतां। त
र आपल्या प्रवासाच्या काळीं भयानें वर्तणूक करा। १८ कां।
हें तुह्मास कळलें। कीं तुह्मी आपली जी व्यर्थ वर्तणूक वडि
लांच्या परंपरां चालीची। तिजपासून। नाशवंत वस्तूनी। सोन्या

मे किंवा रूप्याने। खंडून घेतले न गेलां। १९ परंतु निर्ठिपका
व निर्मळ लाहान मेंढा। याच्या [रक्ताने] जसें। तसें ख्रीस्ताच्या
मोलवान रक्ताकडून। २० तो अगोधर, सृष्टी मांडल्यापूर्वीं
जाणलेला खरें। परंतु तुह्मासाठीं ह्या शेवटल्यां काळांमध्यें
प्रगट झाला॥ २१ ते तुह्मी त्याच्या योगाने देवावर विश्वा
सला। ह्याने त्याला मेलेल्यांमधून उठविलें। आणि त्याला असें
गौरव दिल्हें। कीं तुमचा विश्वास। व आशा देवावर व्हावी॥
२२ तुह्मी भाऊजातिवरील निष्कपटी प्रीतिसाठीं। आत्म्याकडून
खरेपण पाळण्याने। आपले प्राण पवित्र केले असतां। येकमे
कांवर शुद्ध मनाने अखंड प्रीति करा॥ २३ कां। तुह्मी ना
शवंत बिजापासून नव्हे। परंतु अविनाशी यापासून। देवाच्या
जिवंत व सर्वकाळापर्यंत राहाणाच्या गोष्टिकडून फिरोन जन्म
विलेले आहां। २४ कां कीं अवघी मास जात गवतासारि
खी। आणि माणसाचें सर्व गौरव गवताच्या फुलासारिखें [आ
हे॥] गवत वाळतें। आणि त्याचें फूल गळतें। २५ परंतु
प्रभूचा शब्द सर्वकाळापर्यंत राहातो। आणि जो शब्द सुवर्त
मानांत तुह्माजवळ सांगितला आहे। तो तोच आहे ※

पर्व २ ॥ १ यास्तव अवघी दुष्टाई आणि अवघें कपट।
व ढोंगें। व द्वेषांचे प्रकार। आणि अवघीं वाईट बोलणीं। हीं
दूर करून। २ नवें जन्मलेल्यां बाळकांसारिखे तुह्मी गोष्टरू
पी निर्दुधाची फार इछा धरा। ह्मणजे त्याकडून तुह्मी वा
ढावें। ३ जर तुह्मी असें चाखलें। कीं प्रभू कृपाळू। तरच
[तसें होईल॥] ४ तो जिवंत धोंडा। माणसांकडून नकारले
ला खरें। परंतु देवाजवळ निवडलेला। मोलवान। त्याजवळ
तुह्मी येऊन। ५ आपणहि जिवंत धोंड्यांसारिखे रचिले जा
तां। [तुह्मी] आत्मावान मंदिर। [जों] जिव अर्पणें येशू ख्री
स्ताकडून देवाला फार आवडोत। तीं वाहायास पवित्र उपाध्य
जात [जालां आहां॥] ६ यास्तव शास्त्रलेखाच्या आंत हें आ
हे। [कीं] पाहा। कोंपऱ्याचा श्रेष्ठ धोंडा। निवडलेला। मोल

वान। असा मी सीयोनांत ठेवितों। आणि जो त्याजवर वि
श्वास ठेवितो। तो लाजणारच नाहीं॥ ७ तर जे विश्वासता
त त्यां तुह्मासीं तें मोल [आहे॥] परंतु जे मानीत नाहीं
त। त्यांसीं [असें आहे।] जो धोंडा बांधणाऱ्यांनी नकारि
ला। तोच कोंपऱ्याचा मस्तक जाला। ८ आणि ठेंचण्याचा
धोंडा व अडखळण्याचा खडक [आहे॥] ते मानीत नसतां,
गोष्टिविषयीं ठेंचितात। आणि ह्यासाठीं ते नेमले होते॥ ९ प
रंतु तुह्मी निवडलेला वंश, राजरूप उपाध्यजात, पवित्र
राष्ट्र। मोलानें मिळविलेली प्रजा असे आहां। ह्मणजे ज्या
नें तुह्मास अंधारांतून आपल्या आश्चर्यवान उजेडांत बोलावि
लें आहे। त्याचे सुगूण तुह्मी प्रगट सांगावे॥ १० ते [तु
ह्मी] पूर्वी प्रजा [नव्हतां।] परंतु आतां देवाची प्रजा [आ
हां।] दया पावलां नव्हतां। परंतु आतां दया पावलां
आहां ※

११ अहो प्रिय। मी [तुह्मा]जवळ विनंती करितों,
कीं तुह्मी विदेशी व प्रवासी यांसारिखें देहीक वांसनांपासून
दूर व्हावें। प्राणावर त्या लढतात॥ १२ राष्ट्रांमध्यें, तुह्मी
आपली वर्तणूक चांगली राखीत [जा।] ह्यासाठीं कीं ज्यांत ते
जसें वाईट करणाऱ्यांवर तसें तुह्मावर वाईट बोलतात, त्यां
त त्यांनी तुमचीं चांगलीं करणीं पाहून त्यांवरून। भेट घेण्या
च्या दिवसीं देवाचें गौरव करावें ※ १३ तर तुह्मी प्रत्येक
मानवी उत्पन्नासीं प्रभूसाठीं आधीन व्हा। जर राजा। तर ज
सें श्रेष्ठासीं तसें त्यासीं। १४ किंवा जर सुभेदार [आहे
त।] तर वाईट करणाऱ्यांच्या न्यायी दंडासाठीं खरें, परंतु
चांगलें करणाऱ्यांच्या स्तुतिसाठीं त्याकडून पाठविलेले, तसें त्यां
सीं॥ १५ कां तर देवाची इछा असी आहे, [कीं] तुह्मी
चांगलें करण्यानें अज्ञानी माणसांच्या अजाणपणाला कुंठीत करा
वें॥ १६ स्वतंत्रांसारिखे [तुह्मी असा।] तथापि दुष्टपणा
च्या झांकणासाठीं स्वतंत्रता धरिल्यासारिखें नको। परंतु दे

वाचे चाकर असे [व्हा ॥] १७ तुह्मी अवघ्यांचा मान राखा। भाऊजातिवर प्रीति करा। देवाचें भय धरा। राजाचा मान राखा ❀

१८ अहो घराचे चाकर। अवघ्या भिडेने [आपल्यां] धन्यांशीं राजी [असा।] जे उत्तम व विनयी त्यांसीं केवळ न व्हे। परंतु वावग्यांसींहि। १९ कां कीं जर कोणी देवाविषयींच्या भावामुळें दुःखें साहातो। तर हें सद्गूण [आहे। ह्मणजे] निरपराधें सोसिल्यास। २० कां कीं पाप केल्यास आणि बुक्के मार लागल्यास जर तुह्मी साहातां, तर काय कीर्ति? परंतु तुह्मी चांगलें केल्यावर दुःख भोगतांना जर साहातां। तर हें देवाजवळ सद्गूण [आहे ॥] २१ कारण कीं ह्याकरितां तुह्मी बोलावलेले आहां। कां तर ख्रीस्तानेहि आह्मासाटीं सोसून। आह्मासीं कित्ता मागें ठेविला आहे। ह्मणजे तुह्मी त्याच्यां पाउलांवरून अनुसरावें॥ २२ त्याने पाप केलें नाहीं। आणि त्याच्या मुखांत कपट सांपडलें नाहीं॥ २३ त्याने। गांजलेला असून, गांजण्याने फेडिलें नाहीं। सोसित असतां। त्याने धमकाविलें नाहीं। परंतु जो यथार्थ न्याय ठरवितो, त्याच्या जवळ [आपणाला] सोपिलें॥ २४ त्याने स्वतां झाडावर आपल्या शरिरीं आमचीं पापें घेऊन साहिलीं। ह्मणजे आह्मी पापांविषयीं गमावले होऊन पुण्यरूपें जगावें। त्यावरच्या माराने तुह्मी निरोगी जालां॥ २५ कां तर तुह्मी मोकार गेलेल्यां मेंढ्यांसारिखे होतां। परंतु आतां तुमच्यां प्राणांचा मेंढपाळ व जपणारा। याकडे माघारें फिरविलेले आहां ❀

पर्व ३ ॥ १ त्याप्रमाणें। अहो स्त्रिया। तुह्मी आपल्यां नवऱ्यांच्या स्वाधीन असन [जा।] यासाठीं। कीं जर कोणी गोष्टिला मानीत नाहींत। तर ते। गोष्टिवांचून। स्त्रियांच्या वर्तणुकिकडूनच मिळविले जावे। २ त्यानी तुमची भिडेंतली निर्मळ वर्तणूक पाहिल्याकडून॥ ३ त्यां तुमची शोभाही केसांचें गुं

फणें। व सोन्याचीं आं तीं आंगीं घालणें। किंवा वस्त्रें पांघरणें, अशी बाहेरली नसो। ४ परंतु हृदयांतील गुप्त मनुष्यपण [शोभायमान व्हावें।] जें अविनाशी तेणेकडून। लीन आणि निवांत स्वभाव। जो देवाच्या दृष्टीस फार मोलवान आहे, त्यानें शोभा व्हावी॥] ५ कीं तर तसें पूर्वीं ज्या पवित्र स्त्रियांनी देवावर आशा ठेविली, त्यानीहि आपल्यां नवऱ्यांच्या स्वाधीन असण्यानें। आपणांस शोभविलें॥ ६ तसें सारेनें आब्राहामाला मानून, त्याला धनी ह्मटलें॥ तुह्मी चांगलें केल्यास, आणि कांहीं दचकण्यानें भीत नसल्यास, तिची लेकरें जालां आहां ※ ७ अहो नवरे। तुह्मी त्याप्रमाणें त्यांच्या संगतीं जाणतपणानें राहात [जा।] स्त्रीपात्र अधीक निर्बळ मर्यादा खर्चून त्याला देत [जा।] आणि तुह्मी जीवनी कृपेचे संगती वतंदार। यासारिखें [करा।] ह्मणजे तुमच्या प्रार्थना अडविल्या न जाव्या ※

८ तर शेवटीं। तुह्मी सर्व सारिखे चित्ती। संगतीं सोसणारे। भाऊंवर प्रीति करणारे। कळवळणारे। मित्रबुद्धिचे असे [व्हा॥] ९ वाइटासाठीं वाईट। किंवा निंदेसाठीं निंदा असें फेडूं नका। परंतु उलट्या प्रकारें, आशिर्वाद द्या। द्या। हें तुह्मास कळलें। कीं तुह्मी ह्यासाठीं बोलावले गेलां। ह्मणजे तुह्मी आशिर्वाद वतन पावावें॥ १० कीं तर। जो आयुष्याची आवड धरायास। आणि चांगले दिवस पाहायास इछितो। तो वाइटापासून आपल्या जिभेला आटपो, आणि आपल्यां ओंठांसहि। असें कीं त्यानी कपट न बोलावें। ११ तो वाइटापासून वळो। आणि चांगलें करो। तो शांती साधायास झटो। आणि तिच्या मागें लागो॥ १२ कारण कीं पुण्यवानांवर प्रभूच्या दृष्टी [आहेत।] आणि ह्याचे कान त्यांच्या प्रार्थनेकडे [आहेत।] परंतु वाइटपणें करणारे यांच्या विरुद्ध प्रभूचें तोंड [आहे॥] १३ मग। जर तुह्मी चांगल्याचें अनुकरण करणारे जालां। तर तुमचा वाईट करणारा। असा की

ण? १४ आणखी। जरीं तुह्मी पुण्यामुळें सोशितांच। तरीं धन्य [आहां ॥] तर तुह्मी त्यांच्या भयाला भिऊं नका। आणि घाबरूं नका॥ १५ परंतु प्रभू जो देव त्याला आपल्यां अंतःकरणानी पवित्र माना। आणि तुह्मामध्यें जी आशा। तिजविषयींचें कारण जो प्रत्येक पुसतो। त्यासीं लिनतेने व भयाने तोंड सांगण्यास सर्वदां सिद्ध [असा ॥] १६ चांगला भाव राखीत [जा।] ह्मणजे, ख्रीस्ताकडील तुमच्या चांगल्या वर्तणूकिला जे अपवादितात। ते ज्याविषयीं वाईट करणाऱ्यांस जसें। तसें तुह्मास निंदितात, त्याविषयीं त्यानी लाजावें॥ १७ कां कीं तुह्मी सोसावें असें जर देवाची इच्छा येजिती। तर वाईट केल्याने यापेक्षां चांगलें केल्याने [सोसावें।] हें अधीक बरें। १८ कां तर ख्रीस्तानेहि येकदाच। पुण्यवानाने अन्याय्यांसाठीं [असें] पाप्यांसाठीं सोसिलें आहे। हेतु हा। कीं त्याने आह्मास देवाजवळ पोंहचवावें। तो देहाविषयीं जिवें मारला [गेला।] परंतु आत्याकडून जिवंत केला [गेला।] १९, २० त्याकडूनहि त्याने जाऊन बंदिशाळेंतील न मानणाऱ्यां आत्यांसीं गाजविलें। पूर्वीं। नोहाच्यां दिवसांत जेव्हां देवाचा धीर येकच वेळ वाट पाहात होता। [आणि] पेटारूप तारूं सिद्ध होत [होतें] तेव्हां। त्यांत थोडके ह्मणजे आठ प्राणी पाण्याकडून पार तारले गेले॥ २१ त्याच्या प्रतिरूपें बाप्तीस्माहि आतां आह्मास तारितो। हा। देहाचा मळ दूर करणें असा नव्हे। परंतु देवाजवळ चांगला भाव असा ह्मणविणें। [हें] येशू ख्रीस्ताच्या पुनरुठण्यावरून [आहे॥] २२ तो आकाशांत जाऊन देवाच्या उजव्याकडे आहे। जे दूत। व जे अधिकार। व जे पराक्रम। ते त्याच्या स्वाधीन ठेवलेले [आहेत ※]

पर्व ४॥ १ तर। ख्रीस्ताने देहांत आह्माकरितां सोसिलें असतां। तुह्मीहि त्याच मनाने हातेर बांधलेले असा। कारण कीं ज्याने देहांत सोसिलें। तो पापापासून निवांत जाला आहे। २ ह्मणजे त्याने तेव्हांपासून देहांतील उरलेल्या काळीं मा

णसांच्या हांवानी नव्हे। परंतु देवाच्या इछेने जगावें॥ ३ कां तर परप्रजांची इछा वर्तून करायास आयुष्याचा गेलेला काळ आह्मास पुरे। आह्मी कामातुरपणें। हांवां। मद्यताप। खाणारे घोळके। पिणारे घोळके। आणि शास्त्रभंगीत मूर्तिची सेवा। यांकडून चाललों॥ ४ त्याविषयीं तुह्मी वेगाने जाऊन त्याच नाशाञ्याच्या सांचण्यांत मिळत नाहीं। हें त्यांस नवल वाटतें। [आणि] ते निंदितात। ५ [परंतु।] जो जिवंतांचा आणि मेलेल्यांचा न्याय ठरवायास सिद्धतेने राहातो, त्याला झडती देतील॥ ६ कां तर मेलेल्यांपहि यासाठीं सुवर्तमान सांगितलें गेलें होतें। कीं देहाविषयीं त्यांवर न्याय माणसांच्या प्रमाणें ठरविला जावा खरें, परंतु आत्म्याविषयीं त्यानी देवाच्या प्रमाणें जगावें ※

७ परंतु सर्वांचा शेवट जवळ आला आहे। यास्तव तुह्मी शुद्धिवर असा, आणि प्रार्थनांसाठीं सावध असा॥ ८ आणि अवघ्यांपेक्षां। तुह्मी येकमेकांवर बळकट प्रीति राखीत [जा।] कां कीं प्रीति पापांच्या भरपुराला झांकील॥ ९ कुरकुरण्यांवांचून तुह्मी येकमेकांविषयीं आतिथ्य प्रीय [असा॥] १० [तुह्मामधील] प्रत्येकाला जसें कृपारूप दान मिळालें आहे। तसें, देवाच्या अनेकप्रकारच्या कृपेच्या चांगल्या कारभाऱ्यांसारिखे तुह्मी तें येकमेकांस सेवेने फळवा॥ ११ जर कोणी बोलतो। तर देवाच्यां वाण्यांसारिखें [बोलो।] जर कोणी सेवा करितो। तर देव त्याला जी शक्ती पुरवितो। तिजकडून यासारिखें [करो।] ह्मणजे देव अवघ्यानी येशू ख्रीस्ताकडून गौरविला जावा। सदां सर्वकाळांपर्यंत गौरव व सत्ता त्याची आहे॥ आमेन ※

१२ अहो प्रीय। जें जाळणें तुमच्या परीक्षेसाठीं तुह्मास प्राप्त झालें, त्याविषयीं। तुह्मास अपूर्व लागल्यासारिखें। तुह्मी नवल मानुं नका। १३ परंतु ख्रीस्ताच्यां सोसण्यांचे वांटेकरी जालां। यावरून आनंदीत असा। ह्मणजे त्याच्या गौ

रवाच्या प्रगटण्यांत तुह्मी फार उडण्याने आनंद करावा॥
१४ जर तुह्मी ख्रीस्ताच्या नांवासाठीं गांजलें जातां, तर तु
ह्मी धन्य [आहां।] कां तर गौरवाचा आणि देवाचा आत्मा
तुह्मावर असतो॥ तो त्यांकडून निंदला जातो खरें। परंतु तु
ह्माकडून गौरविला जातो॥ १५ तर घातक। किंवा चोर। किं
वा कुकर्मी असा। अथवा चवढाळ असा। तुह्मामधील कोणी
न सोसो॥ १६ परंतु [कोणी] जर ख्रीस्ती असा [सोसितो।]
तर न लाजो। परंतु त्यामुळें देवाचें गौरव करो॥ १७ कां
तर दंडाचा प्रारंभ देवाच्या घरीं व्हावा। असी वेळ [आहे।]
आणि जर तो प्रथम आह्मासीं [होतो।] तर जे देवाच्या सु
वर्तमानाला मानीत नाहींत। त्यांसीं शेवट काय [होईल!]
१८ आणि जर पुण्यवान कष्टाने तारला जातो। तर जो अ
भक्त व पापी। तो कोठे प्रगटेल! १९ यास्तव जे देवाच्या
इच्छेप्रमाणें सोसितच आहेत। ते आपले प्राण देवासीं। जसें
विश्वासू उत्पन्नकरणाऱ्यासीं तसें चांगलें करण्यांत ठेवोत ※

पर्व ५॥ १ तुह्मामध्यें जे वडील त्यांसीं मी विनंती क
रितों। तो मी सोबती वडील। व ख्रीस्ताच्या सोसण्यांचा सा
क्षी, व जें गौरव प्रगट होणार। त्याचा वांटेकरी [आहें।]
२ तुह्मापासीं जो देवाचा कळप। त्याचें पाळण करा। जपणें
काम अगत्यामुळें नव्हे, परंतु स्वभावें करीत [जा।] लाज
विणाऱ्या लाभासाठींहि नव्हे। परंतु सिद्ध चित्ताने करा। ३ आ
णि वतनांवर धनीपण करीत। असें नव्हे। परंतु तुह्मी कळ
पाचे कित्ते व्हा॥ ४ मग मुख्य मेंढपाळ प्रगटल्यावर। तुह्मी
गौरवाचा न कोमणारा मुगूट पावाल॥ ५ त्याप्रमाणें, असो
नवे तरणे। तुह्मी वडिलांच्या स्वाधीन असा। आणि तुह्मी
सर्व येकमेकांच्या स्वाधीन असतां। नम्र स्वभाव ल्यालेले असा।
कां कीं गर्विष्ठांस देव विरोधितो। परंतु नम्र जे। त्यांवर कृ
पा करितो॥ ६ यासाठीं देवाने तुह्मास प्रसंगीं उंचवावें। ह्मा
णोन तुह्मी त्याच्या पराक्रमी हाताखालीं नम्र व्हा॥ ७ तुम

घो सर्व चिंता त्याजवर टाका। कां तर तो तुह्माविषयीं
काळजी करितो॥ ८ तुह्मी सावध असा। पाहारा करा।
कारण कीं तुमचा जो प्रतिपक्षी द्यावलस तो। गर्जत सिंहासा
रिखा, कोणाला गिळावें ह्मणोन शोधीत फिरतो। ९ त्यावि
रुद्ध तुह्मी उभे राहा। विश्वासांत स्थीर [असा।] कां। हें तु
ह्मास कळलें। कीं ह्या लोकीं [जी] तुमची भाऊजात। ति
जवर सोसण्यांचे तेच [प्रकार] पूर्ण होतात॥ १० परंतु स
र्व कृपायुक्त देव। ज्याने आपल्या सर्वकाळच्या गौरवांत आह्मा
स ख्रीस्त येशूकडून बोलाविलें, तो स्वतां। तुह्मी थोडें सोस
ल्यानंतर, तुह्मास सिद्ध करो। स्थीर करो। बळकट करो।
[जो] पाया त्यावर स्थापो॥ ११ त्यासीं गौरव, व पराक्रम
सदां सर्वकाळांपर्यंत [असो॥] आमेन ※

१२ सिलवानस जो विश्वासू भाउ। असें मी मोजितों।
त्याजकडून म्या तुह्मासीं थोडक्याने पत्र लिहून। विनंती के
ली। व आणीक [असें] प्रमाण दिल्हें आहे। कीं ज्या कृपें
त तुह्मी उभे राहातां, ती देवाची खरी [कृपा] आहे ※
१३ बाबेलांतील संगतीं निवडलेली [मंडळी।] आणि माझा
पुत्र मार्कस, हे तुह्मास क्षेम मागतात॥ १४ तुह्मी परस्प
रांस प्रीतिच्या चुंबनाने क्षेम करा॥ जे ख्रीस्त येशूकडील।
त्यां तुह्मा सर्वांचें कल्याण [असो॥] आमेन ※

पेत्रसाचें दुसरें पत्र ॥

पर्व १ ॥ १ जो आमचा देव व तारणारा येशू ख्रीस्त।
याच्या पुण्याकडून जे आमचा यासमान मोलाचा विश्वास पाव
ले आहेत, त्यांसीं येशू ख्रीस्ताचा चाकर व प्रेषीत शिमोन
पेत्रस [लिहितो ※]

२ जो देव व येशू आमचा प्रभू, याच्या वोळखिकडून
तुह्मांसीं कृपा व कल्याण, हीं फार वाढविलीं जावीं । ३ कां,
त्याप्रमाणें त्याच्या देवरूपी सामर्थ्याने जीवनाविषयींचीं व सुभक्ती
विषयींचीं अवघीं आह्मास दिल्हीं । ज्याने आह्मास गौरव व
सत्व धावण्यासठीं बोलविलें, त्याच्या वोळखिकडून [दिल्हीं ॥]
४ ह्यांमुळें त्याने आह्मास अत्यंत मोठीं व मोलवान वचनें
दिल्हीं आहेत । हेतु हा, कीं त्यांकडून तुह्मी, जगांतलें हीं
वांकडोल नास्कं यापासून पळून, देवरूपी स्वभाव याचे विभा
गी व्हावें ॥ ५ आणि याच हेतुनेंहि तुह्मी सर्व नेट लावून आ
पल्या विश्वासासीं सत्व, आणि सत्वासीं जाणणें, ६ आणि
जाणण्यासीं इंद्रिय दमन, आणि इंद्रिय दमनासीं सहनता, आ
णि सहनतेसीं सुभक्ती, ७ आणि सुभक्तीसीं भाऊ मैत्री, आ
णि भाऊ मैत्रीसीं प्रीति, असीं जोडून द्या ॥ ८ कां कीं हीं
तुह्मास असल्यास, आणि वाढत असल्यास, आमचा प्रभू ये
शू ख्रीस्त याच्या वोळखींत आळसी नाहीं, आणि निष्फळ ना
हीं, [असें] तुह्मास करितील ॥ ९ आणखी ज्याला हीं नाहीं
त, तो आंधळा आहे । डोळे मिटतो, [आणि] आपल्यां पूर्वीं
च्यां पापांपासून शुद्ध होण्याचा विसर धरितो ॥ १० यास्तव,
अहो भाऊ, विशेषेंकरून, तुह्मास बोलावणें व निवडणें, जा
लें हें खचीत करण्यासाठीं, लगट करा । कां तर तुह्मी हीं
केल्याने कधीं फसणारच नाहीं । ११ आणखी तसें, आमचा
प्रभू व तारणारा येशू ख्रीस्त याच्या अक्षयी राज्यांत प्रवेश,
हा धनवानरूपें तुह्मास सादर केला जाईल ॥ १२ यास्तव,
जरीं तुह्मी हीं जाणलेलीं [आहेत,] आणि चालत्या सिद्धां
तामध्यें स्थीर जालेले [आहां,] तथापि ह्यांविषयीं तुह्मास सर्व
दां आठवण देण्यास मी निष्काळजी होणार नाहीं ॥ १३ आ
णि जोंपर्यंत मी ह्या राहोटींत आहें, तोंपर्यंत सुचविण्याने
तुह्मास जागवून उठवायास मला नितिरूप वाटतें ॥ १४ कां
हें मला कळलें, कीं जसें आमच्या प्रभू येशू ख्रीस्तानेंहि मला दाख

विशें। तसें माझी झोंपडी लवकर घालवायाची आहे॥ १५ आ-
णखी हितन माझ्या निघण्यानंतर ह्याचीं आठवण करायाचें
[कांहीं] तुह्मास व्हावें। ह्मणोन मी नित्य झटेन॥ १६ कां
तर आह्मी। चातुर्याने कल्पिलेल्या काहाण्या अनुसरल्याने।
तुह्मास आमच्या प्रभू येशू ख्रीस्ताचा पराक्रम। व प्रत्यक्षता क
ळविलीं असें नव्हें। परंतु आह्मी त्याच्या मोठेपणाचे प्रत्यक्ष पा
हाणारे होतों॥ १७ कां कीं तो देव बापापासून मान व
गौरव पावला। फार तेजस्वी गौरवाकडून इतकीहि वाणी त्या
विषयीं जाली। कीं हा माझा प्रीय पुत्र आहे। ह्यावर मी
फार संतोषीत जालों आहें॥ १८ आणि आह्मी त्याच्या सं
गतीं पवित्र डोंगरावर असून। ही आकाशांतून जालेली वाणी
ऐकिली॥ १९ आणि अधीक खचीत भविष्य गोष्ट आह्माजवळ
आहे। तिला। जसें काळोखाच्या ठिकाणीं प्रकाशणाऱ्या दिव्या
ला। तसें तुह्मी चित्त दिल्यास बरें करीत आहां। दिवस फा
पे तोंपर्यंत। आणि पाहांट तारा तुमच्यां अंतःकरणांत उगवे
पर्यंत [चित्त द्या॥] २० पहिलें हें जाणा। कीं शास्त्र लेखांतील को
णी भविष्य गोष्ट येकटीच उलगडण्याची नव्हे। २१ कां तर
भविष्य गोष्ट कधीं माणसाच्या इछेने जाली नाहीं। परंतु दे
वाचे पवित्र मनुष्य। पवित्र आत्म्याकडून चालविलेले असतां।
बोलले ※

पर्व २॥ १ परंतु लोकांमध्यें खोटेहि भविष्य भाषी होते।
तसें तुह्मामध्येंहि खोटे उपदेशक होतील। असे कीं नाशयुक्त
आउमत्तें गुप्तरूपें शिरवितील। आणि ज्या स्वामीने त्यांस वि
कत घेतलें त्याला नकारून। आपणांवर उतावळीचा नाश
आणितें। [असे होतील॥] २ आणि त्यांच्यां नासक्यांस ब
हुत अनुसरतील। त्यांकडून सत्यतेचा मार्ग निंदला जाईल॥
३ आणि लोभाने। कपटी गोष्टींकडून। ते तुमचा विक्रा घा
लतील। त्यांचा जो दंड पूर्वीं [नेमला।] तो उशीर करीत
नाहीं। आणि त्यांचा नाश सुस्ती धरीत नाहीं॥ ४ कारणं

कीं ज्यां दूतानी पाप केलें। त्यांस जर देवाने राखिलें नाहीं।
परंतु निबीड काळोखाच्यां बंधनांमध्यें अधोगतींत घालून। न्या
य ठरण्यासाठीं राखलें जाण्यास स्वाधीन केलें। ५ आणि जु
न्या जगाला राखिलें नाहीं। परंतु। अभक्तांच्या जगावर प्रळय
आणून। नोहा आठवा [माणुस।] पुण्य गाजविणारा याला रा
खलें। ६ आणि होणारे अभक्त यांचें उदाहरण देऊन। स
दोम व गमोरा हीं नगरें भस्म करून अगदी नाश करण्याने
दंडिलीं। ७ आणि [जो] पुण्यवान लोट त्यां शास्त्रभंगणा
ऱ्यांच्या कामातुरपणांतील वर्तणुकिकडून फार कष्टी झालेला।
त्याला सोडविलें। ८ कां तो पुण्यवान त्यांमध्यें राहात अस
तां। पाहाण्याने व ऐकण्याने [आपल्या] पुण्यवान जिवांत त्यां
च्यां नेमभंगीत कामांकडून। दिवसोदिवसीं त्रासलेला होता।
९ तर सुभक्तीमानांस छळणेंतून सोडवायाला। आणि अन्या
यी जे। त्यांस न्याय ठरण्याच्या दिवसीं शासन देण्यासाठीं राखा
याला प्रभू जाणता॥ १० आणि विशेषें। जे देहाच्या पाठीमागें
इंद्रीच्या हांवेने चालतात। आणि धनिपणाला धिःकारितात।
त्यांस [तसें राखायाला जाणता॥] ते उद्धट, स्वछंदी। गौरवां
स निंदून कांपत नाहींत॥ ११ ह्याविषयीं। [जे] दूत बळाने
व सत्तेने अधीक मोठे आहेत। ते प्रभूच्या जवळ त्यां [गौरवां]
वर निंदीत आरोप आणीत नाहींत॥ १२ परंतु हे। जसें
प्रकृतीने अज्ञानी जीव। धरण्यासाठीं आणि नाशासाठीं ज
न्मलेले तसे, ज्यांविषयीं जाणत नाहींत। त्यांविषयीं निंदी
तांना। आपल्याच नासकेपणाने पूर्ण नाश पावतील। १३ अ
न्यायाचें मोल त्यांस मिळेल॥ दिवसीं पोषून माजणें हें सुख।
असें ते मोजितात। ठिपके व डाग [आहेत।] आपल्यां फस
विण्यानी पोषून माजलेले असतां। तुमच्या संगतीं भोजन करि
तात॥ १४ त्यांचे डोळे व्यभिचारिणिने भरलेले। आणि पापा
पासून आटोप्रवत नाहींत, असे आहेत। अस्थीर प्राण्यांस मो
हितात। त्यांचें अंतःकरण लोभाच्या प्रकारांत यत्नाने वहिवा

टलेलें असें आहे। ते शापाचीं लेंकरें [आहेत।] १५ नीट मार्ग सोडून सोकार गेले आहेत। बसराचा बलाम याच्या मार्गानें अनुसरलेले [आहेत।] ह्यानें अन्यायाच्या मोलावर प्रीति केली। १६ परंतु त्याच्या उल्लंघण्याचा निषेध त्याला लागला। मुक्या पाठाळानें माणसाची बोली उच्चारून। भविष्यभाष्याच्या वेडेपणाला वर्जिलें॥ १७ ते पाण्यावांचून विहिरी आहेत। वादळानें हेलकावलेले ढग [आहेत।] सर्वकाळांपर्यंत त्यांच्या साठीं असी काळोखाची निबिडता ठेविली आहे॥ १८ कांतर [त्यां]पासून जे अगदी टळून गेले। [परंतु] चुकेने वर्ततात। त्यांस ते। व्यर्थपणाच्या फार फुगीर [गोष्टी] उच्चारण्यानें देहीक ह्यावांकडून [व] कामातुरपणांकडून मोहितात॥ १९ त्यांस मोकळेपणाचें वचन देतात। [परंतु] आपणच नाशकपणाचे दास आहेत। कां कीं ज्याकडून कोणी जिंकला गेला। त्याकडून तो दासपणांतहि घातला गेला आहे॥ २० तर प्रभू व तारणारा येशू ख्रीस्त याच्या वोळखिनें। जरीं ते जगाच्या छंदरी टाळून गेले। तथापि फिरोन जर त्यांमध्यें गुंतून जिंकले गेले। तर त्यांचीं जीं शेवटलीं। तीं पहिल्यांपेक्षां वाईट झालीं आहेत॥ २१ यास्तव कीं पुण्य मार्गाची वोळख झाल्यानंतर। आपणांस जो पवित्र आज्ञा दिल्ही होती तीजपासून मुरडणें। यापेक्षां वोळख नसणें त्यांस बरें होतें॥ २२ परंतु खऱ्या ह्मणिप्रमाणें त्यांस प्राप्त जालें आहे। कीं कुत्रें आपल्या ओकिकडे। आणि धुतलेली डुकरीण गाळांत लोळण्यास परतली आहे ※

पर्व ३॥ १ अहो प्रीय। आतां मी हें दुसरें पत्र तुह्मास लिहितों। ह्यांकडून तुमच्या उजळ मनाला सुचविण्यासे [असें] उठवितों। २ कीं पवित्र भविष्यभाष्यांकडून जीं वाक्यें पूर्वीं ह्मटलेलीं। त्यांची। आणि प्रभू व तारणारा याच्या आज्ञा प्रेषितांच्या आज्ञेची आठवण तुह्मी करावी॥ ३ प्रथम हें जाणावें। कीं दिवसांच्या शेवटीं थट्टेखोर येतील। आपल्यांच ह्यावांप्रमाणें चालतील।

४ आणि ह्मणतील। [कीं] त्याच्या येण्याचें वचन कोठे आहे? कां तर वाडवडील निजले। तेव्हांपासून अवघीं जशीं उत्पत्ती च्या प्रारंभापासून [होतीं।] तशीं राहातात॥ ५ हें तर इच्छेनें ते विसरतात। कीं देवाच्या शब्दाकडून आकाशें पूर्वींच होतीं। आणि पृथ्वी, पाण्यापासून व पाण्याकडून संगत राहात [होती।] ६ त्यानंतर तेव्हांचें भुवन पाण्यांत बुडविलें जाऊन नाश पावलें॥ ७ आणि आतांचीं आकाशें व पृथ्वी त्याच शब्दाकडून अग्नीसाठीं। न्याय ठरण्याचा व अभक्तमाणसांच्या नाशाचा [जो] दिवस। तोंपर्यंत राखलेलीं असतां सिद्ध ठेवलेलीं आहेत॥ ८ परंतु अहो प्रीय, ह्या येकाविषयीं तुह्मी विसरूं नका, कीं प्रभूजवळ येक दिवस हजार वर्षांसारिखा [आहे।] आणि हजार वर्षें येक दिवसासारिखीं [आहेत॥] ९ कित्येक जसें उशीर करणें मो जितात। तसें प्रभू वचनाविषयीं उशीर करीत नाहीं। परंतु तो आह्माविषयीं फार धीर धरितो। कोणांचा नाश व्हावा। ह्मणोन इच्छीत नाहीं। परंतु सर्वांनी ढळून पश्चात्तापास यावें। ह्मणोन [इच्छितो॥] १० तथापि जसा चोर रात्रीं [येतो।] तसा प्रभूचा दिवस येईल। त्यांत आकाशें सुसाट शब्दानें लयास जातील। आणि तत्वें जळण्यानें विरघळतील। आणि पृथ्वी, व तिजमधील कामें जाळून टाकलीं जातील॥ ११ तर हीं सर्व विर घळणार। यावरून तुह्मास कसें असावें लागतें! पवित्र वर्तणुकि नी व सुभक्तीनें [असावें।] १२ देवाच्या ज्या दिवशीं आका शें जळून विरघळतील। आणि तत्वें जळण्यानें रस होतील। त्याच्या येण्याची वाट पाहातां। उतावळीहि करीत [असावें॥] १३ तथापि त्याच्या वचनाप्रमाणें नवीं आकाशें व नवी पृथ्वी। ज्यांमध्यें पुण्य राहातें, त्यांची वाट आह्मी पाहातों॥ १४ या स्तव। अहो प्रीय। तुह्मी ह्यांची वाट पाहात असतां। असा नेट द्या। कीं आपण डागावांचून व खोडिवांचून [असे] सुख रूप त्याला सांपडावें। १५ आणि आमच्या प्रभूचा फार धीर तारण[रूप आहे।] ह्मणोन मोजा। तसें आमचा प्रीय भाऊ पा

ऊलस। याला ज्ञान दिल्हेलें, त्याप्रमाणें। त्यानेहि तुह्मास लि
हिलें आहे। १६ आणि तसें [त्याच्यां] अवघ्यां पत्रांमध्यें ह्यां
विषयीं ह्मटलें [आहे॥] त्यांमध्यें कित्येक गोष्टी समजायास अ
वघड आहेत। त्यांस, अशिक्षीत व अस्थीर जे, ते विपरी
त करितात। तसें दुसऱ्यां शास्त्रलेखांसहि। आपलाच नाश हो
ण्यास। [करितात॥] १७ तर अहो भाऊ, तुह्मी पूर्वीं जा
णत असतां, ह्यासाठीं जपा। कीं आपण शास्त्रभंगणाऱ्यां
च्या चुकिने संगतीं वोढले जाण्याने आपल्या स्थिरपणापासून
न पडावें। १८ परंतु सद्गुणाविषयीं, आणि आमचा प्रभू व
तारणारा येशू ख्रीस्त याला जाणण्याविषयीं तुह्मी वाढा॥
त्यासीं आतां, आणि सर्वकाळाच्या दिवसापर्यंत गौरव [अ
सो॥] आमेन ※

योहान्नाचें पहिलें पत्र॥

पर्व १॥ १ त्या जीवनाच्या शब्दाविषयीं। जें प्रारंभापासून
होतें। जें आह्मी ऐकिलें, जें आह्मी आपल्यां डोळ्यांनी पाहिलें।
जें आह्मी न्याहाळिलें। आणि आमच्यां हातांनी चांपसिलें आ
हे। तेंच [आह्मी सांगतों॥] २ कां। तें जीवन प्रगटलें गेलें।
आणि आह्मी पाहिलें आहे। आणि साक्ष देतों। आणि जें
अक्षयी जीवन बापापासीं होतें, परंतु आह्माजवळ प्रकाशीत
जालें, तें आह्मी तुह्मासीं सविस्तर सांगतों॥ ३ जें आह्मी
पाहिलें व ऐकिलें आहे, तें तुह्माजवळ ह्यासाठीं सविस्तर
सांगतों। कीं तुह्मासहि आह्मासीं गडीपण व्हावें। ह्मणजे आ
मचें हेंच गडीपण। बापासीं आणि त्याचा पुत्र येशू ख्रीस्त।

यांसीं [आहे॥] ४ आणि तुमचा आनंद पूर्ण व्हावा। म्ह
णोन आह्मी तुह्मांसीं हीं लिहितों ※

५ तर जो निरोप आह्मी त्यापासून ऐकिला। आणि
तुह्मास इविस्तर सांगतों, तो हाच आहे, कीं देव उजेड
[रूप] आहे। आणि त्याला कांहींच अंधार नाहीं॥ ६ ज
र आह्मी सांगतों। कीं आह्मास त्यासीं मळोपण आहे। त
थापि जर अंधारांत चालतों। तर आह्मी लबाडी बोलतों।
आणि सत्यता पाळीत नाहीं॥ ७ परंतु जसा तो उजेडांत
आहे। तसें जर आह्मी उजेडांत चालतों, तर आह्मास ये
कमेकांसीं मळोपण आहे। आणि त्याचा पुत्र येशू खीस्त
याचें रक्त आह्मास सर्व पापापासून शुद्ध करितें॥ ८ जर आ
ह्मी सांगतों, कीं आह्मास पाप नाहीं। तर आह्मी आपल्यांस फ
सवितों। आणि आह्मामध्यें खरेपण नाहीं॥ ९ जर आह्मी
आपलीं पापें पदरीं घेतों। तर तो आमचीं पापें क्षमा करा
वयास। आणि आह्मास सर्व अन्यायापासून शुद्ध करावयास।
विश्वासू व पुण्यवान आहे॥ १० जर आह्मी सांगतों। कीं
आह्मी पाप केलें नाहीं। तर आह्मी त्याला लबाड करितों।
आणि त्याची गोष्ट आह्मामध्यें नाहीं ※

पर्व २॥ १ अहो माझीं मुलें। तुह्मी पाप न करावें, म्ह
णोन मी हीं तुह्मांसीं लिहितों। परंतु जर कोणी पाप करि
तो। तर बापाजवळ आमचा अनुवादक, येशू खीस्त। [जो] पु
ण्यवान, तो आहे॥ २ आणि तो आमच्यां पापांविषयीं प्राय
श्चित्त आहे। आणि आमचीं यांविषयीं केवळ नव्हे। परंतु
संपूर्ण जगाचीं यांविषयीं ※ ३ आणि जर आह्मी त्याच्या आ
ज्ञा पाळितों। तर येणेंकरून आह्मी जाणतों। कीं आपण त्या
ला आणिलें आहे॥ ४ जो त्याच्या आज्ञा न पाळितांना म्ह
णतो। [कीं] म्या त्याला जाणिलें आहे। तो लबाड आहे। त्या
मध्यें खरेपण नाहींच॥ ५ परंतु जो कोणी त्याची गोष्ट पा
ळितो। त्यासीं देवाची प्रीति पूर्ण जाली आहे खरें। यावरून

आह्मी जाणतों। कीं आह्मी त्याकडे आहों॥ ६ जो बोल
तो। कीं आपण त्याकडे राहातों। त्याला हें लागतें। कीं ज
सें तो चालला होता। तसें आपणहि चालावें॥ ७ अहो
भाऊ, मी तुह्मासीं नवी आज्ञा लिहीत नाहीं। परंतु जी प
हिल्यापासून तुह्मास होती, ती जुनी आज्ञा॥ जी गोष्ट तु
ह्मी पहिल्यापासून ऐकिली आहे। तीच ती जुनी आज्ञा आहे॥
८ आणखी सांगतों। कीं मी तुह्मासीं नवी आज्ञा लिहितों। हें
त्याविषयीं आणि तुह्माविषयीं खरें आहे। कां तर अंधार हो
ऊन जातो, आणि खरा उजेड आतां प्रकाशतो॥ ९ जो
आपल्या भाउचा द्वेष करितांना ह्मणतो। कीं मी उजेडांत आ
हें। तो आतांपावेतों अंधारांत आहे॥ १० जो आपल्या
भाउवर प्रीति करितो। तो उजेडांत राहातो, आणि त्याला
अडखळा नाहीं॥ ११ परंतु जो आपल्या भाउचा द्वेष करि
तो। तो अंधारांत आहे। आणि अंधारांत चालतो। आणि
आपण कोठे जातो, हें त्याला कळलें नाहीं। कारण कीं अं
धारानें त्याचे डोळे आंधळे केले आहेत※

१२ अहो मुलें। त्याच्या नांवाकारणें तुमचीं पापें सो
डलीं आहेत। यास्तव मी तुह्मासीं लिहितों॥ १३ अहो बा
प। जो प्रारंभापासून, त्याला तुह्मी जाणिलें आहे, यास्त
व मी तुह्मासीं लिहितों॥ अहो नवे तरणे। तुह्मी त्या दु
ष्टाला जिंकिलें आहे। यास्तव मी तुह्मासीं लिहितों॥ अहो
बाळकें। तुह्मी बापाला जाणिलें आहे। यास्तव मी तुह्मासीं
लिहितों॥ १४ अहो बाप, जो प्रारंभापासून त्याला तुह्मी जा
णिलें आहे। यास्तव म्या तुह्मासीं लिहिलें आहे॥ अहो नवे
तरणे। तुह्मी बळकट आहां। आणि देवाची गोष्ट तुह्माम
ध्यें राहाती, आणि तुह्मी त्या दुष्टाला जिंकिलें आहे, या
स्तव म्या तुह्मास लिहिलें आहे※ १५ जग, आणि जगांत
जीं त्यांवर तुह्मी प्रीति करूं नका॥ जर कोणी जगावर
प्रीति करितो। तर बापाची प्रीति त्याला नाहीं॥ १६ का

रण कीं अवघें जें जगांत [आहे।] तें देहाची हांव। व डो
ळ्यांची हांव। व संसाराचें डंभ। हीं बापापासून नाहींत। परंतु
जगापासून आहेत॥ १७ आणि जग, व त्याची हांव होऊ
न जाती। परंतु जो देवाच्या इच्छेप्रमाणें करितो। तो सर्वकाळा
पर्यंत राहातो॥ १८ अहो बाळकें। समय शेवटील आहे।
आणि जसें तुह्मी ऐकिलें। कीं ख्रीस्तवैरी येत आहे, तसें
आतांच बहुत ख्रीस्तवैरी झाले आहेत। यावरून आह्मी
जाणतों। कीं समय शेवटील आहे॥ १९ ते आमच्या म
धून निघाले। परंतु ते आह्माकडील नव्हते। कां कीं जर ते
आह्माकडील असते। तर आह्मासहीत राहिले असते। परं
तु सर्व आमचे नव्हेत, असें प्रगट होण्यासाठीं [ते निघाले॥]
२० आणि जो पवित्र। त्यापासून तुह्मास अभिषेक आहे।
आणि तुह्मी सर्व जाणतां॥ २१ खरेपण तुह्मास कळलें ना
हीं। यावरून म्या तुह्मास लिहिलें असें नाहीं। परंतु यावरू
न। कीं तें तुह्मास कळलें, आणि कांहीं खोटेपण खरेपणांती
ल नाहीं ह्मणोन॥ २२ जो असें नकारितो। कीं येशू तो ख्री
स्त नाहीं। त्यावांचून लबाड कोण आहे? जो बापाला आणि पु
त्राला नकारितो। तोच ख्रीस्तवैरी आहे॥ २३ प्रत्येक जो
पुत्राला नकारितो। त्याला बापहि नाहीं॥ २४ यास्तव तुह्मी
जें पहिल्यापासून ऐकिलें। तें तुह्मामध्यें राहो॥ जें तुह्मी पहि
ल्यापासून ऐकिलें। तें जर तुह्मामध्यें राहातें। तर तुह्मीहि
पुत्रांत आणि बापांत राहाल॥ २५ आणि जें वचन त्यानें
आह्मास दिल्हें। तें हेंच, सर्वकाळ जीवन आहे॥ २६ जे तु
ह्मास फसवितात। त्यांविषयीं म्या तुह्मासीं हीं लिहिलीं आहे
त॥ २७ आणि जो अभिषेक तुह्मी त्यापासून पावलां आहां।
तो तुह्मामध्यें राहातो। आणि तुह्माला कोणी शिकवावें। हें
तुह्मास अगत्य नाहीं। केवळ जसें तो अभिषेक तुह्मास सर्वां
विषयीं शिकवितो तसें। आणि तो खरा आहे। खोटा नाहीं
च। आणि जसें त्यानें तुह्मास शिकविलें आहे, तसें तुह्मी

त्यांत राहा॥ २८ तर आतां अहो मुलें। त्याकडे राहा।
ह्मणजे जेव्हां तो प्रगट होईल। तेव्हां आह्मी निर्भयं
पावावें। आणि त्याच्या येण्याच्या वेळेस। त्यापुढें लाजविलें न
जावें॥ २९ जर हें तुह्मास कळलें। कीं तो पुण्यवान आहे।
तर तुह्मी हें जाणतां। कीं प्रत्येक जो पुण्य करितो। तो त्या
कडून जन्मलेला आहे ※

पर्व ३ ॥ १ आह्मी देवाचीं लेंकरें ह्मटलीं जावीं। यां
त बापानें केवढी प्रीति आह्मावर ठेविली। हें तुह्मी पाहा।
जग आह्मास ह्यासाठीं जाणत नाहीं। कीं त्यानें त्याला जा
णिलें नाहीं॥ २ अहो प्रीय। आह्मी देवाचीं लेंकरें आहों।
परंतु आह्मी काय होऊं। हें अजून दिसत नाहीं। तथापि
आह्मी जाणतों। कीं जेव्हां तो प्रगटेल। तेव्हां आह्मी त्या
च्या सारिखे होऊं। कां तर जसा तो आहे। तसा आह्मा
स दिसेल॥ ३ आणि ज्या प्रत्येकाला त्यावरील ही आशा
आहे। तो आपणाला सोंवळा राखितो। जसें तोहि सोंवळा
आहे तसें॥ ४ प्रत्येक जो पाप करितो। तो शास्त्रभंगहि क
रितो। पाप शास्त्रभंगच आहे॥ ५ आणि त्यानें आमचीं पापें
हरावीं। ह्मणोन तो प्रगट जाला होता। हें तुह्मी जाणतां।
आणि त्याला पाप नाहीं॥ ६ प्रत्येक जो त्याकडे राहातो।
तो पाप करीत नाहीं। प्रत्येक जो पाप करितो। त्यानें त्या
ला पाहिलें नाहीं। आणि त्याला जाणिलें नाहीं॥ ७ अहो
मुलें। कोणी तुह्मास न फसवो। जसा तो पुण्यवान आहे।
तसा पुण्य करणाराहि पुण्यवान आहे॥ ८ जो पाप करितो।
तो द्याबलसाकडील आहे। कां तर द्याबलस प्रारंभापासून पा
प करितो। देवाचा पुत्र ह्यासाठींच प्रगट जाला। कीं त्यानें
द्याबलसाचीं कामें मोडावीं॥ ९ देवापासून जो प्रत्येक जन्मले
ला। तो पाप करीत नाहीं। कां कीं त्याचें बीज त्यांत रा
हातें। आणि त्याच्यानें पाप करवत नाहीं। कारण कीं तो
देवापासून जन्मला आहे ※ १० येणेकडून देवाचीं लेंकरें व

सैतानाचीं लेंकरें प्रगट आहेत। कोणी जो पुण्य करीत नाहीं।
आणि जो आपल्या भाउवर प्रीति करीत नाहीं। तो देवाकडील
नाहीं॥ ११ कां तर जो निरोप तुह्मी पहिल्यापासून ऐकि
ला, तो हाच आहे। कीं आह्मी परस्परांवर प्रीति करावी॥
१२ जसा काइन त्या दुष्टाकडील होता। आणि याने आप
ल्या भाउला वधिलें, तसे [आह्मी] नसावें। तर त्याने त्या
ला कोणत्या कारणावरून वधिलें? यावरून। कीं आपलीं का
में वाईट। आणि आपल्या भाउचीं पुण्यवान होतीं॥ १३ अ
हो माझे भाऊ। जर जग तुमचा द्वेष करितें। तर आश्च
र्य मानूं नका॥ १४ आह्मी मरणापासून जीवनाकडे पार उ
तरलों। हें आह्मी जाणतों। कां कीं आह्मी भाऊंवर प्री
ति करितों॥ जो आपल्या भाउवर प्रीति करीत नाहीं। तो
मरणांत राहातो॥ १५ जो कोणी आपल्या भाउचा द्वेष क
रितो। तो नरहिंसक आहे। आणि कोणत्या[हि] नरहिंसका
ला आपल्यांत अक्षय राहाणारा जीव। असा नाहीं। हें तु
ह्मास कळलें आहे। १६ आह्मी येणेकडून [देवाची] प्रीति
जाणिली आहे। कीं त्याने आह्माकरितां आपला प्राण दि
ल्हा। आणि भाऊंकरितां आह्मीहि प्राण द्यावयास देणेक
री आहों॥ १७ परंतु ज्याजवळ जगाचें उपजीवन असेल।
आणि आपल्या भाउला अगत्य आहे हें पाहातो। तथापि
आपले कळवळे त्याविषयीं बंद करितो। तर त्याजमध्यें देवा
ची प्रीति राहाती कशी? १८ अहो माझीं मुलें। आह्मी
[केवळ] शब्दाने। किंवा जिभेने प्रीति न करावी। परंतु कर
ण्याने आणि खरेपणाने [करावी॥] १९ आणि येणेकडून आ
ह्मी जाणतों। कीं आह्मी खरेपणाकडील आहों। आणि
त्याच्या समोर आपल्या अंतःकरणास आश्वासन देऊं॥ २० कां
कीं जर आमचें अंतःकरण दोष जाणतें, तर असें [आहे।]
कीं आमच्या अंतःकरणापेक्षां देव थोर आहे, आणि अवघीं
जाणतो॥ २१ अहो प्रीय, जर आमचें अंतःकरण आह्माव

र दोष ठरवीत नाहीं। तर आह्मास देवाजवळ बोलण्याचा
धीर आहे। २२ आणि आह्मी जें जें मागतों। तें तें त्यापा
सून पावतों। कां तर त्याच्या आज्ञा पाळितों। आणि जीं
त्याच्या दृष्टींत संतोषकारी, तीं करितों॥ २३ आणि हीच
त्याची आज्ञा आहे। कीं त्याचा पुत्र येशू ख्रीस्त, याच्या नां
वावर आह्मी विश्वास ठेवावा। आणि जसें त्यानें आह्मास आ
ज्ञा दिल्ही आहे। तसें आह्मी परस्परांवर प्रीति करावी॥
२४ आणि जो त्याच्या आज्ञा पाळितो। हा त्याकडे, आ
णि तोहि ह्याकडे राहातो॥ आणि त्यानें जो आत्मा आह्मा
स दिल्हा आहे। त्याकडून आह्मी जाणतों। कीं तो आह्मा
कडे राहातो ※

पर्व ४॥ १ अहो प्रीय। तुह्मी प्रत्येक आत्म्यावर विश्वा
स ठेवूं नका। परंतु आत्मे देवाकडील आहेत किंवा नाहींत।
याविषयीं त्यांस पारखा। कां तर बहुत खोटे भविष्यभाषी
जगांत निघाले आहेत॥ २ येशू ख्रीस्त देहानें आला आहे।
हें जो प्रत्येक आत्मा पत्करितो। तो देवाकडील आहे। या
वरून तुह्मी देवाचा आत्मा जाणा॥ ३ आणि येशू ख्रीस्त दे
हानें आला आहे, असें जो प्रत्येक आत्मा पत्करीत नाहीं।
तो देवाकडील नव्हे। आणि ज्या ख्रीस्तवैयाच्या [आत्म्या]
विषयीं तुह्मी ऐकिलें आहे, कीं येतो। तो हाच आहे। आ
[illegible]ा आतां इतक्यानें जगांत आहे ※ ४ अहो मुलें, तु
[illegible]वाकडील आहां। आणि तुह्मी त्यांस जिंकिलें आहे।
कां कीं जो जगाकडे। त्यापेक्षां जो तुह्माकडे, तो मोठा आ
हे॥ ५ ते जगाकडील आहेत। यास्तव जगाविषयीं बोलतात।
आणि जग त्यांचें ऐकतें॥ ६ आह्मी देवाकडील आहों। जो
देवाला जाणतो, तो आमचें ऐकतो। जो देवाकडील नाहीं,
तो आमचें ऐकत नाहीं। यावरून आह्मी खरेपणाच्या आत्म्या
ला व ठकविण्याच्या आत्म्याला जाणतों ※

७ अहो प्रीय। आह्मी परस्परांवर प्रीति करावी। कां

तर प्रीति देवाकडील आहे, आणि प्रत्येक जो प्रीति करि
तो। तो देवापासून जन्मलेला आहे। आणि देवाला जाणतो॥
८ जो प्रीति करीत नाहीं। तो देवाला जाणत नाहीं। कां
तर देव प्रीति[रूप] आहे॥ ९ आह्मावरील देवाची प्रीति
येणेकरून प्रगट जाली। कीं देवाने आपल्या येकुलत्या पुत्राला
जगांत यासाठीं पाठविलें। कीं आह्मी त्याकडून जगावें॥ १० यां
त प्रीति आहे। आह्मी देवावर प्रीति केली। असें नव्हे। प
रंतु असें। कीं त्याने आह्मावर प्रीति केली। आणि आपला
पुत्र आमच्यां पापांविषयीं प्रायश्चित्त [होण्याकरितां,] पाठवि
ला॥ ११ अहो प्रीय। जर देवाने आह्मावर येवढी प्रीति
केली। तर आह्मी येकमेकांवर प्रीति केली पाहिजे॥ १२ को
णी कधींहि देवाला पाहिलें नाहीं॥ जर आह्मी परस्परांवर
प्रीति करितों, तर देव आह्मामध्यें राहातो। आणि त्याची
प्रीति आह्मामध्यें पूर्ण जाली आहे॥ १३ आह्मी त्याकडे रा
हातों। आणि तो आह्माकडे। हें आह्मी ह्यावरून जाणतों।
कीं त्याने आपल्या आत्म्यांतील [कांहीं] आह्मास दिल्हें आहे॥
१४ आणि आह्मी पाहिलें आहे, आणि साक्ष देतों। कीं
बापाने आपल्या पुत्राला जगाचा तारणारा [होण्यास] पाठवि
लें आहे॥ १५ जो कोणी असें पत्करील। कीं येशू देवाचा
पुत्र आहे। त्याकडे देव राहातो। आणि तो देवाकडे [राहा
तो॥] १६ आणि आह्मावरची जी प्रीति देवाला आ[illegible]
ला आह्मी जाणलें, आणि विश्वासलों आहों॥ देव प्री[illegible]
आहे। आणि जो प्रीतींत राहातो, तो देवांत। आणि देव
त्यांत राहातो॥ १७ येणेकरून आह्मासीं प्रीति पूर्ण जालेली
आहे, कीं न्याय ठरण्याच्या दिवसीं। आह्मास धैर्य व्हावें। कां
तर जसा तो आहे, तसे आह्मीहि ह्या लोकीं आहों॥ १८ प्री
तींत भय नाहीं। परंतु पूर्ण प्रीति भयाला बाहेर घालती।
कां कीं भयाला पिडा आहे, आणि जो भितो। तो प्रीतिवि
षयीं पूर्ण जाला नाहीं॥ १९ त्याने पहिलें आह्मावर प्रीति

केली। यास्तव आह्मी त्याजवर प्रीति करितों॥ २० जर को
णी सांगतो। कीं मी देवावर प्रीति करितों, तथापि जर आ
पल्या भाउचा द्वेष करितो। तर तो लबाड आहे। कां तर
जो आपल्या ज्या भाउला आपण पाहिलें। त्याजवर प्रीति क
रीत नाहीं। त्याच्याने। ज्या देवाला आपण पाहिलें नाहीं। त्या
जवर प्रीति कसें करवती? २१ आणि जो देवावर प्रीति क
रितो। त्याने आपल्या भाउवरहि प्रीति करावी। ही आज्ञा
त्यापासून आह्मास आहे ※

पर्व ५॥ १ येशू तो खीस्त आहे, असें जो कोणी वि
श्वासतो। तो देवापासून जन्मलेला आहे। आणि प्रत्येक जो
जन्मविणाऱ्यावर प्रीति करितो। तो त्यापासून जन्मलेला यावर
हि प्रीति करितो॥ २ जेव्हां आह्मी देवावर प्रीति करितों,
आणि त्याच्या आज्ञा पाळितों, तेव्हां त्यावरून आह्मी जाणतों।
कीं आह्मी देवाच्यां लेंकरांवर प्रीति करितों॥ ३ कां तर ही
च देवावरची प्रीति आहे। कीं आह्मी त्याच्या आज्ञा पाळाव्या।
आणि त्याच्या आज्ञा भारी नाहींत। ४ यास्तव कीं जें कां
हीं देवापासून जन्मलेलें। तें जगाला जिंकितें। आणि जो ज
य जगावर झाला। तो *हाच। आमचा विश्वास आहे॥ ५ जो
विश्वासतो। कीं येशू देवाचा पुत्र आहे। त्यावांचून जो जगा
ला जिंकतो। तो कोण आहे? ※ ६ जो पाण्याने व रक्ताने
आला। तो हाच। येशू खीस्त आहे। पाण्याने केवळ नव्हे। प
रंतु पाण्याने व रक्ताने। आणि जो साक्ष देतो। तो आत्मा आहे।
कारण कीं आत्मा तो सत्यता[रूप] आहे॥ ७ कां तर
[आकाशांत तिघे साक्ष देणारे। बाप। शब्द। व पवित्र आत्मा
असे आहेत। आणि हे तिघे येक आहेत॥ ८ आणि पृथ्वीं
त] तिघे साक्ष देणारे। आत्मा। व पाणी। व रक्त। असे आ
हेत: आणि हे तिघे येक असे आहेत॥ ९ जर आह्मी
माणसांची साक्ष घेतों। तर देवाची साक्ष अधीक मोठी आ
हे। तर जी साक्ष देवाने आपल्या पुत्राविषयीं दिल्ही। तीच

त्यांची साक्ष आहे॥ १० जो देवाच्या पुत्रावर विश्वास ठेवि
तो, त्याला आपल्यांतच साक्ष आहे। जो देवावर विश्वास ठे
वीत नाहीं त्याने त्याला लबाड केलें आहे। कां तर, जी सा
क्ष देवाने आपल्या पुत्राविषयीं दिल्ही आहे, तिजवर त्याने
विश्वास ठेविला नाहीं॥ ११ आणि ती साक्ष हीच आहे।
कीं देवाने आह्मास निरंतर जीवन दिल्हें आहे, आणि तें
जीवन त्याच्या पुत्राकडून आहे॥ १२ ज्याला पुत्र आहे, त्या
ला जीव आहे। ज्याला देवाचा पुत्र नाहीं। त्याला जीव ना
हीं॥ १३ निरंतर जीव तुह्मास आहे। हें तुह्मास कळावें।
आणि तुह्मी देवाच्या पुत्राच्या नांवावर विश्वास ठेवावा। ह्मणो
न ह्या हीं। देवाच्या पुत्राच्या नांवावर विश्वास ठेवणाऱ्यां तुह्मा
स। लिहिलीं आहेत॥

१४ आणि त्याजवळ बोलण्याचें जें अभय आह्मास आ
हे, तें हेंच आहे। कीं जर आह्मी त्याच्या इच्छेप्रमाणें कां
हीं मागतों, तर तो आमचें ऐकतो॥ १५ आणि जें जें आ
ह्मी मागतों, त्या त्यांत तो आमचें ऐकतो। हें जर आह्मा
स कळलें, तर जीं मागणीं आह्मी त्याजवळ मागितलीं। तीं
आह्मास प्राप्त होतात। हें कळलें आहे॥ १६ जर कोणी [हें]
पाहातो, [कीं] आपला भाऊ पाप करितो, [परंतु] तें पाप
मरण लागण्या येवढें नाहीं, तर त्याने मागावें। मग त्याला
ह्मणजे मरण लागण्या येवढें पाप जे करीत नाहीं। त्यांस
[देव] जीव देईल॥ मरण लागण्या येवढें पाप आहे। ह्या
विषयीं त्याने मागावें, असें मी ह्मणत नाहीं॥ १७ प्रत्येक
अन्याय पाप आहे। परंतु मरण लागण्या येवढें नाहीं। अ
सें पाप आहे॥ १८ हें आह्मास कळलें। कीं जो देवापासू
न जन्मलेला तो पाप करीत नाहीं। परंतु जो देवापासून ज
न्मला। तो आपणाला राखितो। आणि तो दुष्ट त्याला शि
वत नाहीं॥ १९ हें आह्मास कळलें, कीं आह्मी देवाकडील
आहों। आणि सगळें जग दुष्टपणयुक्त राहातें॥ २० आणि हें

आह्मास कळलें, कीं देवाचा पुत्र आला आहे। आणि, जो
खरा त्याला आह्मी जाणावें। ह्मणोन त्यानें आह्मास बुद्धी
दिल्ही आहे॥ आणि जो खरा त्याकडे आह्मी आहों। [ह्म
णजे] त्याचा पुत्र येशू ख्रीस्त याकडे। हाच खरा देव आणि
अक्षयी जीवन आहे॥ २१ अहो मुलें। तुह्मी आपणांस मूर्तीं
पासून राखा॥ आमेन ॥

योहान्नाचें दुसरें पत्र॥

१ निवडलेली स्वामीण, व तिचीं लेंकरें त्यांसीं वडील
[लिहितो॥] त्यां तुह्मावर मी खरेपणानें प्रीति करितों। आ
णि केवळ मी नव्हे। परंतु ज्या सर्वांनीं खरेपणाला जाणिलें।
तेहि [करितात।] २ जें खरेपण आह्मामध्यें राहातें। आ
णि आह्मापाशीं सर्वकाळापर्यंत होईल। त्यामुळें॥ ३ देव बापापा
सून। आणि प्रभू येशू ख्रीस्त जो बापाचा पुत्र। त्यापासून। खरे
पणानें व प्रीतिनें। कृपा। दया। कल्याण हीं तुह्मापाशीं व्हावीं ॥
४ जसी आह्मी बापापासून आज्ञा पावलों। तसें तुझ्यां
लेंकरांतील [कित्येक] खरेपणानें चालतां मला सांपडलीं, या
वरून मला फार संतोष जाला॥ ५ आणि आतां। हे स्वा
मिणी। मी तुला विनंती करितों, कीं आह्मी येकमेकांवर प्री
ति करावा। मी तुला नवी आज्ञा लिहितों, असें नव्हे, परंतु
जी आह्मास पहिल्यापासून जाली, तिच्या प्रमाणें॥ ६ आ
णि हीच प्रीति आहे, कीं आह्मी त्याच्यां आज्ञांप्रमाणें चा
लावें। हीच आज्ञा आहे, जसें तुह्मी पहिल्यापासून ऐकिलें
आहे तसें, कीं आह्मी तिच्या प्रमाणें चालावें॥ ७ कां त
र बहुत फसविणारे जगांत आले आहेत। येशू ख्रीस्त देहानें

आला असें पत्करीत नाहींत। असा जो तोच फसविणारा व ख्री
स्तवैरी आहे॥ ८ तुह्मी आपल्याविषयीं असें न्याहाळा। कीं
जीं आह्मी केलीं आहेत, तीं आह्मी न गमवावीं। परंतु कामा
चें पूर्ण फळ पावावें॥ ९ जो कोणी उल्लंघन करितो। आणि ख्री
स्ताच्या उपदेशांत राहात नाहीं। त्याला देव नाहीं। जो ख्रीस्ताच्या
उपदेशांत राहातो। त्याला बाप व पुत्रहि आहे॥ १० जर
कोणी तुह्माजवळ येतो, आणि हा उपदेश आणीत नाहीं,
तर तुह्मी त्याला घरांत घेऊं नका। आणि त्याचें क्षेम बो
लूं नका। ११ कां तर जो त्याला क्षेम बोलतो, तो त्या
च्यां वाईट कामांतील विभागी आहे※ १२ मला तुह्मांशीं ब
हुत लिहायाचीं होतीं। यास्तव कागद व शाई यांकडून [क
ळवायास,] म्यां योजिलें नाहीं। परंतु। आमचा आनंद पूर्ण
व्हावयास। मी तुह्माजवळ येईन। आणि तोंडोतोंड सांगेन,
असी आशा धरितों॥ १३ तुझ्या निवडलेल्या बहिणिचीं लेक
रें तुला क्षेम सांगतात॥ आमेन※

योहान्नाचें तिसरें पत्र॥

१ प्रीय गायसाठीं वडील [लिहितो॥] मी त्या तुजवर
खरेपणाने प्रीति करितों॥ २ हे प्रीय। जसा तुझा जीव सु
खाने चालतो। तसें अवघ्यांविषयीं। तुझें सुखाने चालावें आ
णि तुला समाधान व्हावें। ह्मणोन मी प्रार्थितों॥ ३ कां त
र। जसें तूं खरेपणाने चालतोस। तसें तुझ्या खरेपणाची साक्ष
भाऊनी येऊन दिल्ही। यावरून मला फार संतोष जाला॥
४ माझीं लेकरें खरेपणाने चालतात, हें म्यां ऐकावें, यांहू
न माझा अधीक संतोष नाहीं※ ५ हे प्रीय। तूं भाऊंजवळ

आणि परक्यांजवळ जें काम करितोस। तें विश्वासरूपें क- रितोस॥ ६ त्यांनी मंडळीच्या समोर तुझ्या प्रीतिविषयीं सा- क्ष दिल्ही आहे। त्यांस तूं देवाच्या योग्य प्रकारानें मार्गाविष यीं साह्य करण्यानें बरें करसील॥ ७ कारण कीं ते त्याच्या नांवासाठीं राष्ट्रांपासून कांहीं पावत नसतां। बाहेर गेले॥ ८ यास्तव आह्मी अशांस अंगीकारिलें पाहिजे। ह्मणजे खरे- पणाविषयीं आह्मी संगती कामकरी असावें ※

९ म्या मंडळीला लिहिलें आहे। परंतु जो त्यांजवर श्रे- ष्ठ असण्याची आवड धरणारा दियत्रेफेस। तो आमचा अंगी- कार करीत नाहीं॥ १० ह्यामुळें। जर मी येतों। तर त्याचीं कामें जीं तो करितो। त्यांची आठवण करीन॥ तो आह्मा- वर दुष्ट गोष्टींनी वटवटतो। आणि त्यांकडून तृप्त नसून तो आपण भाऊंचा अंगीकार करीत नाहीं। आणि जे [करायास] इच्छितात। त्यांस तो मना करितो। आणि मंडळींतून घालवि- तो॥ ११ हे प्रीय, जें वाईट। त्याचें नको। परंतु जें चांगलें त्याचें तूं अनुकरण कर॥ जो चांगलें करितो। तो देवाक- डील आहे। परंतु जो वाईट करितो। त्यानें देवाला पाहिलें नाहीं ※ १२ देमेत्रयसाची सर्वांकडून। आणि खरेपणच याक- डून साक्ष आहे। आणि आह्मीहि साक्ष देतों। आणि तुह्मास कळलें। कीं आमची साक्ष खरी आहे ※ १३ माझीं बहुत लिहावयाचीं होतीं। परंतु लेखणी व शाई यांकडून तुजसीं लिहायास मी इच्छीत नाहीं॥ १४ परंतु मी तुला लवकर पाहीन। आणि आपण तोंडोतोंड बोलूं, असी माझी आशा आहे॥ तुझें कल्याण [असो॥] जे मित्र। ते तुला क्षेम सांग- तात॥ मित्रांस नांवानें क्षेम सांग ※

यहूदाचें पत्र॥

१ देव [जो] बाप त्याकडून जे पवित्र जालेले, आणि
येशू ख्रीस्ताकडून राखलेले। [व] बोलावलेले, त्यांसीं। [जो]
येशू ख्रीस्ताचा चाकर व याकोबाचा भाउ यहूदा [तो लिहि
तो॥] २ दया, व कल्याण। व प्रीति। हीं तुह्मासीं फा
र होत जावीं ॐ
३ अहो प्रीय, समायीक तारणाविषयीं तुह्मास लिहा
याला सगळा सगट करीत असतां मला तुह्मासीं असें लि
हायाचें अगत्य जालें। कीं जो विश्वास पूर्वीं पवित्रांसीं
सोपला होता। त्यासाठीं तुह्मी फार झटावें। ह्मणोन ह्या हि
तोपदेश करावा॥ ४ कां तर कित्येक माणसें। जीं पूर्वीं ह्या
च दंडासाठीं लिहिलेलीं होतीं। तीं गुप्तरूपें शिरलीं आहेत॥
तीं अभक्त [आहेत।] आमच्या देवाच्या कृपेला कामातूरपण
रूपें पालटतात, आणि देव। जो एकला स्वामी त्याला। व
आमच्या प्रभू येशू ख्रीस्ताला नकारितात॥ ५ आणि, तुह्मास
पूर्वींपासून कळलें असतांहि। मी हें तुह्मास सुचवायाला इ
छितों। कीं प्रभूने। मिसर देशांतून लोकांचें तारण केल्यानं
तर। दुसरेदां अविश्वासी यांचा नाश केला॥ ६ आणि ज्या
दुतानी आपली पहिली स्थिति राखिली नाहीं। परंतु आप
ली वस्ती सोडिली। त्यांस मोठ्या दिवसांतील न्यायासाठीं,
त्याने निरंतर बंधनांमध्यें निबिड काळोखाखालीं राखिलें आहे॥
७ तसें, त्यांच्या सारिख्या प्रकाराने। सदोम व गमोरा। व
त्यांचीं चंऊकडील नगरें, संगयीने व्यभिचार करून, आणि
अन्य अंगाच्या मागें लागून। सर्वकाळच्या अग्नीदंड भोगण्या
नें उदाहरणरूप पुढें ठेवलीं आहेत ॐ ८ आणखी त्यांप्रमा

णींच होहि अति झोंपेंत असून, देहाला विटाळवितातच। आ
णि धनीपण तुच्छ करितात। गौरवांसहि निंदितात॥ ९ प
रंतु जो मुख्य दूत मिखाएल। त्याने जेव्हां सावलाशीं मोश्या
च्या शरिराविषयीं। निवाडा करीत असतां वाद केला। तेव्हां
तो निंदारूप आरोप त्यावर आणायाला धिरावला नाहीं।
परंतु बोलला। [कीं] प्रभू तुला धमकावो॥ १० तथापि हे
आपणांस जीं जीं कळलींच नाहींत, त्यां त्यांस निंदितात। आ
णि, निर्बुद्धि जीवांसारिखे, जीं जीं ते प्रकृतीनें जाणतात,
त्यांविषयीं आपणांस नासवितात॥ ११ त्यांस हायहाय। कां
तर ते काइनाच्या मार्गांत चालले आहेत। आणि बलामाच्या
मोलभुलिनें वाहात गेले आहेत। आणि कोराहाच्या उलटबो
लण्यांत नाश पावले आहेत॥ १२ हे संगतीं जेवीत असतां,
भयावांचून आपणांस पोषून। तुमच्यां प्रीतिच्यां जेवणांमध्यें
डाग आहेत। वाऱ्यानी फिरविलेले पाण्यावांचून ढग [आहे
त।] शुष्कफळाचीं, निर्फळ, दोनदां मेलेलीं। उपटलेलीं अशीं
झाडें [आहेत।] १३ समुद्राच्या विक्राळ लाटा। आपल्या ला
जा फेंसळून काढणाऱ्या। भोंवार जाणारे तारे, ज्यांसाठीं नि
बिड काळोख सर्वकाळ राखिला आहे, [असे आहेत॥]
१४ आणि आदामापासून सातवा [जो] हनोख, त्याने त्यां
विषयीं अशी भविष्यगोष्ट सांगितली होती। कीं पाहा, प्रभू
आपल्या दाहा हजारों पवित्र यांसुद्धां येतो। १५ हेतु हा।
कीं आपण सर्वांवर न्याय ठरवावा। आणि त्यांमधील जे स
र्व अभक्त, त्यांचीं सगळीं अभक्तीमान कामें। जीं त्यानी अ
भक्तरूपें केलीं, त्यांविषयीं, आणि जीं सगळीं कठोर [भा
षणें] अभक्त पाप्यानी त्याच्या विरुद्ध म्हटलीं, त्यांविषयीं त्यां
स कुंठीत करावें॥ १६ हे कुरकुर करणारे। व दैव खोड
णारे, आपल्यां छांदांप्रमाणें चालणारे असे [आहेत॥] आ
णि फार फुगीर जीं, तीं त्यांचें तोंड बोलतें। [आणि] ते
लाभासाठीं बाहेरल्या दृष्टीला चमत्कारीक मानितात॥

१७ परंतु अहो प्रीय. जीं वाक्यें आमच्या प्रभू येशू
खीस्ताच्या प्रेषितानीं पूर्वीं सांगितलीं. तीं तुह्मी आठवा। १८ कीं
त्यानीं तुह्मास असें सांगितलें। कीं शेवटाल समयीं थट्टेखोर,
आपल्यां अभक्तिमान् हावांप्रमाणें चालणारे. असे होतील ॥ १९ ते
असे आहेत। कीं आपण वेगळे होतात। जिवरूपी[हि]
त्यांस आत्मा नाहीं ※ २० परंतु अहो प्रीय। तुह्मी आपल्या
परम पवित्र विश्वासावर आपणांस रचीत असतां। पवित्र आ
त्याने प्रार्थना करीत असतां। २१ देवाच्या प्रीतींत आपणां
स राखा। सर्वकाळाच्या जीवनापर्यंत आमच्या प्रभू येशू खीस्ता
ची दया इची वाट पाहात [जा]॥ २२ आणि तुह्मी भेद क
रून, कोणावर दयाच करा। २३ परंतु दुसऱ्यांस अग्नींतून
हिस्कून भयाने तारा। आणि जें वस्त्र देहाकडून डागळलें आ
हे। त्याचा द्वेष करीत [जा ※] २४ आतां जो तुह्मास ठेंच
ळण्यापासून राखायाला, आणि आपल्या गौरवाच्या समोर
निर्दोषी [व] फार हर्ष युक्त ठेवायाला सामर्थ्यवान [आहे।]
२५ जो येकला ज्ञानी देव आमचा तारणारा, त्यासीं गौ
र व थोरपण, बळ व अधिकार आतां अवघ्यां काळांपर्यंत
हि [असो ॥] आमेन ※

प्रगटविणें ॥

पर्व १॥ १ येशू खीस्ताचें प्रगटविणें। जीं लवकर व्हावीं
लागतात। तीं देवाने आपल्यां सेवकांस दाखवायासाठीं। हें
त्याला दिल्हें। आणि त्याने आपला दूत पाठवून। त्याकडून
आपला सेवक योहान्न याला दर्शविलें॥ २ त्याने देवाची गो
ष्ट। आणि येशू खीस्ताची साक्ष। आणि जितकीं आपण पा

REVELATION.

दिलीं। यांचें प्रमाण दिल्हें॥ ३ जो वाचितो। आणि जे
ह्या भविष्यगोष्टी ऐकतात। आणि ह्यांत जों लिहिलीं। तीं
पाळितात। ते धन्य [आहेत।] कां तर समय जवळ आहे ※
४। ५ आशींत ज्या सात मंडळ्या। त्यांसीं योहान्न [लि
हितो॥] जो आहे, आणि होता। आणि होणार, त्यापासू
न, आणि त्याच्या सिंहासनासमोर जे सात आत्मे आहेत।
त्यांपासून। आणि येशू ख्रीस्त। जो विश्वासू साक्षी। जो मेले
ल्यांमधून प्रथम जन्मलेला। आणि पृथ्वींतील राजांचा अधिका
री। त्यापासून तुह्मावर कृपा। व कल्याण [असो॥] ज्याने आ
ह्मावर प्रीति केली। आणि आपल्या रक्ताने आमच्यां पापां
पासून आह्मास धुतलें। ६ आणि। देव ह्मणजे आपला बाप
यासाठीं। आह्मास राजे व उपाध्ये केले आहेत। त्यासीं गौ
रव व बळ सदां सर्वकाळांपर्यंत [असो॥] आमेन ※ ७ पाहा।
तो ढगांसहित येतो। आणि प्रत्येक डोळा त्याला पाहील।
आणि ज्यांनी त्याला भोसकिलें। [ते पाहातील॥] आणि पृ
थ्वींतील सर्व वंश त्याजविषयीं बडवून घेतील। होय। आमेन॥
८ मी आल्फा व ओमेगा। प्रारंभ व शेवट आहें। प्रभू
जो आहे। आणि होता। आणि होणार, जो सर्वसत्ताधा
री। तो [असें] ह्मणतो ※ ९ योहान्न, जो तुमचा भाऊ हि,
आणि संकटांतील। व येशू ख्रीस्ताचें राज्य व सहनता। यांती
ल संगती भागीदार। तों मी देवाच्या गोष्टिमुळें। आणि
येशू ख्रीस्ताच्या साक्षिमुळें। पात्मस ह्मटलेल्या बेटांत होतों॥
१० प्रभूच्या दिवसीं मी आत्मायुक्त होतों। आणि म्या आ
पल्या मागें शिंगशब्दासारिखी मोठी वाणी ऐकिली। ११ अ
सी कीं। मी आल्फा आणि ओमेगा। जो प्रथम आणि शेवटी
ल। तो आहें॥ आणि जें तूं पाहातोस, तें वहिमध्यें लिही।
आणि आशींतील ज्या सात मंडळ्या। ऐफेससांत। व स्मूर्णेंत।
व पेर्गामसांत। व थुवातीरसांत। व सार्दीसांत। व फिलादे
ल्फींत। व लावदिकींस। त्यांकडे पाठीव ※

१२ तेव्हां जी वाणी मजशीं बोलली। तिला पाहायास
मी मागें फिरलों। आणि मागें फिरल्यावर म्यां सोन्याच्या सा
त समया पाहिल्या॥ १३ आणि त्यां सात समयांमध्यें माण
साच्या पुत्रासारिखा। पायघोळ ल्यालेला। आणि स्तनांस
सोन्याच्या पट्टीनें वेष्टलेला। असा [म्यां पाहिला॥] १४ आ
णि त्याचें डोकें व केंस। जसी पांढरी लोंकर तसे, व
फेसासारिखे पांढरे [होते।] आणि त्याचे डोळे अग्नीच्या ज्वाळा
प्रमाणें। १५ आणि त्याचे पाय पितळेसारिखे। भट्टीमध्यें
जळते तसे। आणि त्याचा स्वर बहुत पाण्यांच्या शब्दाप्रमा
णें [होता।] १६ आणि त्याच्या उजव्या हातांत सात
तारे होते। आणि त्याच्या मुखांतून दुधारी तिखट तरवा
र निघत [होती॥] आणि त्याचें तोंड जसा सूर्य आपल्या
शक्तीनें प्रकाशतो। तसें [होतें॥] १७ आणि जेव्हां म्यां त्या
ला पाहिलें। तेव्हां मेलेल्यासारिखा मी त्याच्या पायांजवळ
पडलों। तेव्हां त्यानें आपला उजवा हात मजवर ठेवून म
ला म्हटलें, भिऊं नको। जो प्रथम व शेवटील, तो मी आ
हें। १८ आणि जो जगतो तो। मी मेलाहि होतों। आ
णि पाहे। सदां सर्वकाळांपर्यंत जिवंत आहें। आमेन। आ
णि लोकांतराच्या व मरणाच्या किल्ल्या मजपाशीं आहेत॥
१९ जों त्वां पाहिलीं, आणि जों आहेत, आणि ह्यांनंतर
जों होणार आहेत, तों लिही॥ २० ते सात तारे, जे त्वां
माझ्या उजव्या हातावर पाहिले, आणि त्या सोन्याच्या सात
समया। त्यांचें गौप्य [हेंच। कीं] सात तारे, ते त्यां सात
मंडळ्यांचे दूत आहेत। आणि ज्या सात समया त्वां पाहि
ल्या। त्या। सात मंडळ्या आहेत॥

पर्व २ ॥ १ एफेससांतील मंडळीच्या दूताला तूं लीही।
[कीं] जो आपल्या उजव्या हातांत ते सात तारे धरितो।
जो त्यां सोन्याच्या सात समयांमध्यें चालतो, तो हेंच म्ह
णतो। २ [कीं] तुझीं कामें। व तुझा श्रम। व तुझी सह

नता। कीं मला कळलीं। आणि हेंहि। कीं तूं वाइटांचें सु
ळं शकत नाहींस। आणि जे आपण प्रेषीत आहों। असें ह्मण
तात। परंतु नाहींत, त्यांची परीक्षा त्वां घेतली आहे।
आणि तुला ते लबाड सांपडले आहेत॥ ३ आणि त्वां सोसलें,
आणि तुला सहनता आहे। आणि माझ्या नांवामुळें त्वां श्र
म केले आहेत। आणि तूं थकला नाहींस॥ ४ तथापि तुजविरु
द्ध [हें] मला आहे। कीं त्वां आपली पहिली प्रीति सोडि
ली आहे॥ ५ यास्तव तूं कोठून पडलास। [हें] आठव।
आणि पश्चात्ताप कर। आणि पहिलीं कामें कर। नाहीं तर
मी तुजवर वेगें येईन, आणि त्वां पश्चात्ताप न केल्यास।
तुझी समई तिच्या ठिकाणांतून ढळवीन॥ ६ परंतु हें तुला
आहे, कीं निकलाई यांचीं कामें। जीं मीहि देषितों। तीं
तूं देषितोस॥ ७ आत्मा मंडळ्यांस काय ह्मणतो। तें ज्याला
कान आहे। तो ऐको॥ जो जिंकितो, त्याला जें जीवनी झा
ड देवाच्या बागामध्यें आहे। त्यापासून मी खाऊं देईन ※
८ आणि स्मूर्णेंतील मंडळीच्या दुताला लिही। [कीं] जो
पहिला आणि शेवटील, जो मेला होता, परंतु जिवंत जाला
आहे, तो हेंच ह्मणतो। ९ [कीं] तुझीं कामें, व संकट।
व दरिद्र। हीं मला कळलीं। तथापि तूं धनवान आहेस।
आणि जे। आपण यहूदी आहों। असें ह्मणतात। आणि
नव्हेत। परंतु सांटानाची सभा [आहेत।] त्यांची निंदा [म
ला कळली॥] १० जीं तूं सोसणार आहेस। त्यांतील येका
लाहि भिऊं नको। पाहा। तुह्मी पारखले जावे ह्मणोन द्याबलस
तुह्मामधील [कित्येकांस] बंदिशाळेंत टाकणार आहे। आणि
तुह्मास दाहा दिवसांचें संकट होईल॥ तूं मरणापर्यंत वि
श्वासू अस। मग मी तुला जीवनी मुगूट देईन॥ ११ आ
त्मा मंडळ्यांस काय ह्मणतो, तें। ज्याला कान आहे, तो
ऐको॥ जो जिंकितो। त्याला दुसऱ्या मरणाची बाधा होणा
र नाहीं ※

१२ आणि पेर्गामसांतील मंडळीच्या दुताला लिही। [कीं]
ज्याला दुधारी। तिखट तरवार आहे। तो हेंच ह्मणतो।
१३ तुझीं कामें मला कळलीं। आणि [हेंहि कीं] तूं को
ठे वस्ती करितेस। जेथें साटानाचें सिंहासन तेथें। आणि तूं
माझें नांव धरितोस। आणि, जेव्हां माझा विश्वासू साक्षी
आंतीपास। जो तुह्मामध्यें। जेथे साटान वस्ती करितो। ते
थें जिवें मारला गेला। त्यां दिवसांत त्वां मजवरील विश्वासाला-
नकारिलें नाहीं॥ १४ तथापि मला तुजविरुद्ध थोडकीं आ
हेत। असीं कीं [जे] बलामाचा उपदेश धरितात। ते तुझे
तेथें आहेत। त्याने बालाकाला इस्राएलाच्या संतानांपुढें अडा-
अडखळा घालायास उपदेशिलें। कीं [त्यांनी] मूर्तींचे नैवेद्य खा
वे। आणि व्यभिचार करावा॥ १५ आणि तसे। निकलाई
यांच्या उपदेशाला जे धरितात। तेहि तुझे आहेत। हें मी
द्वेषितों॥ १६ पश्चात्ताप कर। नाहीं तर मी तुजवर लवकर ये
तों। आणि माझ्या तोंडांतील तरवारीने त्यांशीं लढेन॥
१७ आत्मा मंडळ्यांस काय ह्मणतो। तें। ज्याला कान आ
हे, तो ऐको॥ जो जिंकितो। त्याला। गुप्त ठेवलेला मान्ना।
यांतून मी खाऊं देईन। आणि त्याला पांढरा खडा देई
न। आणि त्या खड्यावर नवें नांव लिहिलेलें [आहे।] ह्याला
घेणाऱ्याखेरीज। कोणि जाणत नाहीं ※

१८ आणि थुआतीरसांतील मंडळीच्या दुताला [असें]
लिही। देवाचा पुत्र। ज्याचे आपले डोळे अग्नीचा जाळ असे,
आणि आपले पाय पितळेसारिखे आहेत। तो हेंच ह्मणतो।
१९ तुझीं कामें, व प्रीति। व सेवा, व विश्वास, व तुझी सहनता।
आणि तुझीं कामें। आणि हीं शेवटलीं पहिल्यांपेक्षां अधी
क। हीं मला कळलीं॥ २० तथापि मला तुजविरुद्ध थोडकीं
असीं आहेत। कीं ईजेबेल। जी आपल्याला भविष्यभाषीण
ह्मणविती। त्या स्त्रीला तूं माझ्यां सेवकांस असें शिकवुं आ
णि भुलवुं देतोस, कीं [त्यांनी] व्यभिचार करावा। आणि मू

तींचे नैवेद्य खावे॥ २१ आणि तिने आपल्या व्यभिचाराचा प
श्चात्ताप करावा। ह्मणोन म्या तिला अवकाश दिल्हा। परंतु
तिने पश्चात्ताप केला नाहीं। २२ पाहा, मी तिला अंथ
रुणांत टाकीन। आणि तिच्या सहीत जे व्यभिचार करितात।
जर ते आपल्यां कामांचा पश्चात्ताप करीत नाहींत, तर त्यां
स मोठ्या संकटांत [टाकीन॥] २३ आणि मी तिच्यां लेंक
रांस मरणाने जिवें मारीन। आणि सर्व मंडळ्या जाणतील,
कीं जो कंवरांस आणि अंतःकरणांस शोधितो, तो मी आहें।
आणि तुह्मा प्रत्येकाला आपापल्यां कामांप्रमाणें देईन॥
२४ परंतु [जे] तुह्मी व थुवातीरसांतील दुसरे। जितके त्या
उपदेशाला बाळगीत नाहींत। आणि ज्यांनी सातानाचीं खो
लपणें। असीं ते ह्मणतात। तीं जाणलीं नाहींत। त्यां तुह्मा
स मी सांगतों। कीं मी तुह्मावर दुसरा भार घालणार ना
हीं। २५ केवळ जो तुह्मावर आहे। तो, मी येईन तोंपर्यं
त, धरा॥ २६ आणि जो जिंकितो। व माझीं कामें शेवट
पर्यंत पाळितो। त्याला मी राष्ट्रांवर अधिकार देईन। २७ आ
णि तो, लोखंडी काठीकडून, त्यांवर मेंढवळण करील। जसीं
मातीचीं भांडीं तसीं तो [त्यांस] चुरा करील। जसें मी
हि आपल्या बापापासून पावलों, तसें॥ २८ आणि मी त्या
ला पाहांटचा तारा देईन॥ २९ आत्मा मंडळ्यांस काय ह्मण
तो। तें। ज्याला कान आहे, तो ऐको॥

पर्व ३ ॥ १ आणि सार्दीसांतील मंडळी। इच्या दुताला
लीहीं। [कीं] ज्याला देवाचे ते सात आत्मे। आणि ते सा
त तारे आहेत। तो हींच ह्मणतो। तुझीं कामें मला कळलीं।
कीं तूं जगतोस। असें तुला नांव आहे। परंतु तूं मेला आ
हेस॥ २ तूं जागृत अस, आणि उरलेलीं जीं मरायास सि
द्ध आहेत। त्यांस बळकट कर। कां कीं। तुझीं कामें देवा
च्या दृष्टीस पूर्ण जालेलीं। [असीं] मला सांपडलीं नाहींत॥
३ यास्तव तूं कसें घेतलें आणि ऐकिलें। हींची आठवण क

र। आणि राख। व पश्चात्ताप कर। कां। जर तूं जागृत
न होशील। तर मी चोरासारिखा तुजवर येईन। आणि को
णत्या घटिकेस तुजवर येईन। [हें] तूं जाणणारच नाहींस॥
४ तथापि सार्दीसांत थोडकीं नांवें। ज्यानीं आपलीं वस्त्रें वि
टाळिलीं नाहींत। [अशीं] तुला आहेत। आणि ते मजसही
त पांढरींमय फिरतील। कां कीं ते योग्य आहेत॥ ५ जो
जिंकितो। तोच पांढरीं वस्त्रें ल्यालेला होईल। आणि मी
त्याचें नांव जिवनी पुस्तकांतून खोडणारच नाहीं। आणि मा
झ्या बापासमोर व याच्या दुतांसमोर। मी त्याचें नांव पत्क
रीन॥ ६ आत्मा मंडळ्यांस काय ह्मणतो, तें ज्याला कान
आहे। तो ऐको ॥

७ आणि फिलादेल्फींतील मंडळी इच्या दुताला लिही। [कीं]
जो पवित्र। जो खरा। ज्याला दावीदाची किल्ली आहे। जो उ
घडतो तेव्हां कोणी बंद करीत नाहीं। आणि जो बंद करितो तेव्हां
कोणी उघडीत नाहीं। तो हींच ह्मणतो। ८ तुझीं कामें मला
कळलीं। पाहा, म्या तुजपुढें उघडलेलें दार ठेविलें आहे। आ
णि कोणी त्याला बंद करायास शक्तीमान नाहीं। कारण कीं
तुला थोडी शक्ती आहे। [आणि त्वां माझी गोष्ट पाळिली,
आणि माझ्या नांवाला नकारिलें नाहीं॥ ९ पाहा। सैटाना
च्या सभेंतील। जे आपण यहूदी आहों असें ह्मणतात। आ
णि नव्हेत। परंतु लबाडी बोलतात। त्यांतून देईन। पाहा।
त्यांस असें करीन। कीं ते येतील। आणि तुझ्यां पायांसमो
र साष्टांग घालितील। आणि ते जाणतील कीं म्या तुज
वर प्रीति केली आहे। १० त्वां माझ्या सहनतेची गोष्ट पा
ळिली आहे। यास्तव। पृथ्वीवरील वसणाऱ्यांची परीक्षा करा
यास जी परीक्षेची घटिका संपूर्ण वस्तीवटीवर येणार आहे।
तिजपासून मीहि तुला पाळीन॥ ११ पाहा। मी लवकर ये
तो॥ कोणी तुझा मुगूट न घ्यावा। ह्मणोन जें तुझें आहे।
तें दृढ धर धर॥ १२ जो जिंकितो। त्याला मी आपल्या

देवाच्या देवळांत खांब करीन। अशा तो आणखी बाहेर नि घणारच नाहीं। आणि त्याजवर माझ्या देवाचें नांव। आणि माझ्या देवाचें। जें नवें यरूशलेम नगर। माझ्या देवापासून आकाशांतून उतरतें। त्याचें नांव। आणि माझें नवें नांव लिहीन॥ १३ आत्मा मंडळ्यांस काय ह्मणतो। तें। ज्याला कान आहे। तो ऐको॥

१४ आणि लादिकींत जी मंडळी तिच्या दूताला लिही। [कीं] जो आमेन। जो विश्वासू व खरा साक्षी। जो देवाच्या उत्पत्तीचें मूळ। तो हींच ह्मणतो। १५ तुझीं कामें मला कळलीं। कीं थंड नाहींस। आणि तप्तहि नाहींस। तूं थंड अथवा तप्त व्हावें। [हें] मला पाहिजे। १६ तर तूं कोंमट आहेस। ह्मणजे थंड नाहींस। आणि तप्तहि नाहींस। यास्तव मी आपल्या तोंडांतून तुला उलटून टाकणार आहें॥ १७ कां तर तूं ह्मणतोस। कीं मी धनवान आहें। आणि म्या धन मि ळविलें आहे। आणि मला कशाचें अगत्य नाहीं। आणि तु ला असें कळलें नाहीं। कीं तूं हालाचा। आणि करुणापात्र। आणि दरिद्री। आणि आंधळा। आणि नागवा आहेस॥ १८ मी तुला [असा] बोध करितों। कीं तूं धन मिळवावें। ह्मणोन अग्नींतून शोधलेलें सोनें माझ्याजवळून विकत घ्यावें। आणि तूं पांघरलें जावें। आणि तुझ्या नागवेपणाची लाज प्रगट न व्हावी। ह्मणोन पांढरीं वस्त्रें [घ्यावीं।] आणि तुला दिसावें। ह्मणोन सुर्मा [घेऊन] तुझ्या डोळ्यांस लेपन कर॥ १९ मी जितक्यांवर प्रीति करितों। तितक्यांचा निषेध आणि शिक्षा करितों। यास्तव तूं आवेशी हो। आणि पश्चात्ताप कर॥ २० पाहा। मी दारापाशीं उभा राहातों। आणि ठोकितों। जर को णी माझी वाणी ऐकेल। आणि दार उघडील। तर मी त्या च्या जवळ आंत येईन। आणि त्यासहीत जेवीन। आणि तो मजसहीत [जेवील॥] २१ जो जिंकितो। त्याला माझ्या सिंहा सनांत मजपाशीं बसूं देईन। जसें मीहि जिंकून आपल्या बापा

पाशीं, याच्या सिंहासनांत बसलों आहें तसें॥ २२ आत्मा मंडळ्यांस काय ह्मणतो, तें, ज्याला कान आहे, तो ऐको॥

पर्व ४॥ १ त्यांनंतर म्या अवलोकन केलें, तेव्हां पाहा, आकाशांत दार उघडलेलें [होतें।] आणि जी पहिली वाणी म्या ऐकिली। ती शिंग शब्दासारिखी मजसीं असी ह्मणाली, कीं इकडे चढ। मग, ह्यांपुढें जीं व्हावीं लागतात, तीं तुला दाखवीन॥ २ आणि तेव्हांच मी आत्मायुक्त जालों। तेव्हां पाहा, सिंहासन आकाशांत मांडलें गेलें। आणि सिंहासनावर बसणारा [होता॥] ३ आणि जो बसला, तो दिसण्यांत यास्फे व अकीक पाषाणासारिखा होता॥ आणि सिंहासनाभोंवतें मेघधनुष्य, दिसण्यांत पाचेसारिखें [असें होतें॥] ४ आणि सिंहासनाभोंवतें चोवीस सिंहासनें [होतीं॥] आणि त्यां सिंहासनांवर चोवीस वडील बसलेले म्या पाहिले॥ ते पांढरीं वस्त्रें ल्यालेले, आणि त्यांच्यां डोक्यांवर सोन्याचे मुगूट होते॥ ५ आणि सिंहासनापासून विजा, व गडगडाट, व वाण्या निघाल्या। आणि अग्नीचे सात दिवे, जे देवाचे सात आत्मे आहेत, ते सिंहासनापुढें तेवत [होते॥] ६ आणि, सिंहासनापुढें, स्फटिकासारिखा, शिशाचा समुद्र [होता॥] आणि सिंहासनाच्या आंत, असे सिंहासनाभोंवतें, चार जीव, पुढें व मागें डोळ्यांनी भरलेले। [असे होते॥] ७ आणि पहिला जीव सिंहासारिखा, आणि दुसरा जीव वांसरासारिखा, आणि तिसऱ्या जिवाला माणसासारिखें तोंड होतें। आणि चवथा जीव उडत गरुडासारिखा [होता।] ८ आणि चार जीवांतील येक येकाला सा सा पंख। [आणि] सभोंवते व आंतून डोळ्यांनी भरले [असे] होते॥ आणि, प्रभू जो देव जो सर्वसत्ताधारी, जो होता, आणि आहे, आणि होणार, तो पवित्र, पवित्र, पवित्र, असें बोलतां, त्यांस दिवसां व रात्रीं विसांवा नाहीं॥ ९ आणि, सिंहासनावर जो बसतो, जो सदा सर्वकाळपर्यंत जगतो, त्याला जेव्हां ते जीव, गौरव व मान व आभार

स्तुति अर्पितात ॥ १० तेव्हां ते चोवीस वडील सिंहासनावरील बसणाऱ्या पुढें पडतात। आणि। जो सदां सर्वकाळांपर्यंत जगतो। त्याला भजतात। आणि। आपले मुगूट सिंहासनापुढें टाकून। बोलतात। ११ हे प्रभू, गौरव। व मान, व सामर्थ्य घ्यायास तूं योग्य आहेस। कां तर त्वां अवघीं उत्पन्न केलीं। आणि तुझ्या इच्छेकडून तीं आहेत। आणि उत्पन्न जालीं होतीं ॥

पर्व ५ ॥ १ आणि सिंहासनावरील बसणाऱ्याच्या उजव्याकडे पुस्तक। आंतून व बाहेरून लिहिलेलें। [आणि] सात शिक्क्यानी शिक्का केलेलें [असें।] म्या पाहिलें। २ तेव्हां बळकट दूत पाहिला। त्याने मोठ्या शब्दाकडून ललकारिलें। [कीं] तें पुस्तक उघडायास। म्हणजे त्याचे शिक्के फोडायास कोण योग्य आहे? ३ तेव्हां आकाशांत व पृथ्वींत।, व पृथ्वीखालीं। कोणीहि तें पुस्तक उघडायास। अथवा त्याला पाहायास शक्तिमान नव्हता ॥ ४ मग मी त्यामुळें फार रडलों। कीं तें पुस्तक। उघडायास। आणि वाचायास, आणि त्याला पाहायासहि कोणी योग्य सांपडला नाहीं ॥ ५ तेव्हां त्या वडिलांतील येक मला म्हणतो। तूं रडूं नको। पाहे, यहूदा वंशांतील जो सिंह आहे, जो दावीदाचें मूळ, त्याने तें पुस्तक उघडण्याने। म्हणजे त्याचे सात शिक्के फोडण्याने जिंकिलें आहे ॥ ६ तेव्हां म्या अवलोकन केलें। आणि पाहा। सिंहासनाच्या मध्यें असें त्यां चार जिवांच्या [मध्यें।] आणि त्यां वडिलांच्या मध्यें लाहान मेंढा उभा राहिलेला। तो वधलेल्या सारिखा [होता।] त्याला सात शिंगें। आणि सात डोळे होते। हे [डोळे] देवाचे जे सात आत्मे सर्व पृथ्वींत पाठविलेले। ते आहेत ॥ ७ तेव्हां त्याने जाऊन सिंहासनावरील बसणाऱ्याच्या उजव्याकडून तें पुस्तक घेतलें ॥ ८ आणि जेव्हां त्याने पुस्तक घेतलें। तेव्हां ते चार जीव, व चोवीस वडील त्या लाहान मेंढ्यापुढें पडले। प्रत्येकाला विणे। आणि सोन्याचीं पात्रें होतीं। त्यांत धुपद्रव्यें

भरलेलीं। तीं पवित्रांच्या प्रार्थना आहेत॥ ९ आणि ते नवें
गायन गातां बोलतात, [कीं] तूं तें पुस्तक घ्यायास। आ
णि त्याचे शिक्के उघडायास योग्य आहेस। कां कीं तूं व
धला गेलास। आणि तां। आपल्या रक्ताने आह्मास सर्व वंश,
व बोली, व लोक। व राष्ट्र। यांतून। देवासाठीं। विकत घे
तलें आहे। १० आणि आमच्या देवासाठीं। आह्मास राजे व
उपाध्ये केलें आहे। आणि आह्मी पृथ्वीवर राज्य करूं॥
११ तेव्हां म्या अवलोकन केलें। आणि सिंहासनाभोंवतें बहुत दू
त। व ते जीव। व वडील। यांचा शब्द ऐकिला। आणि
त्यांची गणती अयुतांचीं अयुतें, आणि हजारांचे हजार
होती॥ १२ ते मोठ्या शब्दाने बोलले। जो लाहान मेंढा व
धलेला तो। पराक्रम, व धन। व ज्ञान। व शक्ती। व मान।
व गौरव। व स्तुती घ्यायास योग्य आहे॥ १३ आणि प्रत्ये
क उत्पन्न वस्तु, जी आकाशांत। व पृथ्वींत। व पृथ्वीच्या खा
लीं आहे। आणि समुद्रावर जीं आहेत। आणि। त्यांमध्यें जीं
अवघीं यांस [असें] बोलतां म्या ऐकिलें। [कीं] सिंहासनावरी
ल बसणारा यासीं व लाहान मेंढ्यासीं स्तुति। व मान, व गौर
व, व बळ। सदां सर्वकाळांपर्यंत [होवो॥] १४ तेव्हां ते चार
जीव बोलले। आमेन। आणि ते चोवीस वडील पडले,
आणि जो सदां सर्वकाळांपर्यंत जगतो, त्याचें भजन त्यां
नी केलें ॥

पर्व ६ ॥ १ आणि जेव्हां लाहान मेंढ्याने येका शिक्क्याला
उघडिलें, तेव्हां म्या पाहिलें, आणि त्यां चार जीवांतील येका
चें म्या ऐकिलें। तो गडगडाट शब्दासारिखा बोलला, ये आ
णि पाहे॥ २ आणि म्या अवलोकन केलें, तेव्हां पाहा। पांढ
रा घोडा [होता।] आणि यावर जो बसलेला, त्याला धनु
ष्य होतें। आणि त्याला मुगूट दिल्हा गेला। आणि तो जिं
कीत, व जिंकायासाठीं निघाला ॥ ३ आणि जेव्हां त्याने दु
सरा शिक्का उघडला, तेव्हां म्या दुसऱ्या जीवाचें ऐकिलें। तो

बोलला। ये आणि पाहे॥ ४ तेव्हां दुसरा घोडा तांबडा नि
घाला। आणि याजवर जो बसलेला। त्याला पृथ्वीपासून शां
ती घेउं दिल्हें होतें। आणि असें। कीं त्यानी येकमेकांस व
धावें। आणि त्याला मोठी तरवार दिल्ही गेली ※ ५ आणि
जेव्हां त्याने तिसरा शिक्का उघडला। तेव्हां म्या तिसऱ्या जी
वाचें ऐकिलें। तो बोलला। ये आणि पाहे॥ आणि म्या अव
लोकन केलें। तेव्हां पाहा। काळा घोडा। आणि यावर जो
बसलेला। त्याच्या हातांत। तराजु त्याला होती॥ ६ आणि
म्या। त्यां चार जिवांच्या मध्यें वाणी ऐकिली। तो बोलली। [ये
क]पावलीला शेरभर गहूं। आणि तीन शेरभर जव [येक]
पावलीला। परंतु तेल व द्राक्षरस यांस तूं न नडावें ※ ७ आ
णि जेव्हां त्याने चवथा शिक्का उघडला। तेव्हां म्या चवथ्या
जीवाची वाणी ऐकिली। तो बोलला। ये आणि पाहे॥ ८ ते
व्हां म्या अवलोकन केलें। आणि पाहा। फिक्का घोडा। आणि
त्यावरील बसणारा [होता।] त्याचें नांव मरण। आणि त्या
सहीत लोकांतर पाठीमागें चाललें। आणि त्याला। तरवारि
ने। व दुकाळाने। व मरणाने। व पृथ्वींतील श्वापदानी माराया
चा अधिकार पृथ्वीच्या चवथाईवर दिल्हा गेला ※ ९ आणि
जेव्हां त्याने पांचवा शिक्का उघडला। तेव्हां। देवाच्या गोष्टीमुळें।
आणि आपल्यांजवळ जी साक्ष होती। तिजमुळें जे वधलेले।
त्यांचे प्राण यज्ञस्थंडिलाखालीं म्या पाहिले॥ १० आणि मो
ठ्या शब्दाने ते वोरडत बोलले। हे पवित्र व खऱ्या स्वामी।
न्याय ठरविणें। आणि पृथ्वीवरील राहाणाऱ्यांपासून आमच्या र
क्तपाताचें सूड घेणें। हीं कोठपर्यंत न करितोस? ११ आणि
त्यां प्रत्येकांस पांढरे झगे दिल्हे गेले। आणि त्यांस असें
ह्मटलें गेलें। कीं त्यानी। अद्याप थोडा वेळ विसांव्यांत राहा
वें। त्यांचे संगती चाकर। ह्मणजे त्यांचे भाऊ। जे त्यांच्या
हि सारिखे जिवें मारिले जाणार। असे ते पूर्ण होतील। तों
पर्यंत [राहावें ※] १२ आणि जेव्हां त्याने सहावा शिक्का उ

घडला, तेव्हां म्या अवलोकन केलें। आणि पाहा। मोठा भूमी
कंप जाला। आणि सूर्य। केंसाचें तरट असा काळा जाला।
आणि चंद्र रक्तासारिखा जाला॥ १३ आणि आकाशांतील
तारे। जसें अंजीर झाड मोठ्या वाऱ्याने हालविलें असतां,
आपलीं अकाळी फळें गाळितें, तसे पृथ्वीवर पडले॥ १४ आ
णि आकाश जसें गुंडाळलेलें पुस्तक। तसें निघून गेलें। आणि
प्रत्येक डोंगर, व बेट आपल्यां ठिकाणांतून ढळविलें गेलें॥
१५ आणि पृथ्वींतील राजे। आणि जे माहान। आणि जे
धनवान, आणि जे सहस्रपती। आणि पराक्रमी। व प्रत्येक
चाकर, व प्रत्येक स्वतंत्र। यानी आपणांस गुहांमध्यें। आणि
डोंगरांतील खडकांमध्यें लपविलें॥ १६ आणि ते डोंगरांस
व खडकांस बोलतात, [कीं] तुह्मी आह्मावर पडा, आणि
आह्मास सिंहासनावरील बसणाऱ्याच्या तोंडापासून। व त्या ला
हान मेंढ्याच्या रागापासून लपवा। १७ कां कीं त्याच्या रागा
चा मोठा दिवस आला आहे। आणि टिकायाची शक्ती कोणा
ला आहे?

पर्व ७॥ १ आणि त्यानंतर म्या चार दूत पाहिले।
ते पृथ्वीच्यां चार कोन्यांवर उभे राहिले, [आणि] त्यानी
पृथ्वींतील चार वाऱ्यांस असें धरिलें। कीं पृथ्वीवर। व समुद्रावर।
व कोणत्या झाडावर। वारा न वाहावा। २ आणि म्या दुसरा दुत
पाहिला। तो सूर्याच्या उगवतेपासून चढला। त्याजवळ जिवंत
देवाचा शिक्का होता। आणि ज्या चार दुतांस पृथ्वीला व समुद्राला
बाधूं दिल्हें होतें। त्यांस तो मोठ्या शब्दानें असा बोरडला। ३ कीं
आमच्या देवाच्यां सेवकांस त्यांच्यां कपाळांवर आह्मी शिक्का
मारूं, तोंपर्यंत तुह्मी पृथ्वीला, व समुद्राला, व झाडांसहि
बाधूं नका॥ ४ आणि ज्यांवर शिक्का जाला, त्यांची गणती
म्या ऐकिली। इस्राएल संतानांतील सर्व वंशांत, [येक]शें चवेता
ळीस हजारांवर शिक्का जाला। ५ यहूदा वंशांतील बारा हजारां
वर शिक्का जाला॥ रऊबेन वंशांतील बारा हजारांवर शिक्का जा

त्य॥ गाद्‌ वंशांतीं॰ बारा हजारांवर शिक्का जाला॥ ६ आशेर वंशांतील बारा हजारांवर शिक्का जाला॥ नाफ्ताली वंशांतील बारा हजारांवर शिक्का जाला॥ मनाश्शे वंशांतील बारा हजारांवर शिक्का जाला॥ ७ शिमोन वंशांतील बारा हजारांवर शिक्का जाला॥ लेवी वंशांतील बारा हजारांवर शिक्का जाला॥ इस्साखार वंशांतील बारा हजारांवर शिक्का जाला॥ ८ जबूलुन वंशांतील बारा हजारांवर शिक्का जाला॥ योसेफ वंशांतील बारा हजारांवर शिक्का जाला॥ बन्यामीन वंशांतील बारा हजारांवर शिक्का जाला ※

९ त्यांनंतर म्या अवलोकन केलें। तेव्हां पाहा। सर्व राष्ट्रें। व वंश। व लोक। व बोल्या। यांतील मोठा समुदाय। ज्याला कोणाच्याने मोजवलें नाहीं। ते सिंहासनापुढें। असे त्या लाहान मेंढ्याच्या पुढें उभे राहिले। ते पांढरे झगे ल्यालेले [होते।] आणि त्यांच्या हातांमध्यें खारकी डाहाळ्या होत्या॥

१० आणि ते मोठ्या शब्दाने असें ओरडले, कीं आमचा देव। जो सिंहासनावर बसतो। आणि जो लाहान मेंढा। त्याकडून तारण॥ ११ तेव्हां सिंहासन व वडील व चार जीव। यांभोंवते सर्व दूत उभे राहिले। आणि आपल्या तोंडांवर सिंहासनासमोर पडले। आणि देवाला भजोन १२ बोलले। आमेन॥ स्तुति। व गौरव। व ज्ञान। उपकार मानणें। व मर्यादा। व पराक्रम। व बळ। हीं सदां सर्वकाळांपर्यंत आमच्या देवाशीं [असोत॥] आमेन ※ १३ तेव्हां वडिलांतील येक उत्तर करोन मला बोलला। [कीं] जे पांढरे झगे ल्यालेले, हे कोण आहेत? आणि कोठून आले? १४ तेव्हां मी त्याला बोललों। हे प्रभू। तूं जाणतोस॥ तेव्हां तो मला बोलला, [कीं] जे मोठ्या संकटांतून आले। ते हे आहेत। आणि त्यांनी आपले झगे धुतले। आणि लाहान मेंढ्याच्या रक्ताने त्यांस पांढरें केलें आहे॥ १५ यास्तव ते देवाच्या सिंहासनासमोर आहेत, आणि ते। दिवसां व रात्रीं। त्याच्या देवळांत त्याची सेवा करितात॥ आणि जो सिंहासनावर बसतो। तो त्यांमध्यें

वसी करील॥ १६ ते आणखी भुकेले होणार नाहींत। आ
णखी तान्हेलेहि होणार नाहींत। आणि सूर्य किरण। अथ
वा कांहीं ऊन त्यांजवर पडणार नाहीं॥ १७ कारण कीं
सिंहासनाच्या मध्यावर जो तान्हान मेंढा। तो त्यांविषयीं मेंढपाळण
करील। आणि जीवंत पाण्यांच्यां झऱ्यांजवळ त्यांस नेईल।
आणि देव त्यांच्यां डोळ्यांपासून प्रत्येक अश्रू पुसून टाकील ॐ
पर्व ८ ॥ १ आणि जेव्हां त्यानें सांतवा शिक्का उघडला।
तेव्हां आकाशांत। सुमारें अर्धा होरा। शिवांती जाली॥ २ नं
तर जे सात दूत देवासमोर उभे राहिले। त्यांस म्या पाहि
लें। आणि सात करणे त्यांस दिल्हे गेले॥ ३ मग दूसरा दू
त आला। आणि। त्याला सोन्याचें धुपाटणें असतां। तो
खंडिलाजवळ उभा राहिला। आणि। सर्व पवित्रांच्या प्रार्थ
नांसहीत। सिंहासनाच्या समोरील सोन्याचें खंडील यावर त्यानें
अर्पावें। म्हणोन त्याला बहूत धूप दिल्हे गेले॥ ४ आणि
त्या दुताच्या हातापासून। धुपांचा धूर। पवित्रांच्यां प्रार्थनां
सहीत। देवासमोर चढला॥ ५ तेव्हां दुतानें धुपाटणें घेऊन।
आणि त्यांत खंडिलाचा अग्नि भरून। पृथ्वीवर टाकिला॥
तेव्हां वाण्या। व गडगडाट। व विजा। व भूमिकंप जाला॥
६ आणि ज्यां सात दुतांपासीं सात करणे होते। त्यांनी वा
जवायांसाठीं आपणांस सिद्ध केलें ॐ ७ आणि पहिल्या दुतानें
वाजविलें। तेव्हां रक्तानें भेळलेली गारावृष्टी। व अग्नी जाला।
आणि पृथ्वीवर पाडलीं गेलीं॥ तेव्हां झाडांचा तिसरा वां
टा जळून गेला। आणि प्रत्येक हिरवें रोंप जळून गेलें ॐ ८ म
ग दुसऱ्या दुतानें वाजविलें। तेव्हां जसा मोठा डोंगर अग्नीनें
जळत असतां। तसें [कांहीं।] समुद्रांत टाकलें गेलें॥
आणि समुद्राचा तिसरा भाग रक्त जाला॥ ९ आणि समुद्रां
तील उत्पन्न जालेलीं। ज्यांस जीव होते। त्यांचा तिसरा वां
टा मेला। आणि तारवांचा तिसरा वांटा नाश पावला ॐ
१० मग तिसऱ्या दुतानें वाजविलें। तेव्हां मोठा तारा दिव्यासा

रिखा जळतां तारा आकाशांतून पडला। आणि नद्यांच्या ति
सन्या वांट्यावर, व पाण्यांच्या झन्यांवर तो पडला॥ ११ आ
णि त्या तान्याचें नांव कडू दौणा ह्मटलें गेलें॥ आणि पाण्यां
चा तिसरा वांटा कडू दौणारूप जाला। आणि तीं कडू जाल्या
मुळें, पाण्यांकडून माणसांतील बहुत मेलीं ※ १२ मग चौ
थ्या दुताने वाजविलें। तेव्हां सूर्याचा तिसरा वांटा, व चंद्रा
चा तिसरा वांटा, व तान्यांचा तिसरा वांटा मारला गेला।
असें कीं त्यांचा तिसरा वांटा काळोखी जाला॥ आणि दिवसाचा
तिसरा वांटा प्रकाशला नाहीं। आणि रात्र तशीच ※
१३ तेव्हां म्या पाहिलें। आणि येक दुताचें ऐकिलें। तो म
ध्याकाशीं उडतां। मोठ्या स्वराने बोलला। [कीं] जे तीन दूत
वाजविणार आहेत। त्यांच्या करण्याच्या उरलेल्या वाण्या।
यांवरून पृथ्वीवरील राहणान्यांस हायहाय, हायहाय, हा
यहाय ※

पर्व ९॥ १ नंतर पांचव्या दुताने वाजविलें। तेव्हां ता
रा आकाशांतून पृथ्वीवर पडलेला म्या पाहिला। आणि अ
थांग खांचाडाची किल्ली त्याला दिल्ही गेली॥ २ तेव्हां त्या
ने अथांग खांचाड उघडलें। मग मोठ्या भटीचा। तसा धूर
खांचाडांतून चढला। आणि खांचाडाच्या धुराने सूर्य व अं
तरिक्ष काळोखमय जालीं॥ ३ आणि धुरांतून टोळ पृथ्वीव
र निघाले। आणि जसा भुमिवरील विंचूंस अधिकार आहे। त
सा त्यांस अधिकार दिल्हा गेला॥ ४ तेव्हां त्यांस असें ह्म
टलें गेलें, कीं पृथ्वीच्या गवताला, आणि कोणत्याहि हिर्वळिला,
आणि कोणत्याहि झाडाला न नडावें। केवळ ज्यां माणसांस जि
वंत देवाचा शिक्का त्यांच्या कपाळांवर नाहीं, त्यांस मात्र। ५ आ
णि असें त्यांस दिल्हें गेलें, कीं त्यानी ह्यांस जिवें न मारा
वें, परंतु पांच महिने ह्यानी पिडिलें जावें॥ आणि विंचु जे
व्हां माणसाला हाणितो। तेव्हांच्या पिडेप्रमाणें ह्यांची पिडा
[होती॥] ६ आणि त्यां दिवसांत। माणसें मरण शोधिती

ल, परंतु तें त्यांला मिळणार नाहीं। आणि तीं मरायाची
आस धरितील। परंतु मरण त्यांपासून पळेल॥ ७ आणि
त्या टोळांच्या प्रतिमा। लढाईसाठीं सिद्ध केलेल्या घोड्यांसा
रिख्या [होत्या॥] आणि सोन्याच्या सारिखे। तसे मुगूट त्यां
च्यां डोक्यांवर [होते॥] आणि त्यांचे तोंडवळे माणसांच्यां
तोंडवळ्यांसारिखे [होते॥] ८ आणि त्यांचे केंस बायकांच्यां
केंसांसारिखे होते। आणि त्यांच्या दांताख्या सिंहांच्यां सारि
ख्या होत्या॥ ९ आणि त्यांस चिलखतें लोखंडी चिलखतांसा
रिखीं होतीं। आणि त्यांच्यां पंखांचा अवाज। बहुत घोडे
लढाईंत धांवतां। यांच्या रथांच्या अवाजासारिखा [होता॥]
१० आणि विंचूसारिखीं त्यांस शेंपटें होतीं। आणि त्यांच्यां
शेंपुटांस नांग्या होत्या॥ आणि पांच महिने माणसांस नडावें।
[असा] त्यांचा अधिकार [होता॥] ११ आणि जो अधोग
तिचा दूत। तो त्यांच्यां वरील राजा होता। त्याचें नांव इब्री
रूपें अबाद्दोन। आणि हेल्लेनींत त्याला आपल्वोन नांव आहे॥
१२ येक हायहाय होऊन गेली। पाहा। आणखी यांपुढें दो
न हायहायी येतात॥ १३ नंतर साहाव्या दुताने वाजविलें।
तेव्हां देवासमोरील सोन्याचें खंडील। याच्यां चार शिंगांपासू
न; म्या येक वाणी ऐकिली। १४ तो। ज्या साहाव्या दुता
चा करणा होता। त्याला बोलली। [कीं] मोठी फरात नदी।
इजवर बांधलेले जे चार दूत। त्यांस सोडीव॥ १५ तेव्हां
ते चार दूत सुटले। यासाठीं ते सिद्ध जालेले [होते।] कीं
होरा व महिना व वर्ष। येथपर्यंत त्यानी माणसांतील तिस
ऱ्या वांट्याला जिवें मारावें॥ १६ आणि स्वार सैन्यांची गण
ती दाहा हजारांचे दोन दाहा हजार [होती॥] आणि त्यांची
गणती म्या ऐकिली॥ १७ आणि तसें म्या दृष्टांतामध्यें घोड्यां
स। आणि त्यांवरील बसणारे। यांस पाहिलें। त्यांचीं अग्नि
वर्णी। व जांभळी। व गंधकी चिलखतें होतीं॥ आणि घोड्यां
चीं डोकीं सिंहांच्यां डोक्यांसारिखीं [होतीं।] आणि त्यांच्यां

तोंडांतून अग्नी, व धूर, व गंधक निघाले॥ १८ या तीन्हीं
कडून, [ह्मणजे] अग्नी, व धूर, व गंधक, जे त्यांच्यां तों
डांतून निघाले, त्यांकडून माणसांतील तिसरा वांटा जिवें
मारिला गेला॥ १९ कां तर त्यांचे पराक्रम त्यांच्यां तोंडां
त, आणि त्यांच्यां शेंपुटांत आहेत। कां कीं त्यांचीं शेंपुटें सा
पांच्या सारिखीं, त्यांस डोकीं आहेत। आणि यांकडून ते न
डतात॥ २० तेव्हां उरलेलीं जीं माणसें त्यां पटक्यांकडून
जिवें मारिलीं न गेलीं, त्यानी आपल्यां हातांच्यां कामांविषयीं
पश्चात्ताप केलाच नाहीं, असा कीं त्यानी भुतें, आणि मुर्ती हे
व, जे सोन्यांचे, व रूप्यांचे, व तांब्यांचे, व धोंड्यांचे, व
लांकुडाचे, ज्यांस पाहायाची, आणि ऐकायाची, आणि चाला
याचीहि शक्ती नाहीं, त्यांस आपण न भजावें॥ २१ आणि त्या
नी, आपल्यां हत्यांविषयीं, आणि आपल्यां चेटकांविषयीं, आ
णि आपल्यां व्यभिचारांविषयीं, आणि आपल्यां चोऱ्यांविषयीं,
पश्चात्ताप केलाच नाहीं ※

पर्व १०॥ १ आणि म्या दुसरा बळकट दूत, आकाशां
तून उतरतां पाहिला, तो ढग पांघरलेला [होता,] आणि
